दिवाळी २०२२

# साहित्य

२०० रुपये

## स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल



# साहित्य

मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक

स्थापना : जानेवारी १९४७

---

**दिवाळी २०२२**

**संपादक**

नारायण लाळे

**सहसंपादक**

रेखा नार्वेकर

**साहाय्यक संपादक**

राजीव जोशी

डॉ. नरेंद्र पाठक

**प्रकाशक**

अशोक बेंडखळे

मुखपृष्ठ, आतील मांडणी, सजावट : सतीश भावसार / कवितांवरील चित्रे : श्रीधर अंभोरे

मुद्रितशोधन : ग्रंथाली

अक्षरजुळणी : ग्रंथाली, छपाई : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई-४०००३१

- **मूल्य रु. २००/-**
  वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. २००/- द्विवार्षिक वर्गणी रु. ४००/-
- धनादेश 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावाने असावा.
- NEFT S/B A/C No. 002200100046717
  IFSC : SRCB0000002
  Bank Name - The Saraswat Co-op. Bank, Girgaum



**व्यवस्थापकीय पत्ता :** मुंबई मराठी साहित्य संघ, साहित्य संघ मंदिर, डॉ. भालेराव मार्ग,
गिरगाव, मुंबई ४००००४. दूरध्वनी : २३८७६१५८, २३८५६३०३, ७३०४३६९३९६
इमेल : sahityasangha@gmail.com & sahityasangh@mtnl.net.in
वेबसाइट : www.mumbaimarathisahityasangh.com

**संपादकीय पत्ता :** १०४, सीतामाई, अयोध्या नगरी, मानपाडा रोड,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१. दूरध्वनी : ९९८७९२४१९९,
narayanlale@gmail.com



या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे. या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.



**सर्व हक्क प्रकाशकाकडे आहेत.**

# ।। संपादकीय ।।

'साहित्य' २०२२चा दिवाळी अंक, 'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल' विशेषांक म्हणून वाचकांसमोर सादर करताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे. हा आनंद मिळविण्यात आणि देण्यातही अनेकांचा सहभाग आहे. त्यात सहसंपादक म्हणून रेखा नार्वेकर, संपादनप्रक्रियेत सर्वतोपरी साहाय्य करणारे कविमित्र राजीव जोशी, अभ्यासक डॉ. नरेंद्र पाठक आणि प्रकाशक म्हणून मुंबई मराठी साहित्य संघाचे साहित्य शाखा कार्यवाह श्री. अशोक बेंडखळे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, साहित्य संघाच्या कार्याध्यक्षा उषा तांबे, प्रकाश पागेसर, प्रमुख कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव- गांधी, संघाच्या कार्यालयातील रजिता आणि उज्ज्वला चव्हाण या सर्वांच्या कष्टाचे फलद्रुप म्हणजे हा अंक आहे, असे मी म्हणेन.

'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल' हा विषय घेताना, हे शिवधनुष्य आहे, झेपणार नाही अशा नकारात्मक उद्गारांना सामोरे जात आम्ही मराठी साहित्याचे इंद्रधनुष्य हाती घेण्याचा नम्रतापूर्वक प्रयत्न केला आहे. त्यासाठी मराठी साहित्य आणि साहित्यसंबंधित एकूण २२ विषयांची आम्ही निवड केली आहे. यात सर्व विषय आले, असे आम्ही म्हणणार नाही. अनेक कारणांनी ते शक्यही होणार नव्हते. मराठी भाषेची व्याप्ती, समृद्धी आणि श्रीमंती इतकी असीम आहे की, साहित्यातील एकेका विषयावरही अनेक अनेक दिवाळी अंक निघू शकतात! तरीही या कठीण विषयनिवडीचे धाडस आम्ही केले आहे. या धाडसामागे, स्वबळ आणि अर्थातच साहित्य संघाची कार्यशक्ती असल्याचे वेगळेपणाने सांगण्याची आवश्यकता नाही.

'साहित्य' दिवाळी अंकाविषयी लिहिताना, माझ्यासमोर 'साहित्य'चा जानेवारी १९४७चा पहिला अंकही ठेवला आहे. मागे वळून पाहिलं की आपण कुठपर्यंत आलो आहोत त्याचा अंदाज घेता येतो. एकप्रकारे हे आत्मनिरीक्षणच म्हणावे. स्वातंत्र्योत्तर 'साहित्य'ची वाटचाल दृष्टिपथात घेण्याचा हा एक प्रयत्न. त्यानिमित्ताने वा.रा. ढवळे यांच्या संपादनाखाली निघालेल्या 'साहित्य' जानेवारी १९४७च्या अंकाची अनुक्रमणिका वाचकांच्या माहितीसाठी दिवाळी अंकात समाविष्ट केली आहे.

मराठी साहित्यसंबंधित कविता, नाटक, कथा, कादंबरी, समीक्षा, बालसाहित्य, दलितसाहित्य, विनोदीसाहित्य, या विषयांची स्वातंत्र्योत्तर वाटचाल दर्शवताना अनुवादित साहित्य, विज्ञानसाहित्य, वाचनसंस्कृती, प्रकाशन, साहित्य लेखनाची भाषा, पत्रकारिता, वाङ्मयीन संशोधन या विषयांचाही आम्ही विचार केला आहे. साहित्यासंबंधी अशा विविध विषयांची आखणी करताना, स्वातंत्र्योत्तर काळ आणि मराठी संतांची मूल्यदृष्टी या संतवाङ्मयसंबंधित लेखाचाही आवर्जून उल्लेख करावा लागेल. कविताविभागात, स्वातंत्र्योत्तर कालानुरूप काही पूर्वप्रसिद्ध प्रातिनिधिक कवितांचा समावेश केला आहे.

मराठी साहित्यक्षेत्रात प्रथम काव्य-नाट्याची निर्मिती झाली. त्यानंतर गोष्ट, म्हणजे कथेचा जन्म झाला. त्यानंतर कादंबरी, पुढे विनोदीसाहित्य, बालसाहित्य इ. साहित्यशाखांचा उदय झाला. हा क्रम लक्षात घेऊनच 'साहित्य' दिवाळी अंकाच्या अनुक्रमणिकेची रचना केली आहे. अनुक्रमणिकेचे महत्त्व अधोरेखित करण्याचा हा एक प्रयत्न आहे. चित्रकार सतीश भावसार यांनी विषयानुरूप चित्रित केलेले 'साहित्य'चे मुखपृष्ठ उल्लेखनीय ठरावे. चित्रातील पुस्तकांच्या रंगसंगतीत भारतीय तिरंगी झेंड्याचा संकेत मिळतो. मुखपृष्ठाइतकेच कोलाज पद्धतीने साकारलेले अंकाचे पाठपृष्ठही तितकेच महत्त्वाचे ठरावे. या कोलाजमध्ये, डॉ. अ.ना. भालेराव विशेषांक, जाने. १९४७चा 'साहित्य'चा पहिला अंक आणि २०२१चा दिवाळी अंक, अशी रचना केली आहे. जाने.१९४७च्या 'साहित्य'चे मुखपृष्ठ सुप्रसिद्ध चित्रकार एन. एस. बेंद्रे यांनी काढले आहे.

दिवाळी अंकांच्या संदर्भात संपादकाने कितीही पाठराखण केली तरी, वाचक सर्वश्रेष्ठ असतो. सर्व लेखक, अभ्यासक, चित्रकार, जाहिरातदार, मुद्रक, तसेच ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर, योगिता मोरे, मनीष पाटील, कवयित्री प्रज्ञा पवार, मीनाक्षी पाटील, येसू पाटील, अनिल गचके, समीक्षक देवानंद सोनटक्के, दत्तात्रय घोलप, पॉप्युलरचे श्री. मयेकर या सर्वांचे आभार मानून, सर्वांना दिवाळीच्या, तसेच भारतीय स्वातंत्र्य अमृतमहोत्सवाच्या शुभेच्छा देत, 'साहित्य' दिवाळी अंक वाचकांच्या हाती देत आहोत. धन्यवाद.

**संपादक - नारायण लाळे** **सहसंपादक - रेखा नार्वेकर** **राजीव जोशी**

मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक


# साहित्य : दिवाळी अंक २०२२ (नोव्हेंबर-डिसेंबर)

# ‘स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल’ विशेषांक

संपादक : नारायण लाळे ● सहसंपादक : रेखा नार्वेकर ● संपादन साहाय्य : राजीव जोशी

## अनुक्रम


- **स्वातंत्र्योत्तर मराठी काव्यप्रवृत्ती** / ३
  डॉ. राजशेखर शिंदे
- **स्वातंत्र्योत्तर मराठी नाट्यसृष्टीची वाटचाल** / ८
  डॉ. अशोक भाईडकर
- **स्वातंत्र्योत्तर मराठी कथा काही नोंदी, काही निरीक्षणे** / १८
  प्रा. डॉ. अजय देशपांडे
- **स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल** / २९
  डॉ. संदिप दळवी
- **स्वातंत्र्योत्तर विनोदी साहित्याची वाटचाल** / ३९
  सुभाष सुंठणकर
- **स्वातंत्र्योत्तर बालसाहित्याची वाटचाल** / ४६
  एकनाथ आव्हाड
- **समृद्ध तरीही दुय्यम लेखनप्रकार** / ५५
  अंजली कुलकर्णी
- **दलित साहित्य की आंबेडकरी साहित्य की बौद्ध साहित्य की बोधी साहित्य?** / ६१
  संजय पवार
- **स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि मराठी विज्ञानसाहित्य** / ६८
  अभिजित मुळ्ये
- **मराठी भाषेतील स्वातंत्र्योत्तर भाषांतरे : काही सकारात्मक निरीक्षणे** / ७३
  कृष्णा किंबहुने
- **स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षा वैविध्यपूर्ण आणि समृद्ध वाङ्मयप्रवाह** / ७६
  डॉ. राजेंद्र नाईकवाडे
- **चेहरा हरवलेली मराठी पत्रकारिता** / १०३
  विजय चोरमारे
- **साहित्यलेखनाची भाषा आणि संबंधित बदल** /
  प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख
- **स्वातंत्र्योत्तर काळ आणि मराठी संतांची मूल्यदृष्टी** / ११८
  डॉ. रवींद्र बेम्बरे
- **स्वातंत्र्योत्तर काळातील गझल** / १२४
  संगीता जोशी
- **स्वातंत्र्योत्तर मराठी कविता (१९४७–२०२१)** / १३६
  संपादन – प्रा. स्मिता पाटील
- **कविता** / १४६–१५२
  *संपादित कविता विभागात* – बहिणाबाई चौधरी, पु.शि. रेगे, नामदेव ढसाळ, नीरजा, नारायण कुलकर्णी कवठेकर, चंद्रशेखर सानेकर, दिनकर मनवर, प्रणव सखदेव यांच्या पूर्वप्रसिद्ध कविता आणि त्याचबरोबर अशोक बागवे, किरण येले, प्रा. प्रतिभा सराफ, सदानंद डबीर, प्रज्ञा पवार, मीनाक्षी पाटील, अशोक कोतवाल यांच्या कवितांचा समावेश आहे.
- **बदलते तंत्रज्ञान आणि मराठी ग्रंथप्रकाशन** / १५४
  सुशील धसकटे (हर्मिस प्रकाशन)
- **सार्वजनिक ग्रंथालय आणि वाचनसंस्कृती** / १६०
  श्याम जोशी
- **स्वातंत्र्योत्तर मराठी वाङ्मयातील संशोधनात्मक कार्य** / १६३
  डॉ. मधुकर केशव वर्तक
- **७५ वर्षांची ‘साहित्य’ची वाटचाल** / १७२
  रेखा नार्वेकर
- **मुंबई मराठी साहित्य संघाची स्वातंत्र्योत्तर वाटचाल** / १७८
  डॉ. उज्ज्वला मेहेंदळे
- **परिचय** / १८१–१८५
- **साभार पोच** / १८६



स्वातंत्र्योत्तर
मराठी
साहित्याची
वाटचाल

•

मराठी कविता

•

# स्वातंत्र्योत्तर मराठी काव्यप्रवृत्ती

**डॉ. राजशेखर शिंदे**




**मराठीच्या मध्ययुगीन काव्यावर लोकजीवनतत्त्वाचा, तत्त्वदर्शनाचा, आध्यात्मिक प्रबोधनाचा प्रभाव होता–आहे. तत्त्वभाष्य आणि जीवनोद्देशभाष्य यांच्या संकरातून संतवाणी अविश्रांतपणे झटत राहिली. कळकळ आणि तळमळ हा संतवाणीचा आत्मा. ज्ञानेश्वरांच्या गीताभाष्यात, नामदेवांच्या तळमळीत, एकनाथांच्या भारुडात, तुकोबांच्या गाथेत जनवात्सल्याची कळकळ आणि तळमळ जाणवते. त्या वात्सल्यमयी कळकळीशी आपण सारे आजही एकरूप, एकात्म होतो.**

**संत,** पंत, तंत आणि आधुनिक मराठी कविता. या काव्यपरंपरेचा विचार करता, त्यांच्या प्रकटीकरणाचे दोन स्पष्ट असे भाग जाणवतात; त्यांची स्पष्ट भेददर्शक आविष्काराची दरी दिसून येते. संतांच्या काव्यात विचार, आचार आणि जीवनविषयक चिंतन आहे. ती साम्यतत्त्वांत आणि निरपेक्ष भक्तिरसात भिजलेली कविता आहे. संत लोकविन्मुख न होता भक्तिरसाचे आत्मप्रकटीकरण करताना त्यांच्या काव्यातून दिसतात. संतांची वाट धरून निर्माण झालेले पंडिती काव्य भक्तिरसपरिपोष करणारे असले तरी त्यामध्ये आत्मानुभूती, आत्मप्रतीती प्रकर्षाने जाणवत नाही. याउलट रामायण–महाभारत व भागवतादी महाकाव्यांची सुरस, प्रासादिक आणि अलंकारमंडित ‘रचना’ पंडितांनी केली. ती रचना जरी असली तरी पंडितांनी लोकविन्मुख न होता, लोकांत प्रवचन करत राहिले. संतांच्या प्रकटीकरणाचाच भाग पंडितांमध्ये जाणवतो. आणि तंत म्हणजे शाहीर हे लौकिक जीवनात शृंगार हाच रसराज मानणारे. ह्या शाहिरांनी आणि त्यांच्या रचनांनी रणभूमीवर शौर्य गाजवणाऱ्या रणधुरंधरांच्या अंगात शिरशिरी भरवण्याचे काम कवनांतून केले.

संत-पंत-तंत या तिघांच्या रचनाविशेषांत महदंतर आहे; पण तिघांनी सादरीकरण केलेले होते. संतांच्या सादरीकरणात आणि पंडित व शाहिरींच्या सादरीकरणात जमीन-अस्मानाइतका फरक आहे. परंतु तिघांनी लोकसमुदायासमोर सादरीकरण केलेले आहे. या पार्श्वभूमीवर आधुनिक काव्य आविष्कारातून निर्माण झालेले काव्य आहे. म्हणून हे कार्य निर्मात्याच्या मनोधर्मातून, रसरागातून, लोकविन्मुख होऊन आविष्कृत झालेले आहे. आधुनिक काव्य समाजसन्मुख असले तरी त्यामध्ये व्यक्तिवाचित्वाचा भाग बराच प्रभावी ठरतो.

२.

मराठीच्या मध्ययुगीन काव्यावर लोकजीवनतत्त्वाचा, तत्त्वदर्शनाचा, आध्यात्मिक प्रबोधनाचा प्रभाव होता-आहे. तत्त्वभाष्य आणि जीवनोद्देशभाष्य यांच्या संकरातून संतवाणी अविश्रांतपणे झटत राहिली. कळकळ आणि तळमळ हा संतवाणीचा आत्मा. ज्ञानेश्वरांच्या गीताभाष्यात, नामदेवांच्या तळमळीत, एकनाथांच्या भारुडात, तुकोबांच्या गाथेत जनवात्सल्याची कळकळ आणि तळमळ जाणवते. त्या वात्सल्यमयी कळकळीशी आपण सारे आजही एकरूप, एकात्म होतो.

संतांची लोकांविषयीची कळकळ आणि वाणीमधून व्यक्त होऊन मग ती शब्दबद्ध झाली. 'शब्दांनो मागोती' या असा हा प्रवास होता. श्रोता म्हणजे जणू त्यांचा भक्त-शिष्य! त्याला गहन जगाची आणि जीवनाची महती सांगताना संत अक्षरश: बोलत, तत्त्व समजून सांगताना सहजतया निर्मिती घडत, त्यासाठी दृष्टांत देत. द्राष्टांतिकांची स्वतंत्र निर्मिती हीच संतांच्या प्रतिभेची अपूर्व निर्मिती. ती श्रोत्यांसमोर घडत आणि श्रोत्यांसमोरच दृष्टातांची उकल होई. त्यामुळे दृष्टांत आणि द्राष्टांतिक यांतील सायुज्यता समेवर असत. यात संत निवेदक असल्याने वैयर्थकता नव्हती. वैयर्थकता कशी असणार? अनुभूतीचा साक्षात्कार समष्टी पातळीवर येत असताना वैयक्तिकतेचा गंड त्यात नसायचा. त्यामध्ये स्वैरबंध नसून आत्मसाक्षात्काराची निर्गाठ असायची. त्यामुळे संतांचे काव्य मनामनाला जवळचे, आपुलकीचे वाटते. याचा अभाव आधुनिक काव्यात आहे. आधुनिक काव्यात लोकांत आहे. एकांतातून या काव्याची निर्मिती होतेय. हे आधुनिक काव्य समाजसन्मुख असले तरी त्यामध्ये व्यक्तिवाचित्वाचा भाग बराच प्रभावी ठरतो.

३.

संतसाहित्य लोकशिक्षण देणारे होते, असे म्हणता येईल. ज्ञानेश्वरांचे गीतेवरील भाष्य, नामदेवांची-एकनाथांची भारुडे, तुकारामांची गाथा हे सारे लोकशिक्षणच तर आहे. त्यांच्यासमोर श्रोता होता. तो श्रवण करत होता. वाचिकनिर्मिती सहजतया घडून येत असावी. संतांनी दिलेले जे दृष्टांत आहेत ते जीवनव्यापी विषय अध्यात्माला, आत्मतत्त्वाला, सृष्टीच्या रचैत्याच्या अस्तित्वाचा अर्थ सुलभ करण्यासाठी होते. या दृष्टांतांची निर्मिती संतांच्या प्रतिभेची अपूर्वता असली तरी ती अपूर्तता निर्माण करून जनमानसात कीर्ती प्राप्त व्हावी, यश प्राप्त व्हावे या सापेक्ष भावनेतून निर्माण झाली नव्हती. म्हणून तुकोबांनी 'आम्हा घरी शब्दचि धन' असे सहजतया म्हटले. ज्ञानेश्वरांनी याला 'येथ अभिप्रावो, अभिप्रावाते विये, भावाचा फुलोरा होत जाये मतिवरी' म्हटले आहे. संतांचे शब्द निराळे आहेत. त्यांची वाणी वेगळी आहे; परंतु शब्द आणि वाणीतला ओलावा समाजशिक्षण यासाठीचा होता. कारण संतांचे काव्य समूहमनाचे वेध घेऊन, लोकमनाचे वेध घेऊन प्रबोधनासाठी आणि सर्वांगीण प्रबोधनासाठी होता. आधुनिक सकल काव्य सर्वांगीण प्रबोधनाच्या उद्देशाने निर्माण झालेले दिसते.

आधुनिक काव्य व्यक्तित्वाची आहे. ते काव्य वाचताना, त्या काव्याचा आस्वाद घेताना त्यामध्ये समूहमनाचे, लोकमनाचे दर्शन अभावानेच घडते. त्यामध्ये भावना असते, भावभावनांच्या विकारांना आविष्कृत केलेले असते. भावना विचारांना बाजूला सारतात तेव्हा त्या समूहमनाच्या वा लोकमनाच्या नसतात. भावगर्तेत बुडालेल्यांच्या भावनांचे दिग्दर्शन घडलेले असते. दैनंदिन जगण्याचे उर्ध्वपातन कवितेत व्हायला पाहिजे असे भालचंद्र नेमाडे म्हणतात. ते केवळ भावनांच्या अनुषंगाने नव्हे तर त्यामागे व्यापक दृष्टी आहे, हे देखणीचे वाचन-पुनर्वाचन केल्यानंतर कळते. भावना विरून विचारांचे प्रचलन 'देखणी'तल्या कवितांत दिसते. शुद्ध भावकविता हीसुद्धा भावनांचे उन्नयन करणारी असते. भा.रा. तांबे यांची भावकविता मनाला सात्त्विक समाधान देणारी कविता वाटते. पु.शि. रेगे यांची शृंगाररसात भिजलेली भावकाव्याचे रूपदर्शन घडवणारी कविता वाटते. एककल्ली अनुभवाचे कलात्मकतेचे सौष्ठवपूर्ण विस्तारत जाणारे एकाच एका वलयात उठणारे विवरतरंग वाटणारी पु.शि. रेगे यांची कविता विचार देत नाही; पण शृंगारभावनांची

चाळवाचाळव करत नाही.

आधुनिक कवितेमध्ये भावगर्भता आणि अर्थगर्भता याला भावसंपन्नता आणि अर्थसंपन्नता असे म्हणतो, हे आहे. परंतु ही भावगर्भता आणि अर्थगर्भगता समाजहितैषी अभावेनच असते. संतकाव्यात कामनापूर्तीची आरती असते; पण संपूर्ण समाजाला हाक असणारी आधुनिक कविता आहे, असे म्हणवत नाही. केशवसुतांच्या काही कविता, सावरकरांच्या काही कविता, कुसुमाग्रजांच्या काही कविता, इतरही कवींच्या काही कविता संपूर्ण समाजाला आर्त हाक घालतात, संपूर्ण समाजाला सादरीकरणातून हेलावून समाजमनाचे सामान्यीकरण करण्याची क्षमता असलेल्या आहेत. जरूर. पण इतक्या प्रचंड निर्मितीमधून असे अपवाद, उदाहरण म्हणजे सकलत्व नव्हे. आधुनिक कवी समूहमन नसलेले किंवा समूहमनात नसलेले व्यक्तिगत यशापयशात जोखले जाणारे आणि लौकिक जीवनात रस असणारे आहेत. पारलौकिकातील तत्त्वाचा, चैतन्याचा ध्यास लागून त्याचा प्रसादांश शब्दकलेत लीलया उतरला असे क्वचित घडते. पारलौकिक अस्तित्वाचा शोध, विश्वनियंत्यांचा बोध या दोहोतून होणारा ब्राह्मस्वाद सहोदरपणा आला तो रवींद्रनाथ टागोरांना. आधुनिक मराठी कवींना टागोरांच्या पालवीचा स्पर्श झाला नाही. टागोरांत संगीत आणि भावना दोन्ही झंकारत होते आणि एकांतप्रिय नि:संगपणा त्यांना स्वात्मतत्त्वात विलीन होण्यास भाग पाडत होता. त्यांना कुसुमाग्रजांत स्वात्मतत्त्वात विलीन झाल्याची नि:संगता जाणवते; पण ते साामजिक दु:स्थितीचे विडंबन करते. 'विशाखा' आणि 'मुक्तायन'मधील काव्यात स्वात्मतत्त्वाची भंगलेली स्वप्ने विलोभनीय झाली आहेत. ही कुसुमाग्रजांत असलेली भावगर्भता विकारवासनाची भावगर्ता नव्हे. ती विशाखात स्वातंत्र्य आणि स्वराज्य यांची उद्घोषणा करणारी, त्वेषाने, जाज्वल्य अभिमानाने निवेदन करणारी आहे. तिथून कुसुमाग्रज आधुनिक काव्यशैलीत मुक्तायन करताना दिसतात. या 'मुक्तायन'च्या काव्यकाळात कुसुमाग्रज सामाजिक घटितांचे मोठ्या कलाकसबाने हताशपणे विडंबन करताना दिसतात. कुसुमाग्रजांच्या काव्यप्रतिभेच्या जाणिवेत समाजशीलतेची परिवर्तने जाणवतात.

संतवाणीचा, संतपरंपरेचा वसा घेतलेली प्रतिभा म्हणजे अरुण कोलटकरांचे काव्य. अरुण कोलटकरांची सुरुवातीची कविता नवकाव्याने भारीत जाणवत असली तरी ती स्वत:चा चेहरा घेऊन आलेली होती. 'इमारत', 'इराणी', 'घोडा' या कविता उत्तुंग इमलेच आहेत. त्यातील प्रतिमा आणि प्रतीके कोलटकरांच्या अनवटपणाची साक्ष देतात. 'इमारत'मध्ये प्रतिकात्मक रूपात कामभावना दिसते. सर्प कामभावनेचे प्रतीक. कामभावनेची खोल खोल विहीर पायरी नसलेली ती कशी खोदायची? माहिती नसताना; माहिती असताना फणा काढलेल्या सर्पाच्या पारंबीला धरून विहिरीत उतरतोच! पण नंतर कवितेला स्वतंत्र अनवट अशी वाट मिळालेली स्पष्ट दिसते. ही वाट नंतर कोणाला चोखाळणे जमलेले दिसत नाही. अनुकरणाला सुलभता हा विशेष असावा लागतो. तो अरुण कोलटकरांच्या कवितेत नाही. एक तर कोलटकरांची कविता देशोदेशी, ग्रंथोपग्रंथांचा धांडोळा घेऊन नव्याने नवलाईने अनेक तलम वस्त्र लेऊन जन्मते. तिचे आंतरवस्त्र हे तिचे बलस्थान आहे. हे आंतरवस्त्र म्हणजे कोलटकरांच्या काव्यातील आंतर लय, बाह्य लय कर्णमधुर, अवीट असते. परंतु बाह्य लय ही कानाला स्पष्ट जाणवत नसते. ती मनातल्या मनात आस्वादात ध्वनित होत राहते. ती निर्मितीमध्ये सहज नैसर्गिकपणे भिनलेले असते. उखाणे, प्रहेलिका, लोककथागीत, लोकगीत यांच्या कथनात-कहेनात असणारी लय कोलटकरांच्या कवितेत उठते. अनेक लयींच्या तारा ते छेडतात. 'चिरीमिरीत' ते ओवी छंदाची लय घट्ट धरतात, 'द्रोण'मध्ये महाकाव्याची कथन लय काढतात. 'भिजकी वही' ते तत्त्ववेत्त्याची तटस्थता साधत शोकाची, दु:खाची, आर्ततेची निवेदन लय सामावून घेतात. देशोदेशीच्या दंतकथा, आख्यायिका त्यांच्या काव्यात प्रत्यंतरास येतात. या साऱ्या गोष्टी प्रतीतीस येण्यासाठी विडंबन, उपहास यांचे ते काव्यात उपयोजन करतात. उदाहरणार्थ, 'काय डेंजर वारा सुटलाय' या कवितेतील लोककथन लय आणि उपहास :

अरे तुझी टोपी
तुझी टोपी गेली खड्ड्यात
कपाळ पहिलं संभाळ
काय डेंजर वारा सुटलाय
डोसक्यात कचरा
धूळ धूळ

किंवा 'खेकडे' कवितेत आलेली उपहारपर, उपमर्दपण तिरकस शैलीतील आंतरलय विशेष आहे :

''कुणावर टपलेत म्हणून काय विचारतोस
अरे तुझ्यावर

बघतायत बघ कसे
तुझ्याकडं बघतायत
आणखी कुणाकडं
कसे एकटक बसलेत''

बोलीचे सुंदर उपयोजन, बोलीत प्रश्न विचारण्याची आध्यात्मकता लोकधाटीचीच आहे. 'आडगावातल्या हाटेलात'सारख्या अनेक कवितांमध्ये उखाणे-प्रहेलिकांची आंतरलय उमटलेली जाणवते.

आडगावच्या हाटेलात
मरणाशेजारची खोली
माझी मांडतील खोली
तिथल्या भिंतीवरल्या पाली

चढेल, भारदार आवाजाची नादवती लय कसा घुमतो, हे कोलटकर फारच छान दाखवतात. कोलटकर 'द्रोण' परंपरेची अभंगशैली अप्रतिमरीत्या हाताळली आहे. अभंगशैलीत कधी षडाक्षरी, कधी अष्टाक्षरी तर लोकघाटीतील यमकाचा प्रभावी आविष्कार केला आहे. चैतन्य हा भारतीय परंपरेत महत्त्वाचा वाद आहे. १०७ रांडांना पंढरपूरला घेऊन निघालेला बडवा बळवंतबुवा चिरीमिरीत भेटतो. वारीत सोवळ्याओवळ्याच्या पलीकडे जाऊन अंत:करणातील विशुद्ध भक्तिभावाला सामान्य लोक स्त्री-पुरुष या शारीरपातळीच्या पलीकडे जाऊन महत्त्व देतात, त्याचे उन्नत असे दर्शन चिरीमिरीत घडते. रुक्मिणीच्या अनुषंगाने 'स्त्रीवादा'चे मुग्धपणे दर्शनही घडवतात. नर-मादीमधील दैहिक अनुभूती ही केवळ आपला वंश टिकवण्यासाठी नसते, तर आनंदप्राप्ती हा त्यातील मुख्य हेतू असतो. कोलटकरांच्या कवितेत लिंगभावदर्शक शब्द, गालीप्रदान शब्द सर्रास येतात. विप्रलंभ व संभोग शृंगार आविष्कृत करत नाहीत तर त्या मागून जीवनाचे कारुण्यदर्शक पाहतात.

अरुण कोलटकरांना भक्तिशैली आकृष्ट करते, महाकाव्य आकृष्ट करते. देशविदेशातील मेरी, लैला, अपाला, कसांड्रा, विपाशा, हेलन, कणगी, मैनून, हाडम्मा, रजनी, किम या मिथकरूपी स्त्रियाही त्यांच्या सहसंवेदनेने आकृत करून घेतात. तद्वतच दि.पु. चित्रे यांना खंडोबाचे, विठ्ठलाचे 'मिथक' आकृष्ट करते. कुठल्यातरी लांबच्या देशातल्या पॅरिस शहराच्या रस्त्यावर वारीच्या टाळ-मृदुंगाचा स्वर कानावर आदळतो - रामकृष्ण हरी! कोलटकर-चित्रे हे द्वैभाषिक कवीद्वय देशसीमांत मावणारे कवी नाहीत. ज्ञानेश्वर-तुकारामांनंतर हे विश्वचि माझे घर म्हणणाऱ्या कवींना देवांनीच खेळण्यासाठी विश्वघर दिले असे केशवसुती बोलीत हे कवी सांगतात. चित्र्यांच्या 'श्रीयंत्र' आणि अनेक कवितांत नादझंकार आहे.

महानगरी जीवन चित्र्यांच्या विशेष चिंतनाचा विशेष आहे. विठ्ठल, खंडोबा यांच्याविषयी सांगताना महाराष्ट्राचे दैवत खंडोबाच असल्याचे चित्रे सूचित करतात. विठ्ठल हा शेतकऱ्यांचा तर खंडोबा समस्त महाराष्ट्राचा, असे चित्र्यांचे सूत्र आहे. कोलटकर-चित्रे यांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीची व विदेशी संस्कृतीची आराधना केली तितकी बाकी कवींची मिळूनही होत नसावी.

प्रगत आणि गतिमान जीवनानुभूतीसह अनेक वाद व दर्शनेही काव्यानुभूतीत आधुनिक काळात येतात. विंदा, शरच्चंद्र मुक्तिबोध यांची यामध्ये भर निश्चित आहे. विंदा हे चांगल्या अर्थाने स्वत:ला पालटत राहिलेले कवी. त्यांची 'विरुपिका' ज्वलजहाल विडंबन करणाऱ्या आहेत.

नारायण सुर्वे आणि वसंत दत्तात्रय गुर्जर हे दोन कवी महानगरातील कामगार केंद्र मानणारे. गुर्जर हे सूक्ष्मदृष्टीचे कवी. सुर्वे हे चमकदार काव्यविधान करणारे कवी. कामगारांविषयी कळवळा असणारे आणि स्वत: कामगार-दु:ख भोगलेले. त्यामुळे अनुभूती विशेष. कामगारपक्षाचे काव्यनेतृत्व या कवीकडेच गेले. गुर्जर कामगारांचे दु:ख, वेदना विधानात्मक न करता प्रत्यक्ष दु:खाचे 'आँखों देखा' कथन करणारे. त्यांच्या 'गोदी' ह्या संग्रहात कामगारांचे जगणे वेगवेगळ्या गाड्यांशी जुळलेले कसे असते, ते गाड्यांच्या आवाजांद्वारे कथन केले; पण कोरडेपणा, अलंकारविरहित रंकबोली गुर्जरांनी जिवंत केली. सुर्व्यांपासून प्रेरणा मिळाली, ती भाषा व आशय अनुकरण सुलभ असल्याने.

आधुनिक काव्यात गीतांना मोठे स्थान प्राप्त झालेले आहे. ग.दि. माडगूळकर, शांताबाई शेळके, मंगेश पाडगावकर, ना.धों. महानोर यांची गीतरचना लोभस आहे. अर्थवाही, सुकुमार शब्दकळेंनी हा गीतताटवा टवटवीत, डवरता, अवीटही राहिला.

१९६० नंतरच्या साहित्यातील दलित साहित्याची आणि त्या आधीपासून वाटचाल करत असलेल्या ग्रामीण साहित्याची कवितेतील भर उल्लेखनीय आहे. नामदेव ढसाळांच्या कवितेने सारस्वतांची झोप उडवली. ढसाळांच्या रोखठोक सवालांच्या कविता, दया पवारांच्या 'कोंडवाड्या'चे दार किलकिले केले. दोन्ही कवींनी दलित

कवींत प्राण फुंकले. शब्दच नसलेल्या समाजमुखी जणू ज्वाला भडकल्यासारखा द्रोह दिसू लागला.

ग्रामीण कवितेने कृषिवलसंस्कृतीची प्रतिमा दुष्काळातल्याप्रमाणे रयाच गेल्यासारखी वाटते. ना.धों. महानोरांनी तो गारवा निसर्गप्रतिमांतून खेडूताच्या, शेतकऱ्यांच्या जगण्याची चिवटवृत्ती दाखवली. निसर्गप्रतिमांतून आनंदाचा अप्रतीहतपणा कसा ओसंडता असतो, हे चिरेबंदी बोलीत गोंदले.

'देखणी' एका कांदबरीकाराची अतिशय चांगली काव्यवृत्ती. काव्यविषय कथन करण्याची नेमाडे यांची पल्लेदार रचना, उत्तुंग प्रातिभ व्यक्तिमत्त्वाचे दर्शन 'देखणी' आशयविषयात होते. वसंत आबाजी डहाके, सतीश काळसेकर ह्यांनी काव्यजागर विशेष रीतीने केला.

स्त्रीवादी भूमिकेतून काव्यात भूमिका घेत आपला ठसा उमटवणाऱ्या कवयित्रींनी शब्दकळेची, भावजागृतीची रचना महत्त्वपूर्ण ठरली. अनुराधा पाटील, आसावरी काकडे, मल्लिका अमर शेख, अश्विनी घोंगडे इत्यादी.

संतांची कविता लोकांतून निर्माण झाली आहे. ती लोकांसाठी, लोकोद्धारासाठी हेच तिचे अंतिम सत्य होते. लोकांच्या उद्धारासाठी असते तेव्हा ती रचना प्रासादिक असते, सुगम्य असते. त्या काव्याचे आत्मतत्त्व स्फुरण पावणारे असते. ती म्हणजे संतांची रचना महाप्रबंधाच्या अंगाची असते. सतत विश्लेषण, शोध चालू असते. ज्ञानेश्वरीचा, तुकाराम गाथेचा शोध अजून झाला आहे, असे वाटतच नाही. त्या काव्याची प्रस्तुतता आजही आहे आणि उद्याही आहे. कारण त्यात सकलजन उद्धार आहे. याउलट आधुनिक काव्य संतांचे नसल्याने ते कोण्या एका व्यक्तीचे आहे, म्हणून त्यांचे व्यक्तिनिष्ठता हे प्रथम वैशिष्ट्य ठरते. संतवचनातील वस्तुनिष्ठता आधुनिक काव्याच्या रचनांत नाही. त्यामुळे अर्थबहुलता, वाढत अर्थवलयाचा विस्तार काव्यसौंदर्य जरूर वाढते. संतकाव्याच्या वाढत्या विश्लेषणामुळे, शोधामुळे जे सत्याचे सौंदर्य प्रकाशते ते शिवत्वाकडे नेणारे असते; परंतु आधुनिक काव्याचे वाढत जाणारे अर्थसौंदर्य आनंद-पर्यवसायी ठरते, मनाला बोध देणारे नसते.

संतसाहित्य, पंडिती साहित्य, शाहिरी वाङ्मय या साहित्याच्या परिवर्तनाप्रमाणे आधुनिक काव्यात आंतरपरिवर्तने दिसून येतात. साहित्यात होणारे बदल, परिवर्तन त्या काळाच्या समाजविस्तारानुसार, समाजाच्या विचारप्रवृत्तीनुसार, समाजमनाच्या विचारव्यूहानुसार होतात. आधुनिक काव्यात अल्पावधीत झालेले परिवर्तन, बदल समाजमनाच्या ठेवणीचे निदर्शकच म्हणता येईल.

**डॉ. राजशेखर शिंदे**
भ्रमणध्वनी - ७५८८३७३७१०

## 'साहित्य' त्रैमासिकासाठी साहित्य पाठवण्याबाबत सूचना

- 'साहित्य'करता लेखन पाठवताना, ते टंकलिखित अथवा संगणकाद्वारे मुद्रित केलेले असावे. लिखित स्वरूपात असल्यास, सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेले असावे.
- लेखन narayanlale@gmail.com अथवा sahityasangha@gmail.com यावर किंवा संपादकीय पत्त्यावर पाठवावे.
- सृजनात्मक, संशोधनात्मक लेखनाचे तसेच दर्जेदार, वैचारिक, ललित लेखनाचे स्वागत आहे.

## वाचक, वर्गणीदार यांना नम्र विनंती

'साहित्य' त्रैमासिक दर्जेदार लेखनाला प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करत आले आहे. यातील सातत्य टिकवण्यासाठी लेखनाची जशी गरज असते तशी वाचकाचीही गरज असते- विचार व साहित्यकला यांच्या सृजन-संवर्धनासाठी आपल्यासारख्या वाचकांची, वर्गणीदारांची 'साहित्य'ला गरज आहे - वर्गणी कुठल्याही अंकापासून भरता येते.




स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल


•

नाटक

•

# स्वातंत्र्योत्तर मराठी नाट्यसृष्टीची वाटचाल

डॉ. अशोक भाईडकर



**स्वातंत्र्योत्तर काळात व स्वातंत्र्यपूर्व काळातही अनेक लेखक एकतर पाश्चिमात्त्य देशांचा दौरा करून आलेले होते किंवा त्यांनी प्रामुख्याने इंग्लंडमध्ये नाटकांचे जे वेगवेगळे प्रयोग चालले होते. त्याचा अभ्यास केला होता. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात अनेक नाटककारावर पाश्चात्त्य रंगभूमीचा व नाटकांचा नकळत परिणाम झालेला दिसतो.**

**स्वातंत्र्योत्तर** मराठी नाट्यसृष्टीची वाटचाल म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ या दिवसापासून मराठी नाट्यसृष्टीने कशी वाटचाल केली असा होत नाही; तर स्वातंत्र्योत्तर व स्वातंत्र्यपूर्व अशी नाटकांची वाटचाल कशी झाली हे मला म्हणायचे आहे. मराठी नाटकांची मुहूर्तमेढ विष्णुदास भावे व अण्णासाहेब खाडिलकरांनी केली असा जो लोकांचा गैरसमज आहे, तो चुकीचा आहे. माझ्या 'दशावतार' या महाग्रंथात मी त्याचे विवेचन केले आहे.

प्राचीन काळापासून आपल्या देशात राजदरबारी किंवा देवांच्या उत्सवात नाटक करण्याची प्रथा होती. सुरुवातीची नाटके जरी संस्कृत भाषेत असलेली दिसत असली तरी त्याच सुमारास तत्कालीन अनेक लोकभाषांत मौखिक पद्धतीची नाटके होत होती व त्याकाळी नाट्यशास्त्राला वेदांचे महत्त्व आलेले दिसते.

नृत्य, गायन व नाटक या तिन्ही गोष्टींचा उल्लेख रामायण, महाभारत या ग्रंथात सापडतो. उत्कट देवांचा राजा इंद्र यांच्या दरबारात अनेक नृत्यनिपुण नट आणि नट्या होत्या असे दिसते. अप्सरा ह्या तर गणिका असून अभिनय व नृत्यनिपुण होत्या. तेहतीस कोटी देवतांबरोबर महाबलाढ्य

राक्षस, शूर-वीर-प्रतापी मानव यांच्यासाठीही स्वर्गात अप्सरांचे नृत्य व गंधर्वांचे व किन्नरांचे गायन, वादन होत होते असे दिसते. तर ब्रह्मदेवांनी देवांच्या, मानवांच्या व राक्षसांच्याही मनोरंजनासाठी नाट्यशास्त्र हा पाचवा वेद निर्माण केला. त्याचे जननत्व आपण भरताला देतो. पण प्राचीन ग्रंथाचा अभ्यास केला असता एकट्या भरताला नाट्यनिर्मिती करणाऱ्या ग्रंथाचे जननत्व देणे विसंगत वाटते. रामायणाच्या बाबतीतसुद्धा रामायण हे फक्त वाल्मीकीने लिहिले नसून फक्त कथावस्तू त्यांची असून बाकीची भव्य रचना अनेक ऋषींची असून अनेक शतके त्यात वेगवेगळ्या ऋषीने भर टाकून त्याची निर्मिती केली आहे. तसेच महाभारत फक्त व्यासांनी लिहिले नसून रोमहर्षासह अनेक ऋषींची त्यात भर पडली आहे.

यापमाणे स्वातंत्र्योत्तर काळात अनेक लेखकांनी नाट्यलेखनाचा प्रयत्न केला आहे. काही नाटकांवर पाश्चिमात्य नाटकांचा अनुनय झालेला दिसतो. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक छोट्या-मोठ्या लेखकांनी नाटके लिहिली आहेत. त्यात नानासाहेब शिरगोपीकरांची संतांवरच्या नाटकांची अजूनही कोणीही दखल घेतलेली दिसत नाही. नानासाहेब शिरगोपीकरांची संतांवर आधारीत 'गीता गाती ज्ञानेश्वर', संत तुकाराम, भावतोची देव, संत एकनाथ, संत गोरा कुंभार, संत नामदेव यांसारखी नाटके स्वातंत्र्योत्तर काळात खूप गाजली. त्यांच्या नाटकातील ट्रिक-सीन्सने तर नाटकांचा एक वेगळाच ढाचा तयार केला. त्याचे हजारोच्या संख्येने प्रयोग झाले. पण दुर्दैवाने पुस्तकरूपाने एकही पुस्तक माझ्या बघण्यात नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळातील सर्वात यशस्वी नाटककार म्हणून आपणास प्र.के. अत्रे यांचा उल्लेख करावा लागेल. खरंतर स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्र.के. अत्रे यांनी नाट्यलेखनाला सुरुवात केली. त्या काळात त्यांनी अनेक दर्जेदार नाटके लिहिली व व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी करून दाखवली. १९३३ साली अत्र्यांचे 'साष्टांग नमस्कार' हे नाटक रंगभूमीवर आले व ते तुफान गाजले. त्यानंतर त्यांनी 'घराबाहेर', 'भ्रमाचा भोपळा', 'लग्नाची बेडी', 'उद्याचा संसार', 'वंदे मातरम्', 'पराचा कावळा', 'मी उभा आहे', 'पाणिग्रहण', 'जग काय म्हणेल' ही नाटके स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई-पुण्याकडे खूप चालली. लग्नाच्या बेडीने तर हाहाकार केला. पद्मा चव्हाणसारख्या 'सेक्सी' अभिनेत्रीने तर पुरता बार उडवून दिला. समाजातील सो कॉल प्रतिष्ठित माणसांची तर त्यांनी बिनपाण्याने हजामत केली. स्वातंत्र्योत्तर काळात हे नाटक खूप चालले व व्यावसायिक वजाबाकीत ते सरस ठरले. स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांच्या नाटकांची यशस्वी वाटचाल चालूच होती. तर स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी अनेक दर्जेदार नाटके मराठी रंगभूमीसाठी लिहिली. 'कवडीचुंबक' हे त्यांचे नाटक त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळातील लिहिलेले पहिले नाटक आहे असे म्हणावे लागेल. ते इ.स. १९५१ रोजी रंगभूमीवर आले. त्यानंतर जवळजवळ दहा वर्षांनी म्हणजे इ.स. १९६२ रोजी त्यांचे 'तो मी नव्हेच' हे यशस्वी नाटक रंगमंचावर आले. पुढे प्रभाकर पणशीकर व 'तो मी नव्हेच' असे समीकरण होऊन हे नाटक खूप गाजले. व्यावसायिक दृष्टीने या नाटकांनी खूप कमाई केली.  प्रभाकरचा लखोबा लोखंडे अजरामर झाला. यावेळी प्र.के. अत्र्यांची इतरही नाटके रंगभूमीवर गाजत होती. आणि हाउसफुलसह गोठा-गल्ली जमवीत होती. त्यानंतर फक्त दोन वर्षांनी (१९६४) त्यांनी 'बुवा तेथे बाया' हे नाटक रंगभूमीवर आणले. समाजातील ढोंगी बुवाबाजीवर आणि भोळसट बायकांवर आपल्या विशिष्ट शैलीतून त्यांनी मोठे समाजप्रबोधन केले. दुर्दैवाने अत्र्यांनी एवढे सुंदर नाटक देऊनही त्या काळी समाजातील बुवाबाजी संपलेली दिसत नाही. समाजातील अशिक्षित, अर्धशिक्षित माणसाबरोबर उच्चविद्याविभूषित, डॉक्टर, वकील, व्यापारी, एवढेच काय, समाजाचे ठेकेदार समजणारे राजकारणीही आजही बुवाबाजीत रमलेले दिसतात. त्यामुळे त्या नाटकाने प्रबोधन काय केले हा प्रश्न पडतो.

त्यानंतर 'डॉक्टर लागू' हे नाटक प्र.के. अत्रे यांनी लिहिले. हे नाटक रंगभूमीवर आल्यापासून धो धो चालले पण 'डॉक्टर लागू' या नावामुळे हे नाटक कोर्टात जाऊन पोहचले. मग बघता काय, पुढे नाटकांचा प्रत्येक प्रयोग हाउसफुल्ल झाला. 'लागू' शब्द वगळून पुढे ते फक्त 'डॉक्टर' या नावाने रंगभूमीवर गाजत राहिले.

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांची बहुतेक नाटके विनोदी आहेत आणि ती फक्त प्रेक्षकांचे मनोरंजन व्हावे याच हेतूने लिहिली आहेत. हलकीफुलकी नाटके लिहिण्याची परंपरा अत्रेसाहेबांकडून सुरू झाली असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अत्र्यांच्या नाटकातील कथानक हे समाजातील एखाद्या घटनेवर आधारलेले असले तरी समाजप्रबोधन, समाजपरिवर्तनासाठी त्यांची नाटके न होती, असेच म्हणावे लागेल. तीन तास लोकमनोरंजन हाच त्यांचा मुख्य हेतू होता.

आचार्य अत्रे बराच काळ इंग्लंडला होते. तेथे त्यांनी तेथील 'अपेरा' किंवा शेक्सपिरियन नाटके पाहिली असावीत. कारण त्यांच्या मोरूची मावशीने विसाव्या शतकाच्या शेवटपर्यंत रंगभूमीवर धुमाकूळ घातला व प्रचंड नाव व पैसा कमावला. ते नाटक स्वतंत्र नसून ब्रॅण्डन टॉमस यांनी १८९२ साली लिहिलेल्या 'चार्लीस ऑन्ट' या नाटकावरून बेतले आहे. इ.स. १९४८ साली अत्र्यांनी ह्या नाटकावर आधारलेला 'मोरूची मावशी' हा चित्रपट 'अत्रे पिक्चर्स'तर्फे काढला व तो कमालीचा यशस्वी झाला व त्यानंतर जवळजवळ १५ वर्षांनी म्हणणे इ.स. १९६३ साली त्याच कथाभागावर लिहिलेले 'मोरूची मावशी' हे नाटक सुपरडुपर हिट झाले. या नाटकाची वाटचाल भन्नाट आहे. अनेक अभिनेत्यांनी, अभिनेत्रींनी स्वातंत्र्योत्तर काळात या नाटकात काम केले. पण खऱ्या अर्थाने हे नाटक यशस्वी केले ते प्रशांत दामले, प्रदीप पटवर्धन व विजय चव्हाण यांनी. ही त्रिमूर्ती जोपर्यंत या नाटकात काम करत होती, तोपर्यंत या नाटकाने यशाची सर्व शिखरे पार केली होती. प्रशांत दामलेसारखा गोड गळ्याचा गुणी अभिनेता खऱ्या अर्थाने प्रकाशझोतात आला तो या नाटकातूनच असे माझे मत आहे. त्या नाटकातील मोरूच्या अविस्मरणीय भूमिकेमुळे त्यांची पुढची नाटके धो धो चालली आणि आजही प्रशांत दामले या एका नावामुळे नाटकाकडे प्रेक्षक खेचला जातो. तो त्या नाटकातील लेखकाच्या संहितेमुळे नसून प्रशांत दामलेमुळे असे मला वाटते.

प्र. के. अत्र्यांची नाटके ही समाजातील एखादी विशिष्ट व्यक्ती, चालीरीती, संस्कार, राजकारण, समाजकारण म्हणून समाजातील हास्यास्पद प्रवृत्तीचे ते एक प्रकारचे विडंबन असते. त्यांचा विनोद प्रसंगनिष्ठ व स्वभावनिष्ठ असतो. प्र. के. अत्रे यांनी काही गंभीर प्रवृत्तीची नाटके लिहिली आहेत. त्या त्यांच्या नाटकावर 'इब्सेन'च्या तंत्राचा प्रभाव दिसतो.

स्वातंत्र्योत्तर काळात व स्वातंत्र्यपूर्व काळातही अनेक लेखक एकतर पाश्चिमात्य देशांचा दौरा करून आलेले होते किंवा त्यांनी प्रामुख्याने इंग्लंडमध्ये नाटकांचे जे वेगवेगळे प्रयोग चालले होते, त्याचा अभ्यास केला होता. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात अनेक नाटककारांवर पाश्चात्त्य रंगभूमीचा व नाटकांचा नकळत परिणाम झालेला दिसतो. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळातील दुसरे महत्त्वाचे नाटककार म्हणजे अनंत काणेकर हे होत. काणेकरांची बहुतेक नाटके रूपांतरित किंवा प्रसिद्ध इंग्रजी नाटकांची मराठीत अनुवाद केलेली नाटके आहेत. त्यांनी 'डॉल हाउस' या इब्सेनच्या नाटकाचे 'घरकुल' या नावाने रूपांतर केले आहे.

पतंगाची दोरी (१९५१), झुंज ही त्यांची रूपांतरित नाटके; पण स्वातंत्र्योत्तर काळात व्यावसायिक रंगभूमीवर अशा प्रकारची नाटके टिकाव धरू शकली नाहीत.

याच काळात मो.ग. रांगणेकर हे स्वातंत्र्योत्तर काळातील तिसरे महत्त्वाचे नाटककार मानले जातात. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांची प्रामुख्याने 'एक होता म्हातारा' (१९४८), 'कोणे एके काळी' (१९५०), 'माहेर' (१९५१), 'रंभा' (१९५२), 'जयजयकार' (१९५३), 'लिलाव' (१९५५), 'भटाली दिली ओसरी' (१९५६), 'धाकटी आई' (१९५६), 'भाग्योदय' (१९५७) व 'अमृत' (१९५८) ही नाटके रंगमंचावर आली. याच काळात बोलपटांची सुरुवात झाली होती. गावोगावी टूरिंग थिएटरनामक तंबूमध्ये कृष्ण-धवल रंगातील सिनेमे पाहण्यासाठी प्रेक्षकांची तुफान गर्दी होत होती. चित्रपटापूर्वी नाटक, लोकनाटक, कीर्तन, लावणी, दशावतार हेच लोकांचे मनोरंजनाचे साधन होते. चार आण्यात किंवा आठ आण्यात 'राजा हरिश्चंद्र-तारामती'सारखे सिनेमे बघताना नाटकाचा प्रेक्षक नकळत सिनेमाकडे वळला होता. परिणामी नाटकांचे आकर्षण घटत होते. चार-चार, पाच-पाच किंवा उजाडेपर्यंत चालणारी नाटके पाहण्यापेक्षा अडीच-तीन तासाचा पडद्यावरचा सिनेमा लोकांना आवडू लागला होता.

'वन्समोअर' म्हणून एकच गाणे तीनतीनदा गाणाऱ्या अभिनेत्याकडे पाहणारा 'सो कॉल', 'पांढरपेशा' प्रेक्षक आटला होता. आणि नाटकांची वाटचाल बिकट होत चालली होती. त्यांना पुन: नाटकाकडे वळवण्यासाठी काहीतरी करणे आवश्यक होते. त्यासाठी रांगणेकरांनी मराठी नाटक लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी मराठी नाटक सादर करण्यात मोठा बदल केला. त्यात चार-पाच गोड गाणी, स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनी करणे, वास्तववादी नेपथ्य किंवा वास्तवादी सेट लावण्याकडे भर दिला. सुटसुटीत संवादाने ओतप्रोत, उगीच तत्त्वज्ञान न पाजळता खटकेबाज, सुटसुटीत संवाद आणि महत्त्वाचा म्हणजे चांगला, गुणवंत कलावंत निवडून त्यांनी मराठी सिनेमाचे मराठी नाटकावरचे आक्रमण थांबवण्याचा प्रयत्न केला असे दिसते. पण मराठी सिनेमामुळे स्वातंत्र्योत्तर काळात प्रेक्षक पूर्वीपेक्षा कमी झालेला दिसतो. या काळात मराठी नाट्यप्रयोगावर त्याचा निश्चित परिणाम झालेला दिसतो.

स्वातंत्र्योत्तर काळातील आणखी एक नाट्यलेखक म्हणजे मा.वि. वरेरकर यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात नाटके लिहिली व रंगभूमीवर आणली. १९५८ सालापर्यंत त्यांची नवी नाटके रंगभूमीवर आलेली आहेत. इ.स. १९४५ ते १९५८ ह्या काळात त्यांनी 'संन्याशाचे लग्न', 'जिवाशिवाची भेट', 'द्वारकेचा राजा', 'अपूर्ण बंगला', 'लंकेची पार्वती', 'भूमिकन्या सीता' प्रामुख्याने ही नाटके रंगभूमीवर आणली. दुर्दैवाने नाट्यलेखनात असायला हवी असलेली खोली त्यांच्या नाटकात दिसत नाही. काही नाटके थोडीफार चालली; पण लोकांवर ठसा उमटेल असा ठसा त्यांच्या नाटकात दिसून येत नाही. तत्कालीन सामाजिक विषयांवर त्यांची बहुतेक नाटके आहेत. पण तत्कालीन प्रेक्षकांच्या अभिरुचीची ते पूर्तता करू शकले नाहीत असे माझे मत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळाच्या जरा अगोदर म्हणजे १९४६ साली वि.वा. शिरवाडकर यांचे पहिले नाटक प्रसिद्ध झाले. त्यानंतर आजतागायत (त्यांच्या मृत्युपूर्वीपर्यंत) त्यांनी अनेक नाटके लिहिली व रंगमंचावर आणली. स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्त्वाचे नाटककार म्हणून त्यांनी आपला कायमचा ठसा मराठी नाटकावर उमटवला आहे. त्यांनी लिहिलेली सर्वच नाटके स्वातंत्र्योत्तर काळात मराठी नाटकाच्या वाटचालीतील एक मैलाचा दगड ठरली आहेत. वि.वा. शिरवाडकरांनी मराठी नाटक आणि रंगभूमी सशक्त करताना 'दुसरा पेशवा', 'वैजयंती', 'कौंतेय', 'राजमुकुट', 'दिवाणी दावा', 'ऑथेल्लो', 'देवाचे घर', 'ययाती आणि देवयानी', 'आनंद', 'आमचे नाव बाबूराव', 'एक होती वाघीण', 'चंद्र इथे उगवत नाही', 'नटसम्राट', 'बेकेट', 'मुख्यमंत्री', 'विदुषक', 'वीज म्हणाली धरतीला', 'महंत', इत्यादी नाटके लिहिली.

किर्लोस्कर-देवलांपासून मराठी संगीत रंगभूमीची एक परंपरा सुरू झालेली दिसते. ती कोल्हटकर-गडकऱ्यांपर्यंत होतीच; पण पुढेही स्वातंत्र्योत्तर काळात अगदी १९५०पर्यंत टिकलेली दिसते.

मराठी आद्यनाटककार म्हणून विष्णुदास भावे यांना आज समजले जाते. पण आपल्या 'दशावतार' या ग्रंथाचे संशोधक डॉ. अशोक भाईडकर यांनी त्यावर कडाडून हल्ला केलेला आहे. त्यांच्या मते दशावतारी नाटके हीच मराठी नाटकांचे उगमस्थान आहे. फरक एवढाच आहे.

कोकणात दशावतारी नाटके ही मागील एक हजार वर्षांपेक्षा जास्त काळ मौखिक पद्धतीने चालत होती. फक्त विष्णुदास भावेंनी त्यांची संहिता बनवून ती रंगमंचावर आणली. एवढेच नसून किर्लोस्कर-देवलांपर्यंत जी संगीत नाटके लिहिली, ती दशावतारी नाटके समोर ठेवूनच. पूर्वी विष्णुदास भावे यांच्या नाटकांना 'अर्लडूर' नाटके अशीच संज्ञा होती. ती दशावतारी कलावंतांच्या बेंबीच्या देठापासून ती किंचाळून, उच्च स्वराने म्हणत असलेल्या 'डॉयलॉग'मुळेच. म्हणून मराठी नाटकांची परंपरा ही कोकणात हजार वर्षांपूर्वीपासून चालत असलेल्या नाटकातूनच आलेली आहे. विष्णुदास भावे, किर्लोस्कर-देवल यांच्या नाटकांची परंपरा स्वातंत्र्योत्तर काळात कधीच संपली आहे. पण मूळ स्वरूपात अस्तित्वात असलेल्या दशावतारी नाटकाची आजही २०२२पर्यंत घोडदौड चालू आहे. कोकणात, कर्नाटकात, कारवारपर्यंत, गोव्यात, मध्यप्रदेशात असे सर्वदूर दशावतारी नाटकांचे प्रयोग चालत होते. हे प्रयोग त्यावेळी 'राजदरबारी' पण केले जात. झाशीची राणी लक्ष्मीबाई तर आपल्या दरबारात दशावतारी नाटकांचा महोत्सव करत होती. यांचे ऐतिहासिक पुरावे आज उपलब्ध आहेत. पण दुर्दैवाने मराठी नाटकांच्या वाटचालीचा शोध घेणाऱ्या संशोधकांना याबद्दल एक तर काही माहिती नव्हती किंवा जी माहिती होती, ती अत्यंत तुटपुंजी आणि ऐकीव होती. म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळात किंवा स्वातंत्र्योत्तरकालीन मराठी नाटकांच्या वाटचालीत महाराष्ट्राच्या-कोकणाच्या या महान मौखिक परंपरेचा साधा उल्लेखही केलेला दिसत नाही.

बरं, पुन्हा एकदा वि.वा. शिरवाडकरांच्या मराठी नाटकांच्या वाटचालीकडे वळू. इ.स. १९५०पर्यंत मराठी रंगभूमीवर संगीत नाटकांचे वर्चस्व होते. पण शिरवाडकरांनी ती परंपरा मोडीत काढली व गद्य रंगभूमीची सशक्त परंपरा सुरू केली. गद्य नाटकांची खरी वाटचाल ही वि.वा. शिरवाडकरांनी सुरू केली असे म्हटल्यास वावगे ठरू नये असे मला वाटते. याचा अर्थ पुढे कोणी संगीत नाटके लिहिली नाहीत असा नाही. पुढेसुद्धा पुष्कळ संगीत नाटके आली, पण ती किती चालली हा एक संशोधनाचा विषय आहे. असे म्हणण्याचे कारण अनेक संगीत नाटके स्वातंत्र्योत्तर काळात आली. पण त्या नाट्यलेखकांची/ प्रयोगाची दखलपण नाट्यसमीक्षकांनी घेतलेली दिसत नाही. यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे नानासाहेब शिरगोपीकर. स्वातंत्र्योत्तर काळात नानासाहेबांनी आठ-दहा संगीत व संतावर नाटके लिहिली; पण त्याची दखलही मराठी नाटकांच्या वाटचालीचा अभ्यास करणारे विद्वान लेखकही

घेताना दिसत नाहीत.

नानासाहेब शिरगोपीकर म्हणजे संतसाहित्यावर, संतांवर, त्यांच्या चरित्रावर संगीत नाटक लिहिणारे एकमेव लेखक म्हणावे लागेल. दुर्दैवाने संतांवर एवढी नाटके लिहून संतनाट्यपरंपरा चालू करणारे नानासाहेब मराठी नाटकांच्या इतिहासातून गायब झालेले दिसतात.

शिरगोपीकरांनी अनेक नाटके लिहिली व त्यांच्या आनंद संगीत मंडळीतर्फे फिरते तंबू घेऊन अख्ख्या महाराष्ट्रात त्यांचे दहा हजारांच्या वर प्रयोग केले. त्यात त्यांचे १) गीता गाती ज्ञानेश्वर, २) तुका झालासी कळस, ३) संत गोरा कुंभार, ४) संत नामदेव ह्या नाटकांचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी नाटकांच्या वाटचालीत नानासाहेबांचा विचार केला नाही तर हा मराठी रंगभूमीवर केलेला मोठा अन्याय ठरेल.

आज दुर्दैवाने नानासाहेबांच्या एकाही नाटकाचे स्क्रिप्ट उपलब्ध नाही. म्हणून त्यांचे व त्यांच्या नाटकांचे महत्त्व कमी होत नाही. ते बादशहा होते. ट्रिकसीन्सचे बादशहा. मराठी नाट्यसृष्टीत पहिला ट्रिकसीन्सचा वापर कदाचित नानासाहेबांनीच केला असावा असे माझे मत आहे.

पुन्हा शिरवाडकरांकडे वळूया. वि.वा. शिरवाडकर नाटकांची संहिता लिहिताना त्यातील व्यक्तिरेखांचा बारकाव्याने अभ्यास करताना दिसतात. त्यांनी नाटकांसाठी निवडलेली पात्रे जेवढी महत्त्वाची होती, तेवढेच त्यांच्या पात्रांच्या संवादाचे एक तंत्र त्यांनी विकसित केलेले होते. नाट्यलेखन करताना कथा भारदस्त असावी लागते, तशीच त्यांची भाषापण ताकदीची असावी लागते. पण विनोदी नाटकांत किंवा आपण ज्याला 'फार्सिकल ड्रामा' म्हणतो, त्यातील कथानकाला तसे मोठे महत्त्व नसते. तसेच संवादपण छोटे व खटकेबाज असावे लागतात. 'विच्छा माझी पुरी करा' या नाटकात दादा कोंडके काहीही अचटक-विचकट बोलले तरी प्रेक्षकांत हास्याचा धबधबा वाहायला लागायचा. तीच बबन प्रभूच्या नाटकांची तशीच तऱ्हा होती. फक्त दोन घटका मनोरंजन हाच त्याचा उद्देश होता.

वि.वा. शिरवाडकरांचे तसे नव्हते. शिरवाडकरांच्या नाटकात पात्रांच्या संवादातील उच्च कोटीच्या भाषेला फार महत्त्व होते. तसेच त्यांच्या नाटकातील पात्राच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण, पात्रांचे स्वभावविशेष महत्त्वाचे आहेत. जसे शेक्सपियरच्या नाटकातील पात्राच्या व्यक्तिमत्त्वाला फार महत्त्व आहे. तसेच वि.वा. शिरवाडकरांच्या नाटकातील व्यक्तिमत्त्वे महत्त्वाची व भारदस्त आहेत. यातून शेक्सपियरच्या नाटकांचा प्रभाव त्यांच्या नाट्यलेखनावर दिसून येतो. वि.वा. शिरवाडकरांनी 'राजमुकुट', 'ऑथेल्लो' या नाटकांचे भाषांतर/रूपांतर करून मराठी रंगभूमीसाठी लिहिली आहेत. तशीच त्यांनी ऐतिहासिक, पौराणिक आणि सामाजिक स्वरूपाची नाटके लिहिली आहेत. 'दुसरा पेशवा', 'कौंतेय' या नाटकांतील पात्रांच्या मनातील भावनेचे कल्लोळ उत्कट रीतीने त्यांनी लिहिले आहेत. ते स्वत: मोठे कवी असल्यामुळे वि.वां.च्या नाटकांतून प्रकट होणारी काव्यात्म भाषा हेही त्यांच्या नाटकांचे एक ठळक वैशिष्ट्य आहे. म्हणूनच मराठी वाङ्मयीनदृष्ट्या त्यांची नाटके श्रेष्ठ ठरतात.

स्वातंत्र्योत्तर काळातील आणखी एक महत्त्वाचे नाटककार म्हणजे नाना जोग. त्यांनी मोजकीच नाटके लिहिली. त्यात 'चित्रशाळा' (१९४८), 'सोन्याचा देव' (१९४९), 'भारती' (१९५२), 'हॅम्लेट' (१९५७) ही होत. ते एक चांगले नाट्यलेखक होते. पण व्यावसायिक नाटकासाठी लागणारी गुणवैशिष्ट्ये त्यांच्या नाटकात नाहीत. पण त्यांनी लिहिलेल्या उच्च वैचारिक व समाजाभिमुख नाटकांनी मराठी नाट्यसृष्टीच्या विकासात नव्या वैभवशाली पर्वास प्रारंभ केला असे म्हणावे लागेल.

स्वातंत्र्योत्तर काळातील आणखी एक नाटककार म्हणून माधव मनोहर यांचाही उल्लेख करावा लागेल. त्यांनी काही रूपांतरित नाटके रंगमंचावर आणली. त्यात 'आजोबाच्या मुली', 'सशाची शिंगे' (१९४७), 'आई' (१९५३) ही होत. पण ही नाटके रंगभूमीवर चालली नाहीत.

स्वातंत्र्योत्तर काळातील आणखीन एक महत्त्वाचे नाटककार म्हणजे पु.ल. देशपांडे. 'तुका म्हणे आता' (१९४८) हे त्यांचे पहिले नाटक रंगभूमीवर आले. त्यानंतर त्यांनी खास पु.ल. स्टाइलने अनेक नाटके लिहिली. त्यात 'अंमलदार' (१९५२), 'भाग्यवान' (१९५३), 'तुझे आहे तुजपाशी' (१९५७), 'सुंदर मी होणार' (१९५८) ही नाटके रंगभूमीवर आली व ते नाटकाचे 'भाई' झाले.

'तुझे आहे तुजपाशी' हे इ.स. १९५७ साली रंगभूमीवर आलेले नाटक खूप गाजले. जनमानसातून ते वर्तमानपत्रातून त्याची त्याकाळी खूप चर्चा झाली. एक सर्वांगसुंदर व्यावसायिक नाटक म्हणून सर्वत्र या नाटकाचे खूप कौतुक झाले व याच नाटकामुळे प्रथम एक श्रेष्ठ नाटककार म्हणून त्यांना लोकमान्यता मिळाली. पु.ल. एक प्रतिभावंत

लेखक, नाटककार, अभिनेते आणि भन्नाट वक्ते होते याबद्दल महाराष्ट्रात कोणाचेही दुमत नाही असे मला वाटते. पु.ल. महाराष्ट्रात 'लाडके' का झाले याचे श्रेय त्यांच्या चतुरस्र लेखनात आहे.

याच काळात विजय तेंडुलकर नावाचे एक घोंगावणारे वादळ रंगभूमीवर थैमान घालू लागले होते. १९५५ साली विजय तेंडुलकरांचे 'श्रीमंत' हे नाटक रंगमंचावर आले. त्यानंतर प्रत्येक एक-दोन वर्षांत त्यांची नाटके येत गेली. वि.वा. शिरवाडकर, पु.ल. देशपांडे यांच्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वात यशस्वी नाटककार म्हणून विजय तेंडुलकरांची आज मराठी नाट्यसृष्टीत ओळख आहे. त्यांची 'माणूस नावाचे बेट' (१९५६), 'मधल्या भिंती' (१९५८), 'चिमणीचे घर होते मेणाचे' (१९५९), 'मी जिंकलो मी हरलो' (१९६३), 'कावळ्याची शाळा' (१९६४), 'सरी ग सरी' (१९६४), 'एक हट्टी मुलगी' (१९६७), 'शांतता कोर्ट चालू आहे' (१९६८), 'अशी पाखरे येती' (१९७०), 'गिधाडे' (१९७१), 'सखाराम बाईंडर' (१९७२), 'घरटे आमचे छान' (१९७४), 'भल्याकाका' (१९७४), 'बेबी (१९७५), 'भाऊ मुरारराव' (१९७५), 'पाहिजे जातीचे' (१९७६), 'कमला' (१९८२), 'मित्राची गोष्ट' (१९८२), 'कन्यादान' (१९८३), 'विठ्ठला' (१९८५) इत्यादी नाटके प्रसिद्ध झाली. यांतील बहुतेक नाटकांनी व्यावसायिक रंगभूमीवर आपला ठसा उमटवला. नाटकांबरोबर अनेक चांगल्या एकांकिकाही तेंडुलकरांनी लिहिल्या आहेत.

वि.वा. शिरवाडकर, पु.ल. देशपांडे व विजय तेंडुलकरांनी मराठी व्यावसायिक रंगभूमीला सोन्याचे दिवस दाखवले हा काळ १९६० ते १९९० हा आहे. या काळात या तीनही लेखकांची नाटके व्यावसायिक रूपाने अमर झाली असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळातील व स्वातंत्र्योत्तर काळातील पाहता मराठी नाट्यसृष्टीची वाटचाल पाहता याच काळात पु.ल.चे 'तुझे आहे तुजपाशी', बाळ कोल्हटकरांचे 'दुरितांचे तिमिर जावो' ही नाटके मराठी रंगभूमीवर प्रचंड कमाई करताना दिसतात. इ.स. १९५७च्या दरम्यान वसंत कानेटकरांचे 'वेड्याचे घर उन्हात' हे पहिले नाटक रंगमंचावर आले. हे नाटक मराठी नाटकांच्या या सुवर्णकाळात खूप गाजले आणि एक मोठे नाटककार म्हणून कानेटकरांना प्रसिद्धी लाभली. पुढे वसंत कानेटकरांनी अव्याहतपणे नाट्यलेखन सुरू केले व ते नाटककार म्हणून दोन दशके प्रसिद्धीच्या झोतात राहिले. त्यांनी अनेक नाटके लिहिली व त्यातील बहुतेक नाटके व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी झालीत. त्यात 'देवाचे मनोराज्य' (१९५८), 'प्रेमा तुझा रंग कसा' (१९६१), 'रायगडाला जेव्हा जाग येते' (१९६२), 'दोन ध्रुवावर दोघे आपण' (१९६३), 'मत्स्यगंधा' (१९६४), 'मोहिनी' (१९६४), 'अश्रूंची झाली फुले' (१९६६), 'लेकुरे उदंड झाली' (१९६६), 'इथे ओशाळला मृत्यू' (१९६८), 'तुझा तू वाढवी राजा' (१९६९) यानंतरही व पूर्वी त्यांनी अनेक नाटके लिहिली. 'घरात फुलला पारिजातक', 'मला काही सांगायचे आहे', 'मीरा-मधुरा', 'हिमालयाची सावली', 'बेइमान', 'अखेरचा सवाल', 'नलदमयंती', 'विषवृक्षाची छाया', 'कस्तुरीमृग', 'माणसाला डंख मातीचा', 'सूर्याची पिल्ले', 'एक रूप अनेक रंग', 'पंखांना ओढ पावलांची', 'छूमंतर', 'गगनभेदी', 'प्रेमाच्या गावा जावे', 'वादळ माणसाळतंय', 'मदन-बाधा', 'सोनचाफा', 'जिथे गवताला भाले फुटतात' अशी एकापेक्षा एक सरस नाटके कानेटकरांनी लिहिली. १९६० ते १९९० हा काळ कानेटकर नाट्ययुग म्हणून ओळखला जाईल असे मला वाटते.

कानेटकरांनी वेगवेगळ्या ढाच्यांची, विषयांची मनोविश्लेषणात्मक, ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक अनेकविध नाटके लिहिली. तसेच कानेटकरांनी याच काळात मराठी नाटकाला एक विशिष्ट उंची व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यांची सर्वच नाटके प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतली. त्यांनी अनेक सुखान्तिका लिहिल्या. प्रहसनवजा नाटके लिहिली. संगीतमय नाटके सादर केली. विनोदी नाट्यलेखन केले. तसेच अतिरंजित भावनाट्येही त्यांनी लिहिली. स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वात यशस्वी नाटककार म्हणून कानेटकरांचा उल्लेख करावा लागेल. नाटक लिहिताना प्रेक्षकांना काय हवं, काय नको, त्यांना काय आवडते व काय आवडत नाही असा प्रेक्षकांचे, नाट्यरसिकांचे मर्म जाणणारा नाटककार म्हणून त्यांचा उल्लेख करावाच लागेल. कानेटकरांच्या नाटकांशिवाय मराठी नाटकांची वाटचाल थांबल्यासारखी होईल. त्यांनी आपले प्रत्येक नाटक विचारपूर्वक लिहिली. त्यातील व्यक्तिरेखांचा पूर्ण अभ्यास करून आपल्या नाटकांत पात्रांची मांडणी केली. त्यांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे नाटकातील कथानकांची अत्यंत नेटकी आणि बंदिस्त रचना. त्यामुळे त्यांची नाटके प्रेक्षकशरण झालेली दिसतात. या काळातील पहिले दोन दिग्गज नाटककार वि.वा. शिरवाडकर व पु.ल. देशपांडे यांच्याप्रमाणे प्रेक्षकांना काय

आवडते व काय आवडत नाही, तत्कालीन प्रेक्षकांची अभिरुची यांची जाण ठेवतच कानेटकरांनी नाटके लिहिली. जे चालले ते लिहावे व विकावे अशी त्यांची व्यावहारिक वृत्ती त्यांच्या प्रत्येक नाटकांतून दिसते. त्यांना तसे करणे आवश्यक होते. कारण बोलपटाचे, चित्रपटांचे व रेडियोचे आव्हान पेलण्यासाठी असेच लिहिणे ही त्या काळाची गरज होती. नाट्यनिर्मात्याकडे पैसा आला की ते सर्व नटांना चांगले मानधन देतात. चांगले नावाजलेले नटनट्या घेतात. उठावदार, दिलकश नेपथ्य करतात व महत्त्वाचे म्हणजे नाटकांची सतत जाहिरात करून नाटक चालायला लागतात.

याच काळात प्रायोगिक रंगभूमी, व्यावसायिक रंगभूमी असे दोन ठळक प्रकार दिसतात. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक व्यावसायिक नाट्यमंडळे उदयास आली. त्या तुलनेने प्रायोगिक नाटके करणाऱ्या संस्था फारच तुरळक होत्या. याचे महत्त्वाचे कारण अर्थकारण होते. व्यावसायिक नाटकात भरपूर पैसा मिळत होता. तर प्रायोगिक नाटकांसाठी पैसे देऊन, विनंती करून प्रेक्षक जमवावे लागत होते. समाजातील उच्चशिक्षित पांढरपेशा लोकांसाठी प्रायोगिक भूमी आहे असा गैरसमज त्यावेळी मोठ्या प्रमाणात दिसत होता. प्रायोगिक रंगभूमीसाठी प्रामुख्याने 'मराठी साहित्य संघ नाट्यशाखा', भारतीय विद्याभवनाचे कलाकेंद्र, इंडियन नॅशनल थिएटर, पृथ्वी थिएटर, रंगायन, पुण्यातील ड्रॅमॅटिक असोसिएशन, छबिलदास दादर, आविष्कार यांसारख्या संस्था मराठी नाटकात काहीतरी नवीन करण्यासाठी जन्माला आल्या होत्या. त्यांना काहीतरी नवीन प्रयोग करण्याची त्या काळात ऊर्मी आली होती. पण एकदोन अपवाद सोडता त्यातून मराठी नाट्यसृष्टीला काही साध्य झालेले दिसत नाही.

इ.स. १९५४-५५पासून महाराष्ट्र शासनाने राज्य नाट्यस्पर्धा सुरू केली. तिच्यामुळे अनेक नवे नाटककार व नाटके उदयाला आली. यात गंगाराम गवाणकर ह्या एका कलंदर नाटककारांनी 'वेडी माणसे' (१९६७), 'दोन डोळे शेजारी' (१९६८), 'दोघी' (१९७३), 'वात्रट मेले' (१९६५), 'वस्त्रहरण' (१९५५) इत्यादी व्यावसायिक नाटके रंगभूमीवर आणली. 'वस्त्रहरण' हे मुळात नाटकच नव्हते तर ती एक मालवणी भाषेतील एकांकिका होती व राज्य एकांकिका स्पर्धेत ती त्यांनी सादर केली होती. त्याला स्पर्धेत पारितोषिकही मिळाले होते. त्याचे नाव होते, 'आज काय नाटक व्हायचा नाय'. खरंतर मालवणी भाषेतील व्यावसायिक रंगभूमीवर गाजून व्हाया लंडन करून आलेले हे नाटक फार्सिकल या सदरात मोडणारे असले तरी सुरुवातीच्या पहिल्या ६७ प्रयोगांत हे नाटक बघायला हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच नगण्य प्रेक्षक येत होते. कलावंतांना मानधन सोडा, थिएटरचे भाडे देण्यासाठी पण पैसा गल्ल्यात जमत नव्हता. संपूर्ण नाटक फ्लॉप झाले होते. मग मराठी व्यावसायिक रंगभूमीवर असा काय चमत्कार झाला की ह्या नाटकाला ५००० प्रयोगांचा मोठा पल्ला गाठता आला? हा चमत्कार नसून पु.लं.ची या नाटकावर झालेली कृपा आहे. ''मराठी रंगभूमीवर असे विनोदी नाटक आजपर्यंत झाले नाही.'' - पु.ल. हाच तो संजीवनी मंत्र आहे. त्यामुळे ते नाटक अक्षरश: धोधो चालले.

वि.वा. शिरवाडकर, पु.ल. देशपांडे, विजय तेंडुलकर यांसारख्या इतर दिग्गज नाटककारांची व्यावसायिक नाटके व्यावसायिक रंगभूमीवर धोधो चालत असताना कोसळणाऱ्या दशावतारी नाटकांचे किंवा दशावतारी पद्धतीने नाटक बसवताना गावाकडच्या मंडळांची थट्टामस्करी करणारे व काही प्रमाणात कोंकणी माणसांचा खुळचटपणा दाखवणाऱ्या शिव्यायुक्त मराठी नाटकांच्या इतिहासात गंगाराम गवाणकरांचे 'वस्त्रहरण' हे नाव सुवर्णाक्षरांनी लिहावे लागेल. पण हे भाग्य त्या नाटकांना पु.लं.मुळे प्राप्त झाले हे कोणताही नाट्यसमीक्षक नाकारू शकत नाही.

या नाटकांचे वाङ्मयीन मूल्य काय आहे हे मी सांगू शकत नाही. पण हे नाटक सतत तीन दशके लोकांनी अक्षरश: डोक्यावर घेतले यात वाद नाही.

गंगाराम गवाणकरांची वस्त्रहरणनंतरही व्यावसायिक रंगभूमीसाठी 'वनरूम किचन' (१९९०), 'प्रीतिगंध', 'विठ्ठला विठ्ठला' ही वयाच्या ८३व्या वर्षी लिहिलेले २०२२ सालची प्रायोगिक कम व्यावसायिक नाटकं रंगभूमीवर आलेली आहेत.

ढोबळमानाने नाटकांचे सामाजिक नाटक, ऐतिहासिक नाटक, पौराणिक नाटक असे तीन प्रकार करावे लागतात. यामध्ये रूपांतरित, भाषांतरित, फर्सिकल विनोदी इत्यादी उपप्रकारांचा समावेश आहे. पण नानासाहेब शिरगोपीकरांची नाटके जरा हटके होती. कारण नानांची सर्व नाटके संतावर लिहिलेली आहेत. जसा मराठी वाङ्मयप्रकारात संत वाङ्मयप्रकार आहे, तसाच नानासाहेब शिरगोपीकरांनी नाट्यक्षेत्रात आपला ठसा स्वातंत्र्योत्तर काळापासून अगदी विसाव्या शतकापर्यंत संतनाटककार म्हणून उमटवला आहे. पण दुर्दैवाने कोणीही त्यांच्या

नाटकांची दखल घेतलेली दिसत नाही. मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास लिहिणाऱ्या महाराष्ट्र सरकारनेही त्यांचा कधी गौरव केला नाही.

दुर्दैवाने त्यांची नाटकांची लिखित बाडे आज उपलब्ध नाही. प्रसिद्ध गायक-नट अरविंद पिळगावकर यांच्याकडे काही नाटकांची लिखित बाडे असण्याची शक्यता आहे. नानासाहेब यांच्या आनंद संगीत मंडळीने संताच्या जीवनावर अशी संगीत नाटके लिहून संतांचे जीवन, त्यांचे उपदेश, त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांची जीवनपद्धती अत्यंत सोप्या-सरळ पण रसाळ शब्दात लिहिली होती. नानाचे स्वत:चे तंबू थिएटर होते. त्यात ते सर्व कलावंतांसह व वाजंत्र्यांबरोबर ट्रकमधून महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या गावांत नाटकांचे दौरे करत. कोकणात त्यांची नाटके फारच लोकप्रिय होती. ज्ञानेश्वरांचा 'रेडा' प्रत्यक्ष वेदपठण करतोय हा प्रसंग बघण्यासाठी आबालवृद्धाची तुडुंब गर्दी त्यांच्या नाटकात उसळत असे. एक रुपया खुर्ची आणि पन्नास पैसे पीठात असे त्यांच्या तिकिटांचे दर असायचे; पण नाटक एवढे हाउसफुल असायचे की कोकणातील रसिक-प्रेक्षक नानांची नाटके बघण्यासाठी तात्पुरत्या थिएटरचा 'कुड' उखडून टाकायचे.

वरील नाट्यलेखाव्यतिरिक्त स्वातंत्र्योत्तर काळात आणखीन बऱ्याचशा लेखकांनी नाट्यलेखनात आपला हात अजमावण्याचा प्रयत्न केला. १९६०नंतरचा काळ हा प्रामुख्याने व्यावसायिक नाटकांसाठी सुवर्णयुगकाळ होता असे म्हटले तरी चालेल. इ.स. १९६० ते इ.स. १९९०पर्यंत अनेक नव्या-जुन्या लेककांची नाटके रंगभूमीवर आली. त्यात शं.गो. साठे यांचे ससा आणि कासव', 'कावळ्यांची शाळा' विजय तेंडुलकर, 'यशोदा' श्री.ना. पेंडसे, 'एक शून्य बाजीराव' चिं.त्र्यं. खानोलकर, 'एक होती' हे श्रीराम लागू यांनी केलेले रूपांतरीत नाटक, 'बाकी इतिहास' हे अरविंद देशपांडे यांचे भाषांतरित नाटक. याच काळात दादरची 'छबिलदास' चळवळ सुरू झाली. त्यात अनेक नव्या लेखकांची प्रायोगिक नाटके करण्यात आली. याच काळात मुंबईप्रमाणे पुण्यातही अनेक नाट्यसंस्था उभ्या राहिल्या. त्यात भालबा केळकरांची पीडीए ही एक महत्त्वाची संस्था मानावी लागेल. या संस्थेने 'पहाटेची चाहूल' शं.गो. साठे, 'पवनाकाठचा धोंडी' गो.नी. दांडेकर, 'जाणार कुठे' व्यंकटेश माडगूळकर, 'प्रेमा तुझा रंग कसा?' वसंत कानेटकर, 'खून पाहवा करून' हे सरिता पदकीचे नाटक, 'अशी पाखरे येती' इत्यादी नाटके रंगमंचावर आणली. 'थिएटर ॲकॅडमी' या जब्बार पटेलच्या संस्थेने 'घाशीराम कोतवाल' हे विजय तेंडुलकरांचे नाटक रंगभूमीवर आणून लोकनाट्यआधारित पार्श्वभूमीचा वापर करून एक वेगळाच प्रयोग सादर करून एक मोठे दिग्दर्शक म्हणून कीर्ती मिळवली. या नाटकांचे प्रयोग मराठीप्रमाणे हिंदी भाषेतूनही झाले. याशिवाय जब्बारने पु.ल. देशपांडेंचे 'तीन पैशांचा तमाशा', अरुण साधूंचे 'पडघम', सतीश आळेकरांचे 'महानिर्वाण' ही नाटकं सादर करून रंजन कलामंदिर-नागपूर, आर्टिस्ट्स कंबाईन ग्वाल्हेर लोकहितवादी मंडळ-नाशिक, नाट्य आराधना-सोलापूर, कलावलय-वेंगुर्ले इत्यादी संस्थेतर्फे रंगमंचावर आणली.

इ.स. १९६०नंतर विद्याधर गोखले, पु.भा. भावे, शं.गो. साठे, बबन प्रभू, गो.नी. दांडेकर, बाळ कोल्हटकर, व्यंकटेश माडगूळकर, वि.वा. शिरवाडकरांनी स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी नाट्य व रंगभूमी सशक्त करण्याचा प्रयत्न केला. याच काळात आल्बेर काम्यू ह्या फ्रेंच नाटककारांच्या 'कॅलिग्युला' या नाटकाचे रूपांतरित स्वरूप पुरुषोत्तम दारव्हेकरांनी रंगमंचावर आणले, त्याचे नाव 'चंद्र नभीचा ढळला'. या रूपांतराच्या प्रयोगाने मराठीत अस्तित्ववादी नाटकांचा प्रारंभ झाला असे म्हणायला हरकत नाही.

इ.स. १९६०नंतरच्या मराठी रंगभूमीवर आणि नाटकावर शेक्सपीयर, इब्सेन, चेकॉव्ह, ब्रेश्ट, आयनेस्को, बेकेट, सार्त्र, काम्यू ह्या विदेशी नाटककारांचा प्रभाव जाणवतो. वास्तविक कुठलाही लेखक नाट्यलेखन करताना काही पाश्चिमात्त्य नाटककारांच्या कृतीचा आधार घेतो किंवा त्याचा अभ्यास करतो. ज्याचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते असे अनेक मराठी लेखक नकळत पाश्चिमात्य नाटकांचा अभ्यास करताना दिसतात. याचे एक उत्तम उदाहरण म्हणून आचार्य अत्र्यांचे 'मोरूची मावशी' ह्याचे घेता येते. अत्र्यांनी ब्रॅण्डन टॉम्स यांच्या 'चार्लीस ऑन्ट' या इंग्रजी नाटकावरून घेतलेले आहे. जरी नाटकांची मूळ कल्पना 'चार्लीस ऑन्ट' या नाटकावरून त्यांनी उचलली असली तरी त्यातील प्रसंग व भाषा अस्सल मराठमोळी आहे. म्हणूनच या नाटकाने मागील चाळीस-पन्नास वर्षे मराठी व्यावसायिक रंगभूमीवर अक्षरश: धुमाकूळ घातला.

या ठिकाणी मला सूचित करायचे आहे की कुठलाही लेखक आपल्या आईच्या पोटातून नाटक लिहायला शिकून येत नाही. त्यांना त्याचे नाट्यबीज याच समाजात, आपल्या लोकांच्या भावभावनेतून, इतर वाङ्मयातून किंवा रामायण, महाभारत, हरिविजय, भागवतपुराण यांसारख्या ग्रंथांतून व इतिहासातून मिळते. त्याचप्रमाणे कित्येक वेळा ते परदेशी भाषेतील वाङ्मयातून मिळते. अशी ही नाटक लिहिण्याची

देवाणघेवाण सर्व स्तरांतून त्याच्याकडे येते. त्या कथेच्या बीजाची गुंफण तो आपल्या प्रतिभेच्या सूत्रात करतो व नवीन साहित्याकृती तयार होते. म्हणून नाटक भाषांतरित असो वा रूपांतरित असो वा स्वयंस्फूर्त असो, ती लेखकाच्या कुवतीप्रमाणे निर्माण होत असते.

काही लेखकांवर एका विशिष्ट पद्धतीची नाटके लिहिणारा म्हणून ठसा मारला जातो. 'ड्रामा इज ड्रा' ॲन्ड नथिंग अदर' असे माझे मत आहे. काही लेखकांनी विशिष्ट विषयाला धरून नाटके लिहिली. त्यात पौराणिक, ऐतिहासिक, काल्पनिक, सामाजिक, मेलोड्रामा, फार्सिकल, विनोदी, प्रायोगिक संगीत, संतांवरची नाटके, बोलीभाषेतील नाटके, दलित नाटके हे एकच असते. नाटकाला फक्त नाटक म्हणावे असे माझे मत आहे.

इ.स. १९६०नंतर व्यावसायिक संगीत नाटकांचे पुनर्जीवन झालेले दिसते. ही वेगळ्या धाटणीची काही भावगीतप्रधान चांगली नाटके व नाटककार या काळात जन्माला आले. याच काळात पौराणिक संगीत नाटकांबरोबर इतिहासातील किंवा आपण त्याला रंगकथा म्हणू. त्यांनी पूर्वीच्या रटाळ नाटकांचे स्थान घेतले. यातील 'कट्यार काळजात घुसली' हे नाटक त्या काळी प्रचंड लौकिक प्राप्त करून गेले. त्याचबरोबर 'बाजीराव मस्तानी', 'वीज म्हणाली धरतीला' या नाटकांत स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळीतल्या त्यागाचे, हौतात्म्याचे सादरीकरणाचे नवे तंत्र वापरल्यामुळे संगीत नाटकांच्या एका वेगळ्या पद्धतीचा प्रारंभ झाला. यातील एक महत्त्वाचे नाव विद्याधर गोखले हे आहे. ते नानासाहेब शिरगोपीकरांचे समकालीन होते. त्यावेळी नानांच्या नाटकांनी संपूर्ण महाराष्ट्रात संगीत नाटकाची वावटळ आणली होती. तर इथे मुंबई-पुण्याकडील नाट्यरसिक विद्याधर गोखलेंची हलकीफुलकी संगीत नाटके डोक्यावर घेत होते. त्यांची नाटकातील भाषा सामान्य, आधुनिक जीवनशैलीशी जवळीक साधणारी होती. गोखले हे लोकसत्ता या दिग्गज वर्तमानपत्राच्या संपादकीय मंडळात होते. त्यांनी व्यावहारिक गणिताचा विचार करून नाटकांचे चांगल्या प्रकारे मार्केटिंग केले व सामान्य प्रतीची संगीत नाटके असूनही ती त्या काळी खूप चालली.

इ.स. १९६० साली विद्याधर गोखले यांनी 'ललितकलादर्श' या संस्थेमार्फत 'सं. पंडित जगन्नाथ' हे संगीत नाटक रंगभूमीवर आणले. विद्याधर गोखले यांना व्यावसायिक नाटकांचे आर्थिक गणित पक्के माहीत होते. स्वत: लेखक विद्याधर गोखले हे नवखे लेखक होते. संगीत दिग्दर्शकपण फारसा अनुभवी लौकिक असलेला नव्हता. पण या नाटकांचा प्रयोग ललितकलादर्शक मंडळीने व स्वत: विद्याधर गोखले यांनी अशा एका व्यावसायिक स्वरूपात सादर केला की या नाटकामुळे संगीत नाटकाचे स्वातंत्र्योत्तर काळात पुनरागमन झाले असे म्हणावे लागेल.

नाटक असू दे किंवा सिनेमा असू दे, कुठला सिनेमा चालेल किंवा कुठला आपटेल हे सांगणे कठीण आहे. नाटकांचेपण तसेच आहे. काही नाटके प्रसिद्ध लेखकामुळे चालतात तर काही नाटके दिग्दर्शकामुळे व काही त्यातील कलावंतांच्या वलयामुळे चालतात. उदाहरण घ्यायचे असेल तर आणि डॉ. काशिनाथ घाणेकरांमुळे 'अश्रूंची झाली फुले' व 'गुंतता हृदय हे' इत्यादी नाटके खूप चालली. अशोक सराफ, प्रशांत दामलेंच्या नावाच्या झगमगाटामुळे आजही काही नाटके संहितेत दम नसताना चालतात. तशीच किंवा शिरवाडकर, पु.ल. देशपांडे, विजय तेंडुलकर यांच्या प्रसिद्ध नाट्यलेखक या वलयामुळे चालतात तर गंगाराम गवाणकरांचे 'वस्त्रहरण' पु.लं.च्या स्तुतीमुळे किंवा मच्छिंद्र कांबळींच्या आचरट अभिनयामुळे किंवा हेल काढून शिव्यामिश्रित संवादामुळे चालतात. तर विद्याधर गोखलेंसारखी माणसे, मोहन वाघांसारखी माणसे किंवा राजाराम शिंदेंसारखी व्यावसायिक राजकारणी माणसे पैशांच्या जोरावर नाटक हॅमर करत चालवतात व एकदा नाटक चालायला लागले की 'पैसा वसूल' अशी परिस्थिती व्यावसायिक नाटकांची असते.

नानासाहेब ट्रिकसीन्सचे बादशहा होते. संगीत नाटककार होते. ते स्वत: विद्याधर गोखलेंना चांगला नाटककार मानायला तयार नव्हते. अनेक वर्षे श्रीराम निवासच्या दहा बाय सहाच्या खोलीत त्यांचा व माझा जिव्हाळ्याचा संबंध आला. त्यावेळी वेळोवेळी या गोष्टीची ते चर्चा करायचे. काही असले तरी 'सं. पंडित जगन्नाथ' या नाटकामुळे विद्याधर गोखले यांना स्वातंत्र्योत्तर काळातील नाटककार म्हणून ओळख मिळाली. या नाटकाच्या अनपेक्षित यशानंतर पुढच्या काळात त्यांनी बरीच नाटके लिहिली. त्यात 'सुवर्णतुला', 'मंदारमाला', 'मदनाची मंजिरी (१९६५), 'अमृत झाले जहराचे' (१९६५), 'जय जय गौरीशंकर' (१९७३), 'बावन्नखाणी' (१९८३) इत्यादी नाटके लिहिली. संगीत नाटकाचे लेखक अशी कीर्ती मिळवली.

विद्याधर हे त्यावेळी लोकसत्तेच्या संपादकीय विभागात काम करत होते. असे असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कुठलेही दडपण येऊ न देता ''हे नाटक आशयदृष्ट्या, वाङ्मयीनदृष्ट्या विचार केला तर ते एक

सामान्य नाटक होते.'' अशी त्यावेळी नाट्यसमीक्षकांनी त्यांच्या नाटकांवर कठोर टीका केली. त्यांचे नाटक सिनेमॅटिक आहे. त्यात मद्रासी मसाला आहे अशा शब्दांत त्यांच्या नाट्यसंहितेची चिरफाड केली. राम मराठे, वसंतराव देशपांडे, सुधा करमरकर, प्रसाद सावकार, अजित कडकडे, प्रकाश घांग्रेकर, उदयराज गोडबोले, विश्वनाथ बागुल, फैय्याज, बकुल पंडित अशा अनेक गायक कलावंतांनी त्याच्या नामकीर्तीने व गायनाने, दिग्दर्शनाने संगीत रंगभूमी पुन्हा जिवंत केली असे दिसते. १९६० ते १९९० हा पुनर्जीवित संगीत नाटकाचा सुवर्णकाळ होता असे म्हणावे लागेल. यात शिलेदार भगिनींचा वाटापण मोलाचा आहे.


नाटक व्यावसायिक स्वरूपात सादर करणे व त्यातून पैसा कमावणे हे एक तंत्र आहे. नानासाहेबांच्या शब्दात बोलायचे किंवा गंगाराम गवाणकरांच्या शब्दात सांगायचे तर ''नाटकांचे शंभर प्रयोग स्वत:च्या पैशाने 'हॅमर' करायची निर्मात्यांची ताकद हवी. चांगले नट, चांगले नेपथ्य, चांगली संगीतसाथ व प्रामुख्याने चांगली जाहिरात.'' उदाहरण म्हणून गंगाराम गवाणकरांचे शब्द इथे घालतो, ''आमच्या वस्त्रहरणात पहिल्या सत्तर प्रयोगात आठ-दहा प्रेक्षक यायचे. कित्येकदा प्रेक्षक नसल्यामुळे प्रयोग कॅन्सल करण्याची पाळी यायची. पण पु.ल. असे म्हणाले असे वाक्य नाट्य जाहिरातीच्या डोक्यावर चिकटवल्यामुळे पुढचे ५००० प्रयोग अगदी हाउसफुल झाले.'' माझी दोन्ही नाटके फ्लॉप झाली याचे कारण वरीलप्रमाणेच आहे. त्यातील ''क्रांतिवीर भगतिंसगचे जेमतेम आठ-दहा प्रयोग झाले व आर्थिक कुंचबणेमुळे निर्मात्याने ते बंद केले.'' 'सं. उषास्वप्ना'त अजित भगताच्या दिग्दर्शनात आलेले हे नाटक. यात नयना आपटे, अंजली वळसंगकर, शरद जांभेकर, चंद्रकांत कोळी, सिनेस्टार हेमंतकुमार आणि मी स्वत: असताना जाहिरात व्यवस्थित न झाल्यामुळे व निर्मात्याच्या मूर्खपणामुळे व त्याच्याजवळ पैसे नसल्यामुळे आपटले. १९८३ ते १९९० याच काळात ही दोन्ही नाटके व्यावसायिक रंगभूमीवर आली व आपटली. म्हणूनच मी म्हणतो, व्यावसायिक नाटक करणे हे एक तंत्र आहे. ज्याला जमले त्यांनी कमावले, बाकीचे भिकेला लागले.

पुन्हा एकदा कोरोनानंतर संपूर्ण मराठी रंगभूमी डबघाईला आली आहे. एक-दोन नाटके सोडली तर इ.स. २०१९ ते आजतागायत रंगभूमी सावरली नाही. ती सावरेल याची मला खात्री वाटते.

**– डॉ. अशोक भाईडकर**
भ्रमणध्वनी – ७०२०५५४१७४

## श्रद्धांजली

| | | |
|---|---|---|
| प्रदीप पटवर्धन (अभिनेते) | शरद हजारे | डॉ. वसुंधरा बनहट्टी |
| सिंधुताई सपकाळ | कीर्ती शिलेदार | अनिल अवचट |
| सुरेश र. आपटे (आजीव सभासद) | रमेश देव | लता मंगेशकर |
| प्रवीणकुमार (कलाकार) | प्रवीण काटवी | बिरजू महाराज |
| रेखा कामत | अरुण जाखडे | माधव गोडबोले |
| प्रेमाकिरण | मधुकर नारायण गोखले | पं. शिवकुमार शर्मा |
| सुधीर दामले | रामदास कामत | मंगला पंडित |
| प्रदीप भिडे | रवी परांजपे | रजनी परुळेकर |
| कृष्णाबाई नारायण सुर्वे | प्रा. गंगाधर पाटील | रजनी दांडेकर |
| नंदा खरे | माधव भागवत | भूपिंदर सिंग |
| मंजू सिंग | किशोर सोमण | अली पिटर जॉन |
| पालनजी शापूजी मिस्त्री | कवी रमेश अंजर्लेकर | यशोदा मंगेश पाडगावकर |
| संतोश कोचरेकर | राहूल बजाज | बप्पी लाहिरी |



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

कथा

•

# स्वातंत्र्योत्तर मराठी कथा काही नोंदी, काही निरीक्षणे

**प्रा. डॉ. अजय देशपांडे**




**गेल्या ७५ वर्षांत आणि त्यातही अलीकडच्या तीस वर्षांत महाराष्ट्रातील मराठी माणसांचे जगणे अंतर्बाह्य बदलले. जागतिकीकरणाच्या गतिमान प्रक्रियेत गावगाड्यापासून थेट महानगरात राहणाऱ्या सर्वसामान्य माणसांच्या जगण्याचा सारा पोत बदलला. मानवी जगण्याशी समांतर असणाऱ्या, नव्हे, मानवी जगण्यातूनच उगवणाऱ्या, जगण्याच्या संगतीत असणाऱ्या जगण्याच्या जीवनद्रव्यावर भरणपोषण करणाऱ्या आणि मानवी जगण्यालाच नवा आकार, नवा विचार, नव्या ऊर्मी देणाऱ्या ललित साहित्याचा पोत या जागतिकीकरणाच्या काळात बदलला. मानवी जीवनाने कात टाकली की साहित्य आणि कला हे उपक्रमही कात टाकून नवे होत असतात.**

**सामाजिक,** आर्थिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक पर्यावरणाच्या संदर्भात मानवाच्या जगण्याविषयीचे काही एक आकलन ललित साहित्यातून व्यक्त होत असते. साहित्याच्या केन्द्रस्थानी माणूसच असणे अपेक्षित आणि स्वाभाविक आहे. मानव्यसाक्षेप असणारे ललित साहित्य मानवाच्या सामाजिक जीवनातला महत्त्वाचा सांस्कृतिक उपक्रम असते. भूतकाळ आणि वर्तमानकाळाविषयीच्या आकलनांमधून साहित्यकृती भविष्यकाळाकडे बघण्याची दृष्टी देत असते, समकालात जगणे कसे असावे आणि कसे नसावे याविषयीचा मूल्यविचारही साहित्यकृतीतून प्रतीत होत असतो. म्हणूनच जीवनातून उगवलेली साहित्यकृती मानवी जीवनाला नवा आकार आणि विचार देत असते. सांस्कृतिक ऱ्हासाच्या काळात साहित्यकृती मानवाला जगण्याचे बळ, आशावाद आणि मूल्यविचार देत असते.

गेल्या ७५ वर्षांत आणि त्यातही अलीकडच्या तीस वर्षांत महाराष्ट्रातील मराठी माणसांचे जगणे अंतर्बाह्य बदलले. जागतिकीकरणाच्या गतिमान प्रक्रियेत गावगाड्यापासून थेट महानगरात राहणाऱ्या सर्वसामान्य माणसांच्या जगण्याचा सारा पोत बदलला. मानवी जगण्याशी

समांतर असणाऱ्या नव्हे, मानवी जगण्यातूनच उगवणाऱ्या, जगण्याच्या संगतीत असणाऱ्या, जगण्याच्या जीवनद्रव्यावर भरणपोषण करणाऱ्या आणि मानवी जगण्यालाच नवा आकार, नवा विचार, नव्या ऊर्मी देणाऱ्या ललित साहित्याचा पोत या जागतिकीकरणाच्या काळात बदलला. मानवी जीवनाने कात टाकली की साहित्य आणि कला हे उपक्रमही कात टाकून नवे होत असतात.

२०२० हे वर्ष कोव्हिड १९ या जागतिक महामारीचा प्रभाव आणि परिणामांचे, मानवाच्या भयग्रस्त जगण्याचे आणि निराधार मरण्याचे होते. हा निबंध लिहीत असताना आताही कोव्हिड १९ या महामारीची भीती मानवाच्या मनात आहेच. मानव भयग्रस्त असूनही हिमतीने सावरतो आहे. *अनंत अमुची ध्येयासक्ती* या शब्दांचा प्रत्यय मानवाने या भीषण परिस्थितीतही दिला आहे. २०११मध्ये सुरू झालेल्या दशकाचा शेवट आणि २०२१मध्ये सुरू झालेल्या नव्या दशकाचा प्रारंभ निदान आणि उपचार या दोन्ही पातळ्यांवर मानवाला अगम्य ठरलेल्या महामारीमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या भयग्रस्त वातावरणाने अतिशय उदास, दुःखी, उमेद हरवणारा असा झाला आहे. जगण्याची अदम्य इच्छा असणाऱ्या महापराक्रमी मानवाची हतबलता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे, पण या काळाने पूर्वी दोन महायुद्धांनंतर निर्माण झालेला निराशावाद आता पुन्हा ललित साहित्यात फारसा निर्माण झाला नाही. उलट मानवाचा पराभव होणार नाही हा मूल्यविचार फार मोठा आशावाद घेऊन साहित्यकृतींसह सर्व कलाप्रकारांतून व्यक्त होत आहे. दुःखी आणि हतबल असलेल्या मानवाला वाईट काळात कलाप्रेरणा, निर्मितीची ऊर्जा, जीवनमूल्ये, विचार, साहित्य आणि कला जगण्याचे आणि लढण्याचे बळ देत आहेत.

ललित साहित्यकृतींतून समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन होत असते. खरंतर ललित साहित्य हा व्यापक अर्थाने समाजाचा इतिहासच असतो. समाज आणि साहित्य यांचे संबंध परस्परपूरक असतात.

साहित्य आणि समाज यांच्यातील संबंध अन्योन्य असतात, साहित्य हे केवळ सामाजिक कारणांचा परिणाम नसते तर ते सामाजिक परिणामांचे कारणही असू शकते हे हॅरी लेविन यांचे विधान अन्वर्थक आहे. विशिष्ट सामाजिक परिणामांतून निर्माण झालेले ललित साहित्य अनेक सामाजिक परिणामांचे कारणही होऊ शकते. गेल्या तीन दशकांतील बदललेल्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाने मराठी ललित साहित्य अंतर्बाह्य बदलले. बदललेल्या ललित साहित्याच्या आशय आणि रूपबंधाची चर्चाही फार झाली. सामाजिक परिणामांच्या सृजनशील पर्यावरणातून अंकुरलेले ललित साहित्य समाजजीवनास मानुष विचारांनी जगण्याची नवी ऊर्मी देत असते. प्रत्येक कलाकृती ही तिच्या काळाचा स्वतंत्र उच्चार असते. प्रत्येक कलाकृती त्या विशिष्ट काळातील मानवाच्या जगण्याचे अर्थपूर्ण विधान असते. या तीन दशकांतील मराठी माणसांच्या जगण्यातून अंकुरलेल्या मराठी साहित्याने मराठी माणसाच्या जीवनाचा अत्यंत गंभीरपणे विचार केला आहे.

या निबंधात १९४७ ते २०२२ या ७५ वर्षांतील कथा, या ललित साहित्यप्रकाराच्या प्रवाहाची स्थितिगती, वैशिष्ट्ये, लेखनप्रेरणा व प्रवृत्ती, आशयवैशिष्ट्ये, भाषावैशिष्ट्ये, वेगळेपण आदी विषयांची संक्षिप्त चर्चा-चिकित्सा करत काही निरीक्षणे नोंदवावयाची आहेत.

प्रस्तुत निबंध म्हणजे गेल्या ७५ वर्षांतील मराठी कथेचा इतिहास नव्हे; पण या काळातील कथेच्या इतिहासलेखनाची सामग्री तयार करण्याचा हा प्रयत्न मात्र आहे.

इ.स. १९०० ते १९४७ या काळात मराठीत विपुल कथालेखन झाले. सामाजिक जाणिवा व्यक्त करणारे कथालेखनही या काळात मोठ्या प्रमाणात झाले. हरिभाऊ आपटे, वि.सी. गुर्जर, कृष्णाजी अनंत एकबोटे, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, वा.म. जोशी, न.चिं. केळकर, शि.म. परांजपे, दिवाकर कृष्ण, वि.स. खांडेकर, ना.सी. फडके, सानेगुरुजी, विभावरी शिरुरकर, वा.कृ. चोरघडे, कुसुमावती देशपांडे, श्री.म. माटे, प्रभाकर पाध्ये, बी. रघुनाथ, र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ, प्र.के. अत्रे या प्रमुख कथाकारांनी सामाजिक वास्तवाचे अंकन करणाऱ्या कथा लिहिल्या. काही कथाकार १९४७नंतरही कथालेखन करीत होते. हरिभाऊ आपटे ते दिवाकर कृष्ण हा एक कालखंड व दिवाकर कृष्ण ते नवकथेपर्यंतचा दुसरा कालखंड मराठी कथेच्या संदर्भात वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. या दोन्ही कालखंडातील कथालेखनाचे काही प्रवृत्तीविशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील-

१९०० ते १९४७ या काळात विपुल कथालेखन झाले असले तरी मनोरंजन, मध्यमवर्गीयांच्या अभिरुचीसाठी लेखन बव्हंशी कथाकारांनी केलेले दिसते. मध्यमवर्गीयांच्या मनोरंजनासाठी प्रणयप्रधानता असणाऱ्या कथांमध्ये आनुषंगिक वास्तवदर्शन घडविण्याचा प्रकार झालेला दिसतो. ना.सी. फडके यांच्यासह त्यांच्या प्रभावातील अनेकांनी अशी कथा लिहिली.

भारतीय जीवनादर्श लोकपरंपरेतील कहाणी यांच्याशी अनुबंध ठेवीत सामुदायिक सदाचार, नैतिकता यांचा संस्कार देत गांधीवादी विचारांची शिकवण देणारी आणि सामाजिक वास्तवाशी, स्वातंत्र्यचळवळीशी नाते ठेवत देशभक्ती आणि समाजाधिष्ठित समाजरचनेच्या विचारांचा संस्कार देणारी सानेगुरुजींची कथा आणि पुढे वा.कृ. चोरघडे यांची कथा असा एक प्रवाह दिसतो.

३) स्त्रीला 'माणूस' म्हणून जगण्याचा हक्क आहे. स्त्रीचा विचार पुरुषाच्या बरोबरीने 'माणूस' म्हणूनच झाला पाहिजे अशा आशयाचा विचार करणाऱ्या कथांचा प्रवाह विभावरी शिरुरकर यांच्या कथेपासून सुरू झालेला दिसतो. तत्पूर्वी सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून जोतिराव फुले, हरिभाऊ आपटे, बाबा पदमजी यांच्या कथनात्म लेखनातून या विचारांचे प्रकटीकरण झालेले दिसते. विभावरी शिरुरकर यांनी 'कळ्यांचे निःश्वास' या कथासंग्रहातून स्त्रीच्या शारीर आणि मानसिक पातळीवरील भावनिक कोंडमारा अत्यंत सजगपणे आणि सूक्ष्मपणे पहिल्यांदा मांडला. स्त्रीची सहनशीलता आणि स्त्रीचा विद्रोह या दोन्ही गोष्टींचे अतिशय वास्तववादी चित्रण या संग्रहातील कथांमधून केले आहे.

गावगाड्याचे सांस्कृतिक संदर्भ, शेती, निसर्ग, माणूस यांच्यातील संबंधांचे, बदलत्या ग्रामीण जीवनाचे, एकूणच सामाजिक पर्यावरणातील ग्रामीण जीवनानुभूतीचे, तेथील स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीच्या प्रभावाचे, गांधीवादाच्याही प्रभावाचे, सावकार, जमीनदारांच्या शोषणाने कणा मोडून पडलेल्या माणसांचे, त्यांच्या आर्थिक पिळवणुकीचे चित्रण मराठी कथेत कमीअधिक प्रमाणात प्रारंभापासूनच आले आहे. वा.कृ. चोरघडे, र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ यांच्यासह अनेक कथाकारांनी बदलत्या ग्रामीण वास्तवातील गावगाड्याचे रूप दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. वा.कृ. चोरघडे यांची कथा, शेती, गावगाडा, बोली यात रमते, पण महात्मा गांधींच्या विचारधारेचे प्रकटीकरणही करते. र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ यांची कथा ग्रामवास्तव, शेती यांसह माणूस आणि निसर्ग यांच्यातील अनुबंधांचेही संदर्भ अनेक पातळ्यांवर अभिव्यक्त करते.

हा प्रवाह १९६०नंतरच्या काळात सशक्त झाला आहे. हरिभाऊ आपटे यांच्यापासून सुरू झालेल्या सामाजिक जाणिवेतून कथालेखन करण्याच्या प्रवाहात सामाजिक सुधारणा, राजकीय सुधारणा, स्वातंत्र्याची राष्ट्रीय चळवळ, अस्पृश्यतानिर्मूलनाची चळवळ, पहिल्या महायुद्धानंतरचे बदलते सामाजिक पर्यावरण, बदलती सामाजिक जाणीव, स्वातंत्र्य, समता ही मूल्ये, परिवर्तनाचा ध्यास, ध्येयवाद यांच्या प्रभाव, संस्कारांतून अनेक कथाकारांनी कथालेखन केले आहे. वि.स. खांडेकर, श्री.म. माटे, बी. रघुनाथ, कुसुमावती देशपांडे यांनी कमीजास्त प्रमाणात तत्कालीन सामाजिक, राजकीय वास्तवाचे चित्रण केले आहे. तथापि, हा प्रवाहदेखील या काळात मध्यमवर्गीय जीवनाच्या चाकोरीतून बाहेर पडलेला दिसत नाही. १९६०नंतर मात्र सामाजिक जाणिवेच्या कथा विलक्षण ताकदीने लिहिल्या गेल्याचे दिसते.

१९४५नंतर मराठी कथा फार बदलली. १९४५ ते १९७५ या काळात अण्णाभाऊ साठे, बंधुमाधव, शंकरराव खरात, महादेवशास्त्री जोशी, गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे, शांताराम, व्यंकटेश माडगूळकर, वा.कृ. चोरघडे, जी.ए. कुलकर्णी, शंकर पाटील, सखा कलाल, चारुता सागर, महादेव मोरे, उद्धव शेळके, बाबूराव बागूल, रा.रं. बोराडे, श्री.दा. पानवलकर, विद्याधर पुंडलिक, शरच्चंद्र वासुदेव चिरमुले, कमल देसाई, आनंद जातेगावकर, श्री.ज. जोशी, व.पु. काळे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, चिं.त्र्यं. खानोलकर, दि.बा. मोकाशी, वसुंधरा पटवर्धन, सरिता पदकी, राजेंद्र बनहट्टी, ए.वि. जोशी, मधू मंगेश कर्णिक, रणजित देसाई, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, जयवंत दळवी, अनिल डांगे, विलास सारंग, विजया राजाध्यक्ष, तारा वनारसे, वसंत नरहरी फेणे, श्रीपाद रामकृष्ण काळे, वामन काळे, वि.शं. पारगावकर, आनंद यादव, वसुधा पाटील, सदानंद रेगे, द.मा. मिरासदार, शं.ना. नवरे, वामन होवाळ, सुधा नरवणे, शिरीष पै, मंगेश पदकी, का.दि. सोनटक्के, हमीद दलवाई, अच्युत बर्वे, विजय तेंडुलकर यांच्यासह अनेक कथाकार कथालेखन करीत होते.

अण्णाभाऊ साठे, बंधुमाधव, शंकरराव खरात या कथालेखकांनी जगाच्या इतिहासात आणि भूगोलात अस्तित्व नसलेला बिनचेहऱ्याचा माणूस मराठी कथेच्या केंद्रस्थानी आणला. नाकारलेल्या, अलक्षित ठेवलेल्या, वंचित असलेल्या शोषित पीडित माणसाला कथेचे नायकत्व देऊन तळपातळीवरील माणसांच्या जगण्याचे सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक पर्यावरण त्याच्या भाषेसह कथेत आणण्याचे मौलिक कार्य या कथाकारांनी केले.

१९४५ ते १९६० ह्या कालखंड नवकथेचा होय. ह्या काळात मराठी कथा आशय आणि अभिव्यक्तिदृष्ट्या बदलली. गंगाधर गाडगीळ, पु.भा. भावे, अरविंद गोखले,

व्यंकटेश माडगूळकर या चार कथाकारांचे कार्य नवकथेच्या संदर्भात फार महत्त्वाचे मानले जाते. गंगाधर गाडगीळ यांनी आविष्काराच्या नव्या वाटा पादाक्रांत करीत मराठी कथा मनोविश्लेषणाच्या पातळीवर नेली.

गंगाधर गाडगीळ यांनी कथेच्या घटकांचा नव्याने विचार केला.कथेचा विषय, कथानक, व्यक्ती, संवाद, निवेदन, वातावरण, भाषा आदी घटकांची चिकित्सा केली. नवकथेसह नवसाहित्याचे एक भाष्यकार असणाऱ्या गाडगीळांनी नवकथा लिहून व तिची बाजू समीक्षेत मांडून महत्त्वाचे कार्य केले.

गंगाधर गाडगीळ यांच्यासह अरविंद गोखले. पु.भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर यांनी वेगवेगळ्या प्रवृत्तीची नवकथा लिहिली. नवकथेचे सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाशी उत्कट नाते होते. गंगाधर गाडगीळ यांच्यासह काही कथाकार कथा या वाङ्मयप्रकाराचा रूपबंध आणि आशय या दोन्ही दृष्टीने विचार करून नवी कथा लिहीत होते त्यावेळी मराठवाड्यातील बी. रघुनाथांसारखे कथाकारही कथेच्या आशय आणि रूपबंधाविषयी जागरूक राहून कथालेखन करीत होते. नवसाहित्याच्या प्रवाहात 'नव' हे विशेषण मानवाच्या नवसंवेदनशीलतेसह जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या पुनर्विचारांशी आणि आकारास येत असलेल्या नव्या सांस्कृतिक, भाषिक आणि ज्ञानविज्ञानविषयक पर्यावरणाशी नाते ठेवणारे आहे म्हणून ते अधिक सूक्ष्म आणि सजगपणे कालसापेक्षता सूचित करणारे आहे.

नवकवितेसह नवकथेने लेखन, आशय, रूपबंध यांसह आकलन, आस्वाद आणि मूल्यमापनाचीही परिमाणे बदलली. नवकविता आणि नवकथेने या दोन्ही साहित्य-प्रकारांच्या पूर्वपरंपरेला नकार देणे म्हणजे नवी सांस्कृतिक मूल्यवत्ता, नव्या मूल्यविवेकाने निर्भयपणे मांडण्याची एक रीत होती. मानवी मनाचा दर्शनी भाग हा बऱ्याच अंशी घड्याळाची तबकडी व काटे यांच्यासारखा असतो. पण मनाच्या या दर्शनी तबकडीमागे गुंतागुंतीची यंत्रसामग्री असते आणि तीच त्या तबकडीचे काटे फिरवत असते असे लिहिणाऱ्या गाडगीळ यांनी मानवी मनाचे आणि समूहाच्या मानसिकतेचे अलक्षित वास्तव कथेतून मांडण्याचा प्रयत्न केला. गाडगीळांच्या नवकथेने मराठी कथेचे रूप बदलले, तंत्र बदलले, आशय बदलला आणि मुख्य म्हणजे मराठी अभिरुची बदलली. मराठी नवकथेने मराठी ललित साहित्यप्रकारांत कथा या वाङ्मयप्रकाराचे अमीट, अचल असे स्थान निर्माण केले आणि सजग वाङ्मयप्रकार म्हणून कथेला प्रतिष्ठादेखील मिळवून दिली.

अरविंद गोखले यांच्या कथेने व्यामिश्र असे वास्तव कवेत घेतले आहे. त्यांच्या कथेत विविध स्तरांतील विविध जातिधर्माची माणसे, त्यांचे जगणे, सभोवतीचे सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण भाषेसह येते. दोन महायुद्धे, १९४२ स्वातंत्र्यआंदोलन, स्वातंत्र्य, फाळणी, जातीय, धार्मिक दंगली, बेकारी, महागाई अशा विविधलक्षी सामाजिक वास्तवाची अनेक रूपे त्यांच्या कथेत येतात. गोखले यांच्या कथेत सामाजिक वास्तवाचे भान सतत जाणवत राहते. परमनप्रवेश साधताना गोखले यांनी सामाजिक परिवेश नजरेआड केलेला नाही. त्यामुळे पात्रांच्या भावस्थितीचे वर्णन करतानाही ते सामाजिक वास्तवाचे अंकन करतात. शेवटी साहित्यकृती ही समाजाच्या जीवनरसावरच साकार झालेली असते. गोखले समाजमनाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतात.

गाडगीळ-गोखले यांच्या कथेपेक्षा पु.भा. भावे यांचे कथालेखन वेगळे आहे. पु.भा. भावे यांच्या कथेने त्यांच्या पूर्वीच्या कथालेखनाशी आणि नवकथेच्या प्रवाहाशी असा दोहोंशी अनुबंध राखला. तथापि, पु.भा. भावे यांच्या कथेचे नाते जसे तत्कालीन वास्तवाशी आहे, तसेच ते कथेच्या पूर्वपरंपरेशीही आहे. या दोहोंशी अनुबंध ठेवीत भावे यांनी नवकथा लिहिली. पु.भा. भावे यांची कथा प्रणयात रमते, काव्यात्म चित्रणाने रमणीय होते. क्वचित पाल्हाळ व पुनरुक्तीचा दोषही अंगी बाळगते, अतिरंजितही होते, सामाजिक वास्तव मांडताना मनोविश्लेषणही सूक्ष्मतेने चितारते. भावे यांच्या कथेने तत्कालीन सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय परिस्थितीचे अंकन करणाऱ्या कथा लिहिण्याचा प्रयत्न केला. भावे यांच्या कथेची भाषा भरजरी आहे.

व्यंकटेश माडगूळकरांची कथा गाडगीळ, भावे, गोखले यांच्या कथेपेक्षा अगदी भिन्न प्रकृतीची आहे. ती शहरी अथवा महानगरीय संवेदनस्वभावाची कथा नाही. ती ग्रामीण वास्तवाची कथा आहे. माडगूळकरांची कथा मराठी ग्रामीण कथेचा महत्त्वाचा टप्पा आहे. तळपातळीवरील माणसांच्या सामूहिक आणि वैयक्तिक पातळीवरील अमीट नैतिकतेचे उत्कट दर्शन माडगूळकरांच्या कथेतून घडते. गावगाड्याचे समग्र सांस्कृतिक सामाजिक आणि भाषिक पर्यावरण व्यक्ती आणि त्यांच्या भोया माध्यमातून माडगूळकर आपल्या कथेतून उभे करतात. कथानक, घटना, प्रसंग आदींचा दृकश्राव्य प्रत्यय देण्याचे सामर्थ्य माडगूळकरांच्या

कथालेखनात आहे.

शांताराम (के.ज. पुरोहित) यांची कथा वास्तवदर्शी आहे. मध्यमवर्गीयांसह ग्रामीण, कष्टकरी, श्रमजीवी वर्गाचे चित्रण करताना सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचा पोत दर्शवित जाणारी शांतारामांची कथा मनोव्यापारातही रमणारी आहे. गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर, शांताराम या कथाकारांपेक्षा अगदी वेगळी कथा सदानंद रेगे यांनी लिहिली. सदानंद रेगे यांच्या कथेने मराठी नवकथेला वैशिष्ट्यपूर्ण वळण दिले. मानवी जीवनाची दुःखमयता आणि अर्थहीनता त्यांच्या काही कथांमधून उत्कटतेने मांडली गेली आहे.

या काळात दि.बा. मोकाशी, ग.दि. माडगूळकर, प्रभाकर पाध्ये, ग.ल. ठोकळ, र.वा. दिघे हे महत्त्वाचे कथाकार कथेच्या जुन्या-नव्या वळणावर कथालेखन करीत होते. जी.ए. कुलकर्णी यांनी या काळातील मराठी कथेला पृथगात्म असे वळण दिले. वाङ्मय, नाट्य, चित्रकला, स्थापत्य, चित्रपट अशा विविध आविष्कारमाध्यमांची आठवण यावी अशा प्रकारे त्यांनी हा आकृतिबंध वापरलेला आहे. भाषेच्या साहाय्याने अनुकृती करणाऱ्या जीएंसारख्या कलावंताला केवळ कथाकार म्हणून नावाजणे म्हणजे ॲरिस्टॉटल म्हणतो त्याप्रमाणे जणू काय अनुकृती हे कवीचे खरे वैशिष्ट्य नसून पद्य हेच एकजात सर्वांना कवी या नावाला पात्र ठरविते तसे होईल. जीएंनी समकालीन वास्तववादाच्याच नव्हे तर कथा या वाङ्मयप्रकाराच्याही मर्यादा ओलांडलेल्या आहेत. हे प्रा.वसंत आबाजी डहाके यांचे निरीक्षण जी.ए. कुलकर्णी यांच्या कथालेखनाचे सामर्थ्य आणि त्यांच्या कथेची आशयघनता यांचा सार्थ गौरव करणारे आहे.

कमल देसाई यांनी वास्तव, अवास्तव, अतिवास्तव या पातळ्यांवर स्त्रीमनाची कथा लिहिली; गूढतेच्या जवळ जाणाऱ्या आणि अनेकार्थ सूचित करणाऱ्या त्यांच्या कथा स्त्रीमनाची उकल करू पाहतात. या कथांमधील स्त्रीजाणीव अस्तित्ववादाच्या छायेखाली असल्याचे दिसते. पण कमल देसाई यांची कथा स्त्रीवादी विचारधारेत अडकत नाही.

विद्याधर पुंडलिक, श्री.दा. पानवलकर, शरच्चंद्र वासुदेव चिरमुले, शंकर पाटील, द.मा. मिरासदार हे या कालखंडातील महत्त्वाचे कथालेखक होत.

विद्याधर पुंडलिक यांनी जीवनाकडे डोळसपणे व आशावादीदृष्टीने पाहणाऱ्या विचारांना कथेत प्राधान्य दिले. विशिष्ट सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पर्यावरणात जगणाऱ्या माणसांच्या जगण्याचा, मनाचा, भावनांचा, विचारांचा वेध पुंडलिकांच्या कथेतून घेतला गेला आहे.

श्री.दा. पानवलकर यांनी वैविध्यपूर्ण अनुभवविश्वाची कथा लिहिली. जीवनव्यवहारातील सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाची कलापूर्ण व चिंतनशील अभिव्यक्ती पानवलकर यांच्या कथेत आहे. शरच्चंद्र वासुदेव चिरमुले यांनी वैशिष्ट्यपूर्ण घाटाची, कथानकप्रधान, पण मानवी मनाचे अंतरंग शोधणारी, मानवी संबंधांचे अन्वयार्थ शोधणारी कथा लिहिली आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेपेक्षा वेगळ्या धाटणीची ग्रामीण कथा शंकर पाटील यांनी लिहिली. ग्रामवास्तवाचा पोत आणि ग्रामीण माणसांच्या मनांचे, जगण्याचे ताणेबाणे यांना शंकर पाटील यांनी कथेत प्राधान्य दिले. द.मा. मिरासदारांनी विनोदाच्या अंगाने कधी उपहासपूर्ण तर कधी अतिशयोक्तीपूर्ण रीतीने ग्रामीण वास्तव चित्रित केले. मिरासदारांची कथा त्यांच्या तोंडून ऐकण्यासाठीच लिहिली गेली आहे असे अनेकदा वाटते. गोष्टीवेल्हाळ पाल्हाळपण हे त्यावेळच्या विनोदाचे वैशिष्ट्य मिरासदारांच्या कथेत केंद्रस्थानी आहे. विनोदी कथांतील अतिशयोक्तीपेक्षा त्यांच्या गंभीर कथांतील वास्तवाचे अंकन आणि भान फार मौलिक आहे. पण मिरासदार विनोदाच्या अतिशयोक्तीपूर्ण वर्णनातच अधिक अडकले होते ही वस्तुस्थिती आहे.

१९४५ ते १९६० या काळात मराठी कथा अंतर्बाह्य बदलली. कथारचनेचे प्रयोग झाले, नवे अलक्षित विषय मांडले गेले, घटनाप्रधानतेसह मनोविश्लेषणालाही कथेत प्राधान्य प्राप्त झाले. बोधवाद आणि तात्पर्यवादातून कथा बाहेर पडली, ती जीवनाशी अनुबंध राखणारी झाली. आशय, तंत्र व अभिव्यक्तिदृष्ट्या मराठी कथा या काळात बदलली.

१९६०नंतरही वरील कथाकारांपैकी अनेक जण कथालेखन करीत होते. चिं.त्र्यं. खानोलकर, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, बाबूराव बागूल, योगिराज वाघमारे, वामन होवाळ, अमिताभ, आनंद यादव, उद्धव शेळके, रा.रं. बोराडे, चारुता सागर, सखा कलाल, उत्तम बंडू तुपे, महादेव मोरे, भास्कर चंदनशीव, आनंद पाटील, बाबाराव मुसळे, जयवंत दळवी, विजय तेंडुलकर, अच्युत बर्वे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, पु.शि. रेगे, रत्नाकर मतकरी, ह.मो. मराठे, वसंत नरहरी फेणे, विजया राजाध्यक्ष, तारा वनारसे, मधु मंगेश कर्णिक, आनंद विनायक जातेगावकर, विलास सारंग, अनिल डांगे, श्याम मनोहर, भारत सासणे, गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, प्रिया तेंडुलकर, राजेंद्र बनहट्टी, अरुण

साधू, केशव मेश्राम, रंगनाथ पठारे हे आणि आणखी कितीतरी कथाकार १९६० ते १९९० या काळात कथालेखन करीत होते.

चिं.त्र्यं. खानोलकर यांनी दुःखभोगी मानवी जीवनाची कथा लिहिली माणूस जगताना स्वभाव, विचार, विकार, विकृती, विसंगती, वासना, नियती, संबंध, नीतिकल्पना, मूल्ये, सभोवतीची परिस्थिती या साऱ्या गोतावळ्याशी बांधलेलाच असती, दुःख हे मानवी जगण्याचे अटळ आणि शाश्वत सत्य आहे, त्याचे विविध पीळ, पैलू आणि पदर चिं.त्र्यं. खानोलकर यांच्या कथेतून व्यक्त झाले आहेत.

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथेवर अस्तित्ववादाची छाया आहे. अतिव्यक्तिवादी, अस्तित्ववादी प्रश्न उपस्थित करणारी चित्रे यांची कथा वास्तवापलीकडचे वास्तव चित्रित करण्याचा प्रयत्न करते. मरणाच्या अनुभवाची विविध रूपे चित्रे यांच्या काही कथांतून दिसतात.

शोषणाचे भीषण वास्तव चित्रित करत असतानाच बाबूराव बागूल यांनी शोषणविरहित समाजाच्या निर्मितीच्या विचारांची कथा लिहिली. बाबूराव बागूल यांची कथा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पर्यावरण आणि धर्म, जात, वर्ण यांच्या नावाखाली होणारे माणसाचे शोषण हे वास्तव दाखविणारी आणि ते बदलवण्यासाठी आंबेडकरी विचारांचा प्रचार, प्रसार, अंगीकार करणारी कथा आहे. शोषण, दुःख, अन्यायाचे चित्रण करतानाही बागूल निराशावादाचे चित्रण करीत नाहीत, उलट परिवर्तनविचार, लढाऊबाणा, आशावाद, समता, बंधुता, न्यायाचा विचार मांडणारी माणुसकीच्या तत्त्वदर्शनाची आस असणारी कथा त्यांनी लिहिली आहे.

सुखराम हिवराळे, योगिराज वाघमारे, अर्जुन डांगळे, वामन होवाळ, केशव मेश्राम, भीमसेठ देठे, रवींद्र हडसनकर, माधव कोंडविलकर, नामदेव ढसाळ, वामन इंगळे, प्रज्ञा दया पवार, उर्मिला पवार, जयंत पवार या आणि इतर अनेकांनी दलित कथेचा प्रवाह समृद्ध केला आहे. या कथाकारांनी दलित, शोषित, वंचित, पीडित माणसांच्या सामूहिक जगण्याचे वास्तवदर्शी चित्रण मराठी कथेत आणले.

दलित कथा समाजाच्या सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक पर्यावरणाची चिकित्सा करते. परिवर्तनाची अपेक्षा बाळगते. प्रज्ञा दया पवार, जयंत पवार या कथाकारांनी मराठी कथेच्या प्रवाहात सर्वस्वी वेगळी आणि मौलिक अशी कथा लिहिली आहे. पुढे या कथाकारांच्या कथांविषयीचे विश्लेषण येणार आहेच.

व्यंकटेश माडगूळकर, ग.ल. ठोकळ, र.वा. दिघे, शंकर पाटील, द.मा. मिरासदार यांच्यानंतर आनंद यादव, उद्धव शेळके, रा.रं. बोराडे, चारुता सागर, सखा कलाल, महादेव मोरे, भास्कर चंदनशीव, उत्तम बंडू तुपे, बाबाराव मुसळे वगैरे अनेकांनी ग्रामीण वास्तवाची भिन्न भिन्न रूपे चित्रित करणारी कथा लिहिली. ग्रामीण जीवन, तेथील समाजकारण, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण, शेती, निसर्ग, माणूस आणि त्याचे पर्यावरण, परंपरा, सण, उत्सव, वेदना, वासना, सौंदर्य, विकृती असे व्यामिश्र वास्तव ग्रामीण कथाकारांनी कथेतून चित्रित केले आहे.

१९७०च्या दशकात विलास सारंग, अनिल डांगे, श्याम मनोहर, आनंद विनायक जातेगावकर, सानिया, गौरी देशपांडे, रंगनाथ पठारे, भारत सासणे, आशा बगे यांचे कथालेखन फार महत्त्वाचे ठरले. ह.मो. मराठे, अरुण साधू, केशव मेश्राम, रंगनाथ पठारे, अनिल रघुनाथ कुलकर्णी, रत्नाकर मतकरी, जयंत नारळीकर या काही कथाकारांच्या जरा मागेपुढे विलास सारंग, अनिल डांगे, श्याम मनोहर, आनंद विनायक जातेगावकर हे चार प्रयोगशील कथाकार कथालेखन करीत होते. आधुनिकीकरणामुळे मानवी जगण्यापुढे निर्माण झालेल्या नव्या समस्या, ग्रामीण जगण्याच्या समस्या, आजच्या शहरी आणि ग्रामीण जीवनाकडे अस्तित्ववादी दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न या बाबी ह.मो. मराठे आणि रंगनाथ पठारे यांच्या कथेतून दिसतात. अनिल रघुनाथ कुलकर्णी, रत्नाकर मतकरी यांनी कथेत अद्‌भुताच्या विश्वाचा आधार घेतल्याचे दिसते. रत्नाकर मतकरी यांची कथा आणि गूढकथाही माणसांच्या मनांचे ताणेबाणे उलगडून दाखवते. मराठी गूढकथेचा प्रवाह सशक्त आणि समृद्ध करण्याचे कार्य रत्नाकर मतकरी यांनी केले. जयंत नारळीकरांनी सामाजिक वास्तवाशी अनुबंध राखणारी विज्ञानकथा लिहिली.

विलास सारंग यांची कथा बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पर्यावरणात माणसाच्या एकाकीपणाची व्यथा कथन करणारी आहे. अनिल डांगे यांनी आपल्या कथांमधून बदलत्या सामाजिक वास्तवात, यंत्रयुगात निसर्ग, समाज, यंत्र यांच्याशी बांधल्या गेलेल्या माणसांच्या अस्तित्वविषयक समस्याचा वेध घेणारी वैशिष्ट्यपूर्ण कथा लिहिली आहे. सभोवतीच्या एकूणच सांस्कृतिक पर्यावरणात मध्यमवर्गीयांचे जगणे, त्यांचे विचार, भावना, मूल्यांविषयीचा दृष्टिकोन आदी विषय आनंद विनायक जातेगावकरांच्या कथेतून मांडले गेले आहेत. सारंग आणि अनिल डांगे यांच्या

कथेप्रमाणे श्याम मनोहर यांची कथादेखील मानवी अस्तित्वविषयक प्रश्नांचा वेध घेणारी आहे. सामाजिक वास्तवाचे अंकन करीत माणूस आणि समाज, कुटुंब, व्यक्ती, समूह, सामाजिक संस्था यातील ताणेबाणे ही कथा टिपते. श्याम मनोहर यांनी कधी फँटसी, उपहासाचा आधार घेत मानवी संबंधांचे अन्वयार्थ शोधले आहेत. जयवंत दळवी यांनी मानवी मन व नात्यांचा शोध घेणारी कथा लिहिली. भारत सासणे यांनी दृश्यात्मक पातळीवर जाणारे कथालेखन करीत वास्तववादाचे वेगळे दर्शन घडवले. परंपरा आणि प्रायोगिकता यांच्या मिश्रणातून त्यांनी वास्तवाचे प्रत्ययकारी आकलन मांडणारी कथा लिहिली. राजेन्द्र बनहट्टी यांनी माणसांच्या व्यावहारिक, व्यावसायिक जगण्यातले वास्तव कथेतून मांडले तर अच्युत बर्वे यांनी सामान्य माणसे आणि साध्या घटनांच्या माध्यमातून मानवी अंतरंगांचा वेध घेतला. त्यांचे सामाजिक आकलन अत्यंत गंभीरपणे त्यांच्या एकूणच कथात्मक लेखनातून व्यक्त झाले आहे.

गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, प्रिया तेंडुलकर यांनी स्त्रीजीवनाचे, स्त्रीमनाचे अंतरंग चित्रित करणाऱ्या कथा लिहिल्या. विजया राजाध्यक्ष यांनी स्त्रीकेंद्री जाणिवेच्या काही कथा लिहिल्या. कमल देसाई यांच्या कथेने स्त्रीविषयक प्रश्न व जाणिवांना अत्यंत सूक्ष्मपणे व्यक्त केले. गौरी देशपांडे यांच्या कथेमध्ये पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीची कुटुंबात व समाजात होणारी घुसमट, स्त्रीपुरुष संबंध, कुटुंबव्यवस्था यांच्यातील विविध ताणेबाणे चित्रित केले आहे. सानिया यांच्या कथेतून आधुनिक काळातील स्त्रीपुरुषसंबंधाचे पीळ आणि पैलू व्यक्त झाले आहेत. प्रिया तेंडुलकर यांनी आधुनिक काळातील स्त्रीची मानसिक घुसमट, तिचा होणारा कोंडमारा एकूणच स्त्रीभोवती विषमता व अन्यायाचा परकोट उभ्या करणाऱ्या कुटुंब, विवाह या संस्थांची अर्थहीनता आदी अनेक बाबी कथेतून मांडल्या आहेत. आशा बगे यांनी कुटुंबव्यवस्था, नाती, नीतिमत्ता पाळणाऱ्या संवेदनशील स्त्रीची कथा लिहिली आहे. कुटुंबात राहणाऱ्या स्त्रियांच्या मनोवास्तवाचे अनेक पदर आशा बगे यांच्या कथेतून चित्रित झाले आहेत. १९६० ते १९९० या काळातील नवकथेपलीकडच्या मराठी कथेने सामाजिक वास्तवाशी अनुबंध राखत मध्यमवर्गीय आणि शोषित, पीडित, आदिवासी, झोपडपट्टीतील, महानगरातील, ग्रामीण भागातील माणसांचे सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अस्तित्ववादी जाणिवा, जीवनाची निरर्थकता, स्त्रीवरील अन्याय या विषयांसह परिवर्तन, आशावाद, लढाऊ बाणा यांचे चित्रण करणाऱ्या कथाही या काळात लिहिल्या गेल्या. या कालखंडातील कथा नवकथेने निर्माण केलेल्या विशिष्ट साचेबद्धपणातून बाहेर पडली. नवकथेच्या प्रयोगशीलतेला आणि वास्तवदर्शीत्वालाही काहीएक मर्यादा आणि साचेबद्धता आलेली असतानाच्या काळात साधारणपणे १९६०नंतरच्या मराठी कथेने नवकथेची चौकट मोडून नवे विषय, नवी अभिव्यक्ती, नवा रूपबंध आणि नवी विचारशीलता यांचे दर्शन घडवले. जी.ए. कुलकर्णी, कमल देसाई, चिं.त्र्यं. खानोलकर, बाबूराव बागूल, विद्याधर पुंडलिक, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, विलास सारंग, भाऊ पाध्ये यांच्यासह काही कथाकारांनी भाषेच्या रूपकत्वासह कथेच्या घटकांच्या उपयोजनातही विलक्षण बदल घडवून आणले. मराठी कथेच्या आशयकक्षा विस्तारणाऱ्या या कथाकारांनी कथा या वाङ्मयप्रकारातून व्यामिश्र आणि बहुस्तरीय सांस्कृतिक पर्यावरणाचे दर्शन घडवता येते हे सिद्ध केले.

१९९० ते २०२० या तीस वर्षांतील मराठी कथेचा प्रवाह सशक्त असा आहे. के.ज. पुरोहित (शांताराम), रंगनाथ पठारे, आशा बगे, विलास सारंग, रा. रं. बोराडे, जयंत नारळीकर, विजया राजाध्यक्ष, निरंजन घाटे, जयवंत दळवी, रत्नाकर मतकरी, श्याम मनोहर, द.ता. भोसले, नागनाथ कोतापल्ले, प्रेमानंद गज्वी, भास्कर चंदनशीव, संतोष मुळावकर, सानिया, राजन खान, भारत सासणे या आणि आणखी काही मागच्या पिढीच्या लेखकांची कथा २००० नंतरच्या समाजवास्तवाचा वेध घेत कालसुसंगत आणि वास्तवदर्शी ठरली आहे. यांपैकी अनेक कथाकार आजही सकस कथालेखन करीत आहेत.

१९९० ते २००० किंवा त्यानंतरच्या काळात कथालेखनात स्थिरावलेले आणि आजचे लेखक म्हणून या वीस वर्षांच्या मराठी कथेच्या वाटचालीत ज्यांचे कथालेखन उल्लेखनीय, मौलिक असे ठरले आहे, त्या काही कथाकारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

राजन गवस, उत्तम कांबळे, जयंत पवार, सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, प्रज्ञा दया पवार, नीरजा, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, प्रतिभा जोशी, अरुणा ढेरे, लक्ष्मीकांत देशमुख, अनंत सामंत, उर्मिला पवार, सतीश तांबे, बाबाराव मुसळे, रवींद्र शोभणे, धर्मराज निमसटकर, मधुकर धर्मापुरीकर, बाळ फोंडके, सुबोध जावडेकर, माधुरी शानबाग, लक्ष्मण लोंढे, मिलिंद बोकिल, सुमेध वडावाला (रिसबूड), विजय पाडळकर, गणेश मतकरी, अर्जुन व्हटकर,

कृष्णात खोत, मनोहर सोनवणे, अशोक कोळी, प्रणव सखदेव, उर्मिला शिरूर, भारत काळे, मोहन पाटील, कृष्णा किंबहुने, किरण गुरव, बाबाराव मडावी, प्रशांत बागड, समर खडस, सचिन कुंडलकर, योगिराज वाघमारे, संजीव लाटकर, विजय गोविलकर, श्याम पेठकर, रवींद्र लाखे, शिल्पा कांबळे, दिवाकर कृष्ण, मनस्विनी लता रवींद्र, अरुण मांडे, अस्मिता नाईक, रूपेश पाटकर, किरण येले, जी.के. ऐनापुरे, सुरेन्द्र दरेकर ही नामसूची आणखी वाढवता येईल. एकूणच काय तर आज मराठीत कथालेखन करणारे अनेक कथाकार आहेत आणि वृत्तपत्रांच्या साहित्यविषयक पुरवण्या आणि नियतकालिकांच्या पडझडीच्या काळातही दिवाळी अंकात आणि संग्रहस्वरूपात प्रकाशित होणाऱ्या कथांची संख्या लक्षणीय आहे.

जयंत पवार यांचे 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर', 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा', 'मोरी निंद नसानी होय', 'लेखकाचा मृत्यू आणि इतर गोष्टी' हे चार कथासंग्रह आहेत. जयंत पवार यांनी पूर्वकालीन आणि समकालीन कथाकारांपेक्षा वेगळी आणि महत्त्वाची कथा लिहिली. २०१०मध्ये जयंत पवार यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' कथासंग्रहापासून मराठी कथेचे नवे पर्व सुरू झाले आहे.

या वीस वर्षांतील मराठी कथेचे चित्र निराशाजनक नाही, उलट ते बरेच आशावादी आहे. आजची मराठी कथा प्रयोगशील आहे. आशय, रूपबंध आणि भाषा या दृष्टीने नवे कालसुसंगत प्रयोग कथा या वाङ्मयप्रकारांत होत आहेत. हे प्रयोग मराठी कथेचे नवे रूप घडविण्यास उपकारक ठरत आहेत. जयंत पवार, नीरजा, मोनिका गजेंद्रगडकर, गणेश मतकरी, अभिराम भडकमकर, विजय पाडळकर, प्रणव सखदेव या कथाकारांच्या कथा यासंदर्भात लक्षणीय आहेत.

आज मराठी कथेच्या ऐरणीवर नवे आणि अलक्षित विषय आणले जात आहेत. कथानकाचे पठडीबाज रूप आजची उत्तम कथा नाकारते. सशक्त कथाबीज आणि समाजवास्तवाची उत्तम जाण असणारा लेखक असे समीकरण आजच्या कथेसाठी उपयुक्त ठरले आहे. आसाराम लोमटे यांच्या 'इडा पिडा टळो', 'खुंदळण', 'ओझं', 'वळण', 'होरपळ' या कथा, प्रतिमा जोशी यांच्या 'जहन्नम', 'तेरावी गल्ली', 'नग्नसत्य', 'सत्यकाम जाबाली' या कथा, प्रज्ञा दया पवार यांच्या 'एक्झिट', 'विहार', 'तिघाडा', 'टॅग्ड अगेन' या कथा, सदानंद देशमुख यांच्या 'लाल अंधार', 'गाभूळगाभा', 'मांडव,' 'महालूट' या कथा, जयंत पवार यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर', 'घटकाभर रात्र तुकडा तुकडा चंद्र' या कथा, जी.के. ऐनापुरे यांच्या 'अंतर', 'राप' या कथा, गणेश मतकरी यांच्या 'इन्स्टॉलेशन्स', 'रिमाइंडर', 'ट्रामा', 'गेम' या कथा, प्रणव सखदेव यांच्या 'नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य', 'भाजीवाला', 'ग्लोरिया' या कथा, सुबोध जावडेकर यांच्या 'मेंदूची बाळं', 'ऑपरेशन राहत', 'अखेरची साक्ष' या कथा, नीरजा यांच्या 'ओल हरवलेली माती', 'सुशांतचा सोळावा वाढदिवस', 'विटाळ' या कथा समकालीन वास्तवाचे विविध आणि अलक्षित असे पैलू उलगडून दाखवणाऱ्या आहेत. सशक्त आशयद्रव्य आणि वास्तवदर्शी शैली, तंत्रकुशलतेपेक्षा, रचनासौंदर्यापेक्षा जीवनाचे आहे ते रूप प्रकट करण्याची स्वाभाविक प्रवृत्ती आणि कालसुसंगतता यांमुळे या कथा आजच्या मराठी साहित्याच्या प्रवाहात लक्षणीय ठरल्या आहेत. कथेचे कथानक सशक्त आशय बीजासह भाषेवरही अवलंबून असते. कथानक-कथाविषय साकार करण्यासाठी साजेशी भाषा हवी. ज्या माणसांचे जगणे कथेत आले आहे, त्या माणसांची भाषा जगण्याच्या साऱ्या ताण्याबाण्यांसह कथेत येणे अपेक्षित आहे. उत्तम कांबळे, जयंत पवार, सदानंद देशमुख, प्रज्ञा दया पवार, अभिराम भडकमकर, गणेश मतकरी, अशोक कौतिक कोळी, जी.के. ऐनापुरे, श्याम पेठकर, नीरजा, किरण येले, प्रणय सखदेव या आजच्या कथालेखकांची भाषा वास्तवाचे आहे तसे अंकन करण्यात यशस्वी ठरली आहे. या लेखकांनी जीवनाची-जगण्याची आहे ती भाषा धीटपणे स्वीकारली. जसे जगणे, तशीच कथा म्हणून प्रत्यक्ष जगण्याच्याच भाषेचे कथेत उपयोजन हे सूत्र या कथाकारांनी स्वीकारले आहे. राजन गवस यांच्या 'रिवणावायली मुंगी', 'आपण माणसात जमा नाही' या संग्रहांतील कथांमधील भाषेने आजच्या मराठी कथेच्या भाषेला घडणीचे नवे परिमाण दिले आहे.

जयंत पवार यांच्या कथांची भाषा आणि कथेतील सांस्कृतिक पर्यावरण लक्षणीय आहे. नवी कथा घडवणारा लेखक म्हणून जयंत पवार यांचे मोलाचे योगदान आहे. भाषा समाजवास्तवाचे निर्देशन करीत असते, आजच्या समाजवास्तवाचे भाषेच्या अंगाने कथेतील निर्देशन फार मौलिक आहे.

जयंत पवार यांचे एक सामर्थ्य असे की प्राचीन कहाण्यांचा भाषिक रूपबंध आणि आजचे व्यामिश्र जीवन यांचे अनोखे मिश्रण (यासाठी संगीतातली फ्यूजन ही

संकल्पना अधिक नेमकी वाटते) त्यांनी केले आहे. आशयद्रव्य आणि रचना या दोन्ही पातळ्यांवर हे फ्यूजन आजच्या मराठी कथेला उपकारक ठरणार आहे. या संदर्भात 'शीवलीलामृता'च्या कथनशैलीतून साकारलेली 'बैल' ही अल्पाक्षरी कथा, महाभारतातील लाक्षागृह जाळण्याच्या घटनेमागील शह-काटशहाच्या रक्तरंजित राजकारणाचे समकालीन वास्तवापर्यंत आलेले क्रूर धागेदोरे उकलणारी 'लाक्षागृह' ही कथा, मौखिक परंपरेतील कथनशैलीतून साकारलेली 'तुझीच सेवा करू काय जाणे' ही गिरणगावातील सांस्कृतिक परिवर्तनाच्या माध्यमातून एकूणच महानगरीय जीवघेण्या स्थित्यंतराचा वेध घेणारी कथा या आणि अशा काही त्यांच्या कथा लक्षणीय आहेत. महानगरीय बहुलक्षी वास्तवाचे पीळ उकलून आणि पैलू दर्शवताना जयंत पवार इतिहासातील आणि पौराणिक साहित्यातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय अशा बहुविध पर्यावरणाचा, माणसांच्या जगण्यातील ताण्याबाण्यांचा, वृत्तीप्रवृत्तींतील विकृतींचा साक्षेपी शोध घेतात आणि त्यांचे वर्तमानवास्तवाच्या पार्श्वभूमीवर नवे अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करतात. 'लाक्षागृह'सारखी कथा वाचताना हा प्रत्यय येतो. मिथकांच्या पुनर्वाचनाच्या निमित्ताने जयंत पवार इतिहासाचे आणि पौराणिक साहित्याच्याही पुनर्वाचनाची गरज अधोरेखित करतात. 'जे हत्ते कालाच्या ठायी', 'तुझीच सेवा करू काय जाणे' या कथा यासंदर्भात लक्षणीय आहेत.

कथा या ललित साहित्यप्रकाराच्या माध्यमातून सांस्कृतिक इतिहासाचा डोळसपणे शोध घेण्याचा हा प्रयत्न फार मोलाचा आहे. 'बाबू भंगारवाल्याच्या वखारीतील दुपार' या कथेत ऐतिहासिक संदर्भ आणि वास्तव यांच्या मिश्रणातून समकालाचे प्रत्ययकारी आकलन मांडलेले आहे.

आजची गावगाड्याची मराठी कथा पूर्वीच्या निव्वळ मनोरंजनासाठीच्या निर्मितिप्रयोजनातून बाहेर पडली आहे. मनोरंजन करणाऱ्या या कथा नव्हेत. या कथांच्या तळाशी संक्रमणकालीन विपथगामी समाजवास्तवाच्या असंख्य रूपांची गुंतवळ आहे. गावगाड्याच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, तांत्रिक, परिसरीय, अस्मानी, सुलतानी वगैरे अनेक प्रश्नांची जाण ज्यांच्या हाती सत्तासूत्रे आहेत अशांना अजिबात नाही, ही स्पष्ट जाणीव बऱ्यापैकी संवेदनशून्य बनलेल्या गावगाड्याबाहेरच्या शहरी जगाला करून देण्याची आणि जगाचे लक्ष गावगाड्यावर केंद्रित करण्याची प्रामाणिक धडपड या कादंबऱ्यांच्या लेखनप्रेरणांच्या तळामुळाशी आहे. या कादंबऱ्यांमधून मांडलेल्या समकालीन समाजवास्तवातच परिवर्तनाच्या प्रेरणा दडल्या आहेत. समाजसापेक्ष साहित्यकृतींच्या अंतरंगातच परिवर्तनाची बीजे दडलेली असतात. ती वाचकांच्या संवेदनशील मनात रुजणे हे त्या साहित्यकृतीचे खरे कार्य असते. गावगाड्याचा वाईट वर्तमानकाळ हा त्याचा भविष्यकाळ असू नये असा विचार प्रस्फुटित करण्याची ऊर्जा सदानंद देशमुख, आसाराम लोमटे यांच्या कथांमध्ये दडली आहे.

दर दिवशी ढासळत जाणाऱ्या गावगाड्याचे चित्रण असणाऱ्या या कथांची भाषा साक्षात ग्रामजीवनाची जिवंत अशी भाषा आहे. सदानंद देशमुख यांच्या कथांच्या शीर्षकांकडे नजर फिरविली तरी ग्रामजीवनातील भाषेतील जिवंत आणि आशयप्रधान शब्दांचा प्रत्यय येतो. उदाहरणार्थ 'भोगवटा', 'कडकी', 'चिरोटी', 'भणक', 'इळद', 'सारवण', 'लचांड', 'उठावण', 'वाघरुळ', 'पोटमारा', 'चूलखांड', 'काऊस', 'बरास', 'भगदाड', 'हेळणा', 'कचाटा', 'घरभुली', 'गव्हाण', 'रगडा', 'जंजाळ', 'उतारा', 'खूरतुडवा', 'सर्कती', 'लवकांड', 'बखाड', 'उकीर', 'जुडगा', 'पळसपापडी', 'गाभुळगाथा', 'घेवपाठ', 'मूळतुडवा', 'घसमट', 'गदका', 'हिकमत' ही सारी कथाशीर्षके ग्रामीण बोलीतली आहेत; हे सारे शब्द कथेच्या आशयाचे नेमके, नेटके, प्रत्ययकारी दर्शन घडविणारे आहेत. अर्थसघन हेल, आशयसमृद्ध म्हणी, वाक्प्रचार, शब्दांच्या पलीकडचा आशय मांडणारी काव्यात्मकता ही आणि अशी सारी सामर्थ्यं एकवटलेली बोली सदानंद देशमुख यांच्या कथांमध्ये साऱ्या स्वरूपवैशिष्ट्यांसह प्रकटली आहेत. बोलीभाषेतील शब्दश्रीमंतीचा प्रत्यय सदानंद देशमुख, आसाराम लोमटे यांची प्रत्येक कथा वाचताना येतो.

मराठीत विज्ञानकथालेखकांची संख्या फार कमी आहे, निरंजन घाटे, जयंत नारळीकर, बाळ फोंडके, लक्ष्मण लोंढे, शुभदा गोगटे, माधुरी शानभाग, अरुण मांडे, सुबोध जावडेकर यांच्यासह आणखी काही विज्ञानलेखकांनी विज्ञानकथेचा प्रवाह जिवंत ठेवला आहे. 'करड्या छटा', 'रोबोट फिक्लिंग', 'स्वप्न-चौर्य, 'जीवनचक्र' हे निरंजन घाटे यांचे या पंधरा वर्षांतले महत्त्वाचे विज्ञानकथासंग्रह आहेत. 'उद्याची चाहूल' (सुबोध जावडेकर), 'तीन पायांची शर्यत' (बाळ फोंडके), 'चिक्कार नंतरच्या गोष्टी' (मेघश्री दळवी), 'तेथे जीवाणू जगती' (मधुकर दिवेकर) हे विज्ञानकथासंग्रह समकालीन संदर्भात महत्त्वाचे ठरतात.

आजच्या मराठी कथाकारांना समग्र जीवनव्यवहाराचे व्यापक भान, समकालीन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारण, अर्थकारण, धर्मकारण यांसह एकूणच सांस्कृतिक पर्यावरणाची साद्यंत माहिती, इतिहास व समकाळाचे भान, समाजव्यवस्था, जात, धर्म यांतील सूक्ष्म ताण्या-बाण्यांची जाण, शेती, शेतीचे व गावगाड्याचे प्रश्न, गावगाड्याचे सांस्कृतिक वास्तव यांसह एकूणच महानगरांतील उद्योगविश्वासह तळपातळीपासूनच्या जीवनवास्तवाची जाण, समकालीन चंगळवाद, बाजारूपण, सर्व पातळ्यांवरची अनास्था व दुराचार, मूल्यभ्रष्टता, मूल्यहीनता अशा एकूणच समाजवास्तवाचे आकलन करण्याची क्षमता आजच्या या कथाकारांजवळ आहे. मुख्य म्हणजे या कथाकारांजवळ भाषेची उत्तम जाण आणि कथा या ललितसाहित्य-लेखनप्रकाराचे उत्तम ज्ञान, त्याचे सामर्थ्य आणि मर्यादा याचीही जाण असल्याचे दिसते. त्यामुळे कथा या साहित्यप्रकाराच्या रचनातंत्रासह एकूणचच रूपबंधात काही बदल घडवून आणण्याची क्षमता या कथाकारांजवळ आहे. आजची कथा आशयनावीन्य आणि रूपबंधदृष्ट्या बदलत आहे. हा बदल फार मोलाचा आहे.

आजच्या स्त्री कथाकारांनी दर्जेदार अशा लक्षणीय मराठी कथा लिहिल्याचे दिसते. प्रज्ञा दया पवार, नीरजा, मेघना पेठे, प्रतिमा जोशी, मोनिका गजेंद्रगडकर, उर्मिला पवार, मनस्विनी लता रवींद्र या स्त्रीकथाकारांनी आजच्या मराठी कथेला निर्णायक असे वळण दिले आहे. समकालीन वास्तवात वेगवेगळ्या पातळ्यांवर होणारी स्त्रीची कुचंबणा, घुसमट यांपैकी काही लेखिकांच्या कथांचा विषय झाला आहेच; पण स्त्रीकेंद्री प्रश्नांच्या पलीकडे जाऊन व्यापक अशा सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाचे अंकन करणारी नवी कथा या लेखिकांनी धीटपणे, आणि कलात्म रीतीने साकार केली आहे. या लेखिकांनी कथेच्या माध्यमातून साकार केलेली वाङ्मयीन प्रयोगशीलतादेखील कथेच्या प्रवासाला नवी ऊर्मी देणारी आहे. या लेखिकांच्या कथा समकालीन स्त्रीप्रतिमेचे वास्तवदर्शी आणि कलात्म दर्शन घडवण्यातही यशस्वी ठरल्या आहेत. वैशिष्ट्यपूर्ण निवेदनतंत्र, कथानकाच्या गरजेनुसार मांडणी, प्रभावी कथाघाट आणि आशयाशी सुसंगत अशी शैली व भाषा यांमुळे या काळातील कथालेखिकांचे कथालेखन मौलिक ठरले आहे. यासंदर्भात उदाहरण म्हणून नीरजा यांचे 'जे दर्पणी बिंबले,' ओल हरवलेली माती', 'पावसात सूर्य शोधणारी युके माणसे' हे कथासंग्रह, प्रज्ञा दया पवार यांचा 'अफवा खरी ठरावी म्हणून' हा कथासंग्रह, मोनिका गजेन्द्रगडकर यांचे 'भूप', 'आर्त', 'शिल्प' हे कथासंग्रह, प्रतिमा जोशी यांच्या कथा ('जहन्नम' - निवडक प्रतिमा जोशी, संपादक पुष्पा भावे) मेघना पेठे यांचा 'आंधळ्याच्या गायी' हे संग्रह, उर्मिला पवार यांचा 'हातचा एक' हा कथासंग्रह, मनस्विनी लता रवीन्द्र यांचा 'ब्लॉगच्या आरशापल्याड' हा कथासंग्रह या संग्रहांची नावे नोंदवता येतात.

आजच्या काही कथाकारांचे वैशिष्ट्य असे की ते अत्यंत सूक्ष्मपणे जीवनाचा अभ्यास करत कथेत जीवनाची अनेक रूपे साकारताना प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे नैतिकतेचा आग्रह धरतात. केवळ वेगळेपण किंवा वैविध्य म्हणजे गुणवत्ता नव्हे याचे भान आजच्या लेखकांना आहे. त्यामुळे केवळ वेगळेपण अथवा केवळ वैविध्य यांमागे लागून रंजक, शैलीबाज लेखन करणे आजच्या काही कथाकारांनी टाळले आहे. आजच्या अनेक कथाकारांनी तर अगदी मोजके कथालेखन केले असल्याचेही दिसते. जागतिकीकरणाच्या या स्थितीत गोंधळलेल्या, घाबरलेल्या, आर्थिकदृष्ट्या नागावलेल्या, चंगळवादाने मुक्त, लैंगिक स्वैराचाराने बावरलेल्या, हिंसाचाराने-अत्याचाराने स्तिमित-निःशब्द झालेल्या, उदासवाणे भयग्रस्त जीवन जगणाऱ्या हतबल अशा शहरी व ग्रामीण माणसाला वास्तवाचे आकलन करून देत, नैतिकता न सोडण्याचे पटवून देत निर्भय वातावरणात सकारात्मकृतीने जगण्याचे बळ देण्याचा प्रयत्न आजचे कथाकार कथालेखनातून करीत आहेत. माणसांना आणि विचारांना केंद्रबिंदू मानणारी कथा लिहिली जात आहे. साहित्य जर जीवनाच्या शाश्वत सत्याचा शोध घेत असेल तर त्या शोधाची वाट समकालीन घटनांमधूनच जात असते. आजचे मराठी कथाकार वेगवेगळ्या पद्धतीने आणि अनेक बाजूंनी समकालीन समाजवास्तव पिंजून काढत आहेत. हे चित्र आशादायी आहे. आजच्या मराठी कथेसमोर मोठी आव्हाने निश्चितच आहेत, पण या आव्हानांना पेलण्याचे सामर्थ्यदेखील आजच्या कथेच्या ठायी आहे. आजची मराठी कथा विशिष्ट काळाची असतानाच कालातीत होण्याचे सामर्थ्यही काही कथांच्या ठायी निश्चितच आहे. या वीस वर्षांत कथा या वाङ्मयप्रकाराचा बराच विकास झाल्याचे दिसते. लघुकथा, लघुरूप कथा, क्षणकथा, अपहरणकथा, राजनीतिककथा, पर्यावरणकथा, रूपककथा, भयकथा, सूडकथा, गूढकथा, विज्ञानकथा, रहस्यकथा, शौर्यकथा, संदेहकथा ह्या आणि आणखी अनेक प्रकारच्या कथा लिहिल्या जात आहेत. जुनेजाणते आणि नवे लेखक नव्या

जाणिवांच्या नव्या कथा लिहित आहेत. कथेचा प्रवाह मोठा मोठा होत आहे.

साहित्यकृतींचा विचार सौंदर्यशास्त्रीय पद्धतीने करण्यापेक्षा संविधानाच्या मूलभूत तत्त्वांशी बांधिलकी ठेवणाऱ्या सामाजिक जाणिवांच्या मानवतावादी तत्त्वविचारांनी होण्याची गरज असते. लेखकाचे प्रतिभावंत मन माणसांच्या जगण्याशीच सहकंप पावलेले असते. सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाशी लेखकाचे अतूट नाते असते आणि लेखकाच्या कलाकृतीतून ते अभिव्यक्त होत असते. खरंतर समाजसापेक्ष साहित्यकृतींचे सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाशी जैविक नाते असते. माणसांच्या जगण्याचे ऐतिहासिक, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय असे आणि आणखी कितीतरी पदर समाजसापेक्ष साहित्यकृतींमधून आविष्कृत होत असतात. अशा कलाकृती माणसांचे जगण्याचे भान जागृत करीत असतात. ज्यांचे कोणी नाही आणि ज्यांच्या आयुष्यात अन्याय, वंचितता, दुःख यांचेच साम्राज्य आहे अशा वंचितांचे अश्रू पुसण्याचे, त्यांच्या अश्रूंना शब्द देण्याचे त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्याचे, त्यांच्या जगण्याला नैतिक ऊर्जा देण्याचे, विचारांची लढाई विचारांनी लढण्याची उमेद देण्याचे, संविधानाच्या मूलभूत तत्त्वांशी बांधिलकी ठेवून नव्या क्रांतीचे समाजशास्त्र ठरविण्याचे महत्त्वाचे कार्य या समाजसापेक्ष कलाकृती करीत असतात. या कलाकृती कणा मोडून पडणाऱ्या माणसांना पुन्हा ताठ कण्याने उभे राहून लढण्याची वैचारिक-नैतिक मानसिक ऊर्जा देत असतात. अशा कलाकृतींची संख्या कमी असली तरी त्यांचे सामाजिक परिणाम फार मोठे आणि मूल्याधिष्ठित म्हणून फार महत्त्वाचे असतात.

या दृष्टीने गेल्या वीस वर्षांतील मराठी कथेच्या प्रवाहाचा विचार केला तर पदरी निराशा येत नाही. उलट मराठी कथेची वाटचाल आश्वासक असल्याचे स्पष्ट दिसते.

सांस्कृतिक इतिहासाच्या लेखनाची सामग्री शोधणे, पुरावे गोळा करून त्या सामग्रीचे नीरक्षीरविवेकाने विश्लेषण करणे आणि सांस्कृतिक इतिहासाचे लेखन करणे आदी कार्ये अत्यंत महत्त्वाची आणि परिश्रमाची पराकाष्ठा पाहणारी असतात. सांस्कृतिक इतिहासाची एक सामग्री म्हणजे ललित साहित्य होय. आजची मराठी कथा सांस्कृतिक इतिहासाच्या लेखनाला पूरक असा मौलिक ऐवज देणारी आहे.

**– डॉ. अजय देशपांडे**
भ्रमणध्वनी – ९८५०५९३०३०

## पुरस्कार

आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी ह्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सव साजरा करणाऱ्या प्रतिष्ठित संस्थेतर्फे दरवर्षी काही लक्षणीय साहित्यकृतींना पुरस्कार प्रदान करण्यात येतात. मराठी साहित्यातील सन २०२१मधील लक्षणीय गद्य साहित्यकृती पुरस्कार, **संजीवनी खेर,** मुंबई यांच्या **'गांधींचे गारुड'** या ग्रंथास सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

मराठी साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन देणे, या उद्देशाने, 'दत्तात्रेय कृष्ण सांडू प्रतिष्ठान' चेंबूर यांच्याकडून दिला जाणारा, संकीर्ण विभागातील साहित्य पुरस्कार (२०२०-२०२२) **सौ. प्रतिभा बिश्वास** यांच्या '**IAS प्रेरणा आणि अनुभव**' या साहित्यकृतीस प्राप्त झाला आहे.

'**उमलावे आतुनीच**' या **प्रा. प्रतिभा सराफ** यांच्या कवितासंग्रहाला, चिपळूण येथील 'पसायदान प्रतिष्ठान' यांचा, राज्यस्तरीय काव्य पुरस्कार प्राप्त.

**नीलिमा भावे** यांच्या '**विस्तारणारं क्षितिज**' या कथासंग्रहाला **ठाणे नगरवाचनालयाचा** २०२१ सालचा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार मिळाला.



स्वातंत्र्योत्तर
मराठी
साहित्याची
वाटचाल

•

कादंबरी

•

# स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल

**डॉ. संदिप दळवी**

**स्वातंत्र्योत्तर कादंबरीविषयी लिहित असताना त्याआधीच्या तिच्या शतकभराच्या वाटचालीचा काहीएक परामर्श घेणे महत्त्वाचे वाटते. अर्थात स्वातंत्र्यपूर्वकालीन तिची वाटचाल काही अपवाद वगळता निराशाजनकच राहिली. बाबा पद्मनजींच्या 'यमुना पर्यटन' नंतर ज्या रीतीने कादंबरीची वाढ होणे अपेक्षित होते, तशी ती झाली नाही. उलट तिचा प्रवास अधिकतर उलट्या गतीने होत राहिला. कृत्रिम, काल्पनिक स्वरुपाच्या जगाची आकारणी करण्यात ती गुंतली. तत्कालीन राजकीय, समाज-सांस्कृतिक जीवनापासून, प्रबोधन चळवळीपासून ती दूर राहिली. रूढ तंत्रातच गुरफटत राहिल्याने तिची वाढ खुंटली. हरिभाऊ आपटे, वामन मल्हार जोशी, श्री. व्यं. केतकर वगळता या काळातील कादंबरी एका विशिष्ट आवर्तात सापडलेली दिसते.**

**प्रस्तुत** निबंधामध्ये 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल' याविषयीचा आढावा आणि तद्नुरूप काही निरीक्षणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात काळाच्या मोठ्या पटाविषयी काही विधाने करत असताना ती निसरडी होण्याची शक्यता असते. अनेक गोष्टी आपल्या आकलनाच्या कक्षेत येत नाहीत. अभ्यासाच्याही मर्यादा येतात. हा तोल सांभाळत कोणत्या गोष्टी हाताशी लागतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. मुख्यत्वे मराठीत कादंबरी हा वाङ्मयप्रकार एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर म्हणजे आधुनिक काळात उदयाला आलेला वाङ्मयप्रकार आहे. पाश्चात्त्य जगात आधुनिकेतून निर्माण झालेल्या नवमध्यमवर्गातून हा वाङ्मयप्रकार आकाराला आला. पुढे जगभरामध्ये तो विस्तारत गेला. मराठीमध्ये दीड-पावणेदोनशे वर्षांच्या अल्प कालावधीत या वाङ्मयप्रकाराने आश्वासक वाटावी अशी वाटचाल केली आहे. या काळामध्ये कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये अनेकविध प्रकारची स्थित्यंतरे झाली. विषयवैविध्यापासून आविष्काररीतीपर्यंत अनेक नव्या शक्यता तिने आजमावल्या. अल्पजन ते बहुजन असा तिचा प्रवास राहिला आहे. काळानुरूप एकूण मराठी साहित्यव्यवहाराचा परीघ विस्तारत गेला. कादंबरीही

मध्यमवर्गीय परिप्रेक्ष्यातून आणि महानगराचा सीमित अवकाश उल्लंघून महाराष्ट्राचा विस्तृत भूगोल कवेत घेऊ लागली. जात, लिंग, वर्गीय जाणिवांच्या उतरंडीचे चित्रण वास्तवदर्शी पद्धतीने रेखाटू लागली. आधुनिकतावादाच्या प्रभावातून जीवनाकडे पाहण्याची एक नवी जीवनदृष्टी कादंबरीकारांना लाभली. अस्तित्वाला वेढून राहिलेल्या प्रश्नांचा शोध ती घेऊ लागली. देशी कथनरूपांचा फॉर्म स्वीकारत वर्तमानातील विसंगती दर्शवू लागली. शोषित, कष्टकऱ्यांच्या बाजूने उभी राहू लागली. काळाबरोबर कादंबरीकारांची भूमिकाही ठळक होऊ लागली. आरंभी रंजनपरतेकडे असलेला तिचा कोन पुढे समाजभिमुखतेकडे झुकला. याचाच संक्षिप्त असा धांडोळा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

स्वातंत्र्योत्तर कादंबरीविषयी लिहीत असताना त्याआधीच्या तिच्या शतकभराच्या वाटचालीचा काहीएक परामर्श घेणे महत्त्वाचे वाटते. अर्थात स्वातंत्र्यपूर्वकालीन तिची वाटचाल काही अपवाद वगळता निराशाजनकच राहिली. बाबा पद्मनजींच्या 'यमुना पर्यटन'नंतर ज्या रीतीने कादंबरीची वाढ होणे अपेक्षित होते, तशी ती झाली नाही. उलट तिचा प्रवास अधिकतर उलट्या गतीने होत राहिला. कृत्रिम, काल्पनिक स्वरूपाच्या जगाची आकारणी करण्यात ती गुंतली. तत्कालीन राजकीय, समाज-सांस्कृतिक जीवनापासून, प्रबोधन चळवळीपासून ती दूर राहिली. रूढ तंत्रातच गुरफटत राहिल्याने तिची वाढ खुंटली. हरिभाऊ आपटे, वामन मल्हार जोशी, श्री.व्यं. केतकर वगळता या काळातील कादंबरी एका विशिष्ट आवर्तात सापडलेली दिसते.

हरिभाऊ आपटे यांनी आपल्या कादंबरीलेखनात कल्पित आणि वास्तव तपशिलांची सुयोग्य सांधेजोड केली. त्यांनी प्रबोधन, परिवर्तन आणि कादंबरी यामध्ये सुरेख समतोल साधला. हरिभाऊ आपटे यांना केशवसुतांप्रमाणे समाजातील अस्पृश्य वर्गाविषयी सहानुभाव होता. त्यांच्या लिखाणातूनही त्याचा प्रकर्षाने प्रत्यय येतो. मात्र त्यांच्या लेखनामध्ये त्याचे चित्रण जोरकसपणाने येत नाही. त्यांचे अनुभवविश्व हे मर्यादित सामाजिक घटकाशी निगडित राहते. मात्र त्यांना समाजाचे नीट आकलन होते. समाजाचे प्रश्न नेमके काय आहेत; याचे त्यांना भान होते. तो काळ लक्षात घेतला तर हरिभाऊंची कामगिरी महत्त्वाचीच मानावी लागेल. त्यांनी कादंबरीला समाजजीवनाशी, समाजव्यवहाराशी जोडण्याचे काम केले. हरिभाऊंनंतर वामन मल्हार जोशी, श्री.व्यं. केतकर यांनी महत्त्वाचे कादंबरीलेखन केले. वामन मल्हार यांनी 'रागिनी', 'सुशीलेचा देव', 'इंदू काळे आणि सरला भोळे' यांसारख्या कादंबऱ्यांमधून स्त्रीप्रश्नांची चर्चा केलेली आहे. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी 'गोंडवनातील प्रियंवदा', 'परागंदा', 'आशावादी', 'ब्राह्मणकन्या', 'भटक्या' यासारख्या कादंबऱ्यांमधून स्त्री-पुरुषसंबंधाविषयीचे प्रगल्भ चित्रण केले आहे. उपेक्षितांच्या समस्या अधोरेखित करत त्यांची कादंबरी विचारप्रवृत्त करते. हरिभाऊंची परंपरा पुढे नेण्याचे काम स्वातंत्र्यपूर्वकाळामध्ये या दोन कादंबरीकारांनी केले. या काळातील सर्वाधिक लोकप्रिय कादंबरीकार ना.सी. फडके आणि वि.स. खांडेकर होत. जवळपास तीन-चार दशके त्यांचा प्रभाव मराठी कादंबरीवर राहिला. ना.सी. फडके यांनी थेटपणे रंजनवादाची बाजू घेतली. वाचकांना प्रभावित करणारी शैली त्यांनी जाणीवपूर्वक घडविली. वि.स. खांडेकरही वास्तवापासून दूर गेलेले दिसतात. ध्येयवादी नायकाची उभारणी करताना त्यातील कृत्रिमता प्रकर्षाने जाणवत राहते. त्यामध्ये वास्तवाचा अभाव जाणवत राहतो. आदर्श असे स्वप्नरंजन त्यांच्या कादंबरीत आहे. मात्र त्यांच्या लिखाणामध्ये आत्मीय स्वरूपाचा प्राजंळपणा जाणवतो. विभावरी शिरूरकर यांनी या काळात 'हिंदोळ्यावर', 'विरलेले स्वप्न' या कादंबऱ्यांमधून सामाजिक वास्तव मांडले. सानेगुरुजी यांना शोषित, वंचित समूहांबद्दल अपार आस्था होती. मानवी मूल्यांवर त्यांची भिस्त होती. उद्याच्या भारताचे स्वप्न ते आपल्या कादंबऱ्यांमधून साकारत होते. मात्र त्यांच्या कादंबरीला मोठ्या प्रमाणात टीकेला सामोरे जावे लागले. अलीकडच्या काळात त्यांना एक श्रेष्ठ कादंबरीलेखक म्हणून मान्यता मिळत आहे. या काळातील कादंबरीविषयी गो.मा. पवार यांनी नोंदवलेले निरीक्षण महत्त्वाचे आहे- ''बाबा पद्मनजींचा एकाकी प्रयत्न व हरिभाऊ आपट्यांचा अपवाद वगळला तर स्वातंत्र्यपूर्व काळातील कादंबरीवाङ्मयाबद्दल समाधानाला फारशी जागा दिसत नाही. चांगली कादंबरी निर्माण करण्याची क्षमता असणाऱ्या वामन मल्हार-केतकरांकडून समाधानकारक निर्मिती झाली नाही व इतरांकडून तर सामान्यत: रंजनपर कादंबऱ्यांचीच भर पडली. स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी कादंबरीचे चित्र आहे ते असे.''[१] या निष्कर्षावरून स्वातंत्र्यपूर्वकाळातील मराठी कादंबरीचे स्वरूप लक्षात येते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी या काळातील

कादंबरीकारांना घरकोंबडे कादंबरीकार म्हटले होते. श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीही १९३२ साली कोल्हापूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात एकूण साहित्याबरोबर कादंबरी-लेखनाच्या मर्यादाही स्पष्ट केल्या होत्या. एकूणच या काळातील कादंबरीकारांची दृष्टी ही सीमित होती. त्यांचा अवकाश फारच मर्यादित होता. काळाचे भानही या कादंबरीकारांना तितकेसे असलेले दिसत नाही. राजकीय घडामोडी आणि प्रबोधन चळवळी यादृष्टीने कितीतरी गोष्टी आजूबाजूला घडत असताना या काळातील कादंबरीकारांना मात्र या गोष्टी कादंबरीच्या संरचनेमध्ये सामावून घेता आल्या नाहीत.

इसवी सन १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. दीडशे वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर भारतीयांचे स्वप्न साकार झाले. लोकशाही प्रणालीच्या स्वीकारातून जनसामान्यांचे जगणे उन्नत करण्याचे प्रयत्न सुरू झाले. या काळात कथा आणि कवितेच्या स्वरूपात आमूलाग्र बदल झाले. बा.सी. मर्ढेकरांनी मराठी कवितेचा आशयाविष्कारात्मक विस्तार केला. आधुनिकवादी जाणिवेच्या संस्कारातून सर्वार्थाने नवतेचा प्रत्यय देणारी कविता त्यांनी लिहिली. याच जाणिवेच्या प्रभावसंस्कारातून पुढे विंदा करंदीकर, शरदचंद्र मुक्तिबोध, चित्रे, कोलटकर असा मराठी कवितेचा परीघ विस्तारला. नवकथेच्याही बहराचा हा काळा होता. गंगाधर गाडगीळ, भावे, गोखले, व्यंकटेश माडगूळकर नवकथेचे धुरीण होते. त्यांनी मानवाच्या अबोध पातळीवरचे जग वैशिष्ट्यपूर्णरीत्या साकारले. वास्तवाचा स्पर्श असलेल्या गोष्टीही त्यांनी लिहिल्या. मात्र त्यांना वास्तवाचे बहुमुखीपण दिग्दर्शित करता आले नाही. एका बाजूला या काळातील मराठी कथा, कविता नावीन्याचा ध्यास घेत असताना कादंबरी मात्र या सगळ्यापासून अलिप्त असलेली दिसते. स्वातंत्र्योत्तर काळातील श्री.ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर, र. वा. दिघे यांसारखे प्रादेशिकतेचे चित्रण करणारे कादंबरीकारही फडके यांच्या रंजनवादी प्रभावापासून सुटू शकले नाहीत. एका बाजूला मराठी कादंबरीचा भूगोल विस्तारला असला तरी तिने संरचनात्मकदृष्ट्या काही लक्षणीय भर घातली नाही.

व्यंकटेश माडगूळकर यांनी 'बनगरवाडी' या कादंबरीत माणदेशी बोली, तिथला प्रदेश सजीव स्वरूपात साकारला. त्यानंतर हमीद दलवाई यांची 'इंधन', उद्धव शेळके यांची 'धग', अण्णा भाऊ साठे यांची 'फकिरा' या कादंबऱ्यांमधून गाव-खेड्यातील व्यक्ती-समूहाचे, जातीय, वर्गीय संघर्षाचे, स्त्रियांच्या शोषणाचे, वंचितांच्या इतिहासाचे, लढ्याचे प्रभावी चित्रण येते. लोकजीवनाचे, लोकसंस्कृतीचे विविध पदर या कादंबऱ्यांमधून उलगडतात. 'धग'मधील कौतिक ग्रामीण भागातील स्त्रीचे प्रतिनिधित्व करते. 'इंधन'मध्ये कोकणचा बदलता सामाजिक अवकाश येतो. परंपरागत सत्तेविरुद्धचा, जातीविरुद्धचा असंतोष या कादंबरीतून प्रकटला आहे. बी. रघुनाथ यांची 'आडगावचे चौधरी' ही या काळातील महत्त्वाची कादंबरी आहे. चौधरी घराण्याचा नऊ पिढ्यांचा इतिहास छोट्याशा कादंबरीतून साकारला आहे. काळाचे स्थित्यंतर, सरंजामीपणा, मूल्यभावाचे बदलणे या सगळ्याचे त्यांनी प्रभावी चित्रण केले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पुढच्या दशकभराच्या कालावधीमध्ये काही महत्त्वाच्या घटना घडल्या. त्याचा काहीसा प्रभावही तत्कालीन कादंबरीवर पडला. महात्मा गांधींचा खून, धम्मचक्र परिवर्तन, पंचवार्षिक योजना, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, सहकार चळवळ, आधुनिकतेमुळे ग्रामीण-नागर अवकाशात झालेले बदल अशा सर्व घटितांमुळे आपल्या सांस्कृतिक पर्यावरणात कमालीची उलथापालथ झाली. या काळात साहित्यव्यवहारावर असलेली विशिष्ट वर्गाची मक्तेदारी मोडीत निघाली. पुढच्या टप्प्यावर शंकर पाटील, आनंद यादव, रा.रं. बोराडे या लेखकांनी ग्रामवास्तवाला केंद्रस्थानी ठेवून लिखाण केले. त्यांनी बदलत्या गावगाड्याचा, ढासळत्या मूल्यव्यवस्थेचा, यंत्राच्या आगमनपर्वाचा घेतलेला वेध आणि योजलेली भाषा त्या परिसराशी नाते सांगणारी होती. त्यामुळेच १९८० नंतरच्या काळात राजन गवस, सदानंद देशमुख, पुरुषोत्तम बारेकर, कृष्णात खोत, शंकर सखाराम, सीताराम सावंत, आनंद विंगकर, रवींद्र पांढरे, मोहन पाटील, महादेव मोरे या लेखकांनी बदलत्या गावगाड्याचे नवे रचित साकारले. धर्मसत्ता, राजसत्ता, जागतिकीकरण, माध्यमव्यवहार अशा वर्तमान बाह्यदाबातून गावगाड्याचे रूप कमालीचे पालटत गेले. याचे प्रतिध्वनी आजच्या ग्रामीण साहित्यात पाहावयास मिळतात. मात्र या बदलत्या सांस्कृतिक पर्यावरणाचा वेग पकडण्यात ते कमी पडत आहेत. अजूनही या लेखकांच्या साहित्यातून चित्रित होणारा कालावकाश दोनेक दशकाच्या मागीलच आहे. त्यामुळे कालसुसंगत राहण्याची मोठी जबाबदारी या लेखकांना पार पाडावी लागणार आहे. या काळामध्ये ना.र. शेंडे, शंकरराव खरात,

ज.वि. पवार, उत्तम बंडू तुपे या लेखकांनी उपेक्षित जनसमूहाच्या प्रश्नांना, वेदनांना आपल्या कादंबऱ्यांमधून आवाज दिला. बाबूराव बागूल यांची 'सूड' ही एक महत्त्वाची लघुकादंबरी आहे. एका मुरळीचा सूडाचा अनेक पातळ्यावरील प्रवास छोट्याशा अवकाशात बागूल यांनी साकारला आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय याचा पुरस्कार करणारे त्यांचे लेखन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारदृष्टीचा प्रभाव त्यांच्यावर आहे.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये स्त्रियांनीही महत्त्वाचे असे कादंबरीलेखन केले आहे. विभावरी शिरूरकर यांच्या 'बळी' व 'जाई' या कादंबऱ्या स्वातंत्र्योत्तर काळात प्रकाशित झाल्या. स्त्री आणि शोषितांच्या दु:खवेदनांचे वास्तव चित्रण त्यांनी केले. कमल देसाई यांनी 'रात्रंदिन आम्हा' (१९६४) व 'काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई' (१९७५) या दोन लघुकादंबऱ्यांमधून प्रस्थापित समाजव्यवस्थेचे आणि लेखनाचे संकेत धुडकावले आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांमधील नायिका स्वतंत्र, एकाकी आहेत. स्वातंत्र्यासाठी एकाकीपणही त्या आनंदाने पत्करतात. कालानुक्रमाची गुंतागुंत, कथनाची अनवट शैली यामुळे त्यांच्या कादंबऱ्या वेगळ्या ठरतात. आधुनिकवादी जाणिवेची सूत्रे त्यांच्या कादंबऱ्यांमधून ठळक स्वरूपात येतात. गौरी देशपांडे यांनी विचारस्वातंत्र्य, निर्णयक्षमता, बुद्धिवादी असणाऱ्या नायिका उभ्या केल्या. कोणत्याही अर्थाने सत्तास्थान, अधिकारपद हातात असणाऱ्या व्यक्तीने कोणाही व्यक्तीच्या स्वातंत्र्याची गळचेपी करू नये, हा स्वर त्यांच्या एकूणच लिखाणाच्या केंद्रस्थानी आहे. शांता गोखले यांची 'रीटा वेलिणकर' हीही या काळातील एक महत्त्वाची कादंबरी आहे. आधुनिक स्त्रीच्या जगण्याच्या विस्तारलेल्या कक्षा ही कादंबरी अधोरेखित करते. स्त्री-पुरुषांच्या जगाचा तुलानात्मक वेध घेत त्यामधील ताण, घुसमट, अंतर्विरोधाचे त्या नेमकेपणाने चित्रण करतात. 'त्या वर्षी' या कादंबरीत त्यांनी कलावंताचे अनोखे जग त्यातील बहुपरिमितीसह साकारले आहे. अनेक अंतर्विरोधांनी व्यापलेले हे कथन मानवी मनात वसत असलेल्या आदिम जाणिवांचा शोध घेते. दांभिकता, हिंसा, असूया, दिखाऊपणा अशा विकृतींनी मानवी जगण्याला कसे वेढले आहे याचा परामर्श त्या घेतात. कविता महाजन यांनी 'ब्र' आणि 'भिन्न' या दोन कादंबऱ्यांमधून समकालीन समाजवास्तव निर्भीडपणे मांडले आहे. अनेक स्त्रियांचे अनुभवविश्व त्यांच्या कादंबऱ्यात येत असल्याने या कादंबऱ्या समूहलक्षी ठरतात. स्वअनुभवाचे पदर त्यात मिसळले असल्याने आशयाची परिणामकारकता वाढली आहे. त्यांच्या नायिका निर्बंध झुगारतात. सामाजिक संकेतांचे उल्लंघन करतात. हे सर्व त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण भाषेतून साकारल्याने भाषिक पातळीवरही त्यांच्या कादंबऱ्या महत्त्वाच्या ठरतात. मेघना पेठे यांची 'नातिचरामि' या कादंबरीमधील नायिका अधिक प्रगल्भपणे एकूण समाजव्यवहाराकडे पाहते. ती अधिक धीट आहे. लैंगिकतेच्या संदर्भातही ती आपली मते प्रखरपणे मांडते. दुसऱ्या पुरुषाशी संबंध नसताना असल्याचे सांगते. भाषेच्याही चाकोऱ्या मोडत आशयाला प्रभावीपणे आविष्कृत करणारी भाषा त्यांनी योजली आहे. अंबिका सरकार, आशा बगे, सानिया यांनी संयतपणे स्त्रीची बाजू मांडलेली आहे. नातेसंबंधामध्ये स्त्री कशी भरडली जाते, तिला कोणत्या ताणातून जावे लागते याचे चित्रण त्यांनी केले आहे, मात्र याविरुद्ध बंडाचे निशाण त्यांच्या कादंबऱ्यातील नायिका घेत नाहीत. शिल्पा कांबळे यांची 'निळ्या डोळ्याची मुलगी' या कादंबरीत आंबेडकरी तत्त्वज्ञान आणि स्त्रीवाद याची सांगड घातली आहे. 'फिंद्री' ही सुनीता बोर्डे यांची कांदबरी अलीकडेच प्रकाशित झाली आहे. बाईच्या दु:खशोषणाची ती एक गाथाच आहे. या कादंबरीतील नायिकेला शिक्षणासाठी करावा लागलेला संघर्ष, व्यवस्थेशी द्यावा लागलेला झगडा विदारक स्वरूपाचा आहे. एकूणच या काळातील स्त्रियांचे कादंबरीलेखन फारच अल्प आहे. या काळातील स्त्रियांच्या कादंबरीविषयाचे रेखा इनामदार-साने यांचे निरीक्षण महत्त्वाचे आहे. ''आधुनिक जीवनपद्धतीने उत्पन्न झालेले पेच मांडण्याचा त्या प्रयत्न करतात. त्यांच्या जगाचा परीघ विस्तारलेला नाही. परंतु त्यांच्या लेखणाला ज्या मर्यादा पडतात, त्या आपल्या सामाजिक परिस्थितीचाच परिपाक आहेत, असे म्हणावेसे वाटते. गेल्या आणि येत्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे असताना तीव्रतेने वाटते की आणखी पन्नास वर्षांनी तरी लेखिकांच्या साहित्याचा अलगपणे विचार करण्याची गरज उरू नये, असे कादंबरीलेखन स्त्रियांच्या हातून घडावे आणि अभ्यासकांची त्याकडे पाहण्याची मानसिकता पालटावी.''[२] असे भरीव काम स्त्रियांच्या हातून घडणे आवश्यक आहे. समाजजीवनाचा विस्तृत पैस सामावून घेत पसरणे आवश्यक आहे. विविध भूप्रदेशांतील, स्तरांतील स्त्रियांनी आपले जगणे विविध आयामासह कादंबरीतून रेखाटणे आवश्यक आहे. कथा आणि कवितेच्या बाबतीत स्त्री-लेखिकांची कामगिरी तुलनेने अधिक आश्वासक आहे. कांदबरी-

लेखनाच्याही नव्या वाटा धुंडाळत हा मार्गही त्यांनी प्रशस्त करणे आवश्यक आहे. आज कृषिजनसंस्कृतीचे चित्रण सशक्तपणे करणारी एकही स्त्री-कादंबरीकार नसावी ही बाब चिंतनीय आहे.

मराठी कादंबरीचा एक महत्त्वाचा वळणटप्पा म्हणून भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' या कादंबरीकडे पाहावे लागते. मराठी नवकादंबरीची सुरुवात या कादंबरीपासून होते. ही कादंबरी आशय आणि रूपाच्या पातळीवर सर्वार्थाने नावीन्यपूर्ण ठरते. या कादंबरीतून त्यांनी आधुनिकतावादाचा जोरकस पुरस्कार केला. एकटेपण, तुटलेपण, असुरक्षितता, अस्थिरता, दुभंगलेपणाचा प्रत्यय त्यांच्या या कादंबरीतून येतो. त्यांच्या समकालीन व पुढच्या कादंबरीलेखकांवरही या अस्तित्ववादी सूत्रांची गडद छाया पाहायला मिळते. भाऊ पाध्ये, किरण नगरकर, चंद्रकांत खोत, विलास सारंग याबरोबरच श्याम मनोहर, रंगनाथ पठारे, राजन गवस (कळप), दीनानाथ मनोहरांच्या प्रारंभीच्या लेखनावर हा प्रभाव आहे. 'बिढार'पासून नेमाडे यांनी वास्तववादाची कास धरल्याने या संकल्पनेस अतोनात महत्त्व प्राप्त झाले. वास्तववादी कादंबऱ्यांची परंपराच निर्माण झाली. मुख्य म्हणजे सरधोपट वास्तवादी कादंबऱ्यांची निर्मिती यामुळे मोठ्या प्रमाणावर झाली. पृष्ठस्तरीय वास्तवाला अनेक कंगोरे असतात याकडे या काळातील लेखकांचे दुर्लक्ष झाले. १९९० नंतरच्या काळात मात्र हे चित्र बदलू लागले. विलास सारंग, रंगनाथ पठारे, श्याम मनोहर, प्रवीण बांदेकर, नंदा खरे, संग्राम गायकवाड यांसारखे कादंबरीकार या वाङ्मयप्रकाराच्या सामर्थ्यशक्यता लक्षात घेऊन लेखन करू लागले. त्याचा विचार आपण पुढे करणार आहोत.

भाऊ पाध्ये, अनंत सामंत, मधु मंगेश कर्णिक, जयवंत दळवी, ह.मो. मराठे, अनंत कदम, किरण नगरकर या लेखकांनी महानगरीय जीवनाचे चित्रण केले आहे. मुंबई महानगराचा अवकाश विविध दृष्टीबिंदूतून या लेखकांनी साकारला. या शहराचे तळकोपरे धुंडाळले. भाऊ पाध्ये यांनी समग्र महानगर आपल्या चित्रणकक्षेत आणले. स्वातंत्र्योत्तर तीन-चार दशकांत मुंबई शहराचा पालटलेला अवकाश त्यांनी बारकाव्यांसह साकारला. या लेखकांनी मुंबईचे कार्पोरेट कल्चर, झोपडपट्टी, राजकारण, मध्यमवर्गीय जीवनजाणिवा, सांस्कृतिक वाटचालीचे प्रभावी चित्रण केले. महानगराच्या आक्राळविक्राळ पसरलेपणात एकट्या व्यक्तीचा अवकाश कसा खुंटला जातो याकडेही हे कादंबरीकार लक्ष वेधतात. भौतिकतेच्या पलीकडचे सामान्य माणसाचे जगणे या लेखकांनी चितारले आहे. हे तळचे जग कसे दु:खांनी, समस्यांनी व्यापलेले आहे, याचा शोध त्यांनी घेतला आहे. तसेच, महानगरातील असुरक्षिततेचे, एकटेपणाचे प्रभावी चित्रण या कादंबरीकारांनी केले आहे. या कादंबरीकारांमध्ये भाऊ पाध्ये वगळता अन्य लेखकांनी चित्रित केलेले महानगरीय संवेदन सीमित अवकाशाचेच दिग्दर्शन करते. या सर्व कादंबरीकारांच्या कादंबरीतील अवकाश हा मुंबई शहराने व्यापलेला आहे. पुणे, नागपूर अशा महानगराकडे वाटचाल करत असलेल्या शहरांचा अवकाश विविध परिप्रेक्ष्यातून साकारलेला दिसत नाही.

राजकीयतेचे ठळक संदर्भ केंद्रस्थानी असणाऱ्या कादंबऱ्याही या काळात अल्पशा प्रमाणात का असेना लिहिल्या गेल्या आहेत. वसंत वरखेडकर यांनी 'प्रतिनिधी' या कादंबरीमध्ये स्वतंत्र भारताचे स्वप्न आणि प्रत्यक्ष वास्तव यातील अंतराय विविध घटितांसह अधोरेखित केला आहे. ग. प्र. प्रधान यांनी 'साता उत्तराची कहाणी' या कादंबरीमध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय विचारप्रणालींची मीमांसा केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील भल्याबुऱ्या घटनांचा परामर्श त्यांनी घेतला आहे. विविध विचारसरणींच्या दृष्टीबिंदूतून त्यांनी तत्कालीन राजकारणाची केलेली चिकित्साही महत्त्वाची आहे. रंगनाथ पठारे यांनी 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतून आणीबाणीच्या पार्श्वभूमीवरील महत्त्वपूर्ण घटना, सत्तांतर याचा जनसामान्यांच्या जगण्यावर झालेला परिणाम साक्षेपाने समोर आणला आहे. 'ताम्रपट' या कादंबरीत त्यांनी चाळीस वर्षांचा महाराष्ट्रीय राजकारणाचा पट समर्थपणे पेललेला आहे. रा.रं. बोराडे यांनी 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीत राजकारणामध्ये आरक्षणातून वाढलेला स्त्रियांचा सहभाग घरातीलच पती, मुलगा यांना कसा खटकतो यावर नेमकेपणाने भाष्य करते. सत्ताकारण नातेसंबंध कसे विखरून टाकते, याचा वास्तवदर्शी धांडोळा त्यांनी घेतला आहे. अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक', 'सिंहासन' या कादंबऱ्यांमध्ये राज्याचे सत्ताकारण केंद्रस्थानी आहे. मंत्रालयाच्या अवकाशाचा फार सजीव वापर त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये आहे. या वरिष्ठ पातळीवरील घडामोडींच्या चर्वितचर्वणाचे सविस्तर वर्णन आहे. जनसामान्यांच्या जगण्याच्या रीतीत मात्र त्यामुळे काही बदल होत नाही, अशा विधानापर्यंत ही कादंबरी पोचते. त्याचीच सत्यता आजही प्रत्ययाला येते आहे. अलीकडच्या काळात प्रवीण बांदेकर यांची 'इंडियन ॲनिमल फार्म' ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. समकालीन राजकारणाची ती

एक रूपककथा आहे.

ऐतिहासिक कादंबरीलेखनाची परंपरा स्वातंत्र्योत्तर काळातही ठळक राहिली आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात रा. भि. गुंजीकर, हरिभाऊ आपटे, नाथमाधव, वि.वा. हडप यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांना अफाट लोकप्रियता मिळाली. या कादंबरीलेखकांनी आपले लेखन ऐतिहासिक सत्यावर आधारलेले सांगितले आहे. मात्र त्यांच्या लेखनात अद्‌भुततेला, काल्पनिकतेलाच अधिक जागा आहे. रणजित देसाई यांच्या 'स्वामी' या कादंबरीपासून ऐतिहासिक कादंबरीलेखनाचा दुसरा टप्पा समजला जातो. राष्ट्रभक्ती आणि प्रादेशिक अस्मितांच्या जोरकस प्रभावामुळे या काळातील ऐतिहासिक कादंबऱ्या कमालीच्या लोकप्रिय ठरल्या. ना.स. इनामदार, गो.नी. दांडेकर, शिवाजी सावंत, विश्वास पाटील या लेखकांनी ऐतिहासिक कादंबरीला मोठी लोकप्रियता मिळवून दिली. ती आजतागायत टिकून आहे. या काळातील ऐतिहासिक कादंबरीसंदर्भात वसंत आबाजी डहाके यांचे एक निरीक्षण आहे. ''इतिहासाकडे वळायचे ते समकालीन आणि गतकालीन मानवी जीवनाचे आकलन व्हावे यासाठी. व्यक्ती (पराक्रमी अथवा भीरू, सद्‌गुणी अथवा दुर्गुणी, उदात्त अथवा उथळ) तिच्या भोवतालची राजकीय-सामाजिक (अथवा ऐतिहासिक) स्थिती, त्या व्यक्तीची उक्ती-कृती, इतर व्यक्तींच्या उक्ती-कृती, त्या व्यक्तींच्या मनाचे अंत:स्तर, भौतिक आणि दैवी स्थितींशी दिले जाणारे सामने या सगळ्या गोष्टी समजून घेण्याच्या संदर्भात मराठीतली ऐतिहासिक कादंबरी फारशी समाधानकारक नाही. ती समाधानकारक नसण्याचे आणखी एक कारण म्हणजे हरी नारायण आपटे यांच्यापासून नेमाडे, श्याम मनोहर, रंगनाथ पठारे यांच्यापर्यंत एकंदरीत घडत असलेल्या रूपबंधाचे तिला अजिबात भान नाही.''[३] या मर्यादांची जाणीव या काळातील ऐतिहासिक कादंबरी वाचताना प्रकर्षाने होते. यामध्ये गेल्या दोन दशकांत बदल होतो आहे. नंदा खरे, दीनानाथ मनोहर, आनंद विनायक जातेगावकर यांनी ऐतिहासिक कादंबरीच्या रूपबंधाचा लवचीक, प्रसरणशील उपयोग केला आहे. पौराणिक कादंबरीदेखील व्यक्तिगौरवाच्या, उदात्तीकरणाच्या रंजकतेतून बाहेर पडू पाहत आहे. विलास सारंग यांची 'रूद्र' ही कादंबरी त्या अनुषंगाने महत्त्वाची आहे.

अद्‌भुतरम्य, लोकप्रिय कादंबरीलेखनाचीही एक मोठी परंपरा मराठीमध्ये आहे. प्रारंभी हळबेशास्त्री यांची 'मुक्तामाला', ना.स. रिसबूड यांची 'मंजुघोषा' या कादंबऱ्या लोकप्रिय ठरल्या. हाच मार्ग पुढे प्रशस्त करण्याचे काम बाबूराव अर्नाळकर, चंद्रकांत काकोडकर, बाबा कदम, सुहास शिरवळकर यांनी केले. त्यांच्या कादंबऱ्याच्या अनेक आवृत्याही निघत आहेत. अद्‌भुतता, उत्सुकता निर्माण करण्याच्या क्षमतेमुळे वाचक या तंत्रात गुंतत जातो. मराठी भाषकांच्या कानाकोपऱ्यापर्यंत या लेखकांचे लेखन पोचले आहे. मात्र या लेखकांकडे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष झाले आहे. या लेखकांनी रहस्यकथेचा रूपबंध वापरून वास्तवाचे अनेक आयाम दिग्दर्शित केले असते, तर कादंबरीच्या वाढीसाठी ते पोषक ठरले असते. ते नेहमीच वास्तवापासून दूर राहिले. जीवनापासून फारकत घेतल्याने केवळ अद्‌भुततेच्या जोरावर त्यांचा निभाव लागणे अशक्य होते. कथेमध्ये जयंत पवार यांनी रहस्यकथेचा रूपबंध वापरून कथालेखनाचे एक नवे प्रारूपच समोर ठेवले आहे. जयंत पवार यांनी रहस्यकथेविषयीच्या धारणा चुकीच्या ठरवल्या. कादंबरीलेखनातही हे होणे गरजेचे आहे.

१९९० नंतरच्या काळात मराठी कादंबरी प्रयोगशीलतेकडे अधिक झुकलेली दिसते. मुख्यत्वे या काळात आपल्या सामाजिक-सांस्कृतिक प्रारूपात मूलगामी बदल झाले. जागतिकीकरणामुळे नवे सांस्कृतिक पर्यावरण आकाराला आले. धर्मसत्तेची राजकीय हस्तक्षेपातील यंत्रणा मोठ्या प्रमाणावर कार्यान्वित झाली. शिक्षण-सहकार-राजकारण या क्षेत्रामध्ये मूल्यऱ्हासाच्या प्रक्रियेने कमालीचा वेग धारण केला. या बदलाचे स्वरूप गुंतागुंतीचे, बहुस्तरीय स्वरूपाचे आहे. त्यामुळे या बदलांना आविष्कृत करण्यासाठी या काळातील कादंबरीकारांना रूपाविष्काराच्या नवनवीन शक्यतांचा शोध घ्यावा लागला. परंपरागत शैलीरूपे नाकारत कादंबरीचा रूपबंध अधिक खुला केला. या काळातील लेखकांनी कथेचीही काही रचनातत्त्वे सहजपणाने कादंबरीत मुरवली आहेत. या काळातील कादंबरीविषयी या लेखामध्ये थोडे विस्ताराने लिहिले आहे, कारण मराठी कादंबरीच्या पुढील दिशांचे सूचन होण्यास त्यामुळे मदत होईल. श्याम मनोहर हे या काळातील एक महत्त्वाचे कादंबरीकार. त्यांच्या कांदबरीलेखनात 'कळ'(१९९६) ही कादंबरी सर्वार्थाने महत्त्वपूर्ण ठरते. कथानक, पात्ररचना, निवेदन, भाषा अशा सर्वच संरचनात्मक घटकांच्या पार्श्वभूमीवर ती नवीनतम अशा शक्यतांचा शोध घेते. या कादंबरीमध्ये एकूण ५६ कथनतुकडे आहेत. प्रत्येक भागाचा कथनकर्ता वेगळा आहे.

यातील कथनकर्ता कधी प्रथमपुरुषी तर कधी तृतीयपुरुषी आहे. मध्येच ‘चरित्रकळ’चा मजकूर काही प्रकरणानंतर येतो. हे कथन कोणाचे? त्याचा कथनकर्ता कोण? काही कळत नाही. या सर्वातून त्यांनी समकालीन समाजव्यवस्थेतील अनेक कंगोऱ्यांना स्पर्श करत त्यातील फोलपणा उघड केला आहे. त्यांनी ‘खूप लोक आहेत’ या कादंबरीमध्ये मानवी मनात दीर्घकाळ वसत आलेल्या धर्मचिंतनाचा वेध घेतला आहे. ‘उत्सुकतेने मी झोपलो’ या कादंबरीत कुटुंबव्यवस्थेला आतून-बाहेरून न्याहाळत, त्यावर तिरकस भाष्य करत कुटुंबव्यवस्थेतील मर्यादा प्रकर्षाने समोर आणल्या आहेत. ‘खेकसत म्हणणे, आय लव्ह यू’, ‘प्रेम आणि खूप खूप नंतर’, ‘आम्ही हळहळ पावलो’ यांसारख्या महत्त्वाच्या कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी केले आहे. त्यांची प्रत्येक कादंबरी वेगळे आशयविश्व आणि आविष्काररीतीचे दर्शन घडविते. सतत काहीतरी शोधण्याचा प्रयत्न त्यांच्या कादंबरीत केंद्रवर्ती आहे.

श्याम मनोहरांनंतर या काळातील प्रमुख कादंबरीकार म्हणून रंगनाथ पठारे यांच्या नावाचा विचार करावा लागतो. ‘दिवे गेलेले दिवस’ ते ‘सातपाटील कुलवृत्तांत’पर्यंतचा त्यांचा कादंबरीकार म्हणून प्रवास थक्क वाटावा असा आहे. ‘नामुष्कीचे स्वगत’ ही त्यांची महत्त्वाची कादंबरी. या कादंबरीत कालानुक्रमाचे रूढ संकेत मोडले आहेत. पात्रांचाही ठरीव संच नाही. कादंबरीतील बारा प्रकरणे तशी एकमेकांपासून पूर्णत: भिन्न आहेत. निवेदक वगळता प्रत्येक प्रकरणात स्वतंत्र पात्रे येतात. फक्त पॅट्रीशिया हे पात्र दोन प्रकरणात आले आहे. अखंडपणे, सलगपणे हा निवेदक बोलत राहतो. काळाच्या बदलाबद्दलचे आपले आकलन मांडत राहतो. त्यांच्या ‘भर चौकातील अरण्यरुदन’ या कादंबरीतही २६ भाग आहेत. येथेही कथनाच्या पातळ्या निर्माण केल्या आहेत. कादंबरीअंतर्गत कादंबरी अशी नवीच संहिता या कादंबरीत त्यांनी घडवली आहे. ‘सातपाटील कुलवृत्तांत’ या कादंबरीमध्ये सातशे-आठशे वर्षांचा कुलवृत्तांत सात निवेदकांच्या सांगण्यातून साकारला आहे. काळाचा विस्तृत पट ऐतिहासिकतेचा, वाचनीयतेचा तोल सांभाळत वैशिष्ट्यपूर्णरीत्या उभा केला. कालिक स्थित्यंतर दर्शवताना त्यांनी ऐतिहासिक वास्तव गोष्टींशी घातलेली सांगड अफलातून आहे.

एक कादंबरीकार म्हणून गेल्या साठ वर्षांत आपल्या अस्तित्वाची गडद मोहर उमटवणाऱ्या भालचंद्र नेमाडे यांची ‘हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ’ ही कादंबरी २०१० साली प्रकाशित झाली. समूहसंस्कृतीचा मोठा पट कवेत घेत ही कादंबरी इतिहासाचे उत्खनन करते. दीर्घ कालावकाशाचे हे कथन आहे. मातृसंस्था, कृषिसंस्कृती, गावगाडा, स्थापत्यशैली, वास्तुरचना यामागील जाणिवांचा शोध नेमाडे यांनी घेतला आहे. राजन गवस यांची ‘ब-बळीचा’ हीही या काळातील एक महत्त्वाची कादंबरी आहे. जागतिकीकरणाच्या महाकाय वरवंट्याखाली भरडल्या जाणाऱ्या, लुटल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या दु:सह जगण्याची गाथा ही कादंबरी मांडते. इतिहासाच्या व्यापक परिप्रेक्ष्यातून त्यांनी या कादंबरीत कृषिजनसंस्कृतीची पुनर्मांडणी केली आहे. आडव्याप्पा, कोणकेरी व दिपूशेट या कथनाच्या तीन पातळ्या आहेत. याशिवाय पटकथा, पत्रे, डायरी, टिपणे अशा कथनतंत्रातून ही कादंबरी उलघडत जाते. काळानुरूप शोषणाच्या रीती कशा बदलत गेल्या, याचा धांडोळा त्यांनी घेतला आहे.

प्रवीण बांदेकर हे आजच्या काळातील महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. ‘चाळेगत’, ‘उजव्या सोंडेच्या बाहुल्या’ आणि ‘इंडियन ॲनिमल फार्म’ या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. ‘चाळेगत’मध्ये कोकणच्या बदलत्या मूल्यचौकटीचा, राजकीय-सामाजिक स्थितीगतीचा परामर्श घेतला आहे. कोकणातील पालटलेल्या भू-जैविक परिणामातून जनसामान्यांचे जगणे कसे आकारले जाते, याची चर्चा आहे. ‘उजव्या सोंडेच्या बाहुल्या’मध्ये मूलतत्त्ववाद्यांच्या ध्येयधोरणांची चिकित्सा केली आहे. ‘इंडियन ॲनिमल फार्म’ ही समकालीन राजकारणाची रूपककथा आहे. कथनपद्धतींचा व फॅन्टसीचा त्यांनी वापर खुबीने केला आहे. मुख्यत्त्वे राजकीय विधान करत असताना राजकीय भूमिका फार पक्की लागते. प्रवीण बांदेकर यांचा राजकीय दृष्टिकोन आणि भूमिका फार स्पष्ट आहेत याचा प्रत्यय त्यांच्या लिखाणातून येतो. रमेश इंगळे-उत्रादकर यांनी ‘निशाणी डावा अंगठा’, ‘सर्व प्रश्न अनिवार्य’ या कादंबऱ्यांमधून शिक्षणप्रक्रियेतील बेगडीपणा उजागर केला आहे. शिक्षण हा विषय आता आस्थेच्या परिघाबाहेर फेकला जात आहे. या प्रक्रियेतील मूल्यऱ्हासाचा वेग थक्क करणारा आहे. हे तिरकस शैलीत त्यांनी मांडले आहे. ‘एका कादंबरीची गोष्ट’ या कादंबरीत कोरोनाकाळातील दु:सह जगणे अनेक कोनांतून मांडले आहे. त्यातील दाहकता हेलावून टाकणारी आहे. मकरंद साठे यांच्या ‘ऑपरेशन यमू’, ‘अच्युत आठवले आणि आठवण’, ‘काळे रहस्य’ या महत्त्वाच्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. या कादंबऱ्यांमध्ये

त्यांनी प्रचलित संकेतव्यूह ओलांडले आहेत. वास्तववादाला बगल देत त्यांनी केवळ फॅन्टसीच्या आधारे जीवनानुभवाला आकारित केले आहे. कथनाचे विविध प्रयोग त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये पाहायला मिळतात. मात्र ही गुंतागुंत वाचकांची कसोटी पाहणारी आहे. कथाशयाचा अन्वयार्थ लावताना त्यांची चांगलीच दमछाक होते. नंदा खरे यांची 'उद्या' ही कादंबरी वर्तमान आणि भवितव्याची भयावहता दिग्दर्शित करते. भविष्यात कोणती जीवनपद्धती आकाराला येणार, मानवी अस्मिता आणि अस्तित्व संघर्ष कोणत्या पातळीवर जाणार यावरचे मार्मिक भाष्य त्यांनी केले आहे.

या काळातील नंदा खरे, दीनानाथ मनोहर, विलास सारंग, आनंद विनायक जातेगावकर या लेखकांनी पौराणिक, ऐतिहासिक कादंबरीलेखनाचे एक नवे प्रारूप साकारले आहे. नंदा खरे यांनी 'अंताजीची बखर' आणि 'बखर अंतकाळाची' या कादंबऱ्यांमधून आजवरच्या ऐतिहासिक कादंबरीचा रूपढाचाच मोडला आहे. उदात्ततेच्या, भव्यतेच्या जोखडाखाली वावरणाऱ्या ऐतिहासिक कादंबरीला जमिनीवर आणण्याचे काम त्यांनी केले. बखरीच्या रूपबंधाचा अभिनव असा वापर त्यांनी केला आहे. आनंद विनायक जातेगावकरांनी 'अस्वस्थ वर्तमान' या कादंबरीतून गेल्या दीडशे वर्षांतील महाराष्ट्रातील समाज-सांस्कृतिक स्थित्यंतरे उलगडून दाखवली आहेत. धर्मसत्ता, राजसत्तेचा वर्तमानावरचा गडद अंकुश आणि त्यातून आकारास आलेल्या समाजजीवनाच्या दिशा त्यांनी स्पष्ट केल्या आहेत. १८५७ चे बंड, प्रबोधनपर्व, शाहूमहाराजांचे वेदोक्त प्रकरण, गांधीहत्या अशा विविध घटनांचा अन्वयार्थ तर्काधिष्ठित पद्धतीने लावला आहे. विलास सारंग यांनी 'रुद्र' या कादंबरीत परंपरेतील अनेक मिथकांचा, पुराणांचा सर्जक वापर करून वर्तमान व्यवस्थेतील विसंगती दिग्दर्शित केली आहे. पौराणिक कादंबरी लेखनाचे आजवरचे रूढ संकेत मोडत व्यापक मूल्यव्यूहावर ही कादंबरी उभी असलेली दिसते. या कादंबरीत त्यांनी आदिम काळापासून इसवी सन २२०० पर्यंतचा मोठा काळ समाज-सांस्कृतिक परिप्रेक्ष्यातून तपासला आहे. त्यांनी केलेले भविष्यकालीन कथन बरेचसे सूचक आहे. सारे काही नष्ट होणार आहे, हा त्यांचा गर्भित इशारा विचारप्रवृत्त करायला लावणारा आहे. दीनानाथ मनोहर यांच्या 'मन्वंतर' या कादंबरीत कथनाची दुपेडी वीण आहे. वसाहतकालीन 'नर्मद' आणि वर्तमानकालीन 'गौतम' असे दोन नायक या कादंबरीत आहेत. स्वप्न या तंत्राच्या साहाय्याने या दुपेडी वीणेची सांधेजोड मनोहर यांनी केली आहे. शोषित, वंचित अशा भिल्ल आदिवासींच्या लढ्याच्या पार्श्वभूमीवरचे इतिहासवाचन या कादंबरीत आहे. मनोहर यांनी वैशिष्ट्यपूर्ण शैलीतून दोन भिन्न काळांचे अवकाशचित्रण रेखीवपणे साकारले आहे. एकूणच पौराणिक, ऐतिहासिक कादंबरी ठरीव साच्यातून बाहेर पडून विस्तारत आहे, हे निश्चित.

वास्तव तपशिलांचा सर्जक उपयोग करून महत्त्वाचे असे लेखन करणारे कादंबरीकार या काळात आहेत. कृष्णात खोत हे त्यातील एक महत्त्वाचे नाव. ग्रामजीवनातील बदलत्या वर्तमानाचा वेध त्यांनी घेतला आहे. बाईच्या जीवनानुभवाच्या दुःखद कहाण्यांनी त्यांच्या कादंबऱ्यांचा पैस व्यापलेला आहे. 'रौंदाळा' कादंबरीतील राजकीय कथनही महत्त्वाचे आहे. 'झडझिंबड' या कादंबरीमध्ये महापुराने वेढलेल्या गावाचे सजीव चित्रण करून त्यातील दाहकतेचे दर्शन घडवले आहे. 'रिंगाण' या कादंबरीमध्ये आदिमतेच्या, नैसर्गिकतेच्या पातळीवर जाणारे चक्राकार कथन आशयबंध उसवू न देता प्रभावीपणे साकारले आहे. अशोक पवार यांनी 'इळनमाळ', 'पडझड', 'तसल्या' या कादंबऱ्यांमधून भटक्या बेलदार कुटुंबाचे दर्शन घडवले आहे. महेंद्र कदम यांनी 'धूळपावलं', 'आगळ' आणि 'तनस' या कादंबऱ्यांमधून गाव-खेड्याच्या राजकारणाचे, शिक्षण-नोकरीनिमित्त गावाबाहेर पडून स्थिर झालेल्या तरुणांच्या मानसिकतेचे चित्र रेखाटले आहे.

प्रसाद कुमठेकर यांनी 'बगळा' आणि 'बारकुल्या बारकुल्या ष्टोऱ्या' या कादंबऱ्या मराठवाड्यातील उदगिरी बोलींसह तिथला भूगोल, समाजावकाश वैशिष्ट्यपूर्णरीत्या साकारतात. त्यांच्या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये अनेक कथनकर्ते आहेत. समाजव्यवस्थेतील, शिक्षणव्यवस्थेतील रिकाम्या जागा त्यांनी कौशल्याने दिग्दर्शित केल्या आहेत. किरण गुरव यांनी 'जुगाड' या कादंबरीमधून संवेदना गारठलेला यांत्रिक काळ मोठ्या कौशल्याने मुखर केला आहे. या काळात संवेदनशील तरुणांची होणारी ससेहोलपट प्रत्ययकारीरीत्या आविष्कृत केली आहे. आसाराम लोमटे यांनी 'तसनस' या कादंबरीमध्ये शेतकरी आंदोलने, शेतकरी चळवळ अधोगतीकडे लागण्यामागची कारणमीमांसा ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून केली आहे. आनंद विंगकर यांची 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' ही कादंबरी शेतकऱ्यांच्या दुःसह जगण्याची गाथा आहे. हे दुःख विसरण्यासाठी तो कष्ट उपसतो, कष्टच त्यांच्या जगण्याला काहीसा विराम देते, याकडे ती निर्देश करते. रवींद्र पांढरे यांच्या 'पोटमारा',

'सायड', 'अवघाचि संसार' या कादंबऱ्यांमध्ये जामनेरी बोलीचा सर्जक आविष्कार पाहायला मिळतो. अतिशय सहज-संवादी शैलीतून आकारलेले कथन वाचकांच्या मनाचा ठाव घेते. कथनक्रियेत त्यांना सामावून घेते. संतोष जगताप यांनी 'विजेने चोरलेले दिवस' या कादंबरीत भारनियमनासारखा अनोखा, सीमित विषय त्यातील विविध परिमाणासाह विलक्षण ताकदीने रेखाटला आहे. भारनियमनातून शोषणाच्या नव्या पद्धती कशा आकारत गेल्या त्याचा हा शोध आहे.

संग्राम गायकवाड यांची 'आटपाट देशातल्या गोष्टी' ही वेगळ्या विषयावरची महत्त्वाची कादंबरी आहे. या देशाच्या समाज-सांस्कृतिक, राजकीय स्थित्यंतराचा इतिहास आणि त्यातून आकाराला आलेल्या व्यवस्थांचा विस्तृत पैस त्यांनी आपल्यासमोर ठेवला आहे. केवळ प्रशासकीयच नाही तर एकूण समाजव्यवस्थेच्या व्यापक पटावरून ही पाहणी त्यांनी केली आहे. अनेकांच्या दृष्टीतून हे सारे अवलोकन केले आहे. विषयबीजांची मालिकाच या कादंबरीत आहे. वैचारिक व तात्त्विक चर्चांचे घनदाट जाळेच या कादंबरीत पाहायला मिळते. एकूण ही व्यवस्था व्यक्तिसंबंधांचे काय करते, याचा मूल्यगर्भ शोध संग्राम गायकवाड यांनी घेतला आहे. याबरोबच रफिक सूरज यांच्या 'रहबर' या कादंबरीतून अल्यसंख्याक समूहजीवनाचे बारकाईने चित्रण आले आहे. जी.के. ऐनापुरे यांच्या 'रिबोट'मध्ये गिरणगावातील चाळ संस्कृतीचे चित्रण आहे. बबन मिंडे यांच्या 'लँडमाफिया', 'कॉमन मॅन', 'गावई' या कादंबऱ्यांमधून शहरालगतच्या उपजाऊ जमिनीची गुंठा गुंठा विक्री होणे, सामान्य माणसाच्या जगण्याच्या कथाव्यथा त्यांनी चित्रित केल्या आहेत. अवधूत डोंगरे यांच्या 'स्वत:ला फालतू समजण्याची गोष्ट', 'पान, पाणी नि प्रवाह', 'एका लेखकाचे तीन संदर्भ', 'भिंतीवरचा चष्मा' या महत्त्वाच्या कादंबऱ्या गेल्या दशकभरामध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. पत्रकारिता, मार्क्सवाद, नक्षलवाद, राष्ट्रवाद, भटकंती, साहित्य अशा बहुविध विषयांचा व्यासंग त्यांच्या लेखनात आहे. खंडित वर्तमानाचा नोंदीरूप धांडोळा ते घेतात. वैचारिकता आणि चिंतनशीलतेचा प्रत्यय त्यांच्या कादंबऱ्यात जागोजाग येतो. ऐतिहासिक आणि भौगोलिक संदर्भाचा वर्तमानाशी अनुबंध जोडल्याने त्यांच्या कांदबऱ्यांतील काळाचा पैस विस्तारलेला आहे. अतिशय तिरकसपणे त्यांनी भोवतालाचा वेध घेतला आहे.

एकणूच पंचाहत्तर वर्षांच्या या विस्तृत काळात कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये झालेल्या स्थित्यंतराचा हा धांडोळा आहे. या काळात कादंबरी अनेकांगानी विकसित झाली. भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीलेखनाचा आणि कादंबरीविषयक विचारांचा प्रभाव या संबंध काळावर जाणवतो. नेमाडे यांच्या वास्तववादाच्या पुरस्कारामुळे सरधोपट वास्तववादी कादंबऱ्यांचे पीकच जोरात फोफावले. आधुनिकतावादी जाणिवेचे चित्रण करणारी कादंबरीही मोठ्या प्रमाणावर लिहिली गेली. 'कोसला', 'एन्कीच्या राज्यात', 'चक्रव्यूह', 'कळप', 'बाकी शून्य' या कादंबऱ्यांवर अस्तित्ववादी सूत्रांची गडद छाया आहे. आयडेंटिटीचा शोध केंद्रस्थानी आहे. आजचा तिचा कोन आधुनिकतेकडून उत्तर आधुनिकतेकडे झुकला आहे. 'कळ', 'नामुष्कीचे स्वगत', 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ', 'रुद्र' याबरोबरच नंदा खरे, प्रवीण बांदेकर, मकरंद साठे यांच्या कादंबऱ्यांचा या अनुषंगाने विचार होऊ शकतो. एकूणच आजची मराठी कादंबरी वर्तमानाचे नवे रचित साकारत आहे. नवी भाषा, नवे रचनाबंध, नवी मूल्ये रुजवण्याचे आणि वाचकांची अभिरुची घडवण्याचे काम करत आहे. तिचा भू-जैविक परीघ उत्तरोत्तर विस्तारतो आहे. काळभान आणि मूल्यभानाची नवी जाण तिने प्रस्तुत केली आहे. अर्थात काळाच्या मोठ्या पटावर, त्यातही कादंबरीसारख्या महत्त्वाच्या वाङ्मयप्रकारासंबंधी शब्दमर्यादांचा तोल सांभाळत काहीएक भाष्य करताना अनेक गोष्टी निसटल्या असण्याची शक्यता आहे. काही महत्त्वाच्या कादंबरीकाराची नोंदही राहून गेली असेल. या बाबी गृहीत धरून अवलोकनाचा हा प्रयत्न आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. पवार, गो. मा. : साहित्यमूल्य आणि अभिरुची, साकेत प्रकाशन, प्र. आ. ११९४.

२. इनामदार-साने, रेखा : गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी (संपा. विलास खोले), लोकवाङ्मय गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, २००७, पृ. क्र. १४०

३. डहाके, वसंत आबाजी : गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी (संपा. विलास खोले), लोकवाङ्य गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, २००७, पृ. क्र. ११९

**– डॉ. संदिप दळवी**

भ्रमणध्वनी : ९९२१३६४९३८

**आपण ग्रंथप्रेमी आहातच!**
**सजग आणि समृद्ध वाचक होण्यासाठी**
**५७ वर्षांची दीर्घ परंपरा असलेल्या**
**'ललित' या वाङ्मयीन मासिकाचे वर्गणीदार व्हा!**

# ललित

## वार्षिक वर्गणी ४५० रुपये

## चार वर्षांची सवलतीची वर्गणी १६०० रुपये

या वर्गणीत २०० रुपयांच्या दिवाळी अंकासह दहा अंक
(यात विशेषांकांचाही समावेश आहे) देण्यात येतील.


**वर्गणी खालील ठिकाणी स्वीकारली जाईल.**

* **ललित कार्यालय (मुंबई)** – २३८२६२२५, २३८७३५०२ * **मॅजेस्टिक बुक डेपो (गिरगाव)** – २३८८२२४४ * **मॅजेस्टिक ग्रंथदालन (दादर)** – ९८९२२२०२३९ * **मॅजेस्टिक बुक डेपो (ठाणे)** – २५३७६८६५, २५४३०६५२ * **मॅजेस्टिक (पुणे)** – ०२०-२४४५९८१५, ९९२२३४४०८१ किंवा वर्गणीचा चेक/डीडी '**ललित मंथली**' या नावाने ३०८, फिनिक्स, ४५७ एस. व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई-४००००४ या पत्त्यावर पाठवावा किंवा **'ललित'च्या बँक ऑफ महाराष्ट्र, गिरगांव शाखेच्या २००५३७०१००६ (IFCS code no. : MAHB0000006) या क्रमांकाच्या बँकखात्यात रक्कम जमा करून** majesticph@gmail.com या इमेलवर पैसे भरल्याचे तपशील कळवावेत. त्याचप्रमाणे आपली वर्गणी येथेही भरू शकता : www.MajesticReaders.com

**या शिवाय वर्गणी इथेही भरू शकता.**

| G Pay | UPI | Paytm | PhonePe |
|---|---|---|---|
| **9664161090** | **UPI Id : kothawale.ashay@okaxis** | **9664161090** | **9664161090** |

**वर्गणी भरल्यावर नाव आणि पत्ता ९८२०९५५५६७ या**
**व्हॉट्सअॅप क्रमांकावर कळवावा किंवा एसएमएस पाठवा.**



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

विनोदी साहित्य

•




# स्वातंत्र्योत्तर विनोदी साहित्याची वाटचाल

**सुभाष सुंठणकर**

**'चिं.वि. जोशी, पु.ल. देशपांडे यांचा विनोद कालबाह्य झाला आहे काय?' असा प्रश्न हल्ली अधूनमधून विचारला जातो. साहित्य अथवा विनोद कालबाह्य होण्याची शक्यता आहे काय याचा आपण विचार करू. पन्नास-साठ वर्षांचा काल उलटला आहे. काळ बदलला आहे. संस्कार बदलले आहेत. चालीरीती बदलल्या आहेत. मद्यपान, चोरून धूम्रपान, विद्यार्थ्यांचे शाळा चुकवणे व म्हणून शाळेत-घरी मार खाणे, ऑफिसात पैसा खाताना सापडणे, प्रेयसीवर चोरून प्रेम करणे, ऑफिसात कामचुकारपणा करणे, अशा गोष्टींवर पूर्वी विनोद रचला गेला. पण, आता सारेच बदलले आहे. मद्यपानाला प्रतिष्ठा लाभली आहे. कामचुकारपणा, भ्रष्टाचार, प्रेयसीवरचे प्रेम, शाळा-कॉलेज चुकवणे, उर्मटपणा, दादागिरी या बाबी सर्वसामान्य झाल्या आहेत.**

**स्वातंत्र्योत्तर** मराठी विनोदी साहित्याचा आपणास आढावा घ्यायचा आहे. पंचाहत्तर वर्षांच्या कालखंडाचा आढावा घेणे, हे तसे मोठे काम आहे. त्यात विनोदी कथा-कादंबऱ्या, नाटके, सिनेमा, कविता, लेख, स्फुट प्रकार या सर्वांचाच आढावा घ्यावा लागेल.

सन १९४७ पासूनचा हा जरी कालखंड धरला तरी स्वातंत्र्यपूर्व काळात जन्मलेले व तारुण्यात असलेले लेखक तेव्हा विनोदी लेखनात रुजलेले होते. यात चिं.वि. जोशी, श्री.कृ. कोल्हटकर, राम गणेश गडकरी, आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे, दत्तू बांदेकर, गंगाधर गाडगीळ, द.मा. मिरासदार, शंकर पाटील, जयवंत दळवी, वगैरे लेखक येतात. पुढील पंचवीस-तीस वर्षांचा काळ यांनी गाजवला.

चिमणराव-गुंड्याभाऊ हे साहित्य गाजवणारे व ही पात्रे अजरामर करणारे चिं.वि. जोशी यांनी वाचकांची हसून हसून पुरेवाट केली. त्यांचा विनोद कल्पकतेपेक्षा वास्तव परिस्थितीवर आधारलेला आहे. तो विनोद कृत्रिम वाटत नाही. श्री.कृ. कोल्हटकरांचा विनोद उपहासपूर्ण होता. समाजसुधारणेसाठी त्यांनी विनोदाचा मार्ग वापरला. बंडूनाना, पांडूतात्या ही विनोदी पात्रे अजून भाव खाऊन

जातात. ‘सुदाम्याचे पोहे’ हे पुस्तक त्या काळातील मैलाचा दगड आहे. आचार्य अत्रेंच्याच भाषेत सांगायचे झाले तर गेल्या दहा हजार वर्षांत झाला नाही असा विनोदी लेखक म्हणजे आचार्य अत्रे. राजकारण, पत्रकारिता, काव्य, नाटके वगैरे अनेक क्षेत्रांत सर्वगुणसंपन्न असणाऱ्या आचार्य अत्रेंचा विनोदही उच्च दर्जाचा आहे. ‘झेंडूची फुले’सारखा विडंबन कवितासंग्रह असो, सामाजिक ढोंगी लोकांचा बुरखा फाडणारे ‘तो मी नव्हेच’ नाटक असो, ‘ब्रँडीची बाटली’ कथेवरचा सिनेमा असो, २०२२ पर्यंत सातत्याने चाललेले ‘मोरूची मावशी’ असो त्यातील विनोद लोकांना प्रचंड आवडला. उपहास व अतिशयोक्ती हे त्यांचे विनोदगुण होते. त्यांनी हजरजबाबी विनोदाने अनेकांना नामोहरम केले होते. राम गणेश गडकरी हे कवी व नाटककार. दोन्ही क्षेत्रे त्यांनी यथार्थपणे सांभाळली. बाळकराम हे त्यांचे टोपणनाव. तरल विनोदबुद्धी, कुशाग्र बुद्धिमत्ता याच्या भांडवलावर तिंबूनाना, आबाभटजी यांसारखी पात्रे त्यांनी निर्माण केली. काळीकुट्ट असणारी ठकी, तिच्या लग्नाची खटपट त्यांनी समर्थपणे रंगवली. ‘भावबंधन’ नाटकातील इंदू-बिंदू हा त्याकाळचा विनोदविषय होता. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत वाचकांच्या मनावर राज्य करणारे म्हणजे पु.ल. देशपांडे. त्यांच्या पुस्तकांच्या प्रती अजूनही मोठ्या प्रमाणावर खपत आहेत. उच्च दर्जाचा विनोद, प्रचंड निरीक्षणशक्ती, सामान्य जनतेला खळखळून हसवण्याची क्षमता, शाब्दिक कोट्या यांच्या जोरावर त्यांनी ‘बटाट्याची चाळ’, ‘व्यक्ती आणि वल्ली’, ‘मराठी वाङ्मयाचा (गाळीव) इतिहास’ वगैरे पुस्तके घराघरात पोचवली. विनोदी एकपात्री प्रयोग केले. त्यांच्या नारायण, हरीतात्या, अंतू बर्वा, नाथा कामत, पेस्तनकाका, रावसाहेब यांसारख्या पात्रांची आठवण जुनेजाणते लोक अजून सांगत असतात. दत्तू बांदेकर यांना सूक्ष्म निरीक्षणशक्ती, तरल विनोदबुद्धी लाभली होती. ‘सख्या हरी’ या त्यांच्या पात्राला लोकांनी डोक्यावर घेतले. विनोदामध्ये ‘पुढे काय घडणार’ या उत्कंठेमध्ये वाचक बुडून जात. ते प्रसिद्धीपराङ्मुख होते. त्यांनी विनोदी शब्दकोश लिहिला. विनोदी सुभाषिते लिहिली. ‘रविवारचा मोरावळा’ हे ‘नवयुग’मधील त्यांचे सदर गाजले. गंगाधर गाडगीळ या विनोदी लेखकाने बंडू व स्नेहलताच्या कथा सर्वसामान्यांत रुजवल्या. सामान्य मध्यमवर्गीयांच्या या कथा असल्याने त्या खूप गाजल्या. त्यांनी ‘सोबत’मध्ये ‘फिरक्या’ हे सदर लिहिले. ‘सात मजले हास्याचे’ हे पुस्तक त्यांचेच. जयवंत दळवी यांच्या लेखनात मिश्कील वृत्ती दिसते. त्यांची नजर शोधक होती. ‘ठणठणपाळ’ या टोपणनावाने त्यांनी ‘ललित’मधून लेखन केले. द.मा. मिरासदार हे किस्सेवजा विनोदी कथा लिहिण्यात पटाईत होते. ग्रामीण भागातील सुस्त, रिकामटेकडी, अर्धवट ज्ञानी माणसांतील विनोद त्यांनी छान टिपला. ‘माझ्या बापाची पेंड’, ‘माझी पहिली चोरी’, ‘शाळेतील समारंभ’, वगैरे कथा गाजल्या. शंकर पाटील गंभीर व विनोदी दोन्ही लिहीत. तरल विनोदबुद्धी, हेरलेली विसंगती यांच्या आधारे त्यांनी ‘धिंड’, ‘मीटिंग’, ‘हिशेब’, वगैरे कथा सादर केल्या. त्यांचे कथाकथन ऐकणे हा एक अपूर्व योग होता.

‘चिं.वि. जोशी, पु.ल. देशपांडे यांचा विनोद कालबाह्य झाला आहे काय?’ असा प्रश्न हल्ली अधूनमधून विचारला जातो. साहित्य अथवा विनोद कालबाह्य होण्याची शक्यता आहे काय याचा आपण विचार करू. पन्नास-साठ वर्षांचा काल उलटला आहे. काळ बदलला आहे. संस्कार बदलले आहेत. चालीरीती बदलल्या आहेत. मद्यपान, चोरून धूम्रपान, विद्यार्थ्यांचे शाळा चुकवणे व म्हणून शाळेत-घरी मार खाणे, ऑफिसात पैसा खाताना सापडणे, प्रेयसीवर चोरून प्रेम करणे, ऑफिसात कामचुकारपणा करणे, अशा गोष्टींवर पूर्वी विनोद रचला गेला. पण, आता सारेच बदलले आहे. मद्यपानाला प्रतिष्ठा लाभली आहे. कामचुकारपणा, भ्रष्टाचार, प्रेयसीवरचे प्रेम, शाळा-कॉलेज चुकवणे, उर्मटपणा, दादागिरी या बाबी सर्वसामान्य झाल्या आहेत. त्यावरचा विनोद आता शिळा, जुनापुराणा वाटत आहे. त्यामुळे विनोदी लेखक २०२२ सालच्या घडामोडींवर लक्ष ठेवून लिहीत राहिले तर त्यात ताजेपणा येईल.

विनोद कालबाह्य म्हणायचा तर इतर क्षेत्रांचे तरी काय? स्वातंत्र्यानंतरची पहिली पंचवीस वर्षे आठवा. तेव्हा चांगले गायक होते. चांगले संगीतकार होते. चांगले सिनेमा होते. प्रामाणिक नेते, राज्यकर्ते होते. झटून राबणारे समाजसेवक, स्वयंसेवक होते. कथा, कादंबरी, कविता, नाटक या क्षेत्रांत गाजलेले साहित्यिक होते. संपादक-प्रकाशक होते. चांगले शिक्षक-प्राध्यापक होते. ‘आता तो काळ राहिला नाही,’ अशी हाकाटी जुन्याजाणत्या लोकांकडून ऐकू येते. मग सर्वच क्षेत्रांत शिथिलता आल्यावर विनोदी साहित्याच्या क्षेत्रातही शिथिलता येणारच की असे समर्थन केले जाते. परंतु यात जिवंतपणा आणण्यासाठी उपाय काय यावर मात्र विचार केला जात नाही.

चिं.वि. जोशी, अत्रे, पु.ल. देशपांडे यांच्यानंतरचा मधला काळ विनोदी साहित्याच्या दृष्टीने कसा होता यावर

एक नजर टाकता येईल. या काळात आवाज, मोहिनी, बुवा, जत्रा, विनोदी एक्स्प्रेस, ऑल द बेस्ट, हास्यानंद, हास्यांगण, हास्यधमाल, शामसुंदर, नगारा, धमालधमाका, फिरकी, कॉमेडी कट्टा, हास्यचिंतामणी, विशाल विटा या मासिकांनी व दिवाळी अंकांनी विनोदाची परंपरा पुढे चालू ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले. इतर गंभीर व लोकप्रिय अंकांतूनही एखाददुसरी विनोदी कथा छापून येत असे. त्यादृष्टीने विनोदी दिवाळी अंक प्रसिद्ध करणाऱ्या संपादकांचे काम मोठे आहे. प्रत्येक विनोदी लेखकाचे पुस्तक प्रकाशित होईलच असे नाही, पण दिवाळी अंकांमधून विनोदाचा प्रवाह चालू ठेवण्याचे या लेखकांचे कामही फार महत्त्वाचे आहे.

कोण आहेत हे लेखक?

बाळ गाडगीळ यांनी हास्यपरंपरा जपली. मुकुंद टांकसाळे यांची 'टांकसाळीतील नाणी' खणखणीत निघाली. रमेश इंगळे-उत्रादकर यांनी 'निशाणी डावा अंगठा'मधून शिक्षणक्षेत्रातील उथळपणा रंगवला. शिरीष कणेकरांनी अनेक लेख लिहून विनोद रंगवला व विनोदी एकपात्री कार्यक्रमही केले. विजय कापडी तर गेली पन्नास वर्षे आपल्याला हसवत आहेत. दीपा गोवारीकरांनी विनोदात भर टाकली. वसंत जोशी, राजा राजवाडे, चंद्रकांत महामिने, दत्तू बांदेकर, अ.वा. वर्टी, पद्माकर डावरे, बाळ गांगल, बाळ सामंत, प.गं. सुर्वे, भा.ल. महाबळ, म.वि. कोल्हटकर तर दिवाळी अंकांमधून सतत विनोदाचा ढोल बडवत राहिले. गंगाराम गवाणकर यांनी 'संगीत वस्त्रहरण' लिहिले व मच्छिंद्र कांबळींनी ते विनोदी मालवणी नाटक महाराष्ट्रभर गाजत ठेवले. विनोदी मालवणी नाटकाची परंपरा पुढे इतर संस्थांनी चालूच ठेवली. शिवराज गोर्ले यांनीही विनोदी नाटके गाजवली. अशोक पाटोळे यांनी 'आवाज'मधून विनोदी कथा, नाटिका तर लिहिल्याच, तीन अंकी नाटकेही रंगवली.

विनोदी साहित्य हे लोकप्रिय आहे. विनोदी दिवाळी अंकांवर वाचकांच्या उड्या पडतात. वाचनालयात विनोदी अंकांना मागणी असते. तरी विनोदी साहित्याची समीक्षा फारशी लिहिली गेली नाही. विनोदावर समीक्षेची पुस्तके फार कमी लिहिली गेली आहेत. डॉ. उमा कुलकर्णी यांनी मराठी विनोदाची मुबलक चर्चा आपल्या पुस्तकात केली आहे. डॉ. गो.मा. पवार यांनी विनोदाचे स्वरूप, पूर्वकाळापासून आजपर्यंतचा विनोद यावर सविस्तर चर्चा केली आहे. अलीकडचे प्रदीप कुलकर्णी विनोदावर बरेच काही सांगून जातात. 'यांनी केले विनोदविश्व समृद्ध' या पुस्तकात विनोदाची पार्श्वभूमी त्यांनी सांगितली आहे. कोणत्या कारणामुळे विनोदनिर्मिती होते हे सांगून जुन्या-नव्या बारा विनोदी लेखकांच्या विनोदाचे स्पष्टीकरण केले आहे. उदाहरणे दिली आहेत. आणखी काही समीक्षकांनी विनोदावर लिहिले असेलही, पण अशा समीक्षकांची संख्या कमीच आहे.

समीक्षेला वाहिलेली काही मासिके आहेत. त्यात कविता, कथा, दलित साहित्य, कादंबरी या साहित्य प्रकारांवर लेख छापून येत असतात. रसग्रहण होत असते. मंडनखंडन होत असते. पण, इथेही विनोदी साहित्य दुर्लक्षितच आहे.

विनोद हा साहित्यप्रकार गौण मानला जातो काय? तसे असेल तर त्याचे कारण काय? विनोदी दिवाळी अंकांवर वाचकांच्या उड्या पडतात. मग हे असे का? की लोकप्रियता आणि दर्जेदार साहित्य परस्परविरोधी असते असे प्रमेय मांडायचे? पण गंभीर साहित्यात अनेकदा लोकप्रियता व दर्जा एकत्र नांदताना दिसतात. दर्जेदार पुस्तकांचा खपच ही बाब सिद्ध करत असते. मग पु.ल. देशपांडेंसारखे उदाहरण एखादेच. एकंदरीत विनोदी साहित्य लोकप्रिय असूनही गौण मानले गेले आहे. दुय्यम मानले गेले आहे.

समकालीन लेखकांच्या साहित्याची समीक्षा फारशी होत नाही. समीक्षक अजून केशवसुत, मर्ढेकर इथेच रेंगाळताना दिसतात असे म्हटले जाते. समकालीन लेखकाच्या समीक्षेत मुख्यतः दोन अडथळे येतात. १) उपलब्धता २) वादप्रसंग.

आपल्या बरोबरीचे लेखक काय लिहीत आहेत याकडे इतर लेखकांचे, समीक्षकांचे लक्ष फार कमी असते. साहित्यामध्ये विदर्भ, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, पुणे-मुंबई वगैरे भाग नकळत पडले आहेत. विदर्भातल्या रविवारच्या पुरवण्या, मासिके, पुस्तके पश्चिम महाराष्ट्रात सहजपणे उपलब्ध होत नाहीत; तसेच, पुणे-मुंबई येथील साहित्य पटकन विदर्भ-मराठवाड्यात उपलब्ध होत नाही. इंटरनेटने काही गोष्टी सोप्या झाल्या असल्या तरी सर्वसामान्य व गरीब वाचक इंटरनेटपासून अजून दूरच आहे. त्यामुळे आपल्या गावापासून दूर अंतरावर असणाऱ्या विनोदी लेखकाचे साहित्य पटकन वाचले जात नाही. दूर अंतरावरचा लेखकच माहीत नसेल तर त्याचे साहित्य कोण वाचणार? त्याच्यावर समीक्षा कोण लिहिणार? शिवाय आपल्याच भागातील लेखकाचा गाजावाजा करायचा ही मोजकी

असली तरी कंपूशाही वृत्ती समीक्षेला घातक ठरू शकते.

दुसरे म्हणजे वादप्रसंग. बऱ्याच वेळा समीक्षक लेखकाची स्तुती न करता त्याच्यावर टीका करतात. लेखकाचे चांगले गुण कोणते, जमेची बाजू कोणती हे सांगत नाहीत. अवगुण कोणते, चुका कोठे झाल्या हे ते सांगतात. 'साहित्य थिटे आहे,' 'साहित्य तोकडे आहे,' 'साहित्यगुणांचा अभाव आहे,' वगैरे समीक्षकांची भाषा असते. लेखक आपले पुस्तक परीक्षणासाठी पाठवतो तेव्हा समीक्षकांनी आपली स्तुती करावी, आपल्या पुस्तकाला चांगले म्हणावे, दर्जेदार साहित्याच्या यादीत आपल्या पुस्तकाचे नाव असावे, असे त्याला वाटत असते. पण, असे घडत नाही तेव्हा लेखक नाराज होतो. चिडतो. आपली उपेक्षाही त्याला सहन होत नाही व विरोधी सूरही सहन होत नाही. मग तो समीक्षकालाच दोष देऊ लागतो. 'जाण नाही,' 'कंपूशाही,' 'पक्षपाती,' 'उगीच विद्वत्तेचा आव आणणारा,' वगैरे आरोप त्याच्यावर होत राहतात. म्हणून मग समीक्षकही समकालीन लेखकांवर लिहिण्याचे टाळतात. दिवंगत व जुन्या लेखकांच्या साहित्यावर लिहीत राहतात. वादाचे प्रसंग टाळतात. विनोदी साहित्याबाबतही हेच होत असावे.

साहित्य संमेलनात तरी वेगळे काय घडत आहे?

तिथेही विनोदी साहित्याची, साहित्यिकांची उपेक्षाच झाली आहे. १८७८ पासूनच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांचा आढावा घेतल्यास श्री.कृ. कोल्हटकर, प्र.के. अत्रे, पु.ल. देशपांडे, गंगाधर गाडगीळ, रमेश मंत्री, द.मा. मिरासदार वगैर मोजकेच विनोदी लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालेले दिसतात.

बरे, साहित्य संमेलनात चर्चा म्हणावी तर तीही कमीच. विनोदावर परिसंवाद दुर्मिळच. विनोदी साहित्यिकांची विनोदावर भाषणे म्हणावी तर तीही शोधावी लागतील. सविस्तर चर्चा नाहीच. अखिल भारतीय साहित्य संमेलने सोडून इतर संमेलनेही खूप होतात. विभागवार साहित्य संमेलने, जिल्हा साहित्य संमेलने, विद्यापीठातील परिसंवाद, निरनिराळ्या साहित्यसंस्थांची चर्चासत्रे व परिसंवाद इथेही विनोदाची उपेक्षाच आढळते.

या नकारात्मक पार्श्वभूमीवर साहित्यिक राजन खान यांनी एक होकारात्मक किरण दाखवला होता. २०१० डिसेंबरमध्ये त्यांनी यवतमाळ येथे विनोद साहित्य संमेलन भरवले होते. हे 'विनोदी साहित्य संमेलन' नव्हते तर विनोदावर गंभीरपणे चर्चा करणारे विनोद साहित्य संमेलन होते. यात विनोदी लेख, विनोदी कथा, बालसाहित्यातील विनोद, विनोदाची समीक्षा, चित्रपट व दूरदर्शन मालिकांमधील विनोद, विनोदी कविता विडंबने यावर सर्वांगीण चर्चा झाली होती व संबंधित क्षेत्रातील जाणकार व्यक्ती हजर होत्या. प्रचंड खर्चाला फाटा देऊन अगदी साधेपणाने हे संमेलन संपन्न झाले. तीन दिवस चाललेल्या या संमेलनात विनोदाबाबतच्या अनेक प्रश्नांचा ऊहापोह झाला.

परंतु अशी विनोदावरची अथवा फक्त विनोदी साहित्य संमेलने किती झाली, याबाबत शंकाच आहे.

एकंदरीत विनोदी साहित्यावर चर्चा होणे गरजेचे आहे, हेही तितकेच खरे.

एखाद्या विनोदी साहित्यिकाचा अभ्यास करायचा तर कित्येकदा त्याचे संपूर्ण साहित्य उपलब्ध नसते. जुन्या पुस्तकाच्या आवृत्त्या काढल्या जात नाहीत. काही संपादकांनी, प्रकाशकांनी अशा साहित्याची झलक दाखवण्यासाठी 'निवडक', 'वेचक'चे संग्रह काढले आहेत. 'वेचक शिरीष कणेकर', 'निवडक अत्रे', 'बेस्ट ऑफ जयवंत दळवी', 'मिरासदारी' अशी पुस्तके निघाली आहेत. मला वाटते असे मंगला गोडबोलेंचेही पुस्तक येत असावे. अत्रे, दळवी, कणेकरांचे साहित्य विनोदी साहित्य तर आहेच, तसेच त्यांनी इतर लिखाणही भरपूर केले आहे. त्या सर्व लिखाणाचा अशा पुस्तकात समावेश आहे. असे असले तरी विनोदी लेखकांच्या 'निवडक' लेखन पुस्तकांची संख्या फार कमी आहे. त्यामुळे एखाद्या विनोदी साहित्यिकाचा अथवा अनेक विनोदी साहित्यिकांच्या लेखनाचा अभ्यास करणे कठीण झाले आहे. विनोदाची मीमांसा यामुळेच कमी होते. विनोदी लेखकाला नाउमेद करणारी ही बाब आहे.

त्यातल्या त्यात एक आशेची बाब म्हणजे 'निवडक आवाज'. पाटकरांचा 'आवाज' दिवाळी अंक जवळजवळ १९५१ पासून अत्यंत लोकप्रिय आहे. आवाज खरेदीसाठी वाचकांच्या पुस्तक-विक्री दुकानांवर उड्या पडतात. रांगा लागतात. वाचनालयात आवाजसाठी मोठी मागणी असते. अनेक दिवाळी अंकांचा एकच प्रत विकत घेणारी वाचनालये 'आवाज'च्या तीन-चार प्रती विकत घेऊन वाचनालयात ठेवतात. ही लोकप्रियता लक्षात घेऊन पाटकर यांनी 'निवडक आवाज' हे मोठ्या आकाराचे पुस्तक काढले. आवाज प्रकाशनानेच हे पुस्तक २००५ साली प्रकाशित केले. या अंकात विनोदी कथा, विनोदी लेखांबरोबरच आवाजचे वैशिष्ट्य असणारी खिडकी चित्रे,

हास्यचित्रे, व्यंगचित्रे यांचा समावेश आहे. या अंकात १९५१ ते १९९६ या काळातील विनोदी लेखकांच्या साहित्याचा समावेश आहे. सुमारे अर्धशतकातील सर्व विनोदी लेखकांची यात हजेरी आहे. प्रत्येकाचा एक लेख अथवा एक कथा असे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. हा एक विनोदी साहित्याचा दस्तऐवजच म्हणावा लागेल. प्रत्येक जाणकार वाचकाने संग्रही बाळगावे असे हे पुस्तक आहे.

आनंद अंतरकर यांनी 'हंस' मासिकातील चांगल्या निवडक कथांचे 'हंस कथा' नावाचे १, २, ३, ४ वगैरे खंड काढले होते तसेच 'मोहिनी'मधील विनोदी कथांचे 'कथा मोहिनी' नावाने खंड काढावेत असे त्यांच्या मनात होते व काही वर्षांपूर्वी माझ्याबरोबर गप्पा मारताना त्यांनी हे मत व्यक्त केले होते. पण ते प्रत्यक्षात उतरण्यापूर्वीच ते निघून गेले.

इतर विनोदी मासिकांच्या संपादकांनी अशा 'निवडक' साहित्याचा विचार केला तर चांगल्या विनोदी साहित्याची पुस्तके निघतील व वाचकांना संग्रही ठेवता येतील. हे आवश्यक आहे.

आता आपण लोकप्रिय करमणुकीच्या प्रकारांकडे वळू. सिनेमा, नाटके, एकांकिका, दूरदर्शन मालिका हे सध्या करमणुकीचे अत्यंत लोकप्रिय प्रकार आहेत. मराठी विनोदी सिनेमा काढायचा तर त्याला चांगली विनोदी कादंबरी लागते. पूर्वी काय किंवा आता काय, एकूण विनोदी कादंबरी दुर्मिळच. विनोदी कादंबरीत संपूर्ण कादंबरीभर सतत विनोद टिकवावा लागतो. पात्रांचे स्वभाव टिकवावे लागतात. दर्जा टिकवावा लागतो. हे काम कठीण तर आहेच, चिकाटीचेही आहे. दिवाळी अंकांमधून काही विनोदी कादंबऱ्या छापून आल्या आहेत. परंतु त्यांना शब्दमर्यादा असते. संपादकाला विनोदी लेख, विनोदी कथा छापून एक विनोदी कादंबरी त्याच दिवाळी अंकात बसवायची असते. शब्दमर्यादा घालावी लागते. मग लेखकाला कथानकात काटछाट करावी लागते.

अनेक चांगले विनोदी चित्रपट गेल्या पंचाहत्तर वर्षांत थिएटरात झळकले, गाजले. प्रेक्षकांना आवडले. मात्र हे चित्रपट ज्या कादंबऱ्यांवरून घेण्यात आले आहेत त्या कादंबऱ्या फारशा प्रकाशित झाल्या नाहीत. पूर्वी वि.वि. बोकील यांनी लिहिलेल्या कादंबरीवरून 'वाट चुकलेले नवरे' यासारखे राजा गोसावींचे चित्रपट गाजले. द.मा. मिरासदार यांच्या कथेवरून राजा गोसावींचाच 'गुरुकिल्ली' हा चित्रपट गाजला. ती कथा 'व्यंकूची शिकवणी' असावी असे वाटते. वसंत सबनीस यांनी आवाजच्या दिवाळी अंकात काही विनोदी दीर्घकथा लिहिल्या व त्याचे पुढे दादा कोंडके यांनी चित्रपट काढले. कथाकार वसंत सबनीस आणि दिग्दर्शन व प्रमुख भूमिका दादा कोंडके असे समीकरण बनले. 'हऱ्या-नाऱ्या जिंदाबाद' वगैर उदाहरणे देता येतील. पण नंतरचे अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगावकर, मकरंद अनासपुरे वगैरेंचे चित्रपट कोणत्या विनोदी कादंबऱ्या अथवा कथांवरून बेतलेले आहेत, याचा फारसा पत्ता लागत नाही. ते साहित्य प्रकाशित झाले आहे की नाही, तेही समजत नाही.

मराठीत विनोदी नाटकेही खूप निघाली. नाटकाचे काय असते? आधी नाटकाचे प्रयोग सुरू होतात. पन्नास-साठ प्रयोग झाल्यानंतर नाटक गाजते आहे हे लक्षात येते, तेव्हाच ते पुस्तकरूपाने वाचकांसमोर येते. तोपर्यंत नाटकाच्या हस्तलिखित संहितेवर व फोटोस्टॅट प्रतीवरच कलाकार पाठांतराचे व प्रयोगाचे काम पार पाडत असतात. त्यामुळे नाटकांची छापील पुस्तके फार कमी प्रमाणात उपलब्ध आहेत.

त्यामानाने विनोदी एकांकिकांना सध्या खूप भाव आला आहे. शाळा-महाविद्यालयांतून विनोदी एकांकिका सादर केल्या जातात. नाट्यछटा, एकपात्री प्रयोग, द्विपात्री प्रयोग हे बहुतेक विनोदीच असतात. एकांकिका स्पर्धांतही विनोदी एकांकिका असतातच. तरीही प्रकाशित रूपाने आलेल्या विनोदी एकांकिका, नाट्यछटा, एकपात्री पुस्तके एकंदरीत कमीच. त्यामुळे प्रयोग सादर करू इच्छिणाऱ्यांची संहिता मिळवण्यासाठी धडपड चालते.

दूरदर्शनवर चालणारे विनोदी कार्यक्रम लोकप्रिय असतात. आशिष पाथरे, राजेश देशपांडे, नीलेश साबळे वगैरेंनी लिहिलेले व विनोदी कलाकारांच्या साहाय्याने गाजवलेले कार्यक्रम सतत लोकप्रिय असतात. 'फू बाई फू', 'विनोदी एक्स्प्रेस', 'चला हवा येऊ द्या', 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हे कार्यक्रम लोकप्रियतेच्या शिखरावर असतात. लोकांची हसून पुरेवाट उडवतात.

असे काही कार्यक्रम दर्जेदार नसल्याची ओरडही अधूनमधून होत असते. त्यात अचकटविचकट हातवारे असतात. पुरुष साड्या नेसून येतात. विनोदापेक्षा नकला जास्त असतात. टिंगल जास्त असते. जाणकारांची अभिरुची सोडून घडवलेला विनोद असतो. अतिशयोक्ती जास्त असते. असे कार्यक्रम लोकप्रिय असतील तर प्रेक्षकांची अभिरुची हीन झाली आहे का, असाही प्रश्न

पडतो. मग याला विनोदी लेखक, मालिकांचे दिग्दर्शक, काम करणारे कलाकार, सर्वच जबाबदार ठरतात का? याचाही विचार झाला पाहिजे आणि यात सुधारणा करण्याची, दर्जा वाढवण्याची कुणाचीच तयारी नसेल तर टी.आर.पी. या नावाखाली प्रेक्षकशरण वृत्ती स्वीकारली पाहिजे.

महिलांना विनोदबुद्धी नसते, अशी अनेक वर्षांपासूनची एक समजूत आहे. विनोदी साहित्यिक महिला कमी आहेत. आता पाहा, पूर्वी स्त्रियांना शिक्षण वर्ज्य होते, त्यामुळे त्या निरक्षर होत्या. त्यांच्या शिक्षणाची सुरुवात उशिरा झाली. त्यामुळे त्यांचा साहित्यक्षेत्रात व विनोदी साहित्यक्षेत्रात प्रवेश उशिरा झाला. तरी इंद्रायणी सावकार, मंगला गोडबोले वगैरेंनी विनोदी क्षेत्रात लक्षणीय प्रगती केलेली दिसते. स्त्रियांना संसारात असणारी बंधने व अलीकडच्या स्त्रिया नोकरी करत असल्याने त्यांना वेळ न मिळणे याचाही विचार केला पाहिजेच.

बालसाहित्यात ना.धों. ताम्हणकरांनी 'गोट्या' हे विनोदी पुस्तक लिहिले. 'चिंगी' हेही एक पुस्तक होते. किशोर, मुलांचे मासिक, चांदोबा, बालवाडी या मुलांच्या मासिकांमधून काही विनोदी गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत. तरी प्रसिद्ध विनोदी लेखकांचा बालसाहित्याकडे वळण्याचा कल कमी दिसतो.

आता आपण विनोदी सदरांकडे वळू. मासिकांमधून, वर्तमानपत्राच्या रविवारसारख्या पुरवणीमधून जे नियमितपणे लिहिले जाते ते सदर, एकच लेखक अनेक दिवस चालवत असतो. जयवंत दळवींनी 'ठणठणपाळ' या टोपणनावाने ललित मासिकातून 'घटका गेली, पळे गेली' हे सदर अनेक वर्षे चालवले. या सदराने वाचकांची उत्सुकता वाढत ठेवली तरी हा ठणठणपाळ कोण आहे, हे वाचकांना कळले नव्हते. साहित्यिकांच्या फिरक्या घेणारा हा ठणठणपाळ कोण याची उत्कंठा शिगेला पोचली होती. निरनिराळ्या विनोदी लेखकांवर संशय घेतला गेला व शेवटी जयवंत दळवी हेच ठणठणपाळ हे रहस्य फोडण्यात आले.

ललितमध्येच नंतर 'अलाणे फलाणे' हे विनोदी पत्ररूपी सदर सुरू झाले. अलाणेचे फलाणेला विनोदी पत्र व या पत्राला फलाणेचे विनोदी उत्तर हे या सदराचे स्वरूप होते. 'निवडक ठणठणपाळ' व 'अलाणे फलाणे' हे दोन्ही नंतर पुस्तकरूपाने प्रकाशित झाले.

ललितची ही परंपरा 'झारा आणि सराटा' या शीर्षकाद्वारे सध्या 'पांडुरंग अय्या' या टोपणनावाने कोणीतरी चालू ठेवली आहे.

वर्तमानपत्रांच्या पुरवणीतूनही अशी सदरे प्रसिद्ध केली जातात.

सलग पंचाहत्तर वर्षे विनोदाची परंपरा चालू ठेवण्यात दिवाळी अंकांचा सहभाग मोठा आहे. तरुण पिढी इंग्रजी माध्यमाकडे गेली. मासिके बंद पडत चालली तरी विनोदाचा झेंडा फडकावत ठेवण्याचे कार्य दिवाळी अंकांनी केले. केवळ वात्रटिका, विडंबने, व्यंगचित्रेच नव्हेत तर दर्जेदार विनोदी कथा, लेख वाचकांना देण्याचे काम दिवाळी अंकांनी केले. या अंकातला बराचसा विनोद तत्कालीन राजकारणावर असेलही, कधी श्रृंगारालाच विनोद मानलेले असेलही, काही वेळा अतिशयोक्तीने दर्जा घसरलेला असेलही, पण म्हणून दिवाळी अंकांचे विनोदाचे सातत्य टिकवण्याचे महत्त्वाचे कार्य नाकारता येणार नाही. गेल्या तीस-चाळीस वर्षांत नवे दर्जेदार विनोदी लेखक निर्माण झाले ते दिवाळी अंकांमुळेच. कोण आहेत हे सध्याचे लेखक? कुणाकडे पुढील दशकांमध्येही आशेने पाहता येईल?

ज्यांच्या पुस्तकांना वाचनालयात सतत मागणी असे, अशा वि.आ. बुवा, रमेश मंत्री यांच्यानंतर विनोदाचा वारसा चालवणारे काही लेखक पुढील काळ गाजवत राहिले व आजही गाजवत आहेत. गंभीर लेखनासोबत विनोदी लेखन करणारे व.पु. काळे यांनी लेखनाने व कथाकथनाने पुढचा काळ गाजवला. कथाकथन म्हणजे व.पु. असे समीकरण बनले. 'झुळूक अमेरिकन तोऱ्याची', 'फिरंगढंग' वगैरे पुस्तकाने शरद वर्दे यांनी परदेशी स्वभावाचे किस्से दाखवले. मंगला गोडबोले अनेक दिवाळी अंकांतून हजेरी लावत असतातच. 'निवडक मंगला गोडबोले' पुस्तक निघण्याच्या वाटेवर आहे, यातच त्यांची लोकप्रियता दिसते. खरे तर 'विनोदी एक्स्प्रेस' या अंकाचे संजय घाटे हे संपादक व 'नगारा' अंकाचे विनोद गोरवाडकर संपादक. या दोन्ही संपादकांनी उत्तम विनोदी लिखाण केले. 'नसती आफत' हे विनोद गोरवाडकरांचे अलीकडचे पुस्तक. नागेश शेवाळकर हे तर विक्रमवीर आहेत. दरवर्षी ते पन्नासहून अधिक दिवाळी अंकांत कथा लिहितात. विनोदी व विडंबन कविता म्हटले की रामदास फुटाणे, दिलीप पां. कुलकर्णी, अशोक नायगांवकर आठवतात. ते विडंबन कवितांचे बहारदार काव्यवाचन करतात. सध्या बंगळूरू येथे वास्तव्य करणाऱ्या अविनाश चिंचवडकरांनी कोरोनाकाळात 'दिवस घरी हे राहायचे' तसेच 'मोबाइल न वापरणारा माणूस' ही पुस्तके लिहिली आहेत. अनंत तडवळकर, सतीश सहदेव कदम हे जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करत वाचकांना हसवत आहेत.

सध्या अनेक दिवाळी अंकांमधून दिसून येणारी साधारणतः सारखीच नावे म्हणजे सुधीर सुखठणकर आणि सुभाष सुंठणकर. अनेक पुस्तकांसमवेत सुखठणकरांचे 'चटपटीत' व सुंठणकरांचे 'आटपाटनगर साहित्य संमेलन' ही पुस्तके वाचकप्रिय झाली आहेत.

मी यापूर्वी म्हटल्याप्रमाणे समकालीन लेखकांचा आढावा घेणे त्यांच्या साहित्याच्या उपलब्धतेअभावी कठीण असते. परंतु आजचे हे लेखक कोणते विषय विनोदाद्वारे मांडत आहेत?

सध्या मोबाइलवापराचा अतिरेक झालाय. इंटरनेट, मोबाइल बँकिंग, ई मेल, एटीएम वगैरे आधुनिक बाबी जुन्या पिढीची पंचाईत करत आहेत. या बाबींचे सर्वसामान्यांचे अज्ञान हा आता विनोदाचा विषय झाला आहे. एकत्र कुटुंब पद्धती मोडल्याने बिघडलेली नाती, दूरदर्शन मालिकांमधील लांबड व फालतूपणा हे विषय आताच्या विनोदी दिवाळी अंकांतून प्रकटताना दिसतात, समर्थपणे मांडले जातात.

एकूण पंचाहत्तर वर्षांचा थोडक्यात आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे. विस्मरणाने, अनावधानाने काही लेखकांची नावे राहून जाण्याची शक्यता आहे. विनोदातील काही क्षेत्रांकडे, महत्त्वाच्या पुस्तकांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे. संदर्भामध्ये चूक होऊ शकते. तेव्हा चूकभूल देणेघेणे. विनोदाचा अभ्यास करणाऱ्या नवतरुणाला अथवा 'विनोदी क्षेत्रात काय वाचावे?' हे शोधणाऱ्या वाचकाला या लेखामुळे थोडे जरी मार्गदर्शन घडले तरी मला खूप समाधान वाटेल. स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवात विनोद अधिक टवटवीत झालेला दिसो, ही सदिच्छा. धन्यवाद.


**सुभाष सुंठणकर**
भ्रमणध्वनी – ९९०२८९५५१०

## निवेदन

प्रति
सभासद, कुटुंबीय, मित्रपरिवार,
मुंबई मराठी साहित्य संघ,
सप्रेम नमस्कार.

आपल्या संस्थेतर्फे 'साहित्य' हा अंक दर तीन महिन्यांनी प्रसिद्ध केला जातो. तसेच दरवर्षी एक दिवाळी अंकही प्रसिद्ध केला जातो. या वर्षीचे अंक पुढीलप्रमाणे:–
१. साहित्य : फेब्रुवारी–मार्च–एप्रिल २०२२
२. साहित्य : मे–जून–जुलै २०२२
३. साहित्य : ऑगस्ट–सप्टेंबर–ऑक्टोबर २०२२
तसेच दिवाळी, २०२१ हा 'साहित्य'चा मराठी बोलीभाषांवरील विशेषांक.
'साहित्य संघाची पन्नास वर्षे' हे पुस्तक.
वरील सर्व अंक आणि पुस्तक, मुंबई मराठी साहित्य संघाच्या पुढे दिलेल्या संकेतस्थळावर प्रकाशित केले आहे.
संकेतस्थळ : https://www.mumbaimarathisahityasangh.com
कृपया वरील संकेतस्थळाला भेट देऊन निर्देशित सर्व अंकांचा लाभ घ्यावा. आपले कुटुंबीय आणि मित्र परिवारालाही हे अंक वाचण्याची विनंती करावी.
धन्यवाद!
तुमच्या प्रतिक्रियेच्या प्रतीक्षेत,

आपले,
डॉ. अश्विनी भालेराव (प्रमुख कार्यवाह)
श्री. अशोक बेंडखळे (कार्यवाह–साहित्य शाखा)
श्री. नारायण लाळे (संपादक)



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

बालसाहित्य

•

# स्वातंत्र्योत्तर बालसाहित्याची वाटचाल

**एकनाथ आव्हाड**




**आजच्या बालसाहित्याचे स्वरूप ठरवताना कथानक, वातावरणनिर्मिती, पात्रयोजना आणि भाषा या गोष्टींचा विचार महत्त्वाचा ठरतो. तसेच, आजच्या बालसाहित्याची वैशिष्ट्ये लक्षात घेताना कल्पनाशीलता (वास्तवात नसलेले एक अद्‌भुत जग निर्माण करण्याची क्षमता), अतार्किकता (बौद्धिक तर्कपरंपरेला मोडणारी क्षमता), अननुमेयता (अनुमान करता न येणे) आणि बालमानससंबद्धता (मुलांचे मन समजून घेण्याची क्षमता) ही बालसाहित्याची चार वैशिष्ट्ये लक्षात घेऊन आजच्या उत्तम बालसाहित्याचा शोध आपल्याला घेता येईल.**

**भारतीय** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त स्वातंत्र्योत्तर काळापासून आजपावतो मराठी बालसाहित्यात झालेल्या चांगल्या-वाईट बदलांचा, स्थित्यंतरांचा, नावीन्यपूर्ण प्रयोगांचा आणि बालसाहित्याकडून असलेल्या अपेक्षांचा मागोवा घेण्याच्या उद्देशाने बालसाहित्याचा मुळापासून विचार केला जातो तेव्हा बालसाहित्य म्हणजे नेमके काय, कोणत्या साहित्याला खऱ्या अर्थाने बालसाहित्य म्हणावे, मौखिक व लिखित बालसाहित्यातील मोठा फरक कोणता, लिखित बालसाहित्याची सुरुवात कशी, केव्हा व कोणी केली, बालसाहित्याचा विस्तार कसा होत गेला, यात कुणाकुणाचा सहभाग होता, यांसारखे अनेक प्रश्न मनात उपस्थित होतात.

खरे तर, मुलांसाठी जी पुस्तके लिहिली जातात ती सर्व म्हणजे बालवाङ्मय नव्हे. नुसते सोप्या भाषेत लिहिलेले वाङ्मय बालवाङ्मय होत नाही. मुलांचे जगच वेगळे असते, ज्या जगामध्ये त्यांची जीवनमूल्ये ही मोठ्यांच्या जीवनमूल्यांपेक्षा वेगळी असतात. बालसाहित्याच्या अभ्यासक मालतीताई दांडेकर यांच्या मते बालमनाला स्पर्श करणारी आणि त्यांच्या जीवनावर सुसंस्कार करणारी स्फूर्तिदायक रचना म्हणजे बालवाङ्मय होय.

बालसाहित्याची व्याख्या करायची झाली तर मानवी व्यवहार व मानवेतर सृष्टीविषयी मुलांची जिज्ञासापूर्ती करणारे, कल्पनारम्य व चमत्कृतिजन्य वातावरणाने त्यांचे मनोरंजन करणारे, त्यांच्यामध्ये चांगल्या वाईटाची जाण निर्माण करून त्यांचे व्यक्तिमत्त्व सुसंपन्न करणारे जे साहित्य आहे ते बालसाहित्य होय. मुलांच्या भावनिक, मानसिक व बौद्धिक वाढीसाठी उत्तम बालसाहित्याची अत्यंत आवश्यकता असते. म्हणूनच बालसाहित्याला मुलांच्या विश्वात आजही अनन्यसाधारण महत्त्व आहे, हे विसरून चालणार नाही.

आजच्या बालसाहित्याचे स्वरूप ठरवताना कथानक, वातावरणनिर्मिती, पात्रयोजना आणि भाषा या गोष्टींचा विचार महत्त्वाचा ठरतो. तसेच, आजच्या बालसाहित्याची वैशिष्ट्ये लक्षात घेताना कल्पनाशीलता (वास्तवात नसलेले एक अद्‌भुत जग निर्माण करण्याची क्षमता), अतार्किकता (बौद्धिक तर्कपरंपरेला मोडणारी क्षमता), अननुमेयता (अनुमान करता न येणे) आणि बालमानससंबद्धता (मुलांचे मन समजून घेण्याची क्षमता) ही बालसाहित्याची चार वैशिष्ट्ये लक्षात घेऊन आजच्या उत्तम बालसाहित्याचा शोध आपल्याला घेता येईल. तसेच, बरेच बालसाहित्य वाचताना असे लक्षात येते की त्या साहित्यातून मुलांना बोध देण्याची धडपड अधिक असते, उपदेश सांगण्याचा उघड प्रयत्न दिसतो. त्या साहित्यातून तात्पर्य सांगितले जाते. परंतु बालसाहित्याचे हे प्रयोजन नाहीच मुळी. प्रत्येक मूल स्वतंत्र आहे. प्रत्येकाला आपापल्या पद्धतीने कथा, कवितेचे तात्पर्य काढण्याचे स्वातंत्र्य आपण द्यायलाच पाहिजे. बालसाहित्याच्या प्रयोजनात महत्त्वाचे असते ते मुलांचे मनोरंजन आणि मग त्यातून पुढे ज्ञानविस्तार, आनंदनिर्मिती हे मुद्दे महत्त्वाचे ठरतात.

बालमानसशास्त्र लक्षात घेऊन किती बालसाहित्य लिहिले जाते, हा तर आजही संशोधनाचाच विषय ठरेल. शिवाय शिशुगट (वय ५ ते ८ वर्षे), बालगट (वय ८ ते १२ वर्षे) आणि कुमारगट (वय १२ ते १५ वर्षे) या तिन्ही गटांना एकाच प्रकारचे साहित्य देऊन कसे चालेल? प्रत्येक वयोगटाचे काहीतरी वेगळे सांगणे असते हे विसरून चालणार नाही. ज्या बालसाहित्यात बालमनाचे गुणधर्म आढळून येतात ते बालसाहित्य मुलांना आपले वाटते.

नावीन्यप्रियता, मानवीकरण, जिज्ञासा, कल्पनाप्रियता, अनुकरणप्रियता, कृतिप्रधानता, अद्‌भुताची आवड, सूक्ष्मावलोकनक्षमता, विनोदप्रियता, संघर्षप्रियता, उत्कटता, निरपेक्ष प्रेमभावना हे बालमनाचे महत्त्वाचे गुणधर्म आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातील उत्तम बालसाहित्याचा मागोवा घेताना आपल्याला बालसाहित्याची वैशिष्ट्ये, बालसाहित्याचे प्रयोजन, बालमानसशास्त्र आणि बालमनाचे गुणधर्म लक्षात घेऊनच पुढे जाता येईल.

मराठी बालसाहित्यविश्वात १८०६ ते १८५० हा कालखंड बालसाहित्याचा प्रारंभकाल मानला जातो. मराठी बालसाहित्याच्या प्रारंभकाळात तंजावरचे राजे सरफोजी यांनी १८०६ साली मराठी भाषक मुलांसाठी सख्खन पंडित या गृहस्थाकडून इंग्रजीतील इसापनीतीचा मराठीत अनुवाद करवून घेतला आणि तो छापला. या पुस्तकाचे नाव बालबोध मुक्तावली असे ठेवण्यात आले होते. त्यानंतर अनेक अनुवादित पुस्तके प्रसिद्ध झाली. हे साहित्य बाल्यावस्थेतच होते. मौखिक बालसाहित्याला घरोघरच्या मंडळींनी सोपी सुटसुटीत भाषा, कुतूहल व औत्सुक्य वाढणारी मांडणी, मनोरंजन किंवा विचारप्रवर्तक प्रसंग व कथा खुलवण्याची हातोटी यांमुळे भरीव केले होते; लिखित बालसाहित्य पाहिले तर बोजड भाषा, शैलीचा अभाव, अवघड कथावस्तू असे दोष दिसतात. मात्र बालसाहित्य–लेखनात प्रगतीचे प्रयत्न जारीने चालू होते हे निर्विवाद. १८५१ ते १९०० हा बालसाहित्याचा विकासकाळ. या काळातील महत्त्वाची घटना म्हणजे विनायक कोंडदेव ओक यांनी शालेय पुस्तके लिहिली. 'बालबोध' हे मासिक काढून सहज, सोप्या भाषेत चरित्र, कविता, निबंध यांचे लेखन केले. हरी कृष्ण दामले यांनी सुबोध गोष्टी, सायंकाळची करमणूक, इसापनीती यांसारखी पुस्तके लिहिली. पुढे अनेकांनी त्यात भर घातली.

सन १९०१ ते १९५० हा विसाव्या शतकाचा प्रारंभकाळ वासुदेव गोविंद आपटे यांच्या बालसाहित्याने स्मरणीय ठरला. त्यांनी 'आनंद' मासिक काढले. पुढे बालभारत, महाराष्ट्र देशाचा बालबोध इतिहास, मुलांसाठी मौजेच्या गोष्टी, वीरांच्या कथा. याच काळात हॅन्स अँडरसन व ग्रिमबंधूच्या काही नावाजलेल्या परीकथा मराठीत अनुवादित झाल्या. इसापनीती, पंचतंत्र, हितोपदेश अशी पुस्तके म्हणजे थेट उपदेश करणाऱ्या बोधकथा होत्या. बालसाहित्याची संकल्पना ही जागतिक स्तरावरची असली तरी भारतामध्ये आणि महाराष्ट्रात बालमानसशास्त्र आणि बालसाहित्य यांचा गांभीर्याने विचार सुरू होण्यास मादाम मॉन्टेसरी यांची १९४४ मधील पुणे भेट कारणीभूत आहे, असे म्हटले जाते. म.का. कारखानीस, विष्णू धों. कर्वे, ताराबाई मोडक, शं.ल. थोरात, देवदत्त नारायण टिळक,

दत्तात्रय कोंडो घाटे (कवी दत्त) यांनी बालसाहित्यात शिशुगीते व शिशुकथा यांची स्वतंत्र प्रथा सुरू केली. स्वातंत्र्यपूर्व काळात रेव्ह. ना.वा. टिळक, त्र्यंबक बापूजी ठोमरे (बालकवी), श्री.बा. रानडे, सत्यबोध हुदलीकर, मा.के. काटदरे, महादेवशास्त्री जोशी, ह.ना. आपटे, गोपानाथ तळवळकर, ना.ह. आपटे, चिं.वि. जोशी, शरच्चंद्र टोंगो, मायादेवी भालचंद्र, विमला मराठे, भवानीशंकर पंडित, वामनराव चोरघडे, के. नारखेडे, आनंदराव टेकाडे, देवदत्त ना. टिळक, पां.श्री. टिल्लू, भा.रा. तांबे, विठ्ठलराव घाटे, सानेगुरुजी, शं. रा. देवळे, ह.भा. वाघोलीकर, व्यं.रा. खंडाळीकर, वि.वि. बोकील, ना.धों. ताम्हनकर, भा.रा. भागवत, भा.म. गोरे, मालतीबाई दांडेकर, ग.ह. पाटील, ना.गं. लिमये, प्रभावती जोशी, वि.म. कुलकर्णी, संजीवनी मराठे, वा.गो. मायदेव, भालचंद्र वैद्य, ना.घ. पाटील आणि इतर अनेकांनी बालसाहित्याचा काव्य व गद्यविभाग नादमधुर सोप्या शब्दांनी, विषयाच्या सुरेख सुटसुटीत मांडणीने अतिशय आकर्षक तर केलाच, तो संपन्नही केला. आधुनिकतेचे व आगळेपणाचे वळण देणाऱ्या बालकवी, भा.रा. तांबे, वामनराव चोरघडे, गोपीनाथ तळवलकर, सानेगुरूजी, ताराबाई मोडक, ना.धों. ताम्हणकर भा.रा. भागवत, मालतीबाई दांडेकर अशा काही लेखकांनी तर स्वातंत्र्यपूर्व बालसाहित्यात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. स्वातत्र्यपूर्व काळातले मराठी बालसाहित्य सोपी व मनोवेधक भाषा, मुलांच्या वयानुरूप विषयांची निवड, कल्पनारम्यता या बाबतींत किती भरभर विकास पावत होते. यातीलच काही साहित्यिक स्वातंत्र्योत्तर काळातही लिहीत होते. त्यांनी फुलवलेले बालसाहित्याचे दालन अधिक विस्तारले जात होते. नव्या-जुन्या अनेक लेखकांचे योगदान त्यात भर घालत होते. ते योगदान बालसाहित्यासाठी महत्त्वाचे ठरत होते. बालसाहित्याच्या प्रकारानुसार त्याचा आपण साकल्याने विचार करू.

बालकविता - बालकविता म्हणजे बालांसाठी असलेली, कधी बालांवर रचलेली तर कधी बालांना उद्देशून लिहिलेली कविता होय. दृक्, श्राव्य, स्पर्श, गंध, रुची या सर्व संवेदनांचे मिश्रण बालकवितेत हवे. बालकवितेत शिशुगीते, बालगीते, अभिनयगीते, क्रीडागीते, संवादगीते, तालकथा (कथा व काव्य) संगीतिका (नाट्य व काव्य) यांसारखे प्रकार आजही पाहायला मिळतात. ताराबाई मोडक यांनी बालकवितेची जी चतु:सूत्री सांगितली आहे ती मला महत्त्वाची वाटते.

१) बालकवितेची भाषा चित्रमय हवी

२) भाषा नादमय हवी

३) कविता रसपूर्ण आणि चमकदार हवी

४) भाषा सहज, सोपी हवी

स्वातंत्र्योत्तर काळात सानेगुरुजींची गीते मुलांच्या, तरुणांच्या ओठांवर रुळलेली आहेत. शालेय परिपाठातून आजही ती म्हटली जातात.

*आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान*
*शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावु पणाला प्राण..*

किंवा

*खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे.*

ही प्रार्थना

*बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो..*

यांसारख्या समूहगीतांनी मुलांना गुणगुणायला शिकवले.

वा.गो. मायदेव यांचीही गाणी बालगोपाळांच्या गळ्यातला ताईत बनली.

*या चिमण्यांनो या गऽया*
*अंगणि माझ्या नाचाया*
*टपटप पाउल वाजूं दे*
*झपझप पाउल चालूं दे*

विंदा करंदीकरांच्या बालकविता तर लहान-मोठ्यांना आवडतात. आदर्श बालकवितांचा त्या वस्तुपाठ ठरतात.

करंदीकरांनी मुलांच्या भावविश्वात प्रवेश केला तेव्हा नेहमीच्या आवडीच्या बालगीतांचेच रूप घेतले. ते बदलले नाही. त्यांच्या १५ ते १९ शब्दांच्या बालकविताही आहेत, हे विशेष. त्यांच्या बालकवितेत काव्यगुण आढळतो खास, पण बाल-गेयता कधीच सांडत नाही. त्यांची फुलवेडी ही नमुनादाखल एक कविता पाहा-

*एक परी*
*फूलवेडी*
*फुलासारखी*
*नेसते साडी.*
*फुलामधून*
*येते जाते;*
*फुलासारखीच*
*छत्री घेते.*
*बिचारीला*
*नाही मूल;*
*पाळण्यामध्ये*
*ठेवते फूल.*

गेयता आणि काव्यगुणांचा उत्तम नमुना विंदा करंदीकरांची कविता आहे. त्यांच्या बालकवितांच्या पुस्तकांनी बालविभाग खऱ्या अर्थाने समृद्ध केला आहे. एकदा काय झाले (इ.स. १९६१), राणीची बाग (इ.स. १९६१), एटू लोकांचा देश (इ.स. १९६३), सशाचे कान (इ.स. १९६३), परी गं परी (इ.स. १९६५), अजबखाना (इ.स. १९७४), सर्कसवाला (इ.स. १९७५), पिशीमावशी आणि तिची भुतावळ (इ.स. १९८१), अडम तडम (इ.स.१९८५), बागुलबोवा (इ.स. १९९३), टॉप (इ.स. १९९३), सात एके सात (इ.स. १९९३) इत्यादी.

कुसुमाग्रजांच्या बालकविता आजही मुलांच्या अतिशय आवडीच्या. पाठ्यपुस्तकातून त्या हमखास भेटतात.

*नदीबाई माय माझी डोंगरात घर,*
*लेकरांच्या मायेपोटी येते भूमीवर*

किंवा

*उठा उठा चिऊताई, सारीकडे उजाडले...*

यांसारख्या अनेक कविता मुलांच्या ओठांवर सहज रुळतात.

मंगेश पाडगावकरांच्या बालकविता मुलांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या आणि मजेशीर अशाच आहेत. त्यांची 'काळजी' ही कविता पाहा

*आधीच एवढा मोठा पाऊस*
*त्यात एवढी गार हवा*
*बेडकाला गरम गरम*
*चहा करून द्यायला हवा*

शांता शेळके यांच्या बालकविता, बालगीतांची भुरळ तर लहान थोरांना आजही आहे. त्यांची 'काळोख' ही चिमुकली कविता पाहा–

*आई जरा जवळ ये*
*मला वाटते भीती*
*अबब अबब*
*काळोख काळा किती*
*आई जरा अंगावर*
*टाक तुझा हात*
*मग मुळीच नाही मी*
*भिणार काळोखात!*

याशिवाय सुमती पायगावकर, सरिता पदकी, आशा गवाणकर, आशा भाजेकर, अनुताई वाघ, श्रीकृष्ण वैद्य, राजा मंगळवेढेकर, किशोर पाठक, लीला धनपलवार, डॉ. लीला दीक्षित, डॉ. सुरेश सावंत, उत्तम कोळगावकर, इंद्रजित भालेराव, ज्ञानदा आसोलकर, संदीप खरे, रेणू पाचपोर, कल्याण इनामदार, विनय अपसिंगकर, पद्मनी बिनीवाले, अनंत भावे, दत्ता हलसगीकर, वृंदा लिमये, नीलिमा गुंडी, संगीता बर्वे, मुबारक शेख, सुहासिनी इर्लेकर, डॉ. विजया वाड, महावीर जोंधळे, फ.मुं.शिंदे, लीला शिंदे, दासू वैद्य, शं.ल. नाईक, आबा महाजन, एकनाथ आव्हाड, सुमन नवलकर, ज्योती कपिले, सदानंद पुंडपाळ, डॉ. कैलास दौंड, बबन शिंदे, संजय वाघ, माया धुप्पड, बालाजी मदन इंगळे, गणेश घुले, रसिका देशमुख, भगवान अंजनीकर, अरुण देशपांडे, डॉ. अशोक कोळी, विलास सिंदगीकर, रामदास केदार, संजय ऐलवाड यांच्या कविता मुलांच्या अतिशय आवडीच्या आहेत. एकूणच बालकवितेच्या अभ्यासासाठी डॉ. लीला दीक्षित यांचे 'शतकातल्या बालकविता' आणि विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, कल्याण इनामदार व डॉ. सुरेश सावंत यांच्या बालकवितांवर अभ्यासपूर्ण भाष्य करणारे 'बालकविता चार कवींची' ही दोन पुस्तके महत्त्वाची आहेत. डॉ. विजया वाड यांनी संपादित केलेले कवितांचा भाग (बालकविता कोश, खंड १ व २) व निसर्गकवितांचे बाल निसर्गायन (२०१७) हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. सदानंद पुंडपाळ यांनी लिहिलेला 'एकनाथ आव्हाड यांच्या बालकविता : स्वरूप आणि शोध' हा ग्रंथही अभ्यासपूर्ण असाच आहे. अष्टगंध प्रकाशनाने कवी किशोर पाठक यांची 'समग्र बालकविता भाग १ व २' ही पुस्तकेही बालकवितेच्या प्रांगणात महत्त्वाची ठरत आहेत.

किशोर मासिकाने महावीर जोंधळे यांच्या अध्यक्षतेखाली २००८ साली निवडक किशोर खंड प्रसिद्ध केलेत. त्यातील गंमतगाणी आणि कविता हे दोन खंड वाचताना बालकवितांची भाषा, विषय आशय, गेयता, काव्यगुण लक्षात येतात. बालकवितेतील काही प्रयोगही वाखाणण्याजोगे आहेत. उदाहरणार्थ, एकाच विषयाला वाहिलेले कवितासंग्रह आज पाहायला मिळतात. शिशुगटातील मुलांसाठी एकनाथ आव्हाड यांचे जोडाक्षर विरहीत बालगाण्यांचे पुस्तक 'गंमत गाणी' (२००८), डॉ. सुरेश सावंत यांचे एकाच दीर्घ कवितेचे पुस्तक 'युद्ध नको बुद्ध हवा' (२०१९), पावसाची विविध रूपे कवितेतून दर्शविणारा संग्रह केशव वसेकर यांचा 'ऋतू हिरवा' (२०१०) आबा महाजन यांचा अहिराणी बोलीभाषेतला बालकवितासंग्रह 'मन्हा मामाना गावले' (२०१२), एकनाथ आव्हाड यांचा मराठी भाषेची गोडी लावणारा बालकवितासंग्रह 'शब्दांची नवलाई' (२०२०), सूर्यकांत मालुसरे यांचा सुलभ भाषेत काव्यमय रसाळ शिवचरित्र

'शिवगाथा' (२०११) माकडांच्या मजेशीर करामती सांगणारा उत्तम कोळगावकर यांचा बालकवितासंग्रह 'माकडवाडी' (२०१७), लीला शाह यांचा 'पर्यावरणाच्या कविता' (२०१०), मधुमंजिरी गटणे यांचे कवितेतून मुलांना 'पंचतंत्राचे नवरंग' (२०२०) सांगणारे पुस्तक यांसारख्या अनेक पुस्तकांनी बालकवितेचा विभाग समृद्ध केला आहे.

वयोगटानुसार बालकवितासंग्रह आजही पाहायला फार कमी मिळतात. कुमार वयोगटासाठी फारसे कवितासंग्रहच नाहीत. त्यातल्या त्यात एकनाथ आव्हाड यांचा 'खरंच सांगतो दोस्तांनो', उत्तम कोळगावकर यांचा 'जग हे सुंदर किती', सुमन नवलकर यांचा 'धडपडणारी मुले' हे संग्रह बालसाहित्यात आज पाहायला मिळतात. तसेच छात्र प्रबोधन यांनी प्रसिद्ध केलेली अक्षरबोली(२००४), कवितेच्या गावा (२००४), कवितेच्या गावा (२०१७) ही कुमार कवितांची संपादने दखल घेण्यासारखीच आहेत.

बालकवितेतील प्रयोगात विरभद्र मिरेवाड यांनी अनेकांच्या कवितेवर लिहिलेले 'कोरोनाकाळात मुलांसाठी कविता' हे पुस्तक उल्लेखनीय आहे. शाळकरी मुलगा गौतम पाटील याने लिहिलेले राज्यपुरस्कार प्राप्त पुस्तक 'गौतमच्या कविता' (२०१७), सुशांत बसापुरे याचा 'रोपटं' (२०१९) हा बालकवितासंग्रह, मुग्धा घेवरीकर हिचा 'मुग्धाच्या कविता' (२०२१) हा बालकवितासंग्रह प्रसिद्ध आहे. एकूणच मुलांना लिहिते करण्यासाठी ही पुस्तके इतर मुलांमध्ये उमेद, आत्मविश्वास वाढवतात. वाचनानंद देतात. मुलांनीच लिहिलेल्या बालकवितांचे मोठ्यांनी केलेली संपादनेही आजच्या घडीला पाहायला मिळतात. सचिन बेंडभर, तृप्ती अंधारे (दप्तरातल्या कविता), रमेश यादव (क कवितेचा- २०१२) यांनी मुलांच्या कवितांचे केलेले संपादन पाहायला मिळते.

बालकथा - थोडी पात्रे, मोजके प्रसंग, आणि त्यामधून वाचकांच्या मनावर नकळत बिंबवला जाणारा एकात्म संस्कार ही उत्तम बालकथेची प्रमुख लक्षणे स्वातंत्र्योत्तर बालकथांमध्ये दिसून येतात. शिशुकथा व बालकथा, किशोरकथा व कुमारकथा अशा वेगवेगळ्या वयोगटांसाठीच्या कथा आज वाचायला मिळातात. त्यात कुमारकथांचे आणि शिशुकथांचे प्रमाण कमी आहे. आजही कादंबरीपेक्षा कथेला मौखिक मूल्य अधिक आहे. कथा वाचली जाते. त्याहून जास्त ऐकली जाते. इसापनीती, पंचतंत्र या गोष्टींचा प्रवास एकाकडून दुसऱ्याकडे अशाप्रकारेच गोष्टी सांगून घडत गेला आहे. आजच्या बालकथा विश्वात प्राणिकथा, परीकथा, लोककथा, पुराणकथा, इतिहासकथा, साहसकथा, सामाजिक कथा, नाट्यकथा, चित्रकथा, जलकथा किंवा समुद्रकथा, नाताळकथा, खेळणीकथा, हिमकथा, असंबद्धकथा, विज्ञानकथा, नवसंस्कारकथा असे कथांचे प्रकार प्रामुख्याने आढळतात. मुलांना गोष्ट ही खाऊइतकीच प्रिय असते. जसजशी गोष्ट पुढे सरकत जाते तसतशी मुले गोष्टीत विरघळत जातात, एकरूप होतात. एखादा चांगला विचार कळत-नकळत मुलांमध्ये रुजण्यास गोष्ट मदत करत असते. बालकथांचे हे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मुलांमधील नावीन्याची ओढ ओळखून मुलांना रोज नवी गोष्ट वाचायला मिळावी, वाचनाकडे मुलांचा कल वाढावा आणि वाचता-वाचता मुलांचे हातही लिहिते व्हावे या संकल्पनेचा विचार आजचे कथाकार मुलांसाठी लिहिताना करताना दिसतात. खरे तर, प्रत्येक आईबाबांना प्रश्न पडतो, की मुलांना रोज नवी गोष्ट कुठली सांगायची? अशा वेळी 'गोष्टींचे घर' हे डॉ. विजया वाड यांनी संपादित केलेले ३६५ बालकथांचे ३ खंड आपल्याला उपयोगी पडणारे आहेत. महाराष्ट्रातील शंभर लेखकांच्या दर्जेदार, सकस बालकथांनी आणि प्रत्येक कथेला मुलांच्याच चित्रांनी सजवलेले हे बालकुमारकथांचे ३ खंड मुलांइतकेच, मोठ्यांनाही भावतील, हे नक्की. या खंडातील कथा बालमनाचे गुणधर्म टिपणाऱ्या आहेत, त्यामुळे मुलांना या कथा त्यांच्या भावविश्वात घेऊन जाणाऱ्या आहेत. तसेच १२ भाषांतील १३० संस्कार गोष्टींचे 'श्रेष्ठ भारतीय बालकथा' ही बाबा भांड यांनी संपादित केलेला बालकथांचा संग्रह हा बालसाहित्यातला मौलिक ठेवाच म्हणावा लागेल. बालभारती पाठ्यपुस्तक मंडळाने उत्तम संस्कारकथांचे प्रसिद्ध केलेले १ ते ३ भागही यादृष्टीने महत्त्वाचे ठरतात. परंधाम प्रकाशन पवनारने 'विनोबांनी सांगितलेल्या गोष्टी' या पुस्तकाचे अनेक भाग मुलांची गोष्टींची भूक भागवतात. राम कोलारकर यांनी संपादित केलेले निवडक कुमारकथा संच (भाग १ ते ६). या पुस्तकांत कुमार वाचकांचे भावविश्व व्यापणाऱ्या कथा आढळतात. आचार्य अत्रे यांनी संपादित केलेली नवयुग वाचनमाला (एकूण भाग ५) ही पुस्तके पाठ्यपुस्तकांसारखी वाचनानंद देणारी ठरतात. दुर्गा भागवत यांच्या उत्तम बालकथांचे संपादन मीना वैशपायन यांनी 'दुर्गू आजीच्या गोष्टी' या पुस्तकात वाचायला मिळते. गिरिजा कीर यांची बालसाहित्यसंपदा विपुल आणि दर्जेदार आहे. त्यांनी बालसाहित्यात मोलाची भर घातली. 'गिरिजाताईंच्या गोष्टी' (भाग १ ते १०) हा संच २०१७ मध्ये दिलीपराज

प्रकाशनाने प्रकाशित केलेला आहे. विनोद गायकर यांचे १०० गोष्टींचे ४ भागातील बालकथासंच 'वेणूच्या गोष्टी' या नावाने (२०२२) प्रसिद्ध झाले आहेत. आजच्या मुलांना ज्या विषयाचे ज्ञान मिळावे असे त्यांना वाटते ते विषय त्यांनी त्यात कथेच्या अंगाने हाताळले आहेत.

निवडक किशोर खंडात देशदेशांतरातील लोककथा, कथा, दीर्घकथा हे खंड प्रसिद्ध आहेत. ते अल्पावधीत लोकप्रिय झाले आहेत.

तसेच, नॅशनल बुक ट्रस्टने प्रकाशित केलेले आणि सुमन सरन यांनी अनुवाद केलेले 'तेरा अपूर्व किशोरकथा' (१९९६) हे पुस्तक बालकथांमध्ये महत्त्वाचे वाटते.

बालकथांमध्ये सानेगुरुजी, महादेवशास्त्री जोशी, ना.ह. आपटे, भा.रा भागवत, गंगाधर गाडगीळ, दत्ता टोळ, अमरेंद्र गाडगीळ, राजीव तांबे, शंकर सारडा, राजा मंगळवेढेकर, डॉ. विजया वाड यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. सत्तरच्या दशकामध्ये एकत्र कुटुंबपद्धती हळूहळू संपुष्टात येऊ लागल्याने नव्या पिढीला आजी-आजोबांच्या गोष्टी दुष्प्राप्य होऊ लागल्या. काळाची नेमकी गरज म्हणून संस्कारक्षम बालसाहित्याला याच काळात सुगीचे दिवस आले. सत्तरच्या दशकानंतर बालसाहित्याची मागणी वाढून दुर्गा भागवत, सुधा करमरकर, शांता शेळके, लीला भागवत, शैलजा काळे, सरिता पदकी यांची अनेक पुस्तके या काळात पुढे आली.

बाबा भांड (नीतिकथा २००६), राजीव तांबे (होय मीसुद्धा २०१०), फारुक काझी (तू माझी चुटकी आहेस २०१९), सुमन नवलकर (रोज नवी गोष्ट २०२२), एकनाथ आव्हाड (खळाळता अवखळ झरा २०२२), सदानंद पुंडपाळ (वाचू नाचू आनंदाने २०२०), पु.ग. वनमाळी (मानवतेचे पुजारी २०११), लीलाधर हेगडे (कावळे १९९१, हणमू आणि इतर गोष्टी २०१०), डॉ. अनिल गोडबोले (सुबोधकथा २००७), लीला शिंदे (पावसाची फुलं २०२१), कविता मेहंदळे (तू मोठ्ठा कधी रे झालास २०२१), दत्ता डांगे (शिकले गाव कमावले नाव २०१७), बबन शिंदे (छोट्यांचा आटापिटा २०१५), रवी राजमाने (बालवीरांच्या साहसी कथा २०१६), सूर्यकांत सराफ (आगळ्या वेगळ्या गोष्टी २०१८) शिवाजी देशमुख (आभाळमाया २०१४), स्वाती राजे (अंधाराचा गाव, पूल, शोध २०१९), संजय भास्कर जोशी (मोबाइल गँग २०२२), माधव चुकेवाड (सेल्फी २०२१), वर्षा चौगुले (मैत्री २०१९), रमेश तांबे (धमाल गोष्टी २०१७), आबा महाजन (आबाची गोष्ट २०१७), डॉ. सिसिलिया कार्व्हालो (सवंगडी २०२१), डॉ. सुबोध नाईक (कथा क्रांतिकारकांच्या २०१७), आश्लेषा महाजन (कळ्यांचे ऋतू २०१८), प्रशांत गौतम (गोष्टींची गोष्ट २०००), भा.ल. महाबळ (चोराने खोकला नेला २०१४) यांसारखे मुलांचे लक्ष वेधून घेणारे बालकुमार कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. जे बालमनाला साद घालणारे आहेत. तसेच, नामदेव माळी यांनी मुलांच्या लेखनाला प्रोत्साहन देऊन त्यातून आकारला आलेले २०२१मधील चार बालकथासंग्रह म्हणजे श्रावणी पाटील हिचे 'आजीने सांगितलेल्या गोष्टी', मल्हार जाधव याचे 'मल्हारच्या गोष्टी', रतन संकपाळ याचे 'श्रेयस गोष्टी लिहू लागला' आणि श्रीवर्धन पाटोळे याचे 'मुलं गेली आकाशात' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. ही पुस्तके वाचताना ही मुले आश्वासक बालसाहित्यिक वाटतात. त्याचप्रमाणे तनिष्का डांगे इयत्ता नववीतील मुलीचे 'जादूची झप्पी' (२०२१) हे गोष्टीचे पुस्तकही मुलांना वाचायला आवडेल असेच आहे.

बालकादंबरी - कुमारवयोगटात घटनांचे अर्थ लावणारे, बुद्धीला खाद्य पुरवणारे, भावनेला आवाहन करणारे विषय मुलांना आवडतात. या वयात मुले अद्भुतरम्य व कल्पनारम्य जगाकडून प्रत्यक्ष वास्तवाच्या व त्यातही साहसाच्या जगाकडे वळतात. १९४६ साली पुण्यात भरलेल्या कुमारसाहित्य संमेलनाचे सानेगुरुजी अध्यक्ष होते. अध्यक्षीय भाषणातून स्वातंत्र्याला साजेसे नागरिक तयार व्हावेत त्यादृष्टीने असे साहित्य निर्माण केले जावे अशी साद त्यांनी घातली होती.

बालकादंबऱ्यांचे मुख्य दोन प्रकार- १) सामाजिक कादंबरी २) साहसप्रधान कादंबरी. सामाजिक कादंबरीमध्ये समस्याप्रधान कादंबरी व व्यक्तीप्रधान कादंबरी हे दोन उपप्रकार प्रामुख्याने पाहायला मिळतात. तर साहसप्रधान कादंबरीमध्ये पौराणिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक व रहस्यप्रधान कादंबरी हे उपप्रकार पाहायला मिळतात. सानेगुरुजींनी कुमारांसाठी लिहिलेल्या कादंबऱ्या गोप्या, आपण सारे भाऊ, मिरी, स्वर्गीय ठेवा इत्यादी. या कादंबऱ्या काहीशा प्रौढतेकडे झुकणाऱ्या वाटतात. ना.धों. ताम्हणकरांची 'गोट्या' ही विशेष उल्लेखनीय कादंबरी होय. मुलामध्ये जे जे काही विलोभनीय असते ते ते गोट्यामध्ये होते म्हणूनच गोट्या ही जास्त बालकप्रिय कादंबरी झाली. खडकावरला अंकुर, सावटातले रोप, मणि, नारो महादेव ही त्यांच्या इतर बालकादंबऱ्यांची नावे आहेत. वि.वि. बोकील

यांच्या वसंत व विजय या दोन्ही कादंबऱ्यातील कुमारनायक मुलांच्या पसंतीस उतरणारे आहेत. 'लाडका राजा' त्यांची ही कादंबरी फाजील लाडामुळे बिघडलेल्या मुलाची गोष्टच विस्ताराने सांगते.

गंगाधर गाडगीळ यांची धाडसी चंदू, श्री.शं. खानवेलकर यांची चंदू, शांतीलाल भंडारी यांची १९४४ मधील टिल्लू, अमरेंद्र गाडगीळ यांची प्रवासी, रामतनय यांनी १९५० मध्ये लिहिलेली कॅप्टन प्रताप या कादंबऱ्या लोकप्रिय होत्या. महादेवशास्त्री जोशी, यदुनाथ थत्ते, मालतीताई दांडेकर, वामनराव चोरघडे, गो.नी. दांडेकर, भालचंद्र रानडे, ग.दि. माडगूळकर, भा.रा. भागवत, सुमती पायगांवकर, शैलजा राजे, राजा मंगळवेढेकर, श्यामला शिरोळकर, दि.बा. मोकाशी, सुधाकर प्रभू यांच्या बालकादंबऱ्यांनी बालसाहित्यात मोलाचे योगदान दिले. नवविचारांचे आणि सध्याचे विषय कादंबरीतून हाताळणारे साहित्यिक ल.म. कडू, मदन हजेरी तसेच महावीर जोंधळे (गाणारे घर-१९९२), सूर्यकांत सराफ (चंचल झाड चांदीचे, विज्ञान कादंबरिका-२००९), सुमन नवलकर (काटेरी मुकुट-२०१९), संजय वाघ (राजू बनला किंगमेकर-२०१७), संजय ऐलवाड (वारूळ-२०१८), समाधान शिकेतोड (जादुई जंगल-२०२२), बबन शिंदे (जगावेगळा कीर्तनकार-२०२१), विलास मोरे (तिसरा डोळा, विज्ञान कादंबरी-२०२१) यांची पुस्तके बालकांचे लक्ष वेधून घेतात. निवडक किशोरचा कादंबरिका (२००८) हा खंडही महत्त्वाचा आहे.बाबा भांड यांच्या धर्मा (१९७९), पांढऱ्या हत्तीची गोष्ट (१९९१) या बालकादंबऱ्या बालविश्वात लोकप्रिय आहेत.

बालनाटक - बालनाट्य म्हणजे मुलांनी साकारलेले मुलांसाठीचे नाटक. नाटकाला प्रयोगमूल्य असल्यामुळे दृक्-श्राव्य दोन्ही माध्यमांचा वापर करून नाटकाचा अनुभव घेता येतो. १८९९ मध्ये 'पन्हाळगडाचा किल्लेदार' हे नाटुकले किरातांनी लिहिले. राम गणेश गडकऱ्यांचे 'सकाळचा अभ्यास' हे प्रहसनही प्रसिद्ध झाले होते. अत्र्यांचे 'गुरूदक्षिणा' (१९३०) हे बालनाट्यही उल्लेखनीय आहे. केवळ मुलांनी किंवा केवळ मुलींनी करण्याजोगी नाटुकली गरजपरत्वे लिहिली गेली. वि.द. घाटे यांनी नाट्यरूप महाराष्ट्र (१९२६) लिहून चांगल्या ऐतिहासिक बालनाट्याला प्रारंभ केला. १९५५-५६ पर्यंत शालेय समारंभाच्या निमित्ताने, मोठ्यांच्या नाटकांतले किंवा मुद्दाम लिहिलेले, मुलांना योग्य असे प्रवेश वा नाटिका निवडण्यात येत. गणेशोत्सवाच्या मेळ्यांसाठी संवाद, नाटुकली मुद्दाम लिहिली जात. उदाहरणार्थ, पुरुषोत्तम दारव्हेकरांची सुंदर बालनाट्ये. संवादातली वाक्ये मुलांना सहज बोलता येतील अशी छोटी बनली. पुष्कळ मुलांना काम मिळेल अशी नाटुकली लिहिली जाऊ लागली. मुलांच्या दृष्टीने खेळ आणि नाटक एकच. बालनाटकाला रंगभूमीची गरज असतेच असं नाही. बालनाटक व प्रेक्षक एकाच पातळीवर हवेत. तरीही पुढे बालरंगभूमी अस्तित्वात आली. मुले नाटक सादर करू लागले. बालनाट्याचे स्वरूप भाषा व संवाद घटनांना जोडण्यासाठी असतात. विनोद संवादापेक्षा कृतीत दिसला की मुलांना जास्त आवडतो. प्रियंवदा करंडे यांची गंमतजंमत फुलांची, बुद्धिमान प्रधानजी, सूर्य पळाला आणि इतर एकांकिका; तसेच, डॉ. वासंती इनामदार जोशी यांचे बाल नाटुकली (२०१२), सुनंदा उमर्जी यांचे 'बहारदार नाटिका' (२०१०), डॉ. विद्याधर करंदीकर यांचे 'पहिला नंबर माझा' (२००५), उषा परब यांचे 'फुलपाखरू एक कीटक आहे' (२०१२) ही नाटुकल्यांची पुस्तके मुलांच्या आवडीची आहेत. त्र्यंबक वडसकर यांचे 'सर, तुम्ही गुरुजी व्हा!' (२०१८), सुनंदा गोरे यांचे 'प्रतिज्ञा', प्रभाकर शेळके, उमेश घेवरीकर यांनी लिहिलेली बालनाटके मुलांनी रंगभूमीवर सादर केली आहेत. नॅशनल बुक ट्रस्टने प्रकाशित केलेले आणि रत्नाकर मतकरी यांनी संपादित केलेले 'मुलांची नाटके' (१९०६) हे पुस्तक विशेष आवडीचे असेच आहे. तसेच रत्नाकर मतकरी यांचे 'निम्माशिम्मा राक्षस', सई परांजपे यांचे 'जादूचा शंख', सूर्यकांत सराफ यांचे 'मिशी हरवली आहे' व 'चिऊचं घर मोलाचं!' ही बालनाट्ये आजही मुलांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत.

नाट्यछटा - दिवाकरांच्या नाट्यछटानंतर नाट्यछटा एकाएकी नाहीशी झाली. पाठ्यपुस्तकातही ती सापडेनाशी झाली. नाट्यछटा बालसाहित्यात हवीच. कारण नाट्यछटा म्हणजे बालकांच्या अभिव्यक्तिजगतातला तो सर्वोत्तम अलंकार. आता मात्र बालसाहित्यात जाणीवपूर्वक नाट्यछटा प्रकार रुजवण्यासाठी पुण्यात छात्र प्रबोधन (कुमार मासिक), नाट्यसंस्कार कला अकदमी (संस्थापक प्रकाश पारखी) यांच्यातर्फे नाट्यछटा लेखनावर कार्यशाळा घेतल्या जातात. प्रकाश पारखीसरांनी तर निवडक नाट्यछटांचे अनेक भाग त्यांच्या संस्थेतर्फे प्रकाशित करून नाट्यछटालेखनासाठी उत्तेजन दिलेले आहे. त्यांच्या संस्थेतर्फे दरवर्षी नाट्यछटा सादर केल्या जातात. बाजारात सध्या

उल्लेखनीय अशी नाट्यछटेची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. त्यात एकनाथ आव्हाड यांचे 'मला उंच उडू दे' (२०१७), संध्या कुलकर्णी यांचे 'नाट्यछटा पंचविशी' (२०१७), नाट्यछटा लेखनस्पर्धेतील उत्कृष्ट नाट्यछटांचे सुमन नाट्यछटा (संपादक – प्रकाश पारखी २०२२), सुभाषचंद्र वैष्णव यांचे 'बहुरंगी नाट्यछटा' (२०१८); तसेच, प्रियंवदा करंडे यांच्या नाट्यछटांच्या अनेक पुस्तकांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

बालसाहित्याची समीक्षा म्हणावी तशी अजून तरी झालेली नाही. राजीव तांबे, शुभदा चौकर, विद्या सुर्वे बोरसे, स्वाती राजे, पृथ्वीराज तौर, एकनाथ आव्हाड, डॉ. सुरेश सावंत, लीला शिंदे, सदानंद पुंडपाळ यांचे बालसाहित्यावरील लेख बालसाहित्याच्या समीक्षण क्षेत्रात महत्त्वाचे आहेत. एकूणच बालसाहित्यावर डॉ. सुलभा शाह यांचे 'मराठी बालसाहित्य स्वरूप आणि अपेक्षा', विश्वास वसेकर यांचे 'मराठी बालसाहित्य', 'बालसाहित्य' (कविता, नाटक, चरित्र) आणि 'बालसाहित्याचे अंतरग', मालतीबाई दांडेकर यांचे 'बालसाहित्याची रूपरेषा', लीलावती भागवत यांचे 'मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरूप', देविदास बागूल यांचे 'बालवाङ्मय', रजनी हिरळीकर यांचे 'कवितेचं झाड' आणि उज्ज्वला मेहेंदळे व एकनाथ आव्हाड यांनी संपादित केलेले 'बालसाहित्य स्वरूप आणि व्याप्ती', विद्या सुर्वे बोरसे यांचे 'बालसाहित्याची समीक्षा आणि कोरा कागद निळी शाई' हे ग्रंथ बालसाहित्य अभ्यासकांसाठी मौलिक आहेत.

बालसाहित्याच्या क्षेत्रात चरित्रलेखनही विपुल प्रमाणात झाले आहे. परंतु हे लेखन नुसती त्या त्या व्यक्तीची माहिती पुढे करतानाच अधिक आढळून येते. ललित लेखन आणि अनुवादलेखन हे कथा, कवितेच्या तुलनेने खूपच कमी आढळते. पृथ्वीराज तौर यांनी अनुवादित केलेल्या बालकथा; तसेच जपानहून आणलेल्या गोष्टी हे अनुवादित पुस्तक बालसाहित्यात महत्त्वाचे आहे. शिल्पा कुलकर्णी यांनी कुमारांसाठी संपादित केलेला 'बकुळफुलं' हा ललित लेखसंग्रहही उल्लेखनीय असाच आहे. लीला शिंदे यांचे मुलांसाठीचे ललित लेखनही मुलांच्या आवडीचे आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील बालसाहित्यात आढळून आलेल्या महत्त्वाच्या सकारात्मक बाबी :

१) आता प्रसिद्ध होणाऱ्या बालसाहित्यात आशयासोबत चित्रांचाही सहभाग विशेष उल्लेखनीय असा दिसून येतो.

२) कमी मजकूर आणि जास्तीत जास्त चित्रे अशी पुस्तकेही आता बहुतांश बाजारात दिसून येतात. यातूनच चित्रवाचनाची पुस्तके पुढे आलेली आहेत. जी गरजेची आहेत. चित्रकार पुंडलिक वझे, संतोष घोंगडे, चंद्रमोहन कुलकर्णी, सतीश भावसार, ज्ञानेश बेलेकर, सागर नेने यांच्या रंगीत चित्रांनी बालसाहित्य अधिक आकर्षक, बोलके झाले आहे. मुलांना अशी पुस्तके आकर्षित करतात.

३) प्रथम बुक्सतर्फे इतर भाषांतील उत्कृष्ट बालसाहित्य मराठीत अनुवादित होत आहे. त्या पुस्तकांना बाजारात चांगली मागणी आहे.

४) अनेक ज्येष्ठ बालसाहित्यिक जाणीवपूर्वक बालसाहित्य लिहीत आहेत. ही बालसाहित्यासाठी सुखद बाब आहे. रा.रं. बोराडे, संजय भास्कर जोशी, भारत सासणे, विश्वास वसेकर इत्यादी.

५) सध्या बालसाहित्य ऑनलाइन स्वरूपातही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहे. बालसाहित्याची यातून सहज उपलब्धता होण्यास मदतच होते.

६) वाचणारी मुलेच आता लिहिताना दिसत आहेत. अनेक मुलांची पुस्तके आता प्रसिद्ध होत आहे. डॉ. सुरेश सावंत यांनी चिमुकल्या लिहित्या हातांचे विविध वृत्तपत्रे, मासिकांतून कौतुक तर केले आहेच. शिवाय त्यावर 'वाचन संस्कृती, लेखन संस्कृती' हा अभ्यासपूर्ण ग्रंथही साकेत प्रकाशनातर्फे त्यांनी प्रकाशित केला आहे.

७) साकेत, दिलीपराज, इसाप, मेहता, स्पर्श, रोहन, गणगोत, गमभन, चपराक, ज्योत्स्ना, व्यास, जे.के. मीडिया, मनोविकास, क्रिएशन्स, छात्र प्रबोधन, सानेगुरुजी कथामाला या प्रकाशनसंस्था बालसाहित्य मोठ्या प्रमाणावर प्रकाशित करत आहेत, हे विशेष.

८) किशोर, ऋग्वेद, शिक्षण विवेक, मुलांचे मासिक, बालविकास, कथामाला, वयम्, छात्र प्रबोधन, चंपक, छावा, रानवारा, चांदोबा, मनःशक्ती, पाणिनी, छोटू, हे अंक आर्थिक अडचणीतून मार्ग काढत प्रसिद्ध होत आहेत. मुलांचे भावविश्व त्या साहित्यातून प्रकट होताना दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळातील बालसाहित्यात आढळून आलेल्या महत्त्वाच्या नकारात्मक बाबी–

१) सध्या बालसाहित्य विपुल प्रमाणावर प्रसिद्ध होत आहे. त्यात गुणात्मक बाबतीत मात्र उदासीनताच

आहे. जे साहित्य गुणात्मक बाबतीत उत्तम आहे अशा साहित्याला समाजमाध्यमे फारसे उचलून धरताना दिसत नाहीत. त्यामुळे उत्तम बालसाहित्य मुलांपर्यंत पोहोचवणेही कठीण होते.

२) बालसाहित्याला आणखी चांगले प्रकाशक मिळणे आवश्यक आहे. जे आहेत ते हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच. काही प्रकाशक तर बालसाहित्य प्रकाशित करण्यासाठी लेखकाकडूनच पैसे घेतात.

३) वृत्तपत्रात बालसाहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी रविवार पुरवणीत मुलांसाठी एक अख्खे पान राखून ठेवलेले असावे. 'सामना' वृत्तपत्रात अख्खे पान मुलांसाठी राखून ठेवलेले आजही दिसून येते.

४) शासन दरबारी जवळजवळ २५ प्रौढसाहित्य प्रकारांत बक्षिसे दिली जातात. मात्र बालसाहित्यात सहाच प्रकारांत बक्षिसे असतात. हे कुठेतरी बदलायला हवे. बालसाहित्यतही विविध साहित्यप्रकारांना बक्षिसे ही हवीतच. शिवाय प्रौढसाहित्याला एक लाखाचे बक्षीस आणि बालसाहित्याला फक्त पन्नास हजाराचे, असे भेदाभेद बालसाहित्याला मारकच आहेत.

५) अनेक साहित्यसंस्थांमध्ये तर बालसाहित्य विभागासाठी पुरस्काराची तजवीजसुद्धा नसते आणि असली तरी ती अतिशय नाममात्र असते.

६) सोपे लिहिणे ही अतिशय अवघड गोष्ट आहे. मुलांसाठी लिहिताना तर मोठी जबाबदारीसुद्धा असते. अशा लिखाणाला समाजात दुय्यम स्थान मिळणे हे सर्वार्थाने चूकच आहे. उत्तम आरोग्यासाठी जशी सकस आहाराची गरज असते, तशीच मानसिक आरोग्यासाठी उत्तम बालसाहित्याची नितांत गरज असते हे विसरून चालणार नाही. ही समज समाजमनात वाढणे गरजेचे आहे.

७) बालसाहित्यात विविध उपक्रम, संशोधन आजही फारसे होत नाही. याचे प्रमाण आणि अभ्यास वाढायला हवा.

८) बालसाहित्याची समीक्षा मोठ्या स्वरूपात होणे, अनेक लेखकांसाठी ती समीक्षा मार्गदर्शक ठरणे महत्त्वाचे आहे. तेही व्हायला हवे.

९) बालसाहित्य चळवळ निर्माण होणे. अनेक बालसाहित्यिक त्यातून जोडले जाणे, हे उत्तम बालसाहित्याच्या उभारणीसाठी महत्त्वाचे ठरेल.

१०) व्यापक स्वरूपात बालसाहित्य संमेलने खेडोपाडीसुद्धा व्हायला हवीत असे वाटते.

११) बालसाहित्याच्या विविध प्रकारांवर कार्यशाळाही अधिक व्हायला हव्यात.

१२) बालसाहित्याची वितरणव्यवस्था, बाजारपेठ याकडेही लक्ष देणे तेवढेच गरजेचे आहे. नाहीतर लिहिलेले साहित्य लेखकाकडेच पडून राहते.

एकूणच बालसाहित्याला आजही समाजाकडून व समाजमाध्यमांकडून व्यापक दृष्टी आणि दृष्टिकोन लाभलेला नाही. म्हणूनच बालसाहित्य बालच राहिले, त्याचे मोठेपण लक्षात घेतलेच गेले नाही. आजच्या इंटरनेटच्या जगात खूप बालसाहित्य यूट्यूबवर, ब्लॉगवर, गूगलवर, फेसबुकवर वाचायला मिळते. तरीही पुस्तकातून होणारा अक्षरवाङ्मयाचा संस्कार हा हृदयात सहज झिरपणारा असतो. म्हणूनच काळ कितीही प्रगतिशील आणि गतिशील झाला तरी पुस्तकांची जागा कुणीच घेऊ शकणार नाही हे शाश्वत सत्य नाकारून चालणार नाही. त्यामुळेच उद्याची उगवती पिढी वाचनाने समृद्ध होण्यासाठी आपण पुस्तकांचे स्वागत करतानाच काही रक्कम पुस्तकांसाठी राखूनसुद्धा ठेवली पाहिजे आणि हो, मुलांच्या जगण्याला आकार देण्यास साहाय्यभूत ठरणाऱ्या या पुस्तकांस आपले कर्तव्य समजून प्रोत्साहनसुद्धा दिले पाहिजे. असे प्रत्येकाने केल्यास बालसाहित्यावरील मळभ दूर होऊन त्यातील खळाळता प्रवाह मुलांच्या मनापर्यंत नक्की पोहोचेल.

**– एकनाथ आव्हाड**
भ्रमणध्वनी – ९८२१७७७९६८

**सूचना :**
'साहित्य' अंकाची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.
त्यासाठी साहित्य संघाचा बँक अकाउंट नंबर
तसेच IFSC Code कव्हर २ वर दिलेला आहे.
ऑनलाइन वर्गणी भरल्यास, तुमचा पोस्टल अॅड्रेस, पिनकोडसहित
७३०४३६९३९६ या मोबाइल नंबरवर पाठवावा.



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

### ललित साहित्य

•

# समृद्ध तरीही दुय्यम लेखनप्रकार

**अंजली कुलकर्णी**

**मराठीतील स्वातंत्र्योत्तर काळातील ललित लेखन गुणवत्तेने आणि संख्या बळाने समृद्ध आहे. स्वातंत्र्योत्तर काळात कुसुमावती देशपांडे, दुर्गा भागवत, गो.वि. करंदीकर (विंदा करंदीकर), प्रभाकर पाध्ये, विजय तेंडुलकर, विद्याधर पुंडलिक, श्रीनिवास विनायक कुलकर्णी, व्यंकटेश माडगूळकर, ग.दि. माडगूळकर, पु.ल. देशपांडे, अनिल अवचट, ग्रेस अशा कितीतरी ज्येष्ठ साहित्यिकांनी ललित लेखनाचे दालन समृद्ध केले, तरीही ललित लेखनाला म्हणावी तशी वाङ्मयीन महत्ता प्राप्त झाली नाही, हे खरे आहे. ललित गद्य हा साहित्यप्रकार मराठीत दुय्यमच समजला जातो.**

**ललित** लेखन व ललित गद्य हा साहित्यप्रकार संमिश्र अशा स्वरूपाचा आहे. मराठीमध्ये हा साहित्यप्रकार पाश्चात्त्य साहित्यामधून आला. मोंटेन या फ्रेंच साहित्यिकाची 'एसे' या नावाची दोन पुस्तके प्रकाशित झाली होती. त्यानंतर बेकन यांचेही साधारण त्याच स्वरूपाचे ललित पुस्तक प्रकाशित झाले. त्यानंतरच्या काळात ए.जी. गार्डिनर, ल्युकस, लिंड अशा काही लेखकांनी 'फ्री एसे' नावाने आपल्या व्यक्तिगत अनुभवांची शैलीदार भाषेमध्ये सुंदर मांडणी केली. अशाप्रकारे पाश्चात्त्य देशांमध्ये उगम पावलेला हा साहित्य प्रकार साधारणपणे १९२५ च्या सुमारास त्यावरूनच मराठीमध्ये लघुनिबंधलेखन या नावाने अवतरला. त्याचे श्रेय ना.सी. फडके, वि.स. खांडेकर आणि अनंत काणेकर या तत्कालीन श्रेष्ठ साहित्यिकारांकडे जाते. 'गुजगोष्टी' या नावाने या साहित्यप्रकाराची सुरुवात झाली आणि लघुलेख, लघुनिबंध, आत्मनिबंध, ललित निबंध, ललित लेख, मुक्त निबंध ललित गद्य अशा विविध नावांनी तो मराठीत रूढ झाला. या साहित्यप्रकाराचे स्वरूप काहीसे लवचीक, सैल, आहे. 'फॉर्मलेस फॉर्म' असे त्याचे वर्णन केले गेले आहे. त्यात व्यक्तिचित्रणात्मक, प्रवास-

वर्णनात्मक, स्मरणरंजनपर शब्दचित्रे, स्फुटलेखन, चिंतनपर, कलास्वादपर लेखन अशा आशयसूत्रांचा समावेश असतो. ललित गद्याचे स्वरूप विस्तारशील असते. मोकळे-ढाकळेपणाने केलेले लालित्यपूर्ण लेखन अशी याची व्याख्या डॉ. आनंद यादव यांनी केली आहे तर ना.सी. फडके यांनी 'कोणताही संकोच न बाळगता मुक्तपणे केलेले आत्मलेखन' असे ललित गद्याचे स्वरूप अधोरेखित केलेले आहे. मुक्तता, तरलता, भावनाशीलता, संवेदनांचा पट, भाषेचा फुलोरा, जीवनानुभवाचे प्रकटीकरण, चिंतनशीलता, आत्मपरता अशी काही ललित गद्याची वैशिष्ट्ये सांगता येतील. ते कधी कथेच्या, कधी चरित्राच्या, कधी निबंधाच्या व ललित निबंधाच्या जवळ जाणारे वाटले तरी ललित लेखनाचे असे स्वतंत्र अस्तित्व आहे. संबंधित व्यक्तीच्या संदर्भातील विविध घटना, प्रसंग, अनुभव, नातेसंबंधातील आगळेवेगळे कंगोरे, वृत्ती-प्रवृत्ती, स्वभावदर्शन यांचे ओघवत्या रसपूर्ण, आकर्षक भाषा आणि संवादातून येणारे प्रत्यंतर ललित लेखनाला दर्जा बहाल करीत असते.

मराठीतील स्वातंत्र्योत्तर काळातील ललित लेखन गुणवत्तेने आणि संख्या बळाने समृद्ध आहे. स्वातंत्र्योत्तर काळात कुसुमावती देशपांडे, दुर्गा भागवत, गो.वि. करंदीकर (विंदा करंदीकर), प्रभाकर पाध्ये, विजय तेंडुलकर, विद्याधर पुंडलिक, श्रीनिवास विनायक कुलकर्णी, व्यंकटेश माडगूळकर, ग.दि. माडगूळकर, पु.ल. देशपांडे, अनिल अवचट, ग्रेस अशा कितीतरी ज्येष्ठ साहित्यिकांनी ललित लेखनाचे दालन समृद्ध केले, तरीही ललित लेखनाला म्हणावी तशी वाङ्मयीन महत्ता प्राप्त झाली नाही, हे खरे आहे. ललित गद्य हा साहित्यप्रकार मराठीत दुय्यमच समजला जातो.

व्यक्तिचित्रणात्मक ललित लेखन - मराठीत व्यक्तिचित्रणपर लेखन मोठ्या प्रमाणावर झाले आहे. व्यक्तिचित्र, शब्दचित्र, स्वभावचित्र, भावचित्र अशा वेगवेगळ्या संज्ञांनी हे ललित लेखन समोर येत असते.

व्यक्तिचित्रणपर लेखनाची वैशिष्ट्ये - व्यक्तिचित्र असे म्हटले जाते परंतु त्यामध्ये व्यक्तीचे संपूर्ण वास्तववादी चित्र उमटेलच असे नाही. स्वभावचित्र अशी एक संज्ञा व्यक्तिचित्रांसाठी वापरली जाते, परंतु त्यातही व्यक्तीच्या स्वभावाचे पूर्ण चित्र उमटतेच असे नाही असे मत डॉ. विलास खोले यांनी मांडले आहे. व्यक्तीचित्रणपर लेखनात बहुतांश लेखकाच्या त्या व्यक्तीविषयीच्या आत्मनिष्ठ अनुभवांचा समावेश असतो. लेखकाला ती व्यक्ती कशी दिसते, तिची वर्तनशैली, स्वभाव, शारीर तपशील, लेखकाशी असलेले तिचे नाते, इतर व्यक्तींशी तिचे असलेले नातेसंबंध यांचे वर्णन विशेषतः प्रसंग, घटना, विचार, निरीक्षणे यांच्या आधारे केलेले असते. बहुतांश वेळा व्यक्तिचित्रणाला जवळच्या व्यक्तीने केलेले गुणगौरवपर लेखन असा रंग असतो.

थोर व्यक्तींच्या विशिष्ट वयाच्या टप्प्यावर, उदाहरणार्थ, व्यक्तीची पन्नाशी, साठी, अमृतमहोत्सव, सहस्रचंद्रदर्शन, शतकपूर्ती या निमित्ताने अनेक वेळा लेखन केले जाते .ते त्यांच्याशी घनिष्ठ संबंध असलेल्या लेखकांकडून केले जाते तसेच दूरस्थ व्यक्तींकडूनही केले जाते. थोर व्यक्तींच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग, त्यांच्या आचारविचारांतील मोठेपणा अधोरेखित करणाऱ्या गोष्टी, त्यांचे गुण, त्यांचे कार्यकर्तृत्व, त्यांच्या वर्तनातून ठसणारी जीवनमूल्ये, माणूस म्हणून असलेले त्यांचे मोठेपण अशा सर्व पैलूंचा त्यामध्ये परामर्श घेतलेला असतो. अशा व्यक्तींवरील अशा लेखनाद्वारे एक प्रकारे वाचकांसमोर विविध क्षेत्रांतील आदर्श उभे करता येतात. त्यांच्या जीवनप्रवासातून समजलेला त्यांचा संघर्ष, त्यांनी आचरलेली जीवनमूल्ये, मानवी वृत्ती या संबंधीचे वस्तुपाठ समाजासमोर यावेत, पुढच्या पिढ्यांना त्यातून प्रेरणा मिळावी असा या लेखनापाठीमागचा उद्देश असू शकतो. वाचकांना राजकारण, समाजकारण, साहित्य, चित्रपट, संगीत इत्यादी क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्तींविषयी कुतूहल वाटत असते, त्यामुळे अशा व्यक्तिचित्रणपर लेखनाला वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळतो. आचार्य अत्रे यांनी 'समाधीवरील अश्रू' या त्यांच्या पुस्तकात त्यांनी वेळोवेळी विविध क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्तींवर लिहिलेल्या मृत्युलेखांचे संकलन केले आहे. त्यातून त्या त्या व्यक्तीचा कार्य कर्तृत्वासह संपूर्ण सुंदर जीवनपट उलगडला आहे. गदिमा यांच्या 'तीळ आणि तांदूळ' या पुस्तकातही साहित्य, संगीत, चित्रपटक्षेत्रांतील ज्येष्ठश्रेष्ठ व्यक्तींविषयी वाचायला मिळते. महात्मा गांधी, महात्मा फुले, पं. नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, महादेव गोविंद रानडे इत्यादी समाजशिल्पी व्यक्तींवर मोठ्या प्रमाणावर विविध पैलूंतून लिहिले गेले आहे. या महापुरुषांच्या अनेकविध कृतींवर, त्यांच्या तथाकथित चुकांवर टीका करणारे लेखनही मोठ्या प्रमाणावर झाले आहे.

थोर व्यक्तींप्रमाणेच काही अप्रसिद्ध किंवा ज्यांना लौकिक अर्थाने सामान्य म्हणता येईल अशा व्यक्तींचीदेखील

व्यक्तिचित्रणे अनेक वेळा लिहिली जातात. या व्यक्ती महान समजल्या जात नसल्या तरी त्यांच्यामध्ये अनेक वेळा अनेक गुणांचा समुच्चय असू शकतो. विशेषतः मानवता, दया, करुणा, प्रेम, उदारपणा, मनाचा मोठेपणा, इतरांना मदत करण्याची वृत्ती, सदाचार अशा काही गुणांमुळे अनेक व्यक्ती आपल्या परिसरामध्ये, क्षेत्रामध्ये लोकप्रिय असतात. अशा सामान्य व्यक्तींमध्ये असलेल्या असामान्य गुणांमुळे त्यांची व्यक्तिचित्रे वाचनीय ठरतात. यामध्ये आपल्या क्षेत्रातील परिचित व्यक्ती, कुटुंबातील व्यक्ती, नातेवाईक, मित्र इत्यादी व्यक्तींची निवड लेखक करत असतो. जन्मदात्या आई-वडील, भाऊ-बहीण इत्यादी नातेसंबंधांवर लिहिलेली अत्यंत हृद्य व्यक्तिचित्रणे मराठीत अनेक आहेत. उदाहरणार्थ, वि.स. खांडेकर यांनी आपल्या आईवर लिहिले आहे. शिवाजीराव सावंत, द.मा. मिरासदार, डॉ. रामचंद्र देखणे, विठ्ठल वाघ, प्र.चिं. शेजवलकर यांनीदेखील आपल्या आईवडिलांचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे.

यापैकी बहुतांश व्यक्तिचित्रांचा उद्देश गुणगौरव करण्याचा असतो. त्यामुळे अनेक वेळा ही व्यक्तिचित्रे व्यक्तीच्या गुणदोषांची चिकित्सा करणारी नसतात, त्यामुळे ती परिपूर्ण नसतात. अर्थात काही लेखकांनी व्यक्तींच्या गुणदोष चिकित्सेचा धोका पत्करूनदेखील लिहिले आहे, तसेच व्यक्तींच्या स्वभावात असलेल्या विविध कंगोऱ्यांना, स्वभाववैचित्र्य आणि चमत्कारिकपणाला स्पर्श करणारी व्यक्तिचित्रेदेखील आढळतात. दुर्गा भागवत, रवींद्र पिंगे यांनी अशा प्रकारचे व्यक्तिचित्रणपर ललित लेखन केले आहे. रवींद्र पिंगे यांनी तर विपुल व्यक्तिचित्रणपर लेखनातून अर्नेस्ट हेमिंग्वेपासून अमृता प्रीतम, सानेगुरुजी, दुर्गा भागवत, कुसुमाग्रज इत्यादी साहित्य-संस्कृती समृद्ध करणाऱ्या थोरामोठ्यांची व्यक्तिचित्रे लिहून त्यांचा रसाळ शैलीत सुंदर परिचय करून दिला आहे. मधु मंगेश कर्णिक यांनी 'लागेबांधे' या पुस्तकात अशा प्रकारचे चित्रण काहीशा अलिप्ततेने केले आहे. शांता शेळके यांची 'नक्षत्र चित्रे', 'वडिलधारी माणसे' ही नितांत सुंदर पुस्तके त्यांच्या अजोड लेखनशैलीमुळे वाचकप्रिय ठरली आहेत. 'धूळपाटी' या त्यांच्या पुस्तकात शांताबाईंनी त्यांच्या आयुष्यातील अनेकविध प्रसंग, घटना, माणसे, नातेसंबंध यांचा सुंदर पट उलगडला आहे. मंगेश पाडगांवकर यांनीदेखील 'निंबोणीच्या झाडामागे'सारख्या पुस्तकांतून गतकाळाचा मनोरम वेध घेतला आहे. श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या 'डोह' आणि 'सोन्याचा पिंपळ' यांतील लेखनाने अभिजात ललित लेखनाचा एक अनोखा वस्तुपाठ घालून दिला आहे.

बहुतांश व्यक्तिचित्रात्मक लेखन हे वास्तवातील खऱ्याखुऱ्या हयात असलेल्या किंवा नसलेल्या व्यक्तींच्या आयुष्यावर आधारित असते; परंतु पु.ल. देशपांडे यांच्यासारख्या सिद्धहस्त लेखकाने काल्पनिक स्वरूपाची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. पु.ल. देशपांडे यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' सारख्या पुस्तकांमध्ये अशा अनेक काल्पनिक व्यक्ती भेटतात. पुलंचे लेखन वाचकांच्या गळ्यातील ताईत बनून राहिले आहे, याचे कारण ही सर्व व्यक्तीचित्रे प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या व्यक्तींची असली तरी त्यांनी ज्या प्रकारच्या काल्पनिक व्यक्ती त्यातून उभ्या केल्या आहेत तशा व्यक्ती आपल्याला आसपास रोजच्या जीवनामध्ये नेहमी भेटत असतात. त्या सर्वसामान्य व्यक्ती असतात, त्या सर्व प्रकारच्या मानवी गुणदोषांनी युक्त असतात. सामान्य माणसांच्या वाट्याला येणारी सुखदुःखे, आशा-निराशा, त्यांची स्वप्नं, आकांक्षा आणि स्वप्नभंग असे सगळे या सगळ्या परिचित जगाचा अनुभव वाचकांना या व्यक्तिचित्रणपर लेखनातून येतो. ही सगळी सामान्य माणसांचे प्रतिनिधित्व करणारी नमुनेदार माणसे काही एक खुबी, व्यक्तिवैशिष्ट्य, वैचित्र्य घेऊन अत्यंत खुमासदारपणे चुरचुरीत, नर्मविनोदी भाषेमध्ये आपल्यासमोर अवतरतात तेव्हा ती काल्पनिक आहेत अशी आपल्या मनाला जाणीवदेखील होत नाही, इतकी ही माणसे आपल्या आसपास जगत असतात.आपण देखील आपल्या सभोवताली 'नारायण', 'अंतू बरवा', 'चितळे मास्तर' पाहिलेले असतात त्यामुळे आपण या लेखांशी संवेदनाच्या पातळीवर मनापासून जोडले जातो . अर्थात पुलंच्या लेखनावर स्त्रीवादी आणि इतर दृष्टिकोनातून टीका झाली आहे, तो भाग वेगळा. तसेच व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'माणदेशी माणसं'मधील 'झेल्या'सारख्या अनेक व्यक्ती आपल्या ओळखीच्या होऊन जातात. अस्सल मातीतील अस्सल ग्रामीण व्यक्तिरेखा त्यांनी आपल्या लेखनात जिवंत केल्या आहेत. मानवी वृत्ती-प्रवृत्तींचे प्रत्ययकारी दर्शन त्यात घडते.

प्रकाश नारायण संत यांनी त्यांच्या कथा आणि व्यक्तिचित्रण यांच्या सीमारेषेवरील लेखनातून 'लंपन' या अफलातून काल्पनिक व्यक्तिरेखेतून बालमनाचे, बालकांच्या विश्वातील जगाचे कुतूहल, छोटे छोटे आनंद, छोटी छोटी दुःखे, निरागस मित्रभाव, रुसवेफुगवे, अशा संवेदनांचे विलोभनीय चित्रण केले आहे, ते मराठीत

अजरामर झाले आहे.

सध्याच्या काळातील उत्तम व्यक्तिचित्रण करणारी लेखिका म्हणून मला श्रद्धा बेलसरे-खारकर यांचा उल्लेख करावासा वाटतो. मंत्रालयात सचिवपदी नोकरी करत असताना राजकीय क्षेत्रातील मोठे मंत्री, अधिकारी यांच्या संपर्कात त्यांना राहावे लागले. त्यातील माजी राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख अशा व्यक्तींवर लिहिलेल्या लेखांत त्यांनी या मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तींच्या स्वभावातील साधेपणा, दिलखुलास मैत्रभाव, नम्रपणा, कामातील झपाटा, पाय जमिनीवर ठेवण्याची, मदत करण्याची वृत्ती अशा वेगळ्या गुणांवर प्रकाश टाकला आहे. मिलिंद जोशी ह्यांनीदेखील 'दोन शिवाजी'सारख्या लेखातून प्राचार्य शिवाजीराव भोसले आणि शिवाजीराव सावंत या दिग्गजांच्या त्यांना लाभलेल्या सहवासाविषयी अप्रतिम लेख लिहिला आहे.

व्यक्तिचित्रणपर लेखनाचे वैशिष्ट्यच असे असते, की त्यात माणसे केंद्रस्थानी असतात. माणसांविषयी वाटणारा लळा-जिव्हाळा, आदर, प्रेम, कुतूहल, करुणा लेखकांना त्यांच्यावर लिहायला भाग पाडते.

**प्रवासवर्णनात्मक ललित लेखन**

वैशिष्ट्ये - व्यक्तिचित्रणपर लेखनाप्रमाणे प्रवासवर्णन हादेखील ललित लेखनाचा एक मोठा घटक, महत्त्वाचे आशयसूत्र आहे. या प्रकारच्या लेखनात ठिकठिकाणी पाहिलेले, अनुभवलेले भू-प्रदेश, तेथील इतिहास, संस्कृती, माणसे, जीवनसंस्कृती, निसर्गरूपे, यांचे मोहक, सुंदर, तरल भाषेत रेखाटन असते. एकूणच निसर्ग, आपला सभोवताल हा आपल्या जगण्याचा एक सुंदर भाग असतो. सृष्टीतील विविध रंगरूपरसात्मक विभ्रम माणसांना आकर्षून घेत असतात. सभोवताल समजून घेण्याची एक आंतरिक आकांक्षा प्राचीन काळापासून माणसांत उपजत असते. त्यामुळे माणसे विविध परिचित, अपरिचित भूप्रदेशांचा प्रवास करीत असतात. विविध ठिकाणी पाहिलेल्या निसर्ग सौंदर्याची, चमत्कृतीपूर्ण दृश्यांची, माणसांची अनुभूती इतरांनाही करून देण्याच्या ऊर्मीतून, प्रवासवर्णनपर, निसर्गवर्णनपर लेखन जन्माला येते.

यासंदर्भात पुल देशपांडे यांच्या लेखनाला दाद द्यावीच लागते .

पुल देशपांडे यांच्या 'अपूर्वाई'चे अप्रूप आजही वाचकांना वाटते ते त्यांच्या ठायी असलेल्या संस्कृतीविषयक समृद्धतेमुळे; तसेच, त्यांच्या खुसखुशीत, नर्मविनोदी शैलीमुळे. त्यांच्या लेखनातील विविध कला, इतिहास सहित्यादी विषयीचे अकृत्रिमपणे आलेले संदर्भ आपल्याला सुखावतात. त्यांच्या प्रवासवर्णनपर पुस्तकांनी वाचकांच्या मनात आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे.

सध्याच्या काळात गाठीशी बऱ्यापैकी पैसा असल्याने मध्यमवर्गीय माणसे देशविदेशात प्रवास करू लागली आहेत. त्यामुळे विविध देशांत-प्रदेशांत अनुभवलेल्या निसर्गाच्या चमत्कारांना शब्दरूप देणारे साहित्य मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊ लागले आहे. या संदर्भात मीना प्रभू यांच्या लेखनातून जगभरातल्या देशांमधील निसर्गाची किमया आपल्याला घरबसल्या अनुभवता येते. 'माझं लंडन'पासून 'ग्रीकांजली', 'इजिप्तयन', 'चिनी माती' यांसारख्या पुस्तकांतून त्यांनी वाचकांना हा आनंद दिला आहे.

माडगूळकर बंधुद्वयीच्या लेखनातून माणदेशातला अस्सल ग्रामीण निसर्ग अवतरला आहे.

**ग्रामीण संवेदन**

ललित लेखनामध्ये ग्रामीण संवेदन विपुल प्रमाणात व्यक्त झाले आहे. वर्तमानकाळात ग्रामीण संस्कृतीविषयी जीवन रीतींविषयी माणसे, निसर्ग याविषयी लिहिणारे अनेक लेखक पुढे आले आहेत. त्यामध्ये भास्कर चंदनशिवे, दत्ता भोसले, इंद्रजित भालेराव, अशोक कोतवाल, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले, चंद्रकुमार नलगे, कृष्णात खोत, प्रवीण बांदेकर, अशोक कौतिक, कोळी अशोक कोतवाल, अशी कितीतरी नावे घेता येतील, ज्यांनी ग्रामीण संवेदन पुरेशा ताकदीने मांडले आहे. यापैकी बहुतांश लेखन हे स्मरणरंजनातून आले आहे. हरवलेला भोवताल, बदललेले शेतीतील वास्तव, गावाचे स्वरूप, जीवनशैली, वर्तनशैली याविषयीची खंत या लेखकांच्या लेखनातून प्रकट झाली आहे. त्याचबरोबर गावाच्या मातीचा सुगंध, सुगीभरले दिवस, लळ्याजिव्हाळ्याने ओथंबलेली माणसे, आंबे-फणस, हुरडा, मटण, यात्रा-जत्रा, दैवते, देवळे, सणउत्सव अशा सुंदर आठवणीत रमलेले मन या लेखनात प्रकट झाले आहे. द.ता. भोसले यांसारख्या लेखकांच्या लेखणीतून लोकसंस्कृतीच्या खुणा समृद्धतेने भेटतात. मुकुंद कुळे सध्या अशा प्रकारचे ग्रामीण संवेदनेचे सामाजिक अस्तर असलेले मौलिक लेखन करत आहेत. राजन गवस यांनीदेखील जागतिकीकरणाच्या रेट्याने बदलत गेलेले ग्रामवास्तव प्रभावीपणाने रेखाटले आहे इंद्रजित भालेराव यांचे ग्रामीण

जीवनातील बारकावे टिपणारे विलोभनीय लेखन वाचकांच्या अभिरुचीचा भाग झाले आहे.

**सामाजिक जाणिवेचे तसेच**
**कला इतिहास–संस्कृतीविषयक लेखन**

ज्येष्ठ लेखक अनिल अवचट यांनी आपल्या विविध वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिचित्रणपर लेखनातून समाजाचे भले करण्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या व्यक्तीविषयी फार अनौपाचारिक, सुंदर शैलीत लिहिले आहे. कोकणात विंचूदंशाने सर्रास मृत्यू पावणाऱ्या माणसांसाठी कुठल्याही साधनसामग्रीचा अभाव असताना औषध शोधणारे डॉक्टर हिंमतराव बाविस्कर, डॉ. अभय आणि राणी बंग, प्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. सुनंदा अवचट, डॉ. जगदीश हिरेमठ, सुमित्रा भावे अशा कार्यमग्न, ध्येयनिष्ठ व्यक्तींविषयी अनोख्या शैलीत करून दिलेला परिचय वाचकांच्या मनाला भिडतो. याशिवाय 'रिपोर्तज्'सारखे त्यांचे पुस्तकही सुंदर ललित लेखनाचा वस्तुपाठ घालून देणारे आहे. मिलिंद बोकील यांनी मेंढा लेखा गावाच्या लोकसहभागातून साकारलेल्या लोक विलक्षण प्रयोगाविषयी लिहिले आहे.

चिंतनपर ललित लेखन करणाऱ्या लेखकांमध्ये महेश एलकुंचवार यांच्या 'मौनराग' तसेच वसंत आबाजी डहाके यांच्या 'मालटेकडीवरून', 'यात्रा–अंतर्यात्रा' या पुस्तकांचा तसेच प्रज्ञा पवार यांच्या 'इटरनिटीच्या मॉलटेकडीवरून' या सदरलेखनाचा उल्लेख अपरिहार्यपणे करायला हवा. अरुणा ढेरे यांची 'प्रेमातून प्रेमाकडे'सारख्या पुस्तकात थोरामोठ्यांच्या प्रेमकहाण्या सांगणारे पुस्तक प्रकाशित झाले आहे. तसेच 'कवितेच्या शोधात', 'शाश्वताची शिदोरी', 'स्त्री आणि संस्कृती'सारखी अनेक पुस्तके अरुणाताईंच्या सौंदर्यपूर्ण भाषेमुळे, संदर्भ बहुलतेमुळे तसेच त्यांच्या महत्त्वपूर्ण भाष्यामुळे ललित गद्य या साहित्यप्रकारात उच्च वाङ्मयीन मूल्यांची भर घालणारी ठरली.

याशिवाय अलीकडच्या काळात विविध कला, इतिहास आणि संस्कृतीविषयी केलेले प्रगल्भ लेखन समोर येत आहे. अरुण खोपकर यांची 'अनुनाद', 'काल कल्लोळ', 'गुरुदत्त' ही पुस्तके, साधना बहुळकर यांचे 'भारतीय स्त्री चित्रकार' ही पुस्तके; तसेच, मंगेश नारायणराव काळे यांचे साप्ताहिक सकाळमध्ये आलेले चित्रकलाविषयक सदरलेखन, एकूणच ललित लेखन हा साहित्यप्रकार श्रीमंत बनवणारे आहे. याचबरोबर मधुकर धर्मापुरीकर व्यंगचित्रांचे उत्तम रसग्रहण मांडत असतात, तर विजय पाडळकर सातत्याने चित्रपटविषयक जाणिवा समृद्ध करणारे लेखन करीत असतात. अन्य एक वेगळा उल्लेख शरद वर्दे यांच्या लेखनाचा करता येईल. शरद वर्दे व्यवसायानिमित्त सतत देशविदेशात जात असतात, तेव्हा त्यांना तेथे भेटलेली अजबगजब माणसे, त्यांच्या विविध सांस्कृतिक समजुती, वर्तनशैलीचे चित्रविचित्र नमुने यावरील त्यांचे काहीसे विनोदी शैलीतील खुमासदार लेखन बहुतांश वेळा 'मौज'सारख्या दिवाळी अंकांतून प्रकाशित होत असते. वैशाली करमरकर या विविध देशांतील कंपन्यांसाठी आंतर–सांस्कृतिक सल्लागार म्हणून काम करतात. त्यांना येणाऱ्या विविध अनुभवांच्या अत्यंत महत्त्वपूर्ण, संवेदनशील आणि मनोहारी नोंदी त्यांच्या 'संस्कृतिरंग' या नितांतसुंदर पुस्तकात आहेत. विशाखा पाटील यांचीही 'कल्चरल शॉक – जर्मनी'सारखी पुस्तके विविध देशांतील संस्कृतिवैविध्यावर प्रकाश टाकतात. संतोष शेणई यांनी कोकणातील आगळ्यावेगळ्या मंदिरांवर लिहिताना वास्तुशिल्प, इतिहास, दंतकथा, आख्यायिका अशा विविध पैलूंना स्पर्श केला आहे. माझ्या स्वतःच्या (अंजली कुलकर्णी) 'संभ्रमाच्या पाण्यात गटांगळ्या' या पुस्तकात मी 'इंद्रियातीत'सारख्या लेखातून ज्ञान प्रक्रियेवर लिहिले आहे.

निष्कर्ष – एकूणच स्वातंत्र्योत्तर काळात ललित लेखनाचे विश्व असे विविध केंद्री, विविध आकृतीबंध, विविध रंगढंग यांनी झगमगलेले आहे. या साहित्यप्रकाराने वाचकांची अभिरुची घडवण्याचे मोलाचे काम केले आहे. मात्र एक मुख्य आणि समृद्ध साहित्यप्रकार म्हणून त्याकडे म्हणावे तसे अभ्यासकांचे लक्ष गेलेले नाही.

**– अंजली कुलकर्णी**
भ्रमणध्वनी – ९९२२०७२१५८



ऋतुरंग वर्ष ३०वे । दिवाळी २०२२ ।
संपादक : अरुण शेवते

## ॥ विशेषांक : 'उद्या पहाटे दुसऱ्या वाटा' ॥

ऋतुरंग दिवाळी अंकाचे हे ३०वे वर्ष आहे. यावर्षीचा विशेषांक 'उद्या पहाटे दुसऱ्या वाटा' हा आहे. आयुष्याचा प्रवास कधी स्थिर नसतो तर तो गतिशील असतो. एका वाटेवर अनेक वाटा खुणावत असतात. मनाला थांबून ठेवता येत नाही. मनाला हजार वाटा असतात. कुठली वाट निवडायची हे आपल्यालाच ठरवावे लागते. आपल्या विचारात, भावनेत अनेक बदल होत असतात. कधी हे बदल स्वीकारावे लागतात तर कधी नाकारून पुढे जावे लागते. वाटा आपल्याला बोलवत असतात. पहाट तर आपल्याला हवीच असते. वाटा बदलण्यासाठी धाडस लागते. माणसं बदलतात; भूमिका बदलतात. यातूनच आपल्या वाटेवरून पुढे जावे लागते.

### या अंकातील लेखक


गुलज़ार, शर्मिला टागोर, जावेद अख्तर, विनय सहस्रबुद्धे, वैभव जोशी, हेलन पनास्युक, मुकुंद टाकसाळे, श्रीकांत बोजेवार, दीप्ती नवल, डॉ. भाग्यश्री पाटील, सुशीलकुमार शिंदे, अंबरीश मिश्र, किशोर मेढे, कमल परदेशी, मिन्तल मुखिजा, लक्ष्मण चव्हाण, मीरा विजय बाबर, अपर्णा पाटील, राजू बाविसकर, अंजली अंबेकर, सुरेशचंद्र वारघडे, भास्करराव पेरे पाटील, रसिका रेड्डी, मुकुंद संगोराम, संजय आवटे, मल्हार अरणकल्ले, मीनाक्षी पाटील, शिवराम भंडारी, दुर्गा गुडिलू, नीती मेहेंदळे, अरुण नाईक, सविता दामले, पूजा सामंत, सुभाष देवढे, माधुरी ताम्हाणे, किरण येले, जयश्री देसाई, शर्मिला फडके, प्रणव पाटील, शर्मिला कलगुटकर, जयश्री शेट्टी, सुचिता नांदापूरकर-फडके, मीरा उमप, तुषार बोडखे, संजन मोरे

**मुखपृष्ठ** : अन्वर हुसेन
**रेखाटने** : विजयराज बोधनकर, अन्वर हुसेन

**मूल्य : ३०० रुपये । पृष्ठसंख्या : २५०**

ऋतुरंग प्रकाशन

संपर्क : **अरुण शेवते**
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४ **अंक सर्व विक्रेत्यांकडे उपलब्ध.**
shevatearun@gmail.com



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

दलित साहित्य

•

# दलित साहित्य की आंबेडकरी साहित्य की बौद्ध साहित्य की बोधी साहित्य?

**संजय पवार**

**कविता व आत्मकथनांच्या प्रपातानंतर दलित साहित्याचा ओघ काहीसा मंदावला. या दोन साहित्यप्रकारांपलीकडे नाटक या माध्यमाव्यतिरिक्त कथा व कादंबरी लेखनाकडे वळण्यास या साहित्याने बराच वेळ घेतला. तरीही बाबूराव बागूलांपासूनची परंपरा असल्याने कथानिर्मिती होऊ लागली. पण अण्णाभाऊंनंतर कादंबरी लेखनाकडे आजही दलित साहित्यिक व दलित लेखक मोठ्या प्रमाणावर वळलेले दिसत नाहीत.**

**साहित्य** हे साहित्य असते त्यात दलितबिलित कसे काय असू शकते? आता साहित्यातपण जाती व आरक्षण सुरू करायचं?

अशा आशयाच्या चर्चा, संताप, उपरोध, छद्मीपणे मराठी साहित्यविश्वात साठोत्तरी व सत्तरच्या दशकात सुरू झाल्या. तोवर मराठी साहित्य म्हणजे सदाशिवपेठी साहित्य हा शिक्का तत्कालीन मराठी साहित्याने अभिमानास्पद गमतीने स्वीकारला होता!

त्यावेळी सदाशिवपेठी म्हणजे प्रमाण मराठीत लिहिले जाणारे असा मानणारा मोठा वर्ग होता आणि हे प्रमाण मराठी म्हणजेच ब्राह्मणी मराठी वर्चस्व आहे असे जातवास्तव अधोरेखित करणारा एक वर्ग होता.

भाषेच्या प्रमाणीकरणामागे शुद्ध-अशुद्ध असा व्याकरणाचा पडदा पुढे लावत त्यामागे जातीय वर्चस्व दडवण्याची चलाख खेळी यात होती. या सदाशिवपेठी साहित्यांतर्गत पुन्हा चित्पावनांची एक वेगळीच मिरासदारी होती!

पुण्यात असणारी प्रकाशकांची, छापखान्यांची गर्दी आणि प्राध्यापकी व सरकारी नोकरी करत साहित्यिक

म्हणून मान्यता मिळवण्याचे पुणे हे मोठेच केंद्र होते. साहजिकच शिक्षण, साहित्य व संस्कती यावर सदाशिवपेठेने कब्जाच मिळवला होता.

मुंबईत भटवाडी, गिरगावनंतर पुणे हीच साहित्याची प्रमुख केंद्रे. नागपूर म्हणजे वऱ्हाडात देशस्थांचा रा.स्व.सं.च्या सांस्कृतिक सावलीत ब्राह्मणी पगडा होताच. त्यामानाने निजाम राजवटीत भरडल्या गेलेल्या मराठवाड्यातही सुरूवातीस समाजवादी ब्राह्मणी मंडळींचा प्रभाव होता. बाकी कोकणासह उर्वरित महाराष्ट्र या तीन केंद्राभोवतीच फिरत होता. उ. महाराष्ट्रात नाशिक, धुळे, अंमळनेर असे विखुरलेले अपवाद होते. पण मसावि काढायचा झाला तर स्वातंत्र्योत्तर काळात मसाप, पुणेभोवतीच केंद्रित होता. सदाशिवपेठी हा शिक्का त्यामुळेच महाराष्ट्रभर झाला.

साठोत्तरी साहित्य चळवळीचा उद्‌गम, विकास वगैरेवर बरेच लिहून झालेय. अगदी लिटिल मॅगेझिन चळवळीवरही आता पुरेसे संदर्भसाहित्य उपलब्ध आहे.

आता साहित्य हे साहित्य असतं दलितबिलित काही नसते या गदारोळाच्या आधी, आसपास वा त्याच सुमारास ग्रामीण साहित्य अशा उपविभागास सदाशिवपेठेने मान्यता दिली होती. ती मान्यता देण्यात फार खळखळ झाली नाही कारण या तथाकथित ग्रामीण साहित्याची उपज करण्यात पुन्हा ब्राह्मण लेखकांचाही वाटा होता. भाषिक शुद्ध-अशुद्धतेला बाजूला ठेवून ग्राम्य भाषेत लिहिलेले साहित्य ते ग्रामीण साहित्य अशी सुबोध वर्गवारी होती. पुढे आनंद यादव वगैरे मंडळींनी केवळ गावाकडच्या गोष्टी लिहिल्या म्हणजे ग्रामीण साहित्य नव्हे वगैरे म्हणत आपला वेगळाच बावटा फडकावला. त्यामुळे त्यावेळच्या मराठी सिनेमात पाटील वगैरे मंडळी जी भाषा बोलत ती शुद्धअशुद्धतेच्या निकषावर ग्राम्य ठरवत ग्रामीण करून टाकली. मीच्या ऐवजी म्या लिहिलं की झालं ग्रामीण!

या ऐवजावर दोन्ही माडगूळकर, द.मा. मिरासदार यांच्या जोडीने शंकर पाटील यांनी शहरेतर महाराष्ट्रातला व मुख्यत: शेती करणारा, गावगाड्यात बलुतेदारांसह गुण्यागोविंदाने राहणारा असा तथाकथित रांगडा, रगेल, रंगेल असा हिंदू मध्यम जातीचा नायक रंगवत त्याच्या जोडीने महार, मांग, रामोशी, न्हावी, सुतार, धोबी यांची गुणकर्म वैशिष्ट्ये सांगत या पात्रातूनच कधी विनोद निर्मिती तर कधी पाटलाचा सोगा धरत गावकीची कामे करतानाच, मुडदे वगैरे पाडून सदाशिवपेठी वाचकाच्या अंगावर काटा आणत. यातले बलुतेदार समरसतेने गावगाड्यात राहत व विद्रोहाचा ब्रही उच्चारत नसते. विद्रोह म्हणजे मग थेट डाकूच! हिंदू धर्मातील जातीयतेचा काच अजिबात जाणवू न देता तिथे पाहिजे जातीचे म्हणत गावगाड्यातील स्थानासह त्यांचे सामाजिक स्थानही गौरवशाली रूढीपरंपरेच्या नावाखाली विषमतादर्शकच ठेवले गेले.

शुद्ध-अशुद्ध, ग्राम्य, ग्रामीण इथपासून जिल्हा, तालुका, खेडे असा भौगोलिक आधारही या तथाकथित ग्रामीण साहित्याला होता.

या पार्श्वभूमीवर दलित साहित्याची जी निर्मिती झाली ती मूलत: हिंदू धर्मातील जातीयतेवर प्रखर हल्ले चढवत. त्यासाठी विद्रोहाची पेरणी करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनाने, भाषणांनी व चळवळींनी.

हिंदू धर्मातील अस्पश्यतेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्णायकच घाव घालायला सुरुवात केली. भारतीय स्वातंत्र्यलढा व महात्मा गांधींचे नेतत्व देशभर प्रखर देशभक्तीचे वातावरण तयार करत असतानाच, बाबासाहेबांनी राष्ट्र गुलामीतून मुक्त करायचे तर आधी धर्मांतर्गत जातीय गुलामी-अस्पश्यृता नष्ट करा, अन्यथा इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊनही हिंदू धर्म जातीच्या गुलामीत, अस्पश्यतेतून कुठले स्वातंत्र्य मिळणार, असा रोकडा सवालच गांधींना केला.

गांधी धार्मिक व चातुर्वर्ण्य मानणारे होते. पण अस्पश्यतेला त्यांचा विरोध होता. अस्पृश्यांना त्यांनी हरीची लेकरे म्हणून हरिजन असे संबोधन दिले! बाबासाहेबांना दया, सहानुभूती, समरसता वगैरे नको होती, तर माणूस म्हणून समता हवी होती. समानाधिकार हवे होते, त्यांना जातीअंत हवा होता. गांधीना आधी बाबासाहेब पुणेरी ब्राह्मण समाजसुधारक वाटले! पण नंतर ते अस्पृश्य आहेत हे कळल्यावर त्यांना बाबासाहेबांचे विद्रोहाचे पाणी वेगळे आहे हे कळून चुकले. त्यामुळे पुढे गांधींनी हरिजन वगैरे म्हणत अस्पृश्योद्धाराचा कार्यक्रम काँग्रेसमधूनच राबवायला सुरुवात केली. पण बाबासाहेबांना उद्धार नको तर न्याय व समता हवी होती. बाबासाहेबांच्या स्वत:च्या आतच जागत झालेल्या या स्वसन्मान व विषमतेविरुद्धच्या लढ्यात त्यांनी केलेले लेखन, भाषणे, आंदोलने यालाच खऱ्या अर्थाने दलित साहित्याचे बीजारोपण म्हणता येईल.

बाबासाहेबांना स्वत:ला घडवतना कबीरापासून जोतिबा फुलेंपर्यंतचे वैचारिक गुरू लाभले. जोतिबांचा प्रभाव तर फारच होता कारण शूद्रादिशूद्रांबद्दल त्यांची तळमळ व

प्रत्यक्ष कार्य हे त्या काळात असामान्यच नव्हे तर काळाच्या पुढे जाणारे होते. छत्रपती शिवाजीमहाराजांची समाधी शोधून काढून त्यांच्यावर कुळवाडीभूषण म्हणून पोवाडा लिहितात, शेतकऱ्याचा आसूड, सत्यशोधकसह अखंड लिहितात. स्त्री शिक्षणापासून अंधश्रद्धेविरोधात भट, पुरोहितशाहीला प्रखर विरोध करणारे फुले हे बाबासाहेबांना पथदर्शकच ठरले. पुढे छत्रपती राजर्षी शाहूमहाराज यांच्या सक्रिय पाठिंब्याने बाबासाहेबांना जातिअंताचा लढा जसा सुरू ठेवता आला तसाच टिळक, गांधी, काँग्रेसप्रणीत स्वातंत्र्यलढ्याला सामाजिक अंगाने प्रश्न विचारत विरोध करताना ब्रिटिशांचे हस्तक म्हणून हिणवले गेले तरी राजर्षी शाहूमहाराज, ब्राह्मणेतर चळवळ, प्रबोधनकार ठाकरे वगैरे मंडळींच्या सक्रिय पाठींब्याने ते हिंदूधर्मातर्गत विद्रोहाची आग पेरत राहिले, सनातन्यांशी झगडत राहिले व हे सर्व करताना धर्मचिकित्सा करत त्यांनी विपुल लेखन मराठी व इंग्रजीत केले. जातिअंताला न मिळणारा प्रतिसाद पाहून त्यांनी शेवटी निर्धार केला की मी हिंदू धर्मात जन्मलो असलो तरी हिंदू धर्मात मरणार नाही. या निर्धाराला त्यांनी १९५६ साली हिंदू धर्म त्यागून बौद्ध धर्माचा स्वीकार केला व स्वत:सोबत लाखो हिंदू अस्पृश्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

त्याआधी त्यांच्यावर स्वतंत्र होऊ घातलेल्या भारताचे संविधान लिहिण्याची जबाबदारी गांधी, नेहरू, व काँग्रेसने सोपवली. आपले राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक मतभेद बाजूला ठेवत बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून जातिअंत, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व या नव्या देशात रुजवता येईल, त्यासाठी ही मोठीच संधी आहे हे ओळखून त्यांनी संविधाननिर्मितीची जबाबदारी आपल्या विद्वत्तेचा, आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अभ्यासाचा तसेच कायदेविषयक ज्ञानाचा उपयोग करून संविधान परिपूर्ण केले. या संविधानानेच इथल्या अस्पृश्य शुद्रादीशूद्र व स्त्रिया यांना धार्मिक गुलामीतून बाहेर काढून माणूस म्हणून सन्मान देतानाच नागरिक म्हणून मताधिकार दिला, समान संधीसाठी विशेष संधी म्हणून आरक्षणाचे तत्त्व कायद्याने स्वीकारायला लावले.

बाबासाहेबांचे संविधाननिर्मिती योगदान, आरक्षण तत्त्व आणि नंतरचे धर्मांतर यामुळे इथल्या पूर्वाश्रमीच्या हिंदू अस्पश्य जातींमध्ये नवी अस्मिता फुंकली गेली. पशुतुल्य जीवन जगणारी माणसे सन्मानाने भारतीय नागरिक म्हणून समतेच्या पायावर उभी राहिली. शिक्षण, नोकरी, रोजगार या उपलब्धींचा वापर करत स्वातंत्र्योत्तर काळात एकेकाळच्या शूद्रांनी विद्रोह करत क्रांती केली. ही क्रांतीच दलित साहित्याची नांदी होती.

दलित साहित्य ही संज्ञा वापरात येण्यापूर्वीच धर्मांतराने बौद्ध झालेल्या व शिक्षणाचा हक्क, सवलती, आरक्षण मिळालेल्या या तरुणांनी बाबासाहेबांनी वारशात दिलेल्या कबीर, फुलेंपासून ते मग पार चार्वाक, चक्रधर, बुद्ध, तुकाराम ते चोखामहार अशांचे वाचन करत नवेच लेखन सुरू केले. किंबहुना असे म्हणता येईल की मराठी साहित्याचेच पुनर्लेखन करायला घेतले. बौद्ध साहित्य म्हणून लिहिले जाणारे साहित्य व ते लिहिणारे साहित्यिक बौद्ध साहित्य संमेलन भरवू लागले इतपत त्याची वाढ व विस्तार झाला होता. म.भि. चिटणीस, बाबूराव बागूल, शंकरराव खरात, या मंडळींना पाहत-वाचत राजा ढाले, नामदेव ढसाळ, अर्जुन डांगळे, ज.वि. पवार, प्रल्हाद चेंदवणकर, दया पवार, ही मंडळीही लिहू लागली होती, व्यक्त होऊ लागली होती. यापैकी बाबूराव बागूलांवर मार्क्सवादी शिक्का होता तर राजा ढालेंची साठोत्तरी लघुअनियतकालिक बंडखोर चळवळीचा एक महत्त्वाचा शिलेदार म्हणून जास्त ओळख होती.

इथे एक लक्षात घेतले पाहिजे की साठोत्तरी साहित्य बंडखोरीत साहित्यिक म्हणून यातली मंडळी सक्रिय होतीच. पण त्याचवेळी त्यांची राजकीय, सामाजिक जाणिवा साठोत्तरीमधल्या इतर सवर्ण साहित्यिकांपेक्षा वेगळ्या व तीव्र होत्या.

त्यामुळेच सत्तरच्या दशकात देशभर दलित अत्याचाराच्या घटना वाढू लागल्या तेव्हा या सर्व साहित्यिकांना आपल्या दलितत्वाची तीव्र जाणीव झाली व केवळ साहित्यातून नव्हे तर राजकीय, सामाजिक विद्रोहातून प्रतिकार करावा लागेल हे मनाशी ठरवूनच राजकीय संघटनेच्या स्थापनेच्या हालचाली सुरू झाल्या.

म.भि. चिटणीस, जनार्दन वाघमारे यांनी तोवर अमेरिकेतील वर्णभेदविरोधी ब्लॅक पँथर, ब्लॅक लिटरेचर, म्युझिक, थिएटर याची ओळख करून द्यायला सुरुवात केली होती. राजा ढाले यांचे याबाबतीतले वाचन नियमित होते. त्यांनीच ते ढसाळ, जवि, डांगळे, महातेकर, भाई संगारे, इत्यादी समवयस्कांना उलगडून सांगितले. पुढे त्यातूनच प्रेरणा घेत दलित पँथरची स्थापना झाली व त्यातूनच पुढे दलित साहित्य, दलित नाटक जन्माला आले. आणि मग मराठी सांस्कृतिक विश्वात सुरुवातीला म्हटले त्याप्रमाणे साहित्य हे साहित्य असते, नाटक हे नाटक असते ते दलितबिलित कसे

काय असू शकते? मग आता इथेही आरक्षण ठेवायचे का? अशा संतापी ते छद्मी चर्चा सुरू झाल्या.

दलित साहित्याच्या या पूर्वेतिहासाला थोडी काट मारून पुढे जाऊ. आज जे दलित साहित्य म्हणून ओळखले जाते, त्याची सुरुवात नामदेव ढसाळच्या गोलपिठाने झाली असं म्हणता येईल. वास्तविक ढसाळ व गोलपिठाच्या आधी व समकालीन लिहिणारे लिहितच होते. पण दलित पँथरची स्थापना व गोलपिठाचे प्रथम प्रकाशन हे जवळपास एकाच वेळी झाले. गोलपिठाने तथाकथित सारस्वत जगावर टाकलेला हातबॉम्ब इतका जोरदार फुटला की कल्लोळच झाला. त्यात नारायण आठवले यांचे प्रकाशन व विजय तेंडुलकरांची प्रस्तावना यामुळे गोलपिठा चर्चेच्या केंद्रस्थानीच आले. कारण त्यावेळी आठवले व तेंडुलकर दोघेही पत्रकारितेत व बहुधा लोकसत्तेत एकत्रच काम करत होते. तेंडुलकर त्यावेळच्या प्रायोगिक रंगभूमीवर नाटककार व त्याही आधी स्तंभलेखक म्हणून प्रसिद्ध होतेच. त्यांचीही ओळख बंडखोर अशीच होती. पण गोलपिठाने तेही हादरले.

अशा रीतीने साहित्यिकांची चळवळ दलित पँथर म्हणूनही गोलपिठाची भाषा वापरत महाराष्ट्रभर पसरत होती. सामाजिक न्यायासाठी रस्त्यावर उतरतानाच ही मंडळी लिहीतही होती. कविता, लेख, प्रसिद्ध होत होते. गोलपिठानंतर पँथरचे दुसरे नेते राजा ढाले यांच्या साधना साप्ताहिकातल्या काळा स्वातंत्र्यदिन या लेखाने तर महाराष्ट्र ढवळून काढला. यात साधनाचे त्या विशेषांकाचे संपादक अनिल अवचट, संपादक यदुनाथ थत्ते, विश्वस्त एस.एम. जोशी, ना.ग. गोरे यासह सर्वच साधना परिवार हा काँग्रेससह शिवसेना इतर हिंदू संघटना यांच्या रोषाचा धनी झाला. साधनेचे कार्यालय व प्रेस पेटवण्याचा प्रयत्न झाला पण दलित पँथर संघटना साधना साप्ताहिकामागे ठाम उभी राहिली व सर्व हल्ले परतवून लावले. यातून दुर्गा भागवत, महाराष्ट्र टाइम्स यांनी साधनावर निशाणे साधले. गोलपिठाने सुरू झालेली भाषेची चर्चा काळा स्वातंत्र्यदिन लेखानंतर ऐरणीवर आणली व जगणे आणि लिहिणे यातले अंतर मिटवणारी भूमिका मांडली जाऊ लागली. यातून मराठी सारस्वत भयंकर अस्वस्थ झाले याचे एक उदाहरण म्हणून आधुनिक वाल्मीकी म्हणून गौरवलेले गदिमा त्याकाळात प्रतिक्रिया देताना म्हणाले की आता रसाळ नामदेवाचा काळ गेला व ढसाळ नामदेवाचा काळ आलाय! एकुणात बामनाचा पत्रा किती कडकडा वाजायला लागला होता हे वरील विधानावरून लक्षात यावे.

दलित पँथर ही संघटना जेमतेम अडीच-तीन वर्षे टिकली. नंतर त्यात फाटाफूट झाली. ढाले, ढसाळ वेगळे झाले. कालांतराने ढसाळांनी पुण्यातून पँथर चालवली तर नागपुरात जाऊन ढालेंनी दलित पँथर बरखास्तच करून टाकली. त्यानंतर ढालेंनी मास मूव्हमेंट काढली. नंतर त्यांचा प्रवास अनेक वळणे घेत प्रकाश आंबेडकरांच्या भारिपपर्यंत झाला. तेथूनही ते बाहेर पडून नंतर स्वतंत्र काम करत राहिले. नामदेव ढसाळ यांनी स्वतंत्रपणे दलित पँथरचे अस्तित्व कागदोपत्री व काही मेळावे, निवडणुका यापुरते मर्यादित ठेवले. संघटनात्मक ताकद कधीच वाढली नाही. दरम्यान प्रा. अरुण कांबळे व रामदास आठवले यांनी पँथरचे अखिल भारतीय दलित पँथर नावाने पुनरुज्जीवन केले. याच पँथरने नामांतराचा प्रदीर्घ लढा दिला. मात्र या पँथरचे अस्तित्व नंतर एकत्रित रिपाईत करण्यात आले. त्यातून पुढे रामदास आठवले महाराष्ट्रात काँग्रेससोबत मंत्री झाले व सध्या ते भाजपच्या मंत्रिमंडळात आहेत. प्रा. अरुण कांबळे प्राध्यापक म्हणून कार्यरत असतानाच त्यांना मानसिक आजारांनी घेरले व त्यातूनच त्यांनी आत्महत्या केली. नामदेव ढसाळ दुर्धर आजाराशी झुंज देत तर राजा ढाले उत्तरायुष्यात स्वत:वरच स्वत: लादलेल्या विजनवासातून पुढे छोट्याशा आजारातून निधन पावले.

दलित साहित्यावर बोलताना, लिहिताना दलित पँथरचा उल्लेख, प्रवास, उल्लेखणे अपरिहार्य ठरते. पँथरच्या उदयअस्ताचा परिणाम दलित साहित्यावर झाला का?

तर त्याचे उत्तर होय आणि नाही असे दोन्ही आहे. एक परिणाम असा झाला, कम्युनिस्टांप्रमाणेच राजकीय संघर्ष करतानाच सांस्कृतिक संघर्षाची विचारपीठे उभारण्याची झालेली सुरुवात नंतर जवळपास लुप्त झाली. दलित साहित्याच्या जोडीने उभी राहिलेली दलित नाट्यचळवळ नंतर बंदच पडली. आणि परिणाम नाही झाला याचे उत्तर पँथरच्या विघटनानंतरही ज्या प्रचंड संख्येने दलित साहित्य लिहिलं गेलं ते प्रेरणेच्या पातळीवर आजही लिहिले जातेय.

गोलपिठानंतर प्रेरणा घेत विपुल दलित कविता प्रकाशित झाली. एखाद्या प्रपातासारखीच कोसळली. दरम्यान नाट्यमाध्यमातूनही वेगळा आशय प्रस्थापित होत होता. मात्र दया पवारांचे 'बलुतं' प्रकाशित झाले आणि त्याचा दलित समाजातून काही प्रमाणात झालेला धिक्कार तर मराठी साहित्याच्या पारंपरिक ब्राह्मणीवर्चस्व असलेल्या वाचकांकडून झालेले स्वागत व प्रचंड प्रतिसाद यामुळे

साहित्य दलितबिलित असते का? जगणे व लिहिणे यातले अंतर मिटविणारी भूमिका हे सर्व परिघावरून केंद्रस्थानी आले. बलुतंपाठोपाठ लक्ष्मण मानेंचे 'उपरा' आले आणि भटक्याविमुक्तांच जग याच वाचकवर्गाच्या अंगावर काटा आणून गेले. दया पवार व लक्ष्मण माने हे अनुक्रमे आंबेडकरी व सेवा दलित चळवळीतून कार्यरत असलेले लेखक होते. दया पवार तर पँथर काळाच्या आधीपासून कवी म्हणून चर्चेत होतेच. लक्ष्मण माने मात्र 'उपरा'नंतरच लिखाणाकडे वळले. उपरा या आत्मकथनानंतरचे त्यांचे नंतरचे लेखन रिपोर्ताज पद्धतीचे आहे.

दलित साहित्यावर लिहिताना या लेखात नेहमीच्या पद्धतीने चर्चित प्रसिद्ध साहित्यिक व त्यांचे साहित्य यांच्या सनावळ्या वा नामावळ्या न देता दलित साहित्य म्हणून मराठी साहित्यात जे काही अवतरले ते आज कुठल्या स्थानी आहे, काय स्वरूपात आहे, त्यात काय बदल झालेत व साधारण पुढची वाटचाल काय दिसते हे मांडण्याचा प्रयत्न केलाय. वर उल्लेखलेले काही लेखक व कलाकृती हे त्या त्या वेळच्या बदलाच्या टप्प्यावरचे म्हणून नोंदवलेत.

स्थूलमानाने आपण पाहिले तर पँथरच्या व दलित साहित्य या संबोधनाआधी अण्णाभाऊ साठे, बाबूराव बागुल, म.भि. चिटणीस वगैरे मंडळी लिहीतच होती. साठे व बागूल यांच्यावरच्या कम्युनिस्ट प्रभावाने त्यांना दलित साहित्याच्या चर्चाविश्वात फार काळ स्थानच दिले गेले नाही.

गोलपिठा आणि दलित पँथरच्या स्थापनेनंतर विपुल प्रमाणात लिहिली गेलेली कविता हीच दलित साहित्याची पहिली ओळख राहिली.

'बलुतं' व 'उपरा'नंतर आत्मकथनाची मोठीच लाट आली. ती इतकी मोठी होती की दलित साहित्य म्हणजे आत्मकथन असे एक समीकरणच रूढ झाले.

मराठी साहित्यात आयुष्याच्या शेवटच्या पर्वात आत्मचरित्र लिहिण्याची एक रूढ पद्धत होती. पण दलित आत्मकथनांनी तिशी-चाळीशीतील जीवनानुभव इतक्या ताकदीने मांडले की त्यांनी साहित्यासोबत आत्मचरित्रांचीही व्याख्या बदलून ती आत्मकथन अशी केली. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे या सर्व लेखनांचा प्रेरणास्तोत्र हा रूढार्थाने साहित्यबाह्य अशा फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारधारेचा होता. या आत्मकथनांमुळे मुख्यत्वे हिंदू धर्मातील व इतर धर्मातीलही जातीय, पंथीय विषमता, अंधश्रद्धा, शोषण, अत्याचार याच्याबरोबरीनेच स्वसन्मानाचा लढा, शिक्षणाची आच व समताधिष्ठित समाजनिर्मितीची स्वप्ने साहित्याच्या माध्यमातून नोंदवले गेली. भारतीय संविधानही साहित्य निर्मितीचा प्रेरणास्रोत राहू शकते हेही सप्रमाण व गुणवत्तापूर्ण पद्धतीने दिसले.

कविता व आत्मकथनांच्या प्रपातानंतर दलित साहित्याचा ओघ काहीसा मंदावला. या दोन साहित्य-प्रकारांपलीकडे नाटक या माध्यमाव्यतिरिक्त कथा व कादंबरी लेखनाकडे वळण्यास या साहित्याने बराच वेळ घेतला. तरीही बाबूराव बागूलांपासूनची परंपरा असल्याने कथानिर्मिती होऊ लागली. पण अण्णाभाऊंनंतर कादंबरी लेखनाकडे आजही दलित साहित्यिक व दलित लेखक मोठ्या प्रमाणावर वळलेले दिसत नाहीत.

शिक्षणप्रसाराने दलित समाजात मोठ्या प्रमाणावर सुरुवातीला वकील, बॅरिस्टर झाले तसे सरकारी कर्मचारीही झाले. बँकाच्या राष्ट्रीयीकरणानंतर मोठा वर्ग बँकेत लागला तर त्याहून मोठा वर्ग शिक्षक, प्राध्यापक झाला!

दलित साहित्याची दुसरी फेज मुख्यत: या शिक्षक-प्राध्यापकांनी सांभाळली. यात लिहिण्याची आत्मिक गरज असणारा एक वर्ग आहे तर दुसरा वर्ग नोकरीच्या अपरिहार्यतेतून त्यातल्या बदलत्या पात्रतानिकषामुळे साहित्य प्रसवू लागला. हे साहित्य म्हणजे मूलत: संशोधन, संपादन, या पातळीवरचे राहिले. यात सजनापेक्षा प्रकल्प पूर्णत्वाचे उद्दिष्ट अधिक व सुस्पष्ट असल्याने या साहित्यातून संख्या वाढली, गुणवत्ता तुलनेने घटली. पीएचडीधारक डॉक्टर वाढले पण यांचे प्रबंध क्वचितच चर्चाविषय व संदर्भमूल्यवान ठरले.

हे सर्व घडेपर्यंत ऐंशीचे दशक आले. सत्तरचे दशक हे सर्व प्रकारच्या घुसळणीचे ठरले तर सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धात दलित राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक चळवळीवर असलेला आंबेडकरी पर्यायाने बौद्ध समाजाचा जो प्रभाव होता त्याच्यी जोडीने आता भटकेविमुक्त, आदिवासी आणि स्त्रिया यांचाही सहभाग वाढता राहिला. हाच काळ नामांतराच्या चळवळीचाही होता.

दलित पँथरच्या स्थापनेवेळी व दलित साहित्याच्या सुरुवातीच्या कालखंडात दलित हा शब्द सर्वहारा अशा पद्धतीने सर्व धर्मीय मागास दलित, पददलित, आदिवासी, भटके, त्याचबरोबरीने सर्वधर्मीय/जातीय स्त्रिया अशा व्यापक अर्थाने घेतला होता. ब्लॅक पँथरमध्ये जसे सर्व कृष्णवर्गीय होते, तेच सूत्र इथे होते. परंतु ढाले व ढसाळ यांच्यातल्या राजकीय मतभेदाने दलित व्याख्येवरून वाद सुरू झाले. ढसाळांची पार्श्वभूमी समाजवादी व त्यांचे मित्रमंडळ

कम्युनिस्ट विचारधारेला जवळचे असणारे. ढाले खरे तर लघुअनियतकालिकांच्या साहित्यचळवळीतून आलेले. आंबेडकरी वा बौद्ध साहित्यिक चळवळींशी त्यांचा संबंध नंतर आलेला. पुढे त्यांनी दलित पँथरचे नेते म्हणून सारा भारत बौद्धमय करीन अशी घोषणा केल्याने दलित या शब्दाचे सुरुवातीचे व्यापक परिमाण मागे पडले. चळवळीवर बौद्धांचा असलेला प्रभाव पाहता ढालेसमर्थक ढसाळांना कम्युनिस्ट ते नक्षलवादी ठरवून मोकळे झाले. या वादातून जसे पँथरचे विघटन झाले तसेच दलित साहित्याचेही झाले.

दलित साहित्यामधला एक मोठा गट दलित साहित्यला आंबेडकरी साहित्य म्हणून संबोधू लागला. तर फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारा मानणाऱ्या साहित्यिकांना आंबेडकरी प्रेरणा ठीक पण दलित हा व्यापक शब्द राहू द्यावा असे वाटत होते. पण, पुढे उलटच झाले. आंबेडकरी साहित्य म्हणणाऱ्यांमध्येही बौद्ध साहित्य म्हटले पाहिजे असे म्हणत काही लोक वेगळे झाले. यातल्या काही लोकांचे तर असे म्हणणे होते की दलित व्याख्येत बसणाऱ्या सर्वांनीच बाबासाहेबांना स्मरून बौद्ध धर्माची दीक्षा घ्यायला हवी!

इथून दलित साहित्य म्हणून रूढार्थाने प्रचलित झालेल्या संज्ञेचे विघटन होत गेले व ते आंबेडकरी, फुले-आंबेडकरी, फुले-आंबेडकर-मार्क्स, बौद्ध अशा विविध विचारधारांत विभागले गेले. याला समांतर मग आदिवासी, भटकेविमुक्त मुस्लीम, ख्रिश्चन, असेही साहित्याचे पोटभेद होत गेले. सरकारी धोरणाने कामगारसाहित्यही मान्य झाले. याशिवाय मग नव्वदच्या दशकापासून स्त्रीवाद सुरू झाला व स्त्रियांचे साहित्य स्वतंत्रपणे मूल्यमापनात आले. सुरुवातीला दलित व्याख्येप्रमाणे स्त्री ही व्याख्याही लिंगवाचक अर्थाने व्यापकच होती. मात्र पुढे त्यातही दलित, आंबेडकरी, बौद्ध, फुले, मुस्लीम, ख्रिश्चन, भटक्याविमुक्त-आदिवासी असे पोटभेद झालेच!

याचा अर्थ असा दिसतो, साठच्या दशकात सुरू होऊन, सत्तरच्या दशकात शिखरावर पोहचलेले दलित साहित्य विसावे शतक संपताना आंबेडकरी, बौद्ध, फुले आंबेडकर मार्क्स, भटकेविमुक्त, आदिवासी, स्त्री अशा विविध विचारधारांच्या पोटभेदात विभागले. विसाव्या शतकाच्या शेवटासच प्रेमानंद गज्वी यांनी बोधी म्हणजे बुद्धिवादी साहित्य म्हणून वरील सर्व पोटभेदावर फुली मारत बोधी साहित्य हेच योग्य आहे म्हणत त्याचा प्रचार व प्रसार करायला सुरुवात केली.

या पन्नास वर्षांच्या कालखंडात दलित साहित्याच्या संदर्भात घडलेल्या दोन गोष्टींची स्वतंत्र दखल घ्यावी लागेल.

त्यातली पहिली, साहित्य हे दलितबिलित नसते असे म्हणणाऱ्या मराठी सारस्वतांनी, संस्थांनी, साहित्यिकांनी, वाचकांनी, दलित साहित्य व साहित्यिकांचा स्वीकार केला. मराठी सारस्वतांचा मानबिंदू असणाऱ्या साहित्य संमेलनांच्या अध्यक्षपदी, नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी दलित साहित्यिक, नाट्यकर्मी यांची सन्मानाने निवड केली तशीच निवडणुकीच्या माध्यमातूनही त्यांची निवड केली. बा.भ. बोरकरांचा पराभव करून शंकरराव खरात निवडून आले होते! अर्थात या स्वीकाराला रूढार्थाने दलितामधील सर्वानीच प्रतिसाद दिला नाही. त्यांनी विद्रोही, आदिवासी, दलित, मुस्लीम, सम्यक, संबोधि, अण्णाभाऊ साठेस्मृती, अशा विविध संमेलनांनी आपले स्वतंत्र साहित्य व संमेलने अधिक जोमदारपणे भरवायला सुरुवात केली. विद्रोहीचा एक गट तर दरवर्षी अ. भा. मराठी साहित्य संमेलन ज्या गावात ज्या तारखांना असेल त्याच गावात त्याच तारखांना भरवते व यशस्वीही करतात!

ही समता, समरसता, समन्वय, सहभाग काहीही संबोधा पण यामुळे मराठी सारस्वतांना बदलावे लागले. नमावे लागले. स्वीकारावे लागले. मान्य करावे लागले. सदाशिवपेठी शिक्का इतिहासजमा झाला तरी आजही जाणवणारा ब्राह्मणी प्रभाव पुसता आलेला नाही. त्यामुळे दलित साहित्यिक अध्यक्ष झाला तरी सरस्वतीपूजन जाऊन सावित्रीबाई फुलेंना वंदना सुरू झालेली नाही! याबाबतीत भल्या भल्या दलित आंबेडकरी, बौद्ध, भटक्या, आदिवासींसह स्त्रीवादी साहित्यिक अध्यक्षांनीही ना आग्रह धरला ना बदल करवून घेतला. सर्वांनी समयाच पेटवल्या!

दलित साहित्याचा अवकाश ऐंशीच्या दशकानंतर जसा विविध पोटभेदांनी आक्रसला तसाच तो मोठ्या प्रमाणावर व्यापला देशीवादी वा कृषिसंस्कृतीवाद्यांनी व्यापलाय.

या देशीवादात दलित साहित्याने साडेतीनटक्क्यांचं साहित्य म्हणताना उर्वरित ९६/९७% मध्ये गहित धरलेला बहुजन समाज ज्यात प्रामुख्याने मराठा समाजासह कुणबी व इतर मागास समाज जाती येतात.

देशीवाद पृष्ठभागावर आला नसता तर या ९६-९७%चे साहित्य दलित आदिवासी, भटके, स्त्रिया, मुस्लीम, ख्रिस्ती यांच्या बरोबरीनेच मराठी साहित्यात वर्गीकृत झाले असते.

राजकारणात जसा मंडल आयोगानंतर ओबीसी समाज प्रवर्गाने मागास पण सामाजिक स्थानात प्रबळच राहिला

तसेच, साहित्यात देशीवादी साहित्य व साहित्यिक, साहित्यातले ओबीसी होऊन आम्ही साडेतीन टक्क्यांत नाही पण दलितही नाही तर स्वत:ला स्वतंत्र कृषिसंस्कृतीचे हिंदू वारसदार म्हणत साहित्याच्या राजकारणातले प्रबळ दावेदार ठरलेत!

सध्या राजकारणात ओबीसींचा वरचष्मा आहे वा ते सवर्ण व अतिमागास यांच्या सत्तेच्या वाटेवर मधोमध बसलेत तसे देशीवादी साहित्यात कळीच्या जागेवर बसलेय!

शेवटी असे म्हणता येईल, दलित या व्यापक व्याख्येने सुरू झालेल्या साहित्याचा प्रवास मागच्या अर्धशतकात आंबेडकरी–बौद्ध ते बोधी अशा अरुंद वळणावर पोचलाय. आंबेडकरवाद, बौद्ध तत्त्वज्ञान वा बोधीविचार व्यापक असले तरी भारतीय समाजरचनेचा विचार करता व गेल्या पन्नास वर्षांत साहित्य–संस्कृतीविश्वात झालेले विचारांती बदल व सामाजिक रेटा वा विज्ञान–तंत्रज्ञानाच्या, माध्यमक्रांती–नंतरच्या, सध्याच्या मिलेनियम जगात आपण व्यापककेतून पुन्हा एकरेषीय विचारव्यूहात अडकणार याचा विचार दलित साहित्यासोबत वाढलेल्या सर्वच पिढ्यांना करावा लागेल. अन्यथा तसेही विसाव्या शतकाच्या दुसऱ्या पर्वात व ऐंशीच्या दशकाआधी जन्मलेले आपण कालबाह्य होतच चाललोय. जाताजाता पुढच्या पिढीला दलित साहित्याचा दस्तऐवज म्हणून सोपवताना तरी अखंड व व्यापक अर्थाचा असा देता येईल का?

**– संजय पवार**

भ्रमणध्वनी – ९०८२८१०५०८

## नाटक चिरायू होवो

नमस्कार,

आनंदाची गोष्ट अशी की, मुंबई मराठी साहित्य संघातर्फे माझ्या 'नाटकघर' या नाट्यसंस्थेला कै. बापूराव पेंढारकर स्मृती समिती पुरस्कृत प्रायोगिक नाट्यसंस्थेचा पुरस्कार संस्थेच्या अध्यक्ष अचलाताई जोशी यांचे हस्ते मिळाला. प्रमुख पाहुणे चित्रपट दिग्दर्शक राजदत्त होते.

अतिशय आनंद असा, की याच कार्यक्रमात ज्येष्ठ गायक–नट अरविंद पिळगावकर, अभिनेत्री रजनीताई जोशी, संगीतकार नंदलाल रेळे, तबलावादक साई बँकर, दिग्दर्शक आणि नट मंगेश कदम, अभिनेत्री लीना भागवत, सुधाकर भानुशे तसेच संस्थेतील तरुण नाट्यकर्मींनाही पुरस्कार मिळाले.

माझ्याकरता साहित्य संघ हे विशेष ठिकाण आहे. माझे आजोबा समतानंद अनंत हरी गद्रे हे नाटककार होते. 'हाऊसफुल्ल' शब्दाचे निर्माते! आजोबा गिरगावतच रहात. (त्यांच्या नावाने आज तिथे रस्ताही आहे.) ते डॉ. अ.ना. भालेरावांशी घनिष्ट जोडले गेलेले होते. यातील हृद्य भाग असा की या मित्रमंडळींनी समाजस्वास्थ्यकार प्रा. र.धों. कर्वे यांना सन्मानार्थ थैली दिली होती. अशा अनेक कारणांनी माझी आंतरिक नाळ या साहित्य संघ या वास्तुशी जोडली गेली आहे. साहित्य संघाचे काम खूप खूप मोठे आहे. कित्येक कलाकारांच्या पिढ्या इथे घडल्या. त्या नाट्यपरंपरेचाही सार्थ अभिमान मला आहेच.

मला साहित्य संघाने आत्तापर्यंत पार्श्वनाथ आळतेकर, के. नारायण काळे यांच्या नावे अभिनय, दिग्दर्शन याकरता पुरस्कार दिलेले आहेत. यावेळी 'नाटकघर' या माझ्या प्रायोगिक संस्थेला त्यांनी दिला.

'नाटकघर'तर्फे गेली दहा वर्षे मी विविध प्रयोग केले. ते महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरही झाले. अर्थातच या साऱ्या प्रयोगात आणि उपक्रमात सहभागी असणाऱ्या माझ्या लेखक, कलाकार, तंत्रज्ञ आणि प्रेक्षक या सर्वांचा हा पुरस्कार आहे.


साहित्य संघात प्रसिद्ध अभिनेता प्रमोद पवार याने नवे उपक्रम राबवायचे ठरवले आहेत. २६ ऑगस्टच्या नेटक्या कार्यक्रमात वृद्धांचा यथोचित सन्मान करताना नव्या रंगकर्मींची फळी त्याने उभी केली आहे. साहित्य संघ नव्या प्रायोगिक नाटकांकरता स्वागतोत्सुक आहे. प्रायोगिक नाटके अतिशय अल्प आणि गरजेनुसार मोफत करायची सवलत त्यांनी जाहीर केली आहे. आपण साऱ्यांनी तिथल्या अडचणींवर मात करत तिथं प्रयोग करायला हवेत. आम्ही 'अडलंय का?'चा प्रयोग तिथं पुढील दोन महिन्यांत नक्की करू. गावोगावच्या नाटकवाल्यांनीही तिथं प्रयोग करून पाहावे.

तर साहित्य संघ समिती आणि प्रमोद पवार या सर्वांचे मन:पूर्वक धन्यवाद.

सर्व पुरस्कारप्राप्त रंगकर्मींचे परत एकदा अभिनंदन.

नाटक चिरायू होवो.

**– अतुल पेठे** (२६ ऑगस्ट २०२२)



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

विज्ञान साहित्य

•

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि मराठी विज्ञानसाहित्य

अभिजित मुळ्ये




**एकुणात, स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात गेल्या ७५ वर्षांतील विज्ञानसाहित्याचा विचार करीत असताना, असे लक्षात येते की विज्ञानलेखन ही मराठी भाषेतील बऱ्यापैकी मळलेली वाट असली, तरी साहित्याच्या या सकस प्रवाहाची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणासारख्या मानाच्या पानावर नोंद घेतली जायला स्वातंत्र्यानंतर तीन दशके जावी लागली, तर एका विज्ञानकथालेखकाला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळायला जवळपास साडेसात दशके लागली. आणि एवढे होऊनही साहित्य संमेलनांसारख्या साहित्याच्या सर्वांत मोठ्या उत्सवांमध्ये विज्ञानसाहित्यावर कधी काही चर्चा, वैचारिक आदानप्रदान होताना दिसले का? तर त्याचे नाव नाही! हे सारे काय गौडबंगाल आहे?**

**कुतूहल** ही विज्ञानाच्या विकासामागची मूलभूत प्रेरणा आहे. सर्वसामान्यांपर्यंत विज्ञान पोहोचविण्याची प्रेरणा ही हे कुतूहल शमविण्याचीच आहे. पेशवाई जाऊन ब्रिटिशांची सत्ता भारतात स्थिरस्थावर होऊ लागल्यानंतरच्या काळात नव्या सत्ताधिशांसोबत आलेल्या नव्या ज्ञानाबद्दल असलेले कुतूहल हीच मराठी भाषेतील सुरुवातीच्या काळातली विज्ञानलेखनामागची प्रेरणा होती.

मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' १८३२ साली प्रसिद्ध झाले. त्याचे संपादक बाळशास्त्री जांभेकर व्युत्पन्न पंडित होते. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांनी समाजप्रबोधनाच्या उद्देशाने वृत्तपत्र सुरू केले, पण त्यापूर्वीच ते पाठ्यपुस्तके तयार करणाऱ्या नेटिव स्कूल बुक कमिटीचे सेक्रेटरीही बनले होते. त्यांना नऊ भाषा अवगत होत्या. ते गणित, भौतिकशास्त्र आणि भूगोल या विषयांतील तज्ज्ञ होते आणि या विषयांचे अध्यापनही करीत असत. कुलाब्यात वेधशाळा सुरू करण्यातही त्यांची महत्त्वाची भूमिका होती. असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या संपादकांच्या या पांडित्याचे प्रतिबिंब त्यांनी सुरू केलेल्या वृत्तपत्रात पडणे स्वाभाविक होते. त्यामुळे मराठी भाषेतल्या पहिल्याच वृत्तपत्रापासून त्यात प्रसिद्ध

होणाऱ्या विविध विषयांमध्ये विज्ञानविषयक लेखनही प्रसिद्ध होत असे. म्हणजे आजमितीला मराठी भाषेमध्ये विज्ञान लेखन सुरू झाल्याला किमान १९० वर्षे झाली आहेत हे नक्की.

जांभेकरांचे विद्यार्थी आणि शास्त्रीय ज्ञान स्वभाषेत व्यक्त करण्यासाठी मुंबईत १८४८ मध्ये स्थापन झालेल्या 'ज्ञानप्रसारक सभे'चे एक आधारस्तंभ प्रा. विनायक लक्ष्मण ऊर्फ केरूनाना छत्रे हेसुद्धा विज्ञानविषयांवरील उत्तम लेख लिहीत असत. हवा, भरती-ओहोटी, कालज्ञान, सूर्यावरील डाग, पर्जन्यवृष्टी अशा सर्वसामान्यांच्या नित्याच्या अनुभवातील विषयांसह अनेक विषयांवर त्यांनी अगदी सोप्या भाषेत निबंध लिहिलेले आहेत. पुढे, १८८० च्या आसपास आरोग्य व वैद्यक विषयांवरील वृत्तपत्रीय लेखनाची सुरुवात झाली. मुंबईतील त्या काळचे प्रख्यात वैद्य शंकर दाजीशास्त्री पदे यांनी वृत्तपत्रांतून आरोग्यविषयक लेख, तसेच अनेक ग्रंथही लिहिले. मराठी कादंबरीचे जनक म्हणून ज्यांचा गौरव केला जातो असे हरीभाऊ आपटे यांच्या मनोरंजन (१८९०) या वृत्तपत्रातही, लघुकथा, नाटके आणि धारावाही कादंबऱ्या यांच्या जोडीलाच विज्ञाननिबंधांना भरपूर वाव दिलेला असल्याचे दिसते.

विसाव्या शतकाच्या पहिल्या तीन दशकांत भारतीय विज्ञानाचे स्वरूप पूर्णपणे बदलून गेले. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे एकाहून एक सरस शास्त्रज्ञ या काळात भारतात झाले. 'आम्ही कुठेही कमी नाही', हे प्रत्येक क्षेत्रात परकीय राज्यकर्त्यांना दाखवून देण्याच्या प्रचंड ऊर्मीने हा काळ भारलेला होता. याचा प्रभाव म्हणून विज्ञानाशी संबंधित विषयांवर माहिती देणारी काही नियतकालिके मराठीमध्ये सुरू झाली. 'शेतकी आणि शेतकरी' हे कृषिविज्ञानाला वाहिलेले नियतकालिक १९१० मध्ये पुण्यात सुरू झाले. १९१९ मध्ये 'उद्यम' नावाचे मासिक नागपूरमध्ये सुरू झाले. हे नियतकालिक मुख्येत्वेकरून विविध उद्योगधंद्यांची माहिती सामान्य मराठी वाचकांना देण्यासाठी निघत असले, तरी त्यात रसायनशास्त्र, अभियांत्रिकी यांसारख्या विषयांवरील लेखांचाही समावेश असे. १९२८ मध्ये पुण्यात 'सृष्टिज्ञान' हे विज्ञानाला वाहिलेले मासिक सुरू झाले. सर्वसामान्यांपर्यंत या वैज्ञानिक शोधांची माहिती पोहोचवली पाहिजे या ध्येयाने प्रा. गो.रा. परांजपे यांनी 'सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ सायंटिफिक नॉलेज' या संस्थेमार्फत हे मासिक सुरू केले. प्रारंभी त्यांनी वैज्ञानिक विषयांवर व्याख्याने आयोजित केली. परंतु ही माहिती लिखित स्वरूपात द्यावी म्हणजे संग्रही राहील, असे मत श्रोत्यांनी मांडल्याने त्यांनी मासिक प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. हे मासिक आजही सुरू आहे. मात्र असे असले तरी या साऱ्या नियतकालिकांतून भारतीय विज्ञान किती मांडले गेले याबाबत शंकाच आहे. अन्यथा मोबाइलसारखे आज अवघे विश्व व्यापून उरलेले उपकरण ज्या आधारावर चालते ती विद्युतचुंबकीय प्रारणांचा संदेशवहनाकरिता उपयोग करण्याची कल्पना प्रयोगांतून सर्वांत आधी सिद्ध करणारा शास्त्रज्ञ भारतीय होता, जगदीशचंद्र बोस यांनी हे करून दाखविले होते, हे आजच्या घडीला मुद्दामहून सांगण्याची वेळ आली नसती. ज्या अनेक भारतीय शास्त्रज्ञांना ब्रिटिशांच्या भेदभावपूर्ण वागणुकीचा फटका बसला त्यांच्या गाथा सर्वसामान्यांपर्यंत कधीच पोहोचल्या असत्या. दुर्दैवाने हे झालेले दिसत नाही.

सुरुवातीला प्रामुख्याने निबंधांच्या किंवा माहितीपर लेखांच्या स्वरूपात असलेले विज्ञानविषयक लेखन मधल्या काळात सृजनशील साहित्याच्या स्वरुपातही मराठीमध्ये दिसू लागले. 'केरळ कोकीळ' या वृत्तपत्रात संपादक कृष्णाजी नारायण आठल्ये प्रख्यात इंग्रजी लेखक ज्यूल्स व्हर्न यांच्या विज्ञानकथांचे अनुवाद क्रमशः प्रसिद्ध करीत असत. जून १९००च्या अंकापासून 'टू द मून अँड बॅक' या कथेचा अनुवाद 'चंद्रलोकाची सफर' या नावाने प्रसिद्ध होण्यास सुरुवात झाली आणि पुढील सहा वर्षे विज्ञानकथांच्या अनुवादाचा हा उपक्रम चालू राहिला. इंग्रजीमध्ये पहिली विज्ञानकथा १८१८ साली प्रसिद्ध झाली. तर, मराठी भाषेतली पहिली स्वतंत्र विज्ञानकथा १९११ साली प्रसिद्ध झाली. श्रीधर रानडे यांची 'तारेचे हास्य' ही ती कथा. त्यानंतर १९१४ साली वा.म. जोशी यांच्या 'अप्रकाशित किरणांचा दिव्य प्रकाश' आणि 'वामलोचना' या दोन विज्ञानकथा प्रसिद्ध झाल्या. अशा रीतीने मराठीमध्ये ग्रंथप्रकाशनाची सुरुवात (१८२२) झाल्यानंतरच्या पहिल्या शे-सव्वाशे वर्षांतील विज्ञानसाहित्याची स्थिती ही अशी उत्साहवर्धक होती.

दिल्लीतील विज्ञानप्रसार आणि मुंबईतील मराठी विज्ञान परिषद या संस्थांच्या प्रयत्नांतून या काळातील प्रातिनिधिक लेखांचे संकलन 'मराठीतील विज्ञानविषयक लेखन - १८३० ते १९५०' या नावाने दोन खंडांत प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. एकूण ९८१ लेखांचा अंतर्भाव या खंडामध्ये केलेला असून पहिल्या खंडात जीवशास्त्र, ॲलोपथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, आरोग्य, कृषी, भूशास्त्र, भूगोल या विषयांवर; तर दुसऱ्या खंडात खगोलशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र, अभियांत्रिकी, वस्त्रशास्त्र, संगीतशास्त्र इत्यादी विषयांवरचे लेख आहेत. ज्या नियतकालिकांमध्ये हे लेख

प्रसिद्ध झाले त्यापैकी ७५ टक्के नियतकालिके बंद पडली आहेत. काही लेख परदेशी स्थायिक झालेल्या मराठी लेखकांनी लिहिलेले आहेत. निव्वळ विज्ञानप्रसाराच्या ध्येयाने केलेले हे सारे लिखाण आहे. याच काळात विज्ञानविषयक अनेक ग्रंथाची निर्मितीही मराठीमध्ये झाली. त्यांचा हेतूही प्रामुख्याने ज्ञानप्रबोधनाचाच दिसतो.

दोन महायुद्धांचा आणि त्या दरम्यानचा काळ प्रचंड धामधुमीचा, राजकीय जागृतीचा, आंदोलनांचा आणि तंत्रज्ञानाने जीवन व्यापून टाकले जाण्याची सुरुवात होण्याचा होता. या काळात जगभर विज्ञान-तंत्रज्ञानावर आधारित जीवनशैलीचा वेगाने विकास झाला. या काळात मराठी भाषेत विविध नियतकालिके सुरू झाली आणि स्थिरावली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५० च्या दशकात विज्ञानाविषयी जाणून घेण्याची मोठी ओढ निर्माण झाल्याचे दिसते. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी अमेरिकेने जपानवर टाकलेले अणुबॉम्ब आणि १९५० चे दशक संपतासंपता स्पुटनिक अंतराळयान सोडून रशियाने अवकाशसंशोधनाच्या क्षेत्रात घेतलेली झेप या दोन घटनांनी वेग आणि विशेषीकरण ही वैशितघँघ असलेल्या नव्या युगाची नांदी झाली. त्याचे प्रतिबिंब साहित्यव्यवहारातही पडले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शालांत परीक्षेच्या स्तरापर्यंत विज्ञानशिक्षण सक्तीचे बनले. त्यामुळे विज्ञानविषयक लेखनाच्या वाचकवर्गात अचानकच मोठी भर पडली. या वाचकांच्या सोयीसाठी मराठी भाषेमध्ये विज्ञान परिभाषाकोश तयार करण्याचे काम केंद्र व राज्य सरकारांनी सुरू केले. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. पुढच्याच वर्षी महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना झाली. मंडळाने या कोशनिर्मितीला हातभार लावला. विश्वकोशाचे कामही याच सुमाराला सुरू झाले. त्याने विविध विषयांवरची अद्ययावत माहिती मराठीमध्ये वाचकांना उपलब्ध होण्याची शक्यता वाढली. वैज्ञानिक विषयांवरच्या काही ग्रंथांची निर्मिती मंडळाने केली. १९६९ मध्ये सुरू झालेल्या विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाने महाविद्यालयीन पाठ्यपुस्तकांचे मराठीतून लेखन करवून घेतले. त्यामुळे पदवी परीक्षेपर्यंतच्या अभ्यासक्रमाची वैज्ञानिक विषयांवरील पाठ्यपुस्तके मराठीतून उपलब्ध होऊ लागली. या साऱ्या प्रयत्नांतून मराठी भाषेतील वैज्ञानिक वाङ्मयनिर्मितीला मोठी चालना मिळाली. अमेरिकी सरकारच्या माहिती विभागाने (युसिस) याच काळात मराठी लेखक आणि प्रकाशकांना उत्तम अमेरिकी ग्रंथांचे अनुवाद मराठीतून प्रकाशित करण्यास प्रोत्साहन दिले. त्यातूनही काही चांगल्या ग्रंथांची निर्मिती झाली. दरम्यान, महाराष्ट्र शासनानेही वार्षिक राज्य पुरस्कारांच्या रूपाने उत्तम मराठी ग्रंथ व लेखकांचा गौरव करण्याची प्रथा सुरू केली. त्यात वैज्ञानिक लेखनाचाही अंतर्भाव असल्यामुळे ही प्रथा मराठीतील वैज्ञानिक लेखनाला प्रोत्साहक ठरली. अशा सर्व प्रयत्नांतून मराठी विज्ञान वाङ्मय १९५० पूर्वीच्या मानाने चांगले समृद्ध झाले.

ही समृद्धी केवळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मकही होती. सुरुवातीला साहसकथा किंवा परीकथांच्या परिघावर असणारे विज्ञानसाहित्य हळूहळू वैज्ञानिक संकल्पनांचा जास्तीत जास्त वापर करू लागले. कल्पनाविलासाला असलेला विज्ञानाचा आधार घट्ट होऊ लागला. विज्ञानातील आणि तंत्रज्ञानातील प्रगतीची नवनवी शिखरे काबीज होऊ लागली तसतसे त्यांचे पडसाद विज्ञानसाहित्यात उमटू लागले. विज्ञानाच्या अंगाने भविष्याचा वेध हा बराच काळ अनेकांचा लेखनासाठी आवडीचा विषय होता. वैज्ञानिक प्रगतीसोबत तो अधिक नेमका होत गेला. या स्थित्यंतरात साहित्याचा घाट आणि शैली बदलू लागली. सुरुवातीच्या माहितीपर लेखनातल्या आकृत्यांची जागा चित्रे आणि हास्यचित्रांनी घेतली. पुस्तकांची मुखपृष्ठे आकर्षक बनली. १९६० आणि ७० च्या दशकांत विज्ञानसाहित्य प्रामुख्याने अवकाश, अंतराळशास्त्र आणि खगोलीय घटनांभोवती केंद्रित राहिले. कृत्रिम अंतराळयाने, माणूस चंद्रावर उतरणे, अंतराळातून प्रयोगशाळा पडणे, धूमकेतू, खग्रास सूर्यग्रहण, कृत्रिम अवयव आणि अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया यांसोबतच हेरगिरी, ऊर्जेची उपलब्धता, अमरत्व, टेलीपथी, संगणकच्या करामती, कृत्रिम बुद्धिमत्ता, लैंगिक शिक्षण, परग्रहावरील जीवसृष्टी, नवनवीन अस्त्रांचा उपयोग आदी त्या काळात वैज्ञानिक चर्चेच्या परिघात असलेले विषय साहित्यातूनही हाताळले जायला लागले, त्याचे विविध कंगोरे त्यातून सर्वसामान्यांसमोर यायला लागले.

मराठी भाषेतून विज्ञानप्रसाराकरिता १९६६ मध्ये मराठी विज्ञान परिषदेची स्थापना झाली. परिषदेच्या सुरुवातीच्या अनेक उपक्रमांपैकी एक उपक्रम विज्ञानकथांची स्पर्धा हा होता. त्यातून अनेक नवे विज्ञानकथालेखक घडले. डॉ. नारळीकरांसारख्या जगन्मान्य वैज्ञानिकाने विज्ञान सोपे करून समजावून सांगण्याच्या हेतूने याच काळात विज्ञानकथालेखनाच्या क्षेत्रात प्रवेश केला. त्यांच्या प्रयत्नांचा दुर्गाबाई भागवत आणि पु.ल. देशपांडे यांच्यासारख्या प्रस्थापित साहित्यिकांनी मोठा गौरव केला. दुर्गाबाईंनी

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषाणात प्रथमच विज्ञानसाहित्याचा उल्लेख करत मराठी साहित्यविश्वाकतील विज्ञानसाहित्याचे मोल अधोरेखित केले. किर्लोस्कर, उद्यम, विज्ञानयुग, नवल यांसारखी मासिके नियमीतपणे विज्ञानविषयक लेखन प्रसिद्ध करीत होतीच. प्रा. भालबा केळकर, भा. रा. भागवत यांनी लहान मुलांसाठी भरपूर विज्ञानलेख, कथा लिहिल्या, अनेक इंग्रजी कादंबऱ्यांचे अनुवाद केले. त्यातून काही काळ विज्ञान साहित्य हे बालसाहित्यापुरते मर्यादित आहे की काय, असे वाटण्याजोगी परिस्थितीही उद्‌भवली. मात्र, हळूहळू विज्ञानसाहित्य आशय, शैली, परिणाम आदी सर्वंच अंगांनी समृद्ध होऊ लागले. विज्ञान व वैज्ञानिक साहित्य यांबद्दलचे आकर्षण विज्ञानकथांमुळे वाढीस लागले.

१९७० नंतर तंत्रज्ञानाची घोडदौड सुरू झाली. त्याचे प्रतिबिंब विज्ञान कथांमध्ये उमटू लागले. ट्रान्झिस्टरची जागा मायक्रोचिपने घेतली, हा तंत्रज्ञानातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता. यामुळे विविध यंत्रांतील विद्युतमंडलांचा आकार अगदी सूक्ष्म पातळीवर गेला. यंत्रे आटोपशीर झाली. यातून कृत्रिम बुद्धिमत्तेची कल्पना उदयास आली. विज्ञान–साहित्यिकांना कल्पनेचा फुलोरा फुलवण्यासाठी आणखी एक विषय मिळाला. यंत्रमानव ही कल्पना अगदी दुसऱ्या महायुद्धकाळापासून पाश्चात्त्य विज्ञानकथांतून राबवली जात होती. मराठीत ती थोडी उशिरानेच आली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भा.रा. भागवत आणि नारायण धारप यांनी ही कल्पना वापरून मराठीत यंत्रमानवांना प्रवेश मिळवून दिला. आयझॅक ॲसिमॉव यांच्या कथांतून प्रेरणा घेऊन निरंजन घाटे यांनी यंत्रमानवांना भारतीय संस्कृतीत बसवले. नंतरच्या काळातही अनेक लेखकांनी यंत्रमानव ही कल्पना त्यांच्या साहित्यात वापरली. असे असले तरी, सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनातील घडामोडींना, मानवी क्रियाकलापांना आणि मनोव्यापारांना मराठी विज्ञानकथांमध्ये फार स्थान नव्हते. १९७८ मध्ये ल्युसी या जगातील पहिल्या नलिका बालिकेचा जन्म झाला. त्यानंतर सुमारे दहा वर्षांनी फुटवा (क्लोन) पद्धतीने गर्भधारणा झालेल्या डॉली या मेंढीचा जन्म झाला. या दोन घटनांमुळे विज्ञानकथांचा रोख जीवशास्त्राकडे वळायला मदत झाली. त्यातून मानवी भावभावनांचे कंगोरे, दैनंदिन जीवनातील विज्ञानाची वीण यांना विज्ञानकथांमध्ये हळूहळू स्थान मिळू लागले. सरोगसीसारख्या विषयांमुळे अशा शास्त्रीय घडामोडींना असलेली कायद्याची बाजू आणि त्यातील गुंतागुंतही लोकांसमोर आली. त्यातून विज्ञान–साहित्याला एक मोठा नवा विषय मिळाला. आरोग्य सुविधांच्या उपलब्धतेमुळे वयोमान वाढले. विज्ञान–तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे नवनव्या शक्यता निर्माण होऊ लागल्या. त्यातून सर्वसामान्यांचे त्याबाबतचे कुतूहल वाढले. ते शमवण्यासाठी विविध पर्याय वापरले जाऊ लागले. कथा, नाटके, कादंबऱ्या, कविता, एकांकिका, नभोनाट्ये अशा विज्ञानसाहित्याच्या वेगवेगळ्या प्रकारांवर काम होऊ लागले. नारळीकरांव्यतिरिक्त निरंजन घाटे, डॉ. बाळ फोंडके, लक्ष्मण लोंढे, सुबोध जावडेकर, द.पां. खांबेटे, नारायण धारप, दि.बा. मोकाशी, गजानन क्षीरसागर, रत्नाकर मतकरी, अरुण मांडे, मेघश्री दळवी यांसारख्या अनेक लेखकांच्या कथा, कादंबऱ्या, नाटके यांतून हा प्रवाह बळकट होत गेला आणि मराठी विज्ञानसाहित्याचे दालन समृद्ध होत गेले. नारळीकरांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्यांना आणि इतर विज्ञानसाहित्यिकांना राज्य पुरस्कार मिळाले. एका अर्थाने मराठी साहित्याच्या उपवनात विज्ञानसाहित्याची वाटिका विकसित होऊ लागली. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने २०१८ साली प्रकाशित केलेल्या ‘मराठी विज्ञान साहित्याचा इतिहास’ या ग्रंथात जयंत एरंडे यांनी मराठी भाषेतील विज्ञान साहित्याच्या हा साऱ्याविविधांगी प्रवासाचा तपशीलवार आढावा घेतलेला आहे.

मानवी अस्तित्वाचा मूलभूत घटक असलेल्या जनुकांचा अभ्यास करण्यासाठीच्या सर्वांत मोठ्या आणि महत्त्वाकांक्षी अशा जिनोम प्रकल्पाची घोषणा १९९५ मध्ये झाली. या प्रकल्पात जगभारतल्या शास्त्रज्ञांचा सहभाग होता. गुणसूत्रांवर कोणती जनुके कोठे असतात, ती कोणतो गुणधर्म प्रकट करतात याचा तपशीलवार अभ्यास या प्रकल्पात केला जाणार होता. माहिती–तंत्रज्ञानातील सुधारणांच्या वेगामुळे हा प्रकल्प निर्धारित वेळेच्या वर्षभर आधीच पूर्ण झाला. आनुवंशिक व्याधींवर उपचारांची शक्यता त्यातून वाढली. प्रकल्पाचे स्वरूप स्पष्ट होताच मराठीमध्ये हा विषय अनेकांनी हाताळला. नव्या वैज्ञानिक कल्पनांचा कशा तऱ्हेने दुरुपयोग होऊ शकतो, याचे चित्र विज्ञानसाहित्यातून सर्वांत आधी पाहायला मिळते, हे वैशिष्ट्य या जिनोम प्रकल्पाच्या निमित्ताने ठळकपणे पुढे आले. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर लगेचच, म्हणजे २००२ मध्ये जनुकीय उपचारांच्या किंवा जनुकबदलांशी संबंधित नैतिक आणि कायद्याच्या गुंतागुंतीच्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी एडवर्ड केनेडी समितीची स्थापना करण्यात आली आणि त्यांच्या सूचनांनुसार जनुकांत ढवळाढवळ करण्यास बंदी करणारा

कायदा अमेरिकेत संमत करण्यात आला. त्यापुढचा टप्पा होता अब्जांश (नॅनो) तंत्रज्ञानाच्या विकासाचा. नव्या सहस्रकात प्रवेश करताना माहिती-तंत्रज्ञान, दूरसंचार, जनुकीय तंत्रज्ञान आणि अब्जांश तंत्रज्ञान यांनी दैनंदिन मानवी जीवनात तोवर कधीही झाले नव्हते एवढे बदल घडवून आणण्यास सुरुवात केली. या बदलांची व्याप्ती, खोली आणि परिणामकारकता तोवरच्या अशा स्वरूपाच्या बदलांच्या तुलनेत कितीतरी अधिक होती. त्याचे प्रतिबिंब विज्ञानसाहित्यात उमटणे स्वाभाविक होते. १९९० नंतरच्या काळात अनेक नवनव्या लेखक-लेखिकांनी मराठी विज्ञान साहित्याचे दालन समृद्ध झाले. त्यांतले अनेक जण विज्ञान-तंत्रज्ञानात उच्चशिक्षण घेतलेले होते. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्यरत असलेले होते. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन अनुभवातील विज्ञान त्यांच्या लेखनातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला लागले. निव्वळ कल्पनांवर अवलंबून राहण्याऐवजी अनुभवांच्या आधारावर त्यांच्या लेखनाचा वृक्ष बहरू लागला. त्यानंतरच्या काळात म्हणजे साधारणतः २००० नंतरच्या काळात कॉमिक्स, ग्राफिक - म्हणजे चित्रित कादंबऱ्या आणि हॉलीवूडपटांचा मराठीतील विज्ञान-साहित्यावर प्रभाव पडलेला दिसतो.

मराठी विज्ञान परिषद पत्रिका या मासिकाच्या माध्यमातून सातत्याने प्रसिद्ध केले जाणारे विज्ञानसाहित्य, आयोजित केल्या जाणाऱ्या विज्ञानकथास्पर्धा, विज्ञान-साहित्याचा वेगवेगळ्या अंगांनी अभ्यास करणाऱ्या, लेखकांची त्यातील कौशल्ये वाढवण्यास मदत करणाऱ्या कार्यशाळा, या साऱ्यांमुळे विज्ञान लेखक आणि प्रकाशक फक्त मुंबई-पुण्यापुरते मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या सर्व भागांतून साहित्याचा हा प्रवाह सकस होण्यास मदत झाली. त्यासोबत समाजमाध्यमांच्या उदयानंतर सायबर अवकाशात मराठी भाषेतील विज्ञानलेखनाकरिता अनेक नवनवी व्यासपीठे उदयाला आली. कथा, कविता, कादंबऱ्या, नाटिका, कोश अशा विविध प्रकारच्या वैज्ञानिक वाङ्मयाने मराठी साहित्याचे हे दालन समृद्ध झालेले असले तरी त्यात आजही अनेक त्रुटी किंवा कमतरता जाणवतात. त्यातले एक महत्त्वाचे म्हणजे या विज्ञान वाङ्मयाची समीक्षा फार होताना दिसत नाही. मराठी भाषेत समीक्षेचे मोठे समृद्ध दालन असतानाही विज्ञान-साहित्याच्या नशिबी इथे उपेक्षाच दिसते. नाही म्हणायला काही चर्चासत्रांतून मराठी विज्ञानसाहित्याच्या समीक्षेचे प्रयत्न झाले. मात्र त्यालाही आता जवळपास चार दशकांचा काळ उलटून गेला आहे. साहित्याच्या अंगाने विज्ञानलेखनाची समीक्षा होत नसली तरी, एक वेगळा उपक्रम मात्र नव्या पिढीतल्या काही विज्ञानलेखकांनी चालविलेला आहे, त्याचा उल्लेख करणे अगत्याचे आहे. अनेक नव्या लेखकांनी विज्ञानकथा, कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यातल्याच काही लेखकांनी 'साय-फाय कट्टा' या नावाने एक मंच सुरू केला असून त्यावर नियमितपणे भेटीगाठींतून ते आपापल्या कथा-कादंबऱ्या सादर करतात, त्यावर साधक-बाधक चर्चा होते, सुधारणा किंवा बदल सुचविले जातात आणि महत्त्वाचे म्हणजे अनेकदा अशा चर्चांत आलेल्या सूचनांनुसार लेखक आपापल्या कलाकृतीत आवश्यक ते बदल करून त्या अधिक निर्दोष करण्याचा प्रयत्न करतात. ही मोठी आशेची बाब आहे.

मराठीतील विज्ञानसाहित्यासाठी वापरल्या गेलेल्या विविध माध्यमांचा विचार करता चित्रपट या मध्यमाचा वापर फारच कमी प्रमाणात मराठी निर्मात्यांनी केलेला जाणवतो. नाटकांमध्ये मनोविश्लेशणात्मक विषय हाताळले गेले आहेत, वैद्यकीय विषयांवर नाटके सादर झाली आहेत, पण चित्रपटांच्या माध्यमात मराठी भाषेतून विज्ञान कुठे दिसत नाही. दिवाळी अंक हे मराठी भाषेचे एक मोठे वैशिष्ट्य आहे आणि त्यात विज्ञानकथांना राखीव म्हणावे असे स्थान मिळत आहे. हे एकच मोठे समाधान आहे.

एकुणात, स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात गेल्या ७५ वर्षांतील विज्ञानसाहित्याचा विचार करीत असताना, असे लक्षात येते की विज्ञानलेखन ही मराठी भाषेतील बऱ्यापैकी मळलेली वाट असली, तरी साहित्याच्या या सकस प्रवाहाची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणासारख्या मानाच्या पानावर नोंद घेतली जायला स्वातंत्र्यानंतर तीन दशके जावी लागली, तर एका विज्ञानकथालेखकाला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळायला जवळपास साडेसात दशके लागली. आणि एवढे होऊनही साहित्य संमेलनांसारख्या साहित्याच्या सर्वांत मोठ्या उत्सवांमध्ये विज्ञानसाहित्यावर कधी काही चर्चा, वैचारिक आदानप्रदान होताना दिसले का? तर त्याचे नाव नाही! हे सारे काय गौडबंगाल आहे? निबंध, ललित लेख, माहितीपर लेख, कथा, कादंबऱ्या, कविता, नाटक, एकांकिका, श्रुतिका, नभोनाट्ये, कोश, सूची, अनुवाद अशा वेगवेगळ्या प्रकारच्या विज्ञानसाहित्याची मोठी आणि संपन्न परंपरा मराठी भाषेमध्ये पाहायला मिळते. तरीही, मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहापासून विज्ञान अद्याप दूरच असलेले दिसते.

**- अभिजित मुळ्ये**
भ्रमणध्वनी - ९३२११२७७०२



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

अनुवादित साहित्य

•

# मराठी भाषेतील स्वातंत्र्योत्तर भाषांतरे काही सकारात्मक निरीक्षणे

कृष्णा किंबहुने

**भारतात साहित्य अकादेमी आणि नॅशनल बुक ट्रस्ट ह्या साहित्यसंस्थांची अनुक्रमे १९५४ आणि १९५७ ह्या वर्षात झालेल्या स्थापनेपासून आजपर्यंत ह्या दोन्ही संस्था भाषांतरांच्या प्रकाशनात अतिशय महत्त्वाचे योगदान देत आलेल्या आहेत. भारतीय भाषांतल्या साहित्याची अन्य भारतीय भाषांत असंख्य भाषांतरे ह्या दोहोंनाही प्रकाशित केलेली आहेत.**

**मराठी** साहित्येतिहासातला साधारण पस्तीस वर्षांचा कालखंड (१८५०-१८८५) जर 'भाषांतरयुग' म्हणूनच ओळखला जातो आणि तेथपासून ते आजतागायत इतर भाषांतील साहित्यकृतींच्या मराठीत झालेल्या भाषांतरांची संख्या (केवळ संख्या) विचारात घेतली तर ती अद्‌भुत आहे असेच आपल्या लक्षात येते. १८६७ ते १९२० ह्या काळात एकट्या शेक्सपिअरची मराठीत एकूण ७२ भाषांतरे झालेली आहेत. उपरोल्लेखित भाषांतरयुगातच भाषांतराची चांगली परंपरा निर्माण झाल्याचेही आपल्याला दिसते. भाषांतरांबरोबरच भाषांतराची तात्त्विक, उपयोजित समीक्षाही ह्या काळात झालेली दिसते. पण दुर्दैवाने भाषांतर-समीक्षेची परंपरा मात्र पुढे अखंड राहू शकली नाही.

सक्षम भाषांतरे ही लक्ष्य भाषेत, त्या भाषेतील साहित्यात आणि वाचनसंस्कृतीत म्हणजे पर्यायाने एकूण साहित्य-संस्कृतीतच फार भरीव योगदान देत असतात. ही भाषांच्या माध्यमातून अमूल्य सांस्कृतिक देवाणघेवाणच म्हटली पाहिजे. केवळ अभिजात साहित्यकृतींचीच भाषांतरे व्हावीत असा आग्रह असता कामा नये, तर 'लोकप्रिय' साहित्याचीही भाषांतरे आवर्जून व्हायला हवीत असाच

उदार आणि विशाल दृष्टिकोण आपण अंगिकारला पाहिजे. कारण त्यामुळे आपली साहित्याची भाषा, शास्त्रीय भाषा आणि दैनंदिन व्यवहाराची भाषाही वृद्धिंगत होते. सुदैवाने तसा उदार दृष्टिकोण मराठीत असल्याचेही आपल्याला जाणवते. मराठीत भाषांतरे ही अनुवाद, स्वैर अनुवाद, भाषांतर, भावानुवाद, रूपांतर इत्यादी वेगवेगळ्या नावांनी होत आलेली आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या डॉ. वीणा मुळे ह्यांनी केलेल्या मराठी अनुवाद ग्रंथसूची ह्या पुस्तकात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते १९९६ पर्यंत विविध भाषांमधून मराठीत भाषांतरित झालेल्या पुस्तकांची भाषा-विषयनिहाय माहिती आपल्याला मिळते. डॉ. मुळे ह्यांनी केलेली ही अनुवाद-सूची महत्त्वाची आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या अतिशय सक्षम भाषांतरकारांमध्ये सानेगुरुजींचे नाव अगत्याने घ्यावे लागते. १९३० ते १९४७ यादरम्यान सानेगुरुजींना स्वातंत्र्यलढ्यातल्या त्यांच्या सहभागामुळे जवळजवळ आठ वेळेस अटक झाली आणि त्यांना देशातील वेगवेगळ्या ठिकाणी तुरुंगात राहावे लागले. त्रिचनापल्ली येथील तुरुंगात ते तामिळ आणि बंगाली भाषा शिकले. १९३० मध्ये त्यांनी तिरुवल्लुवर ह्यांच्या कुरल ह्या तामिळमधल्या अभिजात ग्रंथाचे भाषांतर संपूर्ण केले आणि १९४८ मध्ये साधनाच्या स्थापनेनंतर हे अप्रतिम भाषांतर पहिल्यांदा प्रकाशात आले. हे भाषांतर करताना सानेगुरुजींनी व्ही. व्ही. एस. अय्यर ह्या कुरलच्या इंग्रजी भाषांतरकार-विद्वानाच्या लेखनाचा अभ्यास आवर्जून केला होता. ह्या मराठी भाषांतराला सानेगुरुजींनी जी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिलेली आहे तिचे महत्त्व भाषांतरसंस्कृतीत अपार आहे. विविध भाषी लोकांशी संपर्कात आल्यानंतर त्यांना देशाच्या सामाजिक-सांस्कृतिक ऐक्यासाठी भाषांतराचे महत्त्व लक्षात येणे, त्यासाठी त्यांनी स्वत: कितीतरी भाषा शिकण्याचा ध्यास जोजवणे, स्वतः भाषांतरे करणे आणि ह्या यत्नांतून आंतरभारतीची संकल्पना वास्तवात आणण्यासाठी झटणे ही मूल्ये त्यांनी आपल्या भाषांतरसंस्कृतीला दिलेली देणगी आहे. सानेगुरुजींनी रवींद्रनाथ ठाकूर, लिओ टॉलस्टॉय ह्यांच्याही साहित्याची भाषांतरे केली. त्यांनी केलेली आणखी दोन आदर्श आणि अतिशय महत्त्वाची भाषांतरे म्हणजे पं. जवाहरलाल नेहरूंच्या The Discovery of India चे भारताचा शोध आणि Will Durrant च्या The Story of Philosophy ह्या ग्रंथाचे पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाची कहाणी.

कर्तव्य मानून निष्ठेने भाषांतरे करणाऱ्या भाषांतरकारांत मामा वरेरकरांचे नाव विचारात घ्यावे लागते. बंगाली भाषेतील विपुल कथा आणि कादंबऱ्यांची त्यांनी मराठीत भाषांतरे केली आणि मराठी वाचकांना बंगाली साहित्य आणि संस्कृतीचा परिचय करून दिला. शरत्चन्द्र चॅटर्जींच्या चंद्रनाथ, श्रीकांत, विराज-वाहिनी, शेषप्रश्न, चरित्रहीन आदी, बंकिमचंद्र चॅटर्जींच्या आनंदमठ, कपालकुंडला, चंद्रशेखर, दुर्गेशनंदिनी आणि प्रभातकुमार मुखर्जींच्या रत्नदीप, सत्याबाला, षोडशी, एकादशी इत्यादी साहित्यकृती त्यांनी मराठीत आणल्या. आज वाचताना ही भाषांतरे जरी कमअस्सल वाटली तरी ज्या काळात ती प्रकाशित झाली तेव्हाचे त्यांचे महत्त्व आणि त्यांचा पडलेला प्रभाव आपल्याला अजिबात डावलता येत नाही. ह्याबरोबरच दुर्गा भागवत ह्यांनी केलेल्या भारतामधल्या विविध प्रांतांतल्या लोककथांची, व्ही. फॉसबोल ह्यांनी संपादित केलेल्या पाली जातककथांच्या आधाराने मराठीत आणलेले सिद्धार्थ जातक आणि हेन्री डेव्हिड थोरोच्या साहित्यकृतींची व्हॉल्डनकाठी विचार विहार आणि चिंतानिका ह्या मराठी भाषांतरांचे महत्त्व मान्य करावे लागते. ह्या निवडक प्रातिनिधिक भाषांतरांना मिळालेला प्रतिसाद विचारात घेतला तर भाषांतरित साहित्यात मराठी वाचकांना रस, उत्सुकता आहे असे निश्चितच म्हणता येते. म्हणजेच मराठी साहित्यातून जे अनुभवाला आलेले नाही ते अन्य भाषांतून मराठीत आलेल्या साहित्यातून मिळवण्याची जिज्ञासा ही मराठी वाचकसंस्कृतीची जमेची बाजू ठरते.

भारतात साहित्य अकादेमी आणि नॅशनल बुक ट्रस्ट ह्या साहित्यसंस्थांची अनुक्रमे १९५४ आणि १९५७ ह्या वर्षात झालेल्या स्थापनेपासून आजपर्यंत ह्या दोन्ही संस्था भाषांतरांच्या प्रकाशनात अतिशय महत्त्वाचे योगदान देत आलेल्या आहेत. भारतीय भाषांतल्या साहित्याची अन्य भारतीय भाषांत असंख्य भाषांतरे ह्या दोहोंनाही प्रकाशित केलेली आहेत.

मराठीत १९६० नंतर पुन्हा दर्जेदार भाषांतराची लाट आल्याचे दिसते. देशी आणि परदेशी साहित्याचा परिचय मराठी वाचकवर्गाला होत जाण्याचा वेग वाढला. १९६० पासून ते आजपर्यंतच्या काळाच्या विविध टप्प्यांमध्ये विंदा करंदीकर (इंग्रजी साहित्य), अशोक शहाणे (बंगाली साहित्य), दिलीप पुरुषोत्तम चित्रे (जगभरातील विविध भाषांमधले साहित्य), अरुण कोलटकर (ॲलन गिन्सबर्गच्या कविता), निशिकांत ठकार (हिंदी साहित्य), चंद्रकांत

पाटील (हिंदी आणि इतर भारतीय भाषांतील साहित्य), प्रकाश भातंब्रेकर (हिंदी साहित्य), दामोदर खडसे (हिंदी साहित्य), चंद्रकांत भोंजाळ (हिंदी साहित्य), लक्ष्मीनारायण बोल्ली (तेलुगु साहित्य), मृणालिनी गडकरी (बंगाली साहित्य), वीणा आलासे (बंगाली साहित्य), धनश्री हळबे (मल्याळम साहित्य), उमा कुलकर्णी (कन्नड साहित्य), राम पंडित (उर्दू साहित्य), विलास गिते (बंगाली साहित्य), नीति बडवे (जर्मन साहित्य), नीलिमा भावे (बंगाली साहित्य), श्रीप्रकाश अधिकारी (तामिळ साहित्य), शांता गोखले (इंग्रजी साहित्य), शारदा साठे (इंग्रजी साहित्य), मुग्धा कर्णिक (इंग्रजी साहित्य), विद्या शर्मा (आसामी साहित्य), लीना सोहोनी (इंग्रजी साहित्य), रंजना पाठक (बंगाली साहित्य), कविता महाजन (हिंदी साहित्य), छाया महाजन (इंग्रजी साहित्य), मनोहर चंपानेरकर (इंग्रजी साहित्य), जयप्रकाश सावंत (हिंदी साहित्य), सूर्यनारायण रणसुभे (हिंदी साहित्य), वसंत केशव पाटील (हिंदी आणि अन्य भाषांतील साहित्य), (भास्कर लक्ष्मण भोळे (उर्दू आणि जगातील काही भाषांमधील साहित्य), अनघा भट (रशियन साहित्य), जयंत धुपकर (फ्रेंच साहित्य), संजय भास्कर जोशी (इंग्रजी साहित्य), बलवंत जेऊरकर (हिंदी साहित्य) यांसारख्या सक्षम भाषांतरकारांनी दिलेले योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. ह्या भाषांतरकारांच्या देशी आणि परदेशी भाषांमधून मराठीत केलेल्या वेगवेगळया साहित्यप्रकारांतल्या उत्कृष्ट साहित्यकृतींमुळे आपल्या साहित्याभिरुचीवर निश्चितच चांगला संस्कार झाला.

भाषांतराच्या संदर्भात काही बाबी अतिशय महत्त्वाच्या ठरतात. जसे, स्रोत भाषा आणि लक्ष्य भाषा या दोन्ही भाषांची उत्तम जाण, भाषांतर थेट करत आहोत की एखाद्या तिसऱ्या माध्यम भाषेतून करीत आहोत, भाषांतर कशाचे करीत आहोत – त्या मूळ कृतीचे तिच्या भाषेतील साहित्य परंपरेत काय योगदान आहे आणि आपल्या भाषेत ह्या कृतीमुळे काय भर पडणार आहे ह्याची पूर्ण समज असणे. ही समज असण्यातच आपण त्या विशिष्ट साहित्यकृतिचे भाषांतर का करतो आहोत ह्या स्वाभाविक प्रश्नाचे उत्तर अनुस्यूत आहे. त्यानंतरची महत्त्वाची बाब म्हणजे ते भाषांतर आपण कसे करीत आहोत ही. अतिशय सक्षम भाषांतराच्या माध्यमातून एका भिन्न संस्कृतीशीच आपला अंशतः परिचय आपल्या भाषेतून आपल्याला होत असतो, म्हणूनच भाषांतरकाराचे काम हे तारेवरच्या कसरतीसारखेच ठरते, विलक्षण सावधपणाचे, जबाबदारीचे आणि भाषांवरच्या प्रभुत्वाचे.


मराठीत महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मेहता पब्लिशिंग हाऊस, आंतरभारती, पद्मगंधा प्रकाशन, सायन प्रकाशन, पॉप्युलर प्रकाशन, लोकवायय गृह प्रकाशन, साकेत प्रकाशन, साक्षात प्रकाशन, मनोविकास प्रकाशन, डायमंड पब्लिकेशन्स, शब्द प्रकाशन, कॉन्टिनेन्टल प्रकाशन इत्यादी अग्रगण्य प्रकाशन संस्थाही उत्साहाने भाषांतरित साहित्यकृती प्रकशित करीत आहेत, ही भाषांतरित साहित्यासाठी आणि मराठी वाचकांसाठी आश्वासक गोष्ट आहे. आजपर्यंतची मराठीतील भाषांतरे ही संख्येने विपुल आहेत, उत्कृष्ट दर्जा विचारात घेऊनही ती संख्यने बरीच म्हणता येतील अशी आहेत, ही निश्चितच पुढच्या प्रवासाला प्रोत्साहन देणारी गोष्ट आहे.

भाषांतरकलेबद्दल असलेल्या विवेचनात्मक/ संशोधनात्मक/ समीक्षणात्मक महत्त्वाच्या प्रकाशित साहित्यामध्ये आपण – भाषांतर चिकित्सा – डॉ मधुकर मोकाशी, भाषांतरविद्या : स्वरूप आणि समस्या – संपादक : रमेश वरखेडे, भाषांतर शास्त्र की कला? – म.वि. फाटक आणि रजनी ठकार, बहुभाषिकतेतून भाषांतराकडे – नीति बडवे, भाषांतर प्रसंग – निशिकांत ठकार, भाषांतर मीमांसा – संपादक : डॉ कल्याण काळे आणि डॉ अंजली सोमण ह्या ग्रंथांचे आणि ह्यांशिवाय कवितेचे भाषांतर – दिलीप पुरुषोत्तम चित्रे, नवभारत, वर्ष ३६, अंक ७, एप्रिल १९८३, अभिजात साहित्याचे भाषांतर – लक्ष्मणशास्त्री जोशी, नवभारत, वर्ष ३६, अंक ४, जानेवारी १९८३, भाषांतरमीमांसेचे स्वरूप – भालचंद्र नेमाडे, नवभारत, वर्ष ३६, अंक ११, ऑगस्ट १९८३ – ह्यांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

मराठीतल्या स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या भाषांतर क्षेत्रातले असे चित्र आश्वासक वाटते.

**– कृष्णा किंबहुने**

भ्रमणध्वनी – ९९८७२१४६१५





स्वातंत्र्योत्तर
मराठी
साहित्याची
वाटचाल

•

**समीक्षा**

•

# स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षा वैविध्यपूर्ण आणि समृद्ध वाङ्मयप्रवाह

**डॉ. राजेंद्र नाईकवाडे**

**स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेचा म्हणजे एकप्रकारे आधुनिक मराठी समीक्षेचाच विचार करताना आपला भारतीय वारसा आणि विशेषतः इंग्रजकाळात आलेला परकीय प्रभाव ह्यांच्या संयोगातून ह्या समीक्षा-विचाराची जडणघडण झालेली दिसते. त्यामुळे ह्या संयोगाच्या सदंर्भातील काही महत्त्वपूर्ण विचारव्यूह पार्श्वभूमीसारखे लक्षात घेणे अगत्याचे आहे. डॉ. गणेश देवी ह्यांनी त्यांच्या 'स्मृतिभ्रंशानंतर' या पुस्तकात भारतीय साहित्यसमीक्षेपुढील ज्या एका प्रमुख प्रसंगाचा निर्देश केला असून त्यास 'सांस्कृतिक स्मृतिभ्रंश' असे सार्थ नाव दिले आहे, तो मुद्दा स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेचा विचार करतानाही महत्त्वपूर्ण ठरतो.**

**'साहित्यसमीक्षा'** ही वाङ्मयव्यवहारातील एक महत्त्वपूर्ण ज्ञानशाखा म्हणून विकसित आणि प्रस्थापित झाली आहे. साहित्यसिद्धांत, साहित्यसमीक्षा आणि साहित्येतिहास या तीन गोष्टींना साहित्यमीमांसेत (किंवा व्यापक अर्थाने साहित्यसमीक्षाव्यवहारात) स्थान देऊन त्याविषयीची विस्तृत मांडणी वेलेक आणि वॉरेन यांनी आपल्या Theory of literature (साहित्यसिद्धांत, अनु. स. गं. मालशे) या ग्रंथात केलेली दिसते. साहित्याची तत्त्वे नि कसोट्या यांचा अभ्यास म्हणजे साहित्यसिद्धांत व प्रत्यक्ष साहित्यकृतीचा अभ्यास (मग तो कालक्रमानुसार रचलेल्या ग्रंथमालिकेचा असो वा सुट्या साहित्यकृतीचा) म्हणजे साहित्यसमीक्षा (पृ. ३२) असा अर्थ वेलेक-वॉरेन करतात. 'समीक्षे'त नेमके काय अंतर्भूत हवे आणि काय अपेक्षित आहे, यावरही मराठी साहित्यसमीक्षेच्या आधुनिक काळातील शंभर वर्षांच्या इतिहासक्रमात बराच खल झालेला दिसतो. 'आधुनिक समीक्षासिद्धांत' ह्या मालशे-जोशी ह्यांच्या अलीकडील ग्रंथात 'साहित्यसिद्धांत' असा समावेशक शब्द न वापरता 'समीक्षेसाठी उपयोजिले जाणारे सिद्धांत' या अर्थी 'समीक्षा-सिद्धांत' असा शब्दप्रयोग केला आहे. गंगाधर पाटील यांनी

त्यांच्या 'समीक्षामीमांसा' या पुस्तकात सार्वत्रिक निकषाची आकांक्षा धरणारा व यथोचित शब्दांतून प्रकट होणारा साहित्य/साहित्यकृतीविषयीचा रसिकाचा ज्ञानगर्भ व मूल्यगर्भ अभिप्राय/प्रतिसाद. (पृ. ६), अशी व्याख्या करून आस्वादातून सर्व प्रकारची समीक्षा स्फुरते म्हणून आस्वाद हा सर्व समीक्षेचा पाया असे मानले आहे. साहित्यकृतीचे वाचन, विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन व शब्दांकन ही साहित्यसमीक्षेची पाच प्रमुख अंगे किंवा समीक्षाव्यवहाराच्या पायऱ्या मानता येतात. या विविध मतांमध्ये 'साहित्यसिद्धांत' व 'साहित्यसमीक्षा' असे दोन ठळक भाग करून विचार करणे अधिक इष्ट व नेमके ठरते.

**तात्त्विक (सैद्धांतिक) आणि उपयोजित : काही सूत्रे**

भारतीय आणि पाश्चात्त्य साहित्याच्या इतिहासासोबतच साहित्यशास्त्राचे किंवा विविध साहित्यसिद्धांतांचेही इतिहास निर्माण झालेले दिसतात. बऱ्याचदा साहित्यकृतीच्या निर्मितीतच सिद्धांतांचीही निर्मिती अनुस्यूत असते. साहित्यनिर्मिती आणि तद्विषयक सार्वकालिक तत्त्वांची म्हणजे सिद्धांतांची निर्मिती ही परस्परजीवी असणारी प्रक्रिया असून भारतीय साहित्याला ह्याची एक गौरवशाली आणि समृद्ध अशी परंपरा लाभली आहे. त्यामुळे एकविसाव्या शतकारंभी आज मराठी-भारतीय भाषेत साहित्यसिद्धांतांची चर्चा करणे, ही नवी किंवा अपूर्वाईची गोष्ट ठरत नाही. भारतीय साहित्यशास्त्राच्या आणि त्याअंतर्गत येणाऱ्या विविध साहित्यविषयक सिद्धांतांच्या प्रकाशातच ह्याविषयीची चर्चा करणे इष्ट व आवश्यक ठरते. भारतीय साहित्यशास्त्रांतर्गत येणाऱ्या रस, अलंकार, ध्वनी, रीती आदी संकल्पनांप्रमाणेच आधुनिक काळातही मराठी भाषेत त्याआधारे वा पाश्चात्त्य संकल्पनांशी त्यांचा समन्वय साधत नवे सिद्धांतन झालेले दिसते. जुन्या तत्त्वांचे समीक्षेसाठी विपुल प्रमाणात उपयोजन करण्याचा किंवा ही जुनी तत्त्वे नव्या स्वरूपात मांडण्याचा प्रयत्नही अनेक विद्वानांनी मराठीत केलेला दिसतो. रा.शं. वाळिंबे, मा.गो. देशमुख, के.ना. वाटवे, गुरुदेव रानडे, शं.दा. पेंडसे, द.भि. कुलकर्णी, त्र्यं.वि. सरदेशमुख इत्यादी अनेकांनी भारतीय संकल्पनांचे प्रभावी उपयोजन समीक्षेसाठी वा वाङ्मयीन मूल्यमापनासाठी केलेले दिसते. मात्र ह्या उपयोजनात विविध सिद्धांतांचा, तत्त्वांचा समन्वय करण्याचे किंवा आवश्यकतेनुसार त्यांचा वापर करण्याचे धोरण साऱ्यांनी बाळगलेले दिसते. एखाद्याच सिद्धांताच्या आधारे एखाद्या वाङ्मयीन प्रवाहाचे वा साहित्यकृतीचे विश्लेषण करण्याची प्रवृत्ती मात्र क्षीण आहे. आधुनिक काळातही काही नवे सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. यामध्ये मर्ढेकरांचे म्हटले जाणारे लयसिद्धांत, भावनानिष्ठ समतानतेचा सिद्धांत व वाङ्मयीन महात्मतेचा सिद्धांत (यांपैकी 'लयसिद्धांत' हा प्रमुख असून इतर तात्त्विक कसोट्यांचे स्वरूप उपसिद्धांतांसारखे आहे.), मुक्तिबोधांचा 'मानुषतेचा सिद्धांत', द.ग. गोडसे यांनी मांडलेला 'पोत' सिद्धांत, पाटणकरांनी साहित्याची प्रकृती स्पष्ट करताना मांडलेला 'द्विध्रुवात्मकतेचा सिद्धांत' इत्यादींचा निर्देश करता येईल. ह्यांपैकी 'द्विध्रुवात्मकता' ही संकल्पना साहित्याचा मूल्यनिकष वा साहित्याच्या मूल्यमापनासाठीचा साहित्यसिद्धांत ठरत नाही.

केवळ साहित्याच्या क्षेत्रात साहित्याच्या मूल्यमापनासाठी मांडले गेलेले साहित्यसिद्धांत आणि मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांत कालौघात निर्माण होऊन साहित्याच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेसाठी कसोट्या म्हणून वापरल्या जाणाऱ्या विचारप्रणाली यांत स्पष्टपणे एक सीमारेषा आपल्याला आखता येते. रस, ध्वनी, अलंकार, रीती, शब्दार्थ ह्या भारतीय साहित्यशास्त्रातील संकल्पना कला व साहित्य ह्यांच्या गर्भातून त्यांची तत्त्वे, घटक व निकष म्हणून निर्माण झाल्या. त्याच परंपरेला अनुसरून मराठी लेखकांनी लय, मानुषता, पोत, भावनानिष्ठ समतानता आदी वाङ्मयसापेक्ष संकल्पनांची निर्मिती केलेली दिसते. त्यामुळे मार्क्सवाद, राष्ट्रवाद, देशीवाद, अस्तित्ववाद इत्यादी विचारव्यूहांच्या प्रकाशात मराठी साहित्याचे मूल्यांकन करणाऱ्या प्रवृत्तींचा एक वेगळा प्रवाह व साहित्यसिद्धांत-सापेक्ष साहित्यसमीक्षेचा स्वतंत्र प्रवाह असे दोन भाग करायला हवेत.

वाङ्मयीन मूल्यमापनाचे निकष म्हणून किंवा वाङ्मयाच्या विविध घटकांतून गवसलेली मध्यवर्ती तत्त्वे म्हणून जे साहित्यविचार आधुनिक काळात मांडले गेले, ते उपयोजनाविनाच एकाकी पडून राहिलेले दिसतात. अशा सिद्धांतांच्या संदर्भात संशोधनप्रबंधांच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याचे काही प्रयत्न होताना दिसतात. डॉ. मा.गो. देशमुख, डॉ. के.ना. वाटवे, डॉ. रा.शं. वाळिंबे, डॉ. जयश्री पाटणकर इत्यादींची अनुक्रमे मराठी संतांच्या साहित्यातून प्रकट होणारे साहित्यशास्त्र, रससिद्धांतांचे आधुनिक मानसशास्त्रीय संकल्पनांच्या आधारे विश्लेषण, ज्ञानेश्वरीच्या संदर्भात भारतीय साहित्यशास्त्रातील विविध संकल्पनांचे उपयोजन व 'ध्वनिसिद्धांता'चे आधुनिक साहित्याच्या

अर्थनिर्णयनासाठी व मूल्यमापनासाठी उपयोजन हे काही प्रयत्न मराठीच्या अभ्यासक्षेत्रात महत्त्वाचे ठरले आहेत. डॉ. वसंत कुळकर्णी यांच्या मराठी प्रबंधसूचीचा धांडोळा घेतला असता असे काही अभ्यासप्रकल्प संशोधकांनी साकारलेले दिसून येतात.

काही सिद्धांतांच्या उपयोजनाचा; म्हणजे विशिष्ट तत्त्वांच्या आधारे आधुनिक साहित्याच्या विश्लेषणाचा व मूल्यमापनाचा प्रयत्न करताना अनेक तात्त्विक अडचणींना सामोरे जावे लागते. उदाहरणार्थ, 'समाजभाषाविज्ञान' किंवा 'समाजशास्त्रीय समीक्षापद्धती' ह्या अलीकडे विकसित व लोकप्रिय झालेल्या कसोट्या कादंबरीच्या संदर्भात ज्याप्रमाणे लावल्या जाऊ शकतात, त्याप्रमाणे काव्यासारख्या अधिक आत्मनिष्ठ प्रकारास लावणे सहज-स्वाभाविक ठरत नाही. त्याचप्रमाणे आधुनिक काळात मांडल्या गेलेल्या लय, मानुषता, पोत इत्यादींसारख्या सिद्धांतांची चर्चा मराठी समीक्षेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात झाली; परंतु त्यांचे उपयोजन करण्याचे प्रयत्न झाले नाहीत. जे झाले ते पुरेसे समाधानकारक व यशस्वी ठरले नाहीत, असे दिसून येते.

भाषाविज्ञानाच्या प्रगतीबरोबर भाषिक अंगाने साहित्यकृतीचे विश्लेषण व अर्थनिर्णयन करण्याच्या पद्धतींना महत्त्व मिळू लागले. शैलीवैज्ञानिक समीक्षा, भाषावैज्ञानिक समीक्षा वा शैलीशास्त्रीय समीक्षा अशी विविध नावे त्यास दिली जातात. नावे वेगळी असली तरी घटकतत्त्वे व उद्दिष्टे एकच असल्याचे लक्षात येते. उदाहरणार्थ, डॉ. रमेश धोंगडे यांची पद्धती व डॉ. सुरेश भृगुवार यांची पद्धती यांत थोडाफार फरक असला तरी भाषाशास्त्राचा एक भाग असलेल्या शैलीशास्त्राच्या अंगानेच दोघांचेही विवेचन होते. वैद्यकशास्त्रात विविध शारीरिक अवयवांच्या स्वतंत्र चिकित्सेचे ज्याप्रमाणे महत्त्व असते, तसेच शैलीशास्त्रीय समीक्षा किंवा छंदशास्त्रीय समीक्षा (काव्यातील छंद-वृत्त-लय ह्यांच्या अंगाने केली जाणारी) ह्यांचेही काही एक महत्त्व असते, ह्याचप्रमाणे विविध ज्ञानशाखांच्या आधारे नवनव्या समीक्षापद्धती विकसित करण्याचा प्रयत्न वाङ्मयक्षेत्रात नित्य सुरू असतो. त्यामध्ये मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, चरित्रात्मक, आदिबंधात्मक आदींचा निर्देश करता येईल. मराठीत एकेक समीक्षापद्धती स्वीकारून, त्या आधारे विविध साहित्यकृतींची व एखाद्या साहित्यिकाच्या समग्र साहित्याची समीक्षा करण्याचे व्रत घेतलेले काही समीक्षक दिसतात. त्याचप्रमाणे विविध समीक्षापद्धतींचा व समीक्षादृष्टींचा आधार घेत; त्यांचा समन्वय साधीत साहित्यकृतींचे आकलन व मूल्यमापन करण्याचाही प्रयत्न अनेक जाणते समीक्षक करताना दिसतात. यासंदर्भात डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात, 'समीक्षा- जी केवळ एका पायावर उभी नसते तर तिला गोमेसारखे अनेक पाय असतात... तिला मानसशास्त्र लागतं, मानववंशशास्त्र लागतं, समाजशास्त्र लागतं, इतिहास लागतो, भूगोल लागतो अशा पद्धतीनं समीक्षा चालते. एका समीक्षकाला हे एवढं सगळं येण्याची गरज नाही. पण एकूण मराठी समीक्षा म्हटली तर ती अशी सर्व पायांनी चालली पाहिजे.' (विसाव्या शतकातील मराठी समीक्षा, पृ. १६४)

**स्वातंत्र्योत्तर समीक्षा : एक वैचारिक पार्श्वभूमी**

स्वातंत्र्योतर मराठी समीक्षेचा म्हणजे एकप्रकारे आधुनिक मराठी समीक्षेचाच विचार करताना आपला भारतीय वारसा आणि विशेषतः इंग्रजकाळात आलेला परकीय प्रभाव ह्यांच्या संयोगातून ह्या समीक्षा-विचाराची जडणघडण झालेली दिसते. त्यामुळे ह्या संयोगाच्या सदंर्भातील काही महत्त्वपूर्ण विचारव्यूह पार्श्वभूमीसारखे लक्षात घेणे अगत्याचे आहे. डॉ. गणेश देवी ह्यांनी त्यांच्या 'स्मृतिभ्रंशानंतर' या पुस्तकात भारतीय साहित्य समीक्षेपुढील ज्या एका प्रमुख प्रसंगाचा निर्देश केला असून त्यास 'सांस्कृतिक स्मृतिभ्रंश' असे सार्थ नाव दिले आहे, तो मुद्दा स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेचा विचार करतानाही महत्त्वपूर्ण ठरतो. ही वसाहतवादी ज्ञानमीमांसा विकृत आहे. तिने ह्या विद्रूपीकरणाच्या वसाहतवादी सांस्कृतिक मूल्यांच्या खोट्या चौकटी निर्माण केलेल्या आहेत आणि ज्ञानाची विभागणी श्रेष्ठ ज्ञान (पाश्चात्त्य) आणि कनिष्ठ ज्ञान (भारतीय) अशा स्तरात केलेली आहे. (पृ. २५) भारतातील 'परंपरा' याच्या पारंपरिक अर्थात दोन मूलभूत घटक सामाजिक आहेत, मार्ग-नागर किंवा मुख्य प्रवाहातील परंपरा आणि देशी-प्रादेशिक आणि उपसांस्कृतिक परंपरा. भारतीय संस्कृतीला या दोहोंतील परंपरा आणि देशी-प्रादेशिक आणि उपसांस्कृतिक परंपरा. भारतीय संस्कृतीला या दोहोंतील आदान-प्रदानाचा आणि ताणतणावाचा अतिशय दीर्घ इतिहास आहे. या नातेसंबंधात 'पाश्चात्त्य' परंपरा येऊन आमुलाग्र बदल न होताच त्याचा विचार झाला. अशाप्रकारे आधुनिक भारतीय परंपरा (म्हणजे भारतीय साहित्यसमीक्षेची परंपरा) देशी परंपरा, मार्ग-परंपरा आणि पाश्चात्त्य परंपरा, असा तिहेरी नातेसंबंध आहे; त्यातील प्रत्येक परंपरा उरलेल्या दोहोंशी नानाप्रकारांनी झगडताना आणि सहकार्य करताना आढळते. स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेतील विविध प्रवाहांचा

आणि परिवर्तनांचा वेध घेताना हा विचारव्यूह महत्त्वाचा ठरतो. कारण मराठी समीक्षेतील विविध प्रवाह उपरोक्त तीन धारांच्या अनुबंधांतूनच आकाराला आलेले दिसतात. मराठीतील लौकिकतावादी आणि अलौकिकतावादी साहित्यसमीक्षाच्या विचारांची मांडणीही ह्याच परिप्रेक्ष्यांत समजून घेता येऊ शकते.

आपल्याकडील समीक्षाविचारात देशीय विचारांच्या असलेल्या गंभीर अनुपस्थितीकडे लक्ष वेधताना डॉ. देवी म्हणतात–

वसाहतवादाला मान्य असलेली साहित्यमूल्यांची श्रेणिमूलक संरचना आधुनिक भारतीय समीक्षकांनी स्वीकारलेली आहे. त्यामुळे त्यांना असे वाटते की साहित्यविषयक आणि समीक्षाविषयक खरेखुरे प्रश्न हे पाश्चात्त्य साहित्यपरंपरेतच आढळू शकतात. त्यांच्या मनात न्यूनत्वाची जाणीव दृढमूल झालेली आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, ब्रिटिश, अमेरिकी किंवा रशियन साहित्यात तुकाराम, मीरा आणि कबीर यांच्या संप्रदायांशी किंवा आधुनिक दलित साहित्याशी तुलना करण्याजोगे काहीही नाही. भारतीय साहित्याची स्वतःची अशी महत्ता आहे. पाश्चात्त्य साहित्याचीही त्यांना साजेशा स्वरूपाची महत्ता आहे. परंतु भाषासमीक्षक हे दुर्धर अशा न्यूनत्व भावाने पछाडलेले असल्यामुळे ते ब्रिटिशपूर्व भाषासाहित्याबरोबर भावनिक संबंध गमावू लागलेले आहेत... या समीक्षकांना वाटते की आपल्या जुन्या भाषासाहित्यात अनेक शेक्सपीअर, ड्रायडन आणि फिलिंग असायला हवे होते. परिणामी ते त्यांच्या तुकारामांची, कबीरांची आणि मीरांची उपेक्षा करण्यास प्रवृत्त होतात. (पृ. ७१) ह्या वास्तवाच्या उलट आपल्याकडील भाषिक व सांस्कृतिक वारसा लक्षात घ्यायला हवा.

आधुनिक भारतीय संज्ञेत पाझरत आलेला जो संस्कृतचा वारसा आहे, तो भाषासाहित्य आणि भाषासंस्कृती यांच्या गाळणीतून झिरपलेला आहे. म्हणून संस्कृतचा वारसा आणि भाषांचा वारसा यांकडे एक एकात्म ऐतिहासिक सातत्य म्हणून पाहण्याची गरज आहे. असे न करणे म्हणजे ऐतिहासिक आधार नसलेले भेद निर्माण करणे होय. असे भेद भारतीय समीक्षकाला संदर्भशून्य वैश्विक साहित्यसिद्धांत आणि साहित्येतिहास लेखनपद्धती, या मायाजालावर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करतात. (पृ. ७८) आपल्या समीक्षा–विचारांतील परपुष्टतेची कारणमीमांसा इथे त्यांनी नेमकेपणाने अधोरेखित केलेली दिसते.

**सैद्धांतिक समीक्षेची वाटचाल**

'सैद्धांतिक अथवा तात्त्विक समीक्षा' म्हणजे साहित्याच्या विश्लेषण, मूल्यमापनाच्या नव्या सिद्धांतांची निर्मिती आणि मांडणी. मराठीत ह्या संकल्पनेबाबत थोडी सरमिसळ झालेली दिसते. नव्या साहित्य–सिद्धांतांची निर्मिती आणि मांडणी, २. विविध प्रकारच्या साहित्यिक सिद्धांतांचा परिचय, त्याचे विश्लेषण आणि त्यावर भाष्य. ३. विशिष्ट साहित्य–सिद्धांतांच्या आधारे करण्यात येणारे साहित्यकृतीचे विश्लेषण व मूल्यमापन. अशा तीन भागांत 'तात्त्विक समीक्षा' विभागता येऊ शकते.

**मर्ढेकर आणि त्यांची प्रभावळ**

मर्ढेकरांनी समीक्षालेखनास प्रारंभ खरंतर स्वातंत्र्यपूर्व काळातच केलेला दिसतो. 'आर्ट्स ॲण्ड मॅन' (१९३७), 'वाङ्मयीन महात्मता' (१९४१), 'टू लेक्चर्स ऑन ॲन ॲस्थेटिक ऑफ लिटरेचर (१९४१) आणि 'सौंदर्य आणि साहित्य' (१९४४) असे त्यांचे विचार ग्रंथरूपात प्रसिद्ध झाले. त्यानंतरच्या काळात 'कला आणि मानव' (भाषांतर रा. भि. जोशी १९८३) ह्यात इतर इंग्रजी स्फुट लेख समाविष्ट करण्यात आले. अशाप्रकारे मर्ढेकरांचा संपूर्ण सौंदर्य–साहित्य विचार उपरोक्त दोन पुस्तकांतील साधारण ३०० पृष्ठांच्या मजकुरात सामावलेला दिसतो. अल्पाक्षरत्व हा मर्ढेकरांच्या काव्यलेखनाचा एक विशेष ह्याही लेखनात पाहायला मिळतो. सौंदर्यशास्त्र, (सौंदर्यविचार, सौंदर्यवाचक विधान, सौंदर्यभावना इत्यादी) कलेची फलश्रुती, वाङ्मय आणि सौंदर्यशास्त्र, काव्य आणि सौंदर्यमीमांसा, ललित वाङ्मयकृतीचा घाट, काव्यातील नवीनता, वाङ्मयीन महात्मता, कलेचे माध्यम, साहित्यातील लयतत्त्व, ललितकला म्हणून काव्याचे स्थान व साहित्यसमीक्षा या १०–१२ विषयांची अथवा संकल्पनांची हाताळणी करून एकूण मराठी समीक्षेलाच एक नवे वळण मर्ढेकरांनी लावलेले दिसते. १९५० ते १९६० या कालखंडात साधारणपणे मर्ढेकरकेंद्री अशी चर्चा तात्त्विक समीक्षेच्या व साहित्य–सिद्धांतांच्या क्षेत्रात होत राहिली. त्या अर्थाने मर्ढेकरी साहित्यविचारांचा प्रभाव स्वातंत्र्योत्तर काळातील दोन–तीन दशकाच्या मराठी समीक्षेवर पडलेला दिसतो. त्या अंगाने मराठीतील नवकाव्याचे जनक हे मराठी नवसमीक्षेचेही जनक ठरतात. मर्ढेकरांनी चर्चिलेल्या उपरोक्त विविध संकल्पना त्यांनी त्रोटक, अर्धवट, सूत्ररूपात व स्वतंत्र लेखरूपात मांडल्या. १९५५मध्ये 'सौंदर्य आणि साहित्य' प्रकाशित

झाल्यावर लागलीच १९५६मध्ये वयाच्या ४७व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यामुळे प्रत्येक संकल्पनांवर विस्तारपूर्वक स्पष्टीकरणात्मक लेखन करण्यास त्यास अवधी मिळाला नसावा. त्यामुळे त्यांच्या मांडणीत एकसंधतेचा अभाव उत्तरकालीन समीक्षकांना जाणवला. अनेक ठिकाणी रिकाम्या जागा व खाचखळगे जाणवले. सर्वच सिद्धांतांच्या मांडणीत अपूर्णता जाणवली. त्यामुळेच त्यावर पुढीलांनी मर्ढेकरांच्या उणिवा व विसंगती दाखवत स्वतंत्र ग्रंथ लिहिले. रसाळांच्या मते रा.भा. पाटणकरांचा अपवाद वगळल्यास बहुतेक सर्वांनी मर्ढेकरांच्या विचारातील विसंगती टिपण्यालाच अधिक महत्त्व दिले. हे सर्व लेखन त्यामुळे नकारात्मक स्वरूपाचे झाले आहे. हे लेखन जणू 'मर्ढेकरगंज'ने पछाडलेले आहे. (पृ. ३४६, मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप) असे असले, तरी ह्या मंडळींनी दर्शविलेल्या उणिवांकडे दुर्लक्ष करता येत नाही. ह्या सर्व समीक्षक-विचारकांचा एकत्र परामर्श आपल्याला डॉ. द.भि. कुलकर्णी ह्यांच्या 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनःस्थापना' (१९८२) या ग्रंथात पाहायला मिळतो. ह्या मर्ढेकर-भाष्यकारांमध्ये शरच्चंद्र मुक्तिबोध (सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य, काही निबंध १९६३), सुरेंद्र बारलिंगे (सौंदर्याचे व्याकरण, नरहर कुरुंदकर (रूपवेध, १९६४), प्रभाकर पाध्ये (मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा, १९७० सौंदर्यानुसार १९७२), रा.भा. पाटणकर (सौंदर्यमीमांसा, १९७४), विजयराजे इंगळे (जीवन, साहित्य, कला आणि सौंदर्यशास्त्र), पु.शि. रेगे, मे.पु. रेगे, कुसुमावती देशपांडे, अशोक रानडे, पु.ग. सहस्रबुद्धे, लक्ष्मणशास्त्री जोशी, संभाजी कदम इत्यादी अनेकांचा समावेश होतो.

मर्ढेकरांच्या समर्थनाचा किल्ला अखेरपर्यंत लढवून त्या वैचारिक लढ्याचे ग्रंथरूपांतर करणाऱ्या द.भिं.नी भारतीय साहित्यशास्त्र आणि बा.सी. मर्ढेकर ह्यांच्या समन्वयातून आपला 'नवअलौकिकतावाद' नावाचा सिद्धांत मांडण्याचा प्रयत्नही (त्यांची दोन अध्यक्षीय भाषणे) केलेला दिसतो. मर्ढेकरांच्या अलौकिकतावादी 'लयसिद्धांताच्या' सापेक्षतेनेच मुक्तिबोधांचा 'मानुषतेचा सिद्धांत' 'द.भ. गोडसे ह्यांचा 'पोत सिद्धांत', रा.भा. पाटणकरांनी सूचित केलेला 'द्विधृवात्मकतेचा सिद्धांत,' हे सिद्धांत सिद्ध झालेले दिसतात. स्वातंत्र्योत्तर काळात बहुतेक समीक्षकांनी मर्ढेकरांच्या साहित्यविचारांवर काही ना काही भाष्य केले असले, तरी नेमाड्यांसारखे लेखक-समीक्षक विचारक मात्र- समीक्षा म्हणजे केवळ कांट किंवा रसेल नाही. समीक्षेचा काहीही संबंध नाही, असंही मी म्हणू शकेन. सौंदर्यशास्त्र हा मुळात तत्त्वज्ञानाचा विषय आहे. साहित्याचा आणि सौंदर्यशास्त्राचा संबंध फार दूरान्वयानं आहे. सौंदर्यशास्त्राचा विचार वगळून आपल्याला समीक्षेचा विचार करणं शक्य होतं.... मर्ढेकरांनी पद्धतशीरपणे एकत्रपणे वा साकल्यानं मराठी समीक्षेचा, मराठी परंपरेचा विचार केला आहे हे त्यांच्या ग्रंथरूपात समाविष्ट झालेल्या तात्त्विक समीक्षेवरून मला दिसत नाही. (पृ. ३६२, ३७३ मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप) असाही ठाम विचार दुसरीकडे मांडताना दिसतात. त्यामुळे स्वातंत्र्योतर मराठी समीक्षेचा आढावा घेताना मर्ढेकर व मर्ढेकरप्रभावित समीक्षेचा एवढा विचार पुरेसा ठरतो.

वा.ल. कुलकर्णी हे स्वातंत्र्योत्तर काळातील एक अत्यंत महत्त्वाचे समीक्षक. उपयोजित समीक्षेचा एक आदर्शच त्यांनी घालून दिलेला दिसतो. तात्त्विक आणि उपयोजित दोन्ही प्रकारची समीक्षा एकत्रपणे हाताळणारे आणि अध्ययन-अध्यापनाच्या समीक्षेचे अनुबंध स्थापित करणारे वा.ल. हे स्वातंत्र्यानंतरच्या २५ वर्षांतील एक प्रमुख समीक्षक ठरतात. मते आणि मतभेद (१९४९), वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन (१९५९), वाङ्मयातील वादस्थळे (१९६२). साहित्य : शोध आणि बोध (१९६७), वाङ्मयीन टिपा आणि टिप्पणी (१९६०), साहित्यः स्वरूप आणि समीक्षा (१९७५) हे त्यांचे समीक्षाग्रंथ प्रसिद्ध आहेत. विविध वाङ्मयप्रकारांच्या घटकतत्त्वांचा आणि त्यातील अंतरंगसंगतीचा वेध ते छोट्या छोट्या लेखातून नेमकेपणे घेतात. सोबतच विविध साहित्यकृतींचा अभ्यास, कालखंडाचा अभ्यास, लेखकाचा अभ्यास, ह्या क्षेत्रात त्यांची कामगिरी महत्त्वाची ठरते. नेमक्या व सूत्रबद्ध पद्धतीने विषयाची उकल करीत ते साहित्यकृती, साहित्यकार आणि साहित्यप्रवाह ह्यांचे विश्लेषण व मूल्यमापन करतात. म्हणूनच डॉ. रसाळ, त्यांच्या वाङ्मयाचा सर्व प्रकारचा अभ्यास करणारे वा.ल. कुळकर्णी हे या काळातले परिपूर्ण समीक्षक आहेत. वा.ल. कुळकर्ण्यांच्या तात्त्विक समीक्षेने साहित्यकृतीच्या वस्तुरूपाची जी वैशिष्ट्ये सांगितली, ती आजच्या कलावादी समीक्षेत सर्वमान्य झालेली आहेत. आधुनिक मराठी समीक्षेने साहित्यकृतीच्या वस्तुरूपाची जी वैशिष्ट्ये सांगितली, ती आजच्या कलावादी समीक्षेत सर्वमान्य झालेली आहेत. आधुनिक मराठी समीक्षेची परिभाषाही त्यांनीच रुजविली आणि रुळविली असे म्हणावे लागेल. (पृ. ३३० म.सा. प्रेरणा व स्वरूप) अशा शब्दांत सार्थ गौरव करतात. तात्त्विक स्वरूपाची गंभीरपणे समीक्षा लिहिणारे मराठीतले पहिले टीकाकार हा श्री.पु. भागवतांचा अभिप्रायही वालंचे मराठी समीक्षेतील कर्तृत्व दर्शविणारा

आहे. वालंची एकूण समीक्षा बघता तिचे वर्णन केवळ 'कलावादी' अथवा 'रूपवादी' या शब्दांनी करणे अपूर्ण ठरेल, असे वाटते. कारण कलाकृतीतील आशयाचे महत्त्व मान्य करून ते आशयाभिव्यक्तीच्या स्वाभाविक अभिन्नतेला मान्यता देतात.

मर्ढेकरांप्रमाणेच नवकाव्याचे एक जनक म्हणून ज्या शरच्चंद्र मुक्तिबोधांचा निर्देश केला जातो, त्यांनी मार्क्सवादाच्या प्रेरणेतून व प्रभावातून मर्ढेकरांच्या अलौकितावादी व कलावादी समीक्षाविचारांचा प्रतिवाद करावयास प्रारंभ केला. त्यांच्याप्रमाणेच दि.के. बेडेकरांनीही मार्क्सवादी विचारांवर आपली सैद्धांतिक साहित्यसमीक्षा उभारण्याचा प्रयत्न केला. १९४०च्या सुमारास मराठी समीक्षेवर साम्यवादी विचारांचा प्रभाव पडू लागला आणि त्या पायावर साहित्यविचारांची मांडणी प्रभावीपणे केली ती सर्वप्रथम दि.के. बेडेकरांनी! 'साहित्य : निर्मिती व समीक्षा' (१९५४) व 'साहित्य-विचार' (१९६४) 'हेगेल', 'केशवसुतांची काव्यदृष्टी', 'अस्तित्ववादाची ओळख' (१९६२) इत्यादी ग्रंथांतून त्यांनी सैद्धांतिक समीक्षेची मांडणी केली. मार्क्सवादी पक्षाचे कार्यकर्ते व तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असणाऱ्या बेडेकरांनी १९३५च्या सुमारास लेखनाला सुरुवात केली आणि सातत्याने आपल्या जीवनवादी विचारसरणीची मांडणी केली.

बेडेकरांप्रमाणे शरच्चंद्र मुक्तिबोधांनीही आपले साहित्यविचार हिरिरीने मांडले. 'काही निबंध' (१९६३), 'जीवन आणि साहित्य' (१९७२) ह्या दोन पुस्तकांतून 'साहित्यविचार' व 'नवी मळवाट'च्या प्रस्तावनेतून (१९६८) मराठी काव्याची समीक्षा मांडताना पुढे जाऊन 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य' यातून आपला 'मानुषतेचा साहित्यसिद्धांत' प्रतिपादित केला. 'मानुषता हे मानवाचे मुळातले असणे (Errenbe) आहे व समाजाची परिवर्तनशीलता ही माणूस होत जाण्याची (Becoming) प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे अंतिम उद्दिष्ट मानुषता व प्रत्यक्ष सामाजिकता यामधील द्वैत नष्ट करणे हेच आहे... मानुषता हे देशकाल परिस्थितीमध्ये तत्त्व नव्हे. ते सर्व देशात, सर्वकाली, सर्व परिस्थितीमध्ये (घटनांमध्ये) मानवी व्यक्तींना (आज, काल आणि उद्याच्या मानवी व्यक्तींना) व्यापून असणारे माणूसपणाचे (बीइंगचे) तत्त्व आहे. केवळ (ॲबसोल्यूट) तत्त्व आहे.' (१९६५ सृष्टी...) यांनी म्हटले आहे. हे मत मुक्तिबोधांच्या समीक्षाविचारांप्रमाणेच काव्यनिर्मितीसाठी लागू होणारे आहे. 'मार्क्सवादी साहित्यविचार हे केशव शिरवाडकर यांचे पुस्तक परिचयपर स्वरूपाचे आहे.

आपली स्वतःची स्वतंत्र अशी सिद्धांतमांडणी द.ग. गोडसे यांनी पुढील काळात केलेली दिसते. त्यांनी आपल्या जीवननिष्ठ व समाज-संस्कृतिनिष्ठ साहित्यविचारांना 'पोत' असे नाव दिले आणि वस्त्राच्या ताण्याबाण्याची साहित्यकृतीच्या निर्मितिप्रक्रियेशी तुलना करत आपला सिद्धांत मांडला. ललितकृतीचा आविष्कार हा कालसापेक्ष आणि त्या त्या काळातील भावविश्वाशी निगडित असतो आणि त्यात आशय, आकृतीची एकात्मता अनुस्यूत असते असे ते मानतात. 'पोत'च्या मांडणीतील विविध मर्यादा व उणिवा इतर समीक्षकांनी दाखवून दिल्या असल्या तरी त्यांच्या वेगळ्या मांडणीचे स्वागत केले आहे. पोत (१९६३), शक्तिसौष्ठव (१९७२), उर्जायन (१९७७), गतिमानी (१९७६) लोकधारी, मातावळ इत्यादी पुस्तकांतून त्यांचे साहित्य, समाज व संस्कृतीविषयक चिंतन एकत्र आले आहे.

मराठीमध्ये समीक्षा-सिद्धांत म्हणून तात्त्विक विवेचन करणारे व त्यातून एक नवा साहित्य-सिद्धांत सूचित करणारे दोन मान्यताप्राप्त समीक्षक घेऊन हा तात्त्विक समीक्षेचा भाग पुरा करायचा आहे. त्यापैकी एक आहेत, डॉ. रा.भा. पाटणकर आणि दुसरे आहेत, भालचंद्र नेमाडे. पाटणकरांनी जगभरातील विविध सौंदर्यशास्त्रज्ञांची आणि त्यांच्या विचारांची ओळख मराठी साहित्यविश्वाला करून दिली. त्याचबरोबर 'सौंदर्यसमीमांसा' या ग्रंथात समीक्षाक्षेत्रातील दोन विचारव्यूहांची तुलना करून आपला एक मध्यममार्ग सूचित केला. त्यांच्या मते सौंदर्य किंवा कलामूल्य स्वायत्त आहे हा एक विचार, ज्यास अलौकिकतावाद म्हणतात आणि सौंदर्य व कला ह्या गोष्टी लौकिक जीवनपोषक आहेत हा दुसरा विचार, ज्यास लौकिकतावाद म्हणतात. पाटणकर मूलतः मार्क्सवादी विचारांकडे झुकलेले विचारवंत आहेत. ह्याची जाणीव विशेषतः 'अपूर्ण क्रांती'मधील त्यांची वैचारिक भूमिका पाहून येते. तिथे ते वसाहतवादी विचारांचे समर्थन करीत, म. गांधी, धर्मपाळ नेमाडे, देवी इत्यादींच्या देशीय भूमिकेला विरोध करताना दिसतात. त्यामुळे आपल्या सौंदर्यशास्त्रीय साहित्यविचारात ते स्वाभाविकपणेच लौकिकतावादाची बाजू घेतात. त्यामुळेच कदाचित भारतीय साहित्यशास्त्रात विद्यमान असलेल्या 'लौकिक' आणि 'अलौकिक' ह्या दोन्ही परंपरांचा योग्य निर्देश त्यांच्या विवेचनात आढळत नाही. ह्यातून मग ते दोन्ही भूमिकांच्या

समन्वयाची भूमिका घेतात. त्यांच्या मते बहुतेक कलांमध्ये हे दोन्ही ध्रुव निदान बीजरूपाने उपस्थित असलेले दिसतात. त्यांना जीवनाभिमुखही राहावे लागते व जीवनाशी संबंध नसलेले रूपतत्त्वही अंगीकारावे लागते. द्विधृवात्मक कलेच्या तत्त्वाला कोणतीच कला अपवाद ठरत नाही. ह्या निष्कर्षाची त्यांनी 'एक समीक्षासिद्धांत' या स्वरूपात स्वतंत्र मांडणी केली नसल्याने ह्या द्विधृवात्मक कलेच्या संकल्पनेला 'नवा समीक्षासिद्धांत' म्हणता येईल का? असा प्रश्न शिल्लक राहतो. परंतु स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेच्या वाटचालीत पाटणकरांचे कार्य अद्वितीय स्वरूपाचे आहे यात संशय नाही. सोबतच आपल्या लौकिकतावादी वा जीवनवादी साहित्यविचारांचे उपयोजन करून शरच्चंद्र मुक्तिबोध, कमल देसाई, शांताराम आणि वसंत कानेटकर ह्या मराठी लेखकांच्या साहित्याची उत्तम समीक्षा ते सादर करतात. साहित्यातील आशयविश्वाला आणि त्यातील सामाजिक-सांस्कृतिक घटकांवर लक्ष केंद्रित करून त्याआधारे ह्या साहित्यिकांचे मूल्यमापन ते करतात.

....जग जवळून पाहिलेल्या, श्रांत पण प्रगल्भ मनाच्या कवीच्या नितळ मराठीत लिहिलेल्या या कविता आहेत. जणू संतकवींची परंपरा पुढे चालविणाऱ्या... मुक्तिबोधाच्या कोणत्या कविता लोकांच्या स्मरणात राहतील? कोणत्या पुढेही मूल्ययुक्त व महत्त्वाच्या अशा वाटत राहतील? ज्या जीवनाची त्यांना 'आतून' पूर्ण तपशिलांसह जाण आहे- यात त्यांचे जीवनाच्या विविध अंगाबाबतचे सतत, निग्रहाने चाललेले चिंतनही आले... त्याबद्दलच्या कविता मूल्ययुक्त आहेत व नंतरच्या काळातील वाचकांनाही त्या तशा वाटतील... क्रांतिकवी म्हणून पाहिले तर मुक्तिबोध महत्त्वाचे ठरत नाहीत. महत्त्वाचे ठरतात त्यांच्या चिंतनपर कवितांमुळे! (मुक्तिबोधांचे साहित्य, प्र.) असे कवी मुक्तिबोधांचे समर्पक मूल्यांकन करणारे पाटणकर साहित्यसिद्धांतांप्रमाणेच उपयोजित समीक्षेच्या क्षेत्रातही एक महत्त्वपूर्ण पायवाट निर्माण करणारे समीक्षक ठरतात. तात्त्विक आणि उपयोजित दोन्ही स्वरूपातील त्यांचे योगदान मौलिक स्वरूपाचे आहे.

१९७५नंतरच्या कालखंडात आपला देशीयतेचा साहित्य सिद्धांत मांडून मराठी साहित्य-समीक्षेला नवे देशीय वळण लावणारे नवकादंबरीकार नेमाडे हे मराठी समीक्षेतील एक अत्यंत महत्त्वाचे विचारवंत-समीक्षक आहेत. त्यांचे देशीवादविषयक चिंतन 'टीकास्वयंवर', 'साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण', 'काही भाषणे', 'निवडक मुलाखती' इत्यादी ग्रंथातून आपल्याला पाहायला मिळते.

देशीवाद किंवा देशीयता ही विचारसरणी विशेषतः साठोत्तरी कालखंडात मराठी, भारतीय आणि विश्वसाहित्यात चर्चेत आली. १९८०नंतर किंवा विशेषत्वाने नव्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा व त्यातील विविध घटकांचा भारताने स्वीकार केल्यानंतर तिला विशेष जोम प्राप्त झाला. केवळ मराठीतच नव्हे तर एकूणच भारतीय साहित्यात नव्या देशीवादाची मांडणी व तिचा पुरस्कार करण्याचे श्रेय सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक, कवी, कादंबरीकार, समीक्षक व विचारवंत डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्याकडे जाते.

१९८०नंतर साधारणपणे नेमाड्यांनी उघडपणे या वैचारिक मांडणीला प्रारंभ केला. पाश्चात्त्य जगात चाललेली नेटिव्हिझमची चळवळ किंवा ८०नंतर पुढे आलेला ओरिएंटलिझमचा विचार यांच्याशी संवाद राखत आणि भारतीय परंपरेतील विविध विचारांशी अनुबंध साधत नेमाड्यांनी देशीयतेचा विचार आपल्या समग्र साहित्यातून व समीक्षेतून जोरकसपणे मांडला आणि त्यास मराठीत विविधस्तरीय मान्यताही प्राप्त झाली. परंतु नेमाड्यांनी प्रबंध स्वरूपात देशीवादाची सविस्तरपणे व सैद्धांतिक स्वरूपात मांडणी न करता प्रसंगोपात्त लेखरूपात व मुलाखत, भाषणे इत्यादी रूपात हा विचार मांडल्याने त्याविषयी सर्वत्र संदिग्धता आणि संभ्रम भरून राहिला. नेमाड्यांच्या तिरकस आणि टोकदार शैलीमुळे हा विषय वादग्रस्तही होत राहिला. एकतर टोकाचे समर्थन किंवा टोकाचा विरोध अशा दोन टोकांवर हा विचार हेलकावत राहिला. एक वादविचारसरणी म्हणून आणि साहित्यसमीक्षेचा एक मापदंड वा सिद्धांत म्हणून देशीवादाची नीट मांडणी अजूनही झालेली दिसत नाही. डॉ. अशोक बाबर, डॉ. मदन कुलकर्णी, रंगनाथ पठारे, डॉ. किशोर सानप व स्वतः नेमाडे आदींनी यावर ग्रंथरूपात काही लेखन केलेले असले तरी 'देशीयतेचा साहित्यसिद्धांत' म्हणून त्यातून काही ठोस निष्पन्न झालेले दिसत नाही.

देशीवादाची संकल्पना नेमाडेंनी १९६३पासून वेगवेगळ्या लेखांमधून मांडायला सुरुवात केलेली असली तरी १९८०पासूनच देशीवादावर समग्रपणे चर्चा व्हायला लागली. 'देशी', 'देशीय', 'देशीयता', 'देशीपणा' या सर्व संकल्पना देशीवादातून उदयास आल्या. या सर्व संकल्पनांनी साहित्यविश्व ढवळून निघाल्याने समीक्षकांवर आणि मराठी साहित्यावर यांनी केवढा प्रभाव निर्माण केला याची कल्पना येते. डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी मांडलेल्या 'देशीवाद' या संकल्पनेला अनेक समीक्षकांनी उचलून धरले तर अनेकांनी याचा प्रतिवादही केला.

डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी आपल्या 'टीकास्वयंवर' या

ग्रंथामध्ये देशीवादाची संकल्पना स्पष्ट केलेली आहे. नेमाडे म्हणतात, देशी असणे म्हणजे त्या त्या भूमीशी जोडलेलं असणे, तिच्याशी नाते राखून असणे. हे नाते तिथली भाषा, संस्कृती आणि मूल्ये यांच्याशी असते. हे नाते अबाधित ठेवणारी स्वाभाविक अवस्था म्हणजे देशीपणा. म्हणजेच नेमाड्यांच्या मते भूमी, भाषा, संस्कृती आणि जीवनमूल्ये या सर्वांचा स्वीकार म्हणजे देशीपणा.

देशीवादी समीक्षासिद्धांताच्या मांडणीसोबतच त्याचे उपयोजनही त्यांच्या समीक्षेत दिसून येते. उदाहरणार्थ, त्यांचा मराठी कादंबरीवरचा प्रसिद्ध निबंध, किंवा त्यांनी केलेली कोलटकरांच्या जेजुरीची समीक्षा किंवा भारतीयांच्या इंग्रजी साहित्याची चिकित्सा. ह्याशिवाय देशीयतेच्या अंगाने केलेली अन्य समीक्षा 'टीकास्वयंवर'मध्ये समाविष्ट आहे.

### तात्त्विक समीक्षा : काही वेगळे प्रयास

दि.पु. चित्रे यांनी त्यांच्या 'तुकोबांचे वैकुंठगमन : एक कीर्तन' या ६० पानांच्या छोट्या तुकारामकेंद्री लेखसंग्रहात 'वारकरी भक्तिकाव्याचे काव्यशास्त्र' असा एक देशीवादी साहित्यसिद्धांत मांडण्याचा जो प्रयत्न केला, तो लक्षणीय वाटतो. मराठीत अन्य लेखक-समीक्षक-विचारवंतांनीही मराठीचे स्वतंत्र साहित्यशास्त्र मांडण्याचा जो प्रयत्न पूर्वी केला, त्यास इथे चित्रे अधिक देशी अंगाने प्रतिसाद देताना दिसतात. संत तुकोबारायांच्या जीवनक्रमाची आणि त्यांच्या वाङ्मयीन महात्मतेची चर्चा करताना, वारकरी भक्तिकाव्याचे काव्यशास्त्र श्री ज्ञानदेवांनी प्रथम मांडले... ज्ञानदेवांचे काव्यशास्त्र आत्मसात करून मराठी काव्याची क्षितिजे विस्तारणारे पुढले महाकवी तुकोबाच. असे प्रतिपादन ते करतात. त्यांच्या मते मराठीचे वैशिष्ट्यपूर्ण काव्यशास्त्र 'ग्यानबा-तुकाराम' ह्या जोडशब्दात सामावलेले आहे. ज्ञानदेव हे या काव्यशास्त्राचा प्रकाश तर तुकोबा त्याचा विमर्श. महाराष्ट्र संस्कृतीच्या गर्भात वास करणाऱ्या समन्वयशीलतेला इथे चित्रे स्पर्श करताना दिसतात. ज्या भूमिकेचे वर्णन द.भि.सारखे संतसाहित्याचे भाष्यकार सुसंवाद आणि समन्वय ही मराठी संस्कृतीची आद्यखूण या शब्दांत करतात. ज्ञानदेवांनी ज्या आध्यात्मिक क्रांतीचे काव्यशास्त्र मांडले आणि त्याची आद्य उदाहरणे मांडली, तिचे लोण तुकोबांनी आधुनिक काळाच्या उंबरठ्यापर्यंत पोचवले. अशा अनेक सूत्रमय विधानांतून दिपुंनी केलेल्या या मांडणीवर डॉ. सदानंद मोरे ह्यांच्या 'तुकारामदर्शन' या प्रसिद्ध ग्रंथातील समविचारांची सावली जाणवत राहते. तसा उल्लेखही त्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे दिलीप पुरुषोत्तम चित्रे आणि आपल्या आधुनिकतेची पाळेमुळे भक्तिपरंपरेत शोधणाऱ्या समविचारी लेखककवींना- ही तुकारामदर्शनची अर्पणपत्रिकाही त्या सत्याकडे अंगुलिनिर्देश करते! 'तुकोबांचे वैकुंठगमन' या पुस्तकातील देशीय चिंतनाची बीजरूपे आपल्याला पूर्वीच्या 'पुन्हा तुकाराम'मध्ये पाहायला मिळतात. ह्यासंदर्भात मराठी साहित्याची समीक्षामूल्ये मांडणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प चित्रे यांच्यासमोर होता आणि तो त्यांच्या अकाली निधनामुळे अपुरा राहिला. अशी खंतही मोरेसरांनी व्यक्त केलेली दिसते! तुकारामदर्शनमध्ये त्यांनी चित्र्यांच्या या मराठी देशीवादी भूमिकेविषयी 'आधुनिक महाकवी तुकोबा' हे एक प्रकरणच त्याच्या Says Tuka व 'पुन्हा तुकाराम'च्या आधारे लिहिले असून त्यात 'तुकोबांचे वैकुंठगमन'चा (तुकारामदर्शन १९९६ दु.आ. २०१४ व तुकोबांचे वैकुंठगमन २०१०) निर्देश मात्र नाही! या सर्व गोष्टींमधून दिसणारा मोरे, चित्रे, नेमाडे, 'देशीयता आणि मराठीचे काव्यशास्त्र' हा परस्परानुबंध लक्षणीय आणि मराठी साहित्यसमीक्षेच्या दृष्टीने उल्लेखनीय वाटतो.

### तात्त्विक समीक्षा आणि देशीयता : नेमाडे आणि रसाळ

उत्तम आणि श्रेष्ठ कविलेखक हे आपल्या वाचकवर्गाला डोळ्यांसमोर ठेवून आपली वाङ्मयनिर्मिती करीत नसतात! उत्तम कविलेखक वाचकनिष्ठेतून नव्हे, तर आपल्या साहित्यकृतीचा जो विषय, त्या वर्ण्यविषयनिष्ठेतून लेखन करीत असतात. या वर्ण्यविषयातच समाज आणि संस्कृती हे घटक सामावलेले असतात. वर्ण्यविषयाप्रमाणेच कविलेखकाचे व्यक्तिमत्त्वही साहित्यकृतीच्या केंद्रस्थानी असते, ज्यातच समाज आणि संस्कृती हेही घटक अंगभूतपणे सामावलेले असतात. लेखकाला निष्ठावंत राहायचे असते ते वर्ण्यविषयाशी आणि व्यक्तिमत्त्वाशी. त्यातूनच अस्सल आणि उत्तम साहित्यकृतीची निर्मिती संभवत असते. यालाच वाङ्मयीन महात्मतेसाठी आवश्यक असणारी आत्मनिष्ठा (लेखनपूर्व आणि लेखनगर्भ) आणि आवश्यक ते तादात्म्य (भावनात्मक आणि ज्ञानात्मक) असे म्हणतात. नेमाडे ह्यालाच लेखकाची नैतिकता म्हणतात. त्यांनी मांडलेले सामाजिकता आणि देशीयता हे इतर दोन मापदंड, अनुक्रमे लेखकाची समाजनिष्ठा व संस्कृतिनिष्ठा दर्शवतात. वर्ण्यविषयाच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या माध्यमातूनच लेखक आपली समाजसंस्कृतिनिष्ठा आणि जीवननिष्ठा (मानव-मानवेतर) जोपासत असतो. ह्यातच लेखकाची वाचक-रसिकनिष्ठाही आपोआपच सहजपणे जोपासली जाते.

या विषयाच्या संदर्भात भारतीय साहित्यशास्त्रात वर्णिलेली 'कविरसिकसंवाद ही संकल्पना महत्त्वपूर्ण आणि संवादी ठरू शकते. रस आणि भाव ह्यांच्या अनुबंधाची आणि कविरसिकसंवादाची चर्चा करताना, भारतीय साहित्यशास्त्रातले गुह्य उलगडून दाखविताना डॉ. ग. त्र्यं. देशपांडे म्हणतात– बीज हे जसे वृक्षाचे मूळ, तसेच कविगत साधारणीभूत संवेदन हेच काव्यव्यापाराचे व नाट्यव्यापाराचे मूळ आहे. कविगत साधारणीभूत संवेदना हीच परमार्थतः रस आहे. या कविगत रसामुळेच संपूर्ण काव्यार्थ प्रवर्तित होत असतो. कविगत रसाचीच नाट्य किंवा काव्याच्या द्वारे रसिकाला हृदयसंवादबलाने प्रतीती येते... काव्यगत संपूर्ण व्यापाराचा उगम कविगत साधारणीभूत संवेदनेतच असतो.... आपल्या लौकिक जीवनात कवी जी गोष्ट पाहतो किंवा अनुभवतो, ती तो जशीच्या तशी रसिकासमोर मांडीत नाही. ती तशीच मांडणे हे काव्य नव्हे. तो केवळ 'काव्यानुकार' आहे.... कवी आपल्या प्रतिभाबळाने आपला अनुभव लौकिक व्यक्तिगत पातळीवरून वर उचलतो व त्याला साधारण्याच्या भूमीवर ठेवतो. हे साधारण्यसुद्धा परिमित नसते. कवीचा साधारणीभूत अनुभव सर्व विश्वाला व्यापील एवढा व्यापक होतो. *स्वात्मद्वारेण विश्वं तथा पश्यन्* असे अभिनवगुप्ताने याबद्दल म्हटले आहे. .....त्याचे (कवीचे) भावजीवन त्या अनुभवाने शिगोशीग भरते, आणि अशाच अवस्थेत अकृतकतेने म्हणजे सहजतेने तो अनुभव त्याच्या शब्दांतून अभिव्यक्त होतो. कवीचे भावजीवन जोवर या अनुभवाने पूर्ण व्यापले जात नाही, तोवर तो शब्दांतून बाहेरही पडत नाही. (*यावत् पूर्णा न चेतेन तावन्नैव वमत्यमुम्* –भट्टभायक)... कवीच्या या अकृत्रिम बोलांतून त्याची विश्वव्यापक प्रतीती अभिव्यक्त होते... रसिकाला येणारी प्रतीती ही कविगत प्रतीतीच असते. कवीला आलेला साधारणीभूत प्रत्यय आणि रसिकाला काव्यवाचनाने येणारा साधारणीभूत प्रत्यय एकच म्हणजे एकजातीयच असतात. हाच हृदयसंवाद किंवा वासनासंवाद होय... कवी, नायक व रसिक यांच्या अनुभवाची जात, प्रत व पातळी एकच असते. (*नायकस्य कवेः श्रोतुः समानोऽनुभवस्ततः*) रसिकाचा हृदयसंवाद कवीशी होत असतो. कविसंविद् हाच परमार्थतः रस होय व रसिकाला त्याचीच प्रतीती येत असते अशा शब्दांत अभिनवगुप्ताने हृदयसंवादाचे स्वरूप सांगितले आहे. (भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर, मुंबई १९५८, पृ. ३६३ ते ३६५) देशीयतेच्या वाङ्मयीन तत्त्वाविषयी डॉ. सुधीर रसाळ म्हणतात– प्रत्येक भाषेतील ललित वाङ्मय हे स्वाभाविकपणेच 'देशी' असते. परंतु जेव्हा एखाद्या संस्कृतीतील लेखक-वाचकांच्या संवेदनशीलतेत काही विकृती निर्माण होतात, जेव्हा लेखक स्वतःच्या संस्कृतीतून मिळालेल्या संवेदनशीलतेऐवजी परसंस्कृतीतून दत्तक घेतलेल्या संवेदनशीलतेतून अनुभव घेण्याचा प्रयत्न करू लागतात आणि परसंस्कृतीतून मिळालेल्या वाङ्मयीन संकेतांच्या साह्याने वाङ्मयनिर्मिती करण्याचा प्रयत्न करू लागतात, तसेच अशाच संवेदनशीलतेच्या प्रभावातून जेव्हा वाचकही अशा वाङ्मयाचा 'चांगले वाङ्मय' म्हणून स्वीकार करू लागतात, तेव्हा त्या भाषेतील वाङ्मयनिर्मिती आणि सर्वच वाङ्मयव्यवहार रोगग्रस्त झालेले असतात. हा रोगटपणा नष्ट केल्याशिवाय त्या संस्कृतीच्या स्वतःच्या वाङ्मयीन परंपरा जीव धरत नाहीत. अशा परिस्थितीतच 'देशीपणाचा आग्रह धरणे गरजेचे असते. (वाङ्मयीन संस्कृती, २०१०) तर नेमाडे यांनी या संदर्भात व्यक्त केलेली समीक्षाविषयक मतेही महत्त्वाची व या विचाराला संवादी ठरतात.' भालचंद्र नेमाडे म्हणतात– (कोलटकरांच्या जेजुरीविषयी) ...त्याला (कवीला) खास इंग्रजी वाचकांसाठी चुणचुणीत होणे आवश्यक असते. ह्या चुणचुणीतपणाचा मोठा पटच इंग्रजी लेखन करणाऱ्या भारतीय लेखकांच्या साहित्यात दिसतो. जेजुरीतही तो दिसतो : परदेशी लोकांना हसवणारे भारतीय उंदीर, झुरळे, धर्माचा स्वार्थी वापर, भारतीयांचा आध्यात्मिक नसलेला पण तसा आव आणणारा धर्म, पाण्याची टंचाई....पुरातन काळातल्या दंतकथा घटना म्हणून सांगणे ह्या ठरीव गोष्टींना आणि एकूण हिंदुस्थानातल्या उद्ध्वस्त परंपरांना, दारिद्र्याला आणि स्वतःचा अभिमान असलेल्या संस्कृतीला मजेदार रूप देऊन इंग्रजी वाचकांचे रंजन कोलटकरांनीही करावे हे मराठी कवितेच्या तेजस्वी परंपरेला शोभणारे नाही.....ह्यावरून शहरी व इंग्रजी वसाहतवादी बदमस्ती देशी सांस्कृतिक रूपांच्या तुलनेत स्पष्ट होते. ह्या वसाहतवादी वृत्तीचे एक लक्षण म्हणजे भारतीय नीतिमूल्यांपेक्षा इंग्रजी नीतिमूल्यांची जास्त कदर केलेली असते. (पृ. १६५, १६६ टीकास्वयंवर) इथे आणखी एक महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवावेसे वाटते, ते म्हणजे– नेमाडे यांच्या लेखकराव भूमिकेची बीजे आणि प्रेरणा मर्ढेकरांच्या वाङ्मयीन महात्मतेच्या सिद्धांतात असल्याचे दिसते. त्याआधारे मर्ढेकरांनी पूर्वकालीन व समकालीन लेखकांवर केलेली परखड टीका (क्षीरसागरांची राक्षसविवाह कादंबरी) आणि नेमाड्यांची त्याच स्वरूपाची बोचरी टीकाटिप्पणी (क्षीरसागर यांचे 'वादसंवाद') यातही लक्षणीय साम्य आहे.

**परिचयपर भाष्यपर सैद्धांतिक समीक्षा**

साहित्यक्षेत्रात ज्याप्रमाणे नव्या सिद्धांतांची मांडणी करणारे लेखक-विचारवंत आवश्यक असतात, त्याचप्रमाणे त्या सिद्धांतांवर भाष्य करून त्यांची एकूण परंपरेत स्थाननिश्चिती करणारे व त्यानुसार साहित्यकृतींचे विश्लेषण व मूल्यमापन करणारे लेखक-विचारकही आवश्यक असतात. स्वातंत्र्योतर मराठी समीक्षेच्या क्षेत्रात अशा प्रयत्नांचा फार मोठा पट आपल्याला दिसून येतो. मराठी समीक्षेला वळण लावणाऱ्या सर्व प्रमुख समीक्षकांचा यात समावेश करता येईल. जगभरात निर्माण झालेल्या व होत असलेल्या जुन्या-नव्या साहित्यविचारांची ओळख ते एकूणच साहित्यक्षेत्राला करून देत असतात. त्यांचे कार्य काहीसे दुय्यम स्वरूपाचे वाटत असले तरी तात्त्विक व उपयोजित दोन्ही प्रकारच्या समीक्षेला त्यांचेच योगदान अधिक महत्त्वाचे ठरते. उलट काही मान्यवरांच्या मते 'समीक्षा' या संज्ञेच्या अर्थपरिघात ह्याच प्रकारचे लेखन अधिक अर्थपूर्ण ठरते. यासंदर्भात नेमाडे म्हणतात- समीक्षा म्हणजे केवळ कांट किंवा रसेल नाही! समीक्षेचा अर्थ निव्वळ सौंदर्यशास्त्र मुळीच नाही... सौंदर्यशास्त्राच्या आणि समीक्षेचा काहीही संबंध नाही.. सौंदर्यशास्त्र हा मुळात तत्त्वज्ञानाचा विषय आहे. साहित्याचा आणि सौदर्यशास्त्राचा सबंध फार दुरान्वयाने आहे. सौंदर्यशास्त्राला वगळून आपल्याला समीक्षेचा विचार करणं शक्य आहे... कुठल्याही समीक्षकाला करता येण्यासारखी गोष्ट अशी की त्यानं आपलं केंद्र मराठीपुरतं मर्यादित ठेवावं. संबंध जगातला आणि सौंदर्यमीमांसेचा पट आणू नये!... कांट वगैरे मांडताना त्याचा मराठीशी काही संबंध आहे का किंवा रिथर्डस्‌ची कलामीमांसा याचा कुरुंदकरांना मराठीत काही संबंध सापडला का? (पृ. ३७२ ते ३७४, मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप) नेमाड्यांनी उपस्थित केलेले प्रश्न काही प्रमाणात रास्त असल्याचे आपल्याला पटते! कारण अशा सैद्धांतिक ग्रंथाचा आणि मराठी लेखकांनी मांडलेल्या लय, मानवता, पोत, द्विधृतात्मकता आदी सिद्धांतांचा प्रत्यक्ष मराठी साहित्याच्या समीक्षेसाठी फारसा उपयोग आजवर झालेला नाही.

यासंदर्भात भारतीय साहित्यशास्त्र, काव्यशास्त्र, नाट्यशास्त्र, ध्वनिसिद्धांत, रससिद्धांत, अलंकारशास्त्र, ॲरिस्टॉटलचे मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र, मराठी कवींचा काव्यविचार, पाश्चात्त्य साहित्यसिद्धांत, पाश्चात्त्य वाद-विचारसरणी, आधुनिक पाश्चात्त्य वाङ्मय आणि संप्रदाय, शैलीविज्ञान, भाषावैज्ञानिक समीक्षा, समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती, स्त्रीवाद, गांधीवाद, देशीवाद, आंबेडकरवाद, राष्ट्रवाद, आदिबंधात्मक समीक्षा, संतांचे साहित्यशास्त्र, लौकिकतावादी साहित्यविचार, वाङ्मयप्रकारांची तात्त्विक मीमांसा, कला व साहित्य अनुबंध, विविध नवे साहित्य प्रवाह, तौलनिक साहित्याभ्यास, साहित्य व इतर ज्ञानशाखांचा अनुबंध, लोकसाहित्य, इ. विविध समीक्षाक्षेत्रांसंबंधाचे विपुल तात्त्विक समीक्षालेखन मराठीत स्वातंत्र्यानंतरच्या गत ७५ वर्षांत झालेले दिसते. हे बहुतांशी तात्त्विक लेखन साहित्यकृतीची समीक्षा करण्याच्या प्रेरणेतून झालेले दिसते. त्यामुळेच मराठी समीक्षा अधिक व्यापक, अधिक सखोल, अधिक विविधांगी झालेली पाहायला मिळते. प्रत्यक्ष उपयोजित समीक्षेच्या विविध आयामांचा व त्या संदर्भात निर्माण झालेल्या समीक्षेचा विचार करण्यापूर्वी पार्श्वभूमी म्हणून ह्या परिचयपर तात्त्विक समीक्षेवर दृष्टिक्षेप टाकणे अर्थपूर्ण ठरते, पुढे काही समीक्षकांची व त्यांच्या ग्रंथांची प्रातिनिधिक स्वरूपात विभागशः नावे दिलेली असून त्यातून मराठी समीक्षेचे विशाल मुख आपण अनुभवू शकतो. उपरोक्त प्रवाहातील ज्या ग्रंथांची नावे लेखात अन्यत्र विवेचनादरम्यान आलेली आहेत, ती इथे घेतलेली नाहीत.

**भारतीय साहित्यशास्त्र**

प्राचीन भारतीय साहित्यमीमांसा : एक आकलन (अशोक केळकर १९७९)
काव्यशास्त्रप्रदीप (स.रा. गाडगीळ, १९५५)
रसचर्चा (पद्माकर दादेगावकर, १९९४)
भारतीय साहित्यशास्त्र (राम कापसे, १९७७)
प्राचीन काव्यशास्त्र (र.प. कंगले, १९७४)
आधुनिक मराठी साहित्यसमीक्षा आणि रससिद्धांत (लक्ष्मणशास्त्री जोशी, १९७२)
भारतीयांचा साहित्यविचार (म.सु. पाटील, १९९०)
रससूत्र (नरहर कुरुंदकर, १९८८)
रसभावविचार (र.पं. कंगले, १९७३)

**साहित्य व कला : अनुबंध**

कोरा कॅनव्हास (प्रभाकर बरवे १९९०)
कलेचा इतिहास : भारतीय व पाश्चात्त्य (रमेशचंद्र पाटकर १९७३)
साहित्य आणि कला (म. ना. लोही, १९६६)
संगीताचे सौदर्यशास्त्र (अशोक रानडे, १९७१)

**मराठीतील सौंदर्यमीमांसा / साहित्यशास्त्र**

सौंदर्यानुभव (प्रभाकर पाध्ये, १९७९)
पाटणकरांची सौंदर्यमीमांमा (प्रभाकर पाध्ये, १९७७)
मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा (प्रभाकर पाध्ये, १९७०)
मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनःस्थापना (द.भि. कुलकर्णी, १९८२)
मराठीचे साहित्यशास्त्र : रामदास ते रामजोशी (उषा देशमुख, १९७६)
मराठीचे साहित्यशास्त्र : ज्ञानेश्वर ते रामदास (मा. गो. देशमुख १९)
अर्वाचीन कवींचा काव्यविचार (हेमंत खडके, २०१२)

**पाश्चात्त्य साहित्यशास्त्र**

ॲरिस्टॉटल (गो.वि. तुळपुळे, १९६४)
ॲरिस्टॉटलच्या पश्चात (गो.वि. तुळपुळे, १९६८)
कांटची सौंदर्यमीमांसा (रा.भा. पाटणकर, १९७७)
कॉडवेलचा कलाविचार (अशोक जोशी, १९८८)
कौचेचे सौंदर्यशास्त्र : एक भाष्य (रा.भा. पाटणकर, १९७४)
टीकाविवेक (श्री. के. क्षीरसागर, १९६५)
साहित्यातील संप्रदाय (रा. शं. वाळिंबे, १९७४)
साहित्यावरील विचारधारा (के. रं.शिरवाडकर, २००३)
प्लेटोचे साहित्यशास्त्र (अ.ना. देशपांडे १९८३)
मार्क्सवादी साहित्यविचार (केशव शिरवाडकर, १९८०)
अस्तित्ववाद (रवींद्र मनोहर, १९७९)

**वाङ्मयप्रकारनिष्ठ तात्त्विक समीक्षा**

मराठी विनोद (उषा कुळकर्णी, १९९०)
मराठी लघुनिबंधाचा इतिहास (आनंद यादव, १९९५)
मराठी निबंध, लघुनिबंध : स्वरूप विवेचन (वि. पां. व चंद्रकांत देऊळगावकर १९८१)
शोकात्म विश्वदर्शन (स. रा. गाडगीळ, २०००)
साहित्य : अध्यापन आणि प्रकार (संपादित, रसाळ, तेंडुलकर, १९८७)
चरित्रचिंतन (द.न. गोखले, २०००)
आत्मचरित्र मीमांसा (आनंद यादव)
कादंबरी (ल. ग. जोग, १९६३)
कादंबरी आणि मराठी कादंबरी (उषा हस्तक, १९९३)
कादंबरी : एक वाङ्मयप्रकार (जान्हवी संत, १९७१)
कादंबरी : समीक्षा (श्री. मा. कुळकर्णी, १९७२)
मराठी कादंबरी : पहिले शतक (कुसुमावती देशपांडे, १९५३)
धार आणि काठ (नरहर कुरुंदकर, १९७१)
मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा (चंद्रकांत बांदिवडेकर, १९८३)
टीकास्वयंवर (भालचंद्र नेमाडे, १९९०)
कादंबरी : एक साहित्यप्रकार (हरिश्चंद्र थोरात)
लघुकथा : मंत्र आणि तंत्र (ना. सी. फडके, १९५२)
कथा : संकल्पना आणि समीक्षा (सुधा जोशी, २०००)
मराठी कथा : उगम आणि विकास (इंदुमती शेवडे, १९७३)
मराठी कथा : रूप आणि परिसर (हातकणंगलेकर, १९८६)
गीतकाव्य (वसंत दावतर, १९७१)
कवितेचा शोध (म.सु. पाटील, १९९)
कविता आणि प्रतिमा (सुधीर रसाळ, १९८२)
मराठी कविता : स्वरूप आणि विवेचन (निशिकांत ठकार, १९७७)
अर्वाचीन मराठी काव्यदर्शन (अक्षयकुमार काळे, १९९९)
अंधारयात्रा (त्र्यं. वि. सरदेशमुख, १९६८)
कवितेविषयी (वसंत आबाजी डहाके, १९९९)
कविता : संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा (वसंत पाटणकर, १९९५)
महाकाव्य : स्वरूप व समीक्षा (द.भि. कुळकर्णी, २००१)
अर्वाचीन मराठी काव्यमीमांसा (संपा. नाईकवाडे व इतर २०१४)
रसग्रहण : कला आणि स्वरूप (गो. म. कुलकर्णी, १९७३)
गीतरचना : स्वरूप आणि विकास (कल्याण इनामदार, २००६)
नाटक : एक चिंतन (वसंत कानेटकर, १९७४)
नाट्यविमर्श (के. नारायण काळे १९६१)
नाट्यस्वगत : स्वरूप आणि समीक्षा (शकुंतला खोत, १९७७)
मराठी नाट्यलेखनतंत्राची वाटचाल (अरविंद कुळकर्णी, १९७६)
मराठीचे नाट्यतंत्र (मो. द. ब्रह्मे, १९६४)
मिथक आणि नाटक (तारा भवाळकर, १९८८)
शोकनाट्याचे साहित्यरूप (सदा कऱ्हाडे, १९७९)
शोकांतिकेचा उदय (विलास खोले, १९९२)
सुखनाट्याचे साहित्यरूप (सदा कव्हाडे, १९७४)
शोकनाट्याची मूलतत्त्वे (संपा. गोकाककर, दुंडगेकर, १९७६)
सुखात्मिकेचे स्वरूप (गोकाककर, दुंडगेकर, १९८६)

**लोकसाहित्य**

लोकसाहित्य (गंगाधर मोरजे)

लोकसाहित्य : रंग आणि रेखा (शरद व्यवहारे, १९९०)

लोकसाहित्याची रूपरेषा (दुर्गा भागवत, १९५६)

लोकसाहित्याचे स्वरूप (प्रभाकर मांडे, १९७८)

लोकसाहित्याचे अंतःप्रवाह (प्रभाकर मांडे, १९७५)

लोकसाहित्यातील स्त्रीप्रतिमा (तारा भवाळकर, १९९०)

**वाद-विचारसरणी व मराठी साहित्य**

गांधीवाद आणि मराठी साहित्य (संपा. द. दि. पुंडे, १९९५)

राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता (ज. घु. नाईकवाडे, १९८९)

मार्क्सवाद आणि मराठी साहित्य (वि.स. जोग, १९८१)

**परिचय-भाष्यपर तात्त्विक समीक्षा : नव्वदोत्तर प्रयत्न**

मराठी साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रात भारतीय आणि पाश्चात्त्य साहित्यसिद्धांतांची परिचयपर आणि भाष्यपर मांडणी करण्याचा जो मोठाच उद्योग नवोत्तर ते नव्वदोत्तर काळातील अनेक बुद्धिमान व विद्वान अभ्यासकांनी केला, त्याच परंपरेत शोभेल असा पाश्चात्त्य साहित्यसिद्धांतांचा विश्लेषक परिचय करून देण्याचे मौलिक कार्य 'आधुनिक समीक्षासिद्धांत' (२००७) या ग्रंथातून मिलिंद मालशे आणि अशोक जोशी ह्यांनी केले आहे. मराठी समीक्षेचा जवळपास स्वातंत्र्योत्तर ते इ.स. २०००पर्यंतचा प्रवास डोळ्यांसमोर ठेवून व त्याची यथायोग्य स्थाननिश्चिती करून मांडलेला हा अभ्यास मराठी समीक्षेसाठी व अभ्यासकांसाठी पथदर्शक ठरणारा आहे. 'आस्वाद, समीक्षा आणि सिद्धांत' या पहिल्या प्रकरणातून लेखकद्वयांची वाङ्मयीन आणि वैचारिक भूमिका स्पष्ट होते. त्यांनी मराठी समीक्षेचे 'आस्वादक समीक्षा आणि विश्लेषक मूल्यनात्मक समीक्षा असे फक्त दोन भागात वर्गीकरण करून मूल्यनात्मक समीक्षेचे

१. नवसमीक्षावादी/रूपवादी/कलावादी/स्वायत्ततावादी

२. मनोविश्लेषण, मार्क्सवाद ह्या विचारव्यूहांच्या आधारे जीवनवादी भूमिका

३. भाषा वैज्ञानिक-शैलीवैज्ञानिक

४. संरचनावाद व चिन्हमीमांसा, घटितार्थशास्त्र व अर्थमीमांसा

५. पाश्चात्त्य सैद्धांतिक परंपरेचे आढावापर व कोशरूप लेखन

असे पाच उपप्रवाह कल्पिले आहेत. यात खरंतर 'समीक्षाप्रवाह' म्हणून पहिल्या चारच भूमिकांचा विचार होऊ शकतो. परिचयपर लेखनाला 'समीक्षाप्रवाह' मानण्याची गरज वाटत नाही. मराठीतील सैद्धांतिक तात्त्विक समीक्षेची (सिद्धांतनिर्मिती आणि सिद्धांत-परिचय) मर्ढेकर ते नेमाडे ही स्वातंत्र्योत्तर ते नव्वदोत्तर अशी वाटचाल बघता 'आधुनिक समीक्षा-सिद्धांत' हा त्यापुढचा महत्त्वाचा टप्पा ठरतो आणि त्यातून मराठी समीक्षेचा १९५० ते २०१० ह्या कालखंडातील समीक्षाप्रवाहाचा एक बृहद् आराखडा स्पष्टपणे अभ्यासकापुढे साकार होतो. परंतु वरील वर्गीकरणाच्या संदर्भात काही प्रश्न सहजच निर्माण होतात. लेखकाच्या म्हणण्यानुसार ज्याप्रमाणे 'आस्वादनिष्ठ' (माझी संज्ञा) समीक्षेचे 'मूल्यांकन' अनुस्यूत असते, त्याचप्रमाणे समीक्षेचा पायाच 'साहित्यकृतीचा आस्वाद' हा असल्याने (लेखात अन्यत्र यासंबंधीचे विवेचन आले आहे!) मूल्यात्मक वा विश्लेषक समीक्षेत 'आस्वाद' अनुस्यूत असतोच! त्यामुळे 'साहित्यसिद्धांतांचे खंडन-मंडन' हा प्रवाह जर बाजूला ठेवला, तर 'निखळ उपयोजित समीक्षेचे' १. सिद्धांतनिष्ठ उपयोजित समीक्षा आणि २. आस्वादनिष्ठ उपयोजित समीक्षा असे दोन मुख्य प्रवाह मराठी समीक्षेच्या संदर्भात मानणे योग्य ठरते. 'आधुनिक समीक्षा-सिद्धांत' या ग्रंथाच्या मांडणीतील एक मोठी वैचारिक मर्यादा ह्यावर पडलेली कर्मठ मार्क्सवादी श्रद्धांची सावलीही आहे! त्यामुळे ह्यात बऱ्याच महत्त्वपूर्ण गोष्टी; उदाहरणार्थ भारतीय साहित्य सिद्धांत, मराठीतील संतांचे साहित्यविचार, इतर विचारवंतांनी वेळोवेळी मांडलेले साहित्यविचार, (योगी - देशीवादी साहित्यसिद्धांत, नेमाडे, देवी, मकरंद परांजपे इत्यादी देशीयतावादी विचारवंतांची समीक्षा-सिद्धांताविषयक मांडणी ह्यांना तुलनेसाठीसुद्धा योग्य स्थान मिळालेले नाही. अनेकांचा तर संदर्भसुद्धा यात दिसत नाही! (संदर्भग्रंथसूची वरून) एखाद्या कालबाह्य राजकीय विचारसरणीला कलेवराप्रमाणे अट्टाहासाने खांद्यावर बाळगण्याचा वा अत्रतत्र त्याच्या पुनरुज्जीवनाचा रेटलेला प्रयत्न वस्तुनिष्ठ अभ्यासाला मारक ठरणारा वाटतो. 'आस्वाद घेणे' या प्रक्रियेचा सरळ भावार्थ अनुभव घेणे, अनुभूती घेणे, जाणणे, समजून घेणे, इत्यादी असताना, ... मृत्यूची अटळता, क्लेशकारक 'अनुभव', युद्ध, हिंसा, ... शांतता! कोर्ट चालू आहे!, गोलपीठा, माझे विद्यापीठ यासारख्या साहित्यकृतीचा आपण 'आस्वाद' घेतो असे म्हणता येईल का? (पृ. ५) असा बाळबोध व अज्ञानजन्य प्रश्न पूर्वग्रहदूषित व एकांगी दृष्टिकोनाशिवाय निर्माण होऊ शकत नाही! त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी

केलेली टीकाटिप्पणी व शेरेबाजी अनावश्यक व अप्रस्तुत वाटणारी आहे. उदाहरणार्थ, गंगाधर गाडगीळांना सामाजिक बांधिलकी ही मूल्यसंकल्पना साहित्यमूल्य म्हणून अप्रस्तुत वाटते, परंतु मार्क्सवादी समीक्षकांना तशी ती वाटत नाही. (पृ. १७) इथे खरंतर गाडगीळांची व तत्सम समीक्षकांची भूमिका अजिबात समजून न घेता, तसेच 'सामाजिक बांधिलकी'सारखी प्रत्यक्ष समाजजीवन व्यवहारातील संकल्पना साहित्यसमीक्षेवर लादण्याची अप्रस्तुतता लक्षात घेता, मार्क्सवादी समीक्षकांमध्ये घुसडण्याची प्रवृत्ती ह्या लेखकाच्या कडव्या विचारधारेचे द्योतक ठरते.

### आस्वादनिष्ठ उपयोजित बृहद् समीक्षाविश्व : विविधता आणि एकात्मता

मराठीतील स्वातंत्र्योत्तर कालखंड हा ज्याप्रमाणे विविध साहित्यरूपांनी संप्रक्त आणि समृद्ध झालेला दिसतो, त्याचप्रमाणे आस्वादनिष्ठ उपयोजित समीक्षेचेही दालन अनेक अंगांनी आणि रंगांनी भरून गेलेले दिसते. स्वातंत्र्योत्तर काळाचे स्वातंत्र्योत्तर, साठोत्तर आणि नव्वदोत्तर असे तीन कालखंड भारतीय स्वातंत्र्य, महाराष्ट्र राज्यनिर्मिती आणि जागतिकीकरण ह्या धरितांच्या पार्श्वभूमीवर मानायला हरकत नाही. भारतीय राजकीय परिवर्तनाचा विचार करता आणीबाणीपूर्व आणि आणीबाणीपश्चात असे दोन कालखंड किंवा ढोबळेपणे त्यास काँग्रेसकाळ आणि काँग्रेसोत्तर काळ असेही म्हणता येऊ शकेल. परंतु मराठी साहित्यातील आणि समीक्षेतील परिवर्तनांचा विचार करता स्वातंत्र्योत्तर, साठोत्तर व नव्वदोत्तर या संज्ञा वापरणेच अधिक योग्य ठरते. ललित साहित्याची समीक्षा त्या साहित्याच्या अनुषंगानेच निर्माण होत आली आहे. ग्रंथनिबद्ध मराठी समीक्षेच्या आधारेच प्रस्तुत वाटचाल रेखाटायची असल्याने, त्या अंगाने समीक्षेचा विचार करता साहित्यनिर्मिती आणि समीक्षापर प्रतिसाद ह्या दोन गोष्टींत काळाचे वाजवीपेक्षा अधिक अंतर पडलेले स्पष्ट दिसते. ह्याची कारणे जशी समीक्षकांच्या वैयक्तिक जीवनाशी निगडित असू शकतात, तशीच ती महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक-वाङ्मयीन वातावरणाशीही निगडित दिसतात. विशेषतः राजकारणप्रेरित जातीयतेचा आणि वाङ्मयक्षेत्रातील कंपूशाहीचा मोठा फटका वाङ्मयव्यवहाराला, समीक्षा व्यवहाराला आणि त्यात अपेक्षित गुणवत्तेला बसलेला स्पष्ट दिसतो. या सर्व पार्श्वभूमीवर आपण उपयोजित साहित्यसमीक्षेचा विचार खालील विविध प्रकारच्या विषयपरिघात करता येऊ शकतो.

१. प्राचीन-मध्ययुगीन साहित्याची समीक्षा
२. वाङ्मयप्रकारनिष्ठ समीक्षा
३. साहित्यकृतीचा अभ्यास
४. लेखकाचा अभ्यास
५. वाङ्मयीन प्रवृत्ती-प्रवाहनिष्ठ समीक्षा
६. वाङ्मयीन सिद्धांतनिष्ठ समीक्षा
७. वाङ्मयातील विविध संप्रदायसापेक्ष समीक्षा
८. वाद-विचारसरणीनिष्ठ राजकीय समीक्षा
९. लोकसाहित्यसमीक्षा
१०. तौलनिक साहित्याभ्यास
११. संपादनकार्यसापेक्ष समीक्षा
१२. संशोधन-प्रबंधकेंद्री समीक्षा

विशिष्ट लेखनसीमेमुळे यातील काही निवडक व महत्त्वाच्या प्रवाहांचा विचार पुढील विवेचनात केला आहे.

### प्राचीन-मध्ययुगीन साहित्याची समीक्षा

प्राचीन आणि मध्ययुगीन मराठी साहित्याचे मोठेपण आणि त्याची वाङ्मयीन गुणवत्ता खऱ्या अर्थाने आधुनिक काळातच स्थापित झालेली दिसते. मराठी भाषेचा, साहित्याचा आणि संस्कृतीचा अक्षुण्ण प्रवाहही आधुनिक काळात मराठी समाजापुढे मांडला गेला. हे ऐतिहासिक महत्त्वाचे प्रवाह आधुनिक काळात निर्माण झाले. प्राचीन-मध्ययुगीन साहित्याच्या समीक्षेद्वारा घडून आले. विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात तर संतसाहित्याची वाङ्मयाच्या अंगानेही चिकित्सा होऊ लागली आणि श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय म्हणून त्याची प्रस्थापनाही होऊ लागली. दुसरीकडे प्राचीन (गाहासत्तसई)पासून ते अगदी अर्वाचीनच्या एका टोकापर्यंत (शाहिरी वाङ्मय म्हणून त्याची प्रस्थापनाही होऊ लागली. दुसरीकडे प्राचीन (गाहासत्तसई)पासून ते अगदी अर्वाचीनच्या एका टोकापर्यंत शाहिरी वाङ्मय) विभिन्न साहित्यप्रवाहांची वाङ्मयीन, सांस्कृतिक, सामाजिक, भाषिक, अशी विविधांगी समीक्षा करण्यात आलेली दिसते. ह्यांपैकी केवळ 'संतसाहित्यसमीक्षा' हा प्रांत घेतला तरी, त्याची एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून विचार करता येईल इतकी विविधांगी चिकित्सा स्वातंत्र्योत्तर काळात मराठीत घडून आली. त्यांपैकी केवळ संत ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि वाङ्मयाचा विचार केला तरी मराठीत त्याचं एक स्वतंत्र समीक्षाविश्व निर्माण झालेले दिसून येते. श्रीज्ञानदेव : चरित्र, ग्रंथ व

तत्त्वज्ञान (शं.वा. दांडेकर), ज्ञानदेव आणि नामदेव (शं.दा. पेंडसे), ज्ञानदेव आणि ज्ञानदेवी (रा.चिं. ढेरे), ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान (शं.दा. पेंडसे), श्रीज्ञानदेवदर्शन (संपा. ब.स. थेरकुंटवार), ज्ञानेश्वरी : स्वरूप, तत्त्वज्ञान (शं. दा. पेंडसे), ज्ञानेश्वरी : स्वरूप, तत्त्वज्ञान अणि काव्य (म.वा. धोंड), ज्ञानेश्वरीतील शिकवण (श्री.मा. कुलकर्णी), ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद (द.भि. कुलकर्णी), ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा (गं.बा. सरदार), अन्य ज्ञानदेवांचा, ज्ञानदेवींचा (यु.म. पठाण), इत्यादी अनेक ग्रंथ संतसाहित्यसमीक्षेत महत्त्वाचे ठरतात. सरदारांच्या 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती'पासून ते सदानंद मोरे यांच्या 'तुकारामदर्शन'पर्यंत संतांच्या साहित्याची प्रासंगिकता आणि प्रस्तुतता आधुनिक काळात मांडणाऱ्या अनेक विचारवंत– तत्त्वज्ञसमीक्षकांनी मराठी समीक्षेचे विश्व समृद्ध केले आहे.

**वाङ्मयकार, वाङ्मयकृती आणि वाङ्मयप्रकार**

वाङ्मयप्रकार, लेखक आणि साहित्यकृती ह्या तीन घटकांच्या अंगाने स्वातंत्र्योत्तर काळात अगदी आजपर्यंत म्हणजे २०२०पर्यंत विपुल व विविधांगी अशी दर्जेदार समीक्षा निर्माण झाली आहे. वाङ्मयाच्या अभ्यासाच्या चार प्रमुख शाखा म्हणजे वाङ्मयकाराचा अभ्यास, वाङ्मयकृतीचा अभ्यास आणि वाङ्मयप्रकाराचा अभ्यास, ह्या अंगाने स्वातंत्र्योत्तर काळात कादंबरी, कथा, कविता आणि नाटक ह्या चार प्रमुख वाङ्मयप्रकारांतील कलाकृतींचा, त्यांच्या निर्मात्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्याचा आणि त्यांच्या समग्र साहित्याचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास करण्यात आलेला दिसतो. हा अभ्यास प्रामुख्याने वाङ्मयप्रकाराच्या विविध घटकांच्या, आशयाच्या, तसेच आकृतिबंधाच्या अंगाने करण्यात आला आहे. 'व्यक्ती आणि वाङ्मयीन' या परिघात घडलेली ई समीक्षा त्या त्या कलावंताचे स्वतंत्रपणे वाङ्मयीन मूल्यमापन करीत असताना पूर्वकालीन आणि समकालीनांशी (त्या त्या आशय प्रवाहातील व त्या त्या वाङ्मयप्रकार प्रवाहातील) तुलनात्मक चिकित्सा करून मराठी वाङ्मयाच्या इतिहासात त्यांचे स्थान निश्चित करणारी अशी आहे. मध्ययुगीन काळातील ज्ञानदेव व तुकारामाच्या नंतर आधुनिक काळातील केशवसुत व बा.सी. मर्ढेकर ह्यांच्या साहित्याची सर्वाधिक संख्येने समीक्षा झालेली दिसते. मर्ढेकरांच्या कविता, आणि त्यांचे साहित्यशास्त्र ह्यावर मोठ्या प्रमाणात भाष्य करणारे व विविध अंगाने त्यांच्या काव्याची चिकित्सा करणारे उत्तमोत्तम समीक्षा ग्रंथ मराठीत निर्माण झालेले दिसतात. तुलनेने त्यांच्या कादंबऱ्यांची व संगीतिकांची समीक्षा कमी झाली. अलीकडील काळात प्रसिद्ध झालेल्या सुधीर रसाळ ह्यांच्या समीक्षाग्रंथाने तीही उणीव भरून काढलेली दिसते. मर्ढेकरांच्या कवितेच्या भाष्यकारांमध्ये गो.वि. करंदीकर, गंगाधर गाडगीळ, सुधीर रसाळ, वा.ल. कुळकर्णी, द.भि. कुळकर्णी, डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ. विजया राजाध्यक्ष, विनय हर्डीकर, धों.वि. देशपांडे, म.वा. धोंड इत्यादी प्रमुख आहेत. शिवाय अनेक समीक्षकांनी मर्ढेकरांच्या काव्याची अनेक अंगाने समीक्षा केलेली दिसते. इतर वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत स्वातंत्र्योत्तर काळात कविता या प्रकाराचे दालन अधिक समृद्ध दिसून येते. नवकवी मर्ढेकरांच्या तुलनेत शरच्चंद्र मुक्तिबोध आणि पु.शि. रेगे ह्या समकालीनांच्या काव्याची समीक्षा तुलनेने फारच अल्प आढळते. मुक्तिबोधांवर काही स्वतंत्र समीक्षाग्रंथ पाटणकर, मदन कुळकर्णी, रणधीर शिंदे, भारती सुदामे ह्यांनी लिहिलेले दिसतात. 'पु.शि. रेगे : वाङ्मयदर्शन' ग्रंथात रेग्यांची समीक्षा आली आहे. ह्याशिवाय मराठीत अनिल, (पंडितराव पवार), अरुण कोलाटकर (वसंत पाटणकर), भारतीय प्रभु (माधवी वैश्व), खानोलकर (जया दडकर), कुसुमाग्रज (अक्षयकुमार काळे, उषा देशमुख) ग्रेस (अक्षयकुमार काळे, वसंत पाटणकर, जयंत परांजपे, अजय देशपांडे, सुधीर रसाळ, राजेंद्र नाईकवाडे, बोरकरांची प्रेमकविता) रुपा परिच, नारायण सुर्वे (दिगंबर पाध्ये) व संपादित–सर्वसुर्वे : नारायण सुर्वे), बहिणाबाई चौधरी (स.ग. यादव), भालचंद्र नेमाडे (जयश्री शास्त्री, देखणी संबंधी–संपादक निळकंठ कदम), माधव ज्यूलीयन (सु. रा. चुनेकर), सदानंद रेगे (म.सु. पाटील), ना.धों. महानोर (श्रीकांत देशमुख, राजेंद्र नाईकवाडे), गोविंदाग्रज (अक्षयकुमार काळे, रा.ग. हर्षे), तांबे (आशा सावदेकर, जयंत वष्ट, भ.श्री. पंडित), बालकवी (रा.शं. बाळिंबे, कृ.स. मराठे, दमयंती पांढरीपांडे, एस.एस. वाडकर्णी, रमेश तेंडुलकर, वा.पु. गिंडे) विंदा करंदीकर (विजया राजाध्यक्ष), शांता शेळके (स.ग. यादव), इंदिरा संत (स.ग. यादव) सुरेश भट (द.भि. कुळकर्णी) इत्यादी कवींना स्वातंत्र्योत्तर काळात महत्त्वाचे समीक्षक लाभले. डॉ. अक्षयकुमार काळे यांचा 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन' या बृहद् समीक्षापर काव्यतिहास ग्रंथात स्वातंत्र्योत्तरपासून ते १९९०पर्यंतच्या शेकडो महत्त्वपूर्ण कवींची समीक्षा एकत्र वाचायला मिळते. हा ८०० पृष्ठांचा 'अर्वाचीन काव्येतिहास' म्हणजे रूढ पद्धतीचा केवळ कवींच्या नोंदी टिपणारा 'कोशग्रंथ' नसून गेल्या शतकभरातील जवळजवळ २००

प्रमुख कवींची त्यांच्या काव्यवैशिष्ट्यांसह मूल्यमापनात्मक स्थाननिश्चिती करणारा ‘काव्यसमीक्षा’ ग्रंथ आहे. त्यामुळे मराठी काव्यसमीक्षेत व एकूणच मराठी समीक्षेत या ग्रंथाचे स्थान महत्त्वपूर्ण ठरते. मराठी काव्यसमीक्षेत सिद्धांत, इतिहास आणि समीक्षा या तीन तत्त्वांचा उत्तम समन्वय साधून समीक्षा करणाऱ्या समीक्षकांची वानवा नाही. बहुतांशी समीक्षा ही साहित्य आणि साहित्यकृतिनिष्ठ अशा प्रकारची आहे. स्फुट रचनांचा सुटेपणाने आस्वाद घेतल्यानंतर, कलाकृतीच्या अंतरंगात शिरून त्यांचे विश्लेषण व मूल्यमापन आणि मग विविधतेतील एकत्वाचा शोध घेऊन त्या साहित्यिकाच्या साहित्यिक वैशिष्ट्यांची मूल्यमापनात्मक मांडणी व साहित्यप्रवाहातील त्यांची स्थाननिश्चिती असा हा अनुक्रम आहे.

मराठीतील काव्यसमीक्षा कवीच्या व्यक्तिमत्त्वापासून कवितेचा शोध सुरू करते, त्यानंतर आशयाचा व आशयाच्या विशिष्ट अभिव्यक्तीचा वेध आणि विश्लेषण, त्यानंतर विविध प्रकारच्या कवितांतील आशयसूत्रांतून काही समान सूत्रांचा शोध, त्यानंतर संश्लेषणप्रक्रियेतून समान सूत्रे शोधणे आणि मग एकूण काव्यवैशिष्ट्यांची नोंद घेत, अन्य पूर्वकालीन, समकालीन व उत्तरकालीनांशी तुलना करत त्या त्या कवीचे मूल्य व स्थान ह्यांची निश्चिती असा तो समीक्षाप्रवास घडतो. असा समग्रलक्षी अभ्यास काव्याप्रमाणेच विविध आकृतिबंधातून पाहायला मिळतो. कथा, कादंबरीच्या समीक्षेच्या तुलनेत चरित्र, आत्मचरित्र, निबंध, ललितबंध, यांची समीक्षा क्षीण स्वरूपात दिसून येते. कथा व कादंबरीची वाङ्मयप्रकारनिष्ठ आणि लेखकनिष्ठ समीक्षा मोठ्या प्रमाणात मराठीत झालेली दिसते. अशा समीक्षाग्रंथांची यादी लेखात अन्य मुद्द्यांच्या स्पष्टीकरणात आली आहे. तुलनेने निबंध, ललितबंध, चरित्र-आत्मचरित्र, ह्या वाङ्मयप्रकारांतील कलाकृतींची समीक्षा मराठीत अत्यल्प प्रमाणात दिसते. ह्याचे कारण निर्मितीची संख्यात्मक व गुणात्मक उपलब्धता हे आहे. कथा कविता, नाटक व कादंबरी हे जनमनाशी निकटचे वाङ्मयप्रकार असल्याने त्यांची निर्मिती आणि त्यांची समीक्षा सहजपणेच घडताना दिसते.

**दलित-ग्रामीण साहित्यसमीक्षा**

नवसाहित्यानंतरचे पहिले लक्षणीय परिवर्तन मराठी साहित्यात दलित साहित्याच्या रूपाने घडून आले. त्यामुळे समीक्षेचा १९७०पूर्वीचा विचारव्यूह बदलून तो अधिक सामाजिक, अधिक जीवनवादी, अधिक लौकिकवादी आणि अधिक वास्तववादी झालेला दिसून येतो. १९६० ते ७०च्या दशकात दलित साहित्यप्रवाह उगम पावला आणि विस्तारत गेला. विशेषतः काव्य आणि ‘आत्मकथन’ ह्या दोन आकृतिबंधांतून नव्या दलित जाणिवेला अभिव्यक्तीची वाट गवसली. खरंतर जागतिक पार्श्वभूमीच्या प्रभावातून घडून आलेल्या नवसाहित्यप्रवर्तनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय सामाजिक व राजकीय परिप्रेक्ष्यात घडून आलेले दलित साहित्याचे मराठी भाषेतील प्रवर्तन अधिक महत्त्वाचे मानले पाहिजे. मराठी साहित्याच्या पूर्वीच्या सामाजिक-सांस्कृतिक परिवेशाचा विचार करता त्या पार्श्वभूमीवर दलित साहित्याला मराठीला खरा नवसाहित्यप्रवाह मानले पाहिजे. ह्या प्रवाहाचे स्वागत आणि चिकित्सा मराठीत जरा चाचरत व चाचपून पाहात झालेली दिसते. ७०च्या दशकात ही दलितसाहित्य-समीक्षा ग्रंथरूपात प्रसिद्ध होऊ लागल्यानंतर मग मराठी वाङ्मयाचे अवकाश अधिक खुले आणि विस्तृत झाले. दलित साहित्याच्या संदर्भात समीक्षेचे कार्य खूप महत्त्वपूर्ण व लक्षणीय ठरले. दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह (भालचंद्र फडके १९७७), निळी पहाट (रा.ग. जाधव १९७८), मार्क्सवाद आणि दलित साहित्य (वि.स. जोग १९८५), दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञाव (बाबूराव बागूल १९८१), दलित वाङ्मय प्रेरणा आणि प्रवृत्ती (शंकरराव खरात १९७८), दलित साहित्याचे निराळेपण (प्रभाकर पांडे १९७९), हाक आणि आक्रोश (जनार्दन वाघमारे १९८४), दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप (यशवंत मनोहर १९७८), दलित कविता (म.सु. पाटील १९८१), दलित साहित्य : चिंतन (राजा जाधव १९८२), दलित साहित्य : एक आकलन (बाळकृष्ण कवठेकर १९८१) दलित जाणिवेच्या कवितेतील सूर्यप्रतीक (मदन कुळकर्णी १९९३), दलित साहित्य : चर्चा आणि चिंतन (गंगाधर पानतावणे १९९३), विद्रोहाचे पाणी पेटले आहे (गंगाधर पानतावणे १९७६), दलित कविता : एक दर्शन (ललिता कुंभोजकर १९८४), अशी अनेक नावे या संदर्भात सांगता येतील. ९०पर्यंत येतायेता दलित साहित्यप्रवाहात तोचतोपणा आणि आवर्त निर्माण झाले, तसेच समीक्षाही क्षीण झाली. ९०नंतरच्या कालखंडात मात्र नव्या जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर नव्या जाणिवांसह काही प्रभावी दलित कवी अवतीर्ण झालेले दिसतात. डॉ. रंगराव ह्यांच्या मराठी दलित कविता २००४ या दलित अकादमीच्या संपादनात १९६० ते २००० या काळातील मराठी दलित कवितेचे संकलन केले असून ९०नंतरच्या दलित काव्याची समीक्षा महेंद्र भवरे,

भूषण रामटेके, शैलेंद्र लेंडे, देवानंद सोनटक्के, किशोर सानप, आदी नवे समीक्षक करताना दिसतात.

स्वातंत्र्यपूर्वकाळात वेगळ्या व काहीशा व्याज स्वरूपात अस्तित्वात असलेला ग्रामीण साहित्याचा प्रवाह ६०नंतर नव्या अस्सल जोमदार रूपात मराठी साहित्यप्रांतात अवतीर्ण झाला. ह्या प्रवाहाचे स्वरूप दलित प्रवाहाप्रमाणे 'विद्रोही' न राहित्याने किंवा त्यासारखे 'चळवळी'चे न राहिल्याने त्याची अभिनिवेशी व स्वतंत्र समीक्षा करण्याची गरज प्रतीत झाली नाही. सोबतच हे ग्रामसंस्कृतिनिष्ठ साहित्य एकूणच मराठी साहित्यप्रवाहात मिसळून गेले आणि त्या मुख प्रवाहाचाच एक भाग बनले. त्यामुळे ग्रामीण कविता, कथा, कादंबरी ह्या आकृतिबंधात प्रभावी व लक्षणीय निर्मिती होऊनही त्याची केवळ 'ग्रामीण साहित्य' ह्या प्रवाहाअंतर्गत कप्पे बंद पद्धतीची समीक्षा लिहिण्याची गरज दलित प्रवाहाप्रमाणे निर्माण झाली नाही. तरीसुद्धा ग्रामीण साहित्याचा एक स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण प्रवाह म्हणून व एकूण मराठी साहित्याच्या पार्श्वभूमीवरील त्याचे वेगळेपण अधोरेखित करण्यासाठी जे समीक्षाग्रंथ निर्माण झाले, त्यामध्ये ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या (आनंद यादव, १९७९), ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव (यादव, १९९१), ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध (नागनाथ कोत्रापल्ले १९८५), ग्रामीण साहित्य : एक चिंतन (द.ता. भोसले १९७८), मराठी ग्रामीण साहित्य आणि प्रवाह (गो.म. कुलकर्णी, १९९९), ग्रामीण साहित्य (रा.रं. नारोडे १९९२), ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास (चंद्रकुमार नलगे १९९६), मराठी ग्रामीण इतिहास (कैलास सार्वे १९९९) इत्यादी ग्रंथातून स्वतंत्रपणे ग्रामीण साहित्यप्रवाहाची विविधांगी समीक्षा पाहायला मिळते. १९९०नंतरच्या कालखंडात मात्र ग्रामीण पार्श्वभूमीच्या कविता-कादंबऱ्यांची समीक्षा 'ग्रामीण साहित्य प्रवाह' या अंगाने न होता, एकूणच मराठी साहित्याच्या पार्श्वभूमीवर करताना समीक्षक दिसतात.

**तौलनिक साहित्याभ्यास**

तौलनिक साहित्याभ्यास हे समीक्षेचे एक महत्त्वपूर्ण क्षेत्र असून मराठीच्या समीक्षाव्यवहारात त्याकडे पुरेसे लक्ष दिलेले दिसून येत नाही. डॉ. निशिकांत मिरजकर, डॉ. भालचंद्र नेमाडे, डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, डॉ. गणेश देवी, डॉ. अशोक कामत, डॉ. आनंद पाटील, डॉ. निशिकांत ठकार इत्यादी काहींनी ह्या अभ्यासक्षेत्रात आपापल्या अभ्यासविषयानुसार महत्त्वाची भर घातलेली दिसते. ह्या सर्वांमध्ये डॉ. निशिकांत मिरजकर ह्यांनी मराठी साहित्याची भारतीय साहित्याच्या परीप्रेक्ष्यांत केलेली समीक्षा एक माजदंड म्हणून उठून दिसणारी आहे. 'तौलनिक साहित्य' (२०१६), 'साहित्यगंगा : प्रवाह आणि घाट' (२०००) ह्या मिरजकरांच्या पुस्तकांप्रमाणे 'तौलनिक साहित्याभ्यास' (वसंत बापट १९८१), 'तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा' (संपा. चंद्रशेखर जहागीरदार, हातकणंगलेकर गौरव ग्रंथ, १९९२), 'मराठी नाटकावरील इंग्रजी प्रभाव' (आनंद पाटील, १९९३), 'तोलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन' (आनंद पाटील, १९९८), 'टीकास्वयंवर' (भालचंद्र नेमाडे, १९९०), 'स्मृतिभ्रंशानंतर' डॉ. गणेश देवी, मराठी अनुवाद - म.सु. पाटील २००८), 'भारतीय साहित्याची संकल्पना' (बांडिवडेकर गौरव ग्रंथ, संपादक द.दि. पुंडे २००२), आधुनिक हिंदी साहित्य : अंतरंग (डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, २०१३), साहित्याचे मर्म : शोध आणि बोध (चंद्रकांत बांदिवडेकर, २००८) काही या अभ्यासक्षेत्रातील महत्त्वाचे ग्रंथ मानले पाहिजेत. तौलनिकची उपयोजित समीक्षा मराठीत फारच कमी प्रमाणात झाली असून या संदर्भातील पीएच.डी. प्रबंधलेखन मात्र मोठ्या प्रमाणात झालेले दिसते. १६०च्या वर प्रबंध तौलनिक अभ्यास करून लिहिले गेलेले दिसतात.

**वाङ्मयीन संपादकांचे समीक्षाकार्य**

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्याचे समीक्षाक्षेत्र विविध आयामांनी समृद्ध झालेले दिसते. एक हजार वर्षांची जिवंत साहित्यपरंपरा लाभलेल्या भाषेसाठी ही विविधता आणि समावेशकता स्वाभाविकच म्हटली पाहिजे. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या संशोधनाच्या संदर्भात पाठचिकित्सा आणि संपादने हा जसा एक महत्त्वपूर्ण भाग ठरतो, त्याचप्रमाणे आधुनिक (व प्राचीन) काळातील ललित साहित्याची विविध संपादने हा मराठी समीक्षाक्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण भाग ठरतो. स्वातंत्र्योत्तर काळात कविता, कथा, ललितबंध, निबंध या चार साहित्यप्रकारांच्या शेकडो संपादनांनी समीक्षेचे दालन समृद्ध करण्याचेच कार्य केले आहे. साहित्य अकादमीसारख्या संस्थांनी ह्याला काही एक हातभार लावला असला तरी विविध अभ्यासू संपादकांनी आणि प्रकाशकांनी या क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली दिसते. एखादा साहित्यकार, एखादा साहित्यप्रकार, एखादा साहित्यप्रवाह, एखादा आशयप्रवाह, एखादा कालप्रवाह, एखादी

साहित्यकृती समोर ठेवून त्या त्या परिघात संकलन, संपादन, निवड, विश्लेषण आणि मूल्यांकन करून तयार झालेली अनेकानेक उत्तमोत्तम संपादने स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत (२०२०) मराठी रसिकांच्या भेटीस आलेली दिसतात. अशा संपादनकार्यामुळे अनायासेच साहित्याची समग्र आणि समावेशक समीक्षाही घडून येते. (अर्थात ही संपादने दर्जेदार असतील तरच!) केवळ संकलन करून त्यास चार ओळींची प्रस्तावना लिहून पुस्तकेही काढली जातात, हा भाग वेगळा! मराठीत अशा संपादनांची एक समृद्ध परंपरा तयार झाली असून त्यात मराठीतील गौरवग्रथांच्या वाङ्मयनिष्ठ परंपरेने आणखी मोलाची भर पडली आहे. समग्र दिवाकर (सरोजिनी वैद्य, १९९६), वि. का. राजवाडे समग्र (मु.ब. शहा, १९९५), हरपले श्रेय (रा.श्री. जागे, १९५६), केशवसुत काव्य आणि कला (वि.स. खांडेकर, १९५६), झपूर्झा (निवडक केशवसुत, वि.म., गो.म. कुलकर्णी, १९६२), फुलराणी (निवडक बालकवी, कुसुमाग्रज, रा.शं. वाळिंबे, १९५७), रसयात्रा (बरेकर, शंकर वैद्य १९६९), प्रवासी पक्षी (शंकर वैद्य, ८९), वाग्वैजयंती (रा.शं. वाळिंबे), पिंपळपान (कुसुमाग्रज ७०), बोरकरांची कविता (पाडगाव १९२०), चांदनवेल (कुसुमाग्रज, गो.म. कुलकर्णी, १९६२), महाराष्ट्रलक्ष्मी (निवडक विनायक, म.ना. अदवंत १९६३), सुहृदगाथा (निवडक रेगे, गंगाधर पाटील १९७५), पु.शि. रेगे यांची निवडक कविता (प्रकाश देशपांडे, १९९४) इत्यादी विविध संपादने म्हणजे उत्तम काव्यसमीक्षेचे नमुने आहेत. अलीकडील काळात लोकवाङ्मयग्रह, पॉप्युलर प्रकाशन किंवा इतरही प्रकाशकांनी कवी-कथाकारांची संपादने काढण्याचा जो सपाटा लावलेला दिसतो, तो मराठीच्या निरामय व समृद्ध वाङ्मयीन परंपरेचे एक द्योतक आहे. वरील यादीत काव्याची स्पंदने स्वाभाविकपणेच अधिक दिसतात. ह्याशिवाय कुंजविहारी, अनिल, विंदा, संजीवनी, महानोर, शांता शेळके, सदानंद रेगे, वामन कर्डक, सुरेश भट, वि.स. खांडेकर, महात्मा फुले, रघुनाथ, माधव जूलियन, चंद्रशेखर, माधवानुज, कुंजविहारी, इत्यादी अनेक कवींच्या कलाची आशयपूर्ण संपादने मराठी अभ्यासकांना उपलब्ध आहेत. याशिवाय पत्रपुष्पण केशवसुत ते पाडगावकर (६४), काव्यसरिता (७३), काव्यगंगा (८५), पुन्हा कविता (६५), पुन्हा एकदा कविता (८२), आठवणीतल्या कविता (खंड १ ते ४, १९८९ ते १९९५), आव्हान (६०नंतरच्या १३ कवयित्री १९९०), त्रिदल (बालकवी, कुसुमाग्रज, इंदिरा संत १९९३), चैतन्यवेल (आरती प्रभू, नारायण सुर्वे, अनुराधा पाटील १९९८), सौंदर्योत्सव (तांबे, बोरकर, शांताबाई ९६) कविता विसाव्या शतकाची (१२० कवींच्या कविता- केशवसुत ते प्रज्ञा पवार, २०००), गझलधारा (१९९४) भारत काव्यसंग्रह (१५९ मराठी कवी, १९६१), तंव चरणी ही अञ्जली (म. गांधीवरील कविता १९६९), विद्रोही कविता (७८), मराठी प्रेमकविता (८५ ते ७५, ७६ कवी ११२ कविता, १९८७), आदिमाया (करंदीकरांची स्त्रीकविता) इत्यादी कविता-संपादनांचा उल्लेख करता येईल. याशिवाय निबंध, वैयक्तिक लेख, ललित निबंध, ह्यांचीही संपादने प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे गर्जा जयजयकार एक जागरण (८७), विशाखा : अर्घ्यादान (९४) बालकवींची औदुंबार कविता : विविध अर्थध्वनी (१९९१), चाफाः कविता आणि विविध समीक्षा (१९९५), रणांगण : समीक्षेची ६ वर्षे २००६, विपात पेले (२००८), गोत्रावळा : साद-प्रतिसाद (१९९१), महानिर्वाण : समीक्षा व संस्मरणे (१९९९) देखणी संबंधी (२०००), कोसलाबद्दल (१९७९), नटसम्राट समीक्षा (८६), माझे विद्यापीठ (१९९३), सर्व सुर्वे : नारायण सुर्वे, स्वामी : एक शोध (२००१), चांगदेव चतुष्ट्यासंबंधी (२००१), हरिभाऊ : विविध दर्शन (६४), आचार्य अत्रे : विविधदर्शन (१९५९), अमृतसिद्धी (पु.ल.चे साहित्य खंड १ व २), व्यंकटेश माडगूळकर : माणूस आणि कलावंत (९६), गंगाधर गाडगीळ व्यक्ती आणि सृष्टी (१९९७), महात्मा फुले : शोधण्या नव्या दिशा (१९९८) आम्ही पाहिलेले फुले (१९९३) इत्यादी संपादने मराठी समीक्षेत्र लक्षणीय भर घालणारी ठरली आहे. याशिवाय शंभर एक उत्तम गौरवग्रंथ स्वातंत्र्योत्तर काळात प्रकाशित झालेले दिसतात. या ग्रंथांतून विविध वाङ्मयीन विषयांची सामग्राने चिकित्सा करण्याचा प्रयत्न झाला. समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह (द.भि./१९८५), साहित्य : अध्यापन आणि प्रकार (वा.ल./१९८७), भारतीय साहित्याची संकल्पना (बांदिवडेकर/१) आजचे मराठी साहित्य (प्रभुदेसाई/९९५), प्राचीन-अर्वाचीन साहियानु बंध (वाबगावकर/२००७) अर्वाचीन मराठी कालमीमांसा (अक्षयकुमार काळे/२०१४), साहित्य : ग्रामीण आणि दलित (डॉ. मदन कुलकर्णी) इत्यादी अनेकानेक गौरवग्रंथांनी मराठी साहित्यसमीक्षेत खूपच मौलिक भर घातलेली असून नव्या अभ्यासकांची पायवाट त्यातून रुंद झालेली दिसते. ह्याशिवाय स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेचा आणि वाङ्मयाभ्यासाचा पट मांडणारी, समीक्षेच्या विविध आयामांवर प्रकाश टाकणारी अशीही अनेक संपादने मराठीला लाभली

आहेत. विशेषतः १९७५नंतरच्या कालखंडात! ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.
वाङ्मयीन शैली आणि तंत्र – संपा : हातकणंगलेकर १९८१
संशोधन : स्वरूप आणि पद्धती – संपा. सु.रा. चुनेकर,१९८३
वाङ्मयेतिहासाची संकल्पना – संपा. दत्तात्रय पुंडे, १९८६
वाङ्मयेतिहासलेखन : स्वरूप आणि समस्या – संपा. विद्यागौरी टिळक/१९९९
मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप – संपा. पवार/ हातकणंगलेकर १९८०
आठोत्तरी मराठी समीक्षा–संपा. केशव गर्दे – १९९६
द.ग. गोडसे यांची कलामीमांसा – संपा. सरोजिनी वैद्य/ वसंत पाटणकर/१९९७
शोकनाट्याची मूल्यतत्त्वे – संपा. गोकाककर/दुंडगेकर–१९७६
अभिरुची : ग्रामीण आणि नागर – संपा. गो.म. कुलकर्णी–१९७६
दलित साहित्य : एक अभ्यास–संपा. अर्जुन डांगळे–१९७४
मराठी टीकाकार (चिपळूणकर व प्र. पाध्ये/– संपा. म.वि. गोखले/जोगळेकर/१९७९
भाषा व साहित्यसंशोधन – संपा. वसंत जोशी, १९८१ (भाग–१)
भाग २ – संपा. जोशी/जोगळेकर, १९८५
भाग ३ – संपा. जोशी/अडवंत, १९...
मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह – संपा. शरण लिंबाळे
मराठी टीका – संपा. वसंत दावतर, १९६६
मराठी समीक्षा – संपा. रा.श्री. जोग/वा.ल./श्री. पु. भगत/ १९७२
नवसमीक्षा : काही विचारप्रवाह– संपा. गो.म. कुलकर्णी १९८२
भारतीय साहित्यविचार – संपा. भालचंद्र खांडेकर/गोविलकर १९८८
पाश्चात्त्य साहित्यविचार – संपा. भालचंद्र खांडेकर/१९८९
नाट्यसमीक्षा : काही दृष्टिकोन – संपा. वि.भा. देशपांडे–१९९०
वाङ्मयीनवाद : संकल्पना व स्वरूप – संपा. सीताराम रायकर व इतर १९९०
गांधीवाद आणि मराठी समीक्षा – संपा. द.दि. पुंडे– १९९५
निवडक मराठी समीक्षा – संपा. पवार/हातकणंगलेकर/ १९९९

१९३८ ते २००७पर्यंतच्या मराठीतील प्रबंधांची सूची डॉ. वसंत कुलकर्णी ह्यांनी तयार केला असून तिची नवी आवृत्ती २०११ (साहित्य प्रसारकेंद्र, नागपूर)मध्ये प्रकाशित झाली. ह्या सूचीत १९३८ ते २००७ या कालखंडातील मराठी प्रबंधांची माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. मराठी समीक्षेतील अनेक उत्तमोत्तम समीक्षाग्रंथ हे मूळातले पीएच.डी. प्रबंधांसाठी केलेले संशोधनप्रकल्प असल्याचे लक्षात येते. त्यासाठी मराठी साहित्यातील कितीतरी उदाहरणे सांगता येतील. उपरोक्त सूचीतील नुसती नावे वाचली, तरी ही गोष्ट सहज लक्षात येते. त्यामुळे विद्यापीठीय संशोधनाने मराठी समीक्षेत खूप मोलाची भर घातली आहे. यात संशय नाही. १९५२पूर्वी मुंबई व नागपूर ही दोनच विद्यापीठे होती. त्यामुळे बहुतांशी प्रबंध (फक्त ९ प्रबंध पूर्वीचे आहेत) हे स्वातंत्र्योत्तर काळातच निर्माण झाले आहेत. या प्रबंधांची एकूण संख्या जवळपास १७०० इतकी आहे. त्यापैकी २५–३० टक्के प्रबंध ग्रंथरूपात प्रसिद्ध झाले, त्यास 'उत्तम समीक्षाग्रंथा'चा दर्जा दिला जाऊ शकतो, असे गृहीत धरले तरी अंदाजे ५००इतकी संख्या भरते. म्हणजे हे संशोधन क्षेत्र मराठी समीक्षेसाठी मोलाचे ठरले आहे असेच मानायला हवे. कुलकर्णी ह्यांनी प्रबंधाचे विषयावार वर्गीकरण मराठी वायय, तौलनिक साहित्याभ्यास व भाषाशास्त्र या तीन भागात केले आहे. त्याचे साठवर उपविभागही त्यांनी केले असून त्यावरून मराठीच्या विविधांगी अभ्यासक्षेत्रातील कल्पना येते. यातील अनेक समीक्षाग्रंथांची नावेलेखीत अत्रतत्र आलेली आहेतच. विशेषत: वा.ल. कुलकर्णी, अ.ना. देशपांडे, द.भि. कुलकर्णी, श्री.मा. कुलकर्णी, डॉ. यू.म. पठाण, डॉ. भीमराव कुलकर्णी, डॉ. सरोजिनी वैद्य, डॉ. रा.शं. वाळिंबे, डॉ. भालचंद्र फडके, प्रा. गो.म. कुलकर्णी, डॉ. वि.भा. देशपांडे, डॉ. एस.एस. भोसले, डॉ. अरविंद वामन कुलकर्णी, प्रा. रा.श्री. जोग, डॉ. वि.भा. देशपांडे, डॉ. एस.एस. भोसले, डॉ. अरविंद वामन कुलकर्णी, प्रा. रा.श्री. जोग, डॉ. वि.भा. देशपांडे, डॉ. एस.एस. भोसले, डॉ. अरविंद वामन कुलकर्णी, प्रा. ह.श्री. शेणोलीकर, डॉ. आनंद यादव, डॉ. विजया राजाध्यक्ष, डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ. व.दि. कुलकर्णी, प्रा. गंगाधर पाटील, डॉ. उषा देशमुख, डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ. वि.स. जोग, डॉ. ग्रामोपाध्ये, प्रा. भ.श्री. पंडित, प्रा. भगवंत देशमुख, डॉ. अनंत देशमुख, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. नसिराबादकर, डॉ. निर्मलकुमार फडकुले, डॉ. गो.मा. पवार, डॉ. हेमंत इनामदार, डॉ. गं.ना. जोगळेकर, डॉ. गंगाधर पानतावणे,

डॉ. श्री.दं. कुळकर्णी, डॉ. रमेश धोंगडे, डॉ. म.रा. जोशी, डॉ. वा.के. लेले, डॉ. कल्याण काळे, डॉ. पु.य. देशपांडे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, डॉ. स.रा. गाडगीळ, डॉ. चंद्रकांत बांदिवडकेर, डॉ. सुधीर रसाळ, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. श्री. दं. कुलकर्णी, वि.रा. करंदीकर, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. मा.गो. देशमुख, प्रा. वसंत दावतर, डॉ. वसंत पाटणकर, डॉ. दत्तात्रय पुंडे, डॉ. यशवंत पाठक, डॉ. तळघट्टी, डॉ. सदाशिव कव्हाडे, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. नागनाथ कोतापल्ले, डॉ. के.ना. वाटवे, डॉ. मु.श्री. कानडे, प्रा. अ.का. प्रियोळकर, डॉ. शं.दा. पेंडसे, डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे ही काही प्रबंधमार्गदर्शकांची नावे नमुन्यादाखल नोंदली आहेत. ह्यांचे स्वतःचे प्रबंधग्रंथ आणि ह्यांच्या शिष्यांचे उत्तमोत्तम प्रबंध मिळून मराठी समीक्षेचा एक फार मोठा भाग व्यापलेला आहे. ही यादी करताना ग्रंथरूपात प्रसिद्ध प्रबंधांचाच विचार केला आहे. विविध विद्यापीठातील प्रबंधलेखनांमुळे मराठी समीक्षा किती अंगांनी समृद्ध झाली आहे, ह्याची कल्पना येऊ शकते.

**अध्यापन आणि समीक्षा**

मराठीत जशी संपादक आणि निबंधकार अशी थेट जुळणी तशी प्राध्यापक आणि समीक्षक हीही. अनुबंध खूप प्रकर्षाने जुळलेला दिसतो. राष्ट्रवादी विचारवंत म्हणन ख्यात असलेले प.ग. सहस्रबुद्धे हे मराठा विचारवंत पीएच.डी. ही पदवी प्राप्त करणारे पहिले संशोधक. त्यांच्या 'मराठा ललित साहित्यातील स्वभावलेखन' या न.चिं. केळकरांच्या मार्गदर्शनाखाली लिहिलेल्या आणि वा.म. जोशी यांनी तपासलेल्या प्रबंधाला मुंबई विद्यापीठाने १९३९ मध्ये पीएच.डी. पदवी प्रदान केली होती. ४६ ते ६४ अशी जवळजवळ दोन दशके त पुण्याच्या एस.पी. कॉलेजात मराठीचे अध्यापनकार्य करत होते. प्रामुख्याने वैचारिक निबंधकार व भारतीय संस्कृतीचे भाष्यकार म्हणून मराठी विचारविश्वाला ते परिचित आहेत. मराठीतील दुसऱ्या आचार्य पदवीचा मान मिळविणारे आणि नागपूरच्या हिस्लॉप महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करणारे थोर वाङ्मयसेवक म्हणजे डॉ. शं.दा. पेंडसे. वारकरी संप्रदायाच्या प्रतिष्ठेचे रक्षण आणि संतपरंपरेचे मंडन करण्याच्या हेतूने पेंडसेंनी मराठीत संतसाहित्यसमीक्षेचा एक संस्कृतिनिष्ठ महामार्ग घालून दिलेला दिसतो. भारतीय तत्त्वज्ञानाच्या आणि संतसाहित्याच्या सखोल व्यासंगातून त्यांनी केलेली ज्ञानदेव ते रामदास अशी चिरेबंदी मांडणी कोणत्याही काळात संतसाहित्याच्या अभ्यासकाला निश्चित आणि आश्वासक वाट दाखवणारी ठरते... श्री ज्ञानेश्वराचे तत्त्वज्ञान या विषयावर आचार्य पदवी प्राप्त करणाऱ्या पेंडसेंनी ज्ञानदेव, नामदेव, तुकोबा आणि रामदास या महाराष्ट्रीय संतपंचकावर मौलिक संशोधनग्रंथ निर्माण करून संतमंडळाला एका सूत्रात बांधण्याचा अवर्णनीय उपक्रम केला. अशाच प्रकारे डॉ. शं.गो. तुळपुळे यांच्यापासून ते डॉ. सदानंद मोरे यांच्यापर्यंतच्या पुणे विद्यापीठाशी संबंधित महनीय अभ्यासकांनी संतसाहित्यसमीक्षेचा समन्वयशील, उदार, समावेशक आणि समंजस प्रवाह सिद्ध केलेला दिसतो. डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. सतीश बडवे यांनी आपल्या संशोधनपर संतसाहित्य समीक्षेचे बीजप्रवाह या ग्रंथात मराठीतील एकूणच संतसापेक्ष समीक्षेचा आढावा घेतलेला दिसतो. हा समीक्षेचा आणि अध्यापन-कार्याचा सेतू वा.ल. कुलकर्णीसारख्या मराठीतल्या श्रेष्ठ समीक्षकांच्या वाङ्मयप्रवासातून प्रत्ययाला येतो. वालंची ही परंपरा पुढे त्यांचे विद्यार्थी डॉ. सुधीर रसाळ यांनी एका १९ काव्यविषयक बीजग्रंथाची (कविता आणि प्रतिमा) निर्मिता करून पुढे नेलेली दिसते. रसाळांचे अलीकडील 'वाङ्मयीन संस्कृती' हे पुस्तकही त्यांच्या व्यापक व्यासंगाची साक्ष देणारे आणि सांस्कृतिक समीक्षेच्या मार्गावरील नव्या अभ्यासकांना वाट दाखवणारे असे आहे.

मराठीच्या साधकांची मोठी मांदियाळी नागपूर विदर्भाच्या भूमीचेही एक वैशिष्ट्य ठरावे. पेंडसे, कोलते, डोळके, मिरांशी, देशपांडे इत्यादी अस्सल जातिवंत... संशोधक तर आपल्याला दिसतातच, परंतु समीक्षेच्या आणि ललित साहित्याच्या क्षेत्रातही शिक्षकांच्या थोर मांदियाळीची कोरीव पदचिन्हे उमटलेली स्वच्छ पाहता येतात. ध्येयप्रवण अध्यापकांनी आपल्या धाराप्रवाही अध्यापनासोबतच प्रभावी अशा साहित्यकृतींनी मराठी साहित्याची दालने समृद्ध केलेली दिसतात. भ.श्री. पंडित, डॉ. अ.ना. देशपांडे, डॉ. द.भि. कुलकर्णी, डॉ. म.रा. जोशी, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. आशा सावदेकर, डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ. मदन कुलकणी, डॉ. वि.स. जोग अशी निष्ठावंत अभ्यासकांची परंपरा नागपूरला लाभलेली दिसते, ती अगदी आजतागायत!

**मराठी ललितबंध आणि विनोद : एक समीक्षारूप**

मराठी साहित्याला समीक्षेप्रमाणेच 'ललितबंध आणि 'विनोद' ह्या दोन आकृतिबंधांचीही समृद्ध परंपरा लाभली आहे आणि त्यांच्यातील अनुबंधाचा एक धागा

समीक्षाव्यवहाराशी जुळतो. 'ललितबंध' आणि त्याचा एक उपप्रकार, शोभणारा 'विनोद' (विशेषतः पुलंचा विनोद) ही मुख्यत्वे संस्कृती, समाज आणि साहित्य ह्याविषयीचे एका व्यक्तिमनाचे 'भाष्य' असते. आत्मपर ललितबंधही बहुधा संस्कृति-समाज-साहित्यभाष्याचे रूप धारण करीत असतो. दुर्गाबाई, इरावतीबाई, पु.लं, ग्रेस, करंदीकर, ह्यांचे ललितबंध असे 'आत्मपर संस्कृतिभाष्य' ठरतात बऱ्याचदा! ह्यातून मग एक प्रकारची साहित्य-समीक्षा आकाराला येताना दिसते. साहित्याचे मर्म उलगडून दाखविण्याचा आस्वादनिष्ठ प्रयत्न अनेक ललितबंधातून होताना दिसतो. उदा. पैसाचा खांब (दुर्गाबाई), आकांताचे देणे, मृगजळाचे बांधकाम (ग्रेस), इत्यादी लेखांतून महत्त्वपूर्ण साहित्यसमीक्षासूत्रे वाचकांच्या हाती लागतात. ग्रेसांनी 'मृगजळाचे बांधकाम आणि अन्य संग्रहातून केलेली स्वतःच्या आणि ज्ञानदेवासहित अन्य कवींच्या काव्यांची काव्यात्म समीक्षा म्हणजे त्यांचे ललितबंध असा अनुबंध दृष्टीस पडतो. 'टेकडीवरचा पाऊस आणि भावेसारखे लेख किंवा पाश्चात्त्य लेखकांचे संदर्भ असलेले ललितबंध ह्या संदर्भात लक्षणीय ठरतात. दुसरीकडे श्री.के. क्षीरसागर, द.भि. कुलकर्णी ह्यासारख्या समीक्षकांचे काहीएक समीक्षालेख, ललितबंधांच्या प्रांतात शिरताना दिसतात. 'काव्यात्म टीका' ह्या ललितबंधाच्या एका रूपाचे ते प्रकटीकरण असते. आस्वादपर समीक्षालेखांना जे आत्मपर रूप लाभते, त्यातून हे 'ललितलेख' आकाराला आलेले असतात. त्यातून अनेकदा एखाद्या कथा, कविता, कादंबरी विषयीची मर्मदृष्टी वाचकांना अनायास प्राप्त होते आणि ती एखादी कलाकृती समजून घेण्यास मोठ्या समीक्षाग्रंथापेक्षा अधिक उपयुक्त ठरते. एखाद्या कोरड्या बुद्धिवादी विद्वानाने क्लिष्ट, किचकट, भरताड शैलीत, अनावश्यक संदर्भ देत व विद्वतेचा देखावा करीत केलेल्या समीक्षेपेक्षा ही अशी आस्वादपर व आत्मपर, 'ललितबंधात्म समीक्षा' अधिक अर्थपूर्व व उच्च दर्जाची ठरते. ललितबंधाप्रमाणेच विनोदी लेखनातूनही बऱ्याचदा 'समीक्षा' प्रकटत असते. पु.ल. देशपांडे ह्यांच्या 'मराठी वाङ्मयाचा गाळीव इतिहास'सारखे विनोदी लेखन तर उघडच एक वाङ्मयीन भाष्य असते, परंतु त्यांच्या इतरही विनोदी लेखनातून ते सतत साहित्यावर मार्मिक भाष्य करताना दिसतात. त्यांची व्यक्तिचित्रे, त्यांचे प्रवासलेख, मार्मिक व्यंगचित्रे (जावे त्यांच्या देशा), त्यांच्या एकांकिका ह्यातून हे साहित्यभाष्य व्यक्त होताना दिसते. वाङ्मयीन व्यवहारावर प्रामुख्याने उपरोधिक व तिरकस भाष्य करून व त्यातील विसंगती टिपत विनोदी लेखन करणारे जयवंत दळवी आणि त्यानंतरचे महत्त्वाचे विनोदकार मुकुंद टांकसाळे ह्यांचे बहुतांशी लेखन म्हणजे एक प्रकारची 'मराठी साहित्य समीक्षा'च ठरते.

**नव्वदोत्तर समीक्षेचा क्षीण प्रवाह**

साहित्याची समीक्षा ही स्वाभाविकपणेच साहित्यकृतींचे आणि साहित्यप्रवाहांचे अनुसरण करणारी असते. साहित्यकृती, तिचा निर्माता, साहित्यकृतीचा आकृतिबंध, साहित्यकृतीचा निर्मितिकाळ आणि साहित्यकृतीचा विशिष्ट आशयप्रवाह ह्या पाच गोष्टींचे विश्लेषण आणि मूल्यमापन समीक्षा करते. ती जशी साहित्याचे मूल्यन-परीक्षण आणि प्रस्थापन करते, तसेच ती साहित्यकृती आणि रसिक ह्यांना जोडणारा सेतूही बनते. स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेची वाटचाल बघताना स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याच्या वाटचालीवर दृष्टिक्षेप टाकावा लागतो. स्वातंत्र्योत्तर साहित्याचे पहिले वळण 'नवसाहित्य' या नावाने ओळखले जाते. खरंतर 'नवसाहित्य' हे नामाभिधान योग्य नसले आणि केवळ ते पाश्चात्त्य साहित्यातील संकल्पनांचे अनुकरणमात्र असेल, तरी मराठीच्या संदर्भात ती एक वाङ्मयीन सोय म्हणून मान्य करावी लागते. प्रत्येकच कालखंडातले ती एक वाङ्मयीन सोय म्हणून मान्य करावी लागते. प्रत्येकच कालखंडातले 'नवे' हे वेगळे असते; आणि तेच कालांतराने 'जुने' ठरू शकते. साधारणपणे १९४५ ते १९६० हा नवसाहित्याचा कालखंड मानला जातो. त्यानंतर १९६० ते १९९० हा साठोत्तरी नव्या साहित्यप्रवाहांचा कालखंड आणि १९९० ते २०२० हा नवदोत्तरी जागतिकीकरणोत्तर साहित्याचा कालखंड मानला जातो. नवकाव्य आणि नवकथा हे नवसहित्याचे दोन उपप्रवाह, स्वातंत्र्योत्तर काळात उदयाला आले, तर गंमत म्हणजे नवनाट्याचा व नवकादंबरीचा प्रवाह मात्र १९६०नंतर उदयाला आलेला दिसतो. 'एक शून्य बाजीराव'मध्ये तेंडुलकरांच्या नाटकांमध्ये नवनाट्याचा आणि नेमाड्यांचा 'कोसला'पाशी नवकादंबरीचा उगम मानला जातो. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील साहित्याच्या आशयाच्या व अभिव्यक्तीच्या पार्श्वभूमीवर लक्षणीय बदल स्वातंत्र्योत्तर साहित्यातील आशय-अभिव्यक्तीरूपात झालेले दिसून येतात. नवसाहित्याच्या वळणानंतर दुसरे स्वातंत्र्योत्तर वळण दलित-आंबेडकरवादी साहित्य आणि ग्रामीण साहित्य ह्या दोन प्रमुख साहित्यप्रवाहांच्या रूपाने दिसून येते. विशेषकरून ६० ते ७०च्या दशकात हे दोन नवे प्रवाह मराठीत उदयाला आले. त्यानंतरच्या थोड्या पुढच्या कालखंडात 'स्त्रीवादी'

व ‘आदिवासी’ हे दोन प्रवाह उदयाला आलेले दिसतात. त्याच काळात नवसाहित्याचा पुढचा टप्पा म्हणता येईल असा ‘महानगरी साहित्याचा’ (कथा, कविता, नाटक, कादंबरी) प्रवाह मराठीत उगवलेला पाहायला मिळतो. हे विविध बदल साधारणपणे १९६० ते १९९० ह्या कालखंडात घडत गेलेले दिसतात. त्यानंतरचे वळण जागतिकीकरण, संगणकक्रांती आणि माध्यमक्रांती ह्या तीन घटितानंतरचे साहित्याचे वळण मानले पाहिजे. ९०नंतरचा कालखंड पूर्वीच्या विविध साहित्यप्रवाहांतीलच नव्या बदलांचा कालखंड ठरतो. जागतिकीकरण, खासगीकरण, उदारीकरण, संगणकक्रांती, महाजाल, माध्यमक्षेत्रातील आमुलाग्र बदल, नवनवी दृक्‌श्राव्य माध्यमे, वाहिन्या, सार्वत्रिक (social media) माध्यमे, ग्लोबल व्हिलेज, इत्यादी विविध गोष्टी आणि संकल्पनांच्या आगमनानंतरचे व प्रभावानंतरचे साहित्य म्हणजे नव्वदोत्तर साहित्य म्हटले पाहिजे. हाच काळ स्वाभाविकपणेच ‘वाचनसंस्कृती’चा ऱ्हासकाळ ठरल्यामुळे, एकूणच वाचन-व्यवहार, वाङ्मयव्यवहार संपुष्टात आल्यामुळे त्याचा आनुषंगिक परिणाम समीक्षा-व्यापारावर झालेला दिसतो. मुद्रणसुलभतेमुळे एकीकडे ग्रंथनिर्मिती मोठ्या प्रमाणावर होत असताना वाङ्मयीन नियतकालिके, वृत्तपत्रांच्या वाङ्मयीन पुरवण्या व इतर माध्यमे आणि क्षेत्र गेल्याने समीक्षा-व्यवहार मात्र दुसरीकडे थंडावलेला दिसून येतो.

नव्वदोत्तर साहित्याची नवी समीक्षा साधारणपणे एकविसाव्या शतकात ग्रंथरूपाने प्रसिद्ध होऊ लागलेली दिसते. त्यात अजूनही काही विशेष लक्षणीय असे घडलेले दिसत नाही. उत्तर-आधुनिकतावाद, उत्तर-वसाहतवाद, देशीवाद आदी मापदंड लावण्याचा प्रयत्न काही मंडळी करताना दिसतात. काही जुनेजाणते समीक्षकही नव्वदोत्तर कविता, कथा, कादंबरी ह्या प्रकारांतील साहित्याची समीक्षा करताना दिसतात. नव्वदोत्तर काळातील नव्या समीक्षकांमध्ये डॉ. महेंद्र भवरे (मराठी कवितेच्या नव्या दिशा), डॉ. किशोर सानप (युगांतराची कविता २०१९, जुने समीक्षक, पण नव्या काव्याची समीक्षा!), डॉ. नितीन रिंढे (पासोडी), डॉ. देवानंद सोनटक्के (कवितेचा अंतःस्वर २०१८), डॉ. अशोक इंगळे (नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा), डॉ. अशोक पळवेकर (मर्ढेकर-सुर्वे : दोन युगमुद्रा), डॉ. रवींद्र इंगळे चावरेकर (सिंधुकालीन लिपी आणि भारतीय भाषांचा इतिहास/ तसे हे काही समीक्षेचे पुस्तक नाही!), विश्राम गुप्ते (नवं जग नवी कविता, नवं जग नवं साहित्य), डॉ. अजय देशपांडे (आकलन आणि आक्षेप २०१५, ग्रेस : वेदना आणि सौंदर्य २०१५), डॉ. भूषण रामटेके (जागतिकीकरण आणि साहित्यसमीक्षा, २०१९), डॉ. रणधीर शिंदे (दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांची कविता, ज्वालेचे फूल : शरच्चंद्र मुक्तिबोधः व्यक्ती आणि वाङ्मय), डॉ. प्रमोद मुनघाटे (आदिवासी कादंबरी आणि इतर २००५, सृजन-संवाद, अठराशे सत्तावन आणि मराठी कादंबरी २०२०), डॉ. शैलेंद्र लेंडे (साहित्याचा मूल्यवेध २०१३, अर्वाचीन मराठी साहित्य : अन्वयार्थ २०१३, मराठी आंबेडकरवादी कवितेचे वर्तमान २०१३), सतीश तांबे (लेखाजोखा), डॉ. आशुतोष जावडेकर (‘वा!’ म्हणताना.... २०१९) या समीक्षकांचा निर्देश करता येईल. यांपैकी काही मंडळी नव्या पद्धतीने समकालीन व पूर्वकालीन वाङ्मयाची समीक्षा करू पाहात आहेत. विविध शास्त्रे, विविध भाषा, विविध कला, विविध ज्ञानशाखा ह्यांचा महाजालावरील मुक्त संचार त्यांच्या जीवनदृष्टीला आणि समीक्षादृष्टीला खुलेपणा प्रदान करतो. त्यासोबतच एक प्रकारची संभ्रमावस्था आणि भांबावलेपणही ह्या मंडळींना घेरून असते. यापैकी वाङ्मयीन अभ्यासाची पार्श्वभूमी लाभलेली व मराठी वाङ्मयीन परंपरेची जाण असलेली मंडळी रूढ पद्धतीने समीक्षा करतात. तर अन्यक्षेत्रीय मंडळी नव्या मुक्त शैलीत व नव्या परिभाषेत समीक्षेचा प्रयत्न करतात. काही जुन्या पिढीतील समीक्षकांची पुस्तकेही आज एकविसाव्या शतकात प्रसिद्ध होताना दिसतात. पण ते त्यांच्या अभिरुचीनुसार नव्वदोत्तर कवितेची समीक्षा करताना दिसत नाहीत. यामध्ये सुधीर रसाळ, अक्षयकुमार काळे, निशिकांत मिरजकर व इतर अनेकांचे समीक्षाग्रंथ आज २०१०नंतर प्रसिद्ध झाले आहेत. यात मिरजकरांसारखे भारतीय साहित्याचे जुनेजाणते भाष्यकार ‘नव्या वाटा, नवी वळणे’ सारख्या संपादनातून(२१व्या शतकातील २० कवींच्या निवडक कवितांचे संपादन, पेंग्विन बुक्स, २००८) नव्वदोत्तर नव्या कवितांची उत्तम समीक्षा करतानाही दिसतात. ग्रंथवाचनसंस्कृती आणि एकूणच वाङ्मयव्यवहार यांच्यावरील दृक्‌श्राव्य व नवमाध्यमांच्या अतिरेकी प्रभावामुळे दीर्घ पल्ल्याची, विस्तृत, सूत्रबद्ध, शिस्तबद्ध आणि ग्रंथनिबद्ध समीक्षा पाहिजे त्या प्रमाणात निर्माण होताना दिसत नाही. कदाचित नव्वदोत्तर साहित्याचे नवे प्रवाह अजून समीक्षेच्या दृष्टीने पुरेसे सिद्ध आणि स्थिरस्थावर झालेले नाहीत!

काही नवे समीक्षक विविध वाङ्मयीन व वैचारिक

संकल्पनांमागील विचारव्यूह नीट, सखोल रीतीने समजून न घेता, अर्धकच्च्या स्वरूपात त्या नव्या संकल्पनांचे मराठी कवितेच्या मूल्यमापनासाठी उपयोजन करू पाहत असल्याचे दिसते. त्यामुळे ही समीक्षा वैचारिक व वाङ्मयीन विसंगतींनी व मर्यादांनी ग्रस्त झाली आहे. दलित कवितेतील आधुनिकतावादी मूल्यांचे विवेचन कथित उत्तर-आधुनिकतावादी मूल्यांनी करू पाहणे वैचारिक संभ्रमाचे द्योतक ठरते. 'समीक्षेतील नव्या संकल्पना' (संपादक मनोहर जाधव, २००१) या पुस्तकात 'उत्तर आधुनिकतावाद' या लेखात निशिकांत ठकार यांनी (व मकरंद परांजपे यांनी), तसेच 'संरचनावाद' या लेखात रवींद्र किंबहुने यांनी अशा आयातीत सिद्धांतांच्या उपयोजनाबाबत व त्या संदर्भातील निरर्थकतेबाबत वा विसंगतीबाबत जो इशारा दिला आहे, तो उपरोक्त मंडळींनी लक्षात घेतलेला दिसत नाही.

**मान्यवरांनी मांडलेली समीक्षासूत्रे**

मराठी समीक्षेला स्वातंत्र्योत्तर काळात जे लक्षणीय समीक्षक लाभले, त्यांची नावे, त्यांचे कार्य आणि समीक्षेला त्यांचे मौलिक योगदान पवार आणि हातकणंगलेकर ह्यांनी 'निवडक मराठी समीक्षा' (१९९९) या ग्रंथात अधोरेखित केले आहे. त्यामध्ये कुसुमावती देशपांडे, श्री. के. क्षीरसागर, गंगाधर गाडगीळ, रा. श्री. जोग, शरच्चंद्र मुक्तिबोध, वा.ल. कुळकर्णी, पु.शि.रेगे, म.वा. धोंड, दि. के. बेडेकर, गो.वि. करंदीकर, नरहर कुरुंदकर, त्र्यं.वि. सरदेशमुख, माधव आचवल, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, रा.भा. पाटणकर, द.ग. गोडसे, रा.ग. जाधव, बाबूराव बागुल व भालचंद्र नेमाडे ह्या वीसेक प्रतिनिधिक समीक्षकांच्या आधारे १९५० ते १९९०च्या समीक्षा-वाटचालीचा समावेशक नकाशा संपादकद्वय रेखाटतात. कलावाद आणि जीवनवाद किंवा अलौकिकतावाद आणि लौकिकतावाद अशा दोन बिंदूमध्ये (पाटणकर त्यांना 'धृव' म्हणतात!) हा समीक्षाव्यापाराचा लंबक हेलकावताना त्यांना दिसतो. अर्थात ह्या दोन 'धृवां'मध्ये समीक्षेचा मोठा अवकाश वास करतो हे आपण लक्षात घ्यायला हवे! विशेषतः साठोत्तर कालखंडात ज्यावेळी नवनवे साहित्यप्रवाह मराठीत अवतीर्ण झाले आणि मराठी समाजाची शहरापासून वनापर्यंतची सारी प्रतिभावंत मने लेखनसन्मुख आणि वाङ्मयसण्मुख झाली, तेव्हापासूनच मराठी समीक्षाही अधिक व्यापक आणि जीवननिष्ठ झाली, खऱ्या अर्थाने व व्यापक अर्थाने 'जीवनवादी' झाली, हे सत्य सूर्यप्रकाशाइतके स्वच्छपणे जाणत्या मराठी रसिकाला सहजच प्रतीत होऊ शकते. पूर्वी विशुद्ध कलानिष्ठ, कलात्मक भूमिका घेण्याची चढाओढ होती, कालांतराने लंबक दुसरीकडे झुकत गेला व कविलेखकसुद्धा 'सामाजिक' असे काही लिहायला धडपडू लागले, तसेच समीक्षेलाही मानवी जगण्याचे, समाजाचे, संस्कृतीचे अगत्य वाटू लागले. म्हणजे एकप्रकारे साहित्यरूपांनी समीक्षारूपांतही परिवर्तन घडवून आणले. उपरोक्त संपादनात पवार-हातकणंगलेकर ह्या संपादकद्वयांनी मराठी समीक्षेतले उपरोल्लेखित मंडळींचे योगदान अचूक शब्दांत वर्णिलेले दिसते. त्यांच्या मते - गंगाधर गाडगीळ हे मर्ढेकरांना अभिप्रेत असलेला कालसापेक्ष संवेदनरीतींचा आश्रय घेतला... मर्ढेकरांच्या सौंदर्य-विवेचनातील तत्त्वाचे सपंजस उपयोजन करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी केली. आशयप्रधान आणि आकृतिप्रधान समीक्षेतला समतोल गाडगीळांनी साध्य केला..... मर्ढेकरांच्या नंतर साम्यवादाचे सामाजिक तत्त्वज्ञान ज्यांनी अंगीकारले, अशा समीक्षकांचा एक जोमदार पक्ष मराठीत उदयाला आला. त्यात शरच्चंद्र मुक्तिबोध आणि दि.के. बेडेकर हे प्रमुख होते. मर्ढेकरांच्या कलासमीक्षेला छेद देणारा हा जोरदार विचार मराठीत मूळ धरून आहे... दिलीप चित्रे यांनी कलावंताचे अस्तित्वभान आणि वाङ्मयनिर्मिती या दोहोंतील गुंतागुंतीच्या संबंधांची मांडणी केली. यांची भूमिका व्यक्तिविशिष्ट, कलानिष्ठ, संवेदनेच्या संघटनेचे साहित्य कृतिगणीक वेगळे स्वरूप मानणारी आहे. मर्ढेकरोत्तर काळातील महत्त्वाची भूमिका असून तिच्यातील सांस्कृतिक आणि कलानिर्मितिविषयक आकलन अधिक पृथगात्मपणे मांडणारी आहे... मर्ढेकरांच्या नंतर सौंदर्यविचार एका वेगळ्या भूमिकेवरून सैद्धांतिक स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न रा.भा. पाटणकर यांनी केला आहे... कलेसंबंधीची अलौकिकतावादी विचारसरणी पाटणकरांना अमान्य आहे. पाटणकरांनी तात्त्विक समीक्षाविचारात घातलेली महत्त्वाची भर म्हणजे द्विधृवात्मकतेचा सिद्धांत मांडून पाश्चात्त्य व भारतीय सौंदर्यसिद्धांताचा एक नवा सैद्धांतिक नकाशा मांडला. श्री.के. क्षीरसागर हे स्वतंत्र वृत्तीचे कलावादाच्या प्रणालीत मांडणारे समीक्षक आहेत. त्यांची स्वतंत्र विचारसरणी त्यांच्या 'टीकाविवेक' या ग्रंथात दिसते. प्राचीन काव्यप्रवाहातील मुख्य अर्थ म्हणजे बाळबोध, उथळ काव्याचे लक्षण अशी कित्येकांची समजूत होऊ लागली होती (मर्ढेकरांची दुबोध कविता यामुळे), याचा प्रतिवाद करण्यासाठी रा.श्री. जोग यांनी 'मुख्यार्थाची कैफियत' हा लेख लिहिला. काव्याकडे बघण्याचा संस्कृत, साहित्य विचाराला धरून असलेला

पारंपरिक दृष्टिकोन व मर्ढेकरांच्या कवितेनंतरचा बदललेला दृष्टिकोन यामध्ये संघर्ष होणे अपरिहार्य होते. या संघर्षाचे उत्तम प्रतिबिंब जोगांच्या लेखनात पाहायला मिळते. आधुनिक समीक्षादृष्टीने मध्ययुगीन कवितेचे आकलन कसे केले जाऊ शकते हे वा.ल. कुळकर्णी, वा.वा. धोंड यांच्या लेखामध्ये पाहावयास मिळते. गोडसे यांनी व्यापक सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परिमाणात साहित्यस्वरूपाचा आणि त्यातील प्रवृत्ती, परिवर्तनाचा अभ्यास केला आहे. साहित्याच्या अभ्यासाला एक विस्तृत बैठक देण्याचा व मराठी समीक्षेला देशी रूप देण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न आहे. गो.वि. करंदीकरांनी 'मराठी कवितेत सामाजिक जाणीव ज्ञानेश्वर, तुकारामांपासून मर्ढेकरांपर्यंत निरनिराळ्या मार्गांनी व्यक्त होत आलेली आहे', असे म्हटले आहे. पण त्यांनी असेही म्हटले आहे की याचा अर्थ काव्याचे माहात्म्य सामाजिक जाणिवेवर अवलंबून असते असे नव्हे, त्याचप्रमाणे सामाजिक जाणिवेची कविता कवी काव्यात्म असते असेही नव्हे! त्र्यं.वि. सरदेशमुख वास्तवाचा वेगळा पातळीवर विचार करतात. सामाजिक वास्तव म्हणजे सर्व वास्तव नव्हे. Reality hr realismपेक्षा भिन्न आहे. ही reality केवळ तर्काने कळत नाही. सरदेशमुख हे कवितेतून प्रकट होण्याच्या जाणिवांचा पल्ला आध्यात्मिक अंगाने समजून घेऊ पाहतात. दि.के. बेडेकरांनी सामाजिक जाणिवेच्या प्रामाण्याचा दीर्घकाळ पुरस्कार केला. पण केशवसुतविषयक चिंतनात ते या विचाराच्या पलीकडे, जडवादी श्रद्धेच्या पलीकडे जातात व गूढ जाणिवेवरील श्रद्धेपर्यंत पोहोचताहेत असे दिसते. निखळ कलावादी वा अलौकिकतावादी भूमिकेतून समीक्षा करू पाहणारे पु.शि. रेगे हे समीक्षक आहेत. व्यक्ती ही सर्वस्वी समाजावर अवलंबून असते, पण व्यक्तीला एक स्वतंत्र अस्तित्व असते. साहित्य जीवनाचा भाग असले तरी त्याचेही एक स्वतंत्र महत्त्व आहे हे मान्य करायला हवे. साहित्य जीवनाला उपयुक्त असावे असा आग्रह धरला तर खरे साहित्य मागे पडते अशी रेगे यांची भूमिका आहे. माधव आचवल यांनी जी.ए. कुलकर्णी यांचा कथेवर मर्मज्ञ रसिकतेने, तन्मयतेने लिहिलेल्या लेखात हीच भूमिका (पु.शि. रेगे यांची) स्वीकारली आहे. प्रतिभावंत विलक्षण एकमार्गी, विविक्षित दिशेचा सतत वेध घेणारे असतात. त्यांचा हा ध्यास असतो. त्यातून त्यांच्या लेखनाला मुळे लाभतात. हे लेखन अधिक चैतन्यमय बनते. वाङ्मयकृतीचा आणि वाङ्मयीन प्रवृत्तीचा परामर्श संस्कृतीसंकराच्या, समाजपरिवर्तनाच्या आणि त्यातून घडणाऱ्या वाङ्मयीन साच्याच्या आधारे घेण्याची नेमाडे यांची टीकापद्धती सखोल, संस्कारित, भौतिकवादी, जीवनवादी आहे असे म्हणता येते. नैतिकता, कृतिप्रधानता, देशीपण या संकल्पना आग्रहपूर्वक मांडून मराठी टीकेची संकुचित संतुष्टता आणि अकारण परवलंबित्व यांना भक्कम धक्का देण्याचे काम नेमाडे यांच्या 'टीकास्वयंवर'मधील समीक्षेने केले आहे. (पृ. ८ ते १४, प्रस्तावना, निवडक मराठी समीक्षा)

उपरोक्त अवतरणातून नव्वदपूर्वीच्या स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेचा प्रवास सारांशरूपाने आपल्यापुढे येतो म्हणून मुद्दाम हे दीर्घ अवतरण इथे मुद्दाम उद्धृत केले आहे.

मराठी समीक्षेच्या १९४५ ते २००० या ५०-५५ वर्षातील वाटचालीचा आढावा घेताना सुप्रसिद्ध समीक्षक गो.म. कुलकर्णी ह्यांनी प्रदक्षिणा खंड २मधील 'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य समीक्षा' या लेखात मराठी समीक्षेच्या प्रवासाबद्दल असमाधान व्यक्त केले असले, तरी ह्या काळच्या समीक्षेची 'कमाई' म्हणून काही गोष्टी सूत्ररूपात मांडल्या आहेत. त्यामध्ये सौंदर्यशाळाची तात्त्विक धर्म करणारी ग्रंथनिर्मिती, इंग्रजीच्या प्राध्यापकांनी मराठी समीक्षेला केलेले भरीव योगदान, मध्ययुगीन मराठी साहित्य व संस्कृतीचा नव्या दृष्टीने घेतलेला मागोवा, लोकसाहित्यविषयक नव्या भावाची समीक्षा, वाङ्मयेतिहास लेखनातील नवसिद्ध कल्प (म.सा. परिषद), जन्मशताब्दींच्या निमित्ताने झालेले साहित्यिकांचे पुनर्मूल्यांकन, पीएच.डी. पदवीच्या संशोधनातून उपलब्ध मराठी समीक्षेसाठी उपकारक अशी सामग्री, तौलानिक साहित्य, आदिबंधात्मक समीक्षा व शैलीविज्ञान या क्षेत्रातील नवे भान, साहित्य आणि इतर कलांचे अनुबंध शोधण्याचा लक्षणीय प्रयत्न, संस्कृत साहित्यशास्त्राची नव्या दृष्टीने मांडणी, संतसाहित्याचे नव्या वाङ्मयीन भूमिकेतून उत्तम आकलन, दलित-ग्रामीण साहित्याच्या निमित्ताने घडवले समाजजीवनचिंतन, मार्क्सवादी दृष्टीने झालेली समीक्षात्मक ग्रंथनिर्मिती, विविध चर्चासत्रांची व साहित्य-संमेलनांची समीक्षेच्या वाटचालीत योगदान इत्यादी ज्या गोष्टी गो.म. कुलकर्णी मांडतात, त्यातून एकूणच स्वातंत्र्योत्तर काळातील समीक्षाव्यवहाराची सारांशरूपात कल्पना करता येऊ शकते.

(संदर्भसूची पुढील पानावर)


पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११


**संदर्भ ग्रंथ**


१. मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप, संपादक गो.मा. पवार, म.द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६
२. निवडक मराठी समीक्षा, संपादक गो.मा. पवार, म.द. हातकणंगलेकर, साहित्य अकादमी, दिल्ली, १९९९
३. प्रदक्षिणा खंड २, संपादक अनिरुद्ध अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९१
४. मराठी प्रबंध सूची, वसंत विष्णू कुलकर्णी, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २०११
५. संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश, संपादक डहाके, गणोरकर इ., ग. रा. भटकळ फाउंडेशन, मुंबई,
६. शिल्पकार चरित्रकोश साहित्य खंड, संपादक डॉ. सुभाष भेंडे, साप्ताहिक विवेक, हिंदुस्थान प्रकाशन संस्था, मुंबई, २००९
७. मराठी समीक्षेची सद्यःस्थिती, वसंत आबाजी डहाके, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११
८. समीक्षेतील नव्या संकल्पना, संपादक डॉ. मनोहर जाधव, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१
९. आधुनिक समीक्षा – सिद्धांत, मिलिंद मालशे, अशोक जोशी, मराठी विभाग मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००७
१०. समीक्षामीमांसा, गंगाधर पाटील, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०११
११. स्मृतिभ्रंशानंतर, गणेश देवी, अनुवाद म.सु.पाटील, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००८
१२. तौलनिक साहित्य, निशिकांत मिरजकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१६
१३. वाङ्मयीन संस्कृती, सुधीर रसाळ, मौज प्रकाशन गृह, मुंबई



**– डॉ. राजेंद्र नाईकवाडे**
भ्रमणध्वनी – ९८५०३५१०२५

## समकालीन नव्वदोत्तर मराठी साहित्य : स्थूल आराखडा

(१९९० ते २०२० ह्या कालखंडात प्रकाशित साहित्य. जागतिकीकरण, खासगीकरण, उदारीकरण, संगणकक्रांती, महाजाल, माध्यमक्षेत्रातील आमुलाग्र बदल, Global Village, Era of I.T., Era of Knowledge ह्या संकल्पनांच्या नंतरचे जाणीवविश्व आणि भारतीय लेखकांचे भावविश्व)

**१९९० ते २०२० | या कालखंडातील प्रमुख साहित्य प्रवाह**

- **दलित-आंबेडकरवादी साहित्यप्रवाह**
  - कथात्म साहित्य — कादंबरीकार व कथाकार: जयंत पवार, योगीराज वाघमारे, गौतमीपुत्र कांबळे, प्रकाश खरात, प्रज्ञा पवार, उर्मिला पवार, प्रेमानंद गज्वी, जयराज खुणे, दीपध्वज कोसादे, उत्तम कांबळे, नामदेव कांबळे, शरणकुमार लिंबाळे, जी.के. ऐनापुरे, शिल्पा कांबळे, लक्ष्मण गायकवाड, अशोक पवार इत्यादि.
  - काव्यात्म साहित्य — कवी: अरुण काळे, मंगेश बनसोड, राम दुतोंडे, उत्तम अंभोरे, प्रज्ञा लोखंडे, लोकनाथ यशवंत, सिद्धार्थ-भगत, अनिल धाकू कांबळी, आनंद गायकवाड इत्यादि.
- **ग्रामीण साहित्यप्रवाह**
  - कथात्म साहित्य: आसाराम लोमटे, सदानंद देशमुख, कृष्णात खोत, वासुदेव मुलाटे, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, नागनाथ कोत्तापल्ले, बाबाराव मुसळे, राजन खान, आनंद पाटील, प्रतिमा इंगोले, रमेश इंगळे उत्रादकर, राजन गवस, भास्कर चंदनशिव इत्यादि.
  - काव्यात्म साहित्य: संतोष पवार, श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, केशव सखाराम देशमुख, इंद्रजित भालेराव, प्रकाश होळकर, नलेश पाटील इत्यादि.
- **स्त्रीवादी साहित्यप्रवाह (स्त्रीकेंद्री साहित्यविश्व)**
  - कथात्म साहित्य: मेघना पेठे, सानिया, प्रतिमा जोशी, उर्मिला पवार, कविता महाजन, अरुणा सबाने, शांता गोखले इत्यादि.
  - काव्यात्म साहित्य: नीरजा, प्रज्ञा पवार, कविता महाजन, मनीषा साधू, पद्मरेखा धनकर, शैला सायनाकर, कल्पना दुधाळ, सुजाता महाजन, रेखा आकोटकर, अंजली कुलकर्णी, अश्विनी धोंगडे, आसावरी काकडे, अनुराधा पाटील, रजनी परुळेकर इत्यादि.
- **आदिवासी साहित्यप्रवाह**
  - कथात्म साहित्य: एकनाथ साळवे
  - काव्यात्म साहित्य: वाहरू सोनवणे, भुजंग मेश्राम, विनायक तुमराम, उषाकिरण आत्राम, कुसुम अलाम इत्यादि.
- **महानगरी साहित्यप्रवाह**
  - कथात्म साहित्य: प्रवीण बांदेकर, मिलिंद बोकील, भारत सासणे, श्याम मनोहर, अभिराम भडकमकर, सुरेश द्वादशीवार, नवनाथ गोरे, विश्राम गुप्ते इत्यादि.
  - काव्यात्म साहित्य: मन्या जोशी, मंगेश नारायण काळे, दासू वैद्य, प्रफुल्ल शिलेदार, सलील वाघ, हेमंत दिवटे, अशोक कोतवाल, गणेश विसपुते, खलील मोमीन, अजय कांडर, संजीव खांडेकर, प्रमोद कुमार अणेराव, वीरधवल परब, श्रीधर तिळवे, सचीन केतकर, अशोक कोतवाल इत्यादि.
- **पारंपरिक/लोकप्रिय/मध्यवर्ती साहित्यप्रवाह**
  - कथात्म साहित्य: रवींद्र शोभणे, आशा बगे, ज्योती मोहन पुजारी, विजया ब्राह्मणकर, सुप्रिया अय्यर, मंगला गोडबोले, शुभांगी भडभडे, बाबा भांड, शिरीष गोपाळ देशपांडे, मारुती चितमपल्ली, कृष्णमेघ कुंटे, अतुल धामणकर, रंगनाथ पठारे, आशुतोष जावडेकर, अविनाश कोल्हे, मोनिका गजेंद्रगडकर, सुरेंद्र दरेकर, सुबोध जावडेकर इत्यादि.
  - काव्यात्म साहित्य: सुनील शिनखेडे, श्याम माधव धोंड, संदीप खरे, मीना प्रभू, जयश्री हरी जोशी, मालती बिरजे, आशा पांडे, सुनीता झाडे, शारदा वैद्य, वसंत वाहोकार, मेघना वाहोकार, लखनसिंह कटरे, अरुणा ढेरे, अशोक नायगावकर, श्रीपाद प्रभाकर जोशी, हेमंत जोगळेकर इत्यादि.

## वसाहतवाद

**(राजकीय व सांस्कृतिक - धार्मिक आक्रमण आणि साम्राज्यवाद)**

**मार्क्सवादी वैचारिक-सांस्कृतिक साम्राज्यवाद व बौद्धिक वसाहतवाद**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात राजसत्तेच्या आधारे भारताच्या विविध क्षेत्रात प्रश्रय मिळविणारा वैचारिक दशहतवाद

याविरुद्धचा देशीवादी संघर्ष (गांधीवाद, हिंदुत्ववाद, राष्ट्रवाद व आंबेडकरवाद)

**इस्लामी आक्रमण व वसाहतवाद**

इ.स. १०२६ • गजनी
इ.स. ११९१ • घोरी

इ.स. १७०७ • औरंगजेब मृत्यू
इ.स. १६६४ • छत्रपती शिवराय • हिंदवी स्वराज्य स्थापना.

इ.स. १७६१ • तिसरे पानिपत युद्ध • मराठे व अब्दाली.
(जवळपास ८०० वर्षांचा वसाहतवाद व संघर्ष)

**इंग्रजी-खिस्ती वसाहतवाद**

पानिपत युद्धानंतर आंशिक इंग्रज वर्चस्वाला प्रारंभ
१७५७ • प्लासीची लढाई इंग्रज व बंगालचा नवाब
१७६१ • पानिपत तिसरे
१७६४ • बक्सर युद्ध • इंग्रज व मीर कासिम.
१७६५ • क्लाईव्ह बंगाल गव्हर्नर
१८०३ ते १८१८ • मराठे व इंग्रज विविध लढाया
१८४८ • इंग्रज-शिख युद्धानंतर पंजाबमध्ये इंग्रजी सत्ता स्थापना.
१८५७ • स्वतंत्रता संग्राम (इंग्रज विरोधी प्रथम)
(जवळपास १५० वर्षांचा वसाहतवाद व संघर्ष)


भारत देशाचा इतिहास व परिवर्तने बघता 'उत्तर-आधुनिकतावाद' ही संकल्पना काल्पनिक, केवल बौद्धिक, बरीचशी पुस्तकी व निरर्थक ठरते. उलट 'उत्तर-वसाहतवाद' ही संकल्पना अधिक सार्थक ठरते.


## उत्तर - वसाहतवाद (भारतीय परिप्रेक्ष्य)

१. भारतीय स्वतंत्रता संग्राम
(वसाहतवाद विरोधी)
(राष्ट्रवाद + स्वदेशीवाद)

२. भारतीय आधुनिकतावाद
(वसाहतवादाचे आत्मसातीकरण, देशीकरण, समावेशीकरण)
(राष्ट्रवाद + स्वदेशीवाद + आधुनिकतावाद)

विविध प्रकारचा वैचारिक, सांस्कृतिक साम्राज्यवाद म्हणजे वसाहतवाद आणि त्याविरुद्धचा भारताचा वा भारतीय संस्कृतीचा सततचा संघर्ष म्हणजे राष्ट्रवाद-स्वदेशीवाद म्हणजे 'उत्तर-वसाहतवाद'.


स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षा : एक आराखडा
सैद्धांतिक
(वाङ्मयीन साहित्य-सिद्धांताची मांडणी)
परिचय-भाष्यपर
❖ भारतीय साहित्यशास्त्र
❖ भारतीय काव्यशास्त्र
❖ भारतीय नाट्यशास्त्र
❖ रससिद्धांत
❖ ध्वनिसिद्धांत
❖ अलंकारशास्त्र
❖ मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र
❖ मराठी कवींचा काव्यविचार
❖ पाश्चात्य साहित्य सिद्धांत
❖ पाश्चात्य सौंदर्यशास्त्र
❖ शैलीशास्त्रीय समीक्षा
❖ भाषावैज्ञानिक समीक्षा
❖ समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती
❖ लौकिकतावादी साहित्यविचार
❖ देशीवाद
❖ आदिबंधात्मक समीक्षा पद्धती
❖ संतांचे साहित्यशास्त्र
नवसिद्धांतनिर्मिती
मराठीचे साहित्यशास्त्र
(मा.गो. देशमुख)
लयसिद्धांत
(मर्ढेकर)
वाङ्मयीन महात्मता
(मर्ढेकर)
मानुषतेचा सिद्धांत
(शरच्चंद्र मुक्तिबोध)
भावनानिष्ठ समतानता
(काव्यातील नवीनता मर्ढेकर)
पोत
(द.ग. गोडसे)
देशीयतेचा
साहित्यसिद्धांत
(देवी, नेमाडे)
द्विध्रुवात्मकतेचा
सिद्धांत
(रा. भा. पाटणकर)
नवअलौकिकतावाद
(द.भि. कुलकर्णी)
उपयोजित
(साहित्यनिष्ठ समीक्षा)
सिद्धांतनिष्ठ उपयोजन
(आस्वाद क्षीण)
आस्वादनिष्ठ उपयोजन
उपयोजित समीक्षा
(ललित साहित्याची समीक्षा)
प्राचीन-मध्ययुगीन
साहित्य-समीक्षा
वाङ्मयप्रकारनिष्ठ
साहित्यकृतींचा
अभ्यास
लेखकाचा
अभ्यास
तौलनिक
साहित्याभ्यास
वाङ्मयीन संप्रदायनिष्ठ
समीक्षा (वास्तववाद,
स्वच्छंदतावाद, अभिजातवाद,
अस्तित्ववाद, आधुनिकतावाद,
उत्तरआधुनिकतावाद,
संरचनावाद, विरचनावाद,
उत्तर-वसाहतवाद, देशीवाद)
वाङ्मयीन प्रवृत्ती-
प्रवाहसमीक्षा,
(दलित, ग्रामीण,
स्त्रीवादी, आदिवासी)
वाङ्मयीन सिद्धांतनिष्ठ समीक्षा
(लयसिद्धांत, रससिद्धांत, ध्वनिसिद्धांत
वाङ्मयीन महात्मता,
पोत, मानुषतेचा सिद्धांत इ.)
लोकसाहित्य
समीक्षा
संपादन कार्यनिष्ठ
समीक्षा



अष्टगंध
प्रकाशन

वाचकप्रिय पुस्तकांची
सुवर्णमहोत्सवी वाटचाल...


**अष्टगंध प्रकाशनाचे कवितासंग्रह व निवडक पुस्तके :**

१) कविता लोभसवाणी - प्रसाद कुलकर्णी
२) तरीही शेवटी कविताच उरते शिल्लक - अन्वर मिर्झा
३) बाईपणातून बाहेर पडताना - योगिनी राऊळ
४) मनाच्या बेचैन फांदीवर - गणेश नागवडे
५) माझ्या आषाढाचे अंश - सतीश दराडे
६) किशोर पाठक यांच्या बालकविता भाग १ व २
७) एक शाळा एकदा मला चालवायला द्या - संजय शिंदे
८) व्याकूळ हरणांच्या गोष्टी - गणेश नागवडे
९) मी अस्सल प्रत जन्माची - राधिका प्रेमसंस्कार
१०) माय... अर्थात आईच्या कविता - संपादन प्रशांत मोरे
११) एकांताचा दिवा - सतीश सोळांकूरकर
१२) काही श्वास विश्वासाठी - कमलाकर आत्माराम देसले
१३) काजव्यांचे झाड - अनुपमा उजगरे
१४) जांभूळभूल - अशोक बागवे
१५) प्रिय सालस (कादंबरी) - अशोक बागवे
१६) कोऱ्या कागदाची दुसरी बाजू - अशोक बागवे
१७) मी देशाचा सातबारा लिहीन म्हणतो - रमेश सावंत
१८) केशर दिव्यांची माळ - सतीश सोळांकूरकर
१९) विजा घेऊन येणाऱ्या पिढीची गझल - संपा. रुपेश देशमुख
२०) बोरू म्हणे (ललित गद्य) - अशोक बागवे

अष्टगंध प्रकाशनाच्या वरील पुस्तकांसाठी आणि मौज, पॉप्युलर, पोएट्रीवाला, शब्द, ग्रंथाली, कॉपर कॉईन, वर्णमुद्रा, लोकवाङ्मय, संवेदना व इतर प्रकाशनाच्या घरपोच पुस्तकांसाठी...

**व्हॉट्सअप संपर्क : संजय शिंदे : 98922 76831**

उत्तम दर्जा, उत्तम छपाई व ISBN क्रमांक असलेली
विश्वसनीय पुस्तक प्रकाशन संस्था...



## स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

### वृत्तपत्र / पत्रकारिता

•

# चेहरा हरवलेली मराठी पत्रकारिता

### विजय चोरमारे

**मराठी पत्रकारितेचा चेहरा हरवला आहे, असे म्हणतो तेव्हा माझ्यापुढे मराठी पत्रकारितेचा देदीप्यमान इतिहास आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले. तिथून मराठी पत्रकारितेचा प्रवास सुरू होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या 'केसरी' ने लोकांना स्वातंत्र्ययुद्धासाठी प्रेरित करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्यपूर्वकाळात अनेक वृत्तपत्रांनी लोकजागृतीचे काम केले. त्याचवेळी समाजप्रबोधनाचे काम करणाऱ्या वृत्तपत्रांची संख्याही मोठी होती आणि मराठी पत्रकारितेमध्ये प्रबोधन पत्रकारितेचा प्रवाह सशक्त होता. त्याचमुळे स्वातंत्र्यानंतर वृत्तपत्रांसमोर उद्दिष्ट काय, हा प्रश्न आला नाही. समाजाला रूढी, परंपरांच्या जोखडातून मुक्त करण्याची भूमिका वृत्तपत्रांसमोर होती, त्यादृष्टीने वृत्तपत्रे ही विचारपत्रे बनली.**

**आजची** मराठी पत्रकारिता चेहरा हरवलेली पत्रकारिता आहे, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही. एकूण भारतीय पत्रकारितेसंदर्भातही हे विधान लागू होईल. मराठी पत्रकारिता ही भारतीय पत्रकारितेचाच भाग असल्यामुळे तिची स्थिती वेगळी म्हणता येत नाही. मराठी पत्रकारितेचा चेहरा हरवला आहे, असे म्हणतो तेव्हा पत्रकारितेची भूमिका नजरेसमोर असते. महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, सकाळ, लोकमत, सामना, पुढारी, दिव्य मराठी, देशदूत, प्रहार, नवशक्ती, महानगर, जनशक्ती, तरुण भारत (बेळगाव), तरुण भारत (मुंबई-नागपूर), केसरी, नवा काळ, एकमत, लोकपत्र ही मराठीतील प्रमुख वृत्तपत्रे नजरेसमोर येतात. वृत्तवाहिन्यांमध्ये एबीपी माझा, झी २४ तास, न्यूज १८ लोकमत, साम टीव्ही, टीव्ही ९, जय महाराष्ट्र या प्रमुख वाहिन्या आहेत. डिजिटल मीडियाचा देशपातळीवर आणि प्रादेशिक भाषांमधूनही मोठा विस्तार होतो आहे. त्यामध्ये सर्वच वृत्तपत्रे आणि वाहिन्यांच्या वेबसाइट आहेत. मराठीत न्यूज पोर्टलांची संख्या झपाट्याने वाढते आहे, परंतु ती स्थानिक पातळीवरची आहेत, दखलपात्र म्हणता येतील अशी नाहीत. स्थानिक पातळीवर प्रसिद्ध होणारी वृत्तपत्रे

आणि वृत्तवाहिन्यांची संख्याही लक्षणीय आहे. परंतु मराठी पत्रकारितेचा सर्वंकष विचार करताना एवढ्या वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांचा विचार पुरेसा ठरू शकतो.

**मराठी पत्रकारितेचा इतिहास**

मराठी पत्रकारितेचा चेहरा हरवला आहे, असे म्हणतो तेव्हा माझ्यापुढे मराठी पत्रकारितेचा देदीप्यमान इतिहास आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले. तिथून मराठी पत्रकारितेचा प्रवास सुरू होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या 'केसरी' ने लोकांना स्वातंत्र्ययुद्धासाठी प्रेरित करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्यपूर्वकाळात अनेक वृत्तपत्रांनी लोकजागृतीचे काम केले. त्याचवेळी समाजप्रबोधनाचे काम करणाऱ्या वृत्तपत्रांची संख्याही मोठी होती आणि मराठी पत्रकारितेमध्ये प्रबोधन पत्रकारितेचा प्रवाह सशक्त होता. त्याचमुळे स्वातंत्र्यानंतर वृत्तपत्रांसमोर उद्दिष्ट काय, हा प्रश्न आला नाही. समाजाला रूढी, परंपरांच्या जोखडातून मुक्त करण्याची भूमिका वृत्तपत्रांसमोर होती, त्यादृष्टीने वृत्तपत्रे ही विचारपत्रे बनली आणि त्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवली.

**सत्यशोधक पत्रकारिता**

मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासात सत्यशोधक वृत्तपत्रांनी बजावलेली कामगिरी महत्त्वाची आहे. ब्राह्मणेतरांची स्वतंत्र पत्रे निघणे गरजेचे आहे, असे महात्मा जोतिराव फुले यांचे मत होते. महात्मा फुले यांच्या 'सत्यशोधक समाजा'च्या चळवळीतून ब्राह्मणेतर पत्रकारितेला चालना मिळाली. उच्चवर्णियांच्या हाती असलेली वृत्तपत्रे बहुजन समाजाला न्याय देऊ शकत नाहीत, या भूमिकेतून कृष्णराव भालेकर (१८५०-१९१०) यांनी 'दीनबंधू' हे पत्र पुणे येथून १ जानेवारी १८७७ रोजी सुरू केले. पुढे आर्थिक अडचणींमुळे त्यांना ते चालवता आले नाही, त्यामुळे १८८० साली त्यांनी मुंबईतील तत्कालीन कामगारनेते नारायण मेघाजी लोखंडे आणि रामजी संताजी आवटे यांच्या स्वाधीन केले. लोखंडे यांनी हे पत्र मुंबईहून बरीच वर्षे चालवले. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या मृत्यूनंतर (१८९७) त्याची परवड झाली व ते बंद पडले. 'दीनबंधू'प्रमाणेच 'दीनमित्र' हेही ब्राह्मणेतर चळवळीचे मुखपत्र होते. मुकुंदराव पाटील यांच्या संपादन आणि लेखनामुळे हे पत्र गाजले. मुकुंदराव पाटील यांनी ते तीस वर्षे चालवले. मुळात १८८८ मध्ये कृष्णराव भालेकर यांच्या प्रेरणेने गणपतराव पाटील यांनी मासिकरूपात 'दीनमित्र' सुरू केले. १८९२ मध्ये गणपतरावांच्या निधनाने हे पत्र बंद पडले. त्यांचे दत्तकपुत्र मुकुंदराव पाटील यांनी वयाच्या चोविसाव्या वर्षी २३ नोव्हेंबर १९१० रोजी ते साप्ताहिक पुन्हा सुरू केले होते.

ब्राह्मणेतरांची वृत्तपत्रे अपरिहार्य अशा गरजेतून जन्माला आली. ब्राह्मणेतर पक्षांनी राजकीय क्षेत्रात पदार्पण करेपर्यंत त्यांनी धार्मिक व सामाजिक प्रश्नांना अग्रक्रम दिला. सनातनी, कर्मठ विचारांशी व ब्राह्मण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पुरस्कार करणाऱ्या पत्रांशी या पत्रांचा सतत संघर्ष घडत असे. उदाहरणार्थ, केसरी व भाला यांसारख्या पत्रांनी ब्राह्मणेतर पत्रांशी संघर्ष केला. शेतकरी, कष्टकरी वर्गाचे शिक्षणाचे प्रश्न मांडले; परंतु कालांतराने या पत्रांतून ब्राह्मण्याविरोधाला प्राधान्य मिळू लागले. ही पत्रे बंद पडली तरी ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाची चळवळ सुरू राहिली. ब्राह्मणेतर पत्रांनी अस्पृश्यांच्या प्रश्नावर जेवढा भर द्यावयास हवा होता, तेवढा दिला नाही, ही त्यांची मर्यादाही लक्षात घ्यावी लागते. तरीही त्यांचे ऐतिहासिक महत्त्व आणि बहुजनांच्या जागृतीसाठी त्यांनी केलेले कार्य महत्त्वाचे ठरतेच. अस्पृश्यांच्या लढ्याला प्राधान्य वा पाठिंबा देण्याची भूमिका ब्राह्मणेतर पत्रांनी घेतली नाही, त्यातूनच दलित पत्रकारिता उदयास आली.

महात्मा फुल्यांच्या काळापासून किंवा १८५७ च्या बंडानंतर राजकीय स्वातंत्र्य आणि त्यासाठीचे राजकारण हेच मुख्य प्रवाही बनले आणि माध्यमांनी तेच उचलून धरले. या राजकारणाविरोधात बहुजनांचे राजकारण, समाजकारण, अर्थकारण म्हणजे देशद्रोही आणि इंग्रज धार्जिणे असल्याचा दावा केला गेला. स्वतःच्या वाट्याला आलेली उपेक्षा आणि अन्याय यांना वाचा फोडण्यासाठी बहुजनांची माध्यमे असावीत, यासाठी अनेक वर्तमानपत्रे महात्मा फुले यांच्यानंतर आली. पण व्यापक अर्थाने बहुजनवादाची मांडणी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालवलेली वर्तमानपत्रे भारतीय माध्यम इतिहासात महत्त्वाची ठरतात. बाबासाहेबांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' या नावांनी पाक्षिके चालविली. यापैकी जनता आणि प्रबुद्ध भारत ही त्यांच्या चळवळीची मुखपत्रे असली तरी त्यांचे संपादन बाबासाहेबांनी स्वतः न करता सहकाऱ्यांकडून करवून घेतले. मात्र 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' या दोन्ही पत्रांचे संपादन त्यांनी

स्वत: केले. 'मूकनायक'ने त्याकाळी सर्वार्थाने मुक्या असलेल्या समाजाला खऱ्या अर्थाने आवाज दिला. स्वातंत्र्याच्या आंदोलनाला गती देणे आणि समाज सुधारणा करणे, असे त्याकाळच्या वृत्तपत्रांचे दोन उद्देश होते. बाबासाहेबांची पत्रकारिता यापेक्षा वेगळी म्हणजे मानवमुक्तीचा वसा घेतलेली होती. वरवरची समाजसुधारणा बाबासाहेबांना मान्य नव्हती. माणसाला माणुसकीचे हक्क मिळवून देण्याचा, त्याला त्याच्या हक्कांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न बाबासाहेबांनी पत्रकारितेच्या माध्यमातून केला.

**विज्ञाननिष्ठ भूमिकेचा अभाव**

जोतिराव फुल्यांचा काळ वेगळा होता. कृष्णराव भालेकरांचा काळ वेगळा होता. 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील, 'हंटर'कार खंडेराव बागल, 'विजयी मराठा'कार श्रीपतराव शिंदे यांनी पत्रकारिता केली तो काळ वेगळा होता. ब्राह्मण समाजाकडून बहुजनांची होणारी लुबाडणूक हा त्या काळातला ऐरणीवरचा विषय होता. समाज अशिक्षित होता. आज काळ बदलला असला तरी परिस्थिती फारशी बदललेली नाही. शिक्षणाचा प्रसार झाला. साक्षरता वाढली. मात्र शिक्षणामुळे शहाणपणा येतोच असे नाही आणि तेच आपल्या अवतीभोवती दिसते. जो उच्चशिक्षित समाज आहे, तो अधिक प्रमाणात अंधश्रद्धांच्या विळख्यात सापडला आहे. गरीब आणि अशिक्षित समाज अंधश्रद्धांच्या विळख्यात सापडला असल्याचे चित्र प्रसारमाध्यमे निर्माण करतात. त्यात तथ्य आहेच. परंतु त्याहीपलीकडे पाहिले तर उच्चभ्रूवर्ग मोठ्या प्रमाणावर अंधश्रद्धांच्या विळख्यात सापडल्याचे दिसेल. आणि दिवसेंदिवस तो अधिकाधिक गुरफटत चाललाय. सुमारे सतरा-अठरा वर्षांपूर्वी गणपती दूध प्यायल्याची जी अफवा पसरवण्यात आली होती, त्यावेळी दुधाच्या वाट्या घेऊन गणपतीमंदिरासमोर रांगेत उभे राहिलेल्यांमध्ये कुणीही गरीब नव्हते. सगळेच्या सगळे मध्यमवर्गीय आणि उच्चमध्यमवर्गीय होते. या घटनेलाही वीस वर्षे उलटून गेली. देशबर बुवा-बाबांचे प्रस्थ वाढले तो काळ अलीकडचा आहे. अनेक बुवा-बाबा अनैतिक व्यवहारांच्या आरोपांवरून तुरुंगात गेले आहेत. तरीसुद्धा भोंदू लोकांकडे जाण्याकडे लोकांचा ओढा दिसून येतो. अशा भोंदू बुवा-बाबांविरोधात प्रसारमाध्यमे भूमिका घेत नाहीत, उलट प्रसंगपरत्वे त्यांच्या प्रसिद्धीचे काम करतात. आजच्या काळात प्रसारमाध्यमांनी म्हणजेच पत्रकारांनी अधिक विवेकनिष्ठ आणि विज्ञाननिष्ठ बनण्याची गरज आहे. परंतु एकूणच विज्ञाननिष्ठ भूमिकेचा अभाव मराठी पत्रकारितेमध्ये तीव्रतेने जाणवतो.

**राजकीय पक्षपात**

मराठीतील वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्या यांची भूमिका काय आहे, असा प्रश्न विचारला तर, सगळ्यांकडून एकच उत्तर मिळेल, ते म्हणजे बाजारकेंद्री! राजकीय भूमिकेचा विचार केला तरीही सगळा मामला गोलमाल आहे. एखादे वृत्तपत्र प्रस्थापितविरोधी भूमिका घेऊन उभे आहे, असे ठामपणे म्हणता येत नाही. काही प्रसंगांमध्ये सरकारविरोधी भूमिका घेतली जाते, परंतु त्यात सातत्य नसते. सरकारविरोधी भूमिकेचा देखावा करतानाही सरकारमध्ये काम करणाऱ्या व्यक्तिसंदर्भातील भूमिका मात्र संशयास्पद असते. ती व्यक्तिसापेक्ष असते. दोन व्यक्तींमधल्या संबंधांवर आधारलेली असते. उदाहरणादाखल बोलायचे तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेची चिकित्सा एकाही मराठी वृत्तपत्राने किंवा वृत्तवाहिनीने केली नाही. सरकारविरोधात टीकेचे प्रहार केले तरी त्यातून फडणवीस यांना अलगदपणे बाजूला ठेवले गेले. आपण भाजपविरोधात आहोत, हे दाखवण्यासाठी केंद्र सरकारवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली गेली, परंतु त्यांचीच धोरणे राबवणाऱ्या फडणवीस यांच्याबाबतीत मात्र लवचीक भूमिका घेतली गेली. त्यांच्या चुकांवर पांघरूण घालण्याचे प्रयत्न प्रसारमाध्यमांकडून वेळोवेळी केले गेले. अगदी काँग्रेसच्या विचारांचे वृत्तपत्र म्हणून ओळखले जाणारे वृत्तपत्रसुद्धा व्यक्तिश: देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकाटिप्पणी करण्याचे टाळताना दिसले. मराठी वृत्तपत्रांनी फडणवीस यांच्याबाबत जी सहृदयता दाखवली, तशी सहृदयता कोणत्याही मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत दाखवली गेली नाही. याची कारणे कोणती असू शकतात? देवेंद्र फडणवीस यांचे संपादकांशी असलेले व्यक्तिगत संबंध? फडणवीस ज्या ब्राह्मण जातीचे आहेत, त्याच जातीचे बहुतांश संपादक असल्यामुळे संपादकांना त्यांच्याबद्दल वाटणारे ममत्व? वृत्तपत्रसमूहांचे सत्तेशी असलेले हितसंबंध? की सत्तेची दहशत? या प्रश्नांची उत्तरे शोधताना वेगवेगळी उत्तरे सापडतील. मराठी पत्रकारिता खुजी का आहे, याचे उत्तरही त्यातून मिळेल.

**ग्रामीण पत्रकारिता**

खरा भारत खेड्यात आहे, असे महात्मा गांधी म्हणाले होते. कारण भारत हा खेड्यांचा देश होता आणि वेगाने नागरीकरण होत असले तरी आजही खेड्यांचा देश आहे. भारतातील सत्तर टक्के लोक आजही खेड्यात राहतात. प्राचीन काळापासून भारतीय जीवनाचे खेडे हे प्रमुख केंद्र आहे. स्वातंत्र्यानंतर सत्तेचे विकेंद्रीकरण होत सत्ता गावपातळीपर्यंत आली आणि गावाच्या विकासाचा अजेंडाही गावपातळीवर ग्रामसभांच्या माध्यमातून ठरू लागला. देशाच्या कारभारात अशा रीतीने खेड्यांचा प्रत्यक्ष सहभाग सुरू झाला. सत्तेचे केंद्र दिल्लीत असले तरी त्याची खरी ताकद गल्लीत आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे, असे म्हटले जाते, त्याचप्रमाणे महाराष्ट्र हेही कृषिप्रधान राज्य आहे. कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या या राज्याची दोनतृतीयांश लोकसंख्या शेती आणि शेतीपूरक व्यवसायांमध्ये आहे. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होताहेत. नागरीकरणामुळे खेडी बदलताहेत. तिथल्या माणसांची जीवनशैली बदलत आहे. या बदलांचे प्रतिबिंब प्रसारमाध्यमांमध्ये उमटते का? या प्रश्नाचे उत्तर समाधानकारक मिळत नाही.

बहुतेक वृत्तपत्रे प्रमुख शहरांमधून राजधानीच्या आणि विशेषतः जिल्ह्याच्या ठिकाणाहून प्रसिद्ध होतात. त्यांना बातम्या पुरवणारे जे स्रोत आहेत, त्यातला प्रमुख एक स्रोत म्हणजे ग्रामीण भागातील वार्ताहर किंवा बातमीदार. आधी जिल्हा वृत्तपत्रांचे तालुका किंवा महत्त्वाच्या गावांच्या ठिकाणी वार्ताहर होते, परंतु साखळी वृत्तपत्रांनी जिल्हा आवृत्त्या सुरू केल्यानंतर खपवाढीची स्पर्धा तीव्र बनली आणि त्यातून गावोगावी वार्ताहरांच्या नेमणुका होऊ लागल्या. प्रारंभी बातम्या देण्यापुरते असलेले हे वार्ताहर जाहिरात प्रतिनिधी म्हणूनही काम करू लागले. पुढील काळात वृत्तपत्रांच्या गरजेमुळे जाहिरात हा त्यांचा प्राधान्यक्रम बनला.

वृत्तपत्रांतून किंवा प्रसारमाध्यमांमधून ग्रामीण भागाचे जे प्रतिबिंब उमटते ती ग्रामीण पत्रकारिता. ज्या पद्धतीने आणि ज्या प्रमाणात ते दिसते ते पुरेसे आहे का? आणि ग्रामीण भागातील वस्तुस्थिती पाहता ते वस्तुनिष्ठ आहे का? या अनुषंगानेही विचार करणे आवश्यक आहे.

वृत्तपत्रांच्या बदलत्या प्राधान्यक्रमामध्ये ग्रामीण भागातील बातम्यांची पाने कमी झाली आहेत. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्या बातम्यांचे स्वरूपही खूप साचेबद्ध बनलेले दिसते. मंत्र्यांचे दौरे, पोलिस स्टेशनला नोंद झालेले गुन्हे, राजकीय नेत्यांचे आरोप-प्रत्यारोप, नेत्यांच्या वाढदिवसांचे कार्यक्रम अशा ठरावीक स्वरूपाच्या बातम्या दिसतात. शिवाय जाहिरातदार व्यक्ती-संस्थांच्या बातम्या असतात. शेतीमालाच्या दरासाठीची आंदोलने होतात, त्याला प्रसंगपरत्वे स्थान मिळते. जिल्ह्याच्या किंवा राज्याच्या ठिकाणच्या निर्णय घेणाऱ्या सत्ताकेंद्रापर्यंत ग्रामीण भागाचे खरे प्रश्न त्यामुळे पोहोचतच नाहीत. शहरातील गटार तुंबले किंवा एक दिवस पाणी आले नाही तर मोठमोठ्याने बोंबाबोंब केली जाते. नागरिकांचे हाल झाल्याचे वृत्तांत छापले जातात. टँकरभोवती जमलेल्या गर्दीचे फोटो छापले जातात, परंतु ग्रामीण भागातल्या लोकांचे पाण्यासाठी सतत हाल होतात, त्याचे प्रतिबिंब वृत्तपत्रांमधून कधीच दिसत नाही.

प्राथमिक किंवा माध्यमिक शिक्षक, क्वचित प्राध्यापक, ग्रंथपाल अशी मंडळी वार्ताहर म्हणून काम करायची आणि आजही करतात. काही वृत्तपत्रांचे संपादक वार्ताहरांच्या मासिक किंवा त्रैमासिक बैठका घेऊन मार्गदर्शन करतात. अलीकडे या बैठकांमधून प्रामुख्याने जाहिरातींचे उत्पन्न कसे वाढवायचे, याचेच मार्गदर्शन होते. बाकी संपादकीय स्वरूपाच्या बैठका कमी झाल्या आहेत. परिणामी ग्रामीण वार्ताहरांच्या प्रशिक्षणाची कुठलीही सोय उरलेली नाही. त्यामुळे ठोकळेबाज बातम्यांवर चालत राहते.

काळ बदलत आहे आणि त्याबरोबर पत्रकारितेनेही बदलायला हवे. वृत्तपत्रांनीही या बदलाची दखल घेऊन बदल करायला हवेत. हे बदल म्हणजे तंत्रज्ञानाच्या पातळीवरचे नव्हे तर आशयाच्या पातळीवरचे असायला हवेत. खेडी बदलत आहेत. त्यांचे वेगाने नागरीकरण होत आहे. खेड्या-पाड्यांतूनही स्थलांतरितांची संख्या वाढू लागली आहे. त्यामुळे खेड्यांची संस्कृती बदलू लागली आहे. जीवनशैली बदलू लागली आहे. पूर्वी एसटीतून प्रवास करताना हागणदारीचा वास आला की गाव जवळ आले, हे समजायचे. आता बहुतांश गावे हागणदारीमुक्त झाली आहेत. खेड्यांचा हा सकारात्मक बदलही लक्षात घ्यायला पाहिजे. आता एसटीतून जाताना चायनीजचा वास आला की गाव जवळ आल्याची जाणीव होते. याचा अर्थ खेड्यातल्या लोकांच्या खाण्याच्या आणि पिण्याच्याही सवयी बदलत चालल्या आहेत. चायनीजबरोबरच राजस्थानी खाद्यपदार्थांचे गाडे सुरू झाले आहेत. आइसक्रीमवाल्यांनी बस्तान बसवले आहे. या बदलांमुळे खेड्यांचे अर्थकारण

बदलले आहेच, शिवाय फास्ट फूडमुळे मुलांच्या आरोग्यावरही परिणाम होऊ लागला आहे. हे बदल केवळ कथा-कादंबऱ्यांमध्ये घ्यावयाचे बदल नाहीत. पत्रकारितेनेही त्याची दखल घ्यायला पाहिजे. त्याचे एकूण खेड्याच्या समाजजीवनावर काय परिणाम होताहेत, याची नोंद घेतली पाहिजे. दुर्दैवाने या बदलत्या समाजजीवनाचे एकशतांश प्रतिबिंबही वृत्तपत्रांतून किंवी वृत्तवाहिन्यांवरून दिसत नाही.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशात सगळीकडे लँड माफिया वाढले आहेत. जमिनींच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार जोरात सुरू आहेत. त्यासाठी ग्रामीण भागात एजंट नावाची नवी जमात तयार झाली आहे. शेतजमिनी कवडीमोल किमतीने बळकावल्या जात आहे. पवनचक्की कंपन्यांचे अतिक्रमण होऊ लागले आहे. स्थानिक पुढारी कंपन्यांना सामील होऊन जमिनी बळकावत आहेत. या कंपन्यांच्या दादागिरीमुळे खेड्या-पाड्यांतील स्वास्थ्य बिघडत चालले आहे. कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत आहेत. परंतु त्याची नोंद पत्रकारितेने गांभीर्याने घेतल्याचे दिसून येत नाही.

शेती हाच ग्रामीण पत्रकारितेचा पाया आहे. शेतकऱ्यांवरच्या संकटांची जाणीव पत्रकारितेने करून द्यायला हवी. शेतकऱ्यांना धोक्यांबाबत सावध करायला हवे. नवीन बियाणी-खते-कीटकनाशकांबाबत वस्तुस्थितीनिदर्शक माहिती द्यायला हवी. जैविक तंत्रज्ञानाबाबत शास्त्रशुद्ध माहिती घ्यायला हवी आणि काळाच्या पातळीवर त्याच्या योग्य-अयोग्यतेबाबत वस्तुनिष्ठ मांडणी करायला हवी. राजकीय किंवा धंदेवाईक हेतूने अनुकूल किंवा प्रतिकूल प्रचार करणाऱ्यांचे हेतू उघड करायला हवेत. छोटे-छोटे शेतकरीही शेतीमध्ये नवनवे प्रयोग करीत असतात, ते लोकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न करायला हवेत. उत्पादनवाढीसाठीच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाबाबत प्रबोधकाची भूमिका घ्यायला पाहिजे. सरकारी योजना शेतकऱ्यांपर्यंत नीट पोहोचतील आणि त्यांचा जास्तीत जास्त लाभ घेतला जाईल, यासाठीची भूमिकाही विधायक दृष्टीने पार पाडायला हवी. परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपुरतेच शेतकऱ्यांसंबंधीच्या बातम्यांना स्थान उरले आहे.

खरे तर लोकशाही व्यवस्थेत शांततामय मार्गाने अहिंसक रीतीने केले जाणारे उपोषण, आंदोलन व सत्याग्रह यांच्या बातम्या प्रकर्षाने मांडायला हव्यात. परंतु आजच्या पत्रकारितेमध्ये अहिंसक मार्गाने केली गेलेली आंदोलने, बातमीमूल्य हरवत चालली आहेत की काय असे वाटते. याउलट विध्वंस, मारझोड, तोडफोड, राडा, जाळपोळ, दंगे करणाऱ्या व्यक्ती व संघटनांना वारेमाप प्रसिद्धी मिळताना दिसते. लोकशाही व्यवस्थेवर आघात करणाऱ्या हिंसक आंदोलनाला वारेमाप प्रसिद्धी व शांततामय मार्गाने व अहिंसक रीतीने सत्याग्रह व आंदोलने करणाऱ्यांना प्रसिद्धीची उपेक्षा नशिबी येते, हा एकप्रकारे लोकशाहीवर आघात आहे आणि पत्रकारितेसाठी तो आत्मघातकी रस्ता आहे. लोकशाही व्यवस्थेवरचा विश्वास उडून जाण्यास अशा बातम्या पूरक ठरतात व चुकीचे संदेश देतात हे लक्षात घेतले जात नाही.

### पत्रकारिता बहुमुखी व्हावी

पत्रकारितेने आजच्या काळात अधिक बहुमुखी व्हायला पाहिजे. शोधपत्रकारिता केलीच पाहिजे, परंतु काळाच्या पातळीवर झालेले बदल विचारात घेऊन पुढची पावले टाकली पाहिजेत. आजच्या काळात इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा प्रभाव आणि प्रसार वाढला आहे. सोशल नेटवर्किंग साइट्सचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होतोय. वृत्तवाहिन्यांचा आवाज आणि गलबला अधिक आहे, त्यामुळे त्यांचा तत्कालिक प्रभावही जाणवतो. परंतु त्यांच्या मर्यादाही आहेत आणि त्या अनेक महत्त्वाच्या प्रसंगांमध्ये समोर आल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या गोंगाटात मुद्रित माध्यमांचा आवाज क्षीण झाल्यासारखा वाटत असला तरी, आजच्या काळात खरी जबाबदारी आहे ती मुद्रित माध्यमांवरच.

न्या. मार्कंडेय काटजू प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष होते, तेव्हा त्यांनी माध्यमांसंदर्भात एक निरीक्षण नोंदवले होते आणि त्यावेळी त्यासंदर्भात उलटसुलट चर्चाही झाली होती. न्या. काटजू म्हणाले होते, 'भारतातील प्रसारमाध्यमांमधील बहुतांश पत्रकारांची बौद्धिक पात्रता खूपच निम्नस्तरावरील आहे. बहुतांश पत्रकार खूपच चाकोरीबद्ध आहेत, त्यामुळेच माझे त्यांच्याविषयीचे मत विपरीत आहे. स्पष्ट सांगायचे, तर या पत्रकारांना अर्थशास्त्र किंवा राज्यशास्त्रातील सिद्धांत किंवा साहित्य, तत्त्वज्ञान यांचे फारसे ज्ञान असेल, असे वाटत नाही. त्यांनी या विषयांचा अभ्यास केला असेल, असेही वाटत नाही. भारतीय माध्यमे जनतेच्या हिताविरोधातच भूमिका घेत असल्याचे दिसून येतात. सामान्यांच्या वास्तवातील समस्यांचे मूळ आर्थिक घडामोडींमध्ये आहे. देशातील ८० टक्के जनता भयावह दारिद्र्यात आहे, महागाईची समस्या, आरोग्याचे

प्रश्न, बेरोजगारी अशी आव्हाने आहेत. मात्र, प्रसारमाध्यमे जनतेचे लक्ष मूळ समस्यांवरून इतरत्र वळवताना दिसतात.'

काटजू यांच्या या म्हणण्यामध्ये त्यावेळीही काही चुकीचे नव्हते आणि आजही काही चुकीचे नाही. कोणत्याही विशिष्ट क्षेत्राचा अभ्यास असलेल्या पत्रकारांची वानवा सगळीकडे दिसून येते. सगळेच येते म्हणजे नीटपणे काहीच जमत नाही, अशी सर्वसाधारण स्थिती आहे. तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र वगैरे लांबच्या गोष्टी आहेत. साहित्य-कला-संस्कृतीबाबतही घोर अडाणीपण दिसून येते. खरे तर मराठी पत्रकारांचे साहित्यक्षेत्रात फार मोठे योगदान आहे. अनेक पत्रकारांनी साहित्यात देदीप्यमान कामगिरी केलेली आहे. कथा, कादंबऱ्या, नाटक, काव्य, ललितलेखन अशा क्षेत्रांत अनेक मराठी पत्रकारांची नावे प्रसिद्ध आहेत. ग.त्र्यं. माडखोलकर, न.चिं. केळकर, प्रबोधकार ठाकरे, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, आचार्य प्र.के. अत्रे, वि.वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज, विजय तेंडुलकर, अरुण साधू, माधव गडकरी, विद्याधर गोखले, विजय कुवळेकर, उत्तम कांबळे, महावीर जोंधळे, भालचंद्र देशपांडे, जयंत पवार अशी मोठी नामावली देता येते. अलीकडच्या काळात साहित्य आणि पत्रकारितेचा हा धागा तुटत चालला आहे. पत्रकारिता आणि साहित्याचा संबंध तुटत चालल्यामुळे पत्रकारिता रुक्ष बनत चालली आहे. साहित्य-कला-संस्कृतीच्या संदर्भात अनेक महत्त्वाची विधाने होत असतात, खंडन-मंडनाचे राजकारण होत असते. परंतु वार्तांकन करणाऱ्या वार्ताहरांना ते समजत नसल्यामुळे त्यातले काहीच छापून येत नाही. अशा कार्यक्रमांमध्ये 'व्हिज्युअल' मटेरिअल नसल्यामुळे वृत्तवाहिन्या त्यांची दखल घेत नाहीत. वृत्तपत्रांमधून साहित्य-कला-संस्कृतीविषयक कार्यक्रमांच्या ज्या बातम्या प्रसिद्ध होतात, त्या वाचल्या तर एकूण सांस्कृतिक सुमारपणाचे दर्शन घडते. त्याऐवजी वृत्तपत्रांनी अशा बातम्या छापल्या नाहीत, तर त्यांचे सांस्कृतिक क्षेत्रावर उपकार होतील, असे म्हणण्याजोगी परिस्थिती आहे.

एकूणच काळ बदलत आहे. जगभरात माध्यमांमध्ये तांत्रिक बदल झपाट्याने होताहेत. मराठीतही ते होताहेत. परंतु मराठी पत्रकारिता तांत्रिक बदल स्वीकारण्याबाबत काळाच्या बरोबर आहे. प्रसारमाध्यमांची मूळची भूमिका हरवली आहे, परिणामी पत्रकारितेतला आशय गायब झाला आहे. खप आणि उत्पन्नाचा आलेख चढता असला तरी पत्रकारितेचा पाया मात्र भुसभुशीत झाला आहे. मराठी पत्रकारिता चेहरा हरवून बसली आहे!

**बातम्यांचा सौदा**

पेड न्यूजसंदर्भात आपण जवळपास गेल्या दोन दशकांपासून ऐकत आलो आहोत. आदर्श आचार-संहितेमध्ये उमेदवाराच्या निवडणूक खर्चावर निर्बंध असल्यामुळे वृत्तपत्रांमध्ये जाहिराती करण्यावर मर्यादा आल्या. त्यातून काढलेला मार्ग म्हणजे पेड न्यूज. म्हणजे बातम्यांसारख्या बातम्याच छापायच्या. प्रचाराच्या. प्रचारफेरीच्या. जाहीर सभेच्या. निवडणूकप्रचाराशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या. संबंधित उमेदवाराने जाहिरातीच्या दराने त्या बातम्यांचे पैसे रोखीने द्यायचे. उमेदवाराचा प्रचार झाला. वृत्तपत्रांना पैसे मिळाले. कुणाची तक्रार नाही. असे वर्षानुवर्षे चालत आले आहे. अलीकडच्या काळात पद्धती बदलत गेल्या. पेड न्यूज अनेकदा नजरेत येऊ लागल्या आणि त्याबाबत तक्रारी होऊ लागल्या म्हणून मग मतदारांना प्रभावित करणाऱ्या छुप्या मोहिमा राबवल्या जाऊ लागल्या. उदाहरणार्थ बोलायचे तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी किंवा अन्य मोठ्या नेत्याच्या जाहीर सभेचे लाइव्ह प्रसारण दिसते. दर्शकांना वाटते बातमीचा भाग म्हणून सभा दाखवताहेत. प्रत्यक्षात संबंधित पक्षाने त्या सभेच्या प्रसारणासाठी जाहिरातीच्या दराने रोखीने पैसे दिलेले असतात. लोकांना फसवण्याचे असे अनेक मार्ग राजकीय पक्ष अवलंबत असतात. हे सगळे जगजाहीर होते, परंतु ते सांगोवांगीच्या स्वरूपात. 'कोब्रापोस्ट'ने हा सगळा बाजार मध्यंतरी चव्हाट्यावर आणला. टाइम्स ऑफ इंडिया, इंडिया टुडे, हिंदुस्थान टाइम्स, झी न्यूज, नेटवर्क १८, स्टार इंडिया, एबीपी न्यूज, दैनिक जागरण, रेडिओ वन, रेड एफएम, लोकमत, एबीएन आंध्रा ज्योती, टीव्ही ५, दिनामलार, बिग एफएम, के न्यूज, इंडिया व्हॉइस, द न्यू इंडियन एक्स्प्रेस, एमव्ही टीव्ही आणि ओपन मॅगझिन हे माध्यमजगतातील बडे खेळाडू कोब्रापोस्टच्या स्टिंग ऑपरेशनमध्ये रंगेहाथ सापडले. पैसे घेऊन हव्या तशा बातम्या छापण्यासाठी तयारी असल्याचे संबंधितांनी मान्य केले होते. नंतर अनेकांनी त्याचा इन्कार करून खुलासेही केले होते, परंतु त्याला फारसा अर्थ नव्हता. देशातील प्रमुख माध्यमसमूह निवडणुकीच्या तोंडावर पैशांच्या बदल्यात स्वत:ला विकण्यास तयार असल्याचे यातून स्पष्ट झाले होते.

अन्य माध्यमांच्या तुलनेत मुद्रित माध्यमे अधिक विश्वासार्ह असल्याची चर्चा केली जाते. परंतु सामान्य माणसाच्या छापील शब्दावर असलेल्या विश्वासाला तडा

देणारीच परिस्थिती अवतीभोवती असल्याचे यातून स्पष्ट होते.

गेल्या काही वर्षांत झालेय काय की पत्रकारांच्या कामाचे स्वरूप बदलले असून पत्रकारांचे पीआरओ झाले आहेत. भाजपच्या गोटातले, शिवसेनेच्या गोटातले, राष्ट्रवादीच्या जवळचे, काँग्रेसच्या विचारधारेचे, कृष्णकुंजचे निष्ठावान, निळी पताकावाले, लाल निशाणवाले असे वेगवेगळ्या गटांमध्ये विभागले आहेत. काही जण जातीनुसार विभागले आहेत. काही जण विचारधारेनुसार विभागले आहेत. हे असे कितीही कसेही असले तरी इलेक्ट्रॉनिक मीडियात सगळ्या मोक्याच्या जागी भाजपचे प्रवक्ते बसले आहेत. किंबहुना ते लोक तिथे असावेत याची व्यवस्था भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनीच केली आहे. त्यामुळे देशाच्या पातळीवर ज्याप्रमाणे गोदी मीडिया ही एक स्वतंत्र ओळख बनली आहे, त्याचप्रमाणे मराठी वृत्तवाहिन्यांनीही फडणविशी मीडिया ही ओळख तयार केली आहे. वर नरेंद्र खाली देवेंद्र अशी घोषणा २०१४ पासून भाजपच्या गोटातून दिली जात होती. वृत्तवाहिन्यांनी ते खरोखर आत्मसात केले असून दिल्लीतला मीडिया जसा नरेंद्रांच्या प्रभावाखाली आहे, तसा मुंबईतला मीडिया देवेंद्रांच्या प्रभावाखाली आहे.

माध्यमांचे जग इतके प्रदूषित झाले आहे, की नजीकच्या काळात ते स्वच्छ होण्याची शक्यता अजिबात दिसत नाही.

**– विजय चोरमारे**

भ्रमणध्वनी – ९५९४९९९४५६

## प्रतिक्रिया

मा. संपादक श्री. नारायण लाळे सर,

'साहित्य'चा ऑगस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर २०२२ चा अंक नेहमीप्रमाणे वाचनीय आहे. अंक हाती घेताच शालेय जीवनाच्या आठवणी जाग्या होतात. दरवर्षी नवीन वर्गात गेल्यावर जसे नव्या पाठ्यपुस्तकांचा गंध घ्यायचो तसं 'साहित्य'चा अंक मिळाल्यानंतर वाटतं, इतका तो सुंदर, छोटा व गोंडस वाटतो.

ह्या अंकात माझ्या दोन्ही आवडत्या कवींवर लिहिलेले 'अलक्ष लागले दिवे' आणि 'ना. धों. महानोरांची कविता' ह्या मा. डॉ. अनुजा जोशी व मा. डॉ. मधुकर केशव वर्तकांच्या लेखांनी भावुक बनवलं. पौर्णिमा केरकरांचे 'कुंजण', डॉ. नरेंद्र पाठक लिखित 'अनोखी परंपरा' आणि राजीव जोशींचे पुस्तक परिचय उत्तमच! खरं तर प्रत्येक अंक हा संग्रही ठेवावा असाच असतो!

असे उत्तमातले उत्तम तुम्ही देत आहात म्हणून तुम्हा संपादक मंडळाचे आभार!

आपला नम्र

**गॅरी फरोज,** वसई.

भ्रमणध्वनी – ९३२०३३५८१३

---

नमस्कार

आदरणीय संपादक आणि कार्यकारी संच

आपण मागील वर्षात प्रकाशित केलेले सारे अंक छान होते.


बोली भाषेचा अंक हा संग्राह्य झाला आहे.

अभिनंदन आणि अनेक शुभेच्छा.

आपला

**किरण येले**

भ्रमणध्वनी – ९८६९२६०७८०



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

साहित्याची भाषा

•

# साहित्यलेखनाची भाषा आणि संबंधित बदल

**प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख**

**भाषेच्या लेखनशैलीचे हे नानाविध तथापि निवडक नमुने जसे लक्षणीय आहेत तद्वतच त्या त्या शैलींमागे असलेले बहुसंदर्भही तेवढेच महत्त्वाचे आहेत. त्यातील विचारसौंदर्य किंवा भावसंदर्भ किंवा प्रांतनिष्ठ काही संदर्भ पुष्कळ बोलके असून त्यापलीकडे जाऊन अधिक काही सांगणारे हे संदर्भ स्वाभाविकच महत्त्वाचे ठरतात.**

**आरंभी** तीन घटकांची नोंद करणे मला अगत्याचे वाटते ते यासाठी, की साहित्यलेखनविषयक भाषा हा या लेखाचा विषय पायघोळ, महापटाचा आणि एका स्वतंत्र ग्रंथाचाच आहे. त्यामुळे हा आढावा अर्थातच, परिपूर्ण आणि एकूण या विषयास न्याय देणारा नक्की नाही. एकप्रकारे ह्या नोंदी आहेत. दुसरा घटक म्हणजे भालचंद्र नेमाडेलिखित ‘साहित्याची भाषा’, आनंद यादवलिखित ‘साहित्याची निर्मितीप्रक्रिया’ आणि ‘एकनाथ पाटील संपादित ‘कादंबरीच्या निर्मितीचा सूत्रशोध’ ह्या महत्त्वाच्या तीन ग्रंथांमधून भाषिक सर्जक अंगाने महत्त्वाचे तात्त्विक चिंतन मला महत्त्वाचे वाटते. त्याअनुरोधाने अजून एक दाखलाही इथे नमूद करायला हवा; आणि तो म्हणजे, ‘अंतर्नाद’च्या सन २०१२च्या दिवाळी अंकामध्ये ‘मी आणि माझे लेखन’ या शीर्षकाखाली एक विशेष विभाग छापून, त्यात महत्त्वाच्या १५ साहित्यिकांची भूमिका मांडली गेली जी खूप महत्त्वाची होती; आणि तिसरा घटक म्हणजे लेखकांच्या, वाचकांसमोर विविध माध्यमांमधून ज्या मुलाखती सादर होतात; त्यातूनही साहित्यिकांचा सामाजिक, भाषिक, प्रादेशिक, सांस्कृतिक एकूण सर्जक प्रदेश स्पष्ट होत गेलेला

असतो, जो अभ्यासाचे साधन म्हणून अगदीच महत्त्वाचा मानायला हवा. हे तिन्ही घटक विविधांगी साहित्यलेखनाची भाषा समजून घेताना माझ्या ह्या मांडणीस साहाय्यभूत ठरणारे आहेत. शिवाय गंगाधर गाडगीळ यांनी भाषा आणि साहित्याची उकल करताना काही वेगळे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. (संदर्भ : खडक आणि पाणी) जसे की : १) मन:स्थितीच्या चित्रणावर भाषेचा नादाचा अपरिहार्य परिणाम होतो. २) भाषेचा नाद हा तिच्या आशयात बुचकळून निघालेला असतो. ३) कवींना तालबद्ध व सुरचित नादांची भाषा वापरणे आवश्यक वाटते. ४) साहित्यातील भाषा प्रतीती देणारी असते. ५) प्रत्येक शब्दाभोवती आशयाचे एक मोहोळ तयार होते. त्या मोहोळासकट साहित्यिकाला शब्द हवा असतो. साधारणत: गाडगीळकृत हे पाचही मुद्दे ह्या एका विषयाचा आवाका आणि ह्या विषयाचे सूत्र समजून घेताना विचारात घेणे गरजेचे ठरू शकते. सारांश, अभिव्यक्तीची अनिवार्यता, संवादांची अपरिहार्यता, लेखनाची निकड, स्वत:ला ज्याच्या त्याच्या शैलीमध्ये व्यक्त होण्यासाठी 'भाषा' तर हवी असतेच. त्यामुळे भाषेला माध्यम म्हणा की, साधन म्हणा; तिच्याशिवाय माणूस-कलावंत हा व्यक्त होत नाही. स्वरांनी डवरलेले संगीत, छन्नीच्या घावांनी साकारलेले शिल्प, ब्रशच्या फटकाऱ्याने अवतरलेले चित्र, मूकाभिनयातून 'बोलकी' झालेली देहबोली हे असे काही इतर अपवाद 'शब्दांवीण संवादू' असतात. तथापि, सरसकट मूळ 'भाषा' बाजूस सारून 'साहित्याची मीमांसा' अधुरीच. 'साहित्य' म्हणून चर्चा करताना भाषेला एक स्वतंत्र अस्तित्व प्राप्त होत जातेच, याकडे दुर्लक्ष करता येत नाही. जसे, आमच्या मराठी साहित्यविचार करताना अगदी कुसुमाग्रज आणि ना.घ. देशपांडे यांचा एक सहज दाखला घेतला तरी दोघांच्या काव्यभाषेचा वंश हा केवढा निराळा आहे, हे लक्षात येते. आंतरिक आवेग आणि ओजस्वीतेचे सामर्थ्य लाभलेली कविवर्य कुसुमाग्रजांची भाषा आणि निसर्ग आणि प्रीतीबंध केवढ्या अशा आल्हादिक पद्धतीने साकार करणारी कविवर्य नाघंच्या कवितेची भाषा ह्या दोन्ही महान अशा प्रतिभावंतांच्या 'भाषा' मनांवर अधिराज्य करून राहतात किंवा वा.रा. कांत आणि बा.भ. बोरकरांच्या काव्यभाषेचे विवेचन कुसुमाग्रज-ना.घ. यांच्या काव्याला लावलेल्या न्यायाने करता येईल. 'हृदयभंगाची कविता' असे इंदिरा संतांच्या एकंदर कवितेचे अचूक वर्णन करताना डॉ. अरुणा ढेरे यांनी 'निसर्ग, प्रेम, विरह, दु:ख आणि एकाकीपण हे इंदिराबाईंच्या कवितेचे पंचप्राण आहेत.' असे म्हटलेले आहे, ते अगदी यर्थार्थ आहे. त्यामुळे, भाषिक काव्यप्रतिमाही या कवयित्रींच्या पंचप्राणांना अधिकच स्पष्ट करत नेतात. उदाहरणार्थ, खोल विरहाची अभिव्यक्ती करताना इंदिराबाई लिहितात :

'चाले कशाचे कांडण
घाव घालतात फक्त
माझे काळीज उखळ
तेही आता शब्दमुक्त'

भाषेलाही ओलांडून पुढे गेलेली संतांची ही अभिव्यक्ती वर निर्देश केलेल्या कवयित्रींच्या पंचप्राणांना सहज आणि कमी शब्दांत व्यक्त करते. (संदर्भ : गर्भरेशीम) काव्यभाषेच्या याप्रकारच्या जागा इंदिराबाईंच्या विविध कवितांमध्ये आढळतात. प्रेमकविता, गीतकाव्य या प्रकारच्या लेखनातली सामाजिक ओझे झुगारून व्यक्त झालेली शांताबाईंच्या कवितेची भाषा रसिक आणि वाचकांना कायम लुभावणारी आहे. 'तोच चंद्रमा' किंवा 'कळ्यांचे दिवस फुलांच्या राती' ह्या गीतसंग्रहांतील शांताबाईंची काव्यभाषा मनांवर गारूडच करते. 'कविप्रकरण'मधील ओव्या किंवा 'पर्वणी', 'अश्वमेध'सारखे अभंग यातील कुसुमाग्रजांची भाषा आणि 'पळस'मधील दृक्प्रत्ययी, रंगसंवेदना यांनी वेगळा अनुभव देणाऱ्या प्रतिमा महत्त्वाच्या होत. जसे :

'श्रावणाच्या नक्षीत
देवळांचे कळस
कळसावर पुन्हा
मेघांचे पळस'

या कवितेतील प्रतिमांची मोहक शृंखला मनवेधी आहे. (संदर्भ : प्रवासी पक्षी (सं.) शंकर वैद्य) दुसरीकडे ज्यांच्या कवितेने 'युग' निर्माण केले. त्या मर्ढेकरांच्या कवितेबद्दल/भाषेबद्दल मराठीत अनेक ग्रंथ लिहिले गेले. या कवितेचा/आशयाचा/शैलीचा/भाषेचा/नवतेचा एकप्रकारे 'स्पष्ट' ठसा एकूण मराठीत अनन्यसाधारण ठरला. धों.वि. देशपांडे यांनी मर्ढेकरी कवितेची मीमांसा करताना नोंदवलेली निरीक्षणे येथे मुद्दाम नोंदवतो.

१) मर्ढेकरांच्या भाषेची भावसूचक भव्यता उल्लेखनीय आहे.
२) इंग्रजी धाटणीचे मराठी शब्दप्रयोग हे मर्ढेकरांचे आणखी एक वैशिष्ट्य होय.
३) जुन्या संतवाङ्‌मयाबरोबरच मर्ढेकरांची भाषा लोकवाङ्‌मयाचेही देणे लागते.
४) मर्ढेकरांची काव्यभाषा भाववाहक असली ती तिची मांडणी तर्काधिष्ठित असते.

अत्यंत थोर कवी मर्ढेकरांच्या कवितेची भाषा आणि तिच्या आशयासंदर्भात ग्रेस ह्यांनी 'मर्ढेकरांच्या कवितेतील भाषागत व आशयगत आंदोलने आजही मराठी कवितेच्या मूलस्रोताची शक्तिकेंद्रे आहेत.' असे संबोधून मर्ढेकरी काव्याचा मजबूत पाया आणि त्यांच्या कवितेचे एका अर्थी वर्तमानभविष्य किती मजबूत आहे, हेच सांगितले आहे! (संदर्भ : मर्ढेकरांची कविता - एक अभ्यास : धों वि. देशपांडे) भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरी-काव्यांच्या भाषेचे चिंतन करताना महानुभाव, संतसाहित्य, लोकसाहित्य आणि एकूण समाज-संस्कृती-लोक त्यांच्या धाटी यांचा विचार करावा लागतो. महावृक्षांच्या खोलवर सर्वत्र पसरलेल्या मुळ्यांपर्यंत पोहचताना जे कळावे, त्याप्रमाणे नेमाडे यांचे लेखन समजून घ्यावे लागते. त्याशिवाय त्यातील 'भाषा-बोली-समाज-लोकसंस्कृती-भूभाग-काळ' यांच्या संगाने येणारे 'संदर्भ' कळू शकत नाही. अगदी 'कोसला'ने स्थापन केलेला सर्वविषयस्पर्शी मानदंड म्हणूनच लक्षात राहतो. 'कोसला'च्या भाषेचे गारुड वाचकांच्या अनेक पिढ्यांवर आजही अधिराज्यच गाजवणारे आहे किंवा नेमाडे यांच्या 'हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ'च्या संदर्भातला दाखला आता देता येईल.

- खंडेराव, तू मुंग्या मुंग्या होऊन वारूळच झाल्याचं तुझ्या लक्षात आलं, ते इथे. आठव.
- खंडेराव, ह्या आकाशाच्या पोकळीत तुझं तोंड खुपसून पाहतो आहेस.
- खंडेराव, झोपून झोपून तुझ्या डोक्यातला दगड कधी निघणार आहे?
- खंडेराव, असंच तू आता ह्या तुझ्यावरच्या संकटात शिंगं अडकवून टाकली आहेस.
- खंडू, बेडर होऊन जगण्याच्या ह्या कोलाहलात भाग घे.

खंडेरावला संबोधत भाषाशैलीचा खास घाट घडवणारी रा.रा. नेमाड्यांची कादंबरीची भाषा स्वतंत्र प्रभाव स्थापित करते. (संदर्भ : हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ)

वस्तुतः स्वातंत्र्याचा/आंदोलनांचा/चळवळींचा प्रभाव लेखक-लेखन प्रवृत्तींवर सर्वकाळच राहिला. मात्र, साहित्याचे विविध प्रवाह आल्यानंतर भाव, अनुभव, भाषा, शैली, आशय, विषय, भूवैशिष्ट्ये, समाज, संस्कृती हे सर्व बदल साहित्यात 'केंद्रवर्ती' आले. शिरूरकर, बोरकर, पेंडसे, तल्हार, कर्णिक, दांडेकर, माडगूळकर, शेळके, देसाई, खानोलकर, दळवी, पाटील, मोकाशी ह्या अत्यंत कसदार मराठीतील ज्येष्ठ-श्रेष्ठ लेखकांनी 'वास्तवभान' लेखनस्थानी ताकदीने आणले. आपली शैली, आपली भाषा, आपला आशय त्यांनी लेखनात 'अक्षर' केला. तो लेखनातही अमर केला. याबद्दल शंका नाही. पण, त्याबरोबरच मराठीत अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात यांनी भूक-दुःख-वेदनांचा नवा आणि वास्तवाधिष्ठित स्वतंत्र असा प्रदेश साहित्यात आणला. त्यांनी नवे नायक उभे केले. तसेच जगण्याची/स्वाभिमानाची नवी भाषाही जन्माला घातली. त्यातून माणुसकीचे, माणसांचे नवे 'गान-भान' मराठीत आले. हा काळजाला भिडणारा ठसठशीत भाषेचा अनुभवच अण्णाभाऊंनी मराठीला दिला. मात्र याच श्रेष्ठत्वाला द्यायचे 'मानस्थान' आपण उशिराच दिले. ही खंतही पुन्हा आहेच! दुसरीकडे, यादव-बोराडे-भोसले-मुलाटे-कोत्तापल्ले-महानोर-चंदनशिव ही अत्यंत महत्त्वाची ग्रामीण साहित्यिकांची फळी गावसंस्कृती आणि शेतीसंस्कृती यांचे सत्यदर्शन घडवत लिहिती राहिली. सत्ताकारण, भ्रष्टाचार, शोषण आणि भूमिपुत्रांच्या श्रम-वेदनेला कटिबद्ध झालेली अगदीच न्याय्य लेखन भाषा/बोलींसह या फळीने उभी केली. एकूण सामाजिक परिवर्तनांची भक्कम बाजू या सर्व लेखनांमध्ये कायम राहिली. महादेव मोरे, उत्तम बंडू तुपे, लक्ष्मण माने, भास्कर चंदनशिव, बाबाराव मुसळे, पुरुषोत्तम बोरकर, राजन गवस, राजन खान, हमीद दलवाई ह्या अनेक लक्षणीय महत्त्वाच्या लेखकांनी आपल्या साहित्यातून 'नवे विषय, नवे जग, नवे अनुभव, नवा भूभाग, बोलीभाषा, भाषाशैलींचे नवे मानदंड' निर्माणच केले. यासंदर्भात, फार वरच्या श्रेणीत रंगनाथ पठारे या थोर कादंबरीकारांचे लेखनकर्तृत्व तर तमाम मराठी संस्कृतीला मान्य करावे लागेल. तसेच विविध प्रदेशांत सलोखा स्थापून असलेले श्रमकरी, गरीब मानवी जग, तेथील भूकमारी, संघर्ष, अनेक जातीधर्मापल्याड असलेली हाडामांसाच्या माणसांची दुनिया 'बहुभाषा सौष्ठवांसह' महादेव मोरे ह्यांनी कथा-कादंबऱ्यांतून आणली. विषयबदल/भाषेबद्दल म्हणून मोरे यांचे लेखन श्रेष्ठ ठरते.

ज्ञानसाधना आणि कादंबरीलेखनशैलीचा/विषयविविधतेचा मानदंड म्हणून अरुण साधू यांचे वाङ्मयीन कार्य अजोड. 'मुखवटा', 'झिपऱ्या', 'मुंबई दिनांक' ह्या साधूंच्या कलाकृती मराठीला देणगी ठरतात. भाषा, अनुभव, आशय, शैली - या पातळीवरही साधूंनी मानदंड उभे केले आहेत ज्याला तोड नाही. शिवाय, अनंत सामंतांच्या कादंबरीलेखनाची भाषाशैली म्हणून/विषय निराळेपण म्हणून

आणि कसदार लेखन म्हणून स्वतंत्र नोंद करता येईल. सदानंद देशमुख, नामदेव कांबळे, रमेश इंगळे, रमेश अंधारे, अशोक कोळी, श्रीकांत देशमुख, भारत काळे, आसाराम लोमटे, जाधव, शेषराव मोहिते, प्रदीप पाटील, मनोज बोरगावकर ही कथा-कादंबरीकारांची सशक्त फळी मराठीच्या साहित्येतिहासात स्वतंत्र गुणवत्ता स्थापित करते. किरण गुरव, कृष्णात खोत, प्रवीण बांदेकर, बालाजी सुतार, प्रशांत बागड, प्रणव सखदेव, प्रसाद कुमठेकर, प्रतिमा इंगोले, कल्पना दुधाळ, द.तु. पाटील, राजकुमार तांगडे : भूमी, भाषा, अनुभव, नवविषयातील नवाशय अशा बहुस्तरीयदृष्ट्या ही फळी साहित्यसंस्कृतीतला नवा आयाम प्राप्त करून देणारी फळी होय. ही नवी श्रेष्ठ अशी लेखकपिढी आशय व भाषा दोन्हींना घेऊन ठाम उभी आहे.

भाषिकदृष्ट्या प्रयोगशील बाब म्हणून पथनाट्य, सत्यशोधकी जलसे, वामनदादा कर्डकांची हजारो गीते आणि झाडीपट्टी रंगभूमीवरील जनमन ओळखणाऱ्या लोककलावंतांची नाटकप्रवण लेखणी आणि भू-भाषा यासंबंधी स्वतंत्र नवा निबंध लिहिला पाहिजे. डॉ. हरिश्चंद्र बोरकर, डॉ. कापगते, ना.गो. थुटे, डॉ. मनोहर नरांजे, अंजनाबाई खुणे यांचे झाडीपट्टी रंगभूमी बोली या क्षेत्रांतील कार्य भाषासंस्कृतीच्या संदर्भात फारच महत्त्वाचे ठरावे. या महान कार्याची पाहिजे तशी दखल शासन व इतर संस्थांनी घेतलेली नाही. भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या झाडी प्रदेशांतील लोकरंभीचे भाषिक-सांस्कृतिक भरीव योगदान अत्यंत महत्त्वाचे होय. इथे नवरदेवाच्या स्वागताला 'आदव्याची सुपारी' अशी अर्थसुंदर शब्दावली आहे. तर ग्रंथदिंडीला झाडी बोलीभाषेमध्ये 'पोहा' असा रसपूर्ण शब्द आहे. श्रद्धांजलीसारख्या शब्दाला 'दुखोडा' शब्द उपयोगात आणला जातो. अहवाल वृत्तांताला 'अनुभव' असा गोड शब्द झाडीबोलीत, झाडी संमेलनात योजला जातो.

'शालोम' (संपादक – नारायण लाळे) ही येशू ख्रिस्त आणि संबंधित मराठी कविताविषयक महत्त्वाची कलाकृती. साहित्य अकादमी / भारत सरकार यांनी प्रकाशित केलेली ही कलाकृती जवळजवळ ८४ प्रतिभावंतांच्या काव्याचा विचार समाजापुढे ठेवणारी आहे. त्यातील लेखनविविधा, विविधशैलीदर्शन, प्रत्येक कवीचे प्रातिभिक प्रतिमाविश्व आणि येशू ख्रिस्तांसंबंधी वाचकांना येणारा अपूर्व समाधानकारक अनुभव. ही सगळी गुणवैशिष्टचे 'शालोम'मध्ये सामावलेली आहेत. ख्रिस्ती साहित्यक्षेत्रातील एक दर्जेदार काव्यविषयक संपादन म्हणून लाळे यांच्या ह्या वाङ्मयीन कार्याची नोंद करावीच लागेल. फादर दिब्रिटो, जोसेफ तुस्कानो, डॉ. कार्व्हालो, सायमन मार्टिन आणि इतर अनेक मातब्बर प्रतिभावंतांनी सामाजिक/भाषाविषयक/विज्ञानबोधी/सांस्कृतिक/परिवर्तननिष्ठ मौलिक लेखनात उल्लेखनीय कार्य केले आहे / करीत आहेत. मराठी ख्रिस्ती साहित्याची ही आणि यापुढे जाणारी एक अशी समृद्ध परंपरा मराठी भाषासंस्कृतीला आणि मराठी साहित्यसंस्कृतीला समृद्ध आकार आणि सशक्त आशय द्यावयास सतत पुढे येत राहिली. याशिवाय, मारुती चितमपल्ली ज्यांनी अवघे जीवन, जंगल, सृष्टी, प्राणी, वृक्षवेली, निसर्ग, तलाव, जल, वायू, आकाश समजून घेत / अनेक भाषा तपश्चर्या करत शिकून 'अरुण्यविश्व' साहित्यातून अमर करून टाकले आहे. जंगलांनी जोडून असलेला जनसमुदाय, ज्ञानी कलावंत लोक, सर्व प्राणिविश्व, त्यांची संकेतभाषा, हालचाली, हवामानातील बदल, धोके-शिकारी संकेत आणि हिंस्र प्राणिविश्वाच्या सर्व हालचाली साठ-सत्तर वर्षे जंगलमग्न होत चितमपल्ली यांनी ग्रंथबद्ध केल्या. त्यावरची विपुल ग्रंथसंपदा त्यांनी सिद्ध केली. एक वनोपनिषद असलेला 'चकवाचांदण' हा त्यांचा जवळजवळ सातशे पानांचा ग्रंथ वनभाषा, वृक्षभाषा, पशुपक्षीभाषा, विविध समाजांच्या विविध भाषा म्हणून अत्यंत समृद्ध ग्रंथ आहे. (या ग्रंथाला अकादमी आणि ग्रंथलेखकाला पद्मश्रीसारखा भारत सरकारचा सन्मान कधीच आणि नक्की मिळायला पाहिजे होता. परंतु, त्यापासून हा उत्तुंग लेखक अजूनही दूर आहे. कारण कळत नाही. असो.) अनुभवांची/लेखनाची/आशयनिष्ठ सुलभ-प्रसन्न भाषा हे चितमपल्ली यांच्या लेखनाचे ठळक वैशिष्ट्य आहे. तथापि, यावर पाहिजे तसे संशोधन मात्र होताना दिसत नाही, हे समजून घ्यायला हवे. तसेच, जागतिक लौकिकप्राप्त शि.द. फडणीस 'रेषाटन'मधून सांगितलेला आठवणींचा प्रवास रोचक, श्रेष्ठ, खूपच आनंदून टाकणारा, खळखळून हसवणारा असा हा प्रवास आहे. इथे चित्रांची भाषा लेखनांत मिसळून गेली तर लेखनाची भाषा चित्रांतून दिसते. कळते. हसवते. अनुभवांची ही शिदोरी गुणवत्ता म्हणून तर अव्वल आहेच, त्याशिवाय अत्यंत श्रेष्ठ रेखाचित्रे आपले जीवन समृद्ध करतात. 'रेषांची ही भाषा' सहज कळते/हसवते/अंतर्मुख करते! आर.के. लक्ष्मण यांची 'लक्ष्मणरेषा' (अनु. अशोक जैन) लेखन व दृक्‌भाषाप्रत्यय म्हणून ही कलाकृतीसुद्धा ज्ञानात्मक सौख्य प्रदान करते. व्यक्ती, लेख, भाषा, शैली, ध्येयनिष्ठा ह्या सर्वच पातळीवर 'मनातली माणसं' (नरेंद्र चपळगावकर) आणि एक गाव-काही माणसं यासंबंधानं अत्यंत रसाळ तसेच ज्ञानवंत पुस्तक म्हणून

'लोभस' (सुधीर रसाळ) ह्या दोन ग्रंथांचा उल्लेख महत्त्वाचाही आणि श्रेष्ठही. 'व्यक्तिचित्रणभाषेचा मानदंड' म्हणून त्या दोन्ही ग्रंथांची नोंद करणे मला खूप महत्त्वाचेच वाटते.

मूलत: एकोणीसशे ऐंशीनंतर ग्रामीण साहित्याची चळवळ गतिमान झाली. त्यासाठी यादव-बोराडे-भोसले-मुलाटे-कोत्तापल्ले ह्या बिनीच्या थोर लेखकांनी नव्या लेखनाच्या दिशा स्पष्ट केल्या. स्वत:च्या निर्मितीसमवेतच नव्या साहित्यशक्तींचा त्यांनी वेध व शोध घेतला. अनेकांना लिहिते केले. त्यानंतर, शेषराव मोहिते, भालेराव, श्रीकांत देशमुख, प्रभाकर हरकळ, उमेश मोहिते, सरदार जाधव, आसाराम लोमटे, तांगडे ही एक दमदार फळी उभी राहिली आणि स्वत:चे स्वतंत्र स्थान त्यांनी निर्मिले. दुसऱ्या बाजूला चारुता सागर, सखा कलाल, राजन गवस, महादेव मोरे ते किरण गुरव, खोत, द.तु. पाटील, प्रवीण बांदेकर, अशोक कोळी ते अगदी संतोष पवार यासारखी अत्यंत ताकदीची लेखक-कवींची फळी उभी राहिली. यांनी भाषेत क्रांती केली. बोलींचे वैभव वाढवले. अनुभवांचा/शैलींचा नवा पीळ उभा केला. या लेखकांच्या साहित्यकृतींचा अनेक आवृत्त्या निघाल्या. मराठी भाषा/मराठी साहित्य वैभवशिखरी न्यायला या आणि त्यांच्या पिढीतील अनेक लेखककवींचा सिंहाचा वाटा आता सर्वमान्यपण झाला आहे. आज तर नवे असंख्य प्रतिभावंत भाषिक-वाङ्मयीन अत्यंत ताकदवान अशी अभिव्यक्ती करताना आढळतात.

आपण थोडे मागे गेलो तर हे लक्षात येते, की 'मेड इन इंडिया' (बोरकर) कादंबरीच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. अफलातून अस्सल वऱ्हाडी बोलीभाषेतील ही कादंबरी बोलभाषा-ग्रंथभाषा-इंग्रजी-हिन्दी अशा भाषासंकरातून घडत/उकलत जाते. वऱ्हाडी भाषा कशी झुकवली/वाकवली जाते याचे मराठीतील मोठे उदाहरण म्हणून 'मेड इन इंडिया' कादंबरीचा उल्लेख करता येतो. किशोर सानप यांनी या कादंबरीचे वर्णन 'ग्रामीण तरुणाच्या स्वत:च्या भाषेतील कादंबरी असे करून कादंबरीतील वऱ्हाडी बोली, मराठी, ज्ञानोबा-तुकोबा, महानुभाव साहित्य शैलीचे संदर्भ, इंग्रजी भाषा अपभ्रंश, वाक्प्रयोग, सुभाषिते, उखाणे, गझल, बातम्या, गाणी, कविता, लोकगीते - अशा विविध गुणांनी तयार झालेली 'सहजप्रवृत्ती भाषा' हे कादंबरीचे यशोशिखर आहे.' अशा शब्दांत करून बोरकरांच्या कादंबरीची भाषिक सौंदर्यशीलता अधोरेखित केली आहे.

१) आईमाईच्या काहाले करा लागत होता वं?

२) माह्या भावाचं लेकरू खाल्ले ते राजा

३) इंडियात मले फक्त येकच गोष्ट भयानक खरतनाक वाटते.

४) शेती म्हणजे चोवीस तास पॅड बांधून रेडीच पाहिजे माणूस.

५) पुढे बसलो त धुरजळ, मांगे बसलो त उलाय.

६) माझं श्राद्ध कराचं नाही हे म्या हजार जनाईले सांगेल.

७) काला करून जेवाची माही आजन्म सवय.

८) बाप्पू म्हनत, खरा भारत हा खेळ्यात पसरलेला आहे.

९) सतरा नवरे एकाले ना आवरे

१०) हत्ती चाले तोलानं कुत्रे भुक्ती जोऱ्यानं.

या प्रकारची पानोपानी कादंबरीभर उपयोजिलेली बोलभाषा बोरकरांच्या कादंबरीला उत्तम उठाव मिळवून देत राहते. 'उचल्या' आत्मकथेतही लक्ष्मण गायकवाड यांनी आणलेली भाषा खूप वैशिष्ट्यपूर्ण/वेगळी आहे. या प्रकारची मराठीतील आत्मकथने विपुल आढळतात. भटका, गरीब, फिरस्ता, कष्टकरी समाज, विविध प्रदेश, परंपरा, रीती, रिवाज, रूढी, नियम यांना धरून येणारी भाषा खूप महत्त्वाची ठरते. अशोक पवारांच्या साहित्यकृतींचा या दृष्टीने विशेष अभ्यास करता येईल. 'संस्कृती, समाज, भूमी, भाषा' हे सूत्र घेऊन हा अभ्यास अजून खूप पुढे घेऊन जाता यायला हवा. भूवैशिष्टचे, अनुभवांचे वेगळेपण, जीवनदाहकता आणि बोलीभाषेची स्वतंत्र ताकद - अशा कितीतरी परींनी मराठी दलित आत्मकथनांची दीर्घ व महत्त्वाची मांडणी अजून नव्याने करता येणारी आहे. म्हणून हे सत्य समजून घ्यायला हवे, की प्रतिभावंत नेहमीच समीक्षेचा पराभव करत असतो.'' असे किंबहुने यांनी सांगून ठेवलेले आहे. (संदर्भ - किंबहुना ग्रंथ) या विधानातली शक्ती जर समजून घेतली तर हे पटते. कारण, भाषेच्याही स्तरावर आणि अनुभवांच्या सशक्तपणावर लक्ष केंद्रित केले म्हणजे जवळजवळ सर्व साहित्यप्रकारांत अत्यंत क्षमतेने लेखन करणारा मोठा वर्ग दलित, ग्रामीण, आदिवासी, मुस्लीम, ख्रिस्ती किंवा लिटल मॅगेझिन्सच्या चळवळीने मराठीला दिला. तमाम समाज लिहिता झाला. सगळे प्रदेशही लेखनाच्या मध्यभागी आहे. लेखिका-कवयित्री लिहू लागल्या. भाषेला/भूमिकानिष्ठ लेखनाला समोर ठेवून प्रज्ञा दया पवार, नीरजा, अरुणा ढेरे, अनुराधा पाटील, डॉ. सिसिलिया कार्व्हालो, मेघना पेठे, सानिया ते कल्पना दुधाळ यांच्या सक्षम साहित्यसाधनेचा नव्या पद्धतीने विचार करता यायला हवा. कारण हे सगळे लेखन साहित्य, भाषा, समाज, संस्कृती यांनाही नवा आयाम मिळवून देणारे आहे. हे जाणीवत: लक्षात घ्यायला हवे.

समाजकर्ता म्हणून एक, अरण्यविश्वानुभव म्हणून दोन

आणि अभियांत्रिकी क्षेत्रातली तसेच एकूण समाजभाषा म्हणून तीन, अशा बाजूंनी जाणारं आणि 'श्रेष्ठ' अशा गुणवान क्षेत्रात मोडणारे साहित्य अनिल अवचट, सय्यदभाई, हिम्मतराव बावस्कर, मारुती चितमपल्ली, नंदा खरे ह्या दिग्गज व्यक्तिमत्त्वांनी लिहिले. 'बॅरिस्टरचं कार्ट'मधून बावस्करांनी मांडलेले अनुभव आणि जालना-बुलडाणा सीमेवरची मराठवाडी बोलभाषा, सेवाभावतले नितळ-स्वच्छ वर्णन ही नेमकी वैशिष्ट्ये बॅरिस्टरचं कार्टंमध्ये आढळतात. जगण्यातील खडतर अनुभव/या अनुभवांमधून साप-विंचूदंशावरील जागतिक कीर्तीचे प्राप्त केलेले यश, ग्रामीण बोलीभाषा - ह्या सगळ्या गुणांनी शेतीसंस्कृतीमधील तरुण पिढीला प्रेरणा देणारे हे लेखन होय. रिपोर्ताज-पातळीवर देशोदेशी भ्रमंती करून संवेदनशीलता/मानवी कळवळ्याने लिहिलेले अवचटांचे लेखन वास्तवदर्शी, दाहक, प्रेरक, बहुभाषाप्रवण आणि प्रश्नोत्पन्न लेखन आहे. 'दगडावरची पेरणी'मधून सय्यदभाई ऊर्फ पद्मश्री सय्यद मेहबुब शाह काद्री यांचे हे लेखन कार्यकथन म्हणून भाषाविविधता म्हणून श्रेष्ठच.

लेखनभाषेच्या दृष्टीने एक वेगळी बाजूपण अशी नमूद करायला हवी आणि ती म्हणजे 'शहाणे करून सोडावे सकलजन' ह्या वचनाशी सामाजिक बांधिलकी म्हणून नाते स्थापित करणारे मौलिक लेखन मराठीतून झाले. होत आहे. समाज निरामय रहावा, समाज प्रगतीची पावले टाकत पुढे जावा आणि ज्ञानविज्ञानाची कास धरून 'सबका मंगल हो' ह्या धारणेने साहित्याचे सामाजिक दायित्व स्पष्ट होत जावे; या अनुरोधाने आकलन सहजरित्या होणाऱ्या समाजाच्या भाषेत/जनभाषेत साहित्यलेखन केले जाते. अशा लेखनात सामाजिक कळवळ तर राहतेच, त्यासोबतच समाज-प्रबोधनाची बीजे याप्रकारच्या लेखनात गवसतात. अशा साहित्यलेखनाची भाषा ही लोकांतली, लोकांची, लोकांसाठीची भाषा असते. उदाहरणार्थ, विज्ञान साहित्य किंवा माणसं, धागे आडवे उभे, गार्गी अजून जिवंत आहे, माझा साक्षात्कारी रोग, दगडावरची पेरणी, अग्निपंख, बॅरिस्टरचं कार्टं, यशवंतराव चव्हाणसाहेबांचे लेखन किंवा लोक माझे सांगाती यांसारखे प्रचंड प्रमाणात वाचलेले गेलेले पुस्तक, जोहड, मन में है विश्वास, भुरा, ग्रामगीता किंवा बहिणाबाईंची गाणी, लोकोत्तर, अच्युत गोडबोले यांचे ज्ञानशील समग्र वाङ्मय किंवा मराठीतील चरित्रात्मक कांदबऱ्या अशी हजारपेक्षाही जास्त ग्रंथसंपदा 'समाजाचा दिवा' होऊन समाजाच्या भाषेत समाजासोबत राहायचे महत्त्वाचे कार्य करतात. अशा ग्रंथांची एक मोठी शीर्षकसूची देता येणारी आहे. तथापि, विस्तारभय होऊ नये म्हणून ती द्यावयाचे टाळतो. विशेषत: १९८० नंतर तर अशी ग्रंथनिर्मिती महाप्रचंड मराठीत निर्माण झाली. समाजाकरता ज्ञानभूक भागवणारी ही सारी 'सर्जनशील दौलत' आमच्या साहित्यातील मोठी व श्रेष्ठ देणगी म्हणायला हवी.

मराठवाड्यातील प्रतिभावंत आणि त्यांचे 'मराठवाडी' बोलीचा रसगंध असलेले लेखन स्वाभाविकच पुष्कळ आहे. यात विशेषत्वाने अनेक उल्लेख करता येतील. तथापि, बी. रघुनाथ आणि राजा मुकुंद यांच्या मौलिक साहित्यसंपदेचा भाषा/बोली म्हणून किंवा मराठी-उर्दू-हिन्दी-फारसी भाषासमन्वय म्हणून बी. रघुनाथांच्या गद्य-पद्य वाङ्मयाची श्रीमंती प्रचंडच महनीय म्हणता येईल. राजा मुकुंदांनी काव्यलेखनातून शिवार, शेती, गाव, माती आणि मराठवाड्याची खास बोली सगळ्या सामाजिक तसेच सांस्कृतिक संदर्भांसह मांडली. सोपान हाळमकर, गजमल माळी, फ.मु. शिंदे, अनुराधा पाटील यांच्या काव्यलेखनाचा भाषाविश्व म्हणून, आशयघनता म्हणून आणि येथील भूमींचे सगळे सूक्ष्म संदर्भ म्हणून ही मराठवाडी कविता सर्व पातळींवर श्रीमंत म्हटली पाहिजे. इंद्रजित भालेरावांनी आपल्या जनप्रिय कवितांनी मराठवाडी विशेषता लेऊन महाराष्ट्र मराठी कविता स्वाभाविकच श्रीमंत केली. पुढे पुढे अनेक नव्या साहित्यिकांनी हे भाषावैभव वाढवलेले आहेच.

प्रतिष्ठेच्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेली, कुठलीही पोझ न घेता कथानक सहजसहज पुढे घेऊन जाणारी, कथानकाला आंतरिक गती असलेली, 'एखादी कलाकृती किती सहज पण खिळवून ठेवणाऱ्या शैलीत लिहिली जाऊ शकते'' अशी निसर्गरम्य खेड्यातील किशोरवयीन मुलाची + खारीची ही गोष्ट म्हणजे ल.म. कडूलिखित 'खारीच्या वाटा' ही गोष्ट! अस्सल, ग्रामीण, सहजरम्य, अप्रतिम, काव्यात्म अशा कितीतरी शब्दात खारीच्या वाटांचे वर्णन करता येईल. पूर्ण कथानक मांडणी पातळीवर 'कविते'प्रमाणे छापलेले हे गद्यलेखन की दीर्घकाव्य असा मेळ घातलेले बेहद्द सुंदर पुस्तक आहे! त्यात, रिघीरिघी (हळूहळू), सणसर (मोठा), सडई (गवतप्रकार), सावा (बाजरी), मानगा (बांबू), चेकंदळ (मजा), गव्हारी (गुराखी), खेतऱ्या (सोंगाड्या), कालवा (आवाज), घायटा (घाई) असे नवे नवे शब्दभांडार गच्च भरून असलेली कडू यांची ही कलाकृती भाषिक-सांस्कृतिक वैभव वाढवतेच! किंवा हॉटेल संस्कृतीमधील श्रम करणाऱ्या मुलांचे बरेभुले अनुभव, तेथील जीवनाला जोडून असलेली भाषा 'हॉटेल माझा देश' (धम्मपाल रत्नाकर), 'टिश्यू पेपर'

(रमेश रावळकर) यांनी मराठी साहित्यात आणली ती केवळ अप्रतिम आहे. इंग्रजी-मराठी-हिन्दी भाषामिश्रणातून जगण्यातील दाहक अनुभव धम्मपाल व रमेश ह्या तरुण श्रेष्ठ लेखकांच्या लेखनातून आले. 'मराठीसाठी हे सगळे नवीन आणि अस्वस्थ करणारे जग आहे.' 'हॉटेल माझा देश' कवितासंग्रहातील भाषा, काव्यप्रतिमा जगणे आणि तेथील अस्वस्थ करणारे नवे जग दर्शवतात. मीही एक अॅश ट्रे, सेवाभावी टॉवेल, टॉवेलसारखी जन्मणारी माणसं, पेग भरून देताना वाचणारा थेंब, हॉटेलभर पांचट चर्चा, पाण्यासारखा हॉटेलभर पसरून, मी कपासारखा एकटा, मुतारीच्या भांड्यात डांबरगोळीसारखा मी विरघळणारा, हा देश हॉटेल बनवायचाय मला, जिसका कोई नहीं होता, उसका तो हॉटेल होता है। हे नवेच प्रतिमांकन गरिबी/परिस्थितीने अनुभवायला भाग पाडलेल्या तरुणाने कवितेतून आणले. कदाचित मराठीत हे प्रथम घडत असावे. 'दु:खात/कष्टांत मिसळून आलेली ही नवी भाषा, नवे अनुभव' रमेश आणि धम्मपाल यांनी मराठीला दिले हे अपूर्व म्हटले पाहिजे.

कालखंडनिहाय, साहित्यप्रकारानुरूप, लेखकीय जीवनजाणिवा म्हणून, शैलींचे ठसे म्हणून आणि भाषिक क्षमता म्हणून भाषेत कसे विस्मयकारक बदल होतात. याविषयीचे बारा दाखले या ठिकाणी जाणीवपूर्वक नमूद करायचा मोह होतो. जसे-

१) पदरात पडणारा प्रत्येक दिवस भिवाच्या आयुष्याला शेणकिड्याप्रमाणे पोखरत होता. आणि भिवा जीर्ण वस्त्राप्रमाणे विरत चालला होता. (पृ-१) (मामाचा वाडा : चारुता सागर)

२) विलासचा बंगला म्हणजे अगदी ठोकळा आहे. विलासच्या घरातही इन्टेरियर डेकोरेशन चांगले नाहीय. जुनाट आहेत लोक. विलासची आईही जुनाट आहे. (पृ. ११४)
(उत्सुकतेने मी झोपलो : श्याम मनोहर)

३) न झालेली भेट आयुष्यभर पाठलाग करत राहते म्हणतात. त्यापेक्षा एकदा प्रत्यक्ष भेटून ती भेट संपवून टाकलेली बरी. (पृ. १८१)
(अदृष्ट : भारत सासणे)

४) शेतकऱ्यानं विठ्ठल केलाऽऽऽ
शेतकऱ्यानं राजा केला.
नगर झाले शेतामुळेऽऽऽ
कशाला खोदिता कुळे.
शेतातल्या पिका वगळूनऽऽऽ
कुळ तुमचे बुळे... (पृ. १०७)
(ब, बळीचा - राजन गवस)

५) दुसऱ्या दिसी पहाटंच खोजे मास्तर बोर्डिंगीत आले. त्यांनी आल्या आल्या आमच्या खोलीत प्रवेश केला अन् छडीनं मला झोडायला सुरुवात केली. खोजे झोडपीत व्हते अन् म्या वरडत होतो. आखीर खोजे सोता मारून मारून दमले. (पृ. १७७)
(गावकी : रुस्तुम अचलखांब)

६) कापसाची जात आतल्या गाठीची आणि बेईमान. कापसाची वात वळून तिचं सूत होतं, तेव्हा ते एकमेकांना बांधतं. एकीचं सलग वस्त्र होतं. पण सुटा सुटा कापूस पोटात आग ठेवून निखारे फुलवत राहतो. त्याच्या अहंकारावर फुंकर घातली, की साक्षात वडवानल होतो. (पृ. ७२)
फिनिक्सच्या राखेतून उठला मोर - जयंत पवार

७) दैववशात आकारपरिवर्तन घडो न घडो मलाही दारिद्र्याचं स्वतंत्र शेत आहे ज्याची वहिवाट करता करता दिवस उगवतात, दिवस मोडतात...
अगोदरचे असतील बिचारे भू-दास (पृ. ३४)
(गोलपीठा : नामदेव ढसाळ)

८) विकता, विकता त्यांनी सूर्य बाजारात आणला!
घर फुंकून निघालेले लोक पाहातच राहिले.
- अशा वेळी स्वस्थ बसून कसे चालेल?
बघता, बघता त्यांनी हातही बाजारात आणला
- हाताची घडी घालूनच कसे चालेल?
(पृ. १५२)
(सुर्वे-नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता)

९) बाजूलाच दोन्ही पाखरं होती. जणू कोंबडी पिलांचं पंखाखाली संरक्षण करत आहे. भुकेमुळे व्याकूळ झालेली लक्ष्मी आणि तिची मुलं सगळ्या दिशांनी टकमक बघत होती. (पृ. १)
- कोल्हाट्याचं पोर, किशोर शांताबाई काळे

१०) हरेकाच्या जिन्याले काई मकसद राह्यते. तवाच रातच्याले झोप लागते. नाई तं दवादारू लागते. आता सवादीड साल व्हीलचेअरवर काहाडले, टाइमच टाइम. तं मकसद धरला, का खान्दानी शिक्षक आहो, तं शिकवनं हाच मकसद. (पृ. ८५)
(उद्या : नंदा खरे)

११) महे कशाले काही म्हन्नं आशीन. आशे डाफरून जाता तुम्ही. कुत्र्यावानी वऱ्हे तंगडी करून मुत्याले पाहाता. नीट बोल्ल्याचं सांगलं मीन्हं तुल्हे. कुत्र न कात्र वसनावू नको. थोबाड फाडून टाकीन... (पृ. ६६)
(कुंधा : अशोक कौतिक कोळी)

गाय माय गोमूत्र दे
गाय माय दूध दे
जठराएवढं अन्न दे
तृष्णेएवढं पाणी दे
पायापुरती भुई दे
थोडसं सुख दे
वाट्याचं सगळं दु:ख दे
भुई भुई ठाव दे (पृ. २१५)
(भुई भुई ठाव दे : सीताराम सावंत)


भाषेच्या लेखनशैलीचे हे नानाविध तथापि निवडक नमुने जसे लक्षणीय आहेत तद्वतच त्या त्या शैलींमागे असलेले बहुसंदर्भही तेवढेच महत्त्वाचे आहेत. त्यातील विचारसौंदर्य किंवा भावसंदर्भ किंवा प्रांतनिष्ठ काही संदर्भ पुष्कळ बोलके असून त्यापलीकडे जाऊन अधिक काही सांगणारे हे संदर्भ स्वाभाविकच महत्त्वाचे ठरतात.

खोल चिंतन, लेखनामागची शोधसंशोधनदृष्टी, शैलीची विविधता, भाषेतील वेगवेगळे प्रयोग किंवा संस्कृती–साहित्याच्या सर्व परंपरा नीट पचवत, त्या समजून घेत नवा 'साहित्याविष्कार' घडवला. यात प्राधान्याने भारत सासणे, श्याम मनोहर, कवी ग्रेस आणि नंदा खरे ह्या अत्यंत महत्त्वाच्या चार थोर प्रतिभावंतांना वाचायला हवे. समजून घ्यायला हवे. सगळ्या विद्याशाखा ओलांडून पुढे जाणारे त्यांचे लेखन समाज–भाषा–संस्कृती–साहित्य यांच्यातील कुठलाच पदर सुटू न देणारे लेखन म्हणून सासणे–मनोहर–ग्रेस–खरे यांच्या साहित्यसाधनेचा विचार अतिशय महत्त्वाचा ठरतो. त्यातही नंदा खरे यांनी 'उद्या' कादंबरीमधील विविध बोलींचा तसेच मिश्रभाषांचा केलेला प्रयोग तर अचंबित करणारा म्हटला पाहिजे. भाषा वापरताना त्यामागील असणारी सूक्ष्म दृष्टी आणि भाषेमागचे चिंतन नंदा खरे आणि श्याम मनोहर यांच्या लेखनात लक्षणीय स्वरूपात आहे.

व्याकरणबद्ध भाषा नियम आणि सूत्रे घेऊन उभी राहते हे खरे असले तरी कविता ते मोडून पुढे जाते. आधुनिक तथा महानगरी लेखनाबाबतही असे म्हणता येते. श्याम मनोहर, नंदा खरे, पुरुषोत्तम बोरकर यांसारख्या लेखकांची भाषा, त्या भाषेची घडण अगदी स्वायत्त, वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रचंड प्रभावी आहे अमान्य करता येत नाही. आपले 'जगणे' घेऊन आलेली भाषा किंवा अत्यंत भयंकर जीवनाच्या अनुभवांतून आलेली भाषा किंवा लोकलयीमधून घडत गेलेली अस्सल भाषा हा असा भाषेचा बहुपदरीपणा व्यवस्थित समजून घेता येणार असतो. 'बलुतं', 'उचल्या' आत्मकथनांची भाषा, 'रानातल्या कविता'ची भाषा, 'जेव्हा मी जात चोरली होती'ची भाषा किंवा ढसाळ, कोलटकर, मेश्राम यांच्या काव्याची अत्यंत वेगळी असलेली भाषा, तेंडुलकरांच्या नाटकांतील भाषा किंवा अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांची पात्रभाषा किंवा असे कालखंड विचारात घेऊन शंभरापेक्षा अधिक विविध प्रतिभावंतांच्या भाषेचे निराळेपण समजून घेता येणार आहे. जे मराठीला मिळालेले हे वरदान म्हणून नोंदवता येणार आहे.

या लेखाचा समारोप करताना काही नवे पण ताजे दाखले देत भाषाविशेषाचे धावते रूप असे नमूद करता येईल– बालाजी सुतारांनी स्वत:ची भाषा घडवलेली दिसते. बब्रुवान रुंद्रकंठावार ह्यांनी सटायर लेखनाची नवी वाट मळवलेली वाचायला मिळते. भाषेतून घटनाप्रसंग कसे लख्ख उभे राहतात हे नंदा खरे यांना वाचताना उमगते. प्रांतभाषेचा मनमोहक ठसा बाबाराव मुसळे यांच्या भाषेत मुक्काम करून असतो. पुरुषोत्तम बोरकरांची भाषा मनावर गारुडच करते. द.तु. पाटलांच्या कथा किंवा महादेव मोरे यांच्या कथा अस्सल बोलीभाषेचा अनुभव प्रत्येक वेळी देत राहतात. मंगेश नारायण काळेंच्या कवितेतील प्रतिमाविश्व समजून घेताना भाषेचे नवे रूप समजून येते. आसाराम लोमटे यांच्या कथेतील मराठवाडी डौल लक्षणीय असाच ठरतो. प्रवीण बांदेकर, राजू बावीस्कर, सरदार जाधव, कल्पना दुधाळ, बालाजी इंगळे, प्रसाद कुमठेकर, एकनाथ पाटील, अशोक कोतवाल, केशव खटींग, महेश मोरे, शंकर विभुते, प्रभाकर हरकळ, प्रतिमा इंगोले, सदानंद पुंडगे, उमेश मोहिते, वीरा राठोड, विनायक पवार, रमेश चिल्ले, बबन शिंदे, बबन मिंडे ही अशी दमदार साहित्यिकांची फळी आणि असे मराठीत आज लिहिणारे शंभरपेक्षाही अधिक महत्त्वाचे साहित्यिक आशय आणि भाषा यांची एकगाठ बांधून वाङ्मयीन नवनिर्माण करतात, ते केवळ अप्रतिम ठरणारे होय.

**– प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख**
भ्रमणध्वनी – ९४२२७२१६३१



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

## संतांची मूल्यदृष्टी

•

# स्वातंत्र्योत्तर काळ आणि मराठी संतांची मूल्यदृष्टी

**डॉ. रवींद्र बेम्बरे**

**विसाव्या शतकातील मराठी संतपरंपरेचा मागोवा घेत असताना संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी–महाराज ही दोन नावे ठळकपणे समोर येतात. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या कृती–उक्तीतून समाजाला दिशा देण्याचे कार्य या दोन संतांनी केले. गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, महात्मा बसवेश्वर, चक्रधरस्वामी, गुरुनानक, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत कबीर, संत तुळशीदास, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास अशा श्रेष्ठ संतांचे विचारधन पचवून वर्तमानकाळाच्या पार्श्वभूमीवर मूल्यविचारांची मांडणी संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनी केली. आपल्या रचनात्मक कार्यातून मूल्यांचा कृतीरूप आविष्कार या संतांनी केला. यांनी परमार्थाला एक नवा आयाम प्राप्त करून दिला.**

**भारतीय** समाजाला एक सम्यक दिशा आणि दृष्टी देण्याचे मौलिक कार्य येथील संतपरंपरेने अविरतपणे केले. सबंध भारताला एका विचारसूत्रात बांधण्याचा पहिला प्रयत्न नाथ संप्रदायाने केला. या संप्रदायातील संतांनी सर्व भेदभावाच्या पलीकडे जाऊन माणूस जोडण्याचा संदेश दिला. महाराष्ट्राच्या भूमीत उदयास आलेल्या महानुभाव, वारकरी, लिंगायत, नागेश, दत्त, समर्थ, चैतन्य, आनंद आणि सुफी संप्रदायाच्या संतांनी सकल सजीवसृष्टीच्या कल्याणार्थ शाश्वत सत्याचा व्रतस्थपणे शोध घेत त्यातून हाती आलेली शाश्वत मूल्ये जनमनात रुजवली. संतांची मूल्यदृष्टी चिरंतन स्वरूपाची असल्यामुळे काळाच्या ओघात वेळोवेळी उद्भवलेल्या प्रश्नावर मात करण्यासाठी आपले संतसाहित्य नेहमीच उपयुक्त आणि बळ देणारे ठरले. अनिष्ट रूढीप्रमाणेच अन्याय, अत्याचार आणि अनीतीच्या विरोधात लढत असताना संतांची विचारसंपदा सदैव ऊर्जास्रोत ठरल्याचे पाहायला मिळते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारत देशाला मुक्त करण्यासाठी आपल्या सर्वस्वाची आहुती दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या मनातील त्याग आणि समर्पणाची मुळे येथील संतांच्या शिकवणीत सापडतात.

सर्व स्तरांतील भारतीय जनतेने संघटितपणे दिलेल्या लढ्यातून भारत देश १९४७ साली स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारतासमोर अनंत समस्यांचे डोंगर उभे होते. देशात प्रचंड दारिद्र्य होते. लोकसंख्येच्या प्रमाणात अन्नधान्याचा तुटवडा होता. शिक्षणाच्या अभावामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर अज्ञान आणि अंधश्रद्धा होती. ग्रामीण भागात आरोग्याच्या गंभीर समस्या होत्या. विकसित राष्ट्रांच्या तुलनेत वैज्ञानिकदृष्ट्या आपला मागासलेपणा होता. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांपासून समाजातला एक मोठा घटक वंचित होता. इंग्रजांनी आणलेल्या यांत्रिकीकरणामुळे ग्रामीण भागातील  कारागिरांचे व्यवसाय बुडाल्याने बेकारी मोठ्या प्रमाणात वाढली होती. अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरामध्ये भारतीय समाज गुरफटलेला होता. अस्पृश्यांची अवस्था प्रचंड दयनीय होती. स्वातंत्र्य मिळाले तरी त्या स्वातंत्र्याबद्दल समाजात फारशी जागृती नव्हती. स्वतंत्र भारताने स्वीकारलेली लोकशाही आणि संविधानातील मूल्यांबाबत जनतेत मोठ्या प्रमाणावर अज्ञान होते. भारत देशाला विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रथम या सर्व समस्यांवर मात करणे नितांत गरजेचे होते. हे सर्वच काम सरकारकडून होणे अशक्य होते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील संतांची मूल्यदृष्टी आणि त्यांनी केलेले रचनात्मक कार्य अत्यंत मौलिक स्वरूपाचे ठरले.

विसाव्या शतकातील मराठी संतपरंपरेचा मागोवा घेत असताना संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी-महाराज ही दोन नावे ठळकपणे समोर येतात. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या कृती-उक्तीतून समाजाला दिशा देण्याचे कार्य या दोन संतांनी केले. गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, महात्मा बसवेश्वर, चक्रधरस्वामी, गुरुनानक, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत कबीर, संत तुळशीदास, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास अशा श्रेष्ठ संतांचे विचारधन पचवून वर्तमानकाळाच्या पार्श्वभूमीवर मूल्यविचारांची मांडणी संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनी केली. आपल्या रचनात्मक कार्यातून मूल्यांचा कृतीरूप आविष्कार या संतांनी केला. यांनी परमार्थाला एक नवा आयाम प्राप्त करून दिला. मिळालेले स्वराज्य हे सुराज्यात रूपांतरित व्हावे, या भूमिकेतून राष्ट्राच्या उन्नतीसाठी पूरक अशा कालसुसंगत मूल्यांची मांडणी या संतांनी केली.

संत तुकडोजीमहाराजांप्रमाणे संत गाडगेबाबांनी साहित्यलेखन केले नसले तरी त्यांचे कीर्तन आणि कृती एका अर्थाने जिवंत साहित्यच होते. संत गाडगेबाबांच्या कीर्तन आणि कृतीतून प्रकटलेल्या मूल्यविचारावर मराठीत मोठ्या प्रमाणावर साहित्य निर्माण झाले. भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी, आजाऱ्याला औषध, खचलेल्यांना हिंमत, श्रमातून स्वावलंबनास प्रोत्साहन, वेटबिगारीस विरोध, पात्र पाहून दान, निरक्षरास शिक्षण, अनाथ आणि गरिबांना मदत, हुंडाबंदी, सावकारशाहीला मूठमाती, अज्ञानाचे निरसन, अनिष्ट रूढी-प्रथापरंपरांचे उच्चाटन, समतेचा पुरस्कार, विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी, गाईगुरांचे पालन, मुक्या प्राण्यावर प्रेम या मूल्यांचा उद्घोष करून त्यातच धर्माचा अर्थ शोधण्याची दृष्टी संत गाडगेबाबांनी समाजाला दिली. धर्म म्हणजे कर्मकांड नसून मूल्याधिष्ठित जीवनाची वाटचाल असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्या काळात अन्न, पाणी आणि औषधांचा प्रचंड तुटवडा होता, अशा काळात भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी आणि आजाऱ्याला औषध देणे म्हणजे धर्म असल्याचे संत गाडगेबाबांनी सांगितले. पडेल ते काम करून मिळवलेले अन्न ते समाजातील अपंग, दीनदुबळ्यांना वाटत असत. गाडगेबाबांकडे स्वतःचे कोणते जनावर नसतानाही कामाच्या मोबदल्यात शेतकऱ्याकडून वैरण घेऊन रस्त्यावरील थकलेल्या बेवारस जनावरांना खाऊ घालत. उन्हातानात गावोगाव भटकत असताना रस्त्यात कुणी तहानलेला माणूस भेटला, तर जवळपासच्या घरातून पाणी मागून देत. प्रसंगी विहीर व नदीवरून स्वतः पाणी आणून तहानलेल्या वाटसरूंना पाजत. रस्त्यावर कधी एखादे तहानलेले जनावर दिसले तर  स्वतः विहिरीतून पाणी काढून त्याला पाजत असत. संत गाडगेबाबांनी परोपकारलाच परमार्थ मानला. माणसाने माणसाच्या जन्माला येऊन परोपकार करावा. परोपकारासारखे पुण्य नाही मायबाप, आणि पुण्यासारखा धर्म नाही. दुसऱ्याच्या सुखात सुख आणि दुःखात दुःख पाहण्यात खरे सुख आहे. दुसऱ्यासाठी जगलात तर जगला आणि स्वतःसाठी जगलात तर मेलात. दारिद्री नारायणाची सेवा हीच खरी ईश्वर सेवा. असा परमार्थाचा मानवताकेंद्रित अर्थ गाडगेबाबांनी सांगितला.

आपल्या देशातील दारिद्र्यावर मात करायची असेल तर श्रमाला पर्याय नाही, ही गाडगेबाबांची रास्त भूमिका होती. त्यासाठी त्यांनी श्रमातून स्वावलंबनाचा मंत्र दिला. दास डेबूजीचा म्हणे कष्ट करून पोट भरी। कुत्र्या परीस हे जिणे नको हिंडूस घरोघरी।। अशा वचनातून देवधर्माच्या नावाखाली चालणाऱ्या ऐतखऊपणाची त्यांनी कठोर शब्दांत

निर्भर्त्सना केली. माणसाने सदैव काम करीत राहावं. कामाशिवाय राहू नये. काम केल्याशिवाय खाऊ नये. शरीराला कामाची सवय लावावी. मनाला कामाची सवय लावावी. कामाने शरीर सशक्त बनते. कामाने मन निर्भय बनते. आपल्या कामाचा अहंकार मात्र बाळगू नये. ही गाडगेबाबांची शिकवण होती. श्रम आणि स्वावलंबना-प्रमाणेच संसारात उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ असला पाहिजे, कर्ज काढून सण साजरे करू नयेत, असे त्यांनी वेळोवेळी बजावले. संसार देशोधडीत लावणाऱ्या अनेकविध व्यसनांपासून समाजाला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. निर्व्यसनाने मनुष्य लक्षाधीश होतो; तर व्यसनाने तो भिक्षाधीश होतो, त्याची पशुत्वाकडे वाटचाल होते. व्यसनांनी एकाची अब्रू जात नाही; तर घराण्याची जात असल्याचे सांगितले.

सर्व प्रकारच्या रोगराईचे मूळ अस्वच्छता असल्याचे ओळखून संत गाडगेबाबांनी आपल्या हातात झाडू घेऊन गावागावातील घाण स्वच्छ करत समाजाला स्वच्छतेचा मंत्र दिला. भौतिक स्वच्छतेप्रमाणेच मानसिक स्वच्छतेलाही त्यांनी विलक्षण महत्त्व दिले. आपल्या कीर्तनातून लोकांच्या मनातील धर्मभोळेपणा आणि अंधश्रद्धेची जळमटे काढून टाकण्याचा निरंतर प्रयत्न केला. देवाच्या नावाखाली होणारी पशुहत्या थांबवण्यासाठी संत गाडगेबाबांनी अखंडित भ्रमंती केली. देवासाठी मागे जो भीक कोंबडी बकरी। देव त्याचा भिकार भक्त त्यांचे भिकारी।। असे ते म्हणतात. नवस करून देवाच्या नावावर कोंबडी-बकरी कापणे यासारखा अधर्म नसल्याचे ते सांगत. देव आपल्या अंतरंगात असून तो कुठल्याही मूर्तीत नाही. मूर्ती विकत मिळते पण देव विकत मिळत नसल्याचे ते सांगतात. जत्रा मे पत्थर। बिठाया तीरथ बनाया पाणी। दुनिया भई दिवानी पैसे की धूलधानी।। अशी मूर्तिपूजेची निरर्थकता ते स्पष्ट करतात. गावात प्रत्येक देवाचे वेगळे देऊळ बांधून पैसा वाया घालण्यापेक्षा सर्व देवांचे एकच देऊळ बांधावे. ही पृथ्वीच सर्व देवांचे देऊळ असल्याचे त्यांनी प्रतिपादित केले. देवाशी निगडित जनमनातील अनेक अंधश्रद्धा घालवल्या. बाप्पा हो, आजपर्यंत देव कोणाच्या अंगात आला नाही, येत नाही आणि येणार पण नाही. देव अंगात येणारे, अंगाराधुपारा देणारे, गंडे, दोरे ताईत देणारे यांच्या सावलीतसुद्धा उभे राहू नका. अंगाराधुपारा देणारे भगत कोणतेही आजार बरे करू शकत नसून तज्ज्ञ डॉक्टरच आजार बरा करू शकतो. आजाराचा आणि देवाचा काहीही संबंध नाही. आजार टाळण्यासाठी स्वच्छता पाळली पाहिजे, स्वतःच्या आरोग्याला जपले पाहिजे असे गाडगेबाबांनी सांगितले.

स्वतंत्र भारताने स्वीकारलेली लोकशाही शासनव्यवस्था खऱ्या अर्थाने यशस्वी होण्यासाठी भारतीय समाज साक्षर होणे नितांत गरजेचे होते. समाजातील अज्ञान आणि मागासलेपणाचे कारण निरक्षरता असल्याचे ओळखून संत गाडगेबाबांनी शिक्षणाचा आग्रह धरला. ‘ज्याले विद्या नसेल त्याले खटाऱ्याचं बैल म्हटलं तरी चालेल! आता तरी सुधरा. आता तरी मुलाले शिक्षण द्या. पैसे नही म्हणाल तर जेवणाचं ताट मोडा. हातावर भाकरी खा. बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या. इव्हायाला पाहुणचार करू नका. पण मुलाले शाळेत घातल्याविना सोडू नका. विद्या मोठा धन आहे.’ असा केवळ शाब्दिक उपदेश करून न थांबता समाजातील सर्व स्तरापर्यंत शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व सांगत असताना संत गाडगेबाबांनी वेळोवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उदाहरण दिले. अज्ञान गेल्याशिवाय माणसाचे माणूसपण जागृत होणार नाही, ही त्यांची भूमिका होती. शिक्षण घेऊन ज्ञानी झालेल्या समाजाने विवेकनिष्ठा अंगीकारून विज्ञानाची कास धरली पाहिजे. ‘अर्थ घ्यावा विज्ञानाचा । उघडा डोळा ज्ञानाचा । दास मने डेबुजीचा। खेळ सारा अज्ञानाचा।।’ असे ते म्हणतात. विज्ञानाशिवाय उन्नती नसली तरी विज्ञानाला नीतीचे अधिष्ठान असले पाहिजे यावर संत गाडगेबाबांचा कटाक्ष होता.

आपल्या सभोवतीचे पशुपक्षी, मुंग्या विलक्षण एकजुटीने राहतात. आपण तर माणूस आहोत, एकजुटीने राहिलेच पाहिजे, असा ऐक्याचा संदेश गाडगेबाबानी दिला. सर्व प्रकारची विषमता नाकारून सामाजिक समतेचा पुरस्कार केला. कोणी जात विचारली तर माणूस हीच जात सांगा. जातीयता कलंक आहे, असे ते वारंवार सांगत. समाजातील स्त्रीचे महत्त्व विशद करताना एक स्त्री हजार शिक्षकांपेक्षा मोठी आहे म्हणून तिचा सन्मान राखलाच पाहिजे, साऱ्या प्रपंचाची चावी तिच्या हातात आहे, असे ते आवर्जून सांगत. मुलांना योग्य वळण देण्यासाठी स्त्री ही सदैव जागरूक असावी. समाजातील हुंडा प्रथेतून येणारी सौदेबाजी टाळण्यासाठी हुंडा मागणाऱ्यावर सामूहिक बहिष्कार घालावा, अशी भूमिका संत गाडगेबाबांनी मांडली.

स्वतंत्र भारतातील समाजाला सर्वांगीण उन्नतीची दिशा देण्याच्या भूमिकेतून राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनी विपुल

स्वरूपाचे गद्यपद्य साहित्यलेखन केले. मोठ्या प्रमाणावर मराठी आणि हिंदीतून गीतलेखन केले. 'खंजिरी' या वाद्याच्या साहाय्याने भजनाच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रूढीप्रथा, धार्मिक संघर्ष, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, हरिजन मंदिर प्रवेशबंदी इत्यादी प्रतिगामी समाजविघातक रूढींवर कठोर प्रहार करून त्यांनी ईश्वराचे विशुद्ध स्वरूप लोकांसमोर मांडले. गावे स्वयंपूर्ण बनून तेथील लोक उद्योगशील व निर्व्यसनी कसे होतील याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. महिलोन्नती, अंधश्रद्धानिर्मूलन, स्वच्छतेचा प्रसार यांवर त्यांचा विशेष भर होता. ग्रामोद्योग वाढीस लागावे व सामाजिक विषमता कमी व्हावी, यासाठीही त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ, गुरुकुंज आश्रम, जि. अमरावती या नोंदणीकृत संस्थेच्या शाखा श्रीगुरुदेव सेवामंडळ या नावाने गावोगावी स्थापन करून आदर्श समाजरचनेस साहाय्यभूत असे संघटन केले.

खरा भारत हा ग्रामीण भागात वसलेला असल्यामुळे ग्रामीण भागाच्या उन्नतीचा व्यापक विचार राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनी ग्रामगीतेतून केला आहे. कुरुक्षेत्रावरील अर्जुनाप्रमाणेच अगतिक झालेल्या स्वातंत्र्योत्तर ग्रामीण जनतेला योग्य दिशा देऊन गतिमान करण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनी 'ग्रामगीता' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये प्रपंच आणि परमार्थ यात संतुलन साधण्याची दिशा दाखवली. 'सुखे करावा संसार। साधेल तैसा परोपकार। चारही आश्रमांचा सार। आचरणी आणावा।।३६।।' (अध्याय ०४) आपला संसार करत करत जमेल तेवढा परोपकार करणे म्हणजेच परमार्थ अशी परमार्थाची सामाजिक बांधिलकी सांगणारी व्याख्या राष्ट्रसंतांनी केली. खऱ्या अर्थाने गावाचा विकास साधण्यासाठी पुढारी हे परोपकारी आणि चारित्र्यसंपन्न असावेत. त्यांच्या उक्तीला कृतीची अधिष्ठान असावे. लोकांना एकत्र आणण्याचे कौशल्य त्यांच्याकडे असायला हवे. गावाच्या कल्याणासाठी सर्वांनी एकत्र येऊन एकदिलाने कामाला लागले पाहिजे. प्रत्येक जण सेवाभाव जपून गावासाठी काम केल्यास जे ठरवलं ती गोष्ट साध्य होत असते, असा तुकडोजी महाराजांचा विश्वास होता. 'आपण झिजोनि अंगी स्वतः। जीवजंतूसि द्यावी प्रसन्नता। सुखे करावी गावाची जनता। हीच सेवा पुण्यकर।।३७।।' (अध्याय ०९) आपण स्वतः झिजून गावाला सुखी बनवण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच पुण्य आहे, असे तुकडोजीमहाराज सांगतात. आपल्या सेवेवर निष्ठा असावी, कुणाला तरी वरवर दाखवण्यासाठी ती नसावी. सेवेमध्ये दिखाऊपणा आणि कृत्रिमता नसावी. ती अंत:करणातून असावी. मनात स्वार्थ ठेवून सेवा करू नये. किंवा काहीतरी प्रतिष्ठा मिळवण्यासाठी ती सेवा नसावी, असा तुकडोजीमहाराजांचा कटाक्ष होता.

गावाचा विकास साधायचा असेल तर संघटन हे खूप महत्त्वाचे आहे. 'ग्राम सुधारणेचा मूलमंत्र । सज्जनांनी व्हावे एकत्र। संघटना हेचि शक्तीचे सूत्र। ग्रामराज्य निर्माण करी।।१७।।' (अध्याय ११) गावचे संघटन मजबूत व्हावे. एकत्र येऊन एकमेकांची सुखदुःखे एकमेकांना सांगावीत. कोणावरही विनाकारण अन्याय होऊ नये, याची खबरदारी घ्यावी. एखाद्या असहाय्य गरिबावर अन्याय होत असेल तर संघटितपणे त्याचा प्रतिकार केला पाहिजे. मंदिरात डोळे मिटून जप करण्यापेक्षा रस्त्यावरचे काटे उचलल्यास अधिक पुण्य मिळते. शाब्दिक ज्ञानापेक्षा कृती महत्त्वाची आहे. केवळ व्याख्यानाने फारसे काही साध्य होत नाही, त्याला कृतीचा आधार आवश्यक असतो. 'एक हात खोदावी जमीन। हे पूजनाहुनि पूजन। परिणाम शेकडो व्याख्यानांहून। अधिक तयाचा।।१९।। (अध्याय१८) असे तुकडोजी-महाराज सांगतात. स्वतःसाठी पशुपक्षीही जगत असतात पण दुसऱ्यासाठी जगण्यात आणि परोपकारातच मनुष्यत्व दडलेले आहे. तेचि माणुसकीचे कर्म। जे दुसऱ्यांसाठी केले श्रम। एरव्ही पशुपक्षीही करिती उद्यम। आपुलाले।।१३।। (अध्याय १८) परोपकार हेच पुण्य आहे आणि परपीडा म्हणजे पाप हा संत तुकाराम महाराजांचा दृष्टिकोन राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेतून प्रतिध्वनित झाला आहे.

गावातील प्रत्येकांनी आपापल्या बुद्धिकौशल्याने, शक्तिसामर्थ्याने श्रम करून गाव स्वावलंबी बनवण्यासाठी प्रयत्न करावा. प्रत्येक कामगाराची उपयुक्तता लक्षात घेऊन त्याचा सन्मान राखला जावा. 'एक शेतीकामाचा कामगार। एक बेलदार, सुतार, लोहार। शिंपी, धोबी, कुंभार, चांभार। सारखेचि उपयुक्त।।१०३।।' (अध्याय १७) गावासाठी प्रत्येक उद्योग हा तितकाच महत्त्वाचा आहे. कुणी एक भंगी काम करत असेल, कुणी वैद्यकीय व्यवसाय करत असेल, तर कोणी मंदिरात पुजारी असेल, प्रत्येक जण गावाच्या दृष्टीने तितकाच महत्त्वाचा आहे. सगळ्यांच्या श्रमातूनच गावाला वैभव प्राप्त होत असते. काम कोणतेही असो ते उपयुक्त आणि पवित्रच असते, ही भूमिका राष्ट्रसंतांची आहे. कोणताही उद्योगव्यवसाय न करता जगणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. अशा आळशी माणसांना

खायलाप्यायला देणे पाप असल्याचे तुकडोजीमहाराज सांगतात. 'एरव्ही उद्योगाविण जे भोगणे। मानवासि ते लाजिरवाणे। आळशासि खाणेपिणे। देणे असे महापाप।।९७।।' (अध्याय १७) प्रत्येकाने आपला आळस झटकून टाकावा. परिश्रमाचा आणि प्रयत्नांचा मार्ग अनुसरावा. घरातील लहान मुलापासून मोठ्यापर्यंत प्रत्येकाने आपापली कुवत आणि युक्तीप्रमाणे कामे करावीत. प्रत्येक स्त्री-पुरुषाची आपल्या कामावर दृढनिष्ठा असावी. काम करत परमेश्वराचे नामचिंतन करावे. कामापेक्षा वेगळा परमेश्वर नाही. हाती उद्योगाचे साधन। मुखी रामनामाचे चिंतन। हाचि धर्म आहे महान। गावकरी लोकांचा।।१४।।' (अध्याय १३) आपल्या उद्योगाशी एकरूप होऊन रामनामाचे चिंतन करणे हाच खरा धर्म असल्याचे तुकडोजीमहाराजांनी सांगितले आहे. गावासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू गावातच निर्माण झाल्या पाहिजेत. पारंपरिक उद्योगधंद्यांना पूरक आणि पोषक वातावरण मिळाले पाहिजे ही तुकडोजीमहाराजांची भूमिका खेड्यांना स्वावलंबनाचा मंत्र देणारी होती.

संत गाडगेबाबांप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनीही स्वच्छतेवर भर दिला. ग्रामीण भागात वारंवार येणारे साथीचे आजार, रोगराई अस्वच्छतेमुळे येतात. 'चहुबाजूंनी केली घाण। त्यात जंतु झाले निर्माण। त्यातूनि रोगांच्या साथी भिन्न भिन्न। वाढ घेती।।०८।।' (अध्याय १४) सगळीकडे वाढलेली घाण आणि त्यात निर्माण झालेले जीवजंतू यातूनच भिन्न भिन्न साथीचे आजार फैलावतात. यास्तव गावातील युवकांचे संघटन करून ग्रामस्वच्छतेची एक व्यापक चळवळ राबवावी. 'मिळोनि करावी ग्रामसफाई। नाली, मोरी ठायीठायी। हस्ते, परहस्ते साफ सर्वहि। चहुकडे मार्ग।।५३।।' (अध्याय १२) अशाप्रकारे स्वच्छता केल्यास गावात कोणतीही रोगराई येणार नाही, उत्तम आरोग्य नांदेल आणि यातूनच गावात वैभव निर्माण होईल असा विश्वास राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज प्रकट करतात. गावात साथीचे आजार आल्यानंतर अंधश्रद्धेच्या आहारी न जाता विवेकाने त्यामागची कारणे समजून घ्यावीत आणि वेळीच वैद्यकीय उपाय करावा. आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी निसर्गाला अनुसरून आपली दिनचर्या ठेवावी. रात्री लवकर झोपावे आणि सकाळी लवकर उठावे. ताजे सात्त्विक अन्न सेवन करावे. माणसाचा आहारविहार सात्त्विक असावा, संगती सात्त्विक लोकांची असावी, व्यवहारही सात्त्विक असावा, सात्त्विक साहित्याचे वाचन करावे. 'सात्त्विक आहार, सात्त्विक विहार। सात्त्विक संगति, व्यवहार। सात्त्विक वाचन-दर्शनादी साचार। प्रिय सज्जनांसि।।२।।' (अध्याय १६) आपल्या पुढील पिढीवर सात्त्विक संस्कार करावेत. आपले आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी प्रत्येकाने नियमित व्यायाम करावा. व्यायामहीन मनुष्य हा स्वत:चा व राष्ट्राचाही शत्रू होय! असे राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज सांगतात.

समाजामध्ये वावरत असताना समतेचे पालन करावे. आपल्या प्रत्येक कृतीस सत्य, न्याय आणि नीतीचे अधिष्ठान असावे. जगातील सर्व लोकांच्या अंत:करणात एकच देव पाहण्यातच खरा धर्म आहे. 'सर्वांविषयी समभाव । सर्वाभूती वासुदेव। हे जाणे तोचि खरा मानव। सत्य धर्म हाचि त्याचा।।३७।।' (अध्याय २९) माणसामाणसामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करू नये, त्याचप्रमाणे परमेश्वरामध्येही भेदभाव करू नये. सांप्रदायिक सदभाव आणि सहिष्णुतेचा पुरस्कार करावा असे तुकडोजीमहाराज सांगतात. 'हरिहरा भेद नाही। एक एकाचे हृदयी। राम, रहीम एकची पाही। देवी-देवही एकात्मक।।४८।। (अध्याय २५) राम आणि रहिमाचे दर्शन एकत्र घेतले पाहिजे असे तुकडोजीमहाराज सांगतात. 'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे!' या गीतातून 'हे सर्व पंथसंप्रदाय एक दिसू दे!' अशी प्रार्थना ते करतात. सहिष्णुतेचा आणि धार्मिक एकोप्याचा संदेश तुकडोजीमहाराजांनी दिला. स्वातंत्र्योत्तर काळातील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर हा विचार खूप महत्त्वाचा ठरतो. बाल व युवा हे राष्ट्राचे आधारस्तंभ असतात. त्यामुळे त्यांना शिक्षण व बलोपासनेसाठी सतत प्रोत्साहन दिले पाहिजे. समाज ज्ञानी होण्याच्या दृष्टीने संत गाडगेबाबांप्रमाणेच राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनी शिक्षणाचा कायम आग्रह धरला. 'वडिलांने मुलगा नाही शिकविला। तोही पापाचा भागीदार झाला। जैसे जन्म देणे कर्तव्य त्याला। तैसेचि शिक्षण देणे अगत्याचे।।४२।।' (अध्याय १९) आपल्या मुलाला योग्य शिक्षण न देणे म्हणजे पाप आहे. ज्या मुलाला आपण जन्म दिला त्याला शिकवणे हे एक अत्यंत महत्त्वाचे कर्तव्य आहे. अशी शिक्षणाबद्दलची आग्रही भूमिका राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनी मांडली. केवळ आध्यात्मिक उन्नतीवर भर न देता मनुष्याच्या सर्वांगीण विकासावर भर देणे, हे राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांचे वैशिष्ट्य आहे. कैकाडी महाराजांनी आपल्या प्रबोधनपर कीर्तनातून बहुजन समाजात पुरोगामी विचार रुजवण्याचे मौलिक कार्य केले.

प्रसन्न वाणी आणि प्रभावी लेखणी यांनी महाराष्ट्राला मंत्रमुग्ध करणारे वारकरी संप्रदायाचे विसाव्या शतकातील प्रवक्ते म्हणून धुंडामहाराज देगलूरकरांचा परिचय होता.

ज्ञानेश्वरीतील विचारधन आपले कीर्तन-प्रवचन आणि लेखनातून समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न त्यांनी अत्यंत निष्ठेने केला. संत ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंतच्या वारकरी संतसाहित्यातून प्रकटलेल्या मूल्यांचा स्वातंत्र्योत्तर काळातील वर्तमानास अनुसरून अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न धुंडामहाराजांनी केला. ज्ञाननिष्ठेचा आदर्श लोकमनात रूजवण्याचे मौलिक कार्य त्यांनी केले. श्री धुंडा महाराजाप्रमाणेच वारकरी संप्रदायातील प्राचार्य मामा दांडेकर हे एक महत्त्वपूर्ण संत होते. धार्मिक ग्रंथांची पारायणे करण्यापेक्षा त्यातले विचार आचरणात आणा; धर्माला अध्यात्माची जोड द्या; धर्म म्हणजे आत्मधर्म, तो साधण्यासाठी भक्तिप्रधान, उदार भागवतधर्माची गरज आहे, असे विचार त्यांनी मांडले. त्यांनी गावोगावी कीर्तने-प्रवचने करून सर्वसामान्य लोकांना नीतिधर्माचा उपदेश करून त्यांना अंधश्रद्धामुक्त असा सन्मार्गाचा रस्ता दाखवला. याबरोबरच वारकरी संप्रदायातील साखरेमहाराज, तनपुरेमहाराज, सातारकरमहाराज, सानपमहाराज अशा अनेक वारकरी संतांनी समाजात नीतीमूल्ये पेरण्याचे मौलिक कार्य केले.

लिंगायत परंपरेतील डॉ. शिवलिंग शिवाचार्यमहाराज अहमदपूरकर हे एक महत्त्वपूर्ण संत होते. स्वातंत्र्यपूर्वकाळात देशस्वातंत्र्याच्या चळवळीतही यांनी आपला सहभाग नोंदवला होता. महात्मा बसवेश्वरांपासून ते शिवयोगी मन्मथ स्वामींपर्यंतच्या लिंगायत संतांचे पुरोगामी विचार समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वाहिले. महाराष्ट्रातील लिंगायत संतसाहित्याचे मोठ्या प्रमाणावर संकलन, संशोधन आणि प्रकाशन केले. धार्मिक कर्मकांडांचे स्तोम, अंधश्रद्धा, बुवाबाजी, चमत्कार या गोष्टीना त्यांनी कधीच थारा दिला नाही. एकशे चार वर्षांच्या प्रदीर्घ आयुष्यात त्यांनी विवेकप्रामाण्य आणि विज्ञाननिष्ठेला प्राधान्य दिले. धर्मगुरू असूनही धर्म, पंथ, जात, वर्ण, प्रांत या सर्व भेदांच्या पलीकडे जाऊन सदैव राष्ट्रनिष्ठा जोपासली. आपल्या कृतीउक्तीतून राष्ट्रनिष्ठेचा संदेश दिला. आचार्य नंदी या जैन संतांनी कर्मठपणा म्हणजे धर्म नव्हे, हा महत्त्वाचा विचार समाजासमोर ठेवला. धर्म म्हणजे प्रेम, वात्सल्य आणि बंधुभाव असे सांगितले. निर्लोभतेला तर त्यांनी 'परम'धर्म संबोधले आहे. 'सर्व समाज हा माझा बंधुवर्ग आहे' हा त्यांचा एक आवडता सिद्धांत होता. जैन धर्माला अभिप्रेत असलेल्या अहिंसा तत्त्वाचे त्यांनी निष्ठेने पालन केले. शिक्षणातून परिवर्तन घडते, ही त्यांची श्रद्धा होती. यासाठी आचार्य नंदींनी शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान दिले.


विसाव्या शतकातील मराठी संत हे स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर दोन्ही काळाचे साक्षीदार होते. स्वातंत्र्यपूर्वकाळात लोकांच्या मनात ईश्वरभक्तीबरोबरच देशभक्ती रुजवून स्वातंत्र्याचा विचार जागवण्याचा प्रयत्न या संतांनी केला. काही संतांनी प्रत्यक्ष स्वातंत्र्यचळवळीत सहभाग घेतल्याचा इतिहास आहे. स्वातंत्र्यानंतर देशासमोरील नवीन आव्हानांना सामोरे जाण्याच्या दृष्टीने काळानुरूप मूल्यांची मांडणी या संतांनी केली. मध्ययुगीन काळातील विविध संप्रदायांच्या संतसाहित्यातून प्रकटलेल्या मूल्यांची वर्तमान परिप्रेक्ष्यातून पुनर्मांडणी स्वातंत्र्योत्तर-काळातील मराठी संतांनी केली. समाजाच्या पारमार्थिक उन्नतीबरोबरच लौकिक उन्नतीचाही प्राधान्याने विचार या संतांनी केला आहे. स्वातंत्र्योत्तरकाळातील मराठी संतांनी मांडलेले मूल्य हे संवैधानिक मूल्यासाठी पूरक आणि पोषक ठरले आहे. स्वतंत्र भारताच्या वाटचालीत मराठी संतांची मूल्यदृष्टी निश्चितच उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरली.

**– डॉ. रवींद्र बेम्बरे**
भ्रमणध्वनी – ९४२०८१३१८५

## प्रतिक्रिया

सर नमस्ते. आपण मुंबई मराठी साहित्य संघाच्या मुखपत्राचे संपादक झाला आहात. याबद्दल आपले मनस्वी खूप खूप अभिनंदन. सदरचा आलेला अंक पीडीएफ स्वरुपात पाहिला. खूप सकस साहित्य समाविष्ट आहे. तुम्ही संपादक पदाची जबाबदारी नेटकेपणाने पार पाडाल याची निश्चितपणाने खात्री आहे. शिवाय अंकाची उंची आपण उत्तरोत्तर उत्तमोत्तम वाढवत न्याल अशी आशा करतो. धन्यवाद सर, शुभ शुभेच्छा!

**– धनाजी घोरपडे**
भ्रमणध्वनी – ९४२१३०३७०२



स्वातंत्र्योत्तर
मराठी
साहित्याची
वाटचाल

•

गझल

•

# स्वातंत्र्योत्तर काळातील गझल




**संगीता जोशी**

**स्वातंत्र्योत्तर काळात मराठी गझलेचे अमृताचे रोपटे भटांनी लावले, ही महत्त्वाची घटना घडली. ते रोपटे पोसायचेही काम त्यांनी केले. त्याला मानभावी जाणकारांनी 'भटारखाना' म्हणून हिणवले. परंतु भटांच्या व इतर उदित कवींच्या गझलेने त्यांना पुढे निरुत्तर केले. 'कवीचे युद्ध हे एकच आघाडी असलेले युद्ध असते; प्रेम व सौंदर्य यासाठी केले जाणारे, द्वेषाचा द्वेष करणारे हे सनातन युद्ध आहे. कवीची खाजगी हारजीत वेगळी; पण हे युद्ध सुरूच राहील. अशा कवींपैकी मी एक सैनिक आहे.' असे त्यांनी म्हणून ठेवले आहे.**

**स्वातंत्र्याचा** अमृतमहोत्सव या वर्षी आपण साजरा केला; त्या निमित्ताने सगळ्याच क्षेत्राळत आपण एक सिंहावलोकन करत आहोत. तसे ते मराठी गझलक्षेत्राचेही व्हावे या हेतूने हा लेख प्रस्तुत करत आहे. गझलक्षेत्रात मागे वळून पाहताना त्याची पाळंमुळं मात्र स्वातंत्र्यपूर्वकाळात शोधावी लागतात; आणि मुळांशिवाय वृक्ष नाही, म्हणून पूर्व कालात थोडे डोकावूनच पुढे जावे लागणार आहे.

गझल हा कवितेचाच एक प्रकार आहे. सुनीत, अभंग, ओवी, पोवाडा इत्यादी प्रकारांसारखाच गझल हा एक प्रकार. कविता शार्दूलविक्रीडित, वसंततिलका, भुजंगप्रयात इ. वृत्तांत असायच्या; शाळेत असल्यापासून वृत्ते आपल्या परिचयाच्या असतात. गझलची वृत्ते याहूनही वेगळी असतात. कवितेत वर्ण्यविषय एकच असतो, पण एकाच गझलेत निरनिराळे विषय येऊ शकतात. कारण गझलमध्ये द्विपदी असतात; त्यांना शेर असे म्हणतात. प्रत्येक शेर निराळा व भिन्न भिन्न विषयांवर असू शकतो. अर्थाच्या दृष्टीने प्रत्येक शेर स्वतंत्र असतो. अशी द्विपदींची माळ म्हणजे गझल. कवितेत शेवटी उच्चबिंदू (क्लायमॅक्स) येतो, गझलेत प्रत्येक शेरात असा उच्चबिंदू येऊ शकतो. गझलची

मुख्य ओळख म्हणजे काफिया (यमक). काफियाशिवाय गझल होऊच शकत नाही. काफिया म्हणजे समउच्चारी शब्द. काफियानंतर ठरावीक शब्द, पहिल्या शेरात दोनदा व नंतरच्या प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळीत येत असतील तर त्या एका अथवा अनेक शब्दांच्या समूहाला रदीफ असे म्हणतात काफिया हा शब्द पुल्लिंगी असून रदीफ शब्द स्त्रीलिंगी आहे. सामान्य वाचकांसाठी एवढी माहिती पुरेशी आहे. जे कवी गझल लिहू इच्छितात, त्यांच्यासाठी माझे वेगळे पुस्तकच आहे; शीर्षकः 'छंदोमयी कविता-गझल', ते उपयुक्त ठरेल.

आपण द्विपदींशी अगदी अपरिचित आहोत, असे नाही. ज्यांना संस्कृत भाषेचा थोडा परिचय असेल, त्यांना संस्कृत श्लोक माहीत असतील; शालेय जीवनापासून पाठही असतील. तसेच, जुन्या हिंदी कवींचे दोहे पूर्वी लोकांना पाठ असत. त्यात उपदेशही असे. कबीर, रहीम, वृंद इत्यादी ही नावे दोह्यासाठी प्रसिद्ध आहेत. मुख्य म्हणजे आपला पवित्र ग्रंथ 'भगवद्‌गीता' हाही दोन दोन ओळींच्या ७०० संस्कृत श्लोकांचा आहे!

मला वाटते गझल ही कवितेची पुढची पायरी ठरते. आधी चांगला कवी असेल तर तो गझल सहज लिहू शकेल. नियमांमध्ये बांधलेली कविता असते गझल. एखादा द्राव संपृक्त करायचा असेल तर त्यात द्राव्य पदार्थ अधिकाधिक टाकत जावे लागते. उदाहरणार्थ, पाण्यात मीठ विरघळवते, तोपर्यंत अधिकाधिक टाकत राहिले, तर एक वेळ अशी येते की जास्तीचे मीठ न विरघळता तळाशी साचते. तेव्हा जो गाळून घेतलेला द्राव तयार होतो तो संपृक्त द्राव असतो. हा जर तापवला व सर्व पाण्याची वाफ होऊ दिली, ते मिठाचे शुद्ध स्फटिक (Crystals) आपल्याला मिळतात. कवितेलाही अनुभवच हवे असतात. अनुभवांचे पुरेसे साचलेपण मनात निर्माण झाले, त्याचे मनाच्या संवेदनशीलतेमुळे उत्कट भावनेत रूपांतर झालं, व प्रतिभेने समर्थ शब्दांची जोड दिली तर गझल आकाराला येते. म्हणून म्हणता येते की गझल हे कवितेचेच 'क्रिस्टलायझेशन' (स्फटिकीकरण) आहे. कवीच्या मनात भावना व विचार हे संपृक्त व्हायला हवेत. गझल कवितेइतकी सहज लिहून होत नाही.

काही कवी 'मी रोज एक गझल लिहितो/लिहिते' किंवा 'गझल लिहिल्याशिवाय झोपत नाही'; असे अभिमानाने सांगतात. शक्य असते तर मी त्यांचा 'क्लास' लावला असता!

मघाशी द्विपदींचा उल्लेख आला. आपल्या अनेक मराठी कवींनी स्वतंत्र द्विपदी लिहिल्या आहेत व एकाच कवितेत त्यांची संख्याही पंधराच्या पुढेच आहे. पण त्याची गझल झालेली नाही, कारण प्रत्येक दोन ओळींत यमक साधले असले तरी तो काफिया होऊ शकत नाही व बाकीचे नियमही दुर्लक्षित राहिलेले आहेत.

१. सह्याद्रीच्या तळी शोभते हिरवे तळकोकण
राष्ट्रदेविचे निसर्गनिर्मित केवळ नंदनवन...
इतिहासाला वार्ता ज्याची श्रुत नाही जाहली
दंतकथांसहि विस्मृति ज्यांची होउनिया राहिली...

– कवी माधव

२. हिरवे हिरवेगार शेत हे सुंदर साळीचे
झोके घेते कसे, चहुकडे हिरवे गालिचे!
पाहा पाखरे चरोनि होती झाडावर गोळा
कुठे बुडाला पलीकडे तो सोन्याचा गोळा!

– भा. रा. तांबे

या दोन-दोन द्विपदी वरील मुद्दा स्पष्ट करतात. शिवाय मराठीतील आर्या हीसुद्धा दोन-दोन ओळींचीच रचना असते.

यातूनच स्फटिकीकरण होत गेले असावे. आता गझलचा थोडा इतिहास पाहू.

कवी माधव ज्युलियन हे मला शास्त्रज्ञ डाल्टन यांची आठवण करून देतात. डाल्टन याने आपला अणु-सिद्धांत मांडला तो पुढील काळात नवीन शोध लागल्यानंतर सर्वतोपरी अग्राह्य ठरला. पण डाल्टनच्या मूळ कामावरूनच सर्वांनी प्रेरणा घेतली होती. अगदी तसेच माधव ज्युलियनांनी गझलेवर प्राथमिक काम भरपूर केले. फारसी गझलेवरून तिचे नियम व वृत्ते त्यांनी आत्मसात केली; पण त्यांच्या गझलांमध्ये आणण्यात ते कमी पडले. पण त्यांच्या काळात (२१ जानेवारी १८९४-२९ नोव्हेंबर १९३९) त्यांनी समकालीन कवींना गझलची गोडी दाखवून दिली होती. १९२७ मध्ये त्यांनी गझलवृत्तांवरील ग्रंथ 'छंदोरचना' प्रसिद्ध केला; व १९३३ साली त्यांचा गजलसंग्रह 'गज्जलांजली' प्रकाशित झाला. 'छंदोरचना' हे एक अमूल्य काम त्यांच्या हातून झाले. गज्जलांजलीमधील ११४ कवितांपैकी बऱ्याचशा कविता आजच्या मापदंडाने गझला म्हणता येत नाहीत. अगदी 'शुद्ध' गझला हाताच्या बोटांवर मोजण्याइतपतच सापडतात. तरीही आपल्या पंचेवाळीस वर्षांच्या अल्प आयुष्यात त्यांनी खूप काम केले आहे. शिवाय फारसी-मराठी शब्दकोश त्यांनी एकट्याने लिहून तो

१९२५ मध्ये प्रकाशित केला!

मराठी गझलेचे मूळ याहीपेक्षा खोलवर आहे. त्याचा उल्लेख आवश्यक आहे. औरंगाबादचे कवी अमृतराय (१६९८-१७५३) व मोरोपंत (मोरोपंत रामचंद्र पराडकर १७२९-१७९४) यांनी ही प्रथम गझलांचा प्रयत्न केल्याचे म्हटले जाते. 'जगव्यापका हरीला नाही कसे म्हणावे' ही अमृतरायांची रचना उदाहरण म्हणून घेतली जाते. परंतु एक दुसरे उदाहरणही आहे. (विस्तारभयास्तव प्रत्येक ठिकाणी काही ओळीच देत आहे.)

३. हेचि सत्पुरुषाची शोभा । महासंकटी राहे उभा ।।
सुख होताचि न धरी लोभा ।
दुःख आलिया न पावे क्षोभा।।

– अमृतराय

४. रसने, न राघवाच्या थोडी, यशात गोडी ।। धृ.
निंदा-स्तुती जनांच्या वार्ता वधू-धनाच्या
खोट्या व्यथा मनाच्या काही न त्यात गोडी।।..१
विनवी 'मयूर' भावें सखि हेचि नित्य गावे
मजला द्रवोनि पावे, दुसरे न बंध तोडी ।।..२

– मोरोपंत

५. मिळेना अंतरी तुझ्या मला थोडाहि ओलावा
म्हणुनी तूज सोडावे, न तू हा बोल बोलावा...१
धनुष्ये-बाण घेवोनी खडे डोळे तुझे दोन्ही
म्हणुनी काय गे कोणी न यावे प्रीतिच्या गावा...२
हवा तो भाव मी ठेवी शिलेची जो करी देवी
त्यजू तो सांग मी केवी? वृथा का मांडिशी दावा...३

– माधव ज्युलियन

वर क्र.४ च्या उदाहरणात मोरोपंतांनी 'मयूर' हे काव्यनाव (टोपणनाव) वापरून 'मक्ता' लिहिला आहे. उदाहरणार्थ, ५ मध्ये माधव ज्युलियनांनी 'व्योमगंगा' वृत्त पाळून गझल लिहिली आहे. वृत्तासाठी ऱ्हस्व अक्षरे दीर्घ लिहिण्याची सूट घेतली आहे. त्यांनी 'छंदोरचना' पुस्तकात लिहिलेच होते, की 'कवींना गझलच्या वृत्तांची ओळख व्हावी म्हणूनच मी स्वतः काही उदाहरणे लिहितो आहे.'

माधव ज्युलियनांनी पहिली गझल १५ एप्रिल १९१९ रोजी लिहिली; त्यानंतर कविश्रेष्ठ सुरेश भट उदयाला येईपर्यंत मध्ये बराच काळ गेला, स्वातंत्र्योत्तर काळाकडे येईपर्यंत भटांच्या आधीही काही महत्त्वाचे कवी गझल लिहून गेले. या कवीचे योगदान स्वतंत्र्यात्तर काळातील आहे व बहुतांश कवी १९४७ नंतरही हयात होते, म्हणून त्यांना टाळले नाही.

६. आमुचे सर्वस्व गेले केवढे आश्चर्य हे
जे न व्हावे तेच झाले केवढे आश्चर्य हे...
वेळ येता मायभूमी बायकांनी राखिली
वीर तेथे षंढ झाले, केवढे आश्चर्य हे..

– देवीदास महाजन

उदाहरण ६ मध्ये वेगळे विषय दोन्ही शेरात मांडले आहेत. 'केवढे आश्चर्य हे' ही रदीफ आहे. पहिल्या शेरात (मतला) गेले शब्द आला असला तरी बाकी पाच 'झाले' हा शब्द सर्व शेरात आला आहे. तो जर रदीफमध्ये (अंत्ययमकात) जोडला तर 'अ' हा स्वर काफिया मानता येईल. यात देवप्रिया हे वृत्त वापरले आहे. महाजनांच्या गझलेत रवानी (भाषेचा ओघ किंवा प्रवाहीपणा) चांगला साधला गेला आहे.

७. कवी यशवंत (यशवंत दिनकर पेंढारकर) यांच्या काही ओळी तर सुभाषितासारख्या वापरल्या गेल्या आहेत.

जगी या द्वेषदंभाचा तमाशा माजला सारा
मुलामा मान्यता पावे, गुणाला लाभते कारा....
स्वकर्मी चूर जो मौनी, कुणाच्या येइना डोळां
त्यजोनी धान्य, भुसाला दिगंती नेतसे वारा

– यशवंत

हे दोन शेर दिले आहेत; सारा व कारा हे काफिये आहेत, पण बाकीच्या शेरांतही वारा, धारा, हारा असे योग्य काफिये आले आहेत. 'वियद्गंगा' वृत्तात सर्व शेर आहेत. तांब्याच्या भांड्याला चांदीचा लेप दिला तर त्याला जास्त किंमत येते, मान्यता मिळते; तसे लोक बाह्य रूपाला भुलतात, पण गुणी माणसाला किंमत मिळतेच असे नाही. जो न बोलता आपले कर्तव्य करत राहतो, तो लोकांच्या नजरेत भरत नाही; जसे धान्य जमिनीवरच राहाते, पण भुसा मात्र वाऱ्याबरोबर उंचीवर पोहोचतो. अशा अर्थाचे व दोन वेगळे विषय यातही आले आहेत.

८. कवी अनिल (आत्माराम रावजी देशपांडे) मुक्तछंद हा काव्यप्रकार यांनी पुढे आणला व वाढवला. असे असूनही त्यांनी काही छंदोबद्ध कविता लिहिल्या आहेत; त्यात अल्पशा गझला सापडतात. पुढे त्यांनी याच गझलांना दशपदी हे नाव दिले. त्यांना कळले होते की आपल्या रचना गझलच्या कसोटीवर उतरत नाहीत. पुढे गझलेतील दोन शेर पाहूया.

चटकचांदण्या रात्री येत राहतात पुन्हा
जीवपाखरू अवचित सापडते त्यात पुन्हा...
हिंदोळत बसते मग चांदणे मनातलेच
डोळे उलटून आत रूप पाहतात पुन्हा...

– अनिल

ही रचना मात्रावृत्ततात असून, चोवीस मात्रांचे हे वृत्त आहे.

९. आवडे तुझा गडे हा वर्ण काळा सावळा
हासु दे कोणी मला की 'काय भोळा बावळा '
ना कधी सत्प्रीतिला तो बाह्य रूपाचा लळा
अंतरंगीच्या गुणांचा रंग मोही आगळा'

– कुमुदबांधव

कवी सदाशिव अनंत शुक्ल ऊर्फ कुमुदबांधव यांची ही गझल आहे. अग्न्यावर्तनी गटातील देवप्रिया या अक्षरवृत्तात ती लिहिली आहे. सात शेरांची ही ठाकठीक गझल म्हणता येईल. प्रत्येक द्विपदी स्वतंत्र असून काफियाच्या शब्दाने ओळ संपते त्यामुळे रदीफ नसलेली (गैरमुरद्दफ) अशी ही गझल आहे.

यानंतर भवानीशंकर श्रीधर पंडित, ना.घ. देशपांडे यांचा उल्लेख करून मी पुढील कवींकडे वळते.

बाळकृष्ण भगवंत बोरकर हे एक महत्त्वाचे कवी. प्रेम, निसर्ग आणि सौंदर्य हे तीन त्यांचे महत्त्वाचे काव्यस्तंभ होते.

त्यांनी म्हणावी अशी गझलरचना केली नाही, पण अनेका द्विपदी सापडतात.

१०. लोचनी ये आज पाणी तत्स्मृतीने साजणी
भैरवी आलापिते ही रात्र येथे चांदणी

– बा. भ. बोरकर

माथ्यावरती होते ओझे; उरात होते गाणे
त्याविण आता जीवित सारे उदास केविलवाणे

– बोरकर

केशी तुझिया फुले उगवतिल, तुला कशाला वेणी?
चांदण्यास शिणगार कशाला? बसशिल तेथे लेणी

– बोरकर

छळा, पिडा वा तिरडी काढा आम्ही साहू पाहू
गळ्याभोवती फास आवळा, वेद नवा पण गाऊ

– बोरकर

देखणा देहान्त तो, जो सागरी सूर्यास्तसा
अग्निचा पेरून जातो रात्रगर्भी वारसा!

– बोरकर

वरील पाचही द्विपदी वेगवेगळ्या रचनांमधून घेतल्या आहेत. या सगळ्यांत गझलेची झलक नक्की दिसते. १९६० व १९७५ साली त्यांनी लिहिलेल्या दोन गझला, 'ते स्वप्न एक होते' आणि 'वास नाही ज्या फुलांना' ह्या पूर्णपणे गझला होत, असे डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी म्हटले आहे.

११. कवी कुसुमाग्रज (विष्णू वामन शिरवाडकर)

मराठीतील या कवीचे भाग्य असे की त्यांचे नाव 'नासा' या अंतराळ-संस्थेने एका नवशोधित ताऱ्याला दिले! मात्र त्यांनी गझलेचा पाठपुरावा केला नाही. 'गझलधारा' या पुस्तकात त्यांची एक गझल डॉ. सांगोलेकरांनी घेतली आहे. त्यातही मतल्यात जो कफिया वापरला आहे, तो पुढे पाळलेला दिसत नाही.

चाललो मी सारखा हा चालण्याला अंत नाही
चाललो कोठे, कशाला, हीही आता खंत नाही...

– कुसुमाग्रज

१२. मरणाची भीती नाही सौख्यातच धोका आहे
जगण्याचासुद्धा येथे जगि एकच मोका आहे

– कवी संजीव

या कवीचे नाव कृष्ण गंगाधर दीक्षित, पण संजीव नावानेच ते प्रसिद्ध होते. त्यांनी चित्रपटासाठीही गीते लिहिली. एवढेच नव्हे तर कथा व संवादही लिहिले. 'अखेरचा हा तुला दंडवत' हे लताजींनी गायलेले व संगीतबद्ध केलेले गीतही त्यांनीच लिहिले. त्यांच्या 'गझल-गुलाब' या संग्रहास राज्यसरकारचा पुरस्कार मिळाला होता.

विंदा करंदीकर हे मराठीतील महत्त्वाचे कवी. मुख्य म्हणजे त्यांनी माधव ज्युलियनांप्रमाणेच गझल हा शब्द पुल्लिंगी करून वापरला. ते कोणाला पटण्यासारखे नव्हते. त्यांच्या गझलाही बोटांवर मोजण्याइतक्याच सापडतील.

१३. मी ऐकले ध्रुव हालतो; त्याचे न काही वाटले
माझेच काही मागचे माझ्या गळ्याशी दाटले

– विंदा करंदीकर

गझल उपदेशाचा, गझल साठीचा अशा शीर्षकांच्या काही गझला त्यांनी लिहिल्या आहेत.

१९४७ नंतर राजकीय घडामोडींचा काळ बराच मोठा होता. त्यात गझलक्षेत्राकडे विशेष लक्ष दिले गेले नाही. मात्र १९५० नंतर फार मोठा असा भावगीतांचा काळ होता. १९४७ लाच माणिक वर्मा (त्यावेळी दादरकर) यांची पहिली रेकॉर्ड एचएमव्हीने काढली. संगीत होते सुधीर फडके यांचे.

१४. 'सावळाच रंग तुझा पावसाळी नभापरी
आणि नजरेत तुझ्या वीज खेळते नाचरी....
सावळाच रंग तुझा चंदनाच्या बनापरी
आणि नजरेत तुझ्या नाग खेळती विखारी...

अशा गझलची आठवण करून देणाऱ्या द्विपदी काही गीतांमधेही होत्या. यातील दोन ओळींतील 'रब्त' लक्ष वेधून घेतो. माणिक वर्मांचेच गायलेले दुसरे भावगीत म्हणजे ...

त्या चित्तचोरट्याला का आपुले म्हणू मी
स्मृतिजाल आसवांचे दिनरात का विणू मी....
सहजी करी धरावे नख लावुनी खुडावे
की फूल मालतीचे बागेतले जणू मी ...

यासारखी रचना गझलच्या बरीच जवळ जाणारी होती, तरीही त्या गझला नव्हत्या. गझल हा गेय प्रकार आहे व तो गाण्याची एक विशिष्ट शैली आहे. मध्ये-मध्ये दुसरे शेर, ठेका थांबवून म्हणणे हाही त्याचाच एक भाग असतो.

यानंतर जी मराठी गझल म्हणून रेकॉर्ड गाजली, ती म्हणजे शोभा गुर्टूंची. त्या बेगम अख्तर यांच्या शिष्या होत्या. उर्दू गजलाही त्या गात असत.

१५. उघड्या पुन्हा जहाल्या जखमा उरातल्या
फुलती तुझ्या स्मृतीच्या कलिका मनातल्या ....
येऊ कशी निघोनी पाऊल अडखळे
विरहात वेचितांना घटना सुखातल्या....
उठती तरंग देही हळुवार भावनांचे
स्मरतात त्या अजुनी भेटी वनातल्या....
हासूनिया खुणावी ती रात रंगलेली
तू मोजिल्यास होत्या तारा नभातल्या.....

– उमाकांत काणेकर

उमाकांत काणेकर यांनी लिहिलेली ही गझल आहे, बावीस मात्रांचे हे वृत्त क्वचित गडबडले आहे. काफिया व रदीफ एकरूप झाले आहेत; किंवा रदीफ नसलेली ही गझल आहे. किरकोळ दोषांकडे दुर्लक्ष केलेले आहे. याचे संगीत श्रीकांत ठाकरे (राज यांचे वडील) यांचे होते. १९६१ साली सुरेश भट यांचा 'रूपगंधा' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. यात ज्या गझला होत्या, त्यातही तांत्रिक दृष्ट्या त्रुटी राहिलेल्या होत्या. नंतर १९७४ साली त्यांचा 'रंग माझा वेगळा' हा संग्रह आला व सर्व कवींना गझलेची दिशा मिळाली; वाट सापडली.

१६. वसंत बापट यांच्या एकूण संग्रहांत द्विपदी असणाऱ्या रचना खूप आहेत, पण गझला मात्र तुरळकच आढळतात. १९९१ साली प्रसिद्ध झालेल्या 'राजसी' या संग्रहात आलेली ही एक गझल–

हरवून शीळ आले रानात पाखरू
वेडे उदास झाले रानात पाखरू...
कळपात सोबत्यांच्या चाले अखंड चर्चा
का एकटे उडाले रानात पाखरू...
फुलवूनिया पिसारे केले कुणी इशारे
का हे जरा न हाले रानात पाखरू...
कोठे वसंत आहे हे वाट पाहताहे
माझे दुखावलेले रानात पाखरू...

ही गझलही पूर्ण निर्दोष नाही पण अमृतरायांपासून सर्वच कवींना सूट देऊन आपण गझलची वाटचाल पाहात आहोत. त्यामानाने ही बरीच दोषरहित आहे. काही ओळीत आनंदकंद वृत्त आहे, त्यात शेवटचा एक गुरू वगळला की जे विद्युल्लता वृत्त होते, ते वृत्त दिसते. शेवटच्या शेरात वसंत हे स्वतःचे नाव गुंफून मक्ता लिहिला आहे असे म्हणता येते; पण 'दुखावलेले' हा शब्द इतर काफियांशी सुसंगत नाही.

कवयित्रींकडे येताना शांता शेळके यांनी गीतरचनां-बरोबरच काही गझला लिहिल्या आहेत. त्यांची संख्या वीसच्या आसपास असेल. याचवेळी इंदिरा संत, संजीवनी मराठे, पद्मा गोळे, वृंदा लिमये, सरिता पदकी यांची आठवण होते. पण, यांच्या संग्रहांत गझला आढळल्या नाहीत. ही माझ्याकडूनही त्रुटी राहिली असेल, ही शक्यता मी नाकारत नाही.

१७. भरूनिया भोवती तयाचाच श्वास आहे
फिकाफिका चांदण्यासही तो सुवास आहे...
कुणी 'नभाच्या पलीकडे तो वसे' म्हणाले
इथे परी तो, इथेच, आसपास आहे...
खुडून त्याने मला दुरी फेकले तरीही
उरात माझ्या अजून त्याचा निवास आहे...
चराचराला दिली तयाने स्वनाममुद्रा
मला कळे मीहि एक त्याचा विकास आहे...
कधी दिसावे, कधी हसावे, कधी लपावे
अनंत रूपात शाश्वताचा प्रवास आहे....

– शांता शेळके

सती+जलौगवेगा या वृत्तातील ही गझल आहे. श्वास, सुवास, प्रवास इत्यादी काफिये असून 'आहे' ही रदीफ आहे.

या गझलचे वैशिष्ट्य हे की ईश्वरी तत्त्वाचा शोध घेणारी ही गझल आहे. शेरांतून आणखीही अर्थ वाचक समजू शकतील. हे गझलचे एक सौंदर्यलक्षण आहे.

मंगेश पाडगावकर यांनी १९८१ साली 'गझल' नावाचा संग्रह काढला होता. त्यांच्या बहुतांश गझला निर्दोष आढळतात.

१८. माणसांना माणसे कंटाळली
चेहऱ्यांना चेहरे हे टाळती...
झाडल्या गोळ्या तुझ्या छातीवरी
ते तुझी आता जयंती पाळती...

आणिला नाही कुणी येथे दिवा
मात्र ते झोपड्या या जाळती....
पाखरांचे पार गाणे गोठले
सूर हे नाण्यांस आता भाळती...
ईश्वराला गाडला खड्यांमधे
आणि आता देवळे सांभाळती...

– मंगेश पाडगावकर

'त्रिवेणी' हा १९९५ साली प्रसिद्ध झालेल्या संग्रहातून वरील मेनका वृत्तातील गझल घेतली आहे. सुरेश भट हे तोपर्यंत 'गझल-सम्राट' म्हणून मान्यता पावले होते. त्यांनी गझलेला नवे आयाम दिलेले होते. गझल ही, प्रेयसी वा प्रेम या विषयातून बाहेर येऊन तिने सामाजिक, राजकीय वा आध्यात्मिक विषयही आपलेसे केले होते. पाडगावकरांच्या गझलेतही सामाजिक भाष्य केलेले आढळते.

बऱ्याच नामवंत कवींनी गझला लिहिल्या, आपण त्या त्रुटींसह स्वीकारल्या; पण या कवींपैकी कोणीही गझलकार म्हणून प्रसिद्ध पावले नाहीत. कारण त्यांनी तुरळक गझला लिहिल्या. सर्वांचा भर द्विपदीयुक्त कविता लिहिण्यावरच होता. सुरेश भटांच्या उदयानंतर खरे तर या कवींना गझलचे मर्म समजले होते. तिचा प्रभाव कविसंमेलनात दिसत होता. पण का कुणास ठाऊक गझलेला कवींकडून, प्रथितयश साहित्यिकांकडून व त्यामुळे रसिकांकडून अनुकूल प्रतिसाद मिळत नव्हता. ठाणे येथील अ.भा. साहित्य संमेलनातही 'कवितेवर गझलेचे आक्रमण' या विषयावर परिसंवाद गाजला होता. आमच्यासारख्यांना, 'निदान गझलेची दखल घ्यावी लागली' याचा आनंद त्यावेळी झाला होता.

नव्याने गझलकडे वळणाऱ्या कवींना मात्र 'सुरेश भट' सापडल्याने, त्यांना जणू परीसच लाभला होता. त्यातून किती जणांचे सोने झाले, हा मुद्दा तूर्तास सोडून देते.

सुरेश भट यांच्या गझलांबद्दल लिहिण्यासारखे खूप आहे, पण भट व त्यानंतरचे कवी यांच्या पूर्वी एका कवीची आठवण जरूर ठेवली पाहिजे. ते कवी म्हणजे वामनदादा कर्डक. त्यांनी मराठीत दोनशे तेहेतीस गझला लिहिल्या आहेत! दादांनी हिन्दीतही शंभरच्या जवळपास गझला लिहिल्या आहेत, ही माहिती मला प्रसिद्ध गझलकार प्रदीप निफाडकरांनी दिली. ते चित्रपटगीतेही लिहीत असत. वामनदादांना आंबेडकरी गझलेचा आरंभबिंदू मानतात, असे प्रमोद वाळके (नागपूर) यांनी संपादित केलेल्या दादांच्या गझल-संग्रहाच्या (संग्रामपिटक) प्रस्तावनेत लिहिले आहे.

ही प्रस्तावना अभ्यासपूर्ण व वाचण्यासारखी आहे. आंबेडकरी गझल म्हणजे काय यावरही पुस्तक वाळके यांनी लिहिले आहे. वामनदादा यांच्या गझला पाहू...

१९.(अ) माळावरची माती बोले आज मळ्याच्या मातीला
फुगू नको गं तू गर्वाने फुगवू नको गं छातीला...
मी हलकी तू भारी असला गर्व तुला का आला गं
पाणी नसता राहील का गं मान तुझ्या या जातीला...
काल भीमाने तुकडे केले मनुस्मृतीच्या सापाचे
उगीच आता भिऊ नका रे या सापाच्या कातीला...
तथागताची करुणा व्हावी वामनवानी संसारी
तथागताचा नातू बोले, तथागताच्या नातीला...

– वामनदादा कर्डक

(ब) काय सांगू तुला आता भीम माझा कसा होता
लेकराला जशी माता भीम माझा असा होता...
रास लावून ज्ञानाची वाटली ती गरिबांना
पाहिला ना कधी जो तो पामराला पसा होता...
वाटखर्चास जातांना गौतमाच्या निवासाला
दिला काढून कमरेचा बांधलेला पसा होता...
काय सांगू तुला वामन भीम माझा कसा होता
सात ठिगळाच्या बंडीचा भीम माझा खिसा होता

– वामनदादा कर्डक

काफिया-रदीफसह, मक्ता असलेली वरील गजल बाबासहेबांचे गुणगान करणारी मुसलसल गझल आहे. दादांनी सुमारे १९५५-५६ पासून गझला लिहिल्या असे वाळके म्हणतात. त्यावेळी त्यांना गझल प्रकाराची माहिती व तंत्र कोणी दिले असेल? याचे उत्तर त्यांनीच दिले आहे की 'मी खूप उर्दू मुशायऱ्यांना जायचो, तिथे हे शिकलो.' यावरून त्यांच्या आकलनशक्तीलाही दाद द्यावीशी वाटते!

२०. सुरेश भट यांच्या गझलेकडे येताना प्रथम सांगावेसे वाटते, की ते स्वयंभू गझलकार होते. त्यांनी तंत्रशुद्ध गझल मराठीला दिली. उर्दूचा त्यांचा अभ्यास होता, व त्यातून त्यांनी गझलेचा आकृतिबंध समजून घेऊन तो मराठीत आणला. पण त्यांच्या गझलांत वापरलेली सारी प्रतीके ही मराठी संस्कृतीतील आहेत. 'जी ऐकल्यानंतर मनात ह्या ना त्या रीतीने कायमची शिल्लक राहते ती अस्सल कविता.' असे ते म्हणत. गझल हा सर्वश्रेष्ठ व सर्वशक्तिमान काव्यप्रकार आहे , असा त्यांचा मुळीच दावा नव्हता. 'मी नेमका कोण आहे, हे मी नसेन तेव्हाच ठरेल' असे ते सांगत. .....आणि आता त्यांना जनता 'गझलसम्राट' मानू लागली आहे. ते असतानाही त्यांना हा किताब मिळालाच होता. पण मी 'गझलसम्राट' नाही असे ते म्हणत. सर्वसामान्य

जनता त्यांची चाहती होती, मात्र साहित्य-वर्तुळात त्यांना मान मिळायला फार काळ वाट पाहावी लागली. म्हणजे ते वाट पाहात नव्हते, आम्हा निकटवर्तीयांना ते जाणवत व खटकत होते.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी गझलेचे अमृताचे रोपटे भटांनी लावले, ही महत्त्वाची घटना घडली. ते रोपटे पोसायचेही काम त्यांनी केले. त्याला मानभावी जाणकारांनी 'भटारखाना' म्हणून हिणवले. परंतु भटांच्या व इतर उदित कवींच्या गझलेने त्यांना पुढे निरुत्तर केले. 'कवीचे युद्ध हे एकच आघाडी असलेले युद्ध असते; प्रेम व सौंदर्य यासाठी केले जाणारे, द्वेषाचा द्वेष करणारे हे सनातन युद्ध आहे. कवीची खाजगी हारजीत वेगळी; पण हे युद्ध सुरूच राहील. अशा कवींपैकी मी एक सैनिक आहे.' असे त्यांनी म्हणून ठेवले आहे.

त्यांनी १९५५ पासून गझल लिहायला सुरुवात केली. पण रूपगंधा (१९६१) या संग्रहात सात गझला होत्या.

'रंग माझा वेगळा' ह्या कवितासंग्रहात ९२ कवितांपैकी ३० गझला होत्या. नंतर 'एल्गार'मध्ये (१९८३) ९६ पैकी ९२ गझला; 'झंझावात'मध्ये ८९ पैकी ७४ गझला; व 'सप्तरंग'मध्ये ८० कवितांपैकी ४४ गझला आढळतात. हे आकडे थोडेसे कमी-जास्त होऊ शकतात, पण भटांनी विविध विषय यात हाताळले आहेत. प्रेम, शृंगार, हे गझलेचे पारंपरिक विषय तर आहेतच, तसेच समाजातील विषमता, उपेक्षित वर्गाची दुःखे, जगातील ढोंगी, फसवा, भोंदू व तथाकथित प्रस्थापित वर्ग (त्यांच्या गझलेतील 'तेऽ') व जगातील सुखे इत्यादी गोष्टी एकीकडे, व कवी दुसरीकडे असा संघर्षात्मक विरोध त्यांच्या गझलातून दिसतो. त्यातून वाट्याला आलेल्या दुःखातून त्यांना स्थितप्रज्ञता आलेली दिसते आणि एक कलंदरपणा त्यांच्या व्यक्तित्वाला आलेला दिसतो. त्यांच्या गझलांतील काही शेर पाहू.

शृंगारप्रधान-

(अ) कोवळी काया तुझी लावण्य सामावेल का?
लाजता तू, घाबऱ्या माझ्या मनाला वाटले...

(ब) जाहली पुरेशी ऊब तुझ्या कायेची
बाहेर लाजते फुलांफुलांवर पाणी...

(क) ही कहाणी तुझ्याच न्हाण्याची
तापलेल्या अधीर पाण्याची...

(ड) तुझ्या तारुण्यवर्खाची अशी काही मजा आली
विडाही रंगला होता, दिवाही लाजला होता...

(ई) अजुनी सुगंध येई दुलईस मोगऱ्याचा
गजरा कसा फुलांचा विसरून रात गेली.....

सामाजिक, राजकीय देश...

(फ) गाजती चोहीकडे दुःखे बिलोरी
ते, इत्यादि हुंदका ऐके न कोणी खापरांचा....

बिलोरी दुःखे व कापरांचा हुंदका अशी प्रतीके दोन ओळींत खूप अर्थ सामावून घेतात.

(ख) भाकरीचा प्रश्न आता राहिला नाही
लोकहो, घेऊ न्याहारी पाच वर्षांनी....
हा समाजाचा तमाशा, खेळ जातींचा
खेळती सारे मदारी पाच वर्षांनी...

(ग) माणसे नाहीत या देशात आता
सांगतो जो तो स्वतःची जात आता...

(घ) त्या दुःखांचा देशाचा आहेच कोण कैवारी
ह्या अश्रूंच्या मुलखाची मी रोजच करितो वारी...

(ङ) साऱ्याच गुन्हेगारांचा 'संयुक्त' चालला दंगा
ते भक्त लोकशाहीचे नालीला म्हणती गंगा...

(च) वृत्तपत्रांचे रकाने वायद्यांनी भरत होते
अन् किड्यामुंग्याप्रमाणे लोक साधे मरत होते...

(छ) ताठ कॉलरींचा ताठा वाकणार आहे
वंचनाच ज्याची त्याला गाडणार आहे...
मठोमठी मंबाजींना कीर्तने करू द्या
विठू काय बेमानांना पावणार आहे?...

(ज) उषःकाल होता होता काळरात्र झाली
अरे, पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली...

(झ) त्या सुसंस्कृत श्वापदांनी बांधली अपुली घरे
मोडक्या दारापरी मी खिन्न वाजत राहिलो...

(ञ) हे नवे फक्त आले पहारेकरी
कैदखाना नवा कोठला यार हो...

सुरेश भटांचे येथे किती शेर वा संपूर्ण गझल देऊ? सर्व शेर, दोन ओळींत एक कविताच सादर करतात; व प्रत्येक शेरात क्लयमॅक्स असतो हे दाखवून देतात. भटांनी मराठी काव्यक्षेत्रात क्रांती घडवली. कवी पुन्हा एकदा वृत्तबद्ध कवितेकडे वळले, हे मोठे श्रेय त्यांना जाते. त्यांच्या वेगळ्या क्षमतेचा त्यांना रास्त गर्व होता...

कोटि कंठातून माजी वैखरी घेईल ताना
शब्द हा एकेक माझा वेचुनी घेतील तारे...

– सुरेश भट

काही गझलांत क्वचित तात्त्विक शेरही आले आहेत.

तू समुद्र निर्विकार नेहमीच
मी तरंग! मी तुषार नेहमीच!

– सुरेश भट

स्वातंत्र्योत्तर काळात काव्यक्षेत्रात भटांनी क्रांती घडवली, म्हणून, डॉ. द.भि. कुलकर्णी (माजी संमेलनाध्यक्ष) यांनी भट यांचा 'युगप्रवर्तक कवी' असा गौरव केला आहे; व त्यांच्यावर स्वतंत्र पुस्तकही लिहिले आहे.

सुरेश भट यांच्याबरोबरच डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी व सुरेशचंद्र सुरतवाला यांचे गझलक्षेत्रात मोठे योगदान आहे. त्यांनी वेळोवेळी वाडिया कॉलेजात व सुरतवालांनी त्यांच्या ऑफिसात मुशायरे आयोजित करून आम्हा नवीन गझलकारांना प्रोत्साहन दिले. आमच्या गझला इतरांपर्यंत पोहोचवण्याची संधी दिली. नाडकर्णीसरांनी वाडिया कॉलेजमधे उर्दू व मराठी असे संमिश्र मुशायरे घेतले. बहुतेक दर शनिवारी ते असत. त्यामुळे आमची दृष्टी विस्तारली. व इतरांचे विचार ऐकून आम्ही समृद्ध झालो. सुरुवातीला मी व अनिल कांबळे असे दोघेच मराठी कवी मुशायऱ्यात असायचो. नंतर इलाही जमादार येऊ लागले. अशा तऱ्हेने गझल फोफावण्यात वरील दोन सुरेशचंद्रांचा वाटा होता.

पु. वि. बेहेरे यांनी मेनका मासिकात भट यांना गझल हे सदर चालवण्याची विनंती केली. यामुळेही नवीन गझलकार पुढे आले. 'आता माझ्या गझला गाण्याऐवजी या नवीन गझलकारांच्या गझला तुम्ही गाव्यात.' अशा अर्थाचे पत्र भटांनी आशा भोसले यांना आमच्या देखत लिहिले होते! एवढा मोठ्या मनाचा कवी क्वचितच आढळेल! आमच्या घडण्यात असा तीन 'सुरेशांचा' मोठा वाटा आहे.

सुरेश भटांकडून मार्गदर्शन मिळालेले किंवा स्वप्रतिभेनेही अनुकरणातून खूप कवी गझल लिहू लागले होते. काहींचे संग्रहही आले. १९८० व १९९० च्या दशकांत गझलकार कवींनी गझलला पुढे नेले. विषयांची विविधता, गझलेचे सौंदर्य, शब्दांचा नेमकेपणा व तंत्रशुद्धता याचा चांगला प्रत्यय मराठी गझलांतून आला. ते पाहून भटांचे समाधान झालेले दिसत होते. २००१ मधे त्यांचा 'सप्तरंग' हा संग्रह म.सा.प. पुणे येथे प्रकाशित झाला. गं.ना. जोगळेकर अध्यक्ष होते. भट यांनी त्या संग्रहावर रसग्रहणात्मक-समीक्षात्मक 'संगीता जोशींनीच बोलावे' असे जोगळेकरांना सांगितले होते. मला हा माझा सन्मानच वाटला. त्यावेळी केलेले भाषण मी जपून ठेवले आहे.

'अमृताचे रोपटे' लावून २००३ मध्ये हा कवी उद्यानातून कायमचा निघून गेला. पण गझलचा तोपर्यंत मोठा वृक्ष झाला होता. पण त्याला बहर आणण्याचे काम अनेक गझलगायकांनीही केले होते. मुळात गझल हा गेय काव्यप्रकार असल्याने भीमराव पांचाळे, सुधाकर कदम, डॉ. राजेश उमाळे इत्यादी अनेकांनी गझला गाऊन लोकप्रिय केल्या. भीमरावांनी तर गझल-संमेलने घेऊन व ती यशस्वी करून दाखवून गझलेकडे साहित्यविश्वाचे लक्ष वेधून घेतले. त्यावेळच्या नव्या गझलकारांच्याही गझला गाऊन त्यांनी नव्यांची ओळख श्रोत्यांना करून दिली. अमरावतीत झालेल्या तिसऱ्या गझल-संमेलनाची अध्यक्ष होण्याची संधी भीमरावांनी मला दिली.

या सर्व गायकांच्या मैफिली परदेशातही झाल्या. गझलेला प्रतिष्ठा मिळाली. फक्त दिवाणखान्यात गालिच्यावर बसून, पेयाचे घोट घेत ऐकल्या जाणाऱ्या गझलेला सन्मानाचा रंगमंच या मंडळींनीही मिळवून दिला. २००५ नंतर शाहीर सुरेशकुमार वैराळकर यांनी उदयदादा लाड यांच्या मदतीने पुणे-मुंबई व महाराष्ट्रात सर्वत्र गझलेचे मुशायरे आयोजित करून अनेक नवीन गझलकार उजेडात आणले. उदयदादांनी गझलकारांना पुरस्कार देऊन त्यांना प्रोत्साहन दिले. प्रदीप निफाडकर व डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी सा. फुले पुणे विद्यापीठात असताना बऱ्याच कार्यशाळा घेतल्या व तीन दिवसांचे जागतिक गझलसंमेलन घेतले. त्याला मॉरिशस, दुबई व अमेरिकेतूनही प्रतिनिधी आले होते.

गझलेच्या क्षेत्रातील या सर्व महत्त्वाच्या घटना गझलेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. आता सुरेश भटांनंतर (व ते असल्यापासूनच) ज्या गझलकारांनी नाव मिळवले त्यांचे काही शेर मी उद्धृत करणार आहे. त्यातून गझलेचा विकासही स्पष्ट होईल व कवींचा यथोचित परिचयही होईल. यात मी कसलीही 'सीनिऑरिटी' वगैरे न पाहता, जसे मला मिळतील त्या क्रमाने शेर घेणार आहे. त्यावरून कोणाचाही अधिक्षेप करण्याचा माझा हेतू नाही. शब्दमर्यादा असल्यामुळे खूप कवी राहूनही जातील, हे नक्की आहे.

१. झेलून ऊनवारे जपले फुलांस आम्ही
तोडून टाकण्याचा अमुचा स्वभाव नाही...
हे दान वेदनेचे द्यावे कुणा कळेना
अश्रूंस मागणारा कुठलाच गाव नाही

– आशा पाण्डे

*

२. वस्त्र बाजारी मिळे ते मलमली अन् रेशमी
शेवटी अंगाप्रमाणे ते शिवावे लागते...
हे असे आयुष्य आहे... काय ते आहे पुढे
लागती ठेचा तरी येथे पळावे लागते

– शंकर वैद्य

*

३. तशी उंच मी झेप घेतेच आहे
नभापार हे यान जाईल माझे?...
कराया पुन्हा पाकळ्या जीवनाच्या
तुला फूलही मीच देईन माझे

– ललिता बांठिया

✲

४. काय फुलांना सांगू माझ्या पानगळीचा दरवळ
मी ओघळतो तर डोळ्यातुन, अत्तर येऊ शकते...
कुठल्याही सूर्याला मी मावळलो नाही कारण
आयुष्याच्या संध्याकाळी, उत्तर येऊ शकते

– सुधीर मुळीक

✲

५. हे भ्रष्ट पापाचे धनी सत्ता नका देऊ तयां
हे संशयाचे सारथी पत्ता नका देऊ तयां...
काहीच नाही ठेवले बाकी तयांनी खायचे
आता तरी याच्यापुढे भत्ता नका देऊ तयां

– सिद्धार्थ भगत

आहे जरी सभोती पेटून युद्ध माझ्या
मी ठेवतो तरीही प्राणात बुद्ध माझ्या

– सिद्धार्थ भगत

✲

६. वादळांना झेलणारी आज माझी गझल आहे
संकटांशी खेळणारी आज माझी गझल आहे

– रमेश सरकाटे

✲

७. दूर हा काळोख  झाला पाहिजे
सूर्य तो आता निघाला पाहिजे...
कोणतीही योजना आखा तुम्ही
ह्या फुलांना गंध आला पाहिजे

– अरुण सांगोळे

✲

८. आवाज बंदुकीचे झडतात रोज येथे
रक्तात राजरस्ते भिजतात रोज येथे...
शोधू नकोस यांच्या आनंद चेहर्याचा
आतून जीव सारे जळतात रोज येथे

– गंगाधर पुसतकर

✲

९. वाळूचे तर वाळूचे । चल बांधू घर वाळूचे...
गाव झर्यांचे खरेच हे । वरवरचे थर वाळूचे...
कधीच आटत नाही जे । असे सरोवर वाळूचे...
वादळ होते की काही । झाले डोंगर वाळूचे...
तुझे 'इलाही' सहचारी । कण ओंजळभर वाळूचे

– इलाही जमादार

✲

१०. राहिली मीरा कुठे केव्हाच झाली 'शाम' ती
बासरी ओठी तिच्या लावून मीरा नाचली...
घुंगरू पायामधे बांधून मीरा नाचली
रोमरोमी सावळा गोंदून मीरा नाचली

– प्रल्हाद सोनेवाने

✲

११. प्राशिला विषाचा प्याला मी त्याला ईश्वर म्हटले
जो सूर्य सकाळी आला मी त्याला ईश्वर म्हटले...
अपुल्याच घरादाराची लावून ललाटी रक्षा
जो फासावरती गेला मी त्याला ईश्वर म्हटले...
गंगेत मारली नाही डुबकीही कधीच ज्याने
पण घामामध्ये न्हाला मी त्याला ईश्वर म्हटले

– प्रफुल्ल भुजाडे

✲

१२. पुन्हा घेतली मी भरारी वगैरे।
पुन्हा सज्ज झाले शिकारी वगैरे....
तिथे एकटा तोच होता दरिद्री।
रुबाबात होते पुजारी वगैरे...
किती जीवना रोज देतोस धमक्या।
दिली का यमाने सुपारी वगैरे...
अतीही सुगंधी नसावीत नाती।
पुढे येत जाते शिसारी वगैरे...

– वैभव जोशी

✲

१३. ऐकतो मी हाक कोर्या कागदाची
गझल कासावीस होते काळजाची...
नाव मी घेणार नाही ईश्वराचे
ओढ माझ्या अंतराला माणसाची...
काळही करतो प्रशंसा आदराने
माणसापेक्षा इमानी श्वापदाची...

– रमण रणदिवे

✲

१४. युद्धभूमीवर उडेल कबूतर, तेव्हा होईल गझल खरी
स्वर्गच आणू या धरतीवर तेव्हा होईल
गझल खरी...
कुराण, गीता, वेद, बायबल, मनुस्मृती,

गुरुग्रंथ असो
वर्ण-जात हा पडेल विस्मर तेव्हा होईल
गझल खरी....
नमस्कार, कुर्निसात करणे, संस्कृतीच ही रिवाजही
करील मुल्ला 'रामराम' जर, तेव्हा होईल
गझल खरी....
गूढ स्मिताचे उलगडले जर, तिच्या मनीचे
कधी कुणा
हसेल 'मोनालिसा' खरोखर, तेव्हा होईल
गझल खरी...

– घनःश्याम धेंडे

*

१५. साध्या गवताच्या पात्याला सुख म्हटले मी
सहज भेटणाऱ्या जगण्याला सुख म्हटले मी....
ते हिरवे हंगाम फुलांचे ज्याचे त्यांना
हाती उरलेल्या पाचोळ्याला सुख म्हटले मी...
अजून आहे जमीन माझ्या पायाखाली
ठेच लागुनी सावरण्याला सुख म्हटले मी

– बबन सराडकर

*

१६. ये गडे स्वप्नात माझ्या एकदा आई
घास दे तोंडात माझ्या एकदा आई....
आज मजला आठवेना तू कशी होती
उमट तू चित्रात माझ्या एकदा आई...
एकटी मी जेवते मी एकटी खाते
जेव तू पानात माझ्या एकदा आई...

– शोभा तेलंग

*

१७. श्रावणाने आटलेला तो झरा माझाच होता
वादळांनी बांधलेला आसरा माझाच होता....
कैक त्या पात्रात गेले, अन् सुखे परतून आले
मी बुडाले एकटी तो भोवरा माझाच होता...
तो जरी चुकवून गेला ताल माझ्या बंदिशीचा
मैफलीला जिंकणारा अंतरा माझाच होता...
तू म्हणे दारात त्याला ना दिला थारा कधीही
मी कसे दुःखास टाळू? सोयरा माझाच होता

– क्रांती साडेकर

*

१८. तू हासलीस की सगळ्या काट्यांची मखमल होते
तू भेटतेस तेव्हा या खडकांची हिरवळ होते...
येशूस सुळाची शिक्षा सुकराता जहरी प्याला
(सॉक्रेटिस)
खोट्यांच्या संसाराला सत्याची अडगळ होते...
समजूनच आला नाही दुःखाचा गनिमी कावा
जी झुळुक वाटली मोठी, ते मोठे वादळ होते

– दिलीप पांढरपट्टे

*

१९. फुलांनी दृष्ट काढावी असा तो चेहरा आहे
कळ्यांची नजर लागावी असा तो
चेहरा आहे...
निळ्या रात्री तिला बघण्या नभी तो चांदवा येतो
तयाने मान झुकवावी असा तो चेहरा आहे...
तिला स्वप्नात बघताना, उद्याचा सूर्य विसरावा
कधी ना रात्र संपावी असा तो चेहरा आहे...

– सदानंद डबीर

*

२०. दुःखाने कुठल्या समुद्र इतुका हेलावतो सारखा
अश्रू का इतके पितो, खवळतो,
खारावतो सारखा....
भेटावा चकवा तसे दिवसही येतात भेटावया
आहे त्याच स्थळी अजून दुनिया,
मी धावतो सारखा...
ये मागे परतून, खेळ अपुला मांडू नव्याने पुन्हा
माझ्यातील कुणी निरागस मला
बोलावितो सारखा....
वृत्त-शार्दूलविक्रीडित

– चित्तरंजन सुरेश भट

*

२१. ओली अशी पहाटे दिसतात का फुले ही?
आतील वेदनेने रडतात का फुले ही?....
वृक्षातळी फुलांचे हे ढीग कोण रचतो?
खुडल्याशिवाय कोणी गळतात फुले ही?...
बागेत ह्या फुलांच्या येतेस ज्या क्षणी तू
पाहून तुज खुशीने हसतात का फुले ही?...

– खावर

*

२२. कोरडे नक्षत्र गेले, कोरडी ठेवून माती
ठेवले आश्वासनांनी तेवढे दुष्काळ हाती....
ती जुनी झाली कहाणी अक्षरांच्या पावसाची
अक्षरांनी जे दिले ते शब्द अर्थालाच खाती...

दूर यंदाही पुन्हा तू का असा गेलास, मेघा?
हे उपाशी लोक वेडे का तुझे गुणगान गाती?...
– दीपक करंदीकर

✻

२३. शेतीप्रधान देशा दे एवढेच उत्तर
केव्हा भिजेल अमुची डाळीत पूर्ण भाकर...
गावामधे सकाळी मी ऐकली दवंडी
अश्रू पिणे शिका हो, पाणी पुरेल कुठवर?...
– सतीश दराडे

✻

२४. येथे जरी मनाची भाषा असे मराठी
शिवबा तुझा इलाका आता नसे मराठी....
या, नाथ अन् तुकोबा नाम्यास हे पुसूया
सारे समर्थ असता का ही फसे मराठी...
देशावरील सारे पुसतात का अम्हाला
ना मुंबईत उरले का फारसे मराठी ?....
जननी, घरात अपुल्या परकीय जाहली तू
मुलखास या म्हणू मी आता कसे मराठी...
– डॉ. राम पंडित

✻

२५. अस्फुट अधरांवरती तुझिया गुपित गुलाबी थरथरते
प्रियंवदे मज सांग एकदा काय तुझ्या मनि हुरहुरते...
धुंद हसशि जणु मोनालिसा, रम्य अमर चित्रांमधली
बाळे, तुझिया कानी अल्लड गीत
कोणते गुणगुणते?...
– गंगाधर महांबरे

✻

२६. खरेच का हे जीवन माझे अधांतरी आहे
बहुधा सारे जगणे आता ग्रहांपरी आहे...
दुःख दुःख जुळवून सांधले आयुष्याला
सुख कुठल्याशा अडगळीतल्या चिऱ्यावरी आहे...
भूगर्भातिल लाव्हारस माझ्यात साठलेला
भूगर्भाच्या उद्रेकाला वाव तरी आहे...
– जनार्दन केशव म्हात्रे

✻

२७. या अंगणात माझ्या चाफा गुलाब येतो
मी पेरले कधी जे त्याचाच जाब येतो....
येतात शब्द काही चुरगाळल्याप्रमाणे
घेताच नाव माझे त्यांना रुबाब येतो...
कविते, तुझ्यामुळे मी या पोचलो पदाला
पुसण्यास बूट माझे आता नबाब येतो...
येता समोर मृत्यू इतकेच मी म्हणालो–
'आहे तशी किती ही किरकोळ बाब', येतो...
– प्रदीप निफाडकर

✻

२८. आरसा होता बिलंदर आज तोही भाळला
मुखवट्याआडून माझा चेहरा सांभाळला...
घेतला ज्योती 'वसा' तो टाकला नाही कधी
मी व्यथेच्या या सुईने रम्य कशिदा काढला...
– ज्योती बालिगा-राव

✻

२९. जन्म मला तू द्यावा आंदण पुढल्या जन्मी
या जन्माची नको आठवण पुढल्या जन्मी...
तुझ्याविना या सहा ऋतूंचे काय करू मी
ऋतू सातवा होऊ आपण पुढल्या जन्मी...
राग अनावर होता होता आवरेन मी
पण प्रेमावर नको नियंत्रण पुढल्या जन्मी...
– ममता सिंधुताई सकपाळ

✻

३०. सोन्यास काय चाटू, खाऊ कसे हिऱ्याला
श्रीमंत देव तुमचे लखलाभ हो तुम्हाला...
पाण्यात पीठ बाळा, मी घातले सुखाने
तू गोड कर मुखाने समजून दूध-काला...
माझे मला न भारी लेंढार लेकरांचे
का रुक्मिणी म्हणाली त्या बाप विठ्ठलाला...
– श्रीकृष्ण राऊत

✻

शब्दमर्यादा पाळणे हे लेखकाकडून अपेक्षित आहे, म्हणून एवढ्याच उदाहरणांवर थांबावे लागत आहे, नाहीतर... तुम्हाला काय वाटले, एवढेच उत्तम शेर आहेत? आजकाल लिहित्या गझलकारांची संख्या पाचशेच्या वर असेल! वरील शेर चाचून तुम्हाला स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी गझलेचा आवाका लक्षात आला असेल. यात अंतराळापासून भूगर्भापर्यंत, वाळूपासून हिऱ्यापर्यंत, मोनालिसापासून रक्मिणीपर्यंत...सर्व प्रकारची प्रतीके आली आहेत.

गझलकारांनी ज्यावर भाष्य केले आहे, अशा काही जोड्या माझ्या लक्षात आल्या; त्या वेगवेगळ्या शेरातील आहेत, पण त्यांनी गझलेतील सौंदर्य वाढवले आहे. त्या जोड्या यम-विठ्ठल; शेत-नभ; माणूस-श्वापद; देव-पुजारी;

मीरा-सॉक्रेटिस; मुल्ला-बुद्ध; गीता-बायबल; फूल-पाचोळा; आई-देशमाता; वादळ-झुळूक...अशी अनेक गुणांनी नटलेली गझल तुम्हाला दिसेल. अनेकांचे शेर मी घेऊ शकले नाही; याबद्दल क्षमस्व!

सुरेश भट यांच्या गझलेतील 'ते' अलीकडे तितक्या स्पष्टपणे दिसत नाहीत; त्यांच्यावरचा राग असला तरी त्याचा आविष्कार वेगळा असतो. आजकाल गझलच्या विषयात कमालीचे वैविध्य आले आहे. वाङ्मयीन गझलांचे प्रमाण वाढले आहे. व्हॉट्सॲपवर गझलचे बरेच ग्रूप असतात. ते लोक आधी वृत्त देतात,व त्यात गझल लिहायला सांगतात. वास्तविक गझल गुणगुणून वा ठेक्यावर लयीत लिहायची असते; ती आपोआप विशिष्ट वृत्तात येते.

शेवटचा मुद्दा. आदरणीय भाऊसाहेब पाटणकर हे मराठी-शायरी लिहीत असत. त्यांचे कार्यक्रमही खूप होत असत. मात्र त्या गझला नव्हत्या. पण तो काही कमीपणा नव्हे. त्यांचे लिखाण बोली-ठेक्यावर जमणारे, लयीत असणारे व सौंदर्य असणारे, जिंकून घेणारे काव्य होते. अशा प्रतिभावंत शायराला मनापासून सलाम! त्यांच्या शायरीने शेवट करूया.

भास्करा, येते दया मजला तुझी आधीमधी
आहेस का रे पाहिली तू रात्र प्रणयाची कधी?
(सूर्य उत्तर देतो,)
आम्हासही या शायरीची कीव येऊ लागते
याच्या म्हणे, प्रणयास याला रात्र यावी लागते!
ना म्हणू की इष्क त्याला, आहे जराही समजला
इष्कातही दिवसास की जो रात्र नाही समजला...

**– संगीता जोशी**

भ्रमणध्वनी – ९६६५०९५६५३

## प्रतिक्रिया

मुंबई मराठी साहित्य संघाच्या वतीने प्रकाशित झालेला 'साहित्य: बोलीभाषा विशेषांक' हा २०२१ चा दिवाळी अंक विशेष वाचनीय असा आहे. बोली भाषांच्या संशोधनाच्या दृष्टीने या अंकाचे महत्त्व विशेष असे आहे. या अंकाची रचना व मांडणी समाधानकारक झालेली आहे.


बोलीभाषा या त्या त्या प्रदेशाची अस्मिता असतात. या पार्श्वभूमीवर वेगाने नष्ट होणाऱ्या बोलीभाषा टिकविण्याचे नव्याने प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यासाठी बोलीभाषांचा परिचय भावी पिढीला होणे अपेक्षित आहे. त्याचाच एक भाग म्हणून बोलीभाषांचा समावेश अभ्यासक्रमात केला जात आहे. इयत्ता दहावीच्या अभ्यासक्रमामध्ये काही बोलींचा समावेश केला गेला आहे. आम्ही शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये काही बोलींचा समावेश केलेला आहे. बोलीभाषांचे महत्त्व ओळखून या अंकाची रचना झाल्याचे सहज लक्षात येते. त्यामुळेच हा अंक विशेष कौतुकास्पद असा आहे.

'साहित्य : बोलीभाषा विशेषांक'मध्ये मालवणी, आगरी, सामदेवी, आडवळी, कादोडी, अहिराणी, मराठवाडी, तावडी, झाडी, चंदगडी, कोरकू, वऱ्हाडी, ठाकरी, गोंडी, कातकरी, पावरी, कोल्हापुरी, सोलापुरी इत्यादी त्या त्या भाषेचे वैशिष्ट्य सांगणारे लेख समाविष्ट केलेले आहेत. याबरोबरच भाषेचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गणेश देवी यांचा भाषेवर सांगोपांग भाष्य करणारा उल्लेखनीय असा लेख देखील आहे. त्यासोबतच बोलीभाषेतील कवितांचाही समावेश केला गेलेला आहे. हा अंक कायमस्वरूपी आपल्या संग्रही ठेवावा असा आहे. या ग्रंथाचे महत्त्व भाषा अभ्यासकांसाठी संदर्भ ग्रंथ म्हणून देखील आहे.

मी अमरावती, पुणे, सोलापूर आणि रायगड मधील काही स्नेही मित्रांना हा अंक आवर्जून विकत घ्यायला लावला. तर ऑगस्ट २०२२ मध्ये मी स्वतः या अंकाच्या पंधरा प्रती विकत घेतल्या आणि माझ्या सहकारी प्राध्यापकांना व कोल्हापुरातील मराठीच्या प्राध्यापकांना संग्रही ठेवण्यासाठी दिल्या आहेत. मी संपादकांना हा विशेषांक पुस्तक रूपाने प्रकाशित करावा अशी विनंती केली होती. आजही माझी विनंती हा अंक पुस्तक रूपात प्रकाशित करावा अशीच आहे. त्याने या अंकाचे दस्तऐवजीकरण होणार आहे. जे भाषेच्या अभ्यासासाठी अत्यंत उल्लेखनीय कार्य ठरेल.

**प्रा. डॉ. गोपाळ ओणामा गावडे,** कोल्हापूर

भ्रमणध्वनी – ९४२११००५६२



स्वातंत्र्योत्तर
मराठी
साहित्याची
वाटचाल

•

कविता

•

# स्वातंत्र्योत्तर मराठी कविता (१९४७–२०२१)

**संपादन – प्रा. स्मिता पाटील**




**गेल्या ७५ वर्षांच्या दीर्घ काळात देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक स्थितीत अनेक बदल घडून आले. या बदलत्या वास्तवाला मराठी कविता कशी सामोरी गेली? प्रतिसाद देताना तिच्यात बदल घडले असतील तर ते कोणते व कसे आहेत? काही कवितांच्या माध्यमातून या प्रश्नाची उत्तरे शोधण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. ही समीक्षा नाही. निरीक्षण आहे. या शोधाला माझ्या आवडीचा–निवडीचा, आकलनक्षमतेचा स्पर्श आहे. या सीमित अवकाशात मराठी कविताप्रवाहाच्या रचनाविशेषांच्या सर्व प्रकारांना तसेच अनेक कवी–कवयित्रींच्या महत्त्वाच्या कवितांना स्पर्श करणे शक्य होणार नाही, याची जाणीव आहे.**

**साहित्यात** काळाचे प्रतिबिंब उमटते, हे खरे असेल तर कवितेतही ते दिसणारच. कवी ज्या काळात जगत असतो त्या काळातील घटिते, बदलते जग, तत्कालीन श्रद्धा–समजुती, नवजाणिवा यांचा संघर्ष इत्यादी गोष्टींचा प्रभाव त्याच्या लेखनावर घडून येतो. ज्या काळात, ज्या समाजात तो जगतो त्या समाजवास्तवाचा काहीएक अंश तो आपल्या मनात वाहत असतो. तो त्याच्या आधीच्या काळाशी जोडलेला असतो आणि नंतरच्या काळाचा अखंड प्रवाहही तो अनुभवतो. त्यातून त्याची कविता आकाराला येते.

'स्वातंत्र्योत्तर मराठी कविता' (१९४७ – २०२१) या ७५ वर्षांच्या कालखंडात मराठी कवितेच्या अवकाशात जी विविध वळणे दिसतात ती त्या काळातील जगण्याच्या स्थितीला कवींनी दिलेल्या साद–प्रतिसादातून निर्माण झालेली आहेत. गेल्या ७५ वर्षांच्या दीर्घ काळात देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक स्थितीत अनेक बदल घडून आले. या बदलत्या वास्तवाला मराठी कविता कशी सामोरी गेली? प्रतिसाद देताना तिच्यात बदल घडले असतील तर ते कोणते व कसे आहेत? काही कवितांच्या माध्यमातून या प्रश्नाची उत्तरे शोधण्याचा हा

अल्पसा प्रयत्न आहे. ही समीक्षा नाही. निरीक्षण आहे. या शोधाला माझ्या आवडीचा-निवडीचा, आकलनक्षमतेचा स्पर्श आहे. या सीमित अवकाशात मराठी कविताप्रवाहाच्या रचनाविशेषांच्या सर्व प्रकारांना तसेच अनेक कवी-कवयित्रींच्या महत्त्वाच्या कवितांना स्पर्श करणे शक्य होणार नाही, याची जाणीव आहे.

सोयीसाठी या कालखंडाचे १९४७ ते १९६०, १९६१ ते १९९०, १९९१ ते २०१४ आणि २०१५ ते २०२१ असे चार टप्पे किंवा विभाग केले आहेत. ते करत असताना बहुसंख्य कवी कालखंडाच्या विशिष्ट टप्प्यात सीमित करणे शक्य नाही, याची जाणीव आहे. म्हणून एखाद्या कवीच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंतच्या एकूण कवितांमधून कुठल्यातरी एका टप्प्यातल्या कवितेची निवड करताना ती कविता ज्या काळाचे ती प्रतिनिधित्व करते त्या टप्प्यावर तिचा विचार केलेला आहे.

पहिला टप्पा - आधुनिक मराठी कविता : १९४७-१९६०

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतीय समाजजीवनावर प्रबोधनाचा प्रभाव मोठा होता. देशप्रेमाने भारलेले भारतीय मन राष्ट्राच्या उन्नतीची, प्रगतीची कवने आळवीत होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांच्या स्वीकारातून माणसाला साफल्यपूर्ण जीवन जगता येईल अशी निष्ठा होती. बा.भ. बोरकर, कुसुमाग्रज, बा.सी. मर्ढेकर, अनिल, पु.शि. रेगे असे अनेक कवी जे स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतरही कविता लिहीत होते, त्यांच्या स्वातंत्र्यपूर्वकाळातील कवितेने झिरपत जाऊन स्वातंत्र्योत्तर काळात जगणाऱ्या मराठी माणसांची मने घडवली आहेत. मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर वगैरे तरुण कवी स्वातंत्र्यालगतच्या काळात कविता घेऊन आले.

'जिप्सी'द्वारे मंगेश पाडगावकरांनी या काळात आगमन केले. स्वातंत्र्यचळवळीचा अंगार सहन करत सैनिकांनी बलिदान देऊन मिळवलेले स्वातंत्र्य या पिढीने प्रथम पाहिले. या पिढीने पाहिलेल्या स्वातंत्र्याच्या सुंदर स्वप्नांचे चित्र पाडगावकरांच्या 'आतां उजाडेल!' या कवितेत जाणवते. 'आता उजाडेल' या कवितेत मला वाच्यार्थापलीकडे एक वेगळा अर्थ जाणवतो. केवळ एक निसर्गकविता म्हणून तिच्याकडे पाहू नये, असे वाटते. ज्या काळात ती लिहली गेली त्या काळातील लोकांच्या मनात निर्माण झालेली आनंदभावना कवीच्याही मनात फुललेली आहे. पाडगावकर हे सौंदर्यलक्षी कवी असले तरी त्यांच्या कवितेतील निसर्ग केवळ सौंदर्यवर्णनाच्या मर्यादेत राहत नाही. त्यांच्या निसर्गप्रतिमा आशय प्रतिपादन करण्यासाठी येतात. या कवितेत पारतंत्र्याच्या दुःखभऱ्या खिन्न काळोखाच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याची ज्योतिर्मय पहाट उगवत असताना निर्माण झालेली स्वातंत्र्याच्या स्वागताची, गौरवाची आनंदी भावना निसर्गप्रतिमांमधून व्यक्त झालेली आहे.

स्वातंत्र्य मिळाले तो काळ स्वातंत्र्यचळवळीच्या धामाधुमीचा होता. स्वातंत्र्यानंतरच्या रम्य भविष्याची स्वप्नाळू चित्रे रंगवण्यात देशवासीय रंगून जाण्याचा हा काळ होता. स्वातंत्र्य मिळाले तेव्हाची आर्थिक स्थिती पाहता प्रत्यक्षात खडतर परिस्थितीचा सामना करावा लागत होता. देशोन्नतीचे सुकाणू सरकारच्या हाती सोपवून जनताही शिथिल झाली होती. समाजातले चैतन्य हळूहळू मावळत असल्याच्या जाणिवेने कवी अनिलांचे मन खंती झाले. मुक्तछंद मराठीत रुजवणारे, दशपदीसारख्या नव्या रचनेचे प्रणेते कवी अनिल यांनी या काळात भावकवितेबरोबरीने वैचारिक कविता लिहिली. पूर्वीची आदर्शवत मूल्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर अर्थविहीन होताना पाहणे, साऱ्या आघाड्यांवर सामसूम झालेले दिसणे कवीला दुःखकारक होते. त्याचा खेद 'सारेच दीप कसे मंदावले आता' या कवितेत उमटला आहे.

कवितेच्या क्षेत्रात 'नवकाव्या'ची पहाट घेऊन अवतरलेले बा.सी. मर्ढेकर हे बुद्धिमान आणि भावनाशील व्यक्तिमत्त्व होते. प्रेमाची, सौंदर्याची आस असलेले हे रोमँटिसिझमशी जवळीक सांगणारे व्यक्तिमत्त्व होते. एकोणीसशे पन्नासच्या दशकात झालेल्या दोन महायुद्धांनी जगात जी उलथापालथ घडवून आणली तिचे ते निकटचे साक्षीदार. बॉम्बस्फोटांनी केलेल्या भीषण नरसंहाराने त्यांच्या मनाला मानवी जीवनाच्या क्षणभंगुरतेची जाणीव झाली . 'आमुचें मरण,... आम्हीच जळण' ही भावना किंवा 'पृथ्वीची तिरडी' होणे ही कल्पना कवीच्या मनाला हादरवून सोडणाऱ्या तीव्र संवेदनांची निदर्शक आहे. अशा क्षणी कविमनात उगवलेले प्रश्न घेऊन 'प्रेमाचे लव्हाळें, सौंदर्य नव्हाळें' ही कविता जन्माला आली. बॉम्बस्फोटांनी केलेल्या संहाराचे नेमके दर्शन घडवणारी तसेच कवीच्या मनात निर्माण झालेल्या क्षोभाचे यथातथ्य वर्णन करणारी शब्दयोजना हे या कवितेचे सामर्थ्य आहे. मर्ढेकरांच्या कवितेने मराठी परिघाबाहेरच्या जगाला स्पर्श केला. तिथे हिंसाचाराने क्रौर्याने थैमान घातले होते. तिथल्या औद्योगिक क्रांतीने यांत्रिकीकरण घडवून आणले होते. आपल्या देशात स्वातंत्र्यासाठी आंदोलने चालली होती. स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद देणाऱ्या या काळाला फाळणीची व तदनुषंगिक

भीषण अमानुष कत्तली व अत्याचाराची दुखरी बाजूही आहे. या धुमश्चक्रीचे शब्दाविष्करण म्हणजे त्यांची कविता. ही कविता जन्माला येताना तिने भाषेत बदल केले. भाषेचे वेगवेगळे प्रयोग केले. म्हणी, वाक्प्रचार यांना आपल्या इच्छेनुसार वाकवले. ते उपहास, उपरोध यांचा वापर करून तिरकस भाषेत आपला आशय व्यक्त करतात.

इंग्रजी साहित्याच्या अभ्यासातून मराठीत रुजत असलेली आधुनिक कविता या काळाच्या दरम्यान बहरात येत होती. सामाजिक जाणीव व्यक्त करणारे शरच्चंद्र मुक्तिबोध, विंदा करंदीकर, वसंत बापट, भा.रा. तांबे यांचे गीतीकाव्य पुढे नेणारे बा.भ. बोरकर, गदिमा यांसारख्या आधुनिक कवींची कविता स्वातंत्र्याच्या लगतच्या काळात गाजत होती. त्यांच्या व्यक्तित्वलक्षी, समूहलक्षी आणि सौंदर्यलक्षी कवितेने हा काळ गाजवला.

वसंत बापट, विंदा करंदीकर आणि मंगेश पाडगावकर या त्रिकूटाची कविता याच कालखंडात उदयाला आली. तिघांनीही पुढे सातत्याने कविता लिहिली. या तिघांनी मंचावर एकत्रित कवितावाचनाचे प्रयोग केले. बापटांनी 'राष्ट्र सेवा दला'च्या माध्यमातून देश व समाज घडविण्यासाठी योगदान दिले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बापट हिरिरीने सहभागी झाले. तेव्हाच्या वातावरणातून बापटांची 'केवळ माझा सह्यकडा' ही पोवाडासदृश रचना जन्माला आली. महाराष्ट्रभूमीची थोरवी, इथला इतिहास, इथली दैवते, इथली लोकोत्तर माणसे यांच्या विषयीच्या अभिमानातून नेटके गुणगान करणारा हा पोवाडा कवींची खास ओळख करून देतो. 'धिक् तुमचे स्वर्गी हाती / इथली चुंबिन मी माती' या शब्दात व्यक्त होणारी महाराष्ट्रभूमीवरील भक्ती, मराठ्यांच्या पराक्रमाचा अभिमान बाळगणारी वृत्ती समस्त मराठी माणसाची ओळख देते.

मराठी भूमीला तिसरा ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणाऱ्या विंदांची या काळातली 'तेंच तें' ही कविता. मुक्तसुनीते, तालचित्रे, आततायी अभंग, गझल, सुक्ते, विरूपिका अशा अनेक प्रकारात विंदांनी कविता लिहिली. 'तेंच तें' ही मुक्तछंदातील रचना. विंदांच्या भाषिक रचनेत वक्तृत्वशैलीचा जोश आहे. आवेग आणि आवेशपूर्ण रचनेमुळे कवितेच्या भाषेत चैतन्य निर्माण झाले आहे. तत्कालीन सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संदर्भांनी विंदांची कविता अर्थपूर्ण झाली आहे. 'तेंच तें' या कवितेत विंदा माणसाच्या दैनंदिन जगण्यातील तेच तेपणाच्या कंटाळवाण्या जीवनसरणीचे वर्णन करतात. सामान्य माणूस त्याला सुरक्षित वाटेल, सोयीचा ठरेल असा कोश तयार करून जगत असतो. त्याचे दैनंदिन जगणे त्या कोशाच्या रिंगणात फिरत राहते. विंदांची प्रतिभा गद्यसदृश भाषेच्या वापरातून कवितेची लय अचूक पकडतात. इथे रोजच्या बोलीतील 'तोच चहा, तेच रंजन / तीच गाणी, तेच तराणे...' शब्दांचा पुनरूक्तीसारखा वापर करून लय साधतात. ही कविता मध्यमवर्गीय माणसाच्या मनोवृत्तीची मजेदार खिल्ली उडवते.

जीवनोत्सुकता आणि प्रेमभाव हा ज्यांच्या लेखनाचा प्राण आहे, त्या पु.शि. रेगे यांची 'पुष्कळा' ही ऐंद्रीय संवेदना व्यक्त करणारी कविता आहे. स्त्रीच्या शरीराबद्दल कवीला अप्रूप आहे तसेच आकर्षणही आहे. रेगे यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'पुष्कळा' या कवितेत स्त्रीदेहाच्या सौंदर्याने भारलेल्या कविमनाने तिच्या देहाचे रंगतदार वर्णन केले आहे. त्यात सौंदर्य तर आहेच, ते शृंगारिकही आहे. सूचकता आणि काव्यमयतेमुळे कवितेच्या सौंदर्यात भर पडली आहे. 'पुष्कळ' ह्या शब्दाची पुनरावृत्ती होत असताना प्रत्येक वेळी तो शब्द भिन्न अर्थ सूचित करतो. उत्कट अनुभव रेगे संक्षेपाने व्यक्त करतात. स्त्रीदेहाचे या प्रकारे वर्णन करणारे रेगे हे या काळातील पहिले रोमँटिक कवी आहेत. आंतरिक मनोविश्वाला प्रमाण मानून रेगे यांनी मराठी कवितेत स्वतःची नवीन वाट निर्माण करून स्वतःचे स्वयंभू असे काव्यविश्व तयार केले.

पतिनिधनामुळे निर्माण झालेल्या दुःखानुभवाची उत्कट कविता लिहिणाऱ्या इंदिरा यांच्या 'मेंदी' या कवितासंग्रहाने या काळात अनेकांचे लक्ष वेधून घेतले. इंदिरबाईंची कविता त्यांच्या अंतर्मनाचे प्रतिबिंब आहे. 'मृण्मयी' ही त्यांची गाजलेली कविता. ऋतुचक्राच्या निसर्गविभ्रमांशी तदाकार पावलेल्या कवयित्रीची भाववृत्ती कवितेच्या शब्दांमधून विलोभनीय सौंदर्य निर्माण करते. कवयित्रीचे संवेदनशील मन वेगवेगळ्या ऋतूंमधील निसर्गरूपांना कोवळीकतेने प्रतिसाद देते आणि त्यांच्याशी झालेल्या एकरूपतेचा सुंदर अनुभव देते. या अनोख्या अनुभवाचे 'मृण्मयी' हे शब्दरूप वाचकांच्या मनात आनंदाचे तरंग निर्माण करते.

शेतकऱ्याचे कष्टसाध्य जीवन जगणाऱ्या बहिणाबाई चौधरी निरक्षर असून ओव्यांच्या रूपाने त्यांनी माणसाला मूल्यवर्धित जगण्याचे भान दिले. जात्यावर दळताना ओव्या गाण्याची परंपरा महाराष्ट्रात पूर्वीपासून होती. बहिणाबाईंच्या ओव्या अशाच जन्माला आल्या. त्यांना ग्रामीण स्त्रियांच्या बोलीचा सहजस्पर्श आहे. बहिणाबाईंच्या खानदेशी

बोलीतील या ओव्या प्रथम मौखिक रूपात आल्या आणि बहिणाच्या मुलाने सोपानदेवाने त्या लिहून काढल्या. निरक्षर पण मुळात हुशार व व्यवहारकुशल असलेली बहिणाई मतलबी माणसाच्या जगण्यावर व वर्तनावर मार्मिक भाष्य करते. कवयित्रीला वाटते स्वार्थासाठी लाचार होणाऱ्या माणसापेक्षा कुत्रा, गाय-म्हैस ही जनावरे खूप बरी. बहिणाबाईंची कविता चिरंतन सत्याचे आणि जीवनमूल्यांचे चैतन्यमयी दर्शन घडवते. बहिणाबाईंची गाणी या काळातील मराठी कवितेचे सौंदर्यलेणे आहे.

देशाला मिळालेले स्वातंत्र्य, त्यानंतरची संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, त्यातील हुतात्म्यांचे बलिदान, मुंबईसह महाराष्ट्र राज्याची स्थापना, देशाचे संविधान व प्रजासत्ताक राष्ट्राची घोषणा, तदनुषंगिक सामाजिक बदल अशा महत्त्वाच्या घटनांनी महाराष्ट्रात हा काळ गाजत होता. वसंत बापट व इतर समकालीन शाहिरांची (लीलाधर हेगडे, आत्माराम पाटील), मार्क्सवादी विचारसरणीला घेऊन आलेली शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविताही या काळाचे प्रतिनिधित्व करते.

या काळात दिसणारी आधुनिक कविता एकोणिसाव्या शतकातील मराठी कवितेपेक्षा वेगळी होती. मराठी कवितेच्या भाषेत तिने वेगळे वळण निर्माण केले. बाह्य वास्तवाबरोबरच मनात जाणवणाऱ्या आंतरवास्तवाचा स्पर्श असलेली कविता मराठीत प्रथमच दिसू लागली. शहरी जीवनापेक्षा ग्रामीण जीवनाची ओढ या कवितेत दिसते. कवितेच्या विषयात बदल दिसू लागले. भक्तीच्या अंगाने कविता लिहिण्यापेक्षा मानवी जगण्याला स्पर्श करणारी कविता लिहायला सुरुवात केली. प्रेमाची, निसर्गाची, मानवी भावभावनांची चित्रे रेखाटून केशवसुतांनी मराठी कवितेत आणलेला स्वच्छंदतावाद (रोमँटिसिझम) या कवींनी स्वातंत्र्यानंतर फुलवत नेला. आधीच्या कवितेतील संस्कृतप्रचुरता, पंडिती परंपरा, मोठमोठ्या सामासिक शब्दांचा वापर यांना या नव्या कवितेने नाकारले. रोजच्या बोलीतील साध्यासोप्या भाषेत मानवी कल्पना, विचार व भावभावनांची आंदोलने टिपणारी ही या काळातील 'आधुनिक कविता' म्हणून ओळखली गेली. पुढे मराठी कवितेने वेगळी वळणे घेतली तरी आधुनिक कवितेचा प्रवाह नंतरच्या काळात अखंड वाहत राहिला व तिने परंपरा निर्माण केली. म्हणून आधुनिक कवितेच्या परंपरेला 'मराठीची केंद्रीय परंपरा' मानले गेले. नवकवितेच्या रूपाने मर्ढेकरांनी जगातील हिंसेचे, क्रौर्याचे दर्शन घडवत भय, विफलता, भ्रमनिरास, आत्मिक एकाकीपणाची कविता लिहिली. बहिणाबाईंच्या कवितेने ओवी आणि लोकगीतांच्या रचनातंत्राला या काळात प्रतिष्ठा मिळवून दिली.

दुसरा टप्पा - साठोत्तरी कविता : १९६१-१९९०

स्वातंत्र्य चळवळीच्या धगधगत्या काळात कुसुमाग्रजांच्या 'विशाखा'ने निर्माण केलेले स्थान स्वातंत्र्यानंतरही जनमानसात स्थिर होते. स्वातंत्र्यपूर्वकाळात लढाऊ वृत्तीची प्रेरणा देणारी क्रांतीचा जयजयकार करणारी कविता लिहिणारा हा कवी स्वातंत्र्यानंतर झालेल्या बदलांशी एकरूप झाला. नव्या राजकीय व्यवस्थेत अनुभवाला येणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक जाणिवांची कविता लिहू लागला. त्याची साक्ष देणारी 'छंदोमयी'तली 'म्हातारा म्हणतोय' ही कविता! स्वातंत्र्यानंतर देशाने लोकशाहीचा स्वीकार केला. सर्वसामान्य लोकांचे दुःख, दैन्य, लोकांच्या समस्या दूर करण्याला वाहून घेणाऱ्या लोकशाही राजवटीने जनतेच्या कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजनांची अंमलबजावणी होत असताना गरीब आपद्ग्रस्तांना त्याची किंमत मोजावी लागते, ही मोठी दुःखाची बाब. कुसुमाग्रजांची प्रतिभा याचे उपरोधिक पण वस्तुनिष्ठ चित्र 'म्हातारा म्हणतोय'मध्ये रेखाटते. कुसुमाग्रजांच्या कवितेने सामाजिक व राजकीय भान अखेरपर्यंत कायम राखले. १९८८ मध्ये कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. मराठी मातीला मिळालेला हा दुसरा ज्ञानपीठ पुरस्कार! पहिला ज्ञानपीठ पुरस्कार वि. स. खांडेकर यांना मिळाला.

'म्हातारा म्हणतोय' ही कविता ज्या कालखंडाचे प्रतिनिधित्व करते तो कालखंड 'साठोत्तरी मराठी कवितेचा'. १९६० नंतरच्या कालखंडात वेगळे वैशिष्ट दर्शवणारी कविता मराठीत दिसू लागली. १९६० मध्ये दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचा पहिला संग्रह आला. १९६२ मध्ये नारायण सुर्वे यांचा 'ऐसा गा मी ब्रह्म'ने वेगळी दिशा दाखवली. पुढे अरुण कोलटकर, मनोहर ओक, विलास सारंग, नामदेव ढसाळ, आरती प्रभू, ना.धों. महानोर, ग्रेस यांसारख्या कवींनी त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण निर्मितीमधून १९६० नंतरच्या कवितेत वेगळी वाट निर्माण केली.

'भुंडं टेकाड' ही दिलीप चित्रे यांची कविता. स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरणाला चालना मिळाली. कारखानदारीमुळे रोजगाराच्या आशेने शहराकडे ओढा वाढण्याचा हा काळ. शहराकडे येणाऱ्या लोकांना सामावून घेताना शहरातील पर्यावरणावर आघात होऊ लागला. झाडे

तोडून तिथे इमारती उभ्या राहिल्या. शहरे फुगू लागली. त्याबरोबर बकालपणाही वाढू लागला. पर्यावरणऱ्हासाचे दुःख या कवितेत पोटतिडकीने व्यक्त झाले आहे. अमाप वृक्षतोडीमुळे जैविक ऱ्हास होतो आणि सांस्कृतिक जीवनावरही आघात होतो. या सर्व बदलांवर ही कविता दुखऱ्या भाषेत भाष्य करते. दिलीप चित्रे हे साठोत्तरी कवितेतील महत्त्वाचे कवी. संपूर्णतया नवीन अशी अर्थपूर्ण प्रतिमासृष्टी आणि भावनांची उत्कटता ही त्यांच्या रचनेची बलवत्तर स्थाने! चित्रे यांच्या प्रतिभेने मराठी कवितेच्या प्रचलित शब्दरूपांची तोडमोड करून नव्या रूपात विलक्षण ताकदीची कविता लिहिली. ही कविता मुक्तछंदाहून अधिक मुक्त स्वरूप धारण करणारी होती.

कारखाने व गिरण्यांमध्ये रोजगार करणारा कामगारवर्ग ही शहराची ओळख असण्याचा हा काळ. नारायण सुर्वे हे कामगारवर्गातून आलेले कवी. 'ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती' अशा वर्गाचा हा प्रतिनिधी. अल्पशिक्षित असूनही नारायण सुर्वे यांनी मार्क्सवाद समजून घेत, त्या विचारांचा पाठपुरावा करत कामगारांच्या समस्या कवितेमधून जोरकस भाषेत मांडल्या. कामगार वस्तीला व कामगारांच्या समस्यांना कामगारांच्या भाषेत बोलके करणाऱ्या या कवीने मराठी कवितेची आजवरची भाषाच बदलून टाकली. गद्यप्राय असूनही तिला कवितेची लय सापडलेली आहे. 'ले, पकड रस्सी- हां- खेच, डरता है? क्या बम्मन का बेटा है रे तू साले...' अशी हिंदीमिश्रित बम्बैया बोलीत ती बोलते. अरुण कोलटकर, १९७२ ला आलेल्या नामदेव ढसाळांनीही या प्रकारच्या बोलीचा प्रभावी वापर केला आहे.

'आत्ता' नामदेव ढसाळ यांची 'गोलपिठा' या संग्रहातली ही कविता सत्तरच्या दशकातली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दीक्षा घेतलेल्या ढसाळांनी अन्यायग्रस्त शोषितवर्गाची कैफियत मांडली. मध्यमवर्गीय विश्वाहून भिन्न असलेल्या विश्वाचे दर्शन त्यांच्या कवितेने घडवले. या कवितेला 'दलित कविता' म्हटले गेले. ती समाजाच्या सर्वात खालच्या स्तरात जगणाऱ्या अभावग्रस्त दुःखी व शोषित वर्गाचे प्रतिनिधित्व करते. ढसाळांची कविता महानगरीय संवेदनांची बोली बोलते. आपल्या अनुभवविश्वाला थेट भिडणारी भाषा त्यांनी जाणीवपूर्वक वापरली. समकालीन समाजरचनेशी द्वंद्व पुकारत ढसाळांनी प्रचलित मराठीची तोडमोड करत नवी प्रतिमासृष्टी निर्माण केली. 'आत्ता' या कवितेतून त्यांनी समाजाच्या पुनर्रचनेसाठी संघर्षाचा पवित्रा घेऊन समताधिष्ठित समाजाचा पुरस्कार केला. दलित कवितेने या काळात विद्रोहाचे जळजळीत निखारे शब्दातून पेटवले. मराठीखेरीज इतर भारतीय भाषा तसेच परकीय भाषांमधून ढसाळांच्या कविता रूपांतरित झाल्या. समाजपरिवर्तनाची चळवळ उभारणाऱ्या 'दलित पँथर' संघटनेला या काळातील कवींनी मोठे योगदान दिले. दलित कवितेच्या कार्याची सर्व जगाने दखल घेतली.

रानाच्या 'हिरव्या बोलीचा शब्द' होण्याची प्रतिज्ञा घेणाऱ्या ना.धों. महानोरांची 'रानातली कविता' याच काळात आली. महानोर शेतकरीवर्गाचे प्रतिनिधी. या काळात त्यांनी संसदेत शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व केले. आत्तापर्यंतच्या निसर्गकवितांहून भिन्न वळणाची कविता महानोरांनी लिहिली. महानोरांच्या निसर्गानुभवात निसर्ग साक्षीभावाने वावरत असतो. त्यांचा निसर्ग माणसांसारखा तर माणसे झाडा-पाखरांसारखी वागतात. इतकी निसर्गाशी कवीची एकरूपता आहे. 'जाळीवरती वाळत लुगडे, उभा हसे जरतारी काठ' ही कविता प्राकृतिक प्रतिमांच्या माध्यमातून रतीभाव व्यक्त करते. प्रत्यक्ष वर्णनात ती गुंतत नाही. त्याऐवजी उत्कटत्वाने घेतलेल्या अनुभवाचा प्रतिमांमधून आविष्कार करते. या प्रतिमा ऐंद्रीय असतात. त्या आदिम प्रेरणांशी नाते सांगतात. महानोर अनुभव शब्दबद्ध करतात तेव्हा लोकगीतांशी जवळीक सांगणारी लय त्या रचनेत उतरते. महानोरांच्या प्रतिभेचे हे सामर्थ्य अनोखे आहे. साठोत्तरी कवितेत महानोरांच्या कवितेने आपले विशेष स्थान निर्माण केले. रोमँटिक वृत्तीची निसर्गकविता लिहिणाऱ्या महानोरांनी सामाजिक जाणिवेचीही कविता लिहिली.

'फुलांचे दिवे' ही ग्रेस यांच्या 'चंद्रमाधवीचे प्रदेश'मधील कविता. या कवितेची मध्यवर्ती भावना दुःखाची आहे. दुःखाची वेदना व्यक्त करणारी स्त्रीरूपे ग्रेस यांच्या कवितेत भेटतात. ग्रेस रोमँटिक कवी आहेत. आत्ममग्नता हा ग्रेस यांचा वृत्तीविशेष आहे. ग्रेस यांचे आंतरिक वास्तव गूढ, धूसर, गहन आणि तरल आहे. ते अद्‌भुत आहे. कसल्या तरी ध्यासाने आलेले झपाटलेपण त्यांच्या कवितेत जाणवते. स्वप्नात दिसावे अशा आभासी अवकाशात ग्रेस यांची कविता जन्माला येते. त्यांची शब्दरचना कवितेत एक अनोखे विश्व निर्माण करते. ही कविता आकलनाला सोपी असत नाही, परंतु रसिकांना ती चटकन भावते. भावनांना आवाहन करण्याचे तिचे सामर्थ्य मोठे आहे. कवितेतील तरल, चंचल, धूसर वातावरण, संगीताला जवळ जाणारी नादानुकूल

शब्दकळा यांचा वाचकांच्या मनावर प्रभाव पडतो. आत्मलक्षी असलेल्या ग्रेस यांच्या कवितेतील शब्दकळेने रसिकांना भुरळ घातली. 'फुलांचे दिवे' या कवितेत ग्रेस यांच्या कवितेचे सर्व विशेष जाणवतात.

प्रबोधनयुगातील आधुनिक कवितेच्या प्रभावातून शांता शेळके यांची कविता घडत होती. सुंदर भावगीते व चित्रपटगीते लिहून शांताबाईंनी मराठी मनोविश्वावर अधिराज्य गाजवले. साठोत्तरी काळात शांताबाईंना स्वतःची स्वतंत्र ओळख सांगणारी आधुनिक कविता सापडली. शांताबाईंचा पिंड रोमँटिक आहे. आत्मलक्षी कवितेबरोबर त्यांनी निसर्गकविता, सामाजिक कविता लिहिल्या. कवितेचे अनुवाद केले. साठोत्तरी काळात जन्माला आलेली 'हे एक झाड आहे' ही त्यांची सुंदर भावकविता. 'मातीचे झाड : झाडांची माती : माझी पुन्हा माती' किंवा 'कधी तरी एके दिवशी मीच झाड होईन' अशी शांताबाईंची सहजसोपी शब्दकळा अर्थसघन असून निसर्गाशी एकरूप झालेल्या कवी मनाचे दर्शन घडवताना त्यापलीकडे जात अर्थाची सुंदर वलये निर्माण करते. शांताबाईंच्या कवितेत मराठी संस्कृतीचे, मराठी स्त्रीमनाचे, त्यांच्या श्रद्धांचे, जुन्या वैभवपूर्ण संचिताचे अनोखे दर्शन घडते.

'प्रार्थना' ही सुरेश भट यांची गझल. मराठीत लिहलेल्या या गझलेत पाच शेर आहेत. यातील प्रत्येक शेर म्हणजे एक पूर्ण कविता असते, हे तिचे वैशिष्ट्य. ती वृत्तबद्ध असते व तिच्यात गेयता असते. 'गंजल्या ओठास माझ्या धार वज्राची मिळू दे!' प्रार्थनेतल्या या मागण्याला कवीच्या वर्तमानकाळाचा विशिष्ट संदर्भ आहे. 'बिलंदरांच्या वस्तीत राहून'.... अस्तित्व माझे पेटताना दर्वळू दे!' या ओळीतून व्यक्त होणारी आणि संतांच्या 'परोपकाराय' वृत्तीची जातकुळी एकच आहे. जग लबाडांचे किंवा लाचारांचे असू दे, त्यांच्यासाठी रडत का बसायचे? हा कवी अश्रूंची आरास मांडणारा कवी नाही. अशुभ, अमंगलाच्या विरोधात एल्गार पुकारणारा आहे. 'सत्याचा सूर्य', 'छद्माचा क्रूस' या प्रतिमा बोलक्या आहेत. गझल ही एक वृत्ती आहे. या वृत्तीत एक प्रकारचे कलंदरपण दडलेले असते. गझल अरबीतून फारसीमार्गे उर्दूत व तिथून भारतीय भाषांमध्ये आली. एकाहून एक सरस गझला लिहून सुरेश भट यांनी गझल या प्रकाराला याच काळात मराठी कवितेत अढळपद मिळवून दिले.

साठोत्तरी कवितेने मराठीच्या पूर्वकालीन परंपरेशी पूर्णपणे धागा न तोडता थोडेफार सादृश्य राखत नवीनता निर्माण केली. अंतर्बाह्य जगाला, मूर्त–अमूर्त संकल्पनांना, सुप्त जाणिवांना कवितेच्या परिघात आणून या कवितांनी मराठी संवेद्य विश्वाचा विस्तार केला. या कवींनी भावनाविचार, कल्पनांचे व संवेदनांचे भाषेतून प्रकटीकरण करताना बोलीभाषा, नागरभाषा, भाषेच्या सर्व प्रकारांचा वापर केला. साठोत्तरीतील काही कविता आकलनाला कठीण वाटतात, हे खरे आहे. तरी महानोर, सुर्वे यांची कविता कठीण आहे असे म्हणता येणार नाही. गदिमांची, महानोरांची, शांता शेळके यांची कविता लोकगीतांचा वारसा सोबत घेऊन आली. तिच्यात गेयताही आहे. सुर्वे, महानोर, सुरेश भट यांच्या कवितांनी नेहमीच गर्दी जमवली आणि कवितेचे फड गाजवले. साठोत्तरी कवितेने मंचीय कवितेचा परिसर विस्तृत केला असे म्हणता येईल.

तिसरा टप्पा – नव्वदोत्तरी कविता : १९९१–२०१४

१९९१ मध्ये आर्थिक उदारीकरणाचे पर्व सुरू झाले. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यांनी या काळातील मानवी जीवनावर मोठा प्रभाव उमटवला. सामाजिक व आर्थिक विषमतेला या नव्या व्यवस्थेने खतपाणी पुरवले. शेतीव्यवसाय संकटात आला. खेडी उद्ध्वस्त होताहेत आणि दुसरीकडे शहरे फुगत चालली. या स्थितीची चिंता व्यक्त करणारी 'विचार झाला पाहिजे' ही वसंत आबाजी डहाके यांची कविता आहे. विकासाच्या दिशेने धावणाऱ्या जगाच्या इच्छाआकांक्षा वाढतच चालल्या आहेत. माणसाच्या लोभाने अक्राळविक्राळ रूप घेतले आहे. त्यातून न संपणारे प्रश्नच निर्माण होतात. थांबायचे कुठे ही मर्यादा आखून न घेतलेले धनदांडगे, विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास, शहरांना विद्रूप करणारी बांधकामे यावर कुणाचे नियंत्रण नाही. शेतीव्यवसाय बुडीतखाती गेल्यावर खेडी लकवा मारल्यासारखी झाली. जीविकेसाठी शहराकडे धावणाऱ्या लोंढ्यांचा ताण सहन न झाल्यामुळे शहरे बकाल झाली. जनसामान्यांच्या जीवनाची पातळी खालावली. 'कुरूप महानगर कसं उडवून द्यायचं' यांचा विचार व्हायला हवा म्हणताना हे सारे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आहे, हे कवीला जाणवते. सामान्य माणसाची अपेक्षा काय तर 'खायला भाकर, पांघरायला एक चादर' आणि स्वच्छ मोकळ्या वातावरणात जगण्यासाठी 'आकाशाचा निळाभोर तुकडा' बस एवढीच. ही साधीशी अपेक्षा पूर्ण होण्याची शक्यता कवीला दिसत नाही तेव्हा 'घाण्याच्या बैलासारखं जगता येईल याचा विचार

झाला पाहिजे' या निर्णयापर्यंत येतो. विचार करण्याच्या पलीकडे गेलेल्या सामाजिक व्यवस्थेने चिंतीत कवी उपहासाच्या माध्यमातून जागृती करण्याचा प्रयत्न करतो.

'वर्तमान' ही दासू वैद्य यांची कविता याच काळातील वर्तमानाबद्दल, त्यातील भयावह विपरीत अवस्थेबद्दल काही सांगते आहे. आजकालच्या माणसांना एकमेकांबद्दल, समाजाबद्दल प्रेम, जिव्हाळा वाटेनासा झाला आहे. कोणालाही कशाबद्दल काहीही बोलण्याची गरज वाटत नाही. त्यांच्यामधल्या 'संवादाची रंध्रं सपाट' झाली आहेत. त्यांच्या मनात खूप कोलाहल, खळबळ, क्षोभ माजलेला असला तरी संचारबंदी असल्यासारखे शब्द ओठातून बाहेर पडत नाहीत. आत्महत्या, खून, बलात्कार, जळीतकांडे, हिंसक दंगली यांसारख्या घटनांनी सामाजिक वातावरण बरबटले असले तरी माणसांना वाचा फुटत नाही. कवीला प्रश्न पडतो, या माणसाचा आत्मा ठेचला तर गेला नाही ना? दासू वैद्य यांची कविता महानगरी संवेदनांची कविता आहे. ती शहरी माणसाच्या जगण्यावर भाष्य करते.

'.... आणि इथेही त्याची मारली जाते' ह्या कविता -संचामधून हेमंत दिवटे ग्लोबल कल्चरवर भाष्य करतात. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला माहितीतंत्रज्ञान व दळणवळण या स्तरावर अभूतपूर्व विकास झाला. सायबर विश्वातील कृत्रिम जग अनुभवायची सवय झालेल्या समकालीन टेक्नोसॅव्ही माणसाच्या जगण्यातून नैसर्गिकता हरवू लागली. या नव्या जगात जगण्याचा आणि मरण्याचाही पासवर्ड मिळतो. नव्या 'e कल्चर'मुळे माणसांचे परस्परांमधील भावनिक संबंध बोथट होत असल्याची, त्याच्या जगण्यातील स्वायत्तता हरवत असल्याची जाणीव ही कविता करून देते. कवीने उपरोधिक भाषेत ही जाणीव करून दिली आहे.

'पूर्वपिठाचं दळणकांड' ही भुजंग मेश्राम यांची कविता शैक्षणिक व्यवस्थेत उतरलेल्या अनास्थेचे चित्र रेखाटते. भुजंग मेश्राम हे आदिवासी कवी. या काळातील शिक्षणाचे स्वरूप आणि त्याचे परिणाम याविषयी मेश्रामांची कविता गंभीर प्रश्न उपस्थित करते. एकसाची विद्यार्थी घडवण्याऱ्या या साचेबद्ध पद्धतीपेक्षा नैसर्गिक शिक्षण देऊन जगण्याला सक्षम करणारी रानाची शाळा यापेक्षा खूपच चांगली आहे, असा निष्कर्ष मेश्राम यांनी नोंदवला आहे. अभ्यासक्रमाची शिस्त या नावाखाली सर्वांना सरसकट एकाच तराजूत तोलणारे आजचे शिक्षण खऱ्या उद्दिष्टांपासून कसे भरकटत चालले आहे, यांची बोचरी जाणीव ही कविता करून देते.

नीरजा यांच्या 'कॉम्प्युटर' या कवितेतली आई ही एकविसाव्या शतकात जगणारी आई आहे. जग कितीही बदलले तरी स्त्रीजीवनात फरक पडू शकतो यावर तिचा विश्वास नाही. वरच्या पदावरून महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पेलून दाखवणाऱ्या स्त्रीला आजही 'चूल-मूल' हे क्षेत्र चुकलेले नाही. नीरजाच्या कवितेतल्या आईला अनुभवाने हे सारे पटले आहे. ही आई नव्या जमान्याशी जुळवून घेण्यासाठी स्वतः कॉम्प्युटर शिकते, तरीही मुलीला जाणीवपूर्वक घरकामांची दीक्षा देते. आजची सुशिक्षित स्त्री सर्व क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने काम करते. तरीही तिचे दुय्यम स्थान हटले नाही. अजूनही तिला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नाही. नीरजाची कविता स्त्रियांच्या शोषणाचे चित्र रेखाटताना या शोषणात संस्कृतीचा, परंपरेचा महत्त्वाचा वाटा असल्याचे नोंदवते आणि सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध उभे राहण्याची जागृती करून देते. नीरजाच्या समकालीन मलिका अमरशेख, रजनी परुळेकर, डॉ. सिसिलिया कार्व्हालो, अरुणा ढेरे अशा अनेक कवयित्रींनी स्त्रीजीवनाचे ताणेबाणे स्पष्ट करणारी कविता लिहिली.

'बळीराजासाठी मागणं' ही नारायण कुळकर्णी-कवठेकर यांची कविता वाचताना अंतःकरणात चर्र होते. विसावे शतक सरत असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी महाराष्ट्र हादरला. या काळातील शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेल्या दुर्दैवी दुःखभोगाचे, हतबलतेचे मनाला विषण्ण करणारे चित्र कवठेकरांच्या कवितेत उमटले आहे. या काळातील शेतीव्यवसाय संकटात आला. कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या शेतकऱ्याची कणव कुणालाही येत नाही, कुणाची मदत नाही अशा अवस्थेतून निराश झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू झाले. त्यांचे तीव्र पडसाद समाजात उमटले तरीही आत्महत्या सुरूच होत्या. शेतकऱ्यांच्या मागची अस्मानी-सुलतानी सुटत नाही. शेतकऱ्याला जीव देणे भाग पडेल अशी व्यवस्था ठरवणारी सुटाबुटातली माणसे तुला सोडणार नाहीत, 'टाकाच्या निफांनी ते तुझी कणसं खुडतील.' असं कवी त्याला सांगतो. 'ढोरांच्या गळ्यात गळा घाल अन् मनसोक्त रडून घे. पण जीव देऊ नको.' असे कवी शेतकऱ्याला विनवतो. शेतकऱ्यांच्या जीवनातील कठोर आणि धक्कादायक वास्तव कवठेकरांनी या कवितेत सहानुभूतीने चित्रित केले आहे.

अनुराधा पाटील यांनी या काळातील ग्रामीण स्त्रियांच्या कष्टमय जगण्याचा कवितेतून वेध घेतला आहे. 'माझ्या

डोळ्यांसमोरून...' ही कविता संसाराच्या वणव्यात होरपळून निघणाऱ्या बाईत असलेल्या जगण्याच्या चिवट आणि जिवट मनोबलाचे दर्शन घडवते. संसारासाठी अखंड झिजणाऱ्या स्त्रियांच्या कष्टप्रद जगण्याचे वर्णन करताना 'दुःखाची ज्योत', 'असह्य ठणका आयुष्याचा' या शब्दांत करते. फक्त कष्ट करण्यात आयुष्य सरत असल्याची बोच त्यांना जाणवत असली तरीही स्त्री आपली दुःखे मातीखाली लोटून देते व संसाराचे कष्ट उपसत राहते.

या काळातल्या कवींनी भोवतालच्या वास्तवाचे चित्रण कधी देशीवादी दृष्टिकोनातून, कधी आधुनिक तर कधी आधुनिकोत्तर दृष्टिकोनातून केले. त्यांच्या कवितेच्या भाषेत ग्रामीण, नागरबोली, हिंदी, इंग्रजी किंवा इंग्रजीची बोलीत झालेली रूपांतरे सहज येतात. यशवंत मनोहर, लोकनाथ यशवंत, वीरधवल परब, महेश केळुसकर, कविता महाजन आणि अनेक कवींची कविता या काळाला चित्रित करते.

चौथा टप्पा – वर्तमानकालीन कविता: २०१५–२०२१

२०१५ नंतरचा म्हणजे आजचा काळ. माध्यमक्रांतीने जगावर अधिराज्य गाजवायला सुरूवात केली, तो हा काळ. तरुण पिढी मोबाइल, संगणक वगैरे माध्यमांच्या का ह्यात जाऊ लागली तो हा काळ. देशाच्या राजकीय नेतृत्वात, सत्तेत बदल झाला तो हा वर्तमान काळ. नेतृत्वबदलाबरोबर देशाचे दैनंदिन कामकाज चालवण्याच्या पद्धतीत, विकासाच्या धोरणांत, त्यांची अंमलबजावणी करण्यात... अशा अनेक गोष्टींत बदल घडून आला. 'मख्ख थकवा आलाय विवेकाला' ही आसावरी काकडे यांची कविता या संक्रमणकाळातील अनुभवांबद्दल बोलते. आजकाल कुणीही एखाद्या लहानसहान कृतीचा पटकन देशभक्तीशी संबंध जोडतो. 'भारतीयत्व' म्हणजे काय हे नेमकेपणाने कुणाला सांगता येत नाही. स्वतःचे स्वतंत्र मत व्यक्त करताना आज भीती वाटू लागली आहे. या काळातली तरुण पिढी रेव्ह पार्टी वा तत्सम पार्ट्यांना नशा करून झिंगू लागली तसे डिप्रेशन विसरण्यासाठी आपणही झिंगून घ्यावे असे कवयित्रीला वाटते. या संक्रमणकाळातील संशयी वातावरणात जगताना आलेल्या थकव्याचे, उद्वेगाचे चित्र या कवितेत दिसते.

'तुम्ही असता संशयास्पद वस्तू' ही वर्जेश सोलंकी यांची कविता याच वर्तमानाची आणखी एक बाजू आपल्यासमोर उघडी करते. कुणाचाही कुणावर विश्वास नाही अशा काळाचे ती प्रतिनिधित्व करते. आपला खरा चेहरा लपवणारी, भावनांना प्रदर्शित करण्यापासून रोखणारी माणसे आजूबाजूला वावरताहेत. अशा वास्तवात खरे आणि खोटे ओळखणे कठीण असते. किंवा कुणालाही खोटे वा अपराधी ठरवणे अगदी सोपे असते. एखादा खरा माणूसही इथे संशयास्पद ठरतो. किंबहुना पापभीरू माणसावर संशय घेणे सोईचे असते. अशा माणसांना दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे सक्त आदेश कुणीतरी दिलेले असतात. किंवा संशयाच्या जाळ्यात अडकवून त्यांचे जगणे सडवले जाते. या काळात जगण्याच्या वृत्तीप्रवृत्ती बदलत गेल्या. त्याच्या बऱ्यावाईट परिणामांना आजच्या माणसाला सामोरे जावे लागते, हे दाखवून देणारी ही कविता आहे.

स्वातंत्र्य मिळून सहा–सात दशके सरली तरी अजूनही गरीब–श्रीमंतांमधील आर्थिक, सामाजिक विषमतेची रेषा नष्ट झालेली नाही, याची वेदना दिनकर मनवर यांच्या 'मागील काही युगांपासून' या कवितेत उमटली आहे. दिनकर मनवर आदिवासी समाजातून आलेले कवी आहेत. संविधानाने दिलेल्या समतेच्या हक्काचा अनुभव शोषितवर्गाच्या वाट्याला अजूनही येत नाही. जागतिकीकरण, उदारीकरणामुळे जगात मोठे बदल दिसू लागले. या नव्या व्यवस्थेचे फायदे मूठभर लोकांना मिळाले. गरीब कष्टकरी जनता मात्र या फायद्यांपासून कोसो दूर राहिली आहे. सूर्याच्या प्रतीकामधून कवी आपले म्हणणे पटवून देतो. 'तो तुमच्या घरी दररोज उजेडाचा रतीब टाकतो.' पण 'शिरला नाही भुकेनं व्याकूळ झाल्यावर माझ्या आतड्याच्या आत' अशी भेदाची नीती असल्याचा अनुभव कवी नोंदवतो. भेदभाव करणाऱ्या या व्यवस्थेचे फायदे मिळणे राहिले दूर, त्याचे चटके ('माझ्या पाठीला सारखा भाजत राहतो चटक्यासारखा') मात्र सहन करावे लागतात, अशी तक्रार कवी करतो. दिनकर मनवरांच्या कवितेने सौम्य शब्दात आजच्या व्यवस्थेचे अपयश नोंदवले आहे.

'नवजात मुलासाठी काही सूचना' ही प्रवीण दशरथ बांदेकर यांची कविता अलीकडच्या काळात निर्माण झालेल्या बदलांची दखल घेते. या काळात जन्माला येणारी पिढी स्वतःची स्वतंत्र ओळख हरपलेली, क्लोनिंग केल्यासारखी स्वतःचे स्वतंत्र स्वत्व हरवलेली, यंत्रातून निघालेल्या मालासारखी एकसाची ठरण्याची भीती कवीने व्यक्त केली आहे. यंत्रात जे आणि जेवढे फीड केले असेल तेवढे त्यांचे ज्ञान. यंत्राच्या साहाय्याने अनुभवांचे आभासी ज्ञान घेणाऱ्या या मुलाला आकाश, माती, पावसात बीज रुजणे वगैरेंची कल्पना कशी करता येणार? त्याच्या

जगण्यावर, स्वातंत्र्याच्या हक्कावर कुणीतरी अतिक्रमण केले आहे, याची जाणीवही त्याला झालेली नसेल. पिता-पुत्र किंवा कोणत्याही संवादासाठी 'डब्लूडब्लूडब्लू पितापुत्र संवाद डॉट कॉम' अशा वेबसाईट असतील. आपल्याला हतबुद्ध करणारी गोष्ट म्हणजे यंत्र-तंत्राच्या सोबतीने वाढणाऱ्या त्याला 'प्रेमबिम करायचे, कविता करायचे; लग्नपण करायची' म्हणजे नक्की काय करायचे तेच कळणार नाही. माणूसपण गमावलेल्या त्याची अवस्था 'ग्लोबल मार्केटमधील हक्काचं गिऱ्हाईक' अशीच असणार आहे. येणाऱ्या भविष्याचे हे चित्र संवेदनशील माणसाला हादरवून सोडणारे आहे.

२०१९ मध्ये आलेल्या कोरोनाच्या संक्रमणामुळे मानवी जीवनात उलथापालथ झाली. एका क्षुद्र विषाणूने लाखोंचा नरसंहार घडवला. अचानक उद्‌भवलेल्या संकटाचा सामना करताना माणसांची, व्यवस्थेची त्रेधा उडाली. त्यावरची प्रतिक्रिया चंद्रशेखर सानेकर यांच्या 'परत आदिम गुफेत' या कवितेत उमटली आहे. कोरोनावरच्या लशीचेही राजकारण झाले. यात बळी जाईल फक्त गरीब माणूस. उरलेली माणसे नवे जंगल उभे करतील, ज्यात स्वतंत्र विचारांच्या, स्वत्वाची जाणीव असलेला माणूस नष्ट झालेला असेल. 'गुफा' हे अंधाराचे प्रतीक. 'आदिम गुफा' म्हणजे अनाचार, अशांतता, असंतोष, हिंसा आदि गोष्टींना थारा देणाऱ्या पाशवी मनोवृत्तीचं प्रतीक. यातून उभी राहणारी विपरितता भयावह आहे.

फटाफट होणारा मानवी मृत्यू ही खरी तर चिंतेची बाब. भारतासारख्या अफाट लोकसंख्येच्या देशात मृत्यूसारख्या दुखःद घटनेचेही सपाटीकरण झाले. 'स्मशानभूमीजवळून रोज जाताना' ही केशव सखाराम देशमुख यांची कविता सामान्य माणसांच्या हतबलतेवर बोलते. परिचिताचा मृत्यू होतो तेव्हा माणूस दुःखी होतो, मनातून खचतो. आज मृत्यूच्या बातम्यांनी दिवस उगवतो आणि संपतो. मृत्यूबद्दल ऐकणे वा मृत्यू झालेला पाहणे यापलीकडे सामान्य माणूस काही करू शकत नाही. बऱ्याचदा ब्रेकिंग न्यूज म्हणून माध्यमांवर मृत्यूच्या रक्तरंजित बातम्या पुन्हापुन्हा सादर केल्या जातात. अशा वातावरणात सतत राहिल्याने हळूहळू भीतीच्या भावनेला बधिरता येते. कवितागत निवेदक म्हणतो, 'मन मजबूत करत झेलत राहिलो प्रेतं न्याहाळत राहिलो' किंवा 'अभ्यासानं मरण आस्ते आस्ते समजून घेत राहिलो.' अभ्यास म्हणजे एक प्रकारचा सराव. खूप सराव झाला की त्याची भीती उरत नाही. अपघातात मरण पावणारे निष्पाप जीव, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अकस्मात होणारे मृत्यू, कुणाच्या तरी हव्यासापोटी झालेले मृत्यू, आत्महत्या ... मृत्यूंची कारणे अनेक. मृत्यूच्या बातम्यांच्या सततच्या माऱ्यामुळे माणसाचे मन कोरडे (दगड) होते. अशा सातत्याने होणाऱ्या मृत्यूंमुळे अनपेक्षितपणे आपणही या रांगेत उभे असल्याची जाणीव निवेदकाला होते. मरणाचा होमवर्क पक्का झालेला आहे आणि स्मशानभूमीजवळून जाणारा रस्ताही ओळखीचा झालेला आहे; त्यामुळे मरणाच्या परीक्षेची भीती आता विझून गेली आहे. केशव देशमुखांची कविता वर्तमानकाळातील भयावहता आणि या परिस्थितीत जगणाऱ्या माणसाची अगतिकता व्यक्त करते.

मनात प्रश्न उमटतो, या काळात जगणाऱ्या माणसांना झाले आहे तरी काय? हे वातावरण आपण बदलू शकतो यावर या माणसांचा विश्वास नाही का? प्रणव सखदेव यांची 'ठिणगी' ही कविता आत्मविश्वास हरवून बसलेल्या माणसाला उजेडात आणते. माणसात प्रचंड सामर्थ्य व तेज (अख्खा आसमंत उजळून जाईल एवढा ठासून भरलेला दारुगोळा) भरून राहिले आहे. धार्मिक श्रद्धेचे किंवा राजकीय, सामाजिक नेतृत्वाचे 'मूर्ती' हे प्रतिक आहे. अशा मूर्ती मखरात बसवून त्यांचे उत्सव साजरे करण्यात कार्यकर्ते धन्यता मानतात. क्षणिक स्वार्थासाठी लवंगी फटाके उडवण्यात यांची ऊर्जा वाया जाते. (पिटक्या आवाजात समाधान मानत विझत जातात ठिणग्या) दारुगोळा भरलेली कोठारे कुणाच्यातरी दराऱ्याखाली दबून गेली आहेत. या वातावरणात बदल घडवून आणण्यासाठी एकच ठिणगी पुरेशी आहे. काळोखलेल्या आसमंताच्या डोळ्यात प्रतीक्षा आहे ती आसमंत उजळून काढणाऱ्या लालचुटूक ठिणगीची.

वर्तमानकाळाला प्रतिसाद देणारे आजचे कवी म्हणून प्रफुल्ल शिलेदार, रवींद्र लाखे, पी. विठ्ठल, प्रमोदकुमार अणेराव, योगिनी सातारकर पांडे, कल्पना दुधाळ आणि अनेक कवींची नावे घेता येतील.


'हिल्लोळ हरवून आतबाहेरचा' ही प्रज्ञा दया पवार यांची कविता. कविता आणि कवयित्री यांच्यातील अद्वैत व्यक्त करणारी ही कविता आहे. कविता म्हणजे काय? ती कशी जन्माला आली? कवितेचे सामर्थ्य कशात आहे? कवयित्रीच्या मनाला कविता किती व कशी भिडली आहे? कवयित्रीने कवितेला किती व कसे रिचवले आहे? याचे उत्तर या कवितेत सापडते. कवितेला एका अंतरावर उभे करून प्रज्ञा तिचे अंगोपांग न्याहाळते आहे. मनात अस्मिता

जागवणारी, आतबाहेर उसळणाऱ्या ज्वालामुखीला शब्दरूप देणारी ती... तिने कवयित्रीचे सारे अस्तित्व व्यापून टाकले आहे. 'कविता खावी, कविता प्यावी, घ्यावा कवितेत श्वास'. तिचा टापू 'अस्वस्थ ज्वालामुखी'ने व्यापलेला आहे. ती कवितेचे 'बायप्रॉडक्ट' की 'लखलख शलाका'? वर्तमानकाळाच्या विपरीततेचा तडाखा या कवितेत जाणवतो आहे. सगळी किंमत मोजून जिवाच्या कराराने कवयित्रीने कवितेला घडवले आहे. ती निरुपयोगी ठरू नये. तिच्यातील हिल्लोळाचे सामर्थ्य हरवून भुसा भरलेल्या शोपीससारखी ठरू नये. कवयित्रीच्या मनातील तळमळीचे प्रभावी आविष्करण ही कविता करते. विरामचिन्हांचा वापर न करता सरळ लिहीत गेलेल्या गद्यसदृश वाटणाऱ्या ओघवत्या भाषेत ही कविता बोलते. उत्कटता, भावनावेग, अर्थसघन प्रतीकांचा वापर, रचनातंत्र यांमुळे तिच्यात काव्यात्मकतेचा अंतर्भाव होतो. कवितेच्या सामर्थ्यावरचा अपार विश्वास या कवितेत व्यक्त झाला आहे.

वर्तमानकालीन आशय थेट व्यक्त करण्यासाठी आजच्या बहुसंख्य कवींना मुक्तशैली जवळची वाटली आहे. ही कविता विधानांमागून विधाने करत घटितांची यादी सादर करते. कधी कधी ती विरामचिन्हांचा वापर करण्याचे टाळते. गद्यात्मक वाटणाऱ्या या शैलीत लक्षार्थ, व्यंगार्थाला महत्त्व आहे. कधी उपरोधिकपणे तर कधी उपहासाने ती काही सुचवत असते. साठोत्तरी कवींनी कवितेच्या भाषेत बरेच बदल घडवून आणले. तसे नंतरच्या कालखंडातील कवितेत तसे झालेले दिसत नाही. नव्वद व त्यानंतरच्या कवींना कवितेच्या भाषेत फारसे बदल घडवण्याची गरज वाटली नाही. पुढील काळातील कवींनी कविता लिहताना साठोत्तरी कवींनी रूढ केलेल्या भाषेचा सहजस्वीकार केला.

या ७५ वर्षांच्या मराठी कवितेच्या वाटचालीत नोंदवावे असे काय दिसते? साताठशे वर्षांपासून संतकवितेने, पंडितांच्या आणि शाहिरी परंपरेने निर्माण केलेली वाट या संपूर्ण काळात पूर्णत: खंडीत झाली नाही. विशेषतः अभंगांचा खोलवर ठसा मराठी मनोभूमीवर उमटला असल्याने या ७५ वर्षांच्या दीर्घ काळात आशय व अभिव्यक्तीसाठी अभंग वृत्ताचा वापर सातत्याने केलेला आहे. काळानुसार आशयाच्या अभिव्यक्तीसाठी तिरकस शैलीत अभंग लिहले इतकेच. या दीर्घ कालावधीत आधुनिक मराठी कवितेच्या केंद्रीय परंपरेला धरून प्रेमकविता, निसर्गसौंदर्यवर्णन करणाऱ्या आधुनिक कविता ७५ वर्षांच्या कालावधीत भरपूर आल्या. आधुनिकोत्तर कवितांनी हा झेंडा आणखी पुढे नेला. वास्तवाच्या प्रभावी प्रकटीकरणाच्या दृष्टीने आशय, शैली आणि कवितेची भाषा यात चांगले बदल घडवण्यात मराठी कवी आणि त्यांची कविता यशस्वी ठरत असल्याचे दिसून येते. आजचे कवी भोवतीच्या वास्तवाला कवितेतून भिडतात तेव्हा त्यांच्यातील प्रगल्भ जाणीवांचे दर्शन घडते. आजची कविता भविष्यातील मराठी काव्यविश्वाची आश्वासकता वाढवते.

**– प्रा. स्मिता पाटील**
भ्रमणध्वनी – ८००७८४८३८४





# । कविता ।



**संपादकीय टिपण :**

प्रा. स्मिता पाटील यांनी 'स्वातंत्र्योत्तर मराठी कविता (१९४७–२०२१) या लेखात, समाजावर प्रभाव पडणाऱ्या कवितांची चर्चा केलेली आहे. त्यासाठी त्यांनी कालखंडातील विविध कवींच्या कविता लेखात उद्धृत केलेल्या आहेत. या सर्व कवितांचे एकत्रित संकलन, जागेअभावी तसेच अन्य तांत्रिक कारणांनी अंकात समाविष्ट करता येणे शक्य झाले नाही. तरीही काही मोजक्या प्रातिनिधिक कविता वाचकांसाठी देत आहोत. (शुद्धलेखन छापील कवितांप्रमाणेच.)

पुढील कविता, आवश्यक तेथे पूर्वपरवानगी घेऊन छापल्या आहेत.

**– संपादक**

## मानूस

मानूस मानूस
मतलबी रे मानसा,
तुले फार हाव
तुझी हाकाकेल आशा

मानसा मानसा,
तुझी नियत बेकार
तुझ्याहून बरं
गोठ्यातलं जनावर

भरला डाडोर
भुलीसनी जातो सूद
खाईसनी चारा
गायम्हैस देते दूध

मतलबासाठी
मान मानूस डोलये
इमानाच्यासाठी
कुत्रा शेपूट हालये

मानसा मानसा,
कधी व्हशीन मानूस
लोभासाठी झाला
मानसाचा रे कानूस!

■

**बहिणाबाई चौधरी**

## पुष्कळा

पुष्कळ अंग तुझं, पुष्कळ पुष्कळ मन;
पुष्कळांतलीं पुष्कळ तूं
पुष्कळ पुष्कळ माझ्यासाठीं.

बघतांना किती डोळे पुष्कळ तुझे,
देतांना पुष-पुष्कळ ओठ;
बाहू गळ्यांत पुष्कळ पुष्कळ,
पुष्कळ ऊर.

पुष्कळाच तूं, पुष्क-कळावंती,
पुष्कळ पुष्कळ पुष्कळणारी.

■

**पु. शि. रेगे**

(श्री. मनोज पु. रेगे यांच्या पूर्वपरवानगीने साभार. साहित्य अकादेमीच्या संपादित 'पुष्कळा' संग्रहातून)



## आता

सूर्याकडे पाठ फिरवून त्यांनी शतकांचा प्रवास केला
आत्ता अंधारयात्रिक होण्याचे नाकारलेच पाहिजे
हा आपला बाप अंधार वाहून वाहून अखेर पोक्या झाला
आत्ता त्याच्या पाठीवरला बोजा खाली ठेवलाच पाहिजे
या वैभवनगरीसाठी आपलाच खून सांडला
आणि दगडी खाण्याचा मक्ता मिळाला
आत्ता आभाळमुका घेणाऱ्या हवेल्यांना सुरुंग लावलाच पाहिजे
सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षांनंतर लाभला
आत्ता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे

■

**नामदेव ढसाळ**

(अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, यांच्या पूर्वपरवानगीने साभार - 'गोलपिठा' या संग्रहातून. सौजन्य - कवयित्री मलिका अमरशेख)

## कॉम्प्युटर

ती शिकवते आपल्या मुलीला
शिवण-टिपण
आठवणीनं
कॉम्प्युटरबरोबर.
सुईनं मन कसं शिवावं हळुवार
ह्याचं प्रात्यक्षिक
ती दाखवते
नवीन पॅकेजवर.
ठरलेल्या प्रोग्रामप्रमाणं
संसार करताना नेटका
अचानक भरकटत जातात
तिची की-बोर्डवरची बोटं.
रंगीत पडद्यावर पसरत जातं
उडणाऱ्या पदराचं
अवखळ चित्र.
झूमकडं सरकणारं मन
शर्थीनं मिनिमाईझवर आणते ती.
उडणारा पदर अंगभर लपेटून
ती स्टोअर करते
नवी नवी चित्रं
मनाच्या स्क्रीनवर.
स्वत:च्या नावाची फाईल
उघडत नाही ती चुकूनही.
त्याच्या फाईलमध्येच
आपलं नाव लिहिते वळणदार.
ती कॉम्प्युटर शिकते मुलीबरोबर
आणि मुलगी शिवण-टिपण
आईबरोबर.

■

**नीरजा** (९९६९८१०८९६)



## बळीराजासाठी गाणं

अस्मानी जाईल
तर सुल्तानी खाईल.
तहसिलीतून सुटशील
तर कोर्टात अडकशील.
जनावरानं सोडलं
तर माणसं फाडतील,
टाकांच्या निफांनी
तुझी कणसं खुडतील.

ढोरांच्या गळ्यात
गळा घाल
अन् मनसोक्त रडून घे.
तुझ्या पाठीवर चित्र
कोणाकोणाच्या बुटाचं आहे
त्यांनाच विचारून घे.

थांब थांब राजा,
माझ्या बळीराजा,
असा नाराज नको होऊ.
आपल्याच विहिरीत
जीव नको देऊ
अशी व्यवस्था वरतीच
ठरली आहे बाबा,
की पाणी पाणी म्हणत तू
उन्हात डोळे पांढरे करशील,
तरीही ना मरशील
तर धो धो पडेल पाऊस
पुरात वाहून जाशील.

■

**नारायण कुलकर्णी कवठेकर** (९८५०७४२८८१)

## परत आदिम गुफेत

पछाडलाय एका विचित्र विषाणूने माणूस

घरात असला काय, बाहेर पडला काय
माणसाला बघून माणसाला आता
हातहातभर लांब सुळे आणि नखे फुटतील

एकमेंकांना कापून, फाडून, मारून
हजारो लाखोंचा नरसंहार घडेल

यानंतर या विषाणूवर एक लस शोधली जाईल
ही लस फक्त श्रीमंतानाच परवडेल
मध्यवर्ग चिवट आशेने निभावून नेईल
आणि अजिबात न परवडल्यामुळे
हकनाक मरेल तो ...फक्त गरीब.

पण श्रीमंत लोक ही लस टोचूनच घेणार नाहीत
कारण संहार त्याच्या धंद्याचा कच्चा माल आहे
मध्यवर्ग घेईल कारण त्याला जगायचंय काहीही करून

आणि गरीब या दोघांचा बनत राहील घास

सर्व सत्ताश्वापदांनी आपल्या अक्राळविक्राळ
तिजोऱ्या भरल्यानंतर
या लशीचं राष्ट्रीयकरण होऊन ती मोफत देण्याचं ठरेल

इथूनच एका अमानुष
अराजकयुगाला सुरुवात होईल

आणि एका नव्या जंगलाची पेरणी करून
आपल्या आदिम गुफेत गडप होईल
माणूस

■

**चंद्रशेखर सानेकर** (९८२०१६६२४३)



## मागील काही युगांपासून

मागील काही युगांपासून
मी पाहत आलोय
की सूर्य उगवतो नि मावळतोही आपसूक
तो लालभडक असतो
असं सांगितल्या गेलंय वारंवार मला
आणि उजेडही देतो सगळ्यांना
कोणताही भेदभाव न पाळता

तो आगीसारखा तुमच्या भाकरीत प्रवेश करतो
तो तुमच्या घरी दररोज उजेडाच रतीब टाकतो
असंही सांगितल्या गेलंय वारंवार मला
पण त्यानं तर माझ्या भाकरीत
कधीच मीठ बनून कधीच प्रवेश केलेला नाहीये
की शिरला नाही भुकेनं व्याकुळ झाल्यावर
माझ्या आतड्याच्या आत

हल्ली तर तो सीलबंद पॅकमध्येही
मिळू लागलाय रिलायन्सच्या मॉलमध्ये
पण त्यानं तर माझ्या दाराची कधीच वाजवली नाही कडी
की दिलं नाही साधं दर्शनही सणासुदीला

एवढं मात्र खरंय की तो रात्री बेरात्रीही
माझ्या पाठीला सारखा भाजत राहतो चटक्यासारखा

■

**दिनकर मनवर** (८१०८६८३९१९)

## ठिणगी

खरंतर एकेका माणसात
असतो अख्खा आसमंत उजळून जाईल
एवढा ठासून भरलेला दारुगोळा

त्यातला एकेक फटाका
रडत राहतो वेळोवेळी
कधी उत्सवांची रंगीबेरंगी
लायटिंग पाहताना
कधी टीव्हीवर डॅन्स करताना
कधी मूर्तीची प्रतिष्ठापना करताना
कधी भुस्सा भरलेली मढी जपून ठेवताना
कधी दगडविटांचे ढीग खाऊन बसलेल्या
आप्त-नातेवाइकांचे पोट साफ करताना


बारक्या लवंगीच्या
पिटक्या आवाजातच समाधान
मानत विझत जातात ठिणग्या

खरंतर
एक ठिणगीही पुरून उरू शकते

साधे दगड घासून पाहायची
हिंमत नसलेली कोठारं
सदैव दरारायुक्त संरक्षण कवचात
त्यापेक्षा
अख्ख्या काळ्याशार
आसमंताच्या डोळ्यांतच
फुलून आलेलीये
प्रतीक्षेची लालचुटूक ठिणगी.

■

**प्रणव सखदेव** (७६२०८८१४६३)



## बाहुले

कुणीतरी मागून दोरी ओढते
बाहुले नाचते..!

बाहुल्याचे डोळे मण्याचे
शेण झाले कण्याचे
बाहुल्याच्या तोंडात दात राहिले नाहीत चण्याचे..

कुणीतरी मागून दोरी ओढते
बाहुले नाचते..!

बाहुले ओतते ढीगभर निष्ठा
बाहुले टाकते टोपलीभर विष्ठा
घास खाते नेहमीच उष्टा
बाहुल्याला दोरी दिसत नाही
ओढणारा हात खुपत नाही..

बाहुल्याला वाटते पाय उचलावा
पुढे चालावे
बाहुल्याला वाटते खूप ऐकले
थोडे बोलावे
बाहुला चालेल कसा..? बाहुला बोलेल कसा..?
बाहुल्यात भरलाय ठासून भूसा..

कुणीतरी मागून दोरी तोडते
तरी बाहुले नाचते
बेभान नाचते..!

■

**अशोक बागवे** (९६१९९७२७३२)

## आरसा बाई आरसा

आरसा बाई आरसा
आरशात दिसते छबी
केस धुतल्यावर बाई
का दिसते नवी

केस बाई केस
सोडू नये मोकळे
नजर चिटकते पाठी
कशी फोडावी ही ढेकळे

ढेकूळ बाई ढेकूळ
संपते त्यातली ओल
खपून खपून मरते
माती आत खोल

खोल खोल खणली माती
त्यात साचले पाणी
झुळझुळ झुळझुळ वाहणे संपले
संपली आतली गाणी

गाणी संपली झुळझुळ झुळझुळ
झऱ्याची झाली विहीर
बसता बाई काठावरती
पाण्याला गेली चीर

■

**किरण येले** (९८६९२६०७८०)

## काय होते?

काय होते? काय हाती राहिलेले?
सोबतीला, शब्द काही राहिलेले!

ती फुले कोमेजली आहेत आता...
मात्र हे तळवे सुगंधी राहिलेले!

माफ केले, मी जगाला अन् मलाही-
वैर माझे प्राक्तनाशी राहिलेले!

ओळखीचे लोक दिसती भोवताली-
पण जिवाचे मित्र नाही राहिलेले!

आणभाकांनी कधी का आग विझते?
ते जुने संदेह बाकी राहिलेले!

■

**सदानंद डबीर** (९८१९१७८४२०)

## याला त्याला

याला त्याला चाळत चाळत जगत राहिले.
प्रलोभनांना भाळत भाळत जगत राहिले!

दवबिंदूना टिपण्याआधी गेला श्रावण
मी अश्रुंना ढाळत ढाळत जगत राहिले!

रोज घडाव्या परस्परांच्या गाठीभेटी
या स्वप्नाला जाळत जाळत जगत राहिले!

तुझ्या फुलांच्या बागेमधुनी येतात जाता
गंध फुलांचा माळत माळत जगत राहिले!

पांघरला तू भारी शेला नवीन कोरा
मी दोरीवर वाळत वाळत जगत राहिले!

गुणवत्तेला वाढवता मज आले नाही
पण दोषांना गाळत गाळत जगत राहिले!

■

**प्रा. प्रतिभा सराफ** (९८९२५३२७९५)



## पिवळ्याधम्म उन्हाने लपेटलेल्या ज्वाळा जळताहेत भुरूभुरू

पिवळ्याधम्म उन्हाने लपेटलेल्या ज्वाळा जळताहेत
भुरूभुरू
समोर झाडं निथळताहेत गच्चओली सोनेरी अंमलात
फांद्यांमधून झावळ्यांमधून पानांमधून निबरकोवळ्या
सांडतोय कसल्याशा उष्ण गरम स्पर्शाचा वास
चेहरे कसे मिसळताहेत एकमेकांत
मिसळताहेत हजारोंचे आवाज एकमेकांत
त्या उंचावलेल्या मुठीत
मी पाहिलं होतं
कधीकाळी माझ्याच मुक्तीचं स्वप्न
ही उतरती दुपार
मला वाटतेय तितकीच प्रिय आणि प्रचंड हवीहवीशी
जसा असतो कुठलाही परम अनुभव
तुझ्या तीव्र मिठीसारखा
सारखासारखा
नाहीसा होणारा

■

**प्रज्ञा दया पवार** (९८६९४८०१४१)

## किंकाळी

फारच भिषण, प्राणांतिक आहे मूंकची किंकाळी
अंगावरच्या शहाऱ्यातून आत्म्याला चिरत चिरत
आरपार जाणारी
त्या नजरेतलं भय विझवून टाकतंय साऱ्या रंगांना
तो हृदयभेदी आवाज गोठवतोय साऱ्या आसमंताला
तो कुठचा पूल आहे संवादच संपवणारा
तो मागे उभा असलेला काळपुरुष कोण आहे?
त्याच्यासोबत अजून कुणीतरी दिसतंय अस्पष्टसं
त्या फ्रेममध्ये
का गोठलाय हा दालीचा काळ अनंत काळासाठी
पोटॅटो इटर्सचे पोटॅटोपण संपत चाललेत आता...
आणि ही अमृता तर थेट जाऊन बसलीय मौजेत
तिच्या डोळ्यातून उमटतेय तिच मूंकची मूक किंकाळी
जी कधीच ऐकू आली नाही कुणाला
पूलावरच्या किंकाळीसारखी
की कापूनच टाकले आहेत कान तुम्ही कायमसाठी
व्हॅन गॉघच्या प्रिय स्मृतीत ...

■

**मीनाक्षी पाटील** (९८२०७३७६९३)



## जाच

उत्तररात्र
ढळू लागते तरीही
मुलगा झोपत नाही नीट
अगदी गाढ आणि शांत.

मला जाग येत राहते पुन्हा पुन्हा.
मी पडल्या पडल्याच
मान उंचावून बघून घेतो त्याला.

बघवत नाही मला
अंथरुणात तोंड खुपसून
पडलेल्या मुलाचं
रोज रोज मोबाइलशी इतकं रत होणं.

माझं बोलणं
सहजासहजी उडवून लावणारा तो
पुरेसा मोठा आहे
अन तरुणही.
कळतं त्याला भलंबुरं काहीही.

तरी मला
का जाचत राहतं
त्याचं रात्री असं खूप वेळ जागणं
सकाळी रोज उशीरा उठणं
अन स्वत:मध्येच
अगदी मग्न होऊन राहणं.

■

**अशोक कोतवाल** (९८५०११७५३९)

गंधाली दिवाळी २०२२

वर्ष ३५ वे

पृष्ठे ३००, मूल्य ३०० रुपये

गंधाली



दिवाळी अंक असा असेल -

* **कथा** –वसंत वाहोकार, अशोक लोटणकर, डॉ. अलका शशांक कुलकर्णी, राजेंद्र वैद्य, डॉ. सुनीता चव्हाण, विजय खाडीलकर, डॉ. संजीव गिरासे, प्रा. प्रतिभा सराफ, सुधाकर विठ्ठल दीक्षित, रश्मी रामचंद्र पटवर्धन, रमानंद विष्णू खाकुर्डीकर, दत्तात्रय शंकर म्हेतर, प्रेरणा प्रदीप उपाध्ये, डॉ. मधुकर केशव वर्तक
* **कादंबरी**– संघर्षमय 'वंश' कादंबरी – प्रा. पु.रा. रामदासी, प्रा. सुनील पंडित
* **लेख**– मनोज आचार्य, रमेश नागेश सावंत, वैभव रामचंद्र साटम, वर्षा रेगे, मोहन जोशी
* **कविता विभाग एक** – (नारायण लाळे संपादित) अशोक बागवे, प्रवीण दशरथ बांदेकर, राजीव जोशी, मंगेश विश्वासराव, दमयंती भोईर, हेमकिरण पत्की, वैभव दळवी, गणेश वामन कनाटे , लोकराम शेंडे, कल्पना दुधाळ, गंध मादन, कल्पना मलये, मके
* **कविता विभाग दोन** – (संपादकीय निवड) जयश्री विजय पाटील, पद्माकर कळसकर, सुरेश पाचकवडे, जनार्दन काजिर्डेकर , सायली गिरीश कुलकर्णी, प्रशांत पनवेलकर
* **गिरिजा कीर कथास्पर्धा विजेते** – पाच कथालेखक :– डॉ. सुनीता सुनील चव्हाण, प्रमोद नामदेवराव बोरसरे, सौ. शुभा प्रमोद नाईक, क्षमा गोसावी, तुळशी राम बोबडे
* **नेहमीचे सदर** – मकेचे कणीस
* **मुखपृष्ठाविषयी थोडेसे** – शांता शेळके यांच्या कवितेवरील मुखपृष्ठ आणि विवेचन
* **संपादकीय** – मराठी भाषा आणि वाङ्मय
* **व्यंगचित्रे** – दत्तात्रय शंकर म्हेतर
* **मुखपृष्ठ आणि आतील चित्ररेखाटन** – मनोज आचार्य

वितरण
मुंबई - बी. डी. बागवे आणि कं., मॅजेस्टिक बुक हाऊस
पुणे - पूनम एजन्सी, वीर न्यूज पेपर एजन्सी
नाशिक - पाठक बंधू
कोल्हापूर - एन.टी. तेग्गीनमणी

संपादक - डॉ. मधुकर केशव वर्तक
अ-९, दहिसर दर्शन, मराठा वसाहत,
देसाई रोड, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८.
भ्रमणध्वनी - ९७०२७५२५२१
ईमेल -gandhalidiwali@rediffmail.com
gandhalidiwali@gmail.com



स्वातंत्र्योत्तर
मराठी
साहित्याची
वाटचाल

•

प्रकाशन

•

# बदलते तंत्रज्ञान आणि मराठी ग्रंथप्रकाशन

**सुशील धसकटे**

**लेखक–प्रकाशक संबंध, पुस्तकविक्री, वगैरे मुद्देच वारंवार चर्चिले जातात. त्यामुळे तंत्रज्ञान, बदलती बाह्यस्थिती, शासकीय धोरणे आदींचा प्रकाशनांवर एक व्यवसाय म्हणून थेट आणि गंभीर परिणाम होतो आणि त्यामुळे प्रकाशनसंस्थांना एका विचित्र अवस्थेला–कोंडीला तोंड देत व्यवसाय सांभाळावा लागतो, हा विचार कुणाच्या मनाला स्पर्श करत नाही. किंबहुना प्रकाशकाला काही अडचणी येतात, हेच मुळी मान्य होत नाही.**

**स्वातंत्र्यानंतरच्या** मराठी प्रकाशनव्यवसायाचा विचार करताना साधारण १. १९५० ते १९९०, २. १९९० ते २०१० आणि ३. २०१० ते आजपर्यंत, असे तीन टप्पे करणे मला अधिक सयुक्तिक वाटते. अर्थात हे टप्पे एकंदर समाजस्थिती जसजशी बदलत गेली, विज्ञान–तंत्रज्ञानात नवनवीन शोध लागत गेले, त्यानुसार ढोबळमानाने केलेले आहेत. पहिला, स्वातंत्र्यानंतरच्या काळाचा टप्पा आहे. दुसरा, जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेच्या प्रारंभाचा टप्पा आहे, तर तिसरा, जागतिकीकरणोत्तर गतिशील बदलांचा टप्पा आहे. कारण बदलत्या परिस्थितीच्या रेट्यात मराठी प्रकाशनव्यवसायही बदलत–घडत गेल्याचे दिसते.

इतर सर्वप्रकारचे व्यवसाय आणि ग्रंथप्रकाशन यांमध्ये मूलभूत फरक आहे. प्रकाशन हा निव्वळ एक पैसा देणारा 'धंदा' नव्हे, तर मुळात तो खऱ्या अर्थानं–वाङ्मयीन सांस्कृतिक 'व्यवसाय' आहे. जसा अंबानी आणि टाटा यांच्यात मूलभूत फरक आहे, तसा धंदा आणि व्यवसाय यात फरक आहे. व्यवसायात व्यावसायिक 'एथिक्स'ला महत्त्व असतं. टाटा व्यवसायाची, उद्योजकाची म्हणून एक 'नीती' मानतात. या नीतीला धरून ते इथल्या समाजाप्रती, देशाप्रती

एक विशिष्ट सामाजिक बांधिलकी मानतात. अंबानींच्या दृष्टीने समाजापेक्षा धंदा-पैसा महत्त्वाचा. म्हणूनच समाजमन घडवणारा, समाजाची राजकीय, आर्थिक, ऐतिहासिक, सामाजिक, वैज्ञानिक अभिवृद्धी करणारा, माहिती आणि ज्ञान यांचा विचारप्रसार करणारा, या अर्थानं ग्रंथप्रकाशन हा 'सांस्कृतिक' आहे. त्यातून समाजाला समृद्धीच्या दिशेने घेऊन जाणं आणि सांस्कृतिक आदानप्रदान घडणं अपेक्षित आहे. त्यामुळे पुष्कळदा एखाद्या विशिष्ट विषयावरील पुस्तकात व्यवसाय म्हणून फार पैसा मिळणार नसला तरी ते पुस्तक छापून येणं महत्त्वाचं असतं. कारण ती त्या विषयाची जशी गरज असते, तशीच समाजाचीही. त्या विषयाचं ज्ञान वा विचार अभ्यासक-वाचकांपर्यंत (हा मर्यादित वर्ग असला तरीही) पोहोचवणं ही निकड असते. तसेच त्या विषयावर प्रकाश टाकायला, नव्यानं चर्चा घडवायला म्हणूनही ते पुस्तक छापणं महत्त्वाचं ठरतं. त्यामुळे तद्दन केवळ पैसे मिळवणं इतकं संकुचित लक्ष्य या व्यवसायात अभिप्रेत नाही, तर विचार आणि ज्ञानसंप्रेषण साधणं हा या व्यवसायाचा मूलभूत पाया आहे. 'लिहिणारा' आणि 'वाचणारा' यांतला 'समन्वयक' म्हणून प्रकाशकाला-प्रकाशनसंस्थांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र आपल्या समाजात प्रकाशकाकडे या दृष्टिकोनातून पाहिलं जात नाही. मुळात 'मी प्रकाशक आहे' अशी ओळख करून दिल्यावर 'म्हणजे तुम्ही काय करता?' असा प्रतिप्रश्न बहुतांश वेळा विचारला जातो. यातून 'प्रकाशन वा प्रकाशक' यांविषयीची आपल्या समाजातील लोकांची धारणा वा समज लक्षात येते. त्याला अन्यही काही कारणं आहेत, पण तूर्त त्याची चर्चा इथं करणं अप्रस्तुत आहे.

या लेखात मुख्यत: स्वातंत्र्यानंतरचे बदलते तंत्रज्ञान आणि त्या योगाने प्रकाशनव्यवसायात झालेले बदल, हा मुद्दा विवेचनार्थ घेतला आहे. कारण आजवर या अनुषंगाने फारसे बोलले/लिहिले गेलेले नाही. लेखक-प्रकाशक संबंध, पुस्तकविक्री, वगैरे मुद्देच वारंवार चर्चिले जातात. त्यामुळे तंत्रज्ञान, बदलती बाह्यस्थिती, शासकीय धोरणे आदींचा प्रकाशनांवर एक व्यवसाय म्हणून थेट आणि गंभीर परिणाम होतो आणि त्यामुळे प्रकाशनसंस्थांना एका विचित्र अवस्थेला-कोंडीला तोंड देत व्यवसाय सांभाळावा लागतो, हा विचार कुणाच्या मनाला स्पर्श करत नाही. किंबहुना प्रकाशकाला काही अडचणी येतात, हेच मुळी मान्य होत नाही.

स्वातंत्र्यानंतरच्या काळावर एक दृष्टिक्षेप टाकला तर दिसते की, भाषावार प्रांतरचनेनुसार १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि महाराष्ट्राच्या नवनिर्मितीसाठी सर्वांगीण प्रयत्न सरकारी पातळीवरून सुरू झाले. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे सुसंस्कृत, ग्रंथप्रेमी आणि विचारी व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राला मुख्यमंत्री म्हणून लाभले. यशवंतरावांनी नवमहाराष्ट्राच्या प्रगतीसाठी व्यापक दृष्टिकोनातून विचार करून काही योजना राबवल्या. त्यात मराठी भाषा, मराठी साहित्य आणि संस्कृती या दृष्टीने विविध उपक्रम आणि योजनांचा समावेश होता. यामध्ये मराठी राजभाषा धोरण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, भाषा संचालनालय, लोकसाहित्य समिती, मराठी विश्वकोश मंडळ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक आणि अभ्यासक्रम मंडळ आदींचा उल्लेख करता येईल. पुढे कालांतराने राज्य मराठी विकास संस्थाही शासकीय पातळीवर स्थापन झाली. अशा विविध उपक्रम आणि योजनांद्वारे मराठी भाषा आणि साहित्यासंबंधी शासकीय पातळीवरून काही एक ठोस प्रयत्न होऊ लागलेले दिसतात. विशेष म्हणजे विश्वकोश मंडळाकडून अनेक खंडी कोशनिर्मिती झाली, तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, भाषा संचालनालय, लोकसाहित्य समिती, राज्य मराठी विकास संस्था या शासकीय संस्थांनी मराठी साहित्य-समाज आणि संस्कृतीच्या दृष्टिकोनातून अतिशय समृद्ध आणि मोलाची ग्रंथसंपदा प्रकाशित केलेली आहे, हे आवर्जून नमूद केले पाहिजे. त्यात विविध प्रकारच्या शास्त्रीय ग्रंथांचा, शब्दकोशांचा, चरित्रपर आणि महत्त्वाच्या अनुवादित ग्रंथांचा समावेश आहे. याशिवाय संस्कृती मंडळाकडून नवलेखक अनुदान, महत्त्वाच्या ग्रंथांसाठी प्रकाशकांना अनुदान, लेखकांना पुरस्कार, ग्रंथालय संचालनालयाकडून ग्रंथभेट आणि ग्रंथखरेदी आदी अनेक योजनांचा समावेश आहे. एकंदर महाराष्ट्राच्या नवनिर्मितीमध्ये आणि मराठी ग्रंथप्रकाशनाच्या दृष्टीने या शासकीय संस्थांचे महत्त्वाचे योगदान राहिलेले आहे. महाराष्ट्राच्या जनमानसाची बौद्धिक मशागत करण्यामध्ये शासनांच्या या विविध उपक्रमांचा काहीएक वाटा आहे.

साधारणपणे १९५०-६०नंतर ग्रामीण भागात शिक्षण पोहोचण्याच्या दृष्टीने सरकारी पातळीवरून सर्वतोपरी प्रयत्नांना गती मिळत होती. विविध शैक्षणिक संस्था गावोगावी स्थापन होऊ लागल्या. नवीन विद्यापीठांची निर्मिती होत होती. त्यामुळे ग्रामीण भागातून शिक्षितांच्या, वाचणाऱ्यांच्या आणि लिहिणाऱ्यांच्या नवीन पिढ्या तयार होत होत्या. या काळात

पुणे आणि मुंबई ही दोन शहरं मराठी ग्रंथप्रकाशन-व्यवसायाची प्रमुख केंद्रे होती. किंबहुना मराठी प्रकाशन-व्यवसाय बहुतांशपणे या दोन शहरांमध्ये एकवटलेला होता, असेही म्हणता येईल. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे प्रकाशनव्यवसायाला लागणाऱ्या सर्व सुविधा पोहोचवणारे अन्य छोटेमोठे पूरक व्यावसायिक (उदा. चांगल्या मुद्रणसंस्था, टाइप फाउंड्र्या, खिळे जुळवणारे कुशल कामगार, चित्रकार, बाइंडर, कागदाचे व्यापारी, मुद्रितशोधक, ग्रंथसंपादक, पुस्तकविक्रेते इ.) पुण्यामुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. बाकी उर्वरित महाराष्ट्रातील नागपूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर आदी शहरांमध्ये पुण्या-मुंबईच्या तुलनेत तुरळक प्रमाणात प्रकाशन संस्था सुरू झालेल्या दिसतात. महाराष्ट्राबाहेर गुजरातमधील बडोदा संस्थानात महाराज सयाजीराव गायकवाड यांनी असंख्य महत्त्वाचे ग्रंथ मराठीतून प्रकाशित केलेले दिसतात. सयाजीरावांचे हे कार्य सांस्कृतिक व वाङ्मयीनदृष्ट्या अत्यंत मोलाचे आणि मराठी भाषेला समृद्ध करणारे असेच होते. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांवर सयाजीरावांचे हे फार मोठे ऋण आहेत.

१९६० ते १९९० या काळात मुद्रणालयांमध्ये सुरुवातीला लिथो मशीन्स, ट्रेडल मशीन्स, मर्चिंडिज मशीन्स आदी मशीन्स दिसतात. म्हणजे मुद्रणतंत्रात हळूहळू नवीन बदल येत होते. तो काळ लेटरप्रेसचा होता. एकेका अक्षरांचे सुटे सुटे खिळे जोडून शब्द तयार केले जात. पुण्यातील प्रभात, मुंबईतील मौज आदी अनेक संस्था टाइप फाउंड्र्या आणि मुद्रणाशी संबंधित कामे करत असत. अशा शब्दांच्या समूहाला एका साच्यात दोरीने बांधून तो साचा ट्रेडल मशीनवर चढवून छपाई केली जात असे. मशीनला वरच्या भागात मोठी गोल फिरती चकती असे. या चकतीला शाई लावली जात असे. या चकतीवर एक फिरता रोलर असे. हा शाईचा रोलर मजकुराच्या साच्यावरून हळुवार फिरत असे आणि शाई मजकुराला लागत असे. शाई लागून झाली की दरम्यान मुद्रक मशीनच्या सरफेसवर एकेक कागद ठेवत आणि मजकुराचा साचा त्यावर प्रेस होत असे. साचा प्रेस झाला की कागदावर प्रिंटिंग होत असे. यामध्ये मुद्रकाला एकेक कागद हाताने ठेवावा लागे आणि छापून झाला की काढावा लागत असे. म्हटलं तर हे काम कष्टाचे होते. गावोगाव अशा प्रिंटिंग प्रेसवर विविध प्रकारची छपाई होताना दिसू लागली. याशिवाय विविध सरकारी कार्यालयातून कार्यालयीन कामासाठी म्हणून टाइपरायटर खडखडताना दिसू लागले. एकेक अक्षराचे बटण दाबले की कागदावर अक्षरे उमटत असत.

पुढे १९८५नंतर राजीव गांधी यांनी संगणक आणि माहिती-तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करून भारताला या क्षेत्राच्या दृष्टीने स्वावलंबी बनवण्याचे धोरण अवलंबिले. त्यामुळेच आपण सुपर (परम) कॉम्प्युटर बनवू शकलो. संगणकाच्या क्षेत्रात प्रगती व्हायला लागली. परिणामी अनेक महत्त्वाच्या कार्यालयात, उद्योगांत, कारखान्यांमधून संगणक दिसू लागले. त्या काळात संगणक ही नवलाईचीच गोष्ट होती. १९९०नंतर मुक्त अर्थव्यवस्था आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आणि बदलांची ही गतीही वाढायला सुरुवात झाली. १९९० ते २००० या काळात समाजजीवनाच्या सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांत संगणक आलेले दिसतात. संगणकाचे प्रशिक्षण देणाऱ्या स्वतंत्र छोट्यामोठ्या संस्थाही सुरू झाल्या. नोकरी हवी असेल तर संगणकाचे ज्ञान आवश्यक मानले जाऊ लागले. हाच संगणक प्रकाशन व्यवसायातही आला. मात्र सुरुवातीच्या काळात संगणकाचे सगळे काम हे इंग्रजी भाषेतून चालत असे. इंग्रजीशिवाय संगणक चालवता येणे शक्य नव्हते. कारण संगणकात प्रादेशिक भाषांचे टंक (फॉन्ट) नव्हते. दरम्यान व्यक्तिगत पातळीवर यासंबंधी संशोधन होऊन प्रादेशिक भाषांतील टंकांच्या निर्मितीचे प्रयत्न सुरू झाले होते. आयआयटीमधील मोहन तांबे यांनी संगणकावर मराठी मुद्रण करता यावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नाला यश येऊन १९८९-९० साली प्रियांका नावाने मराठी फॉन्ट तयार आला. पुढे एपीएस या कंपनीने हा फॉन्ट वितरित करायला सुरुवात केली. एपीएसनंतर स्क्रीप मास्टरचे मराठी टंक आले. पुढे सॅम पित्रोदा आणि मोहन तांबे यांनी सी-डॅक या संस्थेच्या वतीने टंकनिर्मितीचे काम सुरू केले. कालांतराने डॉ. विजय भाटकर यांनीही सी-डॅकमध्ये आपले बहुमोल योगदान दिले. यानंतर वाकणकर-भट यांनी एकत्र येऊन आयटीआर नावाने टंकनिर्मिती केली. पुढे आधीच्या स्क्रीप मास्टरने श्री-लिपी या नवीन नावाने विविध प्रकारचे टंक निर्माण केले. साधारणत: १९८९-९०नंतर संगणकावर मराठी टंक येऊ लागलेले दिसतात. खिळ्यांवरील टंकांपेक्षा हे नवीन टंक दिसायला सुंदर, वळणदार होते. शिवाय त्यात विविधताही होती. लेटरप्रेसमध्ये टंकांच्या खिळ्यांचा लवाजमा सांभाळावा लागे. त्यात जुळणीचे काम कष्टप्रद होते, त्यात पुष्कळ वेळ जाई, तसे संगणकावरील टंकन कष्टप्रद नव्हते, शिवाय वेळेची बचतही व्हायला लागली.

संगणकावर मुद्रण (डीटीपी) करणे अतिशय सुलभ

झाले. त्यामुळे वेळेची आणि मानवी श्रमाची मोठ्या प्रमाणावर बचत होऊ लागली. पूर्वी मुद्रणालयांमध्ये जिथे एकेक अक्षरांचे खिळे जुळवून अक्षरजुळणी केली जात होती, तिथे संगणकावर वेगाने टायपिंग होऊ लागले. डीटीपी हा शब्द रूढ झाला. शिवाय संगणकावर चित्रे स्कॅन करणे, त्यात हवे तसे बदल करणे, हवी तशी मांडणी (लेआउट) करणे, मजकुरात हवे तसे बदल करणे, अतिशय सुकर आणि सुलभ झाले. ही बाब मराठीच नव्हे तर एकूणच ग्रंथ प्रकाशनजगताच्या दृष्टीने क्रांतिकारी अशीच होती. पुढे मुद्रणालयातून हळूहळू जुन्या वळणाच्या लेटरप्रेस मशीन जाऊ लागल्या आणि त्याची जागा ऑफसेट मशीन्स घेऊ लागल्या. साधारणत: १९७०-८०नंतर ऑफसेट मशीन्स यायला सुरुवात झाली. सिंगल कलर-टू कलर आणि आता फोर कलर असा ऑफसेटचा प्रवास आहे. असे असले तरी, सोन्याबापू ढवळे यांनी १९५० सालीच ऑफसेट मशीन आणून त्यावर मुद्रणाला सुरुवात केली होती, अशी नोंद शरद गोगटे यांनी 'मराठी ग्रंथप्रकाशनाची दोनशे वर्षे' या ग्रंथात केली आहे. ऑफसेट तंत्रज्ञानाने प्रिंटिंग क्षेत्रात मोठी क्रांती केली. कारण ऑफसेट मशीन्स या स्वयंचलित (ॲटोमॅटिक) पद्धतीने चालत. पूर्वी ट्रेडल मशीनवर छपाई करताना एकेक कागद ठेवावा लागे, ती वेळखाऊ पद्धत मोडीत निघाली. नवीन ऑफसेट तंत्रज्ञानात कागद व्यवस्थित कट करून ट्रेमध्ये ठेवला की मशीनमध्ये आपोआप कागद आत जाऊन छपाई होऊन बाहेर पडत असे. म्हणजे एकाच वेळी कागद आत जाणे आणि प्रिंट होऊन बाहेर पडणे, हे नवतंत्र आले. ऑफसेटवर केलेले मुद्रण सुबक व सफाईदार दिसते. आज ऑफसेटमध्ये खूपच अद्ययावत तंत्रज्ञान आलेले आहे. कॉम्प्युटराइज्ड, फुल्ली ॲटोमॅटिक आणि डिजिटल ऑफसेट मशीन्स आलेल्या आहेत. त्यामुळे अतिशय कमी वेळेत वेगाने छपाई होते. अर्थात छपाईची गती खूप वाढली. मुद्रणाबरोबरच बाइंडिंगच्या क्षेत्रात फोल्डिंग मशीन्स, स्टिचिंग, पिनिंग, परफेक्ट मशीन्सही आल्या. त्यामुळे पुस्तकबांधणीमध्येही मोठ्या प्रमाणात बदल झाले.

या बदलत्या तंत्रज्ञानाबरोबर मराठी ग्रंथप्रकाशन व्यवसायाला जुळवून घ्यावे लागले. अर्थात व्यक्तीला काळाची पावले ओळखून बदलावेच लागते, नाही तर ती व्यक्ती मुख्य प्रवाहातून आपोआप बाहेर फेकली जाते. जे स्वत:ला बदलवून घेत नाहीत, ते काळाच्या रेट्यात बाजूला पडतात. हे जुळवून घेणं सोपं नसतं. रेल्वे जेव्हा रूळ बदलते, तेव्हा खड्खड् असा मोठा आवाज होतो. त्याप्रमाणे नव तंत्रज्ञानाला जुळवून घेताना मुद्रण आणि मराठी ग्रंथप्रकाशनातही घडले. काळाप्रमाणे बदल करण्यात अपयश आलेल्या काही प्रकाशनसंस्था ठप्प होत गेल्या. मराठीतील ग्रंथप्रकाशन हा व्यवसाय पुष्कळसा व्यक्तिकेंद्रित - एक खांबी तंबू - असा आहे. एखाद्या व्यक्तीने संस्था सुरू करणे, उत्तमपणे चालवणे, नावारूपाला आणणे आणि ती व्यक्ती गेल्यावर (वारसांना त्यात रुची नसेल तर) ती संस्था हळूहळू बंद पडते, असा काहीसा हा प्रकार आहे. जुन्या काही प्रकाशनसंस्था बंद पडत गेल्या तशा नवनवीन संस्थाही येत राहिल्या.

आज मराठीमध्ये प्रकाशनसंस्थांची संख्या प्रचंड वाढलेली दिसते. गावोगाव विविध प्रकारच्या प्रकाशनसंस्था निघालेल्या दिसतात. म्हटले तर मराठी प्रकाशन व्यवसायाच्या दृष्टीने ही आनंदाची गोष्ट आहे. मात्र संख्यात्मक वाढ होत असली तरी ग्रंथप्रकाशनातील गुणात्मक व कसदार निर्मितीचे गांभीर्यही कमी कमी होत जाताना दिसते आहे. मजकूर टाइप करायचा, मिळाला मुद्रितशोधक तर प्रुफे वाचून घ्यायची, मुखपृष्ठ करायचे आणि पुस्तक छपाईला द्यायचे की झालं, असा हा प्रकार वाढीला लागला आहे. यात निर्मितीच्या त्या त्या टप्प्यावर पुरेसा वेळ देणे, जाणकारांचा सल्ला घेणे, त्यासंबंधीच्या चर्चा करणे, संपादकीय संस्कार करणे वगैरे वगैरे गोष्टींचा भयंकर संकोच झालेला दिसून येतो. त्यामुळे ग्रंथप्रकाशन करणे पूर्वीच्या काळापेक्षा तंत्रज्ञानामुळे तुलनेने सुलभ झालेले असले तरी पूर्वीच्या काळी ग्रंथांची असलेली दर्जात्मकता आता घसरणीला लागली आहे, हे मान्य करावे लागते.

कोणे एकेकाळी जावजी दादाजी यांनी 'निर्णयसागर'च्या माध्यमातून अतिशय सुबक, वळणदार आणि सर्व प्रकारच्या दर्जात्मक कसोटीवर उतरतील अशी ग्रंथसंपदा मराठीला दिली. सयाजीराव गायकवाड यांनी बडोद्यात अतिशय उपयुक्त आणि मोलाची ग्रंथसंपदा निर्माण केली. विचारधारा वगैरे गोष्ट क्षणभर बाजूला ठेवल्या आणि दर्जात्मक-निर्मितीच्या अंगाने पाहिलं तर, व्हीनस, ग.ल. ठोकळ प्रकाशन, य.गो. जोशी यांचे प्रसाद, चित्रशाळा, केशव भिकाजी ढवळे, मौज प्रकाशन गृह, पॉप्युलर प्रकाशन ते सर्जेराव घोरपडे यांच्या प्रेस्टिज प्रकाशनापर्यंत अशी एक उत्तम ग्रंथनिर्मितीची परंपरा दाखवता येते. ती दर्जात्मकता आणि त्यातील गांभीर्य आता हरवलेय हे खरं. यातील काही प्रकाशनसंस्थांवर प्रस्थापित-एकांगी-विशिष्ट जातवर्गाचं छापणारे म्हणून टीका केली जाते खरी, पण टीका करता

करता ही मंडळी एका विशिष्ट आवर्तात अडकली. प्रेस्टिज प्रकाशन वगळता, प्रस्थापितांच्या पुढं जाणारं ग्रंथप्रकाशनातील काम किंवा त्याला सक्षम पर्याय मात्र या टीकाकार मंडळींना यशस्वीपणे उभा करता आलेला नाही, हेही एक कटू वास्तव आहे.

गेल्या काही वर्षांतील माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आणि दळणवळणाच्या सुविधांमुळे त्या त्या क्षेत्रातील ठरावीक लोकांची मोनोपॉली मोडीत निघत आहे. त्यामुळे एकेकाळी पुणे-मुंबई ही शहरं ग्रंथप्रकाशनाचे केंद्र होती, आता हे केंद्र हळूहळू महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये सरकत आहे. औरंगाबाद, नागपूर, नाशिक, कोल्हापूर आदी शहरांमधून अनेक ग्रंथप्रकाशनांनी मूळ धरले आहे. त्यामुळे मराठी ग्रंथप्रकाशनाचा लंबक महाराष्ट्रभर हलताना, फिरताना दिसतो आहे.

प्रकाशकाची ही समन्वयकाची मूळ भूमिका बदलली तर त्या जागी केवळ 'व्यापारी' उरतो. त्यामुळे 'पैसा' हे मुख्य टारगेट म्हणून स्वीकारलं तर हा व्यवसाय निव्वळ सांस्कृतिक उरत नाही, तर तो 'धंदा' होतो. बाजार होतो. शब्दांची जागा आकडे बळकावतात आणि ह्या आकड्यांत चांगली पुस्तकं गुदमरतात. पुस्तकं गुदमरतात म्हणजे वाचकांच्या येणाऱ्या तरुण पिढ्याही चांगल्या पुस्तकांपासून वंचित राहतात. म्हणूनच काळाची पावलं नीट ओळखून त्याप्रमाणे वाचकाभिरुची विकसित करणारा प्रकाशक महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी स्वतः प्रकाशक उत्तम वाचक आणि उत्तम अभ्यासकही असावा लागतो. समाजातील होणाऱ्या बदलांकडे बारकाईनं पाहून त्याप्रमाणे आवश्यक ती पुस्तकं वाचकांसमोर ठेवणं, ही प्रकाशकाची आद्य भूमिका आहे. याचा अर्थ आर्थिक बाजूकडे पूर्णपणे दुर्लक्ष करायचं असा मात्र नव्हे. हटक्या आणि अनवट विषयांवरील पुस्तकांचं योग्य मार्केटिंग केलं तर ही अडचणही भेडसावत नाही. आजही महाराष्ट्राच्या अनेक भागांत पुस्तकं पोहोचत नाहीत. ती कशी पोहोचवायची ही युक्ती साध्य झाली की हा प्रश्नही मिटतो. प्रकाशक जी छापेल तीच पुस्तकं वाचकांनी घ्यायची-वाचायची, हा आताचा शिरस्ता आहे. त्यामुळेच तर व्यक्तिमत्त्वविकास, पाककृती, प्रेरक विचार, अमुक कसं करावं, तमुक कसं करावं अशा पुस्तकांची मोठी लाट आता आली आहे. इथं 'वाचकांना हेच आवडतं' असं सपशेल गृहीत धरलेलं असतं. अशा लाटेला भीक न घालता दर्जात्मकतेचा आग्रह सदसद्बुद्धी असलेला वाचकच धरू शकतो. म्हणूनच अशा सदसद्बुद्धी असलेल्या वाचकांची संख्या वाढवणं, ती टिकवून धरणं, काळसुसंगत दर्जात्मक लिहिणारे लेखक शोधणं, विशिष्ट विषयांवर संबंधित लेखकाकडून लिहून घेणं वगैरे कठीण व महत्त्वाचं काम प्रकाशकावर येऊन पडतं. नैतिकतेला जागत ही जबाबदारी शेवटपर्यंत लावून धरणं, हेच उत्तम प्रकाशकाचं खरं कार्य ठरतं. यासाठीच समाजस्थिती आणि वाचकांच्या मनातील गुज ओळखून केलेलं पुस्तक भलेही महागडं असेल, विषय भलेही अवघड असेल, ते त्या वाचकांपर्यंत गेलं की विक्रीसाठी फार काही करायची गरज उरत नाही. फक्त त्या त्या वाचकांपर्यंत पोहोचणं महत्त्वाचं. ही गोष्ट कष्टसाध्य, अनुभवसाध्य आहे. संयम हा यातला फार महत्त्वाचा घटक आहे. तात्पर्य, काळाची गरज ओळखून हटके वा वरवर रूक्ष वाटणारे विषयसुद्धा दमदार मांडणी-मजकुराचा दर्जा-विचारांतील नावीन्य आणि विषयाला साजेलशी निर्मिती या गोष्टींच्या बळावर आर्थिकदृष्ट्या यशस्वी ठरतात असा माझा अनुभव आहे. समाज पुढं जायला मदत होईल किंवा ज्या विषयांना कालपर्यंत कुणी स्पर्श केला नाही, असे विषय हेरून पुस्तकरूपानं आणणं, ही प्रकाशनव्यवसायातील एक महत्त्वाची बाब ठरते.

पुस्तकांचं वितरण हा एक आपल्याकडचा तापदायक प्रश्न आहे. पुस्तक छापणं ही सर्वांत सोपी गोष्ट आहे, मात्र त्याचं वितरण ही सर्वांत कठीण गोष्ट. अजूनही महाराष्ट्राचा खूप मोठा भाग पुस्तकांपासून वंचित आहे. तालुका पातळीपर्यंतसुद्धा पुस्तकं गेलेली नाहीत, तर खेड्यांपर्यंत जाणं दूरचीच गोष्ट, अशी अवस्था आहे. कारण आपल्याकडे वितरणाची अशी स्वतंत्र एकच एक युनिक व्यवस्था नाही. त्यातही ललित साहित्याची विक्री करणारे विक्रेते तर अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतके. स्वतः पुस्तकं घेऊन गावोगाव फिरावं तर आजच्या महागाईच्या काळात ते आर्थिकदृष्ट्या तोट्यात जाणारं गणित आहे. ट्रान्सपोर्टेशन, पेट्रोल-डिझेल, बसचे भाडे अव्वाच्या सव्वा वाढलेले आहेत. ग्रंथवितरणातली ही वास्तवस्थिती नीट समजून न घेता किंवा प्रत्यक्ष ग्राउंड रिॲलिटीचा काडीचा अनुभव नसताना काही लोक मात्र पुस्तकं गावोगाव पोहचत नाहीत म्हणून प्रकाशकांच्या नावानं बोंब ठोकताना दिसतात. मराठी प्रकाशनव्यवसाय कसा मागास आहे, प्रकाशकांना कसं काही कळत नाही वगैरे शेरेबाजीही केली जाते. ते त्यांचं केवळ अज्ञान आहे.

आज शिक्षणाचा तद्दन बाजार झालाय. विज्ञान-तंत्रज्ञान आता केवळ शहरांपुरतं मर्यादित राहिलेलं नाही, तर

जागतिकीकरणामुळे नवनवीन गोष्टी अल्पावधीत खेडोपाडी पोहोचतायत. या सगळ्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आणि विकासाच्या नावाखाली आपल्याकडचं समृद्ध भाषिक-सांस्कृतिक-नैसर्गिक वैविध्य मात्र सपाट होत चाललं आहे. एक विचित्र स्थिती समाजाच्या सर्वच थरांतून कॅन्सरसारखी पसरत चालली आहे. यातून नवशिक्षित पिढींमध्ये प्रचंड गोंधळाचं वातावरण तयार झालेलं आहे. 'काय धरायचं, काय सोडायचं, कसं तगायचं' असा हा कशाचीच शाश्वती नसलेला काळ गोंधळ व अस्थिरता वाढवत आहे. याचे काही वाईट परिणाम आता हळूहळू दिसत आहेत. येणाऱ्या काळात ते अधिक तीव्र व गतिमान होतील. नव्या-जुन्यातील फरकाने एक कधीही न मिटणारी दरी मात्र दिवसेंदिवस गावपातळीवर वाढत आहे. हे बदल टिपण्याचे प्रयत्न काही तरुण लेखकांकडून त्यांच्या त्यांच्या पातळीवर होत आहेत. अपवादात्मक प्रयत्न होत असले तरी एकूण बदलाचा रेटा पाहता हे काहीच नाही. अशा लेखकांना जाणीवपूर्वक शोधून त्यांचं नव्या जाणिवांचं-वेगवेगळ्या दृष्टिकोनांचं, आजच्या स्थितिगतीचं वेध घेणारं प्रबोधनात्मक लेखन छापणं महत्त्वाचं आहे. प्रकाशक म्हणून केवळ अनुवाद, लेखकाने आपल्याकडे आणून दिलेल्या आयत्या स्क्रिप्ट्स स्वीकारण्यापेक्षाही हे काम फार महत्त्वाचं आहे.

वर्षाला पन्नास-साठ पुस्तकं छापणारे लोक आहेत. त्यातली किती दीर्घकाळ टिकून राहतात? म्हणजे एकीकडे संख्या (क्वॉन्टिटी) वाढत आहे, परंतु दुसरीकडे दर्जा (क्वॉलिटी) मात्र दिवसागणीक तोळामासानं कमी कमी होत आहे. 'संख्या आणि दर्जा' यांतला अनुबंध योग्य अन्वयानंच साधता येऊ शकेल, असा विचार मात्र मांडला जात नाही. शेवटी एक प्रकाशक म्हणून आपण वाचकाकडे 'वाचक' (रीडर) म्हणून पाहणार आहोत, की 'ग्राहक' (कस्टमर) म्हणून पाहणार आहोत, हा प्रश्न खूप महत्त्वाचा ठरतो. 'वाचक' म्हणून पाहणार असू तर प्रकाशक म्हणून आपल्यावर खूप मोठी जबाबदारी येऊन पडते आणि जर 'ग्राहक' म्हणून पाहणार असू तर मग जबाबदारीचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण 'वाचक' म्हणून पाहताना आपण वाचकांना चांगलं काही देण्यासाठी, साहित्य-समाज-संस्कृतीला उन्नत करणारं लेखन देण्यासाठी बांधील राहतो. त्या पुस्तकात आपली एकप्रकारची भावनिक गुंतवणूक होत असते. आणि 'ग्राहक' म्हणून पाहताना इतर दुकानदारांप्रमाणे ग्राहकांच्या खिशातून पैसा कसा काढता येईल, हाच धंदेवाईक विचार कायम प्रबळ राहतो, साहित्य-समाज-संस्कृतीच्या उन्नतीला इथं फारसं महत्त्व नसतं. भावनिक गुंतवणूक तर नसतेच. असते ती केवळ रूक्ष व्यावहारिकता.

**– सुशील धसकटे**

भ्रमणध्वनी – ९८२२२६६९३९/ ७२४९००८८२४

## प्रतिक्रिया

प्रति,

संपादक, सहसंपादक, प्रकाशक

महोदय,

'साहित्य'चं पालटलेलं रूप लोभस तर झालं आहेच पण आतील मजकूरही वाचनीय असतो. ऑगस्ट ते ऑक्टोबर २२ च्या अंकातील 'अलक्ष लागले दिवे' या कविवर्य शंकर रामाणींवरील लेखाने वाचकांना रामाणींची चांगली ओळख होईल. 'ना. धों. महानोरांची कविता' हा लेख महानोरांना व त्यांच्या कवितेला उलगडून वाचकांसमोर मांडतो. 'कुंजण' ललित मधून एका नवीन फुलाची ओळख झाली. एकूणच अंक वाचनीय ठरला.

धन्यवाद.

**मनीष पाटील**

भ्रमणध्वनी – ९९२००४२४४१

अंक छान आलाय ('साहित्य' ऑ.स.ऑ. २०२२)

माझ्या लेखाचा आवर्जून समावेश केलात खूप छान वाटले, धन्यवाद मनापासून.

**डॉ. अनुजा जोशी**

भ्रमणध्वनी – ७७२१८१०९८६



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

वाचनसंस्कृती

•

# सार्वजनिक ग्रंथालय आणि वाचनसंस्कृती

**श्याम जोशी**

**वाचनसंस्कृती.. वाचनाची परंपरा खऱ्या अर्थानं अजूनही आपल्या महाराष्ट्रात तरी खूप चांगली रुजली आहे असे म्हणता येणार नाही. संस्कृती हा शब्दही वि.का. राजवाडे यांनी सर्व प्रथम कल्चर या इंग्रजी शब्दासाठी वापरला. त्यांना या शब्दामागे वाचनाचा संस्कार हा अर्थ अभिप्रेत होता. या अर्थानं आम्ही मराठी मंडळी जगाच्या तुलनेत खूपच मागे आहोत याचा प्रत्यय निरंतर येत असतो.**

**पुस्तकं** ही एक अद्भुत गोष्ट आहे. हजारो वर्षांपूर्वी आपले सहोदर कसे जगत होते इथपासून आपल्या जगण्याचा अर्थ नेमका काय आहे इथपर्यंत साऱ्या गोष्टींची चर्चा पुस्तकातूनच कळत जाते. त्यामुळेच की काय पुस्तकं हा वाचणाऱ्या जमातींचा बहिश्चर प्राणच म्हटलं तर अधिक न्याय्य होईल. पुस्तक वाचणं म्हणजे आपल जगणं समृद्ध करणं. लेखक त्यांचं जगणं पुस्तकातूनच आपल्याला शेअर करत असतो. संवेदनाशील माणसाच्या धमन्यांमधून हजारो वर्षं पुस्तकं वाहत आली आहेत... आणि हो, त्याच्याबरोबरच संस्कृतीसुद्धा!

वाचनसंस्कृतीला हजारो वर्षांचा इतिहास आहे. ती सार्वभाषिक आणि सार्वकालिक होती आणि असणार आहे. याचं कारण माणसाचं जगणं आणि त्याच्या पृथ्वीवर असण्याविषयीचं कुतूहल हेच होय. पुस्तक हातात येण्यापूर्वीही माणूस वाचत होताच की! झाडाच्या ढोलीमधून बाहेर आल्यावर निसर्गाचा सारा दिवाणखाना त्यांच्यासाठी उघडलेला होता... या सगळ्याशी आपलं नातं काय या प्रश्नानं तो अस्वस्थ होत गेला.. आणि जगण्याच्या अधिव्याधीतून समोरच्या आपल्यासारखाच दिसणाऱ्या

दुसऱ्या माणसाशी वागताना, त्याला समजून घेताना त्याच्याशी लढण्यापासून थेट त्याच्या मदतीला धावून जाण्यापर्यंतचा पट त्याच्या डोळ्यांसमोरच होता... भोवतालची प्राणिसृष्टी आणि माणसं यांचं आकलन होता होता तो भराभर परिस्थिती वाचू लागला... त्याचा अन्वयार्थ लावू लगला... आणि गुहाचित्रांमधून व्यक्त होऊ लागला... गुहाचित्रांचा काळ तीस हजार वर्षांपूर्वीचा आहे. चित्रांमधून व्यक्त होता होता... वाचनसंस्कृतीचा प्रारंभ झाला.

अभ्यासकांच्या मते इसवी सनापूर्वी पाचव्या शतकात एतद्देशीयांना लेखनकलेची माहिती होती. महाभारत, स्मृति, कौटिल्यीय अर्थशास्त्र इत्यादी ग्रंथांत व्यावहारिक विषयांचे अनेक उल्लेख आहेत, त्यातच लिहिण्याच्या कलेचे व लिखित पुस्तकांचे उल्लेखही जागोजागी आहेत. ६४ कलांत पुस्तक वाचनम्  असं म्हटलं आहे, तर छांदोग्य उपनिषदात अक्षर  असा स्पष्ट शब्द आढळतो. इसवी सनाच्या चौथ्या शतकापूर्वीच कापसापासून कागद बनवण्याची कला भारतीयांना अवगत झाली होती. पुस्तके लिहवून ती दान करण्याचे फार मोठे पुण्य पुराणात मानले गेले आहे. चिनी यात्रेकरू ह्यु एन संग याने निरनिराळी ६५७ पुस्तके, येथून परत जाताना चीनला नेली होती. तक्षशीला, नालंदा इत्यादी विद्यापीठांमध्ये तीन/तीन मजली पोथीशाळा होत्या. इतिहासकाळापासून थेट पेशव्यांच्या काळापर्यंत पुस्तके, पोथ्या, त्या नकलवून घेण्याचे उल्लेख सापडतात. अर्थात हा वाचनप्रवासही सरदार, राजे, संत-महंतांचे मठ, ब्राह्मणवर्ग इत्यादी वर्गापुरताच मर्यादित होता. १४३६ मध्ये गुटेनबर्गने जरी मुद्रणाचा शोध लावला तरी, भारतात पहिले मुद्रित पुस्तक करण्यासाठी १८०५ साल उजाडावे लागले. विल्यम कॅरेने छापलेले पहिले मराठी पुस्तक 'द ग्रामर ऑफ मरहट्ट लँगवेज.' पुस्तकाचे शीर्षक जरी इंग्रजी असले तरी एका पानावर इंग्रजी तर दुसऱ्या पानावर त्याचा मराठी तर्जुमा असे होते.

राजा अशोकाच्या म्हणजेच साधारण इसवी सनपूर्व पाचव्या शतकापासून शिलालेखांपासून सुरू झालेल्या या वाचनप्रवासाचं एक पर्व १८०५ साली पूर्ण झाले. भूर्जपत्र-शिलालेख-हस्तलिखितं-मुद्रित पुस्तक असे टप्पे पार करत वाचनसंस्कृती १९व्या शतकापर्यंत पोहोचली... आणि आधुनिक जगाचा, साहित्याचा, संस्कृतीचा परिचय सर्वसामान्य लोकांना झाला.

पूर्वी ग्रंथसंग्रह खाजगी मालकीचे असत. त्यांना पद्धतशीर स्वरूपही नव्हते. इसवी सन १८०४ मध्ये सर जेम्स मॅकिन्टॉश ह्यांनी एका डॉक्टरकडून त्यांचा खाजगी ग्रंथसंग्रह विकत घेतला आणि त्यातून पहिले ग्रंथालय स्थापन झाले. ह्या ग्रंथालयाचे नाव होते, 'लिटररी सोसायटी' पण हे ग्रंथालयही अधिकारी वर्गासाठी असल्याने सर्वसामान्यांना त्याचा काहीही उपयोग झाला नाही. १८२८ मध्ये पहिले सार्वजनिक ग्रंथालय रत्नागिरीत सुरू झाले. त्याचे नाव आहे 'रत्नागिरी (जिल्हा) नगर वाचनालय आजही १९४ वर्षांपासून हे ग्रंथालय सुरू आहे. महाराष्ट्रातील वाचनसंस्कृतीची पहिली पावलं सार्वजनिकपणे सर्वप्रथम कोकणात उमटली. ही १९व्या शतकातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट ठरली.

वाचनसंस्कृती.. वाचनाची परंपरा खऱ्या अर्थानं अजूनही आपल्या महाराष्ट्रात तरी खूप चांगली रुजली आहे असे म्हणता येणार नाही. संस्कृती हा शब्दही वि.का. राजवाडे यांनी सर्व प्रथम कल्चर या इंग्रजी शब्दासाठी वापरला. त्यांना या शब्दामागे वाचनाचा संस्कार  हा अर्थ अभिप्रेत होता. या अर्थानं आम्ही मराठी मंडळी जगाच्या तुलनेत खूपच मागे आहोत याचा प्रत्यय निरंतर येत असतो.

परदेशी लोकांप्रमाणे एतद्देशीय वाचनसंस्कृती समृद्ध नाही. आपल्या महाराष्ट्रात १२,०००च्या वर सार्वजनिक अनुदानित वाचनालयं आहेत. काही सन्माननीय अपवाद वगळता कोणत्या प्रकारची पुस्तकं या ग्रंथालयांमध्ये आहेत? तर ७०% कमिशन देणारी व पावत्यांमध्ये २०% कमिशन दाखवून ५०% रक्कम खिशात घालणारी अनेक ग्रंथालय आपल्याकडे आहेत. मुळात १०० वर्षं ज्या ग्रंथालयांना झाली आहेत त्या ग्रंथालयांमध्येही पन्नास वर्षांपूर्वीची पुस्तकं संदर्भाला / वाचायला उपलब्ध नाहीत. २०२२ सालामध्ये १९७० सालाची पुस्तकं वाचण्यासाठी नाहीत. ही पुस्तकं आता दुर्मिळ झाली त्यामुळे घरी देता योणार नाहीत अशा सबबी सांगितल्या जातात. ही ग्रंथालयं नेमकी कोणती वाचनसंस्कृती समृद्ध करतात?

जगाच्या तुलनेत आपण किती मागे आहोत याचं उदाहरण देतो. सर्वात जास्त अधाशी ग्रंथवाचक जपानमध्ये सापडतात. बस, रेल्वे, लोकल, मॉल मध्येही जिथे जिथे रांग लावायची असते तिथे तिथे जपानी माणूस मोबाइल-ऐवजी पिशवीतून पुस्तक काढून वाचतो. क्यूमध्ये उभं राहिल्यावर वेळ घालवण्यासाठी पुस्तकाशिवाय कोणते दुसरे साधन असणार? उभ्या उभ्याने रांगेत पुस्तक वाचत पुढे सरकणे याला मराठीत शब्द नाही. परंतु जपानी भाषेत मात्र

त्यासाठी खास शब्द आहे. तो म्हणजे टचियोमी. जगभरात सगळ्यात जास्त पुस्तकं जपानमध्ये विकत घेऊन वाचली जातात.

इतर देशांमधील पुस्तकांसंबंधीचं कुतूहल, उत्कंठा जाणीव बघितली तर पुस्तकांबाबत आपण किती मागासलेलो आहोत हे लक्षात येतं. मॉरटीमर जेरॉम अँडलर, अमेरिकन फिलॉसॉफर, जन्म २८ डिसेंबर १९०२, मृत्यू २८ जून २००१ कोलंबिया विद्यापीठाचा स्कॉलर, याच्या मनात एकदा आलं की विसाव्या शतकातील सर्वात महान ग्रंथ कोणते? असा प्रश्न स्वतःलाच विचारून १९७७ मध्ये याचं उत्तर देण्याचा प्रयत्न केला. पाश्चात्य देशांतील महान ग्रंथ म्हणून ७४ लेखकांचे ४४३ ग्रंथ त्यानं निवडले होते. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकानं ५४ खंडात ते सर्व ग्रंथ प्रकाशित केले. सात वर्षं या पुस्तकांच्या छपाईचं काम चालू होतं. अँडलरनं या ग्रंथाची जी सूची तयार केली होती तिनं दोन खंड व्यापले होते. या संपादनकार्यासाठी आठ वर्षांचा खर्च वीस लाख डॉलर एवढा झाला होता.


जगातील बहुतेक भाषांतील उत्तम वाङ्मय इंग्रजीमध्ये भाषांतरित होतं. त्यांना प्रकाशकही मिळतात. साऱ्या जगाला बहुश्रुत करण्यासाठी अथक परिश्रम करणारी लेखक-संपादक मंडळी.. आम्ही या उदाहरणातून काय शिकणार आहोत? ही सगळी ग्रंथसंपदा पाहिल्यावर आपलं अज्ञान किती भयंकर आहे या जाणिवेनं मन कुरतडत राहातेच!

वाचन, मनन, चिंतन ही माणसाच्या उत्कर्षाची साधनं आहेत. वाचन म्हणजे फक्त अक्षरवाचनच नव्हे. वाचनाची संस्कृती एकदा आपलीशी केली की समाज वाचता आला पाहिजे, देश वाचता आला पाहिजे, जगाच्या तुलनेत आपण कसे? कुठे? हेही वाचता आले पाहिजे... कारण वाचन करणं म्हणजे विचार करण्याची सवय लावणं... आणि त्यामुळे अर्थातच आपलं जगणंही समृध्द होत जातं. अशी समृद्ध वाचनसंस्कृती एकेकाळी आपल्या देशात होती. वाचनाचं माध्यम वेगवेगळी असतील पण जग समजुन घेण्याचं कुतूहल हे सनातन मूल्य आहे. १९ व्या शतकात ज्ञान सार्वजनिक झालं. ग्रंथालयांनी तुमच्या दारापर्यंत ज्ञानगंगोत्री वाचनालयांच्या माध्यमातून आणून ठेवली... पण दुर्दैवानं २१ व्या शतकात ज्ञानाऐवजी माहितीच्या गोणीच्या गोणी समाजमाध्यमांनी आपल्यापुढे ओतल्या... आणि त्या धुरळ्यात ज्ञानासक्ती वाहून गेली. गेल्या पन्नास वर्षांत नवीन कोशरचना आपल्याला करता आली नाही. रचना करण्यासाठी बैठक मारणारे हरवून गेले... आणि त्यांच्याबरोबर वाचनसंस्कृतीही आम्ही हरवून बसलो आहोत.

**– श्याम जोशी**
भ्रमणध्वनी – ९३२००३४१५६

> मराठी पहिलींत की दुसरींत मी होतों तेंव्हा 'वसईचा वेढा' हें पांच आण्यांचें एक पुस्तक मला बक्षीस मिळालें होतें. पहिल्या पानावर गणेश सखाराम खांडेकर हें नांव घालून मीं तें पुरेपूर चिताडल्यावर बक्षिसांच्या पुस्तकांत कांही ब्रह्मघोटाळा झाला आहे असें आमच्या वर्गशिक्षकांना आढळून आलें. तें पुस्तक परत करून दुसरें नेण्याविषयी हेडमास्तरांचें फर्मान सुटलें. पण त्याचीं कांही पानें फाटलीं असल्यामुळे म्हणा, सहवासजन्य प्रेमामुळे म्हणा, अथवा त्या पुस्तकांतल्या चिमाजी आप्पांच्या पराक्रमाच्या वर्णनानें माझें बालमन वीरश्रीयुक्त होऊन गेल्यामुळे म्हणा, लढावें लागलें तरी बेहत्तर आहे, पण तें पुस्तक परत करायचें नाही असा विचार त्या वेळीं माझ्या मनांत कितीतरी दिवस घोळत होता. पुढे माझा वाचनाचा नाद—छे, तें व्यसनच होतें—असा बळावला की बोलून सोय नाही.

– वि. स. खांडेकर यांनी लिहिलेल्या 'पुस्तके' या लेखातून ('साहित्य' जाने. १९४७)



स्वातंत्र्योत्तर
मराठी
साहित्याची
वाटचाल

•

संशोधन

•

# स्वातंत्र्योत्तर मराठी वाङ्मयातील संशोधनात्मक कार्य

**डॉ. मधुकर केशव वर्तक**

**संशोधन आणि समीक्षा या दोन बाजू पूरक आणि समवायदर्शक असतात. संशोधकाला आधी वाचक बनावे लागते; आणि पुढे रसिक व्हावे लागते. आणि हे रसिकत्व त्याला मूल्यमापनाकडे घेऊन जात असते. तो टीकाकार जरूर असावा, पण त्याला रसिकत्वाचा विसर पडून चालण्यासारखे नाही. त्याच्या संशोधनात वेगळा अन्वय ज्ञात होणे गरजेचे आहे. किंबहुना एखाद्या साहित्यिकाला अन्यायाने बाजूला सारले गेले असल्यास संशोधनातून त्याला न्याय देता आला पाहिजे.**

**इंग्रजी** भाषेच्या परिचयामुळे एकूण जीवनमानावर परिणाम व्हायला लागला. १९४५च्या आसपास सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रमेये बदलायला सुरुवात झाली. औद्योगिकीकरणाचे वारे वाहू लागले. स्त्रियांचा शिक्षणाकडे ओढा निर्माण व्हायला लागला. या बदलाच्या खाणाखुणा जाणवायला लागल्या. बदलणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक वास्तववादाचे चित्र उमटायला लागले. मराठी वाङ्मयात नव्या दिशा शोधण्याचे, नव्या परंपरा निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात होते. नव्या जाणिवा, नवी विचारसरणी, राहणी यांना अभिव्यक्त करणारे साहित्य प्रसिद्ध करणारी 'अभिरुची' (१९४३), 'सत्यकथा' (१९४५), छंद, साहित्य, प्रतिष्ठान, युगवाणी यांसारखी मासिके प्रसिद्ध होऊ लागली. मराठी कथेला नवा बाज आला. कवितेला आत्मभानाची जाणीव झाली. मार्क्स, फ्राईड, रसेल यांच्यासारख्या उदारमतवादी विचारांचा परिचय झाला. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे इत्यादींनी नवकथेची बीजे रुजवली. केशवसुतांनी पहिली कविता १८८५ साली लिहिली. त्यांचा मृत्यू १९०५ साली झाला. हा कालखंड (१८८५ ते १९०५) आधुनिक कवितेचा

पहिला टप्पा केशवसुतकाळ म्हणून ओळखला गेला. पुढे १९०६ ते १९२० हा कालखंड गोविंदाग्रज व बालकवींच्या कवितेचा बहराचा काळ होता. रविकिरण मंडळाची स्थापना १९२३ साली झाली. १९२१ ते १९४५ पर्यंतचा कालखंड रविकिरण मंडळाचे युग म्हणून ओळखला गेला. क्रांतीनंतरचा हा काहीसा शांत काळ म्हणून ओळखला जातो. १९४५ ते १९६० पर्यंतचा कालखंड नवकवितेचा कालखंड. या कालखंडाकडे मर्ढेकरयुग म्हणून पाहिले जाते. १९६० ते २०२२ पर्यंतचा कालखंड हा स्वातंत्र्योत्तर कालखंड म्हणजे आजपर्यंतचा कालखंड. तो साठोत्तरी कालखंड. ह्या कालखंडातच दलित साहित्याचा उगम झाला. वरील कालखंड कवितेपुरती मर्यादित असले तरी एकूणच वाङ्मयीन बदलांची नोंद घ्यायला उपयोगी पडणारे आहेत.

वाढत्या शिक्षणाच्या प्रसारामुळे जीवनपद्धतीत बदल जाणवू लागला. औद्योगिकीकरणामुळे शहरांची संख्या वाढू लागली. त्यामुळे एकत्र कुटुंबपद्धतीत बदल झाले. अर्थार्जनासाठी घराबाहेर पडणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढू लागली. त्याचा परिणाम एकत्र कुटुंबपद्धतीवर झाला. त्याचा दृश्यस्वरूपात बदल समाजजीवनात रुळलेली पारंपरिक मूल्ये, समजुती, रीतिरिवाज यांना धक्का देण्यापर्यंत झाला. मराठी वाङ्मयात त्याचे चित्र उमटू लागले. मानवतावाद, समाजवाद, मार्क्सवाद, आधुनिकतवाद यांच्या जोडीला स्त्रियांचे भावविश्व स्पष्ट करणारा स्त्रीवाद वाङ्मयात आला. स्त्रियांची मानसिकता, विचारसरणी आधुनिकवादी आकलनाने हळूहळू बदलू लागली. व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष संबंध, लैंगिकता, स्त्रियांची सुखदु:खे, त्यांच्या अंतर्मनचा वेध मराठी वाङ्मयातून स्पष्ट व्हायला लागला. ईश्वरनिष्ठ आशय आणि अभिव्यक्तीकडून मानवी मनाची स्पंदने टिपण्यापर्यंत वाङ्मयीन परिवर्तन झाले ते याच आधुनिक कालखंडात. याच कालखंडात वाङ्मयीन बदलांचा वेध घेताना प्रामुख्याने विचार झाला तो स्त्रियांच्या भावविश्वाचा. पद्मा गोळे यांच्या रचनेतून स्त्रीमनाचे हळुवार भाव वाचकांपर्यंत पोहोचले. पतीनिधनानंतरच्या स्त्रियांच्या एकाकीपणाबरोबरच पाऊस, पाणी, वादळवारा आणि निसर्गप्रतिमांतून इंदिरा संतांनी भावनांची उत्कटता व्यक्त केली. संजीवनी मराठे, शांता शेळके यांच्या रचना निसर्ग, मानव, स्त्रीपुरुषसंबंध यांना व्यापून लिहिल्या गेल्या. एकूणच स्त्रीवादी वाङ्मयीन स्त्रियांचे सारे विभ्रम परिचयाचे होत गेले; त्या साऱ्यांची नोंद या कालखंडापासून झाली, असे म्हणावे लागेल. थोडक्यात, वाङ्मयात स्त्रियांना मानाचे स्थान प्राप्त झाले.

स्वातंत्र्योत्तर मराठी वाङ्मयात गांधीजींची हत्या (१९४८), हैदराबाद मुक्तिसंग्राम (१९४८), संयुक्त महाराष्ट्राची स्थापना (१९६०) व त्याअगोदरचे असंख्य लढे, चीनचे युद्ध (१९६२), बांगलादेशचे युद्ध (१९७१), स्वातंत्र्याची गळचेपी करणारी राजकीय हेतूने प्रेरित झालेली आणीबाणी (१९७५) या घटनांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम दिसून येतो. १८५७चे बंड, त्याच वर्षी मुंबई विद्यापीठाची स्थापना, १९२० साली लोकमान्य टिळकांचा मृत्यू आणि गांधीयुगाचा प्रारंभ या घटनाही वाङ्मयात आपला ठसा उमटून गेल्या. सामाजिक असमतोलाची जाणीव आणि स्पष्ट उच्चार याच कालखंडातील साहित्यातून उमटला. दलित साहित्याने उग्र रूप धारण केले. निषेध, नकार आणि लिपीक बंधनांचे झुगारणे यांनी दलित साहित्य आक्रमक रूप धारण करू लागले. वर्षानुवर्षे दाबून राहिलेल्या भावना झोंबऱ्या शब्दांतून व्यक्त व्हायला लागल्या. समाजव्यवस्थेला खडसावून विचारण्याची प्रक्रिया चोखामेळा, त्याची पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, बहीण निर्मळा, मेहुणा बंका या चोखामेळाच्या कुटुंबातील व्यक्तींच्या लेखनातून दिसून आली. त्या काळात ही पृच्छा संयमाने व्यक्त झालेली आहे; ती ज्याच्यावर त्यांची अपार श्रद्धा होती त्या पांडुरंगाकडे. करुणा म्हटली तरी चोखोबाच्या लेखनामधून त्वेष उत्पन्न होत होता, असे श्री.म. माटे यांनी म्हटले आहे. सरळ जाब विचारणे हा चोखोबाच्या लेखनाचा गाभा होता. निर्भीड उच्चार आणि नकार यांची बीजे इथे रोवली गेली आहेत, हे जाणवते. चोखोबा अस्पृश्यतेवर आगपाखड करतो.

> वेदाशी विटाळ, शास्त्राशी विटाळ,
> पुराणे अमंगळ विटाळाची।
> जीवाशी विटाळ, शिवाशी विटाळ,
> काया अमंगळ विटाळाची।
> ब्रह्मीचा विटाळ, विष्णुशी विटाळ,
> चोखा म्हणे विटाळ आदि अंती

असे म्हणून चोखोबा 'विटाळा परते आहे कोण?' असा प्रश्न विचारतात. चोखोबापासून सुरू झालेली ही असमानतेची, अस्पृश्यतेची अदृश्य चळवळ दलित साहित्याला प्रेरणा देऊन जाते. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्यातून त्याचा दृश्यपरिणाम नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम, रावसाहेब कसबे,

शंकरराव खरात, बाबूराव बागूल, अण्णाभाऊ साठे, वामनदादा कर्डक आदींच्या लेखणीतून अंगार पेटून उठल्याचे जाणवते. त्यातून 'स्वातंत्र्य हे कोणत्या गाढवीचे नाव आहे?' असा सवाल मोठ्या उद्वेगाने नामदेव ढसाळांनी उपस्थित केला होता. दलित साहित्याने वाङ्मयीन मूल्ये नाकारली. समाजव्यवस्थेसंबंधी आपली नाराजी, आपला प्रक्षोभ आणि बंडखोरी प्रकट करण्यास सुरुवात केली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात कथा, कादंबरी, निबंध, प्रवासवर्णन, नाटक, चरित्र, आत्मचरित्र आदी वाङ्मयप्रकारांतून वाङ्मयीन परिवर्तन स्पष्ट होत गेले. ईश्वरनिष्ठ भावभावनांच्या प्रकटीकरणापासून दूर जात अभिव्यक्ती मानवी मनाची स्पंदने ठळक करू लागली. अध्यात्मबोध आणि ईश्वरनिष्ठा यांना एकप्रकारे ओहोटी लागल्यासारखे झाले. व्यक्तिलक्ष्यी विचाराने समूहवाचक जागा घेतली. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीचा पुकारा केला. थोडक्यात, ईश्वरभक्ती आणि अध्यात्मवाद यातून मराठी साहित्य व्यक्तिलक्ष्यीकडे; व्यक्तिलक्ष्यीकडून समूहलक्ष्यीकडे; समूहलक्ष्यीकडून आता तर सौंदर्यलक्ष्यीकडे वळते झाले आहे. आशय बदलले, अभिव्यक्तीचे स्वरूपही बदलले; तसा वाचकही बदलत गेला. या सर्वांच्या खाणाखुणा मराठी साहित्यातून स्पष्ट होत गेल्याचे जाणवते. दस्तऐवज म्हणून त्यांची नोंद घेणे एकूणच मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

मुंबई मराठी साहित्य संघाने बदलाचा धांडोळा घेण्याचे ठरवले. त्या दृष्टीने संशोधनात्मक कार्याचा आढावा घ्यावा असा विचार पुढे आला. साहित्य संघाच्या 'साहित्य' या त्रैमासिकाने स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एकूणच मराठी साहित्याच्या प्रत्येक दालनातील परिवर्तनाचा आलेख स्पष्टपणे अधोरेखित करावयाचे ठरवले. मुंबई मराठी साहित्य संघाचा आवाका मुंबईला केंद्रस्थानी ठेवून असल्यामुळे संशोधनाच्या कार्याचा लेखाजोखा 'मुंबई विद्यापीठा'पुरता मर्यादित ठेवावा, असा एक विचार पुढे आला. त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या मराठी विभागाकडून विद्यावाचस्पती पदवी घेणाऱ्या मंडळींनी १९४७ ते २०२२ पर्यंत साहित्याचा कोणत्या दालनातून परिवर्तनाच्या, बदलाचा अभ्यास केला आहे आणि आपले संशोधनात्मक सिद्धांत मांडले आहेत, हे जाणून घेण्याचे ठरवले. कालमर्यादा निश्चित केल्यामुळे स्वातंत्र्योत्तर कालखंडाचाच विचार करावा लागला.

'एक झाड आणि दोन पक्षी' या आत्मचरित्रात मैत्रीविषयी विश्राम बेडेकर म्हणतात, 'मराठी जीवनात आणि वाङ्मयात माणसांमधल्या सगळ्या नात्यांचे मनोज्ञ दर्शन होते. पण उत्कट बेभान करणाऱ्या मैत्रीची जाणीव दिसत नाही. ग्रीक, युरोपीय, इंग्रजी वाङ्मयात आणि इतिहासात अशा मैत्रीच्या कथा पुष्कळ. ही यारीदोस्तीची वृत्ती हिंदी मुलखात आणि मुसलमानी संस्कृतीतही 'प्रबळ'. विश्राम बेडेकरांचे आत्मचरित्र जवळजवळ निम्म्याने 'मैत्रीच्या धुक्याने' व्यापून गेले आहे. सानेगुरुजींच्या 'तीन मुले'मधील मित्र किंवा खांडेकरांच्या 'अमृतवेल'मधील मैत्रिणी आपल्याला मराठी वाङ्मयात कधीतरी भेटतात. ही वाङ्मयीन भेट आपल्या लौकिक जीवनातही घडते. या अनुषंगाने जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, श्री.ना. पेंडसे यांच्या कादंबरीतील स्त्रीजीवनाचे दर्शन हाही संशोधनाचा विषय होऊन जातो. बहुतेक संशोधकांनी ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, नामदेव, विष्णुदासनामा, स्वामी स्वरूपानंद, साहिरोबानाथ इत्यादी संतांबरोबरच खांडेकर, ह.ना. आपटे, कृ.प्र. खाडिलकर, भा.वि. वरेरकर, बा.भ. बोरकर, भा.रा. तांबे, आचार्य अत्रे, कुसुमावती देशपांडे, सानेगुरुजी, देवल, बा.सी. मर्ढेकर, नाट्यछटाकार दिवाकर, कथाकार गाडगीळ, दि.बा. मोकाशी, जयवंत दळवी, इंदिरा संत, नारायण सुर्वे, जी.ए. कुलकर्णी, वि.वा. शिरवाडकर, दुर्गाबाई भागवत, वसंधुरा पटवर्धन इत्यादी अनेक साहित्यिकांच्या कलाकृतींचा विचार संशोधनासाठी केलेला आहे. त्यांच्या रचनेतून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अंगांनी विचार/ अभ्यासकरून प्रमेये सिद्ध केली आहेत. तत्कालीन राजकीय, भौगोलिक परिस्थितीचा ऊहापोह केलेला आहे. सर्व क्षेत्रांतील परिवर्तन, बदल नेमकेपणाने टिपले आहेत. हा अभ्यास त्या त्या साहित्यिकांच्या कलाकृतीसंबंधी असला तरी तो वाङ्मयाच्या कोणत्या तरी दालनातील परिवर्तन स्पष्ट करणाराच ठरतो, यात शंका नाही. इथे आमच्यासाठी निवडलेला साहित्यिक आणि त्याच्या साहित्याचा सम्यक आलेख उभा करणे महत्त्वाचे आहे. कविता समजून घेणे म्हणजे कवितेच्या कवीला समजून घेणे, निर्मितीच्या वेळी त्याची भावावस्था समजून घेणे महत्त्वाचे आहे. हे सूत्र कमी-जास्त प्रमाणात सर्वच कलाप्रकारांना लागू होते. संशोधन आणि समीक्षा या दोन बाजू पूरक आणि समवायदर्शक असतात. संशोधकाला आधी वाचक बनावे लागते; आणि पुढे रसिक व्हावे लागते. आणि हे रसिकत्व त्याला मूल्यमापनाकडे घेऊन जात असते. तो टीकाकार जरूर असावा, पण त्याला रसिकत्वाचा विसर पडून चालण्यासारखे नाही. त्याच्या संशोधनात वेगळा अन्वय

ज्ञात होणे गरजेचे आहे. किंबहुना एखाद्या साहित्यिकाला अन्यायाने बाजूला सारले गेले असल्यास संशोधनातून त्याला न्याय देता आला पाहिजे. कवी, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, नाट्यछटाकार, चरित्रकार, निबंधकार, समीक्षक इतकेच नव्हे तर अग्रलेख, बोलीभाषा नियतकालिके, मासिके संशोधनाचे विषय झाले आहेत. शिवाय रामायण, महाभारत, लीळाचरित्र, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी, गाथा, संगीत नाटके, महानुभावपंथीय साहित्य, संशोधनाचे आकर्षण ठरले आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडात टप्प्याटप्प्यावर विविध अंगांनी नवा विचार, नवे संशोधन प्रकाशमान झाले आहे. विषयात सादृश्य जरी असले तरी अभ्यासाची दिशा वेगळी असू शकते; विचार वेगळा असू शकतो. किंबहुना कार्यकारणभाव भिन्न असू शकतो. त्यामुळे कालखंडातील वेगवेगळ्या टप्प्यावर संशोधनातील वेगळेपणा अनुभवता येतो.

शंकर गोपाळ तुळपुळे यांनी 'यादवकालीन मराठी भाषेचा भाषाशास्त्रीय विचार' प्रबंधाच्या स्वरूपात १९४१ साली केला. यादवकालीन मराठी भाषेतील सौंदर्यस्थळे नेमकेपणाने अभ्यासासाठी. त्यासाठी त्यांना न.चिं. केळकरांचे मार्गदर्शन लाभले. प्रचलित मराठी भाषेच्या दृष्टीने हा अभ्यास पुढील अभ्यासकांना मार्गदर्शक ठरला असेल, यात शंका नाही. तसाच अभ्यास गंगाधर बळवंत ग्रामोपाध्ये यांनीही केला. त्यांचा विषय होता– 'मराठी लँग्वेज इन द एटींथ सेंच्युरी अॅज रिप्रेझेंटेड इन द पब्लिशड पार्ट ऑफ द पेशवा दप्तर्स'. हा प्रबंध ग्रामोपाध्ये यांनी १९४८ साली सादर केला, तोसुद्धा न.चिं. केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली. एरवी व्यवहाराची भाषा आणि दप्तरी भाषा यातील साम्य-भेदांचाही विचार प्रबंधात झाला असावा. भाषेच्या अनुषंगाने हे दोन्ही प्रबंध दस्तऐवज आहेत. एका संशोधकाने केलेले कार्य पुढील अनेक संशोधकांना– विषय भिन्न असले तरी – उपकारच ठरत असते. दोन्ही ठिकाणी न.चिं. केळकरांची मार्गदर्शक भूमिका किंवा दृष्टी आपणांस बरेच काही देऊन जाते.

इथे एका बाबीचा ऊहापोह होणे आवश्यक आहे. संशोधकांना मार्गदर्शन करताना मार्गदर्शकाची शैक्षणिक अर्हता त्याकाळी पाहिली जात नव्हती; तर मार्गदर्शकाचा व्यासंग, त्या त्या क्षेत्रातील अनुभव आणि विद्वत्ता यांना प्रमाण मानून अधिकार प्राप्त होत होता. ह्याबाबतीत दुर्गाबाई भागवतांचे उदाहरण द्यावेसे वाटते. मुंबई विद्यापीठाने दुर्गाबाईंना विद्यावाचस्पती उपाधीने सन्मानित करावयाचे ठरवले. त्यांना विचारावयास गेलेल्या प्राध्यापिकेला त्यांनी सवाल केला, की त्यांचा प्रबंध कोण तपासणार आहे. प्राध्यापिकेकडे त्याचे उत्तर नव्हते. दुर्गाबाईंसारख्या विदुषीचा प्रबंध तपासायला तितक्याच तोलामोलाचा किंबहुना त्याहून अधिक असा वरचढ विद्वान असायला हवा, असा एकूणच दुर्गाबाईंचा सूर होता.

दुर्गाबाईंचा जातककथांचा अभ्यास होता. त्याच्या उलट सरोजिनी बाबर यांचा लोकगीते आणि लोकवाङ्मयाचा. मौखिक वाङ्मयातून त्यांनी स्त्रियांची मानसिकता स्पष्ट केली. माहेर आणि माहेरची गाणी हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय. सरोजिनी बाबर यांनी 'स्त्रियांची मराठीतील साहित्यसेवा' हा विषय घेऊन १९५१ साली के.ना. वाटवे यांच्या मार्गदर्शनखाली प्रबंध सादर केला. स्त्रियांचे भावविश्व त्यांनी उलगडून दाखवले. त्यांच्या पाठोपाठ दुर्गादास काशिनाथ संत यांनी १९५३ साली 'मराठी साहित्यातील स्त्रीजीवन' ह्या विषयावर प्रबंध सादर केला. दुर्गादास संत यांनादेखील के.ना. वाटवे यांच्याच मार्गदर्शन लाभले. इथे संशोधकांसह मार्गदर्शकाच्या मनात स्त्रीविषयक जिव्हाळा जाणवतो.

नारायण गजानन जोशी यांनी १९५२ साली रा.श्री. जोग यांच्या मार्गदर्शनाखाली 'मराठी छंदोरचना : लयतत्त्व निश्चितीच्या दृष्टीने पुनर्विचार' हा प्रबंध सादर केला. मुक्तछंदाच्या आजच्या विळख्यात हा अभ्यास किती महत्त्वाचा आहे, हे जाणणारेच समजतील. 'मूळ संस्कृत महाभारत व मोरोपंत यांचे मराठी आर्याभारत : तौलनिक अभ्यास' याचा विचार सखाराम विनायक सहस्रबुद्धे यांनी १९५२ साली ना.गो. चाफेकर यांच्या मार्गदर्शनाखाली केला. तर श्रीनिवास मधुसूदन पिंगे यांनी १९५३ साली अ.का. प्रियोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'युरोपीयनांचा मराठी भाषा वाङ्मय यांचा अभ्यास व सेवा' विषय घेऊन आपला प्रबंधात्मक अभ्यास पूर्ण केला. भाषेच्या दृष्टीने हे दोन्ही अभ्यास अभ्यासकांना पुरेसे आहेत. त्यांच्याच जोडीला १९६१ साली स.ग. मालशे यांनी 'ए लिंग्विस्टिक अँड लिटररी स्टडी ऑफ ख्रिस्तपुराण' या विषयावर आपला प्रबंध सादर केला. त्यांनाही अ.का. प्रियोळकरांचेच माार्गदर्शन लाभले. त्यांनी भाषिक आणि वाङ्मयीन मूल्ये तपासून निष्कर्ष काढले. मराठी भाषेच्या दृष्टीने हे संशोधनात्मक कार्य पूरक असेच म्हणावे लागेल.

अ.का. प्रियोळकर यांनी मीना भालचंद्र जोशी यांना 'उत्तर कोकणी बोलीचा भाषिक अभ्यास' (१९६३) पूर्ण करण्यास मार्गदर्शन केले. आजच्या प्रमाण मराठी भाषेची

पाळेमुळे बोलीभाषेत गुंतलेली आहेत. किंबहुना मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी विविध बोलीभाषात साहाय्यभूत ठरल्या आहेत. भाषिक आलेख तपासून पाहताना बोलीभाषांचा आधार घ्यावाच लागतो. सावंतवाडी, वेंगुर्ला आणि मालवणी भागातील बोलीभाषेचा अभ्यास त्यानंतर झालेला दिसून येतो. त्याचबरोबर 'ठाकर बोली', 'महादेव कोळी बोली', 'कुणारी (कादोडी)', 'मांगेला बोली', 'भिल्ल बोली', 'मालवणी बोली', 'गोमंतकीय बोली', 'उत्तर कोकणी बोली', 'ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बोली', 'कुणबी बोली', 'आगरी बोली', 'वसई भागातील सामवेदी बोली', 'मुंबईतील कोळी बोली' (या बोलीभाषेचा भाषा वैज्ञानिक अभ्यास उज्ज्वला महामंडळ यांनी केला आहे); महाराष्ट्रातील विविध भागांतील आदिवासी बोलीभाषांचा विविध भागातील आदिवासी बोलीभाषेचा विविध अंगांनी विचार झाला आहे. या बोलीभाषांचा अभ्यास मराठी भाषेच्या दृष्टीने उपकारच ठरला आहे. रमेश कुबल यांनी आदिवासी नाटकाचा विचार केला, तर मीनाक्षी सामंत यांनी आदिवासी लोककला अभ्यासातून दृग्गोचर केल्या. बोलीभाषेच्या माध्यमातून 'दशावतारी नाटके', '१९२० पूर्वीची मराठी प्रहसने' तपासून पाहता आली. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साहित्याचा विचार करताना अभ्यासकांना स्वातंत्र्यपूर्ण काळातील साहित्याचा आधार घ्यावाच लागला आहे. त्याशिवाय त्यांचा संशोधनात्मक अभ्यास पूर्ण झाला नाही.

वरील सर्व बोलीभाषात्मक अभ्यास लक्षात घेता सविता जाजोदिया यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. त्यांनी 'मराठी व राजस्थानी लोकगीते : तुलनात्मक अभ्यास' १९९४ साली म.अ. करंदीकर यांच्या मार्गदर्शनखाली पूर्ण केला. भाषा वैज्ञानिक दृष्टिकोनातून हा भाषाभगिनींचा घरोबा सांस्कृतिक अनुषंगाने महत्त्वाचा आहे. विठ्ठल बापू प्रभुदेसाई यांनी 'सतराव्या शतकातील गोमंतकीय बोली' यावर संशोधन केले. हा अभ्यास १९६५ साली अ.का. प्रियोळकर यांच्या मार्गदर्शनासाठी झाला. पाचशे वर्षांपूर्वीची गोमंतकीय बोली त्यांनी प्रकाशन आणली. अन्य भाषिक संपर्कामुळे आजची बोली बदलता वेगळा ठसा घेऊन व्यवहारात प्रचलित असेल. सतराव्या शतकाचा आढावा घेताना प्रभुदेसाई यांना खूपच मेहनत करावी लागली असेल. शिवाय जुने दस्तऐवज गोळा करण्यात श्रम आणि पैसा दोन्ही बाबतीत त्यांची दमछाकच झाली असेल. पण जे काम हाती घेतले ते पूर्णत्वास गेल्यावर त्यांना समाधान लाभले असेल. नवीन संशोधकांना त्यांनी पाया उपलब्ध करून दिला आहे, हे कुणीही नाकारणार नाही.

'१९४५ ते १९६० या काळातील साहित्यातून प्रामुख्याने नागर, पांढरपेशा नोकरदार वर्गाच्या जीवनाचेच अनुभव मोठ्या प्रमाणावर व्यक्त झाले आहेत. त्याबाहेरील अनुभवक्षेत्रांचा जो आविष्कार झाला आहे, तो मुख्यत्वे सहानुभावाच्या भावनेने होय. कामगार, दलित, शेतकरी वा ग्रामीण जीवन यांचे या काळात झालेले चित्रण मूलतः बाहेरून झाले आहे. या जीवनाचे 'आतून पाहिलेले' असे चित्रण अपवादात्मक आहे,' असे मत डॉ. वसंत पाटणकर यांनी व्यक्त केले आहे. ते संशोधन क्षेत्रालाही लागू पडते. १९८९ साली वा.ल. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली वसंत सीताराम पाटणकर यांनी 'मराठी साहित्य विचारातील जीवनवादाचा चिकित्सक अभ्यास' यावर संशोधनात्मक प्रबंध पूर्ण केला. आधुनिकतावाद, जीवनवाद, सौंदर्यवाद हे सारे पाटणकर यांचे अभ्यासाचे त्याहून जिव्हाळ्याचे विषय आहेत. सोमनाथ कोमरपंत यांनी १९९० साली 'मराठी कविता (१९२०-१९४५) चिकित्सक अभ्यास' प्रल्हाद वडेर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला.

नाट्यसमीक्षा हा एरवी दुर्लक्षित प्रांत. नाटक हे दृश्यकाव्य म्हणून आवडीचे असले तरी नाटक पुस्तकरूपाने वाचणे तसे दुर्मिळच. असे असताना नाट्यसमीक्षेच्या वाटेला सहसा न जाण्याचा वाचकांचा कल. किंबहुना एकूणच समीक्षा हा कलाप्रांत विद्यापीठीय आहे, अशी समजूत वाचकांनी करून घेतली आहे. तशा वातावरणात संध्या भट यांनी १९९३ साली सदा कऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'माधव मनोहर यांची नाट्यसमीक्षा' प्रबंधासाठी अभ्यासली. माधव मनोहर यांचे नाट्यसमीक्षेसाठी वाहिलेले 'पंचम' सदर त्या कालखंडात आवडीचे झाले होते. प्रत्येक नाट्यसंस्थेला आपल्या नाट्यप्रयोगावर माधव मनोहर यांनी लिहावे असे वाटत असे. पाश्चात्त्य नाटकांचा संदर्भ देत माधव मनोहर मराठी नाटके तपासत असत. त्यांच्या तोंडातील चिरुटाच्या धुरासकट ते नाटकांवर आगपाखड करत असत. त्यांची टीका स्वीकारण्याची मानसिकता नाट्यनिर्मात्यांकडे असायची.

नाट्यसमीक्षेचा विचार झाल्यानंतर एकूणच साहित्याच्या समीक्षेचा विचार होणे आवश्यक आहे. गंगाधर गाडगीळ आणि गंगाधर पाटील यांनी 'समीक्षा' हे दालन समृद्ध केले आहे. त्यांनी प्रयोगात्मक विचार करून काही सिद्धांत मांडले आहेत. भारती निरगुडकर यांनी गंगाधर पाटील

यांच्या मार्गदर्शनासाठी १९९५ साली 'गंगाधर गाडगीळांची समीक्षा' अभ्यासली. त्यांच्या प्रबंधाचा जरी विचार असला तरी स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एकूणच साहित्याचा परामर्श समीक्षेच्या माध्यमातून घेणे आवश्यक होते. समीक्षा हे दालन साहित्यातील सर्वच दालनांचा विचार करून त्यांना सामावून घेणारे असते. त्यामुळे हा अभ्यास मराठीच्या सर्वच दालनांना व्यापून आहे.

समीक्षेच्या अनुषंगाने तसाच अभ्यास पुष्पलता राजापुरे-तापस यांनीही केला आहे. त्यासाठी त्यांनी चि.त्र्यं. खानोलकरांची नाटके निवडली. सुधा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पुष्पलता राजापुरे-तापस यांनी २००० साली 'चि.त्र्यं. खानोलकर यांची नाटके : प्रकारलक्ष्यी समीक्षात्मक अभ्यास' या विषयावर आपला प्रबंध सादर केला. 'समीक्षात्मक' या शब्दाचे माहात्म्य येथे ध्यानात घ्यायला हवे, तसेच नाटकाचे प्रकारही. ही सारी संशोधने एकूणच मराठी साहित्याला एका उंचीवर नेऊन ठेवणारी आहेत, यात शंका नाही.

तसाच अभ्यास सरोजिनी शंकर वैद्य यांनीदेखील केला आहे. 'नाट्यछटाकार दिवाकर यांच्या साहित्याचा समीक्षात्मक अभ्यास' या विषयावर त्यांनी १९८१ साली वा.ल. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आपला प्रबंध सादर केला. अभ्यासकांबरोबरच इथे मार्गदर्शकही आपले लक्ष वेधून घेतात. गंगाधर पाटील, वा.ल. कुलकर्णी आणि सुधा जोशी ही नावे 'समीक्षे'ला जोडली गेली आहेत. शिवाय अभ्यासकांच्या बाबतीत एक साम्य लक्षात घेण्यासारखे आहे; ते म्हणजे सरोजिनी वैद्य, पुष्पलता राजापुरे-तापस आणि भारती निरगुडकर ह्या तिघीही मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या प्रमुख नात्याने परिचित होत्या.

मराठी साहित्याचा विचार करताना भाषेबरोबरच मराठी व्याकरणाचाही विचार झालेला आहे. प्रकाश परब ह्यांनी १९९४ साली 'मराठी शुद्धलेखन : परंपरा आणि पुनर्विचार' याचा अभ्यास सुभाष सोमण यांच्या देखरेखेखाली केला. मराठी भाषेचा आलेख स्पष्ट करताना शुद्धलेखनाच्या रूपाने नियमावली दुर्लक्षित करून चालण्यासारखे नाही, याची जाणीव नवीन, होतकरूंना देणे तेवढेच आवश्यक आहे.

'मराठी व्याकरण : उद्‌गम आणि विकास' हादेखील संशोधनात्मक विषय अभ्यासून झाला आहे.

सिसिलिया कार्व्हालो यांनी 'ज्ञानोदयमधून दिसणारा निबंध वाङ्‌मयाचा पूर्वरंग (१८४२-१९७४)' हा प्रबंध १९९८ साली उषा देशमुख यांच्या देखरेखखाली पूर्ण केला. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील हा वाङ्‌मयप्रकार त्यांनी हाताळला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात निबंध वाङ्‌मयप्रकारात लक्षणीय बदल झाला आहे. अनंत काणेकरांनी समृद्ध केलेला निबंध वाङ्‌मयप्रकार आज पाश्चात्त्य साहित्याच्या परिचयामुळे विकसित झालेला आपण पाहतो. त्याची पाळेमुळे सिसिलिया कार्व्हालो यांनी विशद करून पुढील अभ्यासकांना नव्या वाटा धुंडाळायला मदतच केली आहे. इथे एक बाब नमूद करावीशी वाटते. डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांच्या मार्गदर्शनाखली २०१४ साली मधुकर केशव वर्तक यांनी 'नामदेव धोंडी महानोर – कवी – एक चिकित्सा अभ्यास' हा प्रबंध पूर्ण केला. ना.धों. महानोर यांची कविता अभ्यासताना १२९० ते २००७ या कालखंडातील काव्यवाङ्‌मयप्रकारातील कविता समजून घेताना 'काव्य हे भाषेचे आद्य रूप असून गद्य हे नंतर प्राप्त झालेले भाषारूप आहे' या सिद्धांतापर्यंतचा अभ्यास पूर्ण केला.

ह्याअगोदर '१८७४ ते १९२०-मराठी काव्यविस्तार' आणि 'रविकिरण मंडळाच्या वाङ्‌मयीन कार्याचे मूल्यमापन' ह्या विषयांवर अभ्यासपूर्ण संशोधन झाले आहे. 'मराठीतील चरित्रे, आत्मचरित्रे', 'मराठी नाटक आदिपर्व', 'आधुनिक मराठी वाङ्‌मयातील वैज्ञानिक साहित्याचा चिकित्सक अभ्यास' ह्या विषयांसह 'महानुभाव पंथाचे साहित्य', 'केसोबास यांचा दृष्टांतपाठ' हे संतवाङ्‌मयातील विषय संशोधनाचे विषय झाले आहेत. १९८७ साली प्रतिभा कणेकर यांनी 'स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्रे (१८८०-१९८०) चिकित्सक अभ्यास' ह्यावर संशोधन उषा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. तर शशिकांत लोखंडे यांनी १९८४ साली ग.दि. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली 'मराठीतील सत्य, शिव, सौंदर्यविचार' हा विषय संशोधनासाठी निवडला. वृंदा कौजलीकर यांनी १९९९ साली भा.व्यं. गिरधारी यांच्या मार्गदर्शनाखाली '१९६० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी' हा विषय अभ्यासासाठी निवडला. ग्रामीण कादंबरी खऱ्या अर्थाने परिचित झाली ती याच कालखंडात. तर नंदा मेश्राम यांनी 'दलित कादंबरी – एक चिकित्सक अभ्यास' २००३ साठी संशोधनासाठी घेतला. भा.व्यं. गिरधारी यांनी त्यांना मार्गदर्शन केले. केशव मेश्राम यांच्या सहवासामुळे नंदा मेश्राम यांना या विषयाची गोडी लागणे साहजिकच आहे.

शैला गावंडे यांनी 'संतकवयित्रींचे काव्य : वाङ्मयीन अभ्यास' हा प्रबंध २००१ साली पूर्ण केला. मार्गदर्शक होते सुधाकर देशपांडे. वसंत बणकर यांनी वेगळा विचार केला. 'अस्मितादर्श नियतकालिक' या विषयावर त्यांनी प्रबंध सुभाष सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली २००३ साली सादर केला. या सर्वांपेक्षा वेगळा विचार सुरेखा नाईक यांनी केला आहे. 'प्रशासनीय मराठी : घडण आणि उपयोजनातील समस्या' हा वेगळा विषय अभ्यासासाठी घेतला. २००३ साली त्यांनी सुभाष सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध पूर्ण केला. मराठी भाषेच्या दृष्टीने आखीव, रेखीव नियमावलींना व्यवहारात आणताना साहित्यबाहेर वापरात काय काय अडचणी येऊ शकतात, त्या सर्वांचा विचार ह्या संशोधनात झाला असावा.

संशोधनात्मक कार्यात २००० सालापासून आजतागायत आमूलाग्र बदल होत आला आहे. व्यक्तिगत साहित्यिक आलेखामधून संशोधन लोककला, लोकनाट्य, लोककला, लोकगीते, बोलीभाषेचा अभ्यास, वाङ्मयात उमटलेले स्त्रीजीवन, कामगार रंगभूमी इत्यादी विविध सामूहिक विषयांकडे वळते झाले आहे. त्याचा धांडोळा घ्यावयाचा झाल्यास गोवा, वसई, नंदुरबार, धुळे, कोकण, माणदेश, विदर्भ, मराठा, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर आदी भागांतील निमशहरी आणि ग्रामीण भागांतील अभ्यासकांनी विविध विषय कसे हाताळले ते पाहण्यासारखे म्हणण्यापेक्षा अभ्यासण्यासारखे आहे.

स्नेहा सुहास प्रभू महांबरे यांनी 'उत्तर गोव्यातील सत्तरी तालुक्यातील लोककला : संहिता संकलन व चिकित्सक अभ्यास (शिमगो, घालो इत्यादी)' या विषयावर डॉ. पुष्पलता राजापुरे-तापस यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास केला. त्याअगोदर २००३ साली सूर्यकांत आजगावकर यांनी 'कोकणातील नमन-खेळे' या लोकनाट्याचा चिकित्सक अभ्यास केला होता.

मराठी वाङ्मयात पांढरपेशांचे चित्रण सुरुवातीच्या कालखंडात झाले आहे. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर तळागाळातील समाजाचे चित्रण त्यानंतरच्या वाङ्मयात उभरत गेले. त्याचा अभ्यास लता पांचाळ यांनी २०११ साली करावयास सुरुवात केली. 'मराठी साहित्यातील भटक्या-विमुक्त आणि आदिवासी समाजातले चित्रण : चिकित्सक अभ्यास' हा विषय त्यांनी निवडला. तर भटू वास यांनी २०१३ साली 'खानदेशातील अहिराणी लोककथा संहिता संकलन व चिकित्सक अभ्यास' आणि मुकुंद गोविंद कुबेर (२००९) यांनी 'प्रयोगाच्या लोककला प्रकारातील आख्यान व प्रयोग यांच्या वासुदेव व आराधीचा लोककला प्रकारातील संदर्भात्मक चिकित्सक अभ्यास' करून संशोधनकार्यात भरच टाकली आहे. यांच्या जोडीला दिलीप बासावे (२०१५) यांनी 'नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल जमातीच्या लोकथांचे संकलन व चिकित्सक अभ्यास' पूर्ण केला आहे. मराठी वाङ्मयात माणदेशातील धनगर समाजाच्या लोकसाहित्याचा अभ्यासही झालेला आहे. तसाच 'कोल्हापूर जिल्ह्यातील स्त्रीलोकगीतांचा अभ्यास'ही संशोधनाचा विषय झाला आहे. तसाच 'तेडवी संस्कृतीच्या लोकसाहित्याचा अभ्यास' हा विषयही संशोधनाचा झाला आहे.

लोकवाङ्मयाबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन दृष्टीने काही नियतकालिके विचारात घेतली आहेत. त्या नियतकालिकांना समाजमनावर काय परिणाम झाला आहे हे विशद करणारे संशोधनात्मक कार्य पाहण्यासारखे आहे. आनंद रत्नाकर अहिरे (२०१२) यांनी 'मिळून साऱ्याजणी' या मासिकाचा सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन दृष्टीने चिकित्सक अभ्यास' केला. तर रिचर्ड वाझ (२०१२) यांनी 'सुवार्ता नियतकालिकातील संपादकीय लेख, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक' अंगाने तपासले. मृदुला जयंत वाघमारे यांनी 'अस्मितादर्श नियतकालिकातील वैचारिक लेखनाचा अभ्यास' पूर्ण केला.

संशोधनात सामाजिक चळवळी, वाङ्मयीन स्थित्यंतरे, बोलीभाषांचा विचार, स्त्रीजीवन : स्वातंत्र्य आणि विकास आदी विषयांना संशोधनाने स्पर्श केलेला आहे. 'मराठी कादंबरीतील स्त्रीजीवन', 'कोकणच्या मराठी कादंबरीतील स्त्रीजीवन' या विषयांबरोबरच 'दालदी कोकणी बोली आणि चित्पावनी बोली यांचा भाषाशास्त्रीय अभ्यास' यांचादेखील विचार झाला आहे. तसाच तो गोरमाटी बोलीचाही झालेला आहे.

राजश्री कदम (२०१४) यांनी १९३०-१९७५ या कालखंडातील 'कामगार रंगभूमीवरील नाट्यसंहिता-चिकित्सक अभ्यास' डॉ. भारती निरगुडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. तसे पाहिले तर कामगार चळवळ आणि कामगार रंगभूमीकडे पाहण्याचा दृष्टिकोन तेवढा विकसित झालेला नव्हता. कामगार रंगभूमीने स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर कालखंड दुमदुमवून टाकला होता. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी हौतात्म्य पत्करलेले सामान्य कामगारच होते. हे विसरून चालण्यासारखे नाही.

कामगार नाटकाप्रमाणेच बालनाटके (आरंभ ते १९६०) यावरदेखील संशोधन झालेले आहे.

डॉ. अलका मटकर यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मवीर भाऊराव पाटील यांचा तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांचा चरित्रात्मक अभ्यास झालेला आहे. आत्मचरित्रांच्या संदर्भात 'मराठीतील लेखकपत्नींच्या आत्मचरित्रांचा चिकित्सक अभ्यास'ही पूर्ण झालेला आहे. त्याचबरोबर 'सामाजिक कार्यकर्त्यांची आत्मचरित्रे : वाङ्मयीन व सामाजिक अभ्यास' हा विषयही संशोधनाचा झालेला आहे.

संशोधनाने 'मोडी लिपी', 'मराठी व्याकरण', 'धर्मांतराचा दलित साहित्यावरील परिणाम', 'सामाजिक चळवळ आणि मराठी साहित्य अनुबंध (दलित ग्रामीण, स्त्रीवादी)' या विषयावर आपले प्रबंध सादर केलेले आहेत. तसेच, 'स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी प्रायोगिक कादंबऱ्या'ही विचारात घेतल्या आहेत.

मराठी वाङ्मय कथा, कादंबरी, नाटक, काव्य, निबंध, चरित्र-आत्मचरित्र, आत्मकथन, प्रवासवर्णन, नाट्यछटा, एकांकिका इत्यादी वाङ्मयप्रकारांनी समृद्ध आहे. नाटक आणि काव्य हे दोनच वाङ्मयप्रकार आपले आहेत. इतर वाङ्मयप्रकार कमीजास्त फरकाने परभृत वाङ्मयप्रकार म्हणून परिचयाचे झाले आहेत. १८१८ सालापासून ते सर्व मराठी साहित्याने आत्मसात केले. विकसित केले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात संशोधनात्मक अभ्यासात सर्व वाङ्मयप्रकारांवर सांगोपांग विचारही वाढीस गेला. त्या सर्वांचा धांडोळा या लेखात घेणे तसे अशक्यच. काही त्रोटक आलेख उभे केले आहेत. काहींची दखल घेणे राहूनही गेले आहे. मराठी वाङ्मयातील प्रत्येक दालनाची सारांशरूपाने दखल घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. अभ्यासकांना त्यातून प्रेरणा मिळावी हाच हेतू आहे.

सारांश, स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी वाङ्मयाची, प्रगतीची, विकासाची संशोधनात्मक दखल कोणी कशी घेतली आणि त्या कार्यात कोणाची मार्गदर्शक भूमिका कशी लाभली त्याचा हा आरसा आहे. कदाचित तो पुसट असेल पण आवश्यक आहे, असे वाटले, म्हणून...

**मराठी वाङ्मयातील 'ज्ञानपीठ' प्राप्त साहित्यिक**

मराठी भाषेत महाभारतावर आजपर्यंत उदंड लेखन आढळते. कथा, कादंबऱ्या, नाटक, वैचारिक लेख, प्रहसने इत्यादी वाङ्मयप्रकार त्यासाठी वापरात घेतले आहेत. आणि ते सर्व प्रकार हाताळताना वैचारिक, कल्पनाविलास आणि मूळ महाभारतातील घटना, कथांना धरून विविध दृष्टिकोनातून भरपूर लिहिले गेले आहे. खरे म्हणजे महाभारत हा प्रज्ञावंतांना, विचारवंतांना सदैव आव्हान देणारा विषय आहे. महाभारतातील 'ययाती' ही व्यक्तिरेखा वि.स. खांडेकर यांच्या लेखणीचा विषय झाली. खांडेकरांनी आयुष्यभर जीवनवादाची कास धरली. 'जीवनासाठी कला' हे ब्रीद त्यांनी जोपासले. त्यामुळे ययातीच्या माध्यमातून त्यांनी महाभारतातील व्यक्तिमत्त्वे तपासली, ती महाभारतातील जीवनानुभव जाणून घेण्यासाठी. त्यातून उभी राहिली ती कलाकृती म्हणजेच 'ययाती' ही महाभारतीय कादंबरी. पुढे अनेक भाषांत ती रूपांतरीत झाली. तीच पुढे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झालेली मराठीतील पहिला कलाकृती ठरली. वि.स. खांडेकर हे मराठीतील पहिले ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे साहित्यिक ठरले. पुरस्कार घेतल्यानंतर खांडेकरांना विचारण्यात आले, की त्यांच्यानंतर हा पुरस्कार कोणाला देण्यात आला? खांडेकरांनी तत्काळ उत्तर दिले, की वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रजांना पुढील पुरस्कार दिला जावा. खाडेकरांच्या कथा, कादंबऱ्या अशा विपुल लेखनातून 'ययाती' ह्या कादंबरीचा विचार झाला.

वि.वा. शिरवाडकांना विचारात घेताना त्यांच्या 'नटसम्राट' नाटकाची निवड झाली. मराठी वाङ्मयात दुसरे ज्ञानपीठ पारितोषिक लाभले ते शिरवाडकरांना. आणि कारण ठरले ते त्यांचे 'नटसम्राट' नाटक. पूर्वी नाटककारांना कवी म्हणूनच संबोधले जायचे. शिरवाडकरांची लेखणी गद्यातसुद्धा काव्यमय रूपच धारण करायची. एका अर्थाने वि.वा. शिरवाडकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार देताना वि.स. खांडेकर यांनी व्यक्त केलेल्या भावनांचाच आदर केल्यासारखे आहे.

त्यानंतर मराठीत तिसरा ज्ञानपीठ पुरस्कार कविवर्य विंदा करंदीकरांना प्राप्त झाला. त्यांचा 'अहरदर्शने' हा काव्यसंग्रह विचारात घेतला गेला. अशा रीतीने मराठीत पहिला पुरस्कार कादंबरीला, दुसरा नाटकाला आणि तिसरा कवितेला प्राप्त झाला. वि.स. खांडेकर जीवनावादी किंवा शिरवाडकर वास्तववादी तर विंदा करंदीकर तसे सौंदर्यवादीच म्हणावे लागतील.

चौथा ज्ञानपीठ पुरस्कार भालचंद्र नेमाडे यांना देण्यात आला. त्यासाठी त्यांची 'हिंदू- जगण्याची समृद्ध अडगळ' ह्या कादंबरीचा विचार झाला. नव्वदच्या शतकानंतर जहाल हिंदुत्ववादाने मांडलेल्या सांस्कृतिक राष्ट्रवादाची महाराष्ट्रात लोकप्रियता वाढली. जागतिकीकरणाच्या काळात शिक्षण,

नोकरी, व्यवसाय, माध्यमे, अशा एकूणच सार्वजनिक क्षेत्रांत इंग्रजीचे महत्त्व वाढले. शहरीकरण, इंग्रजीचे स्तोम, प्रगतीच्या नावाखाली नको ती व्यावहारिक समीकरणे, धर्माचे वाढते आकर्षण, व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच या सर्वांना पर्याय मांडण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाडे यांच्या लेखणीने केला. मराठीत राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन चर्चांना जिवंत ठेवण्यात, समृद्ध करण्यात नेमाडे यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

वरील चारही साहित्यिकांनी मराठी वाङ्मयात मोलाची भरच टाकली आहे. त्यांची अभिमानास्पद नोंद घेण्यात सर्वच मराठी वाङ्मयप्रिय रसिकांना आनंदच वाटतो.

**आभार**

डॉ. वंदना महाजन, मराठी विभागप्रमुख,
मुंबई विद्यापीठ, कालिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई
आणि मराठी विभागातील सहकारी वर्ग.

**संदर्भ**


१) स्वातंत्र्योत्तर मराठी कविता १९४५–१९९०
संपादक : वसंत पाटणकर
२) स्वातंत्र्योत्तर मराठी कविता १९६१–१९८०
संपादक – तु.शं. कुळकर्णी
३) रविकिरण मंडळाची निवडक कविता
संपा. अनुराधा पोतदार, वसंत कानेटकर
४) चिंतन शलाका – नीरजा
५) खंडोबाचे जागरण – डॉ. प्रकाश खांडगे
६) आदिवासी वारलींचे लोकसाहित्य
डॉ. किरणकुमार कवठेकर
७) मुस्लीम मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा
डॉ. नसीम एहतेशाम देशमुख
८) रंग याचा वेगळा... दत्तप्रसाद दाभोलकर
लेखन आणि जीवन – संपादक : भानू काळे

**– डॉ. मधुकर केशव वर्तक**
भ्रमणध्वनी : ९७०२७५२५२१

सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच्. डीच्या प्रबंधासाठी पाठारे प्रभु ज्ञातीचा इतिहास व त्यांच्या सामाजिक चालीरीति या विषयाचें संशोधन करण्याची संधि मला मिळाली. या विषयाचा विचार करीत असतांना पाठारे प्रभुज्ञातीचें लोकवाङ्मय मीं गोळा केलें. या वाङ्मयांत एका विशिष्ट प्रकारचीं गाणीं आढळतात. हीं गाणीं 'बायांचीं गाणीं' या नांवाने प्रभु ज्ञातींत ओळखलीं जातात. इतर प्रकारचें लोकवाङ्मयहि या जातींत पुष्कळ आढळून येतें. परंतु बायांच्या गाण्यांनीच माझें लक्ष अधिक वेधून घेतलें. देवींच्या ( Small pox ) आजाराच्या देवतांना 'बाया' म्हणतात. त्यांच्यासंबंधीचीं जीं गाणीं तीं 'बायांचीं गाणीं' होत. याच गाण्यांचा मी प्रामुख्यानें या लेखांत विचार करणार आहें.

पाठारे प्रभु ही मुंबईतील एक छोटीशी जात आहे. सर्व स्त्रीपुरुष मिळून या जातीची लोकसंख्या पांच हजारांच्या आसपास आहे. अव्वल इंग्रजी अमदानींत इंग्रजी भाषा हे लोक पहिल्याने शिकले. इंग्रजी भाषेच्या ज्ञानामुळेच, या काळांत प्रभु लोकांना मोठमोठ्या सरकारी नोकऱ्याहि मिळत. अशा रीतीने गेल्या शतकांत ही जात अत्यन्त वैभवसंपन्न अशी होती. मुंबईतील बराचसा मोठा भाग या जातीच्या लोकांच्या मालकीचा होता. सुप्रसिद्ध 'भाऊचा धक्का' हा या जातींतील कै. लक्ष्मण हरिश्चंद्रजी ऊर्फ 'भाऊ रसूल' यांनी बांधला. जातीच्या या गर्भ-श्रीमंतीचा त्यांच्या लोकवाङ्मयावर बराच मोठा परिणाम झालेला दिसतो.

व. दि. राव यांनी लिहिलेल्या 'बायां'ची गाणी या लेखातून ('साहित्य' जाने. १९४७)



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

'साहित्य'

•

# ७५ वर्षांची 'साहित्य'ची वाटचाल

**रेखा नार्वेकर**

**वाङ्मयाला वाहिलेले एक नियतकालिक प्रसिद्ध करण्याचा संघाचा उद्देश प्रथमपासूनच होता, किंबहुना त्याच उद्देशाला अनुसरून साहित्य संघाचे मुखपत्र म्हणून 'वीणा' हे मासिक १९३७च्या एप्रिल महिन्यात सुरू करण्यात आले. परंतु अनेक कारणांमुळे हे मासिक फक्त वर्षभर चालू राहिले. नंतर 'वीणा' स्थगित करण्याशिवाय संघाकडे दुसरा पर्याय उरला नव्हता. १९४७च्या जानेवारीमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या 'साहित्य' अंकाच्या संपादनाची जबाबदारी ज्येष्ठ साहित्यिक वा.रा. ढवळे यांच्याकडे सोपवण्यात आली.**

**समाजाच्या** प्रगतीचे, विकासाचे मोजमाप विविध अंगांनी होत असते. धार्मिक, आध्यात्मिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी अनेक निकषांवर ही गुणवत्ता अवलंबून असते. त्याहीपलीकडे जाऊन कलात्मकतेचे, सर्जनशीलतेचे ज्ञान आणि भान किती आहे याला अधिक महत्त्व आहे. ही सर्जनशीलता समाजमन घडवत असते. अर्थातच हे 'समाजमन' घडवण्यासाठी 'साहित्यसर्जनाची धारा' ही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मराठी समाजाला ज्या अनेक दीर्घकालीन परंपरा लाभल्या, त्यात साहित्य-निर्मितीची परंपरा लक्षवेधी आहे. मुंबई मराठी साहित्य संघाने ही परंपरा 'साहित्य' या नियतकालिकाच्या माध्यमातून जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

इसवी सन १९३४ साली मुंबईतील साहित्यप्रेमी लोक एकत्र येऊन, मुंबई मराठी साहित्यसंमेलन भरवण्याचे त्यांनी ठरवले. त्याप्रमाणे तसे संमेलन त्याच वर्षी भरवून ते यशस्वी रीतीने पारही पडले. या संमेलनास मिळालेल्या उदंड प्रतिसादामुळे साहित्यविषयक कार्य-साहित्यसंमेलने आयोजित करण्यासाठी एक मध्यवर्ती वाङ्मयसंस्था स्थापन करण्याचे ठरले. मुख्य म्हणजे डॉ. अ.ना. भालेराव

यांच्यातील उत्साह, सकारात्मक वृत्ती, संघटनकौशल्य अशा अनेक विधायक गुणांमुळे २१ जुलै १९३५ रोजी मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना झाली. १९३५ पासून साहित्यसंमेलने, नाट्यवार्षिकोत्सव, वाङ्मय-बोलपट यांवर चर्चा, वामन मल्हार जोशी स्मारक ग्रंथमाला असे विविध प्रकारचे वाङ्मयीन कार्य साहित्य संघांच्या वतीने आयोजित केले गेले आणि जानेवारी १९४७ मध्ये 'साहित्य'चा प्रथम अंक प्रसिद्ध झाला.

वाङ्मयाला वाहिलेले एक नियतकालिक प्रसिद्ध करण्याचा संघाचा उद्देश प्रथमपासूनच होता, किंबहुना त्याच उद्देशाला अनुसरून साहित्य संघाचे मुखपत्र म्हणून 'वीणा' हे मासिक १९३७च्या एप्रिल महिन्यात सुरू करण्यात आले. परंतु अनेक कारणांमुळे हे मासिक फक्त वर्षभर चालू राहिले. नंतर 'वीणा' स्थगित करण्याशिवाय संघाकडे दुसरा पर्याय उरला नव्हता.

१९४७ जानेवारी साली प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या 'साहित्य' अंकाच्या संपादनाची जबाबदारी 'पारिजात, ज्योत्स्ना, रागिणी इत्यादी मासिकांच्या संपादनाची यशस्वी धुरा सांभाळणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक वा.रा. ढवळे यांच्याकडे सोपवण्यात आली. अर्थातच या वर्षापासून. 'साहित्य' हे द्वैमासिक असावे, असे ठरवण्यात आले. साहित्यचा पहिला अंक प्रा. न.र. फाटक, प्रा. अ.बा. गजेंद्रगडकर, वि.स. खांडेकर, वामन चोरघडे, कमलाताई टिळक, वा.ल. कुलकर्णी अशा साहित्याचार्यांचे विविध विषयांवरील लेख आणि गिरीश, राजकवी यशवंत, कुसुमाग्रज, इंदिरा संत, शांता शेळके इत्यादी काव्यश्रेष्ठांच्या कवितांनी वाङ्मयीन दृष्ट्या सर्वोत्कृष्ट ठरला आहे. या अंकासाठी सुप्रसिद्ध चित्रकार बेंद्रे यांचे सुवर्णपदकप्राप्त चित्र मुखपृष्ठासाठी लाभले आहे.

मुंबई मराठी साहित्य संघाने १९५६ सालामध्ये 'साहित्य'चा वार्षिक अंक नवीन स्वरूपात प्रसिद्ध केला. संघाच्या कार्यपद्धतीतील साहित्यविषयक कार्यक्रमांचे संयोजन करणाऱ्या समितीद्वारे हे प्रकाशन करण्यात आले. 'सर्जनशील वाङ्मयाचे समालोचन' 'साहित्य'मध्ये करण्याचे ठरले तरी तीही एक आखीव मर्यादा आहे असे मुळीच नाही- तर व्यवहार आणि सोय हीच या मर्यादेमागची कारणे आहेत आणि काळाच्या ओघात 'साहित्य'चे अंतर्बाह्य स्वरूप बदलणे. 'अशक्य नाही' - असे या नव्या वार्षिकाच्या निवेदनात तत्कालीन साहित्य समितीचे कार्यवाह वसंत दावतर यांनी म्हटले आहे. याशिवाय व.पु. भागवत, श्री.पु. भागवत, द.ग. गोडसे, विजय तेंडुलकर, राम पटवर्धन, अनंत भावे इत्यादी साहित्य समिती सदस्यांचे कार्यवाह यांनी आभारही मानले आहेत. मुंबई मराठी साहित्य संघाचे त्यावेळचे अध्यक्ष प्राचार्य न.र. फाटक यांनी प्रस्तावनेमध्ये कथा, काव्य, कादंबरी, नाटके, एकांकिका, लघुनिबंध इ. साहित्यशाखांविषयीचे विवेचन करणाऱ्या 'साहित्य'चे कौतुक करून, आपुलकीच्या भावनेने साहित्यकार्याची जबाबदारी उचलल्याबद्दल प्रा. दावतर यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. दिलीप पुरुषोत्तम चित्रे, सदानंद रेगे, ज्ञानेश्वर नाडकणी, विद्याधर पुंडलिक, ल.ग. जोग या पाच मान्यवरांनी कथा-कविता-कादंबरी इत्यादी साहित्यावर समालोचन करताना १९५६ सालातील साहित्याचे साकल्याने दर्शन घडेल याचा विचार केला आहे. १९५७ सालच्या 'साहित्य'च्या वार्षिक अंकातून त्या वर्षीच्या मराठी साहित्याचा आलेख वाचकांसमोर मांडलेला आहे. विखुरलेल्या विविधस्वरूपी साहित्यमागच्या मूलभूत प्रेरणांचा शोध घेऊन त्यांची सुसूत्र मांडणी केलेली या संग्रहातील लेखांमधून आढळते. जीवनदर्शनाऐवजी जीवनसंशोधनाचे तत्त्व डोळ्यांसमोर ठेवून साहित्यातील गर्भित अर्थ सांगितला आहे.

डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी संपादन केलेला १९८६चा दिवाळी अंक आणि एप्रिल-मे-जून १९८७चा अंक - हे दोन्ही 'साहित्य'चे अंक वैशिष्ट्यपूर्ण असेच होते. परंतु प्रकृतिअस्वस्थ्यामुळे जुलै-ऑगस्ट-सप्टेंबरच्या त्रैमासिक अंकाची जबाबदारी त्यांनी रवींद्र पिंगे आणि दत्तात्रय पुंड या दोन साहित्यिकांवर सोपवली. 'मानसशास्त्र-साहित्य, स्त्रीवादी साहित्यसमीक्षा, गदिमांचे मंतरलेले दिवस इत्यादी सहा लेखांचा या अंकात समावेश आहे. त्यानंतर सप्टेंबर १९८७मध्ये डॉ. भीमराव कुलकर्णींचे निधन झाल्याने भीमरावांच्या आठवणी, त्यांची ग्रंथसंपदा, त्यांचे कार्य यांवरील श्रद्धांजली पुरवणी साहित्यच्या या अंकात समाविष्ट करण्यात आली.

मुंबई मराठी साहित्य संघातर्फे प्रसिद्ध होणारा 'साहित्य'चा अंक जागतिक मराठी परिषदेच्या निमित्ताने १२ ऑगस्ट १९८९ रोजी प्रकाशित करण्यात आला. त्यानंतर काही अपरिहार्य कारणाने 'साहित्य'चे प्रकाशन होऊ शकले नाही. त्यानंतर १९९० एप्रिल-मे-जूनचा अंक 'काव्य विशेषांक' म्हणून प्रसिद्ध करण्यात आला. मल्हार ढगे आणि पद्मा घारपुरे या मान्यवरांनी संपादनाची बाजू सांभाळली. 'माझी पहिली कविता' या विशेष आस्था

वाटणाऱ्या विषयावर शिरीष पै, नीला सत्यनारायण, दया पवार, रजनी परुळेकर, प्रवीण दवणे इत्यादी मान्यवर कवी-कवयित्रींनी सुरेख लेख लिहिले आहेत. संवेदनशील **सन** आणि प्रतिभेची देणगी त्यांच्या या लेखांमधूनही दर्शन देत राहते. १९९१ या वर्षी विनोदी साहित्य संमेलन विशेषांक, कथाविशेषांक असे नामवंत साहित्यिकांच्या लेखनाने दर्जेदार ठरलेले 'साहित्य'चे अंक निर्माण झाले. साहित्य आणि कलाक्षेत्रातील नामवंत अनेक व्यक्तींचे १९९१-९३ साल हे जन्मशताब्दी वर्ष असल्याने साहित्यचा मार्च १९९३चा अंक 'जन्मशताब्दी' विशेषांक म्हणून प्रसिद्ध करण्यात आला.

'वि.द. घाटे - एक रसिक विचारवंत' हा राम मंत्री यांनी लिहिलेला लेख, 'ना.सी. फडके यांचे साहित्य' हा सुधाकर देशपांडे यांचा लेख १९९५ च्या एप्रिल-मे-जूनच्या 'साहित्य'मध्ये जितके व्यापक दृष्टिकोनाचे ठरले तितकेच पुढील अंकातून प्रसिद्ध झालेले 'दुसऱ्या पिढीचे आत्मकथन'ही वाचकांना औचित्यपूर्ण वाटणारे आणि मोलाचे साहित्य-संदर्भ पुरवणारे आहेत. संगीतदिग्दर्शक केशवराव भोळे, लघुकथाकार शांताराम, संशोधक यू.म. पठाण, कवयित्री शिरीष पै-इंदिरा संत, गंगाधर गाडगीळ, वसंत सबनीस, डॉ. व.दि. कुलकर्णी अशा कला-साहित्यातील अनेक ज्येष्ठ-श्रेष्ठ व्यक्तींनी आपली साहित्य कार्याची वाटचाल शब्दांमधून वाचकांसमोर मांडली आहे.

१९९६ साली जानेवारी-फेब्रुवारी-मार्च या त्रैमासिक अंकापासून साहित्य संघाच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त 'साहित्य'च्या स्वरूपात थोडासा बदल करण्यात आला. मराठीतल्या ज्येष्ठ मान्यवरांना आवाहन करून 'दुसऱ्या पिढीच्या आत्मकथानासाठी' लेख मागवायचे ठरले आणि पुढे या लेखांचा संग्रह प्रसिद्ध करावा अशी योजना आखली. त्याचबरोबर 'अशी मुंबई-असे मुंबईकर' या नावाने सदर सुरू करून मुंबईनगरीचे दर्शन तसेच मुंबईकरांचे अंतरंग उलगडून दाखवण्याचा 'साहित्य'चा उपक्रम नव्याने सुरू केला. 'मराठी साहित्य जगत्' हे संदर्भविषयक सदर ही १९९६च्या प्रथम अंकापासून सुरू करण्यात आले. प्रा. वामन चोरघडे, ग.प्र. प्रधान. गिरिजा कीर, कुसुमाग्रज, रवींद्र पिंगे, प्र.श्री. नेरूरकर इत्यादी मराठी साहित्यविश्वातील नामवंतांनी 'दुसऱ्या पिढीचे आत्मकथन' सदरासाठी लेख लिहिले आहेत. मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष विजया राजाध्यक्ष यांनी अध्यक्षीय भाषणास 'समकालीन वाङ्मयीन संस्कृती' विषयावर मांडलेली निरीक्षणे उद्बोधन करणारी आहेत. १९४१ साली आयोजित केलेल्या सोलापूर येथील मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वि.स. खांडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणाचा पूर्वार्ध ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर १९९६च्या साहित्य अंकात प्रसिद्ध केला आहे. पुढील १९९७चा प्रथम त्रैमासिक अंक 'वि.स. खांडेकर स्मृती विशेषांक' म्हणून प्रकाशित झाला. या अंकात खांडेकरांची सामाजिक बांधिलकी, कथा-कादंबरी साहित्य यांवर आलेले पुरस्कारप्राप्त निबंध छापले आहेत. तसेच, त्यांच्या साहित्यातील भरीव योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. १९९७चे 'साहित्य'चे तिन्ही अंक आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टिकोनातून सरस ठरले होते. 'अनंत काणेकर यांच्या साहित्यातील आधुनिकता' हा सु.श्री. बनहट्टी यांचा शोधनिबंध, त्याचप्रमाणे १९९७-१९९८च्या संयुक्त अंकामध्ये 'आचार्य अत्रे साहित्य संस्मरण'साठी आचार्य अत्रे म्हणजेच केशवकुमार यांचे वेचक साहित्य पुन:प्रत्ययाचा आनंद वाचकांना मिळावा यासाठी 'साहित्य' अंकातून सर्वांसमोर सादर केले आहे.

मराठीत रूढ असलेले आणि रूढ होऊ पाहणारे काही भाषिक आणि पारिभाषिक शब्द मराठी भाषकांपुढे ठेवण्यासाठी 'भाषासमृद्धी' हे नवे सदर १९९८ पासून 'साहित्य'मधून सुरू करण्यात आले. जन्मशताब्दीवर्षानिमित्त नटश्रेष्ठ नानासाहेब फाटकांच्या पुण्यस्मरणानिमित्त दुर्गाबाई खोटे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, अनंत देशमुख आदी मान्यवरांचे लेख छापून नानासाहेबांना मानवंदना देण्यात आली. १९९९ साली 'साहित्य'च्या जानेवारी-फेब्रुवारी-मार्च या त्रैमासिकात ऋषितुल्य कुसुमाग्रजांच्या पुण्यस्मृतीस भावपूर्ण आदरांजली विविध लेखांतून अर्पण करण्यात आली. साहित्य संघाशी वि.वा. शिरवाडकरांचे आपुलकीचे नाते होते. मुख्य म्हणजे साहित्य संघाच्या रंगभूमीवरच ते नाटककार म्हणून समर्थपणे उभे राहिले. महाराष्ट्र कवी यशवंत, कादंबरीकार ग.त्र्यं. माडखोलकर, प्रा. रमेश तेंडुलकर इत्यादी संघाच्या निकटवर्ती साहित्यिकांना भावांजली अर्पण करत असताना १९९९च्या त्रैमासिकांतून विंदा करंदीकर, गंगाधर गाडगीळ, ना.सी. फडके, नारायण सुर्वे, भाऊ पाध्ये, अरुण साधू आदी प्रसिद्ध साहित्यिकांचे लेख समाविष्ट केले आहेत.

त्यानंतर नव्वदीच्या घरात पोहोचलेल्या दुर्गाबाई भागवतांचे अभीष्टचिंतन करताना त्यांच्या 'व्यासपर्व'शी पुनर्भेट 'साहित्य' अंकात घडवली आहे. 'साहित्यातील मुंबई' ही प्रभा गणोरकर यांनी संकलित केलेली निवडक

वेच्यांची मालिका अंकातून चालू ठेवली आहे आणि २००० या वर्षीच्या दुसऱ्या त्रैमासिकात नाट्य, संगीत, चित्रपट, वक्तृत्व अशा विविध दालनांतून मराठी संस्कृतीच्या पुण्यभूमीत नेणारे अष्टपैलू पु.ल. देशपांडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या साहित्याचे दर्शन घडवणारे अनेक लेख प्रसिद्ध केले आहेत. त्याचबरोबर जीवनातील स्वास्थ्यापेक्षा संघर्षावर श्रद्धा ठेवणाऱ्या, आंतरिक प्रेरणेशी अथंगनिष्ठा दाखवणाऱ्या इंदिराबाई संत आणि त्यांच्या कविता यांवर 'इंदिरा संत - एक संस्मरण' हा साहित्यचा अंक प्रकाशित करून त्यांच्याविषयी कृतज्ञताभाव व्यक्त केला आहे.

'साहित्य'च्या २००१ या वर्षीच्या अंकात विठ्ठल-नामदेव, ज्ञानदेव-नामदेव, नामदेव-जनाई यांच्यातल्या हृदयसंवादांचे सुरेख प्रतिबिंब प्रा. म.वा. धोंड, डॉ. अशोक कामत, वा.रा. कांत, उषा देशमुख यांच्या लेखणीतून चित्रित झालेले दिसते. २०२२चा पहिला अंक हा मुंबई मराठी साहित्य संघाचे आद्य संस्थापक व संवर्धक **कै.** अ.ना. भालेराव यांच्या जन्मशताब्दीसोहळ्याच्या निमित्ताने प्रसिद्ध करण्यात आला. रेव्ह. ना.वा. टिळक यांच्या हस्ताक्षरातील बालकवींवरचा लेख, गंगाधर गाडगीळांचा 'चांदोमामा, चांदोमामा भागलास', नीलकंठ कदमांचा 'महेश एलकुंचवारांचे एकांकिका लेखन' अशा अनेक लेखांनी २००३-२००४ सालचे 'साहित्य' अंक दर्जेदार ठरले आहेत. २००५चे जानेवारी ते मार्च हे त्रैमासिक निरंजन उजगरे यांच्या स्मृतीला अर्पण केले आहे. शंकर वैद्य, सुहासिनी कीर्तिकर, नीरजा इत्यादींनी उजगरेंच्या आठवणी लेखणीतून कथन करून त्यांच्या साहित्यकार्याचा आढावा या अंकातून घेतलेला दिसतो. कथा, काव्य, वैचारिक लेख, 'तस्मै श्री गुरवे नमः' हा अरविंद पिळगांवकरांचा पद्मश्री डॉ. दाजी भाटवडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ लिहिलेला लेख, ग्रंथसमीक्षा, महानगर साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षांची भाषणे, अनुवादपर लेख अशा विविध प्रकारच्या साहित्याने १९९६ ते २०१० या वर्षांतली 'साहित्य'ची त्रैमासिके विशेष ठरली आहेत. २०११ या वर्षीचा फेब्रुवारी -एप्रिल महिन्याचा 'साहित्य' अंक कुसुमाग्रजांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'कुसुमाग्रज विशेषांक' म्हणून प्रसिद्ध झाला आणि त्यापुढील मे ते जुलैचा अंक 'महाराष्ट्र सुवर्णमहोत्सव विशेषांक' नावाने प्रकाशित होऊन त्यातून महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून पुढील पन्नास वर्षांतील मराठी नाटक, कथा, कादंबरी, कविता या वाङ्मयप्रकाराचा दिसतो. वस्तुनिष्ठ आढावा जाणकारांनी घेतलेला 'आज साहित्यिकाची जबाबदारी' या विचारप्रवर्तक भाषणाचा काही भाग चंद्रपूर साहित्यसंमेलन अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांनी श्रोत्यांशी साधलेल्या संवादातून २०१२च्या फेब्रुवारी ते जुलै या साहित्यच्या अंकात घेतला आहे. 'साहित्य'मधील परिचय लेख, समीक्षा लेख, वैचारिक लेख इत्यादीमुळे वाचनीय साहित्य वाचकांपुढे सादर होताना दिसते. २०१३-२०१४-२०१५च्या साहित्य त्रैमासिकांतील ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री ज्योत्स्ना भोळे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांचे जीवनकार्य, अखिल भारतीय साहित्यसंमेलन अध्यक्ष आणि साहित्य संघाचे महानगर साहित्यसंमेलन अध्यक्ष यांची प्रबोधनपर भाषणे, संस्थेच्या अष्टदशकपूर्तीच्या निमित्ताने संस्थेची सकारात्मक वाटचाल, संतसाहित्य विशेषांक, अभिव्यक्तीस्वातंत्र्य विशेषांक अशा विविध समर्थ वाङ्मयामुळे सगळेच अंक विशेष ठरले आहेत. विंदा करंदीकर यांचे जन्मशताब्दीवर्ष आणि बालकवी यांचे स्मृतिशताब्दीवर्ष - इसवी सन २०१८ - आणि यासाठीच या दोन समर्थ कवींना मे ते जुलै २०१८च्या 'साहित्य' अंकातून आदरांजली अर्पण केली आहे. माणसाने माणसाविरुद्ध जाणीवपूर्वक माजवलेले हिंसेचे रणकंदन आणि कळत-नकळत निसर्गाविरुद्ध उचलेली विघातक पावले या विषण्ण स्थितीत 'सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुम्बुनि घ्यावे' म्हणणारे बालकवी आणि 'रक्तारक्तातील कोसळोत भिंती, मानवाचे अंती एक गोत्र' असे ठासून सांगणारे विंदांसारखे कवी यांचे स्मरण मराठी माणसाला ऊर्जादायी आहे. अर्थातच वा.रा. ढवळे, वसंत दावतर, डॉ. भीमराव कुलकर्णी, रवींद्र पिंगे, मल्हार ढगे, पद्मा घारपुरे, वसुंधरा पेंडसे-नाईक, उषा तांबे, उज्ज्वला मेंहेदळे, सुहासिनी कीर्तिकर, उमाकांत ठोमरे, निरंजन उजगरे, अनुपमा उजगरे, अशोक बेंडखळे, सावित्री हेगडे, सुरेखा सबनीस, नारायण लाळे या सगळ्याच मान्यवर संपादकांच्या सजग साहित्यनिरीक्षणामुळे ओघवत्या-बदलत्या कालप्रवाहातही 'साहित्य'ने आपले स्थान टिकवून ठेवलेले दिसते.

साहित्यचे प्रसिद्ध होणारे दिवाळी अंक साहित्याच्या माध्यमातून भोवतालच्या घटनांची सजगपणे नोंद घेणारे आहेतच, शिवाय संस्थापक अ.ना. भालेराव, प्रा. न.र. फाटक, वा.रा. ढवळे, कविवर्य ना.वा. टिळक, डॉ. बाळ भालेराव आदी महनीयांचे त्यांच्या कार्यातून स्मरण करून देणारे आहेत. नोबेल पुरस्कार, जनस्थान पुरस्कार, ज्ञानपीठ पुरस्कार, साहित्य संघाचे पुरस्कार अशा विविध पुरस्कारांच्या माहितीने २०१८चा 'पुरस्कार विशेषांक'

नावीन्यपूर्ण झाला आहे. संस्थेच्या अष्टदशकपर्वाची वाटचाल २०१५च्या दिवाळी अंकाने अधोरेखित केलेली दिसते. तसेच, २०२१चा 'मराठीतील बोलीभाषा' हा विशेषांकही वाचकप्रिय ठरला आहे. 'साहित्य'च्या अनेक दिवाळी अंकांना मानाचे पुरस्कार प्राप्त झाले. अर्थातच थोडाफार फरक जाणवला तरीही कालप्रवाहानुसार 'साहित्य' प्रगतीचा आलेख हा समतोल साधत पुढे पुढे जाताना दिसतोय. ७५ वर्षांच्या प्रवासात मराठी साहित्य विश्वात - समाजाच्या प्रगतीचे निकष तपासण्यासाठी, नवनवीन जीवनसूत्रे वेचण्यासाठी 'साहित्य'चे योगदान हे अपूर्व आहे असेच म्हणता येईल.

**– रेखा नार्वेकर**

भ्रमणध्वनी – ९८२००९०२६९

## 'साहित्य'ची बदलती रूपे (१९५६ ते १९९४)

| वर्ष | अंक | विषय | संपादन |
|---|---|---|---|
| १९५६ | वार्षिकांक | ललित वाङ्मयाचे वार्षिक समालोचन | प्रा. वसंत दावतर |
| १९५७ | वार्षिकांक | ललित वाङ्मयाचे वार्षिक समालोचन | प्रा. वसंत दावतर |
| १९८२ | दिवाळी अंक | प्रा. न.र. पाटक स्मृती विशेषांक | उमाकांत ठोमरे |
| १९८३ | दिवाळी अंक | डॉ. अ.ना. भालेराव स्मृती विशेषांक | उमाकांत ठोमरे/रमेश मंत्री |
| १९८६ | दिवाळी अंक | हीरकमहोत्सव विशेषांक | डॉ. भीमराव कुळकर्णी/केशव मेश्राम |
| १९८७ | एप्रिल-मे-जून | कथाविमर्श - वि.वा. शिरवाडकर यांना अर्पण | डॉ. भीमराव कुळकर्णी |
| १९८७ | जुलै-ऑ.-सप्टें. | डॉ. भीमराव कुळकर्णी श्रद्धांजली अंक | रवींद्र पिंगे/दत्तात्रय पुंडे |
| १९८९ | वार्षिकांक | जागतिक मराठी परिषदेच्या निमित्ताने | वसुंधरा पेंडसे-नाईक/रवींद्र पिंगे |
| १९९० | एप्रिल-मे-जून | काव्य विशेषांक | पद्मा घारपुरे |
| १९९० | जुलै-ऑ.-सप्टें. | श्री ज्ञानेश्वरी विशेषांक | शि.मो. घैसास/पद्मा घारपुरे |
| १९९० | ऑ.-नो.-डि. | ६४व्या साहित्य संमेलनानिमित्त पारितोषिक प्राप्त कथा, कविता | वसुंधरा पेंडसे-नाईक |
| १९९१ | एप्रिल-मे-जून | विनोदी साहित्य संमेलन विशेषांक | उज्ज्वला मेहेंदळे/सावित्री हेगडे |
| १९९१ | जुलै-ऑ.-सप्टें. | कथा विशेषांक | रमेश मंत्री |
| १९९२ | जाने.-फेब्रु.-मार्च | ६५ अखिल भारतीय साहित्यसंमेलन विशेषांक | पद्मा घारपुरे |
| १९९३ | जाने.-फेब्रु.-मार्च | जन्मशताब्दी विशेषांक | उज्ज्वला मेहेंदळे |
| १९९४ | जाने.-फेब्रु.-मार्च | - | पद्मा घारपुरे |
| १९९४ | एप्रिल-मे-जून | - | पद्मा घारपुरे |
| १९९४ | जुलै-ऑ.-सप्टें. | - | पद्मा घारपुरे |

अंक प्रकाशन खंडित :
१९५८-१९८१ / १९८४-८५ / १९८८ / १९९१ जाने.-फेब्रु.-मार्च / १९९१ ऑ.-नोव्हें.-डिसें., / १९९२ एप्रिल-मे-जून / १९९२ जुलै-ऑग.-सप्टें. / १९९२ ऑ.-नो.-डि. / १९९३ एप्रिल ते डिसेंबर / १९९४ ऑ.-नो.-डि./ १९९५ जाने.-फेब्रु.-मार्च

(संकलक – वसंत ठुकरुळ)

## जाने. १९४७ ‘साहित्य’च्या पहिल्या अंकाची अनुक्रमणिका – वाचकांच्या माहितीसाठी

साहित्य
जानेवारी १९४७

मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने

# साहित्य

: संपादक : वा. रा. ढवळे

‘ सरस्वती ’
मुंबई नं. ४

किंमत
२॥
रुपये


५॥ अंकात —


| | पृष्ठ |
|---|---|
| | एक |
| श्री. वा. रा. ढवळे | तेरा |
| प्रा. न. र. फाटक | एकोणीस |
| लेफ्टनंट कर्नल प्राचार्य अ. बा. गजेंद्रगडकर | तेहतीस |
| श्री. वि. स. खांडेकर | एकोणचाळीस |
| कै. ना. मा. सन्त | चव्वेचाळीस |
| प्रा. वामन चोरघडे | एकोणपन्नास |
| प्रा. ना. सी. फडके | त्रेसष्ट |
| श्री. शामराव निल्कंठ ओक | एकोणसत्तर |
| सौ. कमलाबाई टिळक | पंचाहत्तर |
| प्रा. अनंत काणेकर | एक्यांएशीं |
| प्रा. श्री. के. क्षीरसागर | एक्याण्णव |
| प्रा. वा. ल. कुळकर्णी | एकशें एक |
| श्री. रा. भि. जोशी | एकशें तेरा |
| श्री. शं. वा. किर्लोस्कर | एकशें एकोणवीस |
| श्री. दि. वि. काळे | एकशें चव्वीस |
| श्री. के. नारायण काळे | एकशें अठ्ठावीस |
| श्री. गो. वा. पाध्ये | |
| गिरीश, राजकवि यशवन्त, कुसुमाग्रज, वसंतराव चिंधडे, कान्त, वा. रा. ढवळे, सौ. शालिनी सोमण, कु. ब. निकुम्ब, रा. अ. काळेले, इंदिरा सन्त, ना. घ. देशपांडे, पु. शि. रेगे, श्रीकृष्ण पोवळे, शान्ता शेळके, | एकशें तीस ते एकशें पंचेचाळीस |
| डॉ. प्रा. व. दि. राव | एकशें पंचेचाळीस |
| श्री. प्रभाकर पाध्ये | एकशें एकसष्ट |
| श्री. पु. भा, भावे | एकशें एकोणऐशीं |
| श्री. पु. ल. देशपांडे | एकशें शाऐंशी |


मुखपृष्ठावरील चित्र सुप्रसिद्ध चित्रकार बेंद्रे यांनीं काढलेलें आहे. या चित्राला मुंबईच्या चित्रकला प्रदर्शनांत सुवर्णपदक मिळालेलें आहे. हें चित्र ‘ साहित्या ’ साठीं दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या अंकाची सजावट सुप्रसिद्ध चित्रकार श्री. द. ग. गोडसे यांनी केलेली आहे.

पुष्प पहिलें



स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याची वाटचाल

•

साहित्य संघ

•

# मुंबई मराठी साहित्य संघाची स्वातंत्र्योत्तर वाटचाल

**डॉ. उज्ज्वला मेहेंदळे**







**स्वातंत्र्योत्तरकाळात** मराठी साहित्य आणि संस्कृती यात अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या संस्थांमध्ये मुंबई मराठी साहित्य संघ ही संस्था महत्त्वाची मानली जाते. आपल्या ८७ वर्षांच्या काळामध्ये या दोन्ही क्षेत्रांत बहुमोल अशी कामगिरी केली आहे आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात तर साहित्य संघाने आपल्या साहित्यिक कार्यक्रमांनी आणि उत्तमोत्तम नाटकांनी लोकांच्या कानांना आणि डोळ्यांना तृप्त करण्याचे फार मोठे कार्य केले.

मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना ही खऱ्या अर्थाने २१ जुलै १९३५ रोजी झाली आहे. या ८७ वर्षांतला साहित्य संघाच्या कार्याचा अवाका खूप विस्तृत आहे. डॉ. अमृत नारायण भालेराव यांनी एका ध्यासाने प्रवृत्त होऊन आपल्या राहत्या घरातच या संस्थेची स्थापना केली. अनेक सहकाऱ्यांचे हात त्यांच्या मदतीला आले आणि त्यांच्या अथक मेहनतीला फळ येऊन आजचा 'साहित्य संघ' आपल्यापुढे उभा आहे.

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात अनेक प्रकारच्या व्याख्यानमाला, १९३८ साली घेतलेले मराठी साहित्य-संमेलन, मराठी अभ्यासक्रमाचे वर्ग, पत्रव्यवहारासाठी

साहित्य संघाची वैशिष्ट्यपूर्ण संघमुद्रा या सगळ्याबरोबर १९४४ मध्ये मेडिकल कॉलेजच्या जिमखान्यावर आठ हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत केलेला भव्य नाट्योत्सव, सुरुवातीला 'वीणा' या नावाने आणि पुढे 'साहित्य' असा नामबदल करून आजपर्यंत चालू ठेवलेले मुंबई मराठी साहित्य संघाचे मुखपत्र अशा विविध उपक्रमांतून मुंबई मराठी साहित्य संघाने साहित्य आणि नाट्य दोन्ही क्षेत्रांत आपला ठसा महाराष्ट्रातील लोकांच्या मनावर उमटवायला सुरुवात केली. मात्र १९५० पासून मुंबई मराठी साहित्य संघाने खऱ्या अर्थाने प्रगतीचा धडाका सुरू केला. यात सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुंबई मराठी साहित्य संघाने स्वत:ची वास्तू उभारण्यासाठी जमीन खरेदी केली. या जागेचे भूमीपूजन न.वि. गाडगीळांनी केले आणि त्याचे पौरोहित्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. पैशांची जमवाजमव होऊन १९६० साली साहित्य संघाच्या सध्याच्या वास्तूची कोनशिला बसवली गेली. परंतु ती पाहण्यासाठी डॉ. अमृत नारायण भालेराव राहिले नाहीत. साहित्य संघाला सर्वस्व मानणारे डॉ. अ.ना. भालेराव यांचे २५ ऑगस्ट १९५५ रोजी अकाली निधन झाले. ज्या संस्थेसाठी त्यांनी तनमनधन दिले त्या संस्थेच्या वास्तूचे दर्शन मात्र त्यांना झाले नाही. पण त्यांची स्वप्नपूर्ती करण्यासाठी डॉक्टरांच्या सर्व सहकाऱ्यांनी चंग बांधला आणि १९६४ मध्ये मुंबई मराठी साहित्य संघाची इमारत पूर्ण झाली. आणि दिवसेंदिवस महाराष्ट्रातील एक अग्रगण्य साहित्य-नाट्यसंस्था म्हणून त्या संस्थेने नाव मिळवले.

मुंबई मराठी साहित्य संघाची स्वातंत्र्योत्तर ७५ वर्षांतील अमूल्य कामगिरी वर्णन करण्यासाठी एखादा ग्रंथच लिहायला लागेल. मात्र या कामगिरीचा थोडासा धांडोळा आपण घेऊ शकतो. स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्यास खूपच झळाळी आली. मराठी साहित्याची आणि साहित्यिकांची मुंबईतील लोकांना मुंबई मराठी साहित्य संघाने उत्तम प्रकारे ओळख करून दिली. सुरुवातीला उपनगर संमेलन या नावाने मान्यता पावलेली आणि आता महानगर संमेलने या नावाने साहित्य संघाने आतापर्यंत संमेलने घडवून आणली. युवक-युवतींना मराठी भाषेची गोडी लागावी आणि त्यांच्यातील सुप्त साहित्यिक प्रतिभा जागृत व्हावी यासाठी साहित्य संघाने वेगवेगळ्या महाविद्यालयांमधून एकूण १४ महाविद्यालयीन संमेलने घेतली. ज्याला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. गेल्या काही वर्षांपासून शालेय संमेलने घेण्यासही संघाने सुरुवात केली आहे. कोरोनाच्या संकटापूर्वी चेंबूरच्या शाळेत असे शालेय संमेलन घेतले आणि या वर्षी दादरच्या राजा शिवाजी विद्यालय या शाळेत असे शालेय संमेलन होणार आहे.

मुंबई मराठी साहित्य संघात घेतल्या जाणाऱ्या व्याख्यानमाला हा तर पूर्वीपासून मराठी लोकांना वाटणाऱ्या आकर्षणाचा भाग होता. वा.म. जोशी व्याख्यानमाला, डॉ. अ.ना. भालेराव व्याख्यानमाला, जयंत साळगावकरांनी सुरू केलेली अमृत व्याख्यानमाला या व्याख्यानांमधून अनेक विचारवंतांचे विचार श्रोत्यांपर्यंत आणि मग पुस्तकरूपाने वाचकांपर्यंत पोहोचवले आहेत.

साहित्य संघाने साहित्याच्या अभ्यासकांना उपयोगी पडतील अशी अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत. 'साहित्य संघाची पन्नास वर्षे', 'अमृत नाट्यगाथा', 'अमृतस्मृती', 'एका पिढीचे आत्मकथन', 'दुसऱ्या पिढीचे आत्मकथन', 'तिसऱ्या पिढीचे आत्मकथन भाग १ व २', 'मराठी बोलू कौतुके', 'ज्ञानतपस्वी रूद्र', 'नाट्य सूर्यमाला', 'मराठी साहित्य सूर्यमाला', 'महानगर साहित्यसंमेलने अध्यक्षीय विचार', 'इये मराठीचिये नगरी', 'बालसाहित्य - स्वरूप आणि व्याप्ती' ही सगळी साहित्य संघाची प्रकाशने आहेत. 'साहित्य' त्रैमासिक आणि साहित्यचा दिवाळी विशेषांक ही तर साहित्यप्रेमींसाठी एक पर्वणीच आहे. साहित्यच्या दिवाळी अंकांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

साहित्य संघाचा एक विशेष कार्यक्रम म्हणजे अमराठी लोकांना मराठी भाषा शिकवण. हा उपक्रम कोरोना काळातही ऑनलाइन चालू होता. परदेशातील काही लोकांनीही याचा उपयोग करून घेतला. 'अक्षरसाहित्य' या संघाच्या उपक्रमातूनही छोट्या प्रमाणावरची कविसंमेलने, पुस्तकप्रकाशने, विविध विषयांवरची व्याख्याने आयोजित केली जात असत. 'कोरोना' महामारीमुळे हा कार्यक्रम साहित्य संघाला बंद करावा लागला. नामांकित साहित्यिकांची जन्मशताब्दी साजरी करणे हा साहित्य संघाचा खास उपक्रम. ग.दि. माडगूळकर, पु.ल. देशपांडे, शांताबाई शेळके यांच्यावर अलीकडच्या काळात कार्यक्रम झालेत.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळापैकी एक महत्त्वाची घटक संस्था म्हणून मुंबई मराठी साहित्य संघ नेहमी कार्यरत असतो. दर दहा वर्षांनी महामंडळाचे कार्यालय साहित्य संघाकडे येते. आणि साहित्य संघाचे सदस्य हे कार्य उत्तम प्रकारे सांभाळतात.

दरवर्षी दिले जाणारे 'साहित्य गौरव पुरस्कार' हे साहित्यिकांना फार महत्त्वाचे वाटतात. मुंबई मराठी साहित्य संघाच्या वर्धापनदिनाच्या दिवशी हे पुरस्कार दिले जातात.

मुंबई मराठी साहित्य संघ असे या संस्थेचे नाव असले तरी साहित्य संघाची नाट्यशाखा ही साहित्यशाखेइतकीच किंवा त्याहीपेक्षा पूर्वीपासून फार मोठ्या प्रमाणावर कार्य करत आहे. नाट्यशाखेने दिलेले पुरस्कार हे नाट्य कलावंतांना फार सन्मानाचे वाटतात. मुंबई मराठी साहित्य संघात होणारी नाटके एकेकाळी फक्त गिरगावकरांना नव्हे तर संपूर्ण मुंबईतील लोकांना आकर्षणाचा विषय होती.

दुर्गाबाई खोटे, विजया मेहता, पु.ल. देशपांडे, दाजी भाटवडेकर, भालचंद्र पेंढारकर, रजनी जोशी, निर्मला गोगटे अशा मान्यवरांनी रंगमंदिर गाजवले आहे. स्वातंत्र्या-पूर्वीपासूनच मुंबई मराठी साहित्य संघाने नाट्यनिर्मिती सुरू केली होती. १९४१ साली विल्सन कॉलेजमध्ये नाट्यसंमेलन भरवले गेले त्यात साहित्य संघाने 'घरकुल' आणि 'उडती पाखरे' ही स्वत:ची निर्मिती असलेली नाटके केली. १९४३ साली सांगलीला संघाचे 'शारदा' हे नाटक सादर केले गेले. १९४४ मध्ये मुंबई मराठी साहित्य संघाने बऱ्याच जुन्या संगीत नाटकांना पुनरुज्जीवित केले आणि भव्य नाट्योत्सव केला.

मात्र साहित्य संघाच्या नाट्यशाखेची स्थापना खऱ्या अर्थाने १९४९ साली म्हणजे स्वातंत्र्यानंतर झाली. नाट्यशाखेने १९५० मध्ये शिरवाडकरांचे 'वैजयंती' नाटक केले, त्यात दुर्गाबाई खोटे, नानासाहेब फाटक यांनी भूमिका केल्या होत्या. १९५२-५३ मध्ये पु.ल. देशपांडे यांचे 'अंमलदार' नाटक केले. यानंतर 'खडाष्टक', 'भाऊबंदकी' यांचे प्रयोग संघाने सादर केले. साहित्य संघाच्या 'होनाजी बाळा' या नाटकाने दिल्लीकरांना मंत्रमुग्ध केले. पु.लं.चे 'सुंदर मी होणार' आणि खाडिलकरांचे 'सवाई माधवरावाचा मृत्यू'ही नाटकेही खूप गाजली. दरम्यान १९५८ मध्ये सुधा करमरकरांनी बालनाट्यशाखा सुरू केली आणि त्याद्वारे 'मधुमंजिरी' आणि 'जादूचा वेल' ही बालनाटके संघाने केली.

मात्र साहित्य संघाच्या या सगळ्या नाटकांचा उच्चतम बिंदू गाठणारे नाटक होते ते 'तुझे आहे तुजपाशी'! नाटक पु.लं.चे आणि काकाजीची भूमिका दाजी भाटवडेकरांची म्हणजे सुवर्ण संयोग. लोकांनी हे नाटक अक्षरश: डोक्यावर घेतले. त्या काळात या नाटकाचे पाठोपाठ शंभर प्रयोग झाले. दाजी भाटवडेकरांना तर बाहेर लोक काकाजी म्हणूनच ओळखू लागले. १९७४ साली भक्ती बर्वे यांनी काम केलेले साहित्य संघाचे 'अजब न्याय वर्तुळाचा' हे नाटक युरोपापर्यंत पोहोचले. त्याचे प्रयोग तिकडे इतके आवडले की जर्मन भाषेत या नाटकाचा प्रयोग तिकडच्या लोकांनी केला. विश्राम बेडेकरांचे 'टिळक आणि आगरकर'हे साहित्य संघाची निर्मिती, ही एक दर्जेदार कलाकृती ठरली. गेल्या १०-१५ वर्षांत 'धाडिला राम तिने का वनी', 'संत गोरा कुंभार' या संघनिर्मित नाटकांचे प्रयोग मुंबईबरोबरच गोवा, दिल्ली आणि संपूर्ण महाराष्ट्रात झाले. शं.ना. अंधृटकर, सुधाकर भानुशे, रजनी जोशी, सुभाष भागवत आणि सध्याचे कार्यवाह प्रमोद पवार हे नाट्यशाखेची धुरा उत्तम तऱ्हेने सांभाळत आले आहेत.

साहित्य-संस्कृती आणि नाट्य यांना एकत्र आणून समाजाचे मनोरंजन आणि ज्ञानवर्धन करण्याचे जे भव्य स्वप्न स्वातंत्र्यापूर्वी मोठ्या डॉ. भालेराव यांनी पाहिले, स्वत:चे सर्वस्व त्यासाठी दिले, ते आपल्या वडिलांचे हे स्वप्न डॉ. बाळ भालेरावांनी स्वातंत्र्योत्तर काळात खऱ्या अर्थाने पुढे नेले आणि त्यांच्यानंतरही हा जगन्नाथाचा रथ सध्याच्या कार्याध्यक्ष प्रा. उषा तांबे, प्रमुख कार्यवाह आणि डॉ. भालेरावांच्या कन्या डॉ. अश्विनी भालेराव आणि सर्व आर्थिक व्यवहारात जातीने लक्ष ठेवणारे कोषाध्यक्ष प्रकाश पागे अत्यंत सक्षमतेने पुढे नेत आहेत.

**- डॉ. उज्ज्वला मेहेंदळे**
भ्रमणध्वनी - ९८२०८०१७२०



# परिचय

**१. डॉ. राजशेखर शिंदे**

एम.ए. पीएच.डी. (मराठी), 'पु.शि. रेगे यांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पदवीसाठी संशोधन (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), 'अरुण कोलटकरांच्या कवितेचा शैली वैज्ञानिक अभ्यास' यु.जी.स. बृहत्प्रकल्प पूर्ण (२०१४), 'पु.शि. रेगे यांच्या कवितेचा शोध' (हर्मिस प्रकाशन, पुणे), असा असामी : पु.ल. देशपांडे (जन्मशताब्दी गौरवग्रंथ) संपादन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई. अनेक महत्त्वाच्या विषयांवर शोधनिबंध प्रकाशित.

**२. डॉ. अशोक भाईडकर**

सुप्रसिद्ध नाटककार, लेखक, लोकनाट्य, संशोधक विधिज्ञ. मुंबई विद्यापीठातून एम.ए. केले व डॉ. उषा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली 'दशावतारी' नाटक स्वरूप व समीक्षा हा प्रबंध लिहून दशावतारी नाटकावरील पहिली डॉक्टरेट मिळवली. वयाच्या १५व्या वर्षे त्यांनी 'भस्मासूर वद्यास्भान' नावाची एकांकिका लिहून आपला लेखनाचा प्रारंभ केला. 'हा जन्म तुझ्यासाठी' ही एकांकिका लिहिली व कॉलेजच्या फायनल इयरला 'शब्द जुळता सूर संपले' हे तीन अंकी नाटक लिहिले. 'सूड' हे तीन अंकी संगीत नाटक पीएच.डी. पूर्ण झाल्यानंतर त्यांनी सांस्कृतिक संचालनाच्या अनुदानावर दशावतारी फॉमॅटवर 'सं. उषास्वप्न' हे तीन अंकी नाटक लिहिले. 'दशावतार' या महाग्रंथाची निर्मिती केली.

**३. डॉ. अजय जनार्दन देशपांडे**

विभाग प्रमुख–मराठी आणि साहित्य विभाग. समीक्षक, संपादक. विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या वाङमयीन नियतकालिकाचे संपादन, 'सर्वधारा' या नियतकालिकाचे संपादक.

पुरस्कार – विदर्भ साहित्य संघाचा पा. ब. गाडगीळ स्मृती युगवाणी लेखन पुरस्कार, 'ग्रेस – वेदना आणि सौंदर्य' या ग्रंथास महाराष्ट्र साहित्य परिषदेचे वासंती गाडगीळ स्मृती उत्कृष्ट साहित्यमूल्य

**४. प्रा. संदिप दळवी**

श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली येथे सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत. एम.ए. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर भाषा विषयात सर्वप्रथम आल्याने राज्यपालांचे सुवर्णपतक प्राप्त. '१९८० नंतरच्या मराठी कादंबरीचा शैलीवैज्ञानिक दृष्टिकोणातून अभ्यास' या विषयावरील पीएच.डी. प्रबंधास वि.रा. करंदीकर उत्कृष्ट संशोधन पारितोषिक प्राप्त. जयंत पवार यांच्या कथालेखनावर 'हा ऋतू वेगळा आहे' या समीक्षाग्रंथाचे संपादन, मराठीतील विविध मान्यवर नियतकालिकांतून समीक्षात्मक लेखन.

**५. सुभाष सुंठणकर**

१९७१ पासून विनोदी कथालेखन. दिलीपराज, मधुश्री, युनिटी, पारख, अनघा, अजब, उदवेली वगैरे प्रकाशनातर्फे पंचवीसहून अधिक पुस्तके प्रकाशित. आवाज, मोहिनी, ऑल द बेस्ट, हास्यधमाल, हास्यानंद, रसिक,शामसुंदर, जत्रा, उत्तमकथा, तरुण भारत इत्यादी दिवाळी अंकांमधून कथा प्रसिद्ध. दरवर्षी साधारणतः दहा–बारा विनोदी कथा प्रसिद्ध. विविध संस्थांतर्फे चार पुरस्कार मिळाले आहेत.

**६. एकनाथ आव्हाड**

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध बालसाहित्यकार व कथाकथनकार. मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत गेली २९ वर्षे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. मुलांसाठी कथा, कविता, नाट्यछटा, चरित्र, काव्यकोडी असे विविध प्रकारचे लेखन करीत असून आजपर्यंत ३० पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांच्या काही पुस्तकांचे हिंदी, इंग्रजी भाषांमध्ये आणि ब्रेल लीपीमध्ये अनुवाद झालेले असून महाराष्ट्र शासनासह अनेक साहित्य संस्थांचे पुरस्कार पुस्तकांना लाभलेले आहेत.

**७. अंजली कुलकर्णी**

एम.ए. (मराठी साहित्य) एलएल.बी.

मराठी स्त्रीवादी कवयित्री /लेखिका, अनुवादक, वृत्तपत्रांतून लेख प्रसिद्ध. चार कवितासंग्रह, ललितलेखसंग्रह, अनुवादित कादंबरी, वैचारिक लेखसंग्रह, संपादित पुस्तके, सामाजिक चरित्रलेखन, संक्षीप्तीकरण, शैक्षणिक, कुमार कवितासंग्रह अशी एकूण १८ पुस्तके

प्रकाशित. पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात कविता संग्रहाचा व एका कवितेचा समावेश.
पुरस्कार- १) दोन कवितासंग्रहांना राज्य सरकारचा उत्कृष्ट साहित्य निर्मितीचे केशवसुत पुरस्कार, आणि अन्य एकूण २२ पुरस्कार. विविध संमेलनांचे अध्यक्षपद भूषविले आहे.

**८. संजय आत्माराम पवार**

सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई येथून उपयोजित कलेची पदविका (१९७४-७९). १९८० पासून पुण्यात आमची पंधरावी कला या जाहिरात निर्मिती संस्थेची स्थापना व त्यात १९९२ पर्यंत कार्यरत. परिचं नाट्यसंस्था संस्थापक सदस्य व लेखक, दिग्दर्शक म्हणून कार्यरत. (१९८७ ते १९९९) १९९२ पासून डॉ. जब्बार पटेल यांचे सहाय्यक म्हणून मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश. १९९४ पासून आजमितीस पटकथा व संवाद लेखक म्हणून पंचवीसहून अधिक मराठी/हिंदी चित्रपटांचे लेखन. आठ नाटकांचे लेखन, त्यातील दोन व्यावसायिक रंगभूमीवर. १९९२ पासून आजमितीस विविध वर्तमानपत्रातून राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषयावर स्तंभलेखन. सामाजिक समघटनांच्या कार्यात सहभाग. जाहिरात, चित्रकला, नाटक, साहित्य व चित्रपट लेखनासाठी अनेक खाजगी, राज्य व केंद्रीय पुरस्कार.

**९. अभिजित मुळ्ये**

'विज्ञान विश्व' या मराठीतून विज्ञान प्रसाराला वाहिलेल्या मासिकाचे संपादक म्हणून सध्या कार्यरत असलेल्या अभिजित मुळ्ये यांची ओळख प्रामुख्याने विज्ञान, पर्यावरण व आरोग्य पत्रकार म्हणून असली तरी त्यांनी इंग्रजी व हिंदी प्रसारमाध्यमांमध्येही विविध पदे भूषविली आहेत. विविध प्रकारच्या वृत्तपत्रीय लेखनासोबतच अनेक पुस्तकांचे संपादन, आकाशवाणीवरील भाषणे आणि दूरचित्रवाणीवरील पर्यावरण व विज्ञानविषयक कार्यक्रमांचे लेखनही त्यांनी केले आहे. मराठी पत्रकारितेचा इतिहास हा त्यांच्या विशेष अभ्यासाचा विषय असून पत्रकारितेच्या वर्गांमध्ये या विषयाचे अध्यापनही त्यांनी अनेक वर्षे केले आहे. मराठी आरोग्य पत्रकारितेतील योगदानाबद्दल त्यांना २००६ सालचा आरोग्य ज्ञानेश्वर पुरस्कार आणि २००९ सालचा वैद्य दाजीशास्त्री पदे पत्रकारिता पुरस्कार यांसारख्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

**१०. कृष्णा किंबहुने**

साहित्याचा विद्यार्थी आणि भाषांतरकार. एक कथासंग्रह आणि एक भाषांतरित कवितांचा संग्रह प्रकाशित.
काही समीक्षालेखही विविध नियत-अनियतकालिकांतून प्रकाशित.
कथासंग्रह : प्रथमपुरुष आणि भूमिती, मरम अल मसरी : निवडक कविता

**११. प्रा. डॉ. राजेंद्र गोविंदराव नाईकवाडे**

प्राध्यापक - मराठी विभाग
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, सक्करदरा चौक, उमरेड मार्ग, नागपूर ४४००२४
अनेक ग्रंथांचे यशस्वी संपादन. अनेक समीक्षा ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्यातील महत्त्वाचे ना. धों. महानोर यांची कविता, आस्वादन आणि मूल्यांकन - महानोरांची कविता, कवी आणि कविता - घ. ना. देशपांडे इ. अनेक ग्रंथ प्रकाशनाच्या मार्गावर असून 'नवे आकलन - भालचंद्र नेमाडे' या ग्रंथाचा समावेश आहे. अनेक वृत्तपत्रे व नियतकालिकांमधून लेख प्रसिद्ध.
* विभिन्न संस्था-संघटनात्मक दायित्व
२. उपाध्यक्ष, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
५. सहकार्यवाह, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर
६. उपाध्यक्ष, नचिकेत नाट्यचित्र संस्था, नागपूर
६. कार्यवाह, अ.ना.देशपांडे स्मृती समिती, नागपूर

**१२. डॉ. विजय चोरमारे**

३५ वर्षांचा पत्रकारितेतील अनुभव. सकाळ, लोकमत, प्रहार आणि महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रांतून वार्ताहर ते संपादक अशा विविध पदांवर काम केले आहे. राजकीय विश्लेषक म्हणूनही ओळख आहे. मराठीतील आघाडीचे कवी म्हणून ओळख. चार कवितासंग्रह प्रसिद्ध असून एका कवितासंग्रहाचा हिंदीत अनुवाद झाला आहे. कवितेसाठी राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

**१३. केशव सखाराम देशमुख**

केशव सखाराम देशमुख यांचा जन्म ५ फेब्रुवारी १९६५ मध्ये तुप्पा, ता. कळमनुरी, जि. हिंगोली या गावी एका कष्टकरी शेतकरी घरात झाला. या घडीला ते नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात मराठीचे वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून कार्य करीत आहेत. विद्यापीठात भाषा संकुलाचे संचालक म्हणून, कला विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून त्यांनी अकादमिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत. याच विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे ते विद्यमान अध्यक्ष आहेत.

मागील तीस वर्षांपासून काव्य, समीक्षा, वैचारिक आणि भाषाविषयक लेखन त्यांनी केले असून देशमुख यांचे सहा मराठी काव्यसंग्रह, एक समीक्षाग्रंथ, एक भाषाग्रंथ, दोन ललितलेखांचे संग्रह आणि चार संपादित ग्रंथ प्रकाशित आहेत.

**१४. डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे**

वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर येथील मराठी विभागात सहयोगी प्राध्यापकपदी कार्यरत. 'इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतली शेतकरी : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पदवीस्तव संशोधन. 'संत तुकारामांचा संत विषयक दृष्टीकोन : एक अभ्यास' या विषयावर विद्यापीठ अनुदान आयोगाकडे लघु संशोधन प्रकल्प सादर. प्रतिष्ठान, पंचधारा, अनुबंध, माझी मराठी, विचारशलाका, अक्षरगाथा, सर्वधारा, तुकावाणी, बसवपथ, बसवमार्ग, रिंगण अशी विविध नियतकालिके आणि संपादित ग्रंथातून ६५ लेख प्रकाशित. दै. महाराष्ट्र टाइम्स, दै. सकाळ, दै. देशोन्नती, दै. तरुण भारत, दै. पुण्यनगरी, दै. एकमत, दै.गावकरी, दै. गोदातीर, दै. प्रजावाणी अशा विविध वर्तमानपत्रातून ७० लेख प्रकाशित. महाराष्ट्रा बरोबरच कर्नाटकातील सभा, संमेलने, शिबिरे आणि कार्यशाळेत मराठी व कन्नड संत साहित्यावर व्याख्याने संपन्न.

**१५. डॉ. संगीता जोशी**

अ.भा. गझल संमेलन-अमरावती येथे अध्यक्षपद, गझलांची ५ पुस्तके प्रसिद्ध. तसेच एक उर्दू गझलांचे पुस्तक प्रसिद्ध, डॉ. द.भि. कुळकर्णी यांच्या 'भावकाव्य : स्वरूप व समीक्षा' या ग्रंथाचे संपादन. अन्य विषयावरील १५ पुस्तके प्रसिद्ध, अनेक पुरस्कार प्राप्त.

**१६. स्मिता पाटील**

कवितासंग्रह : पाझर डिंपल पब्लिकेशन्स, वसई आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरून ललितलेखन, कवितावाचन. मौज, कविता-रती, लोकसत्ता, झपूर्झा, अशा दिवाळी अंकात कथा, कविता, ललितलेखन, पुस्तक परिक्षण आदि प्रसिद्ध. 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण : महाराष्ट्र' (प्रकल्प प्रमुख : डॉ. गणेश देवी. अरुण जाखडे : संपादक) या प्रकल्पात वाडवळी आणि वारली बोलींची माहिती देणारे लेखन समाविष्ट आहे.

पुरस्कार - १. पालघर भूषण पुरस्कार : (२०१६) पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रतिष्ठान, मुंबई. ३. लक्ष्यवेधी पुरस्कार : (२००८)

**१७. सुशील धसकटे**

सध्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे 'मराठवाडा बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पदवीसाठी संशोधन करत आहे.

संपादक : परंतु दिवाळी अंक.

गेली १८ वर्षे मराठी ग्रंथप्रकाशनात ग्रंथ-संपादक आणि प्रकाशक म्हणून कार्यरत.

प्रकाशित पुस्तके :

१. जोहार (कादंबरी), अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे

२. मराठा समाज : वास्तव आणि अपेक्षा (सहकार्याने संपादक), राजहंस प्रकाशन-पुणे

३. जे आहे ते (लेखसंग्रह), अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे

४. मुद्रितशोधन (एम.ए. पाठ्यपुस्तक) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

५. भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी साहित्य : कादंबरी आणि ललितगद्य (बीए द्वितीय वर्ष पाठ्यपुस्तक), बहि:शाल विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

आगामी पुस्तक

७३-नाना पेठ (डॉ. बाबा आढाव यांच्याशी मनमोकळा संवाद), मनोविकास प्रकाशन, पुणे.

**१८. श्यामसुंदर देवीदास जोशी**

शिक्षण : सर जे जे स्कूल ऑफ आर्टस् येथून टेक्स्टाईल डिझायनरची पदविका.

सर्वसमावेशक, सोप्या पद्धतीचं वितरण असलेलं ग्रंथालय का काढू नये या विचारातून 'ग्रंथसखा' वाचनालयाचा जन्म. सर्व पैसे+राहता बंगला विकून व उरलेले कर्ज काढून २ लाख पुस्तके, सुमारे ५५ दोलामुद्रिते व १० हजार दुर्मीळ मासिकांचा संग्रह असलेल्या ग्रंथसखाचा जन्म. दुर्मीळ पुस्तके वाचण्यासाठी वातानुकूलित 'वाचनकक्ष, अभ्यासिका' उपलब्द. सुमारे ५० जण एका वेळी वाचन करू शकतील असा वाचनकक्ष.

आगामी भविष्यातील करावयाची कामे :

* मराठी भाषेच्या संवर्धन संशोधनासाठी 'स्वायत्त मराठी विद्यापीठाची' स्थापना करणे.
* ठाणे जिल्ह्याचे बदलापूर येथे साहित्य, संस्कृतीविषयक उपक्रमांसाठी सांस्कृतिक भवन उभारणे.
* ललित लेखकांसाठी कार्यशाळा. साहित्याचा आस्वाद कसा घ्यावा हे शिकविणारे आस्वाद शिबिर.
* साहित्य जगतात घडणाऱ्या अनेक गोष्टींचे डॉक्युमेंटेशन.
* ख्रिस्ती मराठी साहित्य, जैन व बौद्ध वाङ्मयाच्या अभ्यासासाठीची दालने.
* सेट व नेट परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

पुरस्कार :

* मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय केशव भिकाजी ढवळे पुरस्कार.
* अण्णा हजारे समाज रत्न पुरस्कार, १४ डिसेंबर २०१०
* व्यासरत्न पुरस्कार, ३१ जुलै २०१५
* चतुरंग - एकलव्य पुरस्कार, चिपळूण
* पुणे मराठी ग्रंथालयतर्फे साहित्यसम्राट न.चिं. केळकर पुरस्कार, २३ ऑक्टोबर २०१५

**१९. डॉ. मधुकर केशव वर्तक**

'नामदेव धोंडी महानोर कवी - एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. 'आठवांच्या पारंब्या' ही कादंबरी व 'मधुपर्क' कथासंग्रह प्रकाशित. 'कार्यमग्नता जीवन व्हावे' हा जीवनगौरवग्रंथ प्रकाशित. 'गंधाली' दिवाळी अंकाचे संस्थापक व संपादक.

**२०. रेखा नार्वेकर**

एम.एस्सी. ऑरगॅनिक केमेस्ट्री.

कथा, काव्य, ललित, बालसाहित्य, संवादमालिका, अध्यात्म अशा विविध साहित्य प्रांतातील दहा पुस्तके प्रकाशित.

कवडसे दिवाळी अंक आणि प्रसिद्ध साहित्याला मान्यवर संस्थांचे अनेक पुरस्कार.

देशात-परदेशात ज्ञानेश्वरीवर प्रवचने

अखिल भारतीय साहित्य संमेलनात अनेक वेळा निमंत्रित वक्ता म्हणून सहभाग

आकाशवाणी-दूरदर्शनवर विविध कार्यक्रमांचे लेखन व सहभाग.

विविध मान्यवर संस्थांवर अध्यक्ष-विश्वस्त-संयोजक म्हणून कार्यरत.

**२१. डॉ. उज्ज्वला मेहेंदळे**

'मराठीतील स्त्रियांची आत्मचरित्रे' या विषयावर पीएच.डी. दोन पुस्तकांचे लेखन, चार संपादित पुस्तके, दहा वर्षे साहित्य संघाच्या साहित्य शाखेची कार्यवाह. दहा वर्षे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळावर कार्यरत. सध्या अ.भा.म.सा. महामंडळाची कार्यवाह.

**२२. सतीश भावसार**

* इंडियन एअरफोर्ससाठी ट्रेनिंग फिल्मचे काम पूर्ण. शिवाय कैलास जीवनची ॲनिमेशन ॲड पूर्ण. श्याम बेनेगल यांच्याबरोबर 'सिमर्ग' या डॉक्युमेंटरी फिल्मचे काम पूर्ण.
* नवशक्ती वृत्तपत्रात बारा वर्षे कलासमीक्षक आणि चित्रकार म्हणून काम केले.
* सुपर्ण प्रकाशन पुणे यांच्यासाठी अकरा इंग्रजी क्लासिकल कादंबऱ्यांचा अनुवाद आणि ऋतुरंग दिवाळी अंकासाठी सातत्याने लेखन.
* जहांगीर साबावाला, व्ही.ए. माळी, डॉ. सुधीर पटवर्धन, माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या प्रदीर्घ मुलाखती घेतल्या.

※ पुस्तकांची मुखपृष्ठे आणि रेखांकने यात करिअर. चेतश्री प्रकाशनाने काढलेल्या 'श्यामची आई' या पुस्तकासाठी पहिले मुखपृष्ठ तयार केले. ते मुखपृष्ठ वडघर येथील सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारकामध्ये लावलेले आहे. त्यानंतर अंदाजे पाच हजारांहून अधिक पुस्तकांसाठी मुखपृष्ठे व शेकडो रेखांकने केली.

※ 'निवडक बाबूराव अर्नाळकर' स्मृतिग्रंथाचे लेखन व संपादन राजहंस प्रकाशनातर्फे २०१७ साली प्रसिद्ध.

※ निवडक बाबूराव अर्नाळकर या पुस्तकाला राज्यशासनाचा पुरस्कार

※ तीन चित्रकार हा लेखसंग्रह ग्रंथालीतर्फे प्रकाशित.

**२३. कविता विभाग**

※ नीरजा – भ्रमणध्वनी : ९९६९८१०८९६

※ नारायण कुलकर्णी कवठेकर – भ्रमणध्वनी : ९८५०७४२८८१

※ चंद्रशेखर सानेकर – भ्रमणध्वनी : ९८२०१६६२४३

※ दिनकर मनवर – भ्रमणध्वनी : ८१०८६८३९१९

※ प्रणव सखदेव – भ्रमणध्वनी : ७६२०८८१४६३

※ अशोक बागवे – भ्रमणध्वनी : ९६१९९७२७३२

※ किरण येले – भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०

※ प्रा. प्रतिभा सराफ – भ्रमणध्वनी : ९८९२५३२७९५

※ सदानंद डबीर – भ्रमणध्वनी : ९८१९९७८४२०

※ अशोक कोतवाल – भ्रमणध्वनी : ९८५०११७५३९

※ प्रज्ञा दया पवार (९८६९४८०१४१)

※ मीनाक्षी पाटील (९८२०७३७६९३)


## मुंबई मराठी साहित्य संघाची अलीकडील प्रकाशने

**एका पिढीचे आत्मकथन (दुसरी आवृत्ती),** संपादक : पु.शि. रेगे, वा.ल. कुळकर्णी, रा.भि. जोशी, गं.ब. ग्रामोपाध्ये

**दुसऱ्या पिढीचे आत्मकथन,** संपादक : उज्ज्वला मेहेंदळे

**मराठी बोलु कौतुके,** संपादक : अशोक बेंडखळे / उषा तांबे

**एका मुंबईकराची कहाणी (दीर्घकथा),** लेखक : गंगाधर गाडगीळ

**काशिनाथ त्र्यंबक तेलंग (अल्पचरित्र),** लेखक : गंगाधर गाडगीळ

**मराठी साहित्य सूर्यमाला,** संपादक मंडळ : सुहासिनी कीर्तिकर, चंद्रशेखर गोखले, प्रतिभा बिस्वास, सावित्री हेगडे

**ज्ञानतपस्वी रुद्र – न.र. फाटक यांचे चरित्र,** लेखिका : अचला जोशी

**मराठी नाट्यसंमेलन अध्यक्षीय नाट्यसूर्यमाला : भाग २,** संकल्पना : शं.ना. अंधृटकर, संपादन : सुभाष भागवत

**महानगर मराठी साहित्य संमेलन : अध्यक्षीय विचार,** संकल्पना : ज.बा. कुलकर्णी,
संपादक मंडळ : उषा तांबे, उज्ज्वला मेहेंदळे, अशोक बेंडखळे, पद्माकर शिरवाडकर

**इये मराठीचिये नगरी,** संपादक : अशोक बेंडखळे / डॉ. उज्ज्वला मेहेंदळे

**तिसऱ्या पिढीचे आत्मकथन, भाग १ आणि २,** संपादक : डॉ. उज्ज्वला मेहेंदळे

**अमृत कण कोवळे,** लेखिका : रेखा नार्वेकर

**''बालसाहित्याचे स्वरूप आणि व्याप्ती''**
संपादक : डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, सहसंपादक : श्री. एकनाथ आव्हाड

## साभार पोच

- **बुद्धायन –** अशोक गुप्ते, संवेदना प्रकाशन, मुखपृष्ठ–सतीश भावसार, पृष्ठे–१६८, मूल्य–रु. २५०/–
- **काळीज विकल्याची गोष्ट –** आप्पासाहेब खोत, ललित पब्लिकेशन, मुखपृष्ठ–आप्पासाहेब मेथे पाटील, पृष्ठे–१६०, मूल्य–रु. २५०/–
- **लज्जत –** मधुकर धर्मापुरीकर, संवेदना प्रकाशन, मुखपृष्ठ–संतोष धोंडगे, पृष्ठे–१४०, मूल्य–रु. २००/–
- **तुकोबा –** राजेंद्र दास, अक्षरवाङ्मय प्रकाशन, मुखपृष्ठ–अन्वर हुसेन, मांडणी–प्रदीप खेतमकर, रेखाटने–श्रीधर अंभोरे, पृष्ठे–९५, मूल्य–रु. १५०/–
- **सांजफुले –** तुकाराम पुंडलिक खिल्लारे, अनुदिन प्रकाशन, मुखृपष्ठ–संतोष घोंगडे, पृष्ठे–१३६, मूल्य–रु. १६०/–
- **जखमेत वीज माझ्या –** अजित मालंडकर, अष्टगंध प्रकाशन, मुखपृष्ठ–संतोष घोंगडे, पृष्ठे–७०, मूल्य–रु. २००/–
- **अल्लखचिन्हे –** मेगमेहेन, बुकगंगा पब्लिकेशन, मुखपृष्ठ–अन्वर हुसेन, पृष्ठ–१०३, मूल्य–रु. १४९/–
- **शतकोत्तरी ओरखडा –** राजीव जोशी, वर्णमुद्रा प्रकाशन, मुखपृष्ठ–चंद्रमोहन कुलकर्णी, पृष्ठ–२२९, मूल्य–रु. ४००/–
- **रोलां बार्थ –** आनंद कुलकर्णी, प्रकाशक–सुचिता अविनाश साळापुरीकर, मुखपृष्ठ–अविनाश साळापुरीकर, पृष्ठे–९४, मूल्य–रु. २००/–
- **अशी जिंदगानी –** तुकाराम खिल्लारे, अनुदिन प्रकाशन, मुखपृष्ठ–देविदास पेशवे, पृष्ठे–१२०, मूल्य–रु. १००/–
- **गझल गौरव –** निफाडकर गौरव समिती, मुखपृष्ठ–कै. नयन बारहाते, पृष्ठे–२००, मूल्य–रु. २५०/–
- **उंबळट –** गोपाळ गावडे, स्वच्छंद प्रकाशन, मुखपृष्ठ–संपत नायकवडी, पृष्ठे–१२०, मूल्य–रु. १५०/–
- **माझं घर (नाटक) –** जयंत पवार, शब्दालय प्रकाशन, मुखपृष्ठ–दत्ता पाटील, पृष्ठे–९५, मूल्य–रु. १९९/–
- **डिळी –** सुचिता खल्लाळ, शब्दालय प्रकाशन, मुखपृष्ठ–चंद्रमोहन कुलकर्णी, पृष्ठे–१६०, मूल्य–रु. २९०/–
- **हंडाभर चांदण्या –** दत्ता पाटील, शब्दालय प्रकाशन, मुखपृष्ठ–निलेश सूर्यवंशी, पृष्ठे–१०७, मूल्य–रु. १५०/–
- **अंधातर अंधारात –** महेश केळुसकर, शब्दालय प्रकाशन, मुखपृष्ठ–अन्वर हुसेन, पृष्ठे–११८, मूल्य–रु. २२०/–
- **चाव्या –** दिलीप पुरुषोत्तम चित्रे, शब्दालय प्रकाशन, मुखपृष्ठ–संदीप सोनावणे, पृष्ठे–११०, मूल्य–रु. २००/–
- **साहित्य आणि अस्तित्वभान (भाग २) –** दिलीप पुरुषोत्तम चित्रे, शब्दालय प्रकाशन, मुखपृष्ठ–संदीप सोनावणे, पृष्ठे–६५३, मूल्य– रु. १०००/–
- **सावी –** सतीश सोळांकुरकर, अष्टगंध प्रकाशन, मुखपृष्ठ–संजय शेलार, पृष्ठे–१२२, मूल्य–रु. २००/–
- **युगवाणी –** अरुण कोलटकर विशेषांक, संपादक–प्रफुल्ल शिलेदार, विदर्भ साहित्य संघ प्रकाशन, मुखपृष्ठ–संदेश भंडारे, पृष्ठे–१८३, मूल्य–रु. २००/–
- **अभिधानंतर –** संपादक–हेमंत दिवटे, मुखपृष्ठ–झार्या मॅक्सिम अलेक्सांड्रोविच, पृष्ठे–११६, मूल्य–रु. २००/–
- **पत्रसंवाद भाग १, २ –** रमेश गोविंद कुलकर्णी, बुधकर प्रकाशन, मूल्य–रु. २५०/–, २००/–

येथे प्रश्न असा विचारला जातो-व अलीकडे कांही टीकाकारांकडून विचारला जातहि आहे-की हीं असलीं जीवनाचीं धांवपळीचीं क्षणचित्रें रेखाटण्यांत काय फायदा आहे ? जीवनाची ही असली थरथरती स्फुट जाणीव जीवनांतील अंतिम सत्यें थोडींच आमच्या नजरेस आणून देऊं शकेल ? तिला तीं व्यक्त करतां येणारच नाहीत. ह्या असल्या क्षण-चित्रांना 'हॅम्लेट'ची योग्यता कधीच प्राप्त होणें शक्य नाही. हा आक्षेप खरा आहे. ह्या वस्तुदर्शनांना 'हॅम्लेट'ची योग्यता प्राप्त होईल असें कोणीहि म्हणत नाही; परंतु ह्याचा अर्थ त्यांना वाङ्मयांत स्वतंत्र अस्तित्व नाही, असा नाही. त्यांची योग्यता 'हॅम्लेट-' सारखी नसेल, परंतु त्यांजकडून एक मोठें वाङ्मयकार्य घडत आहे. कार्य कोणतें म्हणाल तर श्रेष्ठ साहित्याला प्रत्यक्षाचा मालमसाला पुरविण्याचें. जीवनाचे अनेक लहानमोठे अनुभव, त्यांतील वर्तमानाचा तजेला यत्किंचितहि कमी होऊं न देत जसेच्या तसे बिंबित करण्याची शक्ति ह्या वस्तुदर्शनांच्या ठिकाणीं असल्यामुळें जीवनाच्या किती विविध अंगांचें दर्शन आता वाङ्मयांत होऊं लागलें आहे !

– वा.ल. कुलकर्णी यांनी लिहिलेल्या, 'डायरींतील पानें' या लेखातून. ('साहित्य' जाने. १९४७)

पाश्चिमात्य देशांत लेखकांचें मार्गदर्शन करण्यासाठी वर्ग चालतात. तशाच संपादक-प्रकाशकांचें निवडीचें कार्य सोपें हाेण्यासाठी वर सुचविलेल्या पद्धतीच्या वाङ्मय-संस्था आहेत. लेखकांचे हितसंबंध दर्शविणाऱ्या व सांभाळणाऱ्या संस्था आहेत. तसेंच वाचकांना उत्तम वाङ्मय कोणतें हें सांगणाऱ्या प्रतिष्ठित समीक्षकांचें साहाय्य घेणाऱ्या संस्था, निवडमंडळें, वाङ्मयीन क्लब्स आहेत. समाजांतील अराजक मोडण्या-साठी जशा राज्यव्यवहारांतील संस्थांचें नियंत्रण स्वीकारावें लागतें, त्याच प्रमाणें वाङ्म-यांतहि नियंत्रणसंस्थांचें पाश्चिमात्य देशांत अवतरलेलें युग कांही सोयिस्कर फेरबद-लाने आपण आपल्याकडे रूढ केलें पाहिजे. तसें न केलें तर वाङ्मयीन दर्जा सांभा-ळणें कठिण जाईल. वाङ्मयांत हीन दर्जाचें लिखाण सोडून देणें आणि त्याचा अनिर्बंध प्रसार करणें हे दोन्हीहि समाजविरोधी गुन्हे आहेत ही जाणीव एकदा झाली तर कोणीहि सत्प्रवृत्त मनुष्य हे गुन्हे हट्टाने करीत राहील असें वाटत नाही. परंतु कांही सत्प्रवृत्त लोकांनाहि सद्वर्तनाच्या मर्यादा समजण्यासाठी आणि दुष्प्रवृत्तीच्या लोकांना योग्य मर्यादेंत ठेवण्यासाठी कायद्याची आवश्यकता भासते तद्वतच जिज्ञासूंच्या शिक्षणासाठी आणि नालायकांच्या नियंत्रणासाठी असल्या वाङ्मयसमीक्षक संस्थांचीं नियंत्रणा अवश्य आहे. सरकारने देखील या संबंधांत थोडाबहुत हस्तक्षेप करण्यास हरकत नाही. अर्थात् त्याला सर्वोत्तम तज्ज्ञांचें पाठबळ मिळालें असेल तर. ● ● ●

– दि.वि. काळे ('व्यासपीठ' या लेखातून. साहित्य जाने. १९४७ )

# मुंबई मराठी साहित्य संघ


**विश्वस्त** : श्रीमती विजया दिवेकर, श्री अभिजित गजेंद्रगडकर, श्री. अभय भालेराव

**अध्यक्ष** : श्रीमती अचला जोशी

**उपाध्यक्ष** : श्री. माधव खाडिलकर, श्री. अशोक कोठावळे,
श्री. गंगाराम गवाणकर, श्रीमती रजनी जोशी,
डॉ. मधुकर केशव वर्तक, श्री. जयंत सावरकर

**नियामक मंडळ सदस्य** : प्रा. उषा तांबे, श्री. प्रकाश पागे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे,
श्री. सुभाष भागवत, प्रा. सुहासिनी कीर्तिकर,
श्री. अशोक बेंडखळे, श्री. चंद्रशेखर गोखले,
श्री. स्वामीकुमार बाणावलीकर, श्री. पद्माकर शिरवाडकर,
प्रा. प्रतिभा बिश्वास, श्री. एकनाथ आव्हाड, प्रा. नरेंद पाठक,
श्री. प्रमोद पवार, प्रा. प्रतिभा सराफ, श्रीमती सावित्री हेगडे,
श्री. दिलीप भाटवडेकर, श्रीमती शकुंतला मुळ्ये,
श्री. विलास म्हामणकर, श्री. सुधीर ठाकूर,
डॉ. अश्विनी भालेराव गांधी, श्री. रोहिदास पांगे,
श्रीमती रेखा नार्वेकर, श्रीमती शैलेजा म्हात्रे, श्री. मनोहर सोमण,
श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर, श्री. यशवंत भिडे,
डॉ. अनुपमा उजगरे, डॉ. दीपक पवार, डॉ. सुरेखा सबनीस,
श्री. नारायण लाळे, श्री. अनंत दाभोळकर, श्री. सतीश सामंत,
श्री. अनिल गचके, श्री. सारंग दर्शने, श्री. सिद्धार्थ पारधे,
श्री. दिवाकर नातू, श्री. ज्ञानेश पेंढारकर

**स्वीकृत सदस्य** : श्रीमती मीनाक्षी जयकर, श्री. आमोद उसपकर

**सन्माननीय सल्लागार** : श्री. जयराज साळगावकर, श्री. दिनकर गांगल, श्री. प्रसाद कांबळी

**कार्यकारी मंडळ** : प्रा. उषा तांबे, श्री. प्रकाश पागे, डॉ. अश्विनी भालेराव गांधी,
श्री. सुभाष भागवत, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्री. प्रमोद पवार,
प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. मनोहर सोमण,
श्री. अशोक बेंडखळे, श्री. रोहिदास पांगे,
श्री. सुधीर ठाकूर, श्री. एकनाथ आव्हाड

## नार्वेकर फार्म्स – किहीम, अलिबाग तर्फे  हार्दिक शुभेच्छा.


निसर्गरम्य हिरवागार परिसर, स्विमिंग पूल, आवडीचे भोजन, प्रशस्त बंगले, कॉटेजिस  – शिवाय खेळण्यासाठी प्रशस्त मैदान. –

मुंबईपासून फक्त एक तासाच्या अंतरावर.

कौटुंबिक समारंभ तसेच डेस्टिनेशन Wedding साठी उपलब्ध.  संपर्क साधा  ९८९२९३८१८०















प्रकाशक: मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ.भालेराव मार्ग,गिरगाव,मुंबई ४. फोन:२३८७६१५८
वितरक : ग्रंथाली, वुलन मिल म्यु.स्कूल,जे.के.सावंत मार्ग,माटुंगा(प.),मुंबई१६